1877

222
20 II

292
202

292
202

पुस्तकालय 42565
गुरुकुल कांगड़ी विश्वविद्यालय
विषय संख्या 292 आगत नं० .....
लेखक 202 ......
शीर्षक ......

दिनांक	सदस्य संख्या	दिनांक	सदस्य संख्या

गुरुकुल कांगड़ी विश्वविद्यालय
कृपया पुस्तक के ऊपर कोई निशान आदि
न लगायें।

२१२
२०II

४२,२६५

६३-०१

पुस्तकालय

गुरुकुल कांगड़ी विश्वविद्यालय

हरिद्वार

४२,२६५

वर्ग संख्या २१२/२०II आ. सं. ....

पुस्तक-वितरण की तिथि नीचे अंकित है। इस तिथि सहित 30वें दिन तक यह पुस्तक पुस्तकालय में वापिस आ जानी चाहिए। अन्यथा 10 पैसे प्रतिदिन के हिसाब से विलम्ब-दण्ड लगेगा।

212,20ii

42575

२१२
२०५ ६५०० . ११३ ३२
३/२

9. Thou didst, with the ... riot-wheel cut ... ten kings

VEDÂRTHA-YATNA

OR

AN ATTEMPT TO INTERPRET THE VEDAS.

वेदार्थयत्न.

COMPILED

ऋग्वेदसंहिता

पदांसहित व

तिचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

B.2

पुस्तक १. एप्रिल सन १८७७. अंक १३.
Vol I April 1877 No 13

CHECKED 1973
Initial

मुंबई
"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

(हें सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदलें आहे.)

माझे

सर्व आर्य बंधु व भगिनी

यांस

हें भाषांतर

सादर समर्पण केलें आहे.

भाषांतरकर्ता.

२१२ / २०५ ४५००६ . २२३ / ३/२

९. तूं सहायरहित सुश्रवसानें ज्यांजवर घाला घातला होता [अशा] त्या वीस राजांस [आणि] [त्यांच्या] साठ हजार नव्याणव [सैन्यासहि] दुर्धर रथचक्रानें मारून टाकिता झालास, [आणि तेणेंकरून] प्रख्यात [झालास].

9. Thou didst, with the invincible, chariot-wheel cut down those twice ten kings, [that were] attacked by the unaided Sus'ravas, [and] [their] sixty thousand and ninty, nine [men] [and]-[becamest] renowned.

---

९. आठव्या मंत्रांत सांगितलीं त्याशिवाय इंद्रानें उपासकांच्या शत्रूंचा वध केला याचीं आणखी उदाहरणें या मंत्रांत सांगतो;–'सुश्रवस् या नांवाचा कोणीएक उपासक आपल्या बलाढ्य वीस शत्रूंबरोबर लढावयास गेला असतां, त्याचें साहाय्य करण्यास कोणीहि नव्हता; तेव्हां इंद्रानें त्याचें साहाय्य केलें, आणि प्रखर चक्र घेऊन ते वीसहि शत्रु आणि त्यांचें असंख्य सैन्य मारून टाकिलें.'

'सुश्रवसानें.' हा 'सुश्रवस्' कोण होता आणि याचे वीस शत्रु कोण याविषयीं कांहीं इतिहास ठाऊक नाहीं, निदान ऋग्वेदांत तरी सांपडत नाहीं.

'साठ हजार नव्याणव [सैन्यास]'= 'षष्टिं सहस्रा नवतिं नव.' ही संख्या वास्तविक असलेल्या सैन्याची नसावी, अपरिमितार्थीं परिमितार्थसंख्यावचन योजिलें आहे असें दिसतें. असंख्य इतकेंच तात्पर्य.

'रथचक्रानें' = 'चक्रेण रथ्या.' रथाच्या चक्रानें युद्ध करणें, आणि चक्र म्हणून जें अस्त्र आहे तेणेंकरून युद्ध करणें, हें एकच आहे कीं काय नकळे. तरीहि 'नि अवृणक्' (अक्षरशः कापून टाकिता झालास) याचा प्रयोग केला आहे, त्यावरून एकच असावें असें वाटतें. परंतु मग 'रथ्य' हें विशेषण कां लाविलें आहे तें समजत नाहीं. वर आठव्या मंत्रांत जें 'वर्तनि' शब्दानें चक्र सांगितलें आहे तें आणि या मंत्रांतील चक्र एकच आहे असें दिसतें, आणि त्याला 'तेजिष्ठ' (=परमतेजस्वी) असें विशेषण लाविलें आहे तें त्याच्या धारेच्या संबंधानें आहे.

'[आणि तेणेंकरून] प्रख्यात [झालास]'='श्रुतः.' अक्षरशः अर्थ 'प्रख्यात' इतकाच आहे. सायणाचार्य 'प्रख्यात असा जो तूं तो' असें गुणविशेषण करितात; परंतु अशा गुणविशेषणाचें येथें प्रयोजन नसल्यामुळें आम्हीं विधिविशेषणाच्या भावार्थानें भाषांतर केलें आहे.

त्वमा॑विथ सु॒श्रव॑सं॒ तवो॒तिभि॒स्तव॒ त्राम॑भिरिन्द्र॒ तूर्व॑याणम् ।
त्वम॑स्मै॒ कुत्स॑मतिथि॒ग्वमा॒युं म॒हे रा॒ज्ञे यूने॑ अरन्धनायः ॥ १० ॥

त्वम् । आ॒वि॒थ॒ । सु॒ऽश्रव॑सम् । तव॑ । ऊ॒तिऽभिः॑ । तव॑ । त्राम॑ऽभिः ।
इन्द्र॒ । तूर्व॑याणम् ।
त्वम् । अ॒स्मै॒ । कुत्स॑म् । अ॒ति॒थि॒ऽग्वम् । आ॒युम् । म॒हे । रा॒ज्ञे । यूने॑ ।
अ॒र॒न्ध॒ना॒यः॒ ॥ १० ॥

भाषायाम्.

१०. हे इन्द्र, त्वं सुश्रवसम् (=एतन्नामानं पूर्वोक्तं राजानं) तव ऊतिभिः (=पालनैः) आविथ (=ररक्षिथ) [तथा] तव त्रामभिः (=त्वदीयैः संरक्षणैः) तूर्वयाणम् (=एतन्नामानं राजानं=दिवोदासम् ?) [आविथ], त्वं कुत्सम्, अतिथिग्वं [तथा] आयुम् (=एतांस्त्रीन् राज्ञः) अस्मै महे (=महते) यूने राज्ञे (=दिवोदासाय ?) अरन्धनायः (=तस्य वशमानयः)

१०. हे इंद्रा, तूं तुझ्या पालनांनीं सुश्रवसास रक्षिलेंस, तुझ्या अभयाश्वासनांनीं तूर्वयाणास [रक्षिलेंस]. तूं कुत्साला, अतिथिग्वाला, [आणि] आयूला त्या मोठया तरूण राजाच्या हस्तगत करून दिलेंस.

10 Thou didst protect Sus'ravas with thy protections [didst protect], O Indra, Tûrvayâṇa with thy supports. Thou subjectedst Kutsa, Atithigva, [and] Ayu to that great youthful king.

---

१०. आणखीहि पुढें उदाहरणें सांगतो:— ' सुश्रवसाचे शत्रु मारून सुश्रवसाला रक्षिलें; तूर्वयाणाचे शत्रु मारून तूर्वयाणाला रक्षिलें; आणि कुत्स, अतिथिग्व, आणि आयु यांस हस्तगत करून घेऊन ते ज्या तरूण आणि मोठ्या इंद्रोपासक राजाला (तूर्वयाणाला=दिवोदासाला?) उपद्रव देत, त्याच्या अमलाखालीं आणिलें.' यांपैकीं सुश्रवसाविषयीं वरच्या मंत्रांत एकदा सांगितलेंच आहे.

' तूर्वयाण ' याविषयीं कांहीं इतिहास ठाऊक नाहीं. मात्र ऋ. ६. १८. १३ यांत ' तूर्वयाण ' म्हणजे दिवोदास असें सायणाचार्य म्हणतात.

'कुत्स' आणि 'अतिथिग्व' हे कोण आहेत याविषयीं ऋ. १. ५१. ६ यावरील टीप पाहा.

' आयु ' हें एका मनुष्याचें नांव आहे. त्याविषयीं इतिहास कांहीं ठाऊक नाहीं. मात्र 'कुत्स,' ' अतिथिग्व ' आणि ' आयु ' या तिघांस इंद्रानें जिंकिलें असें ऋग्वेदांत एक दोन ठिकाणीं सांगितलें आहे. (ऋ. २. १४. ७; ६. १८. १३ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पाहा).

' तरूण राजाच्या. ' हा तरूण राजा कोण? सायणाचार्य 'सुश्रवस्' असें म्हणतात, परंतु या वाक्यांतील शब्दसाहचर्यावरून पाहातां ' तूर्वयाण ' असावा आणि ' तूर्वयाण ' म्हणजे दिवोदास होय असें सायणाचार्यांचें मत असल्याविषयीं वर सांगितलेंच आहे.

212,20ii
42575

य उद्दचीन्द्र देवगोपाः सखायस्ते शिवतमा असाम ।
त्वां स्तोषाम त्वया सुवीरा द्राघीय आयुः प्रतरं दधानाः॥११॥१६

ये । उत्ऽऋचि । इन्द्र । देवऽगोपाः । सखायः । ते । शिवऽतमाः । असाम ।

त्वाम् । स्तोषाम । त्वया । सुऽवीराः । द्राघीयः । आयुः । प्रऽतरम् । दधानाः ॥ ११ ॥ १६ ॥

भाषायाम्.

११. [हे इन्द्र], ये वयम् उदृचि (=अस्मिन् यज्ञसमाप्ते) देवगोपाः (=देवैः संरक्षिताः) [देवानां च] सखायः (=मित्राणि) [स्मः] ते (=तादृशा) [वयम्] [उत्तरमपि] शिवतमाः (=अतिशयेन कल्याणाः=अतिशयेन सुखिनः) असाम, (=स्याम), [तथा] त्वया (=तवानुग्रहेण) सुवीराः (=शोभनपुत्रवन्तः) [तथा] द्राघीयः (=अतिशयेन दीर्घम्) आयुः प्रतर (=प्रकर्षेण यथा तथा) दधानाः (=धारयन्तः) [सन्तः] त्वां स्तोषाम (=तव स्तुतिं करवाम)॥

'ते' इत्यत्र निघातः 'असाम' इत्यत्र निघाताभावश्च व्यत्ययेन जातोस्तीत्यनुसंधेयम् । अथवा हे इन्द्र, ये वयम् उदृचि यज्ञसमाप्ते देवगोपा देवरक्षितास्ते तव शिवतमाः सखायः सुखितमा मित्रा असाम अभूम ते वयं त्वां स्तोषामेति अनुसायणाचार्यं व्याख्यातव्यम् ॥

११. हे इंद्रा, जे [आम्ही] [या] यज्ञसमाप्तीपर्यंत देवरक्षित आणि [देव]मित्र [आहों] ते [आम्ही] परम सुखी होऊं असें कर. [आणि] तुझ्या कृपेनें शूरपुत्रसंपन्न [आणि] फार दीर्घायुष्यसंपन्न [होत्साते] तुला स्तवीत राहूं असें कर.

11. May [we] who at [this] end of the hymn [are] god-protected and [god]-friends, [continue to] be most blessed. May [we], long enjoying under thy grace a lengthened life [and] possessed of brave sons, ever sing thy glory.

११. हा या सूक्ताचा उपसंहार आहे. आणि सर्व सूक्ताच्या अंतीं जी प्रार्थना अथवा मागणें करावयाचें तें यांत केलें आहे. तें हें कीं, 'हे इंद्रा, आतां हें आमचें सूक्त संपलें, आणि आम्हीं जें हें सूक्त म्हटलें त्यापासून आम्हांवर देवांची कृपा होऊन आम्ही त्यांचे सखे झालों आहों. आणि ते आम्हांवर प्रसन्न होऊन आमचे संरक्षिते झाले आहेत. तर यापुढें आम्ही अत्यंतसुखी होऊं असें कर, आणि तुझ्या कृपेनें आम्हांस शूर अशीं पुत्रपौत्रादि अपत्यें प्राप्त होऊन आम्ही दीर्घायुषी होऊं, आणि हे इंद्रा, तुझी नित्य स्तुति गात राहाण्याची इच्छा धरूं असें कर.' यांत जो वर मागितला आहे तिकडे लक्ष द्यावें. देवांनीं आपलें रक्षण करावें, आणि आम्हांस आपल्या सख्यत्वाचा लाभ द्यावा हेंच परम सुख मागितलें आहे, आणि शौर्यसंपन्न पुत्रपौत्र आणि दीर्घायुष्य जरी मागितलें आहे तरी इंद्राची विस्मृति न पडतां सदैव त्याचें स्तोत्र करण्याची इच्छा असावी असें वरप्रदान मागितलेलें फार सुंदर आहे. आपल्या उत्कर्षीच्या वेळीं आपण आपल्या सुखांत निमग्न होऊन देवांला विसरतों, तर तसें न होतां सुखाच्या वेळीं सुद्धा देवसेवा करण्याची इच्छा राहो अशी प्रार्थना करणें म्हणजे खरोखर धर्मज्ञानाचा कळस होय यांत शंका नाहीं.

फारकरून प्रत्येक प्रार्थनेंत शौर्यसंपन्न पुत्रपौत्र आपणास प्राप्त व्हावे असें वैदिक ऋषि मागत याविषयीं पूर्वीं सांगितलेंच आहे. तरीहि या सुंदर मंत्रांतहि तोच वर मागितला आहे हें सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. कारण कीं आलीकडील वर मागण्यांत, आणि वैदिक युगांत ऋषि वर मागत असत त्यांत मोठा भेद असलेला जितके वेळ दाखविला तितका थोडाच. आणि प्राचीन ऋषि म्हणजे सर्व संसार सोडून योगसाधनांत हजारो वर्षेंपर्यंत तपोबळानें आपलें आयुष्य आपणच वाढवीत असत, आणि त्यांच्या तपाची भीति देवांस पडे, देवांच्या कृपेची त्यांस विशेष अवश्यकता नसे अशी जी आपली समजूत आहे ती निदान वेदमंत्रांचे जे द्रष्टे ऋषि त्यांस

सूक्तम् ५४.

आङ्गिरसः सव्य ऋषिः । इन्द्रो देवता । छन्दस्तु षष्ठ्यष्टमीनवम्येकादशीनां त्रिष्टुभ् । शिष्टा जगत्यः ।

मा नो॑ अ॒स्मिन्म॑घवन्पृ॒त्स्वंह॑सि न॒हि ते॒ अन्तः॒ शव॑सः परी॒णशे॑ । अक्र॑न्दयो न॒द्यो॒३॒॑ रोरु॑वद्व॒ना क॒था न क्षो॒णीर्भि॒यसा॒ समा॑रत ॥१॥

मा । नः॒ । अ॒स्मिन् । म॒घ॒ऽव॒न् । पृ॒त्ऽसु । अंह॑सि । न॒हि । ते॒ । अन्तः॑ । शव॑सः । प॒रि॒ऽन॒शे॑ ।
अक्र॑न्दयः । न॒द्यः॑ । रोरु॑वत् । व॒ना । क॒था । न । क्षो॒णीः । भि॒यसा॑ । सम् । आ॒र॒त ॥ १ ॥

भाषायाम्.

१. हे मघवन्, नः (=अस्मान्) अस्मिन् (=पुरोवर्तिनि) अंहसि (=पापे=दुःखे) [एतासु] पृत्सु (=युद्धेषु) मा [प्रक्षेप्सीः] । ते (=तव) शवसः (=बलस्य) अन्तः परीणशे न (=प्राप्तुं न= न प्राप्यते) । रोरुवत् (=अतिशयेन गर्जनं कुर्वन्) [त्वं] नद्यः (=नदीः) [तथा] वना (=वनानि=उदकानि) अक्रन्दयः (=अशब्दयः= शब्दयसि) । एवं सति क्षोणीः (=क्षोण्यः=विशः=जनाः) भियसा (=त्वद्भयेन) कथा (=कथं) न सम् आरत (=न संगच्छेरन्=न संगच्छन्ते ?) ॥

कंचित् संग्रामरूपं प्राणसंकटप्रसङ्गम् उद्दिश्य वचनमिदं सव्यस्य । य इन्द्रः वृत्रं भित्त्वा सगर्जनेन तथा लोकांश्च भयहेतुत्वात् समासयता महता मेघजलवर्षणेन तज्जाता नदीर्महदशब्दयत् तेन च स्वबलम् अनन्तमिति आविरभावयत् सोऽस्मिन् दारुण-प्रसङ्गेऽस्माकं प्राणसंकटस्य निवारको भविष्यतीति भावगतम् ॥

तरी लागू पडत नाहीं; आलीकडच्या ऋषींस पडत असेल तर ती गोष्ट वेगळी.

‘ यज्ञसमाप्तीपर्यंत’=‘ उदृचि.’ हा अर्थ आम्हीं सायणाचार्यांस अनुसरून केला आहे. ऋग्वेदांत हा शब्द आणखी एकच वेळ आला आहे (ऋ. १०.७७.७). तेथेंहि सायणाचार्यांनीं हाच अर्थ केला आहे. परंतु ‘ उदर्क ’ असा जो ‘ भविष्यकाळ ’ या अर्थी संस्कृतांत शब्द आहे तो, आणि हा एकच असेल. व्युत्पत्ति पाहूं गेलें असतां एकच आहे यांत संशय नाहीं, तर मग ‘ ये उ॒दृची॑न्द्र दे॒व गोपाः॒ सखा॑यस्ते शि॒वत॑मा असाम ’ असा पाठ अर्थासाठीं धरून, ‘हे इंद्रा, आम्हीं यापुढें जसें देवरक्षित व्हावें तसे देवांचे परमसुखी मित्रहि होऊं असें कर’ (=यथा

सूक्त ५४.

ऋषि—सव्य (पूर्वे सूक्ताचा जो तोच). देवता—इंद्र. वृत्त—६, ८, ९ आणि ११ यांचें त्रिष्टुभ्; राहिलेल्यांचें जगती.

Hymn 54.

To Indra. By *Savya* (author of the previous hymn). Metre—*Jagatî*, except 6, 8, 9, and 11, where it is *Trishtubh*.

१. हे मघवा, आम्हांस या दुःखांत, [या] युद्धांत [घालूं] नकोस; तुझ्या बळाचा अंत लागत नाहीं. [तूं] मोठी गर्जना करीत करीत नद्यांस [आणि] उदकांस गाजवितोस. [मग] भयानें लोक एकत्र जमल्याशिवाय कसे राहतील?

1. Do not, O Maghavan, [place] us in this, [in these] battles, [in this] distress. [There is] no end to find of thy strength. Rumbling didst thou make the rivers [and] the waters roar. How [then] should not the people collect together through fear?

वयम् उदर्के इत उत्तरे काले देवगोपाः देवरक्षिताः स्याम तथा देवानां शिवतमाः सुखितमाः सखायोपि स्याम=इत उत्तरं वयं देवरक्षितास्तथा देवानाम् अतिशयेन सुखितमाः सखायो भवाम) असा अर्थ करावा.

वृत्तनियमांसाठीं ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें समजावयाची आहे.

य उदृचि इन्द्र देवगोपाः ।
सखायस्ते शिवतमा असाम ।
त्वां स्तोषाम त्वया सुवीराः ।
द्राघीय आयुः प्रतरं दधानाः ॥

---

१. हा मंत्र समजण्यास अशी कल्पना केली पाहिजे कीं, कांहीं युद्धसंकटाचा प्रसंग आला आहे आणि तो दूर व्हावा म्हणून सव्य ऋषि म्हणतो कीं, 'हे इंद्रा, आम्हांस या संकटांत, या युद्धप्रसंगांत घालूं नकोस. आणि या संकटाचें निवारण करणें तुला कठीण नाहीं, कारण कीं तुझें बळ अनंत आहे. आणि अनंत आहे हें वृत्रवधाच्या प्रसंगीं तूं उघड करून दाखविलेंस. कारण कीं त्या वेळीं तूं महावृष्टि केलीस, आणि इतकी मोठी गर्जना केलीस कीं, सर्व मनुष्यें भिऊन एकमेकांजवळ धांवलीं आणि एकत्र गोळा झालीं.

'मघवा.' हें इंद्राचें नांव आहे, त्याचा अक्षरशः अर्थ धनवान् अथवा श्रीमान् असा आहे.

'अंत लागत नाहीं'='अन्तो न परीणशे.' अक्षरशः अर्थ, 'अंत लागावयास

नाहीं,' म्हणजे, अंत लागावयाचा नाहीं. 'परीणशे' हें तुमर्थी 'परीणश्' याचें चतुर्थ्यंत रूप आहे.

'गाजवितोस'='अक्रन्दयः.' अक्षरशः अर्थ, 'गाजविता झालास,' म्हणजे, जेव्हां वृत्रवध केला तेव्हां. इंद्र नित्य वृत्रवध करितो (प्रतिवर्षी मेघगर्जना करून वृष्टि पाडितो) म्हणून आम्हीं सायणांस अनुसरून वर्तमान काळीं अर्थ केला आहे.

'लोक'='क्षोणीः.' 'क्षोणी' शब्दाचा मूळ अर्थ पृथ्वी किंवा लोक असा आहे, त्यावरून पृथिवींत राहणारे जे जन म्हणजे मनुष्य ते, असा अर्थ सायणांनीं येथें केल्याप्रमाणें होतो; पण कितीएक पाश्चात्य विद्वान् येथें 'उदकप्रवाह' असा अर्थ विनाकारण कल्पितात. 'जन' हा अर्थ सायणाचार्यांनीं याच मंत्रांत केला आहे असें नाहीं, दुसऱ्याहि पुष्कळ मंत्रांत त्यांणीं तोच केला आहे. ऋ. १०. २२. ९; १. १७३. ७; ८. १३. १७ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पाहा. जसा 'लोक' या शब्दाचा अर्थ प्रथम पृथिव्यादि लोक अथवा गोल असा असतां मागाहून जन अथवा मनुष्यें असा झाला, तसाच 'क्षोणी' याचाहि होणें अगदी स्वाभाविक आहे.

ही ऋचा वंशस्थ वृत्ताला थोड्याच फेरफारानें बसतेः—

मा नो अॅस्मिन् मॅघवॅन् पृत्सु अंहसि ।
नहि तॅ अन्तः शवसः परीणशे ।
अक्रन्दयो नॅदिओ रोरुवद् वना ।
कथा नॅ क्षोणीर्भियसा समारत ।

यावरून असें सहज लक्षांत येईल कीं कोणत्याहि ऋचेंतील प्रत्येक पादांतील शेवटचीं पांच साहा अक्षरें घेतलीं तर त्याच वृत्ताच्या आधुनिक श्लोकास सहज मिळतात; म्हणजे ह्रस्वदीर्घांचा विशेष फेरफार करावा लागत नाहीं. जसें,

............पृत्सु अंहसि ।
............शवसः परीणशे ।
............रोरुवद्वना
............भियसा समारत ॥

यांत आणि आलीकडील वंशस्थ वृत्तांत कांहींच भेद नाहीं. याप्रमाणेंच पुढच्या ऋचेच्या पादांचे शेवट पाहिले तरी असेच जमतात. जसेंः—

............क्रिने शचीवते ।
............महयन्नभि ष्टुहि ।
............रोदसी उभे ।
............वृषभो निऋञ्जते ।

याप्रमाणेंच त्याच्या पुढचाहि मंत्र पाहिला तरी,

............शूषिअं वचः ।
.........धृषतो धृषन्मनः ।
............बर्हणा कृतः ।
......वृषभो रथो हि सः ।

त्याच्याहि पुढचा (४ था) मंत्र पहातां,

............सानु कोपयः ।
............शम्बरं भिनत् ।
............मन्दिना धृषत् ।
............अशनिं पृतन्यसि ।

आणखीहि (५ वा मंत्र),

............श्वसनस्य मूर्धनि ।
...............रोरुवद्वना ।
...............बर्हणावता ।
...............कस्तुआ परि ।

यावरून असें समजावयाचें कीं, वेदांत जें 'जगती' वृत्त आहे, त्यांत आणि आलीकडचें 'वंशस्थ' या नांवाचें प्रसिद्ध वृत्त यांत, ह्रस्वदीर्घांचा जो थोडथोडा भेद आढळतो तो पादांच्या शेवटीं शेवटीं अगदीं नाहींसाच होत जातो, आणि पादांच्या आरंभीं आरंभीं विशेष असतो. आलीकडील तरी अभंग, लावणी, कटाव, आणि पोवाडे हीं जीं साधारण लोकांचीं प्रसिद्ध आणि आवडतीं वृत्तें, तीं पाहूं गेल्यास त्यांच्या पादांच्या शेवटीं शेवटीं तीं सरळ म्हणतां येतात, पण आरंभीं आरंभीं जरा खडबडीत असतात. याचें कारण असें कीं कोणतेंहि वृत्त गातां गातां आरंभींचे शब्द जसे तसे म्हटले तरी चिंता नाहीं, पादाचे अंतीं सूर चांगला जमला पाहिजे. आपण आर्या म्हणूं लागलों म्हणजे पहिल्या पहिल्या शब्दांवरून लौकर लौकर धांवत जातों असे दिसतों, आणि प्रत्येक अर्धाच्या शेवटीं शेवटीं चांगली धाटणी काढून सुरानें म्हणत असतों. आतांच्या वेळीं जशी वेदांची प्रसिद्धि केवळ ब्राह्मणमुखांत आहे तशी पूर्वीं नव्हती; पूर्वीं वेदसूक्तें जिकडे तिकडे प्रेमानें गात असत, त्यामुळें आतां जशी अभंगादिक वृत्तांची स्थिति आहे तशी वेदांतील वृत्तांची पूर्वीं होती असें उघड दिसून येतें.

अर्चा शक्राय शाकिने शचीवते शृण्वन्तमिन्द्रं महयन्नभि ष्टुहि ।
यो धृष्णुना शवसा रोदसी उभे वृषा वृषत्वा वृषभो न्यृञ्जते ॥२ ॥

अर्च । शक्राय । शाकिने । शचीऽवते । शृण्वन्तम् । इन्द्रम् । महयन् । अभि । स्तुहि ।
यः । धृष्णुना । शवसा । रोदसी इति । उभे इति । वृषा । वृषऽत्वा । वृषभः । निऽऋञ्जते ॥ २ ॥

भाषायाम्.

२. [हे अध्वर्यो], शाकिने (=शक्तियुक्ताय) शचीवते (=प्रज्ञावते) शक्राय (=प्रबलायेन्द्राय) अर्च (=स्तोत्रं गाय), शृण्वन्तं (=स्तोत्रं सावधानं शृण्वन्तम् इन्द्रं) महयन् (=पूजयन्) [त्वं] [तम्] अभिस्तुहि (=आभिमुख्येन स्तुहि)। य [इन्द्रो] धृष्णुना (=धर्षकेण) शवसा (=बलेन) उभे रोदसी (=द्यावापृथिव्यौ), वृषा (=सेचनसमर्थो=वीर्यवान्) वृषभः (=कश्चित् तरुणो) वृषत्वा (=वृषत्वेन=वीर्येण) [स्त्रियमिव], निऋञ्जते (=न्यक्करोति=वशीकरोति) ॥

२. शक्तिमान् [आणि] प्रज्ञावान् शक्राला गा. ऐकून घेणाऱ्या इंद्राला पूजून स्तव. जो [इन्द्र] [आपल्या] प्रखर बळानें, वीर्यवान् पति [आपल्या] वीर्यानें [जेर करितो तसा], द्यू आणि पृथिवी [या] दोघींसहि जेर करितो.

2. Sing in honour of mighty [and] wise S'akra, worshippingly praise the audient Indra; who with [his] challenging power overpowers both Earth and Heaven, [as] a puissant hero with [his] puissance.

---

२. ऋषि आपल्याजवळ असलेल्या मित्रास, (सायणाचार्यांप्रमाणें) अध्वर्यूस, म्हणतो कीं, ' शक्तिमान् व बुद्धिमान् असा जो महाप्रबळ इन्द्र, त्याजकारणें स्तोत्र गा; इंद्राकारणें गाणें म्हणजे रानांत रडल्यासारिखें नाहीं. तो स्तोत्र ऐकून घेत असतो. तर मोठ्या संमानानें त्याच्या समोर उभा राहून त्याची स्तुति कर. तो बळी तर असा आहे कीं, जसा एकादा वीर्यवान् तरुण पुरुष आपल्या वीर्यानें एकादे स्त्रियेस जेर करून टाकितो तसा तो द्यावापृथ्वी या दोघींसहि आपल्या अतिप्रखर बळानें जेर करून टाकीत असतो.' यांतील उपमा ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. जसजसे आपण अतिप्राचीनकाळचे (कोणत्याहि लोकांचे) ग्रंथ पाहतों तसतशी वीर्यवान् वीरांची प्रशंसा अनेकरूपांनीं जिकडे तिकडे केलेली आढळते. जे गुण उत्तम पुरुषाच्या आंगीं आहेत अथवा असावेत असें लोक मानीत तेच अतिशयेंकरून देवांच्या आंगीं कल्पणें हें अगदी स्वाभाविक आणि यथार्थ आहे. त्यावरूनच वेदांत इंद्रादि देवांचें वर्णन आलें म्हणजे ' वीर्यवान्,' ' उत्तम वीर,' इत्यादि विशेषणें लाविलेलीं आढळतात.

' शक्राला '=' शक्राय.' 'शक्र' याचा अर्थ 'प्रबळ' असा आहे, आणि तें विशेषण जरी आतां इन्द्राचेंच नांव होऊन गेलें आहे, तरी प्राचीन काळीं म्हणजे वेदांत इंद्राशिवाय दुसऱ्या देवांसहि 'प्रबळ' या अर्थी लाविलेलें आढळतें. (अश्वी या देवांस ऋ. २. ३९. ३ आणि १०. २४. ४ यांत आणि ऋ. १. १६६. १यांत मरुतांस लाविलेलें आहे.) तथापि बहुतकरून इंद्रासच लाविलेलें आहे, त्यावरून वेदोत्तर संस्कृतांत ' शक्र ' हें इंद्राचें नांव होऊन राहिलें आहे.

' गा '=' अर्च. ' 'अर्च ' धातूचे ' पूजणें, ' आणि 'गाणें ' असे दोनी अर्थ होतात. येथें आम्हांस योग्य वाटल्यावरून आम्हीं शेवटचा अर्थ घेतला आहे. ' गाणें' असा अर्थ असला म्हणजे ज्याच्या करितां गावयाचें तो चतुर्थ्यन्त असतो. ऋ. ५. ५९. १; ८. ४१. १; ८. ६९. ८; आणि ६. ४५. ४ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा.

अर्चा दिवे बृहते शूष्यं १ वचः स्वक्षत्रं यस्य धृषतो धृषन्मनः ।
बृहच्छ्रवा असुरो बर्हणा कृतः पुरो हरिभ्यां वृषभो रथो हि षः॥३॥

अर्च । दिवे । बृहते । शूष्यम् । वचः । स्वऽक्षत्रम् । यस्य । धृषतः । धृषत् । मनः ।
बृहत्ऽश्रवाः । असुरः । बर्हणा । कृतः । पुरः । हरिऽभ्याम् । वृषभः । रथः । हि । सः ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. [हे स्तोतः], दिवे (=शुक्लपत्वाद् देदीप्यमानाय) बृहते (=शुक्लपत्वान्महत) [इन्द्राय] शूष्यं (=सुखकरं) वचः (=स्तोत्रम्) अर्च (=गाय)। यस्य धृषतः (=धैर्ययुक्तस्य) [इन्द्रस्य] धृषद् (=धैर्ययुक्तं) मनः (=स्वक्षत्रं) (=स्वभूतबलवद्) [अस्ति]। बृहच्छ्रवाः (=महाकीर्तिः) असुरः (=प्राणवान्) बर्हणा (=शत्रूणां निबर्हयिता=नाशयिता) हरिभ्याम् (=अश्वाभ्यां) पुरः कृतः (=पूजितः) वृषभः (=वीर्यवान्) स रथो हि (=रथो वर्तते खलु)॥

अस्यामृचि 'कृतः पुरो हरिभ्यां वृषभो रथो हि सः' इत्येतद्वाक्यं नितरां दुर्बोधं स्थितस्य गतिचिन्तनमिति न्यायेन अस्माभिः सायणानुसारेणैव व्याख्यातम्। तथापि हरिभ्यां पुरः कृतः इत्यस्यार्थे रथो हि सः इत्यस्यार्थे च गरीयानेव संशयः॥ बर्हणापदं तु क्राणेति वत्प्रथमान्तम्॥

'ऐकून घेणाऱ्या'='शृण्वन्तम्.' म्हणजे इन्द्र दिसत नाहीं आहे यावरून तो उपासकांचें स्तोत्र ऐकून घेऊं शकत नाहीं असें समजूं नये, तो तें कोठून झालें तरी आणि अदृश्य असला तरी ऐकूं शकतो असें तात्पर्य.

'वीर्यवान् पति [आपल्या] वीर्यानें [जेर करितो तसा]'='वृषा वृषत्वा वृषभ [इव].' 'वृषभ' याचा येथें अर्थ 'तरुण पति' असा आहे. ऋ. ८. ६४. ७ आणि १०.१०.१० यांजवरील सायणभाष्य पहा. 'वृषा' शब्दाचा 'वीर्यवान्' (='सेक्तुं समर्थः' रेतःसेचनसमर्थः) हा अर्थ तर ऋग्वेदांत सायणाचार्यांनीं पुष्कळ ठिकाणीं घेतलेला आहे.

'द्यावापृथिवी [या] दोघींसहि'='रोदसी उभे.' 'रोदसी' हा शब्द संस्कृतांत स्त्रीलिंगी आहे. त्यावरून आणि दिलेल्या उपमेवरून, 'दोघी स्त्रियांसारिख्या ज्या द्यावापृथिवी त्यांस' असा ऋषीच्या मनांतील अर्थ आहे.

'जेर करितो'='निकृञते.' आम्हीं केलेल्या अर्थास प्रमाण आहे अशाविषयीं

३. दीप्तिमान् महान् इंद्राला सुखकारक स्तोत्र गा; ज्या धैर्यवान् [इंद्रा]चें धैर्ययुक्त मन स्वशक्तिसंपन्न [होय]. कारण कीं तो महाकीर्ति, प्राणमय [आणि] शत्रुघातक [होय], [आणि] वीर्यवान् [आणि] अश्वांनीं पूजित असा रथ [होय].

3. Sing a delightful hymn to the effulgent [and] great [and] brave Indra, whose brave mind [is] possessed of self-existent power. For of vast renown, full of life, a destroyer of enemies, he, a hero, [is] a chariot worshipped by his pair of horses.

ऋ. ८. ९०. ४; १०. १४२. २; आणि १. १४३. ५ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा. सायणाचार्य प्रस्तुतस्थळीं 'प्रसाधयति' (अलंकृत करितो अथवा स्वाधीन करून घेतो?) या शब्दानें अर्थ करितात.

३. या मंत्राच्या उत्तरार्धाचा अर्थ फारच दुर्बोध आहे. निर्वाहासाठीं आम्हीं (सायणांस अनुसरूनच) शब्दशः त्याचा अर्थ केला आहे. परंतु त्याचें तात्पर्य काय आहे तें खात्रीपूर्वक सांगवत नाहीं. पूर्वार्धाचा भावार्थ असा आहे कीं, 'ज्या भयरहित इंद्राचें मन स्वतःसिद्ध बलानें परिपूर्ण असून भयरहित होय, त्या इंद्राप्रीत्यर्थ, हे मित्र हो, तुम्ही आनंदकारक स्तोत्र गा.' उत्तरार्धांतील सर्वच शब्द कठिण आहेत असें नाहीं, परंतु 'शत्रुघातक' ('बर्हणा') आणि 'अश्वांनीं पूजिलेला रथ होय' ('पुरः कृतः हरिभ्यां रथो हि सः') इतके शब्द दुर्बोध आहेत. 'बर्हणा' याचा अर्थ 'शत्रुघातक,' म्हणजे, शत्रूचा नाश करणारा असा सायणाचार्य करितात. आणि तसा अर्थ संभवतो. सू. ५८ मं ३ याजवरील आमची टीप पहा. ही 'बर्हणा' (म्हणजे मारणें) या स्त्रीलिंगी शब्दाची 'बर्हणया' याच्या ऐवजीं एकवचनी तृतीया आहे असें कितीएक विनाकारण कल्पितात. आतां इंद्र हा रथ होय असें म्हणण्याचा भावार्थ काय आहे तो तर अगदी समजत नाहीं.

'दीप्तिमान्'='दिवे.' अक्षरशः अर्थ जरी ('द्यु' शब्द विशेषण नसल्यामुळें) दीप्तिमान् असा होणें कठीण आहे, तरी पर्यवसानीं तोच अर्थ आहे यांत शंका नाहीं. 'द्युलोकरूप जो इंद्र' असें म्हणणें आणि 'द्युलोकाप्रमाणें दीप्तिमान् असा जो इंद्र' असें म्हणणें त्यांत अर्थ एकच आहे. या स्थळीं इंद्राला द्युरूपत्व मानिलें आहे हें मात्र लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

'सुखकारक'='शूष्यम्.' हा सायणांस अनुसरून आम्हीं केलेला अर्थ योग्य दिसतो. ऋ. ६. १०. २; ३. ७. ६; १. ५२. १; ३. ५४. १; ७. २५. ५;

त्वं दिवो बृहतः सानु कोपयोऽव त्मना धृषता शम्बरं भिनत् ।
यन्मायिनो व्रन्दिनो मन्दिना धृषच्छितां गभस्तिमशनिं पृतन्यसि॥४

त्वम् । दिवः । बृहतः । सानु । कोपयः । अव । त्मना । धृषता । शम्बरम् । भिनत् ।
यत् । मायिनः । व्रन्दिनः । मन्दिना । धृषत् । शिताम् । गभस्तिम् । अशनिम् । पृतन्यसि ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. [हे इन्द्र], यद् (=यदा) [त्वं] व्रन्दिनः (=वृन्दिनः=समूहीभूतान्) मायिनः (=मायाविनः) [असुरान्] [जेतुं] मन्दिना (=हर्षवता) सोमेन (=सोमपानेन जाते हर्षे) धृषत् (=धृषता मनसा धैर्येण) शितां (=तीक्ष्णां) गभस्ति (=हस्ते गृहीताम्) अशनिं (=वज्रं) पृतन्यसि (=अपृतन्यः=तान् प्रति प्रेरितवानसि), [तदा] त्वं बृहतो दिवः (=महतो द्युलोकस्य) सानु (=उपरिप्रदेशम्) [अ]कोपयः (=अकम्पयः) [तथा] धृषता (=धर्षणयुक्तेन मनसा=धैर्येण) शम्बरम् (=एतन्नामकमसुरम्) अव त्मना (=अवैव) भिनत् (=अभिनत्=भिन्नवानसि=भित्त्वा अपास्तवानसि) ॥

इदमुक्तं भवति । अनेकमायाव्यनुचरयुक्तः शम्बरः इन्द्रेण सह युद्धायाजगाम । तदा हस्तग्रहणोचितं तीक्ष्णं वज्रं गृहीत्वा सोमपानेन जातहर्ष इन्द्रो धैर्ययुक्तमनाः सन्, शम्बरेण सह युद्धं कृत्वा तं जघान । तस्मिन्समये महान् द्युलोकोपि इन्द्रभियसा चकम्प इति ॥

अत्र व्रन्दिनः इत्येतच्छब्दस्य प्रयोगान्तरबाहुल्याभावाद् अर्थनिर्णये संशयो वर्तते॥

१०.१२०.८; १०.३१.३ हे मंत्र पाहा. कितीएक पाश्चिमात्य विद्वान् 'शूष्यम्' याचा 'मोठ्यानें म्हटलेलें' अथवा 'उच्चारिलेलें' असा जो अर्थ करितात तो निराधार आहे असें आम्हांस वाटतें.

'स्वशक्तिसंपन्न'='स्वक्षत्रम्.' म्हणजे, ज्याला दुसऱ्यानें उत्तेजन दिल्यावरून धैर्य आलेलें असतें असें नव्हे, तर 'ज्याला स्वाभाविकच बळ आहे' असा अर्थ. 'स्वधावान्' असें म्हटलें असतें तर हाच अर्थ झाला असता.

'प्राणमय'='असुरः'. म्हणजे मूर्तींसारिखा मृन्मय, पाषाणमय अथवा धातुमय नव्हे, तर केवळ आत्ममय, म्हणजे अविनाशी जो आत्मा तन्मय असा अर्थ. 'असुर' शब्दाचा आलीकडील संस्कृतांत दैत्य असा अर्थ होतो तो वैदिक संस्कृतांत होत नाहीं. वेदांत 'असुर' शब्द देवांस लाविला आहे. सू. २४ मं. १४ याजवर दिलेली टीप पाहा.

४. [हे इंद्रा], [तूं] जेव्हां आपल्या हातांत तीक्ष्ण वज्र घेऊन [त्या] एकत्र जमलेल्या कपटी [असुरां]बरोबर सोमाच्या भरांत शौर्यानें युद्ध करिता झालास, [तेव्हां] तूं महान् द्युलोकाचें शिखर हालविता झालास, [आणि] शौर्यानें शंबराला छेदून खालीं ढकलून देता झालास.

4. Thou didst shake the ridge of great heaven [and] bravely didst strike down S'ambara, when in the exhilaration of the Soma [thou] didst bravely brandish the sharp handy thunderbolt [against] [those] collected intriguers (the demons).

---

४. या ऋचेचा भावार्थ असा आहे कीं 'शंबर आणि त्याचे मायावी म्हणजे कपटविद्यायुक्त अनुचर इंद्राबरोबर लढावयास आले. तेव्हां इंद्राला सोम पिऊन हर्ष झालाच होता, म्हणून नेहमीं हातांत घ्यावयाचें अतितीक्ष्ण वज्र हातांत घेऊन मोठ्या धैर्यानें शंबरास मारून द्युलोकांतून खालीं फेकून दिलें. तेव्हां शंबरास मारण्याच्या वेळीं इंद्रानें जें आपलें बळ प्रगट केलें तेणेंकरून महान् द्युलोकहि भयभीत होऊन कांपूं लागला, तेणेंकरून त्याचें शिखर हालूं लागलें'.

'तूं जेव्हां आपल्या हातांत तीक्ष्ण वज्र घेऊन [त्या] एकत्र जमलेल्या कपटी असुरांबरोबर युद्ध करिता झालास'= 'यत् मायिनः व्रन्दिनः शितां गभस्तिम् अशनिं पृतन्यसि.' अक्षरशः अर्थ 'हातांत घेतलेलें तीक्ष्ण वज्र जेव्हां तूं एकत्र जमलेल्या कपटी [असुरां]प्रत प्रेरितोस.' यांत इतकें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं 'पृतन्यसि' हा भूतार्थीं वर्तमान आहे, आणि द्विकर्मक आहे.

'एकत्र जमलेल्या'='व्रन्दिनः.' या अर्थाविषयीं थोडा संदेह आहे. आम्हीं केलेला अर्थ सायणांनीं दिलेल्या दोन अर्थांपैकीं एक आहे. ते तरी निश्चयानें अर्थ करित नाहींत.

'शंबर' याजबद्दल सू. ५१ मं. ६ याजवरील टीप पाहा.

नि यद्वृणक्षि श्वसनस्य मूर्धनि शुष्णस्य चिद् व्रन्दिनो रोरुवद्वना ।
प्राचीनेन मनसा बर्हणावता यदद्या चित्कृणवः कस्त्वा परि॥५॥१७

नि । यत् । वृणक्षि । श्वसनस्य । मूर्धनि । शुष्णस्य । चित् । व्रन्दिनः । रोरुवत् । वना ।
प्राचीनेन । मनसा । बर्हणाऽवता । यत् । अद्य । चित् । कृणवः । कः । त्वा । परि ॥ ५ ॥ १७ ॥

भाषायाम्.

५. हे इन्द्र, यद् (=यस्मात्) [त्वं] रोरुवत् (=मेघैरतिशयेन गर्जयन् श्वसनस्य (=श्वसनं कुर्वतः) व्रन्दिनः (=वृन्दिनः=अनुचरसमूहयुक्तस्य) शुष्णस्य चित् (=अपां शोषकस्य=एतद्रूपस्य असुरस्यापि) मूर्धनि (=शिरसि) वना (=वनानि= उदकानि मेघोदकानि) नि वृणक्षि (=आवर्जयसि), [तथा] यद् (=यस्मात्) [त्वं] प्राचीनेन (=अपराङ्मुखेन) बर्हणावता (=शत्रुहननेच्छायुक्तेन) मनसा अद्य चित् (=अधुनापि) [तथैव] कृणवः (=कर्तुं शक्नोषि) [तस्मात्] त्वा परि (=त्वां परि=तवोपरि) को [भवति]?

इदमुक्तं भवति। इन्द्रः पुरा अप्शोषणरूपस्य असुरस्य शुष्णनामकस्य मूर्धानं तदुपरि मेघोदकानां वृष्टिं कृत्वा बिभेदेति ऋषिवचनेषु प्रसिद्धिः । तथैव तन्मूर्धच्छेदनम् अधुनापि यदि कामयेत तत्कर्तुं शक्नोति । एवं सति कोस्ति नाम इन्द्रादपि गरीयान्? न कोपीत्यर्थः ॥

५. ज्यापेक्षां [तूं] झपाऱ्यानें वाहणाऱ्या [आणि] शोषून टाकणाऱ्याहि सानुयायी [असुरा]च्या माथ्यावर मोठी गर्जना करीत करीत मेघोदकें फोडिता झालास, [आणि] ज्यापेक्षां [तसेंच] उत्साही [आणि] शत्रुघातक मनानें अजूनहि करूं शकतोस, [त्यापेक्षां] [हे इंद्रा], तुझ्यावर श्रेष्ठ कोण [आहे] ?

5. Since thou didst roaringly cut down the [heavenly] waters on the head of even the [demon] that blows violently [and] that causes drought, [and] since [thou] couldst do this even now with a forward mind desirous of destroying the enemy, who [is there] above thee?

५. याचा भावार्थ असा आहे कीं, 'शुष्ण या असुरानें सोसाटा वारा सोडून सर्व पाणी शोषून नेलें आणि तो त्यांस जमिनीवर पडूं देईना, तेणेंकरून लोकांस फार उपद्रव होऊं लागला. मग इंद्र त्याजबरोबर युद्ध करीत असतां शुष्ण आपलें सर्व सैन्य घेऊन त्याजबरोबर युद्धास आला; तेव्हां जमिनीवरून शोषण करून नेलेलीं आणि अंतरिक्षांत मेघरूपी गुहांमध्यें लपवून टेविलेलीं जीं उदकें तीं त्या गुहा फोडून इंद्रानें खालीं सोडिलीं, आणि शुष्णाला त्यांत बुडवूनच जणुं मारिलें. हा जो इंद्रानें पराक्रम केला तो आजहि त्याच्यानें पुनः करवेल (आणि हें खरेंच आहे, कारण कीं पाहिजे तेव्हां मेघवृष्टि करण्याची शक्ति इंद्राला आहेच). तर असा जो इंद्र त्याहून दुसरा कोणी श्रेष्ठ नाहीं.'

'शुष्ण' सू. ११. मं. ७ सू. ३३ मं. १२ आणि ५१. ११ हे मंत्र आणि त्यांजवरील आमच्या टीपा पाहा. प्रस्तुतच्या मंत्रावरून शुष्ण म्हणजे उदकें शोषून नेणारा आणि सोसाटा वारा सोडून त्यांची वृष्टि न होऊं देणारा असा जो रूपकसिद्ध असुर तो होय, असें उघड होतें.

'सानुयायी'='व्रन्दिनः.' या शब्दाच्या अर्थाविषयीं संशय आहे म्हणून पूर्वींच्या मंत्रांत सांगितलेंच आहे.

'मोठी गर्जना करीत करीत'='रोरुवत्.' ही गर्जना म्हणजे मेघगर्जनाच होय असें सायणाचार्य म्हणतात तें निर्विवाद दिसतें. 'रोरुवत्' हें व्याकरणदृष्ट्या क्रियाविशेषण समजावें.

'उत्साही आणि शत्रुघातक मनानें'='प्राचीनेन वर्हणावता मनसा.' म्हणजे शत्रूचा नाश करण्याविषयीं ज्याला उत्साह आणि आवेश आहे अशा मनानें.

त्वमा॑विथ॒ नर्यं॒ तु॒र्वशं॒ यदुं॒ त्वं तु॒र्वीतिं॒ वय्यं॒ शतक्रतो ।
त्वं रथ॒मेत॑शं॒ कृत्व्ये॒ धने॒ त्वं पुरो॒ नव॒तिं दं॒भयो॒ नव॑ ॥ ६ ॥

त्वम् । आ॒वि॒थ॒ । नर्य॑म् । तु॒र्वश॑म् । यदु॑म् । त्वम् । तु॒र्वीति॑म् । व॒य्य॑म् । श॒त॒क्र॒तो॒ इति॑ शत॒ऽक्र॒तो॒ ।
त्वम् । रथ॑म् । एत॑शम् । कृत्व्ये॑ । धने॑ । त्वम् । पुरः॑ । न॒व॒तिम् । द॒म्भ॒यः॒ । नव॑ ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. [हे इन्द्र], त्वं नर्यं [तथा] तुर्वशं यदुं [च] आविथ (=ररक्षिथ) । हे शतक्रतो (=शतप्रज्ञ इन्द्र), त्वं तुर्वीतिं [तथा] वैय्यम् [आविथ] । त्वं धने (=धनार्थे युद्धे) कृत्व्ये (=कर्तव्ये) [सति] रथम् एतशं [च] [आविथ] । त्वं [शम्बरस्य] नवतिं नव (=नवोत्तरनवतिसंख्याकाः) पुरः (= नगराणि) [अ]-दम्भयः (=व्यनीनशः) ॥

अत्र नर्यतुर्वशयदुतुर्वीतिवैय्यरथैतशाः केचिद् इन्द्रेण रक्षिताः पुरुषाः । तुर्वीतिवैय्ययोर्भिन्नत्वम् ऋ. २. १३. १२, ४. १९. ६ इत्यत्र सायणाचार्यैरेव प्रतिपादितम् ॥

६. हे शतप्रज्ञ [इंद्रा], तूं नर्याला, [तूं] तुर्वशाला, [तूं] यदूला, तूं तुर्वीतीला [आणि] वय्याला रक्षिता झालास. तूं युद्ध करण्याचा प्रसंग आला तेव्हां रथाला [आणि] एतशाला [रक्षिता झालास]. तूं नव्याण्णव नगरें विध्वंसून टाकिता झालास.

6. Thou protectedst Narya, Turvas'a, [and] Yadu. Thou protectedst, O [Indra] of hundred wisdoms, Turvîti [and] Vayya. Thou protectedst Ratha [and] Etas'a at the time of battle. Thou brakest the ninty-nine fortresses.

६. या मंत्राचा अर्थ उघडच आहे. यांत इंद्रानें पूर्वीं कोणकोणत्या उपासकांचें रक्षण केलें तें सांगितलें आहे.

'नर्य,' हा कोण होता अथवा त्याचा इतिहास काय आहे तें ऋग्वेदांत सांगितलेलें नाहीं. आणि हें नांव आणखी एकच वेळ ऋक्संहितेंत (ऋ. १. ११२. ९ यांत) आलें आहे आणि त्यांत 'नर्याला' अश्वी देवांनीं रक्षिलें असें सांगितलें आहे.

'तुर्वश.' सू. ३६, मं. १८ याजवर दिलेली टीप पहा.

'यदु.' याविषयींहि सू. ३६ मं. १८ याजवरील टीप पहा.

'तुर्वीति.' याविषयींहि सू. ३६ मं. १८ याजवरील टीप पहा.

'वय्य.' ऋ. २. १३. १२ आणि ४. १९. ६ यांत वय्यासाठीं इंद्रानें पृथिवी उदक आणि अन्न यांहीं करून समृद्ध केली असें सांगितलें आहे. याशिवाय 'वय्य' हा कोण आणि कोठला होता आणि त्याचा इतिहास काय होता तें ठाऊक नाहीं. प्रस्तुत स्थळीं सायणाचार्य 'वय्य' म्हणजे 'वय्यकुळांत जन्मलेला' असा विशेषणीं अर्थ करून तुर्वीतीकडेस घेतात. परंतु आम्हीं आतांच सांगितलेल्या दोनहि मंत्रांत तुर्वीति आणि वय्य हे एक नव्हेत, वेगवेगळे होत असें सायणाचार्यांच्याच भाष्यावरून समजतें.

'रथ.' हें सायणाचार्यांस अनुसरून आम्हीं विशेषनाम घेतलें आहे. परंतु तो कोण होता याविषयीं कांहीं कथा ठाऊक नाहीं. आणि 'रथ' हें विशेषनाम वेदांत प्रसिद्ध दिसत नाहीं. तरीहि येथें विशेषनाम करणें हाच आम्हांस उत्तम पक्ष दिसतो.

'एतश.' हा कोण होता त्याविषयीं कांहीं ठाऊक नाहीं.

'नव्याण्णव नगरें'='पुरः नवतिं नव.' हीं नगरें शंबराचीं होत असें आचार्य म्हणतात. नव्याण्णव म्हणजे शब्दशः अर्थ समजावयाचा नाहीं असें आम्हांस वाटतें. ऋग्वेदांत नव्याण्णव नगरें फोडि-

स घा राजा सत्पतिः शूशुवज्जनो रातहव्यः प्रति यः शासमिन्वति ।
उक्था वा यो अभिगृणाति राधसा दानुरस्मा उपरा पिन्वते दिवः ॥७

सः । घ । राजा । सत्ऽपतिः । शूशुवत् । जनः । रातऽहव्यः । प्रति ।
यः । शासम् । इन्वति ।
उक्था । वा । यः । अभिऽगृणाति । राधसा । दानुः । अस्मै । उपरा ।
पिन्वते । दिवः ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. यो जनो रातहव्यः (=दत्तहविष्कः) [सन्], शासम् (=इन्द्रस्य अनुशासनं) प्रति इन्वति (=व्याप्नोति=स्वीकरोति) स सत्पतिः (=सतां पालकः) [एतादृशो] राजा [भूत्वा] शूशुवत् घ (=आत्मानं वर्धयत्येव), वा (=अपि च) यो [जनो] राधसा (=हविर्लक्षणेनान्नेन सह= हविर्लक्षणान्नम् अर्पयित्वा) उक्था (=उक्थानि=स्तोत्राणि) अभिगृणाति (=अभिमुखो भूत्वा गायति) अस्मै (=तस्मै जनाय) उपरा दानुः (=मेघरूपा वृष्टिः) दिवः (=द्युलोकसकाशात्) पिन्वते (=वर्धते=पीना सती वर्षति)॥

इदमुक्तं भवति । यो जनो दत्तहविष्कः सन् तथा दत्तराधाः सन् इन्द्रस्य शासनं पालयति तथा तस्य स्तुतीर्गायति स निःसंशयं सत्पती राजा भूत्वा वर्धते तदर्थं च दिव्या मेघोदकवृष्टिर्विपुलं यथा तथा पततीति ॥

त्याविषयीं पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे. ऋ. २. १९. ६ यांत इंद्रानें शंबराचीं ९९ नगरें फोडिलीं असें सांगितलें आहे. (नवतिं च नव इन्द्रः पुरः विऐरयत् शम्बरस्य); ऋ. ७. १९. ५ यांत 'हे इन्द्रा, जेव्हां तूं तीं नव्याण्णव नगरें एकदम फोडून टाकिता झालास' (तानि नव यत् पुरो नवतिं च सद्यः); ऋ. ७. ९९. ५ यांत, 'हे इंद्र आणि विष्णू हो, तुम्ही शंबराचीं नव्याण्णव बळकट नगरें विध्वंसून टाकिते झालां' (इन्द्राविष्णू दृंहिताः शम्बरस्य नव पुरो नवतिं च श्नथिष्टम्); ऋ. ८. ९३. २ यांत 'जो वृत्रघ्न इंद्र आपल्या बाहुबळानें नव्याण्णव नगरें फोडून टाकिता झाला आणि वृत्ररूप अहीस मारिता झाला' (नव यो नवतिं पुरो बिभेद बाह्वोजसा, अहिं च वृत्रहावधीत्) असें सांगितलें आहे, आणि ऋ. १. १३०. ७ यांत 'हे इंद्रा, तूं मानवाकरितां नव्वद नगरें विध्वंसिता झालास' (='भिनत् पुरो नवतिम् इन्द्र पूरवे'); ऋ. ३. १२. ६

u2575

७. तो मनुष्य निःसंशय सज्जनपालक राजा [होऊन] उत्कर्षाप्रत पावतो, [कीं] जो [इंद्राला] हवि अर्पण करून [त्याची] आज्ञा पाळितो; अथवा जो [हविरूप] अन्न देऊन स्तोत्रें गातो त्यासाठीं पोषणयुक्त मेघवृष्टि स्वर्गाहून पडत असते.

7. That man who, having offered oblations [to Indra], promotes [his] ordinance, shall indeed prosper [as] a king [and] protector of the good; or he who, offering the sacrificial food, sings prayers unto [him],—to him the rainy stream shall richly flow.

यांत 'हे इंद्राग्नी, तुम्ही दासांचीं म्हणजे अनार्य शत्रूंचीं नव्वद नगरें हालवून देते झालां' (=इन्द्राग्नी नवतिं पुरो दासपत्नीः अधूनुतम्) असें सांगितलें आहे. आणि कोठकोठें शंभर नगरें फोडिलीं असेंहि सांगितलें आहे; उदाहरणार्थ ऋ. १. ५३. ८ यांत वंगृदाचीं शंभर नगरें इंद्रानें फोडिलीं असें आहे. ऋ. ४. ३०. २ यांत 'इंद्रानें देवभक्त दिवोदासाकरितां शंबराचीं पाषाणमय शंभर नगरें फोडून फेकून दिलीं' (शतम् अश्मन्मयीनां पुराम् इन्द्रो व्यास्यत् दिवोदासाय दाशुषे) असें म्हटलें आहे. या सर्वांचा विचार करितां, नव्वद अथवा नव्याण्णव अथवा शंभर म्हणजे असंख्य इतकाच अर्थ घ्यावयाचा असें दिसतें. पूर्वीं सू. ३२ मं. १४ यांत इन्द्र नव्याण्णव नद्यांपलीकडे गेला असें सांगितलें आहे तें व त्याजवरील टीप पहा. या सर्व स्थळीं अपरिमितार्थी परिमितवचन आहे असें समजलें पाहिजे.

'विध्वंसिता झालास.' नगरें विध्वंसिता झालास म्हणजे ज्या किल्ल्यांत शंबरासुर आश्रय करून राहिला ते फोडून टाकिता झालास. शंबरादिकांनीं पृथ्वीवरील सर्व पाणी शोषून घेऊन आकाशांत मेघरूप किल्ल्यांत ठेवून आपणहि त्यांतच राहिले. तेव्हां इंद्रानें ते किल्ले फोडिले. म्हणजे, मोठी मेघगर्जना करून मेघोदकांची वृष्टि करून नर्य. तुर्वश इत्यादिक जे देवभक्त त्यांस सुख दिलें इतकाच पर्यवसित अर्थ आहे.

---

७. भावार्थः—'जो कोणी मनुष्य इंद्राला हवि अर्पण करीत असतो आणि त्याची आज्ञा पाळीत असतो, आणि हवि अर्पण करून त्याजबरोबर इंद्राचीं स्तोत्रें गात असतो, तो निःसंशय राजा होतो आणि सज्जनाचा पालक होतो, आणि त्याचा उत्कर्ष होतो, आणि त्याच्या हितार्थ द्युलोकाहून मेघवृष्टि मोठमोठी होऊन पडत असते.'

'सज्जनपालक'='सत्पतिः.' हा

२.१२९१०

असमं क्षत्रमसमा मनीषा प्र सोमपा अपसा सन्तु नेमे ।
ये त इन्द्र ददुषो वर्धयन्ति महि क्षत्रं स्थविरं वृष्ण्यं च ॥ ८ ॥

असमम् । क्षत्रम् । असमा । मनीषा । प्र । सोमऽपाः । अपसा । सन्तु । नेमे ।
ये । ते । इन्द्र । ददुषः । वर्धयन्ति । महि । क्षत्रम् । स्थविरम् । वृष्ण्यम् । च ॥ ८ ॥

भाषायाम्.

८. [इन्द्रस्य] क्षत्रं (=बलम्) असमम् (=अनुपमम्) । [तस्य] मनीषा (=बुद्धिः) असमा (=अनुपमा) [भवति] । नेमे (=एते) सोमपाः (=सोमस्य पातारो) [यजमाना] अपसा (=स्वकर्मणा) प्र सन्तु (=प्रवृद्धा भवन्तु) । ये [सोमपाः] हे इन्द्र, ददुषः (=दत्तवतः=अभीष्टदानस्य दातुः) ते (=तव) महि क्षत्रं (=महद् बलं) स्थविरं वृष्ण्यं च (=स्थूलं वीर्यप्रवृद्धं पुंस्त्वं च) वर्धयन्ति (=प्रवृद्धं कुर्वन्ति) ॥

अर्थ आम्हीं सायणानुसारें केला आहे तो योग्य वाटतो. सू. ५३ मं. ६ याजवरील टीप पहा.

'निःसंशय उत्कर्षाप्रत पावतो'= 'शूशुवत् घ.' 'शूशुवत्' हें आम्हीं लेट्चें रूप आहे असें समजून भाषांतर केलें आहे. अक्षरशः अर्थ, 'उत्कर्षाप्रत पावेलच' अथवा 'पावूं शकेल'.

'आज्ञा पाळितो'='शासं प्रति इन्वति.' म्हणजे यज्ञ करितो आणि तेणेंकरून सन्मार्गानें चालतो, इंद्राची आज्ञा मोडीत नाहीं.

'त्यासाठीं पोषणयुक्त मेघवृष्टि स्वर्गाहून पडत असते'='दानुः अस्मै उपरा पिन्वते दिवः.' 'दानुः' म्हणजे 'वृष्टि' असा अर्थ होतो याविषयीं ऋ. १०. ४३. ७ हा मंत्र आणि त्याजवरील सायणभाष्य पहा. 'उपरा दानुः' म्हणजे 'मेघवृष्टि' असा भावार्थ आहे. 'उपरा' हें येथें 'दानु' या स्त्रीलिंगी शब्दाचें विशेषण आहे. 'उपर' म्हणजे मेघ असा अर्थ यास्कांनीं केलाच आहे. ऋ. १०. २७. २०; ५. ४४. २; १०. २७. २३; १. १६७. ३ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा. 'उपर'शब्दाचा मेघ असा अर्थ कसा होतो तें सांगवत नाहीं, तरी मेघ हा अर्थ होतो यांत संशय दिसत नाहीं. प्रस्तुत स्थळीं 'मेघसंबन्धी' अशा अर्थाचें विशेषण आहे. 'पिन्वते' म्हणजे 'वृद्धिंगत होते,'

८. [इंद्राचें] बळ अनुपम [होय], [त्याची] प्रज्ञा अनुपम [होय]. [तर हे इन्द्रा], हे सोमपान करणारे [जन] [आपल्या] कर्मानें उत्कर्षाप्रत पावोत; कारण कीं हे इंद्रा, ते तुज उदाराचें महाबळ आणि स्थिर पुंस्त्व वाढवीत असतात.

8. Unequalled [is Indra's] power, unequalled [is his] wisdom. May these Soma-drinking worshippers be prosperous through [their] work; for they [through their hymns] glorify, O Indra, the great might and the vast puissance of thee the liberal.

'पीन होते,' 'पुष्ट होते,' म्हणजे मेघवृष्टि विपुळ पडते. मोठी होणें आणि पुष्ट होणें किंवा पुष्ट होत्सातें वाहणें अशा अर्थाविषयीं ऋ. ७. ३४. ३; ४. ५०. ८; ६. ५२. ४; ६. २३. ६; आणि ८ १२. ५ हे मंत्र आणि त्यांजवरील भाष्य पहा.

---

८. भावार्थः—' इंद्राचें बळ आणि शहाणपण हीं अद्वितीय आहेत. यास्तव इंद्राची सेवा करणारे जे हे आम्ही त्यांचा उत्कर्ष होओ. कारण कीं हे इंद्रा, आम्हांस इच्छिलेलें देणारा जो तूं, त्याचें मोठें बळ आणि अचल वीर्य हीं आम्ही आपल्या सूक्तांच्या योगानें वाढवीत असतों.'

'हे सोमपान करणारे जन '=' नेमे सोमपाः'. हा अर्थ सायणांस अनुसरून आम्हीं केला आहे. 'नेमे' याचा अर्थ 'दुसरे,' 'हे नव्हेत ते ' असा बहुतकरून होतो. (ऋ. ४. २४. ४ आणि ४. २४. ५ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा.) परंतु ह्या मंत्रांत सायणांनींच केलेला अर्थ योग्य दिसतो. अथवा 'सकळ सोमपान करणारे [जन]' असा अर्थ केल्यास चांगला संभवतो.

'[आपल्या] कर्मानें '=' अपसा.' म्हणजे देवयजनादि जें शुभकर्म तेणेंकरून असा अर्थ आहे.

'कारण कीं...ते '=' ये. ' अक्षरशः अर्थ 'जे' इतकाच आहे. पण यच्छब्दाचा केव्हां केव्हां असा अर्थ करावा लागतो हें पूर्वी पुष्कळ वेळ सांगितलेंच आहे.

'वाढवितात '=' वर्धयन्ति.' स्तोत्रानें देवाचें बळ अथवा वीर्य वाढतें असें वेदांत पुष्कळ ठिकाणीं सांगितलेलें अथवा जाणविलेलें आढळतें. त्याचें तात्पर्य असें दिसतें कीं, स्तोत्र म्हणून प्रार्थना केल्यानें प्रार्थित देवाच्या आंगीं आवेश येऊन तज्जन्य बळ उत्पन्न होत असतें. समरांगणांत योद्ध्यांचें बळ उत्तेजन येणाऱ्या शब्दांनीं सेनापति कसें वाढवितात हें प्रसिद्धच आहे.

तुभ्येदेते बहुला अद्रिदुग्धाश्चमूषदश्चमसा इन्द्रपानाः ।
व्यश्नुहि तर्पया काममेषामथा मनो वसुदेयाय कृष्व ॥ ९ ॥

तुभ्यं । इत् । एते । बहुलाः । अद्रिऽदुग्धाः । चमूऽसदः । चमसाः । इन्द्रऽपानाः ।

वि । अश्नुहि । तर्पय । कामम् । एषाम् । अथ । मनः । वसुऽदेयाय । कृष्व ॥ ९ ॥

भाषायाम्.

९. हे इन्द्र, एते (=पुरोवर्तिनो) बहुलाः (=प्रभूता) अद्रिदुग्धाः (=ग्रावरूपैरश्मभिर्दुग्धा अभिषुताः) चमूषदः (=चमसेषु स्थिता) इन्द्रपानाः (=त्वत्पानाः=त्वया पातुं योग्याः) चमसाः (=सोमाः) तुभ्येत् (=तुभ्यमित्=त्वदर्थमेव) [सन्ति]। [तस्मात् हे इन्द्र], [तान्] व्यश्नुहि (=भक्षय), [भक्षयित्वा च] एषां (=चमसानां) कामं (=त्वं भक्षयेरिति मनोरथं) तर्पय (=पूरय) । अथ (=अनन्तरं) वसुदेयाय (=वसुने देयाय=अस्मभ्यं धनं दातुं) मनः कृष्व (=मनः कुरुष्व=दातुकामो भव) ॥

उपासकैर्दत्ताः सोमा इन्द्र अस्मान्भक्षयेदितीच्छन्त आसन् । तद् आगत्य तान् पिबेति भावः । उक्तं चान्यत्र 'इन्दवो वामुशन्ति हीति ऋ. १. २. ४. ॥

वृत्तानुसारेंकरून 'वृष्ण्यं च ' या ऐवजीं 'वृष्णिअं च ' असें संहितेंत म्हटलें पाहिजे, म्हणजे उपजाति श्लोकाप्रमाणें म्हणतां येईल.

९. हे इंद्रा, हे विपुल, पाषाणापासून दोहून काढिलेले, चमसपात्रांत असलेले [आणि] त्वां पिण्यास योग्य असलेले सोम तुझ्याकरितांच [आहेत]. [तर हे इंद्रा,] [हे तूं] भक्षण कर [आणि] यांची इच्छा पूर्ण कर, आणि आम्हांस संपत्ति देण्याचा निश्चय कर.

9. For thee only [are] these plentiful, [and] stone-milked Somas, standing in the bowls [and] fit to be drunk by thee. Drink them, [and thereby] gratify their desire. And then make up thy mind to give [us] wealth.

९. मंत्रकर्त्या ऋषीनें म्हणजे सव्यानें सोम काढण्याचे जे ग्रावे म्हणून पाषाण असत, त्यांच्या योगानें पुष्कळसे आणि इंद्रानें पिण्यास योग्य असे चांगले सोमरस काढून, चमस म्हणून जो प्याला असे त्यांत घातले; आणि इंद्रास अर्पण करून म्हणतो, 'हे इंद्रा, हे सोमरस तुजकरितांच आहेत आणि तूं आपणांस प्यावेंस अशी इच्छा करीत आहेत; तर तूं ते पी आणि त्यांची इच्छा पूर्ण कर. आणि मग आम्हांसहि संपत्ति देण्याचें मनावर घे.'

'पाषाणापासून दोहून काढिलेले' = 'अद्रिदुग्धाः.' म्हणजे गाईपासून जसें दूध दोहून काढावें तसे जणुं काढिलेले.

'यांची इच्छा पूर्ण कर' = 'तर्पय कामम् एषाम्.' उपासकांनीं देवांस अर्पण केलेले सोम देव केव्हां येतील आणि पीतील अशी इच्छा करून वाट पाहत असतात याविषयीं सू. २ मं. ४ पहा. सायणाचार्य प्रस्तुत स्थळीं 'या [तुझ्या] इंद्रियांची इच्छा तृप्त कर' असें भाष्य करितात, पण 'इंद्रियांची' हें पद अध्याहृत घ्यावें लागतें, आणि 'एषाम्' (=ह्यांचा) ह्या पदाचा मग निर्वाह चांगला होत नाहीं.

'[आम्हांस] संपत्ति देण्याचा निश्चय कर' = 'मनः वसुदेयाय कृष्व.' अक्षरशः अर्थ 'देण्याच्या धनासाठीं मन [निश्चित] कर.' 'वसुदेयाय,' म्हणजे 'देयाय वसुने.' लाटीन भाषेंत असे प्रयोग फार येतात. 'वसुने देयाय' =ad bona danda.

या मंत्रावरून इंद्रादि देवांस आपले पूर्वज आर्य सोम प्यावयास अर्पण करीत हें जसें सिद्ध होतें तसेंच पूर्वील मंत्रावरून ते स्वताहाहि पीत असत असें सिद्ध होतें. आपण जसजसा वेद पुढें पुढें वाचूं तसतसा, पुरातन ऋषि सोम देवांस अर्पण करीत पण आपण स्वतः पीत नसत या आधुनिक गोष्टीला, आणि पुरातन ऋषि देवांस मांस अर्पण करण्याकरितां पशु मारीत पण त्यांस पुनः जीवंत

अपामतिष्ठद्धरुणह्वरं तमोऽन्तर्वृत्रस्य जठरेषु पर्वतः ।
अभीमिन्द्रो नद्यो वव्रिणा हिता विश्वा अनुष्ठाः प्रवणेषु जिघ्नते ॥ १०

अपाम् । अतिष्ठत् । धरुणऽह्वरम् । तमः । अन्तः । वृत्रस्य । जठरेषु । पर्वतः ।

अभि । ईम् । इन्द्रः । नद्यः । वव्रिणा । हिताः । विश्वाः । अनुऽस्थाः । प्रवणेषु । जिघ्नते ॥ १० ॥

भाषायाम्.

१०. अपाम् (=उदकानां) धरुणह्वरं (=धारानिरोधकं) तमः अतिष्ठत् (=आसीत्)। वृत्रस्य (=मेघानाम् आवरकस्य एतन्नामकस्यासुरस्य) जठरेषु अन्तः (=उदरे) पर्वतः (=पर्ववान् मेघः) [अतिष्ठत्=आसीत्]। [तदा] इन्द्रः अभि ईम् (=एनं पर्वतम् अभिलक्ष्य), वव्रिणा (=आवरकेण वृत्रेण) हिताः (=पिहिता) [अत एव] अनुष्ठाः (=आनुपूर्व्येणावस्थिता) विश्वाः (=सकला) नद्यः (=नदीः=अपः) प्रवणेषु (=निम्नप्रदेशेषु) जिघ्नते (=तं पर्वतम् अभिहत्य जलानि भूम्यादिषु निम्नप्रदेशेषु आवर्जितवान्) ॥

अत्रेदमुक्तं भवति। पुरा किल जलानां वर्षकं मेघं वृत्रः स्वोदरे निधाय सकलं जगत् तिमिरावृतं कृत्वा मेघोदकानि निरुद्धवान् तदा इन्द्रस्तदुदरस्थं मेघरूपं पर्वतं भित्त्वा तत्रस्थान्युदकानि भूमौ पातितवानिति ॥

करण्याची शक्ति त्यांस होती आणि त्याप्रमाणें ते करीत असत त्यामुळें त्यांच्या हातून हिंसा होत नसे याहि गोष्टीला कांहीं आधार नाहीं असें दिसून येईल. आलीकडच्या युगांत जे प्रचार निंद्य (आणि कांहीं अंशानें योग्य रीतीनें निंद्य) समजतात ते आपल्या अतिपवित्र पूर्वजांच्या वेळीं चालू होते असें कबूल करावें लागतें, तर त्यांपासून निंद्यपणा जावा म्हणून त्या दोनहि गोष्टी आलिकडेस रचिल्या आहेत हें उघड दिसून येतें.

१०. उदकांच्या धारांचा अवरोध करणारा अन्धकार [जिकडे तिकडे] [पसरला] होता. वृत्राच्या पोटांत पर्वत [राहिला होता]. तो फोडून इंद्र, वृत्रानें लपविलेलीं [आणि] एकास एक लागून राहिलेलीं सकल उदकें खालीं पाडिता झाला.

10. [There] was darkness that stopped the flow of the waters: the mountain (the rain-cloud) [was] in the bowels of Vṛitra. Striking this, Indra let flow down all the waters which concealed by Vṛitra, had stood one behind another.

१०. भावार्थः—' पूर्वी पाण्याचा अवरोध करणारा जो वृत्र त्याणें मेघरूप पर्वत आपल्या पोटांत घालून ठेविला, तेव्हां उदकें सहजच वर्षून वाहण्याचीं बंद झालीं, आणि जिकडे तिकडे अंधार झाला. मग इंद्रानें तो उदरस्थ पर्वत फोडून टाकून वृत्रानें लपवून ठेविल्यामुळें आखडून गेलेलीं जीं उदकें तीं सर्व खालीं पाडिलीं.'

' धारांचा अवरोध करणारा'=' धरुणह्वरम्.' हा अर्थ आम्हीं सायणानुसारें केला आहे आणि तो आम्हांस योग्य दिसतो. कितीएक विद्वान् दुसरा अर्थ कल्पितात त्याला आधार दिसत नाहीं. हा शब्द ऋग्वेदांत दुसऱ्या स्थळीं आलेला नाहीं. ' धरुण 'शब्दाविषयीं सू. ५२ मं. २ याजवरील आमची टीप पहा.

' वृत्रानें लपविलेलीं'='वव्रिणा हिताः.' अक्षरशः ' आच्छादकानें ठेविलेलीं.' वृत्र यास आच्छादक म्हणण्याचें कारण असें कीं, तो मेघोदकांस आच्छादून अथवा झांकून टाकितो.

' एकास एक लागून राहिलेलीं.'= 'अनु स्थाः.' म्हणजे, वृत्रानें त्यांस आपल्या पोटांत कोंडून ठेविल्यामुळें, लहानशा गोठ्यांत पुष्कळ गुरें कोंडून ठेविल्यामुळें जशीं एकमेकास भिडून उभीं राहतात तशीं उभीं राहिलीं होतीं असें तात्पर्य आहे.

इंद्रानें वृत्रवध करून मेघजलांची वृष्टि केली हा जो त्याचा सर्ववर्णनव्यापी पराक्रम तोच या मंत्रांत रूपान्तरानें सांगितला आहे.

' तो फोडून...उदकें खालीं पाडिता झाला '=' अभि ईम् नद्यः प्रवणेषु जिघ्नते.' हा प्रयोग चमत्कारिक आहे. अक्षरशः अर्थ ' त्याजवर उदकें फोडिता झाला ' असा आहे; म्हणजे ' त्याजवर (=पर्वतावर) मार मारून उदकें खालीं पाडिता झाला.' ' जिघ्नते ' हा भूतार्थी वर्तमान आहे.

स शेवृधमधि धा द्युम्नमस्मे महि क्षत्रं जनाषाळिन्द्र तव्यम् ।
रक्षा च नो मघोनः पाहि सूरीन्राये च नः स्वपत्या इषे धाः ११॥१८

सः । शेऽवृधम् । अधि । धाः । द्युम्नम् । अस्मे इति । महि । क्षत्रम् जनाषाट् । इन्द्र । तव्यम् ।
रक्ष । च । नः । मघोनः । पाहि । सूरीन् । राये । च । नः । सुऽअपत्यै । इषे । धाः ॥ ११ ॥ १८ ॥

भाषायाम्.

११. स [त्वं] (=तादृशस्त्वं=पूर्वोक्तगुणयुक्तस्त्वम्) अस्मे अधि (=अस्मासु) शेवृधं (=शेववृधं=सुखवर्धकं) द्युम्नं (=यशो) धाः (=स्थापय), [तथा] महि (=महत्) जनाषाट् (=जनानाम् अभिभवितृ) तव्यं (=प्रवृद्धं) क्षत्रं (=बलम्) [अस्मे अधि धाः= अस्मासु स्थापय] । च (=अपि च) मघोनो नः (=अस्मान् धनयुक्तान् कृत्वा) रक्ष (=पालय), सूरीन् (=विदुषः) पाहि (=रक्ष) । च (=अपि च) नः (=अस्मान्) राये (=धनाय) [तथा] स्वपत्यै (=सदपत्ययुक्तायै) इषे (=अन्नाय) धाः (=स्थापय=अस्मान् धनयोग्यान् सदपत्यान्नयोग्यांश्च कुरु=अस्मभ्यं धनं सदपत्ययुक्तमन्नं च देहि) ॥

अस्मिन् सूक्तोपसंहारे सूक्तकर्ता सव्य ऋषिः स्वाभीष्टं याचत इति ज्ञेयम् ॥

---

११. तर हे इंद्रा, तूं सुखवर्धक यश आम्हांला दे, [आणि] मोठें [आणि] लोकांस जिंकून टाकणारें [आणि] विपुल बळ [आम्हांला दे]; आणि आम्हांला संपत्तिमान् करून रक्ष; विद्वानांचें पालन कर; आणि आम्हांला संपत्ति [आणि] सुसंततिसंपन्न अन्न दे.

11. Confer thou, therefore, upon us glory that increases happiness, [and] O Indra, power that is great, that conquers the world, [and] that is magnificent. And [making] us rich, protect us, protect the learned. And enable us to gain wealth [and] food accompained by good progeny.

---

११. हा या सूक्ताचा उपसंहार आहे, आणि उपसंहारांत सूक्तकर्ता आराध्य देवतेपाशीं जें काय मागावयास इच्छितो तें सव्यऋषीनें या शेवटच्या मंत्रांत मागितलें आहे. तो म्हणतो कीं, असा म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें तुझा पराक्रम आहे त्यापेक्षां 'हे इंद्रा, ज्या वैभवापासून सुखाची वृद्धि होते असें वैभव, आणि मोठें व पराक्रमी, आणि सर्वलोकांस जिंकून टाकणारें असें बळ आम्हांस तूं दे; आणि आम्हांस धनसंपन्न केल्यावरहि आमचें रक्षण करीत राहा, आणि सर्व विद्वानांचें पालन कर, आणि आम्हांस संपत्ति, आणि चांगल्या संततीनें युक्त जें अन्न तें मिळे असें कर.'

या मंत्रांत ऋषि काय मागतो त्याजकडेस विशेष लक्ष द्यावें. तो प्रथम आपणास अन्नादि संपत्ति मिळावी असें म्हणतो; २ सुसंतति म्हणजे वीर्यवान् पुत्रपौत्रादि प्राप्त व्हावे म्हणतो; ३ सर्व जनांस जिंकून त्यांजवर आपला अधिकार चालावा म्हणतो; आणि ४ इतकें झाल्यावरहि इंद्रानें आपलें संरक्षण करण्याचें सोडूं नये. आधुनिक महावैभवास चढलेल्या पण खरोखर धर्मनिष्ठ देशांतील लोक झाले तरी यापेक्षां चांगला वर मागूं इच्छितील असें नाहीं. आमच्या देशांत मात्र वर मागावयाचा तो याहून फार वेगळ्या रीतीचा मागतील यांत संशय नाहीं.

'तर ...तूं '=' स [त्वम्]'. म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें तुझा पराक्रम आहे त्यापेक्षां. या प्रकारचे प्रयोग वेदांत पुष्कळ येतात.

'सुखवर्धक '=' शेवृधम्.' या पदाचा अर्थ प्रस्तुत स्थळीं जरी सायणाचार्य येथें केलेल्या अर्थाहून भिन्न करितात, तरी ऋ. ५. ८७. ४; १०. ४६. ३; आणि १०. ६१. २० हे मंत्र आणि त्यांजवरील त्यांचें भाष्य पाहा.

सूक्तम् ५५.

आङ्गिरसः सव्य ऋषिः । इन्द्रो देवता । जगती च्छन्दः ।

दिवश्चिदस्य वरिमा वि पप्रथ इन्द्रं न मह्ना पृथिवी चन प्रति ।
भीमस्तुविष्मान् चर्षणिभ्य आतपः शिशीते वज्रं तेजसे न वंसगः ॥ १

दिवः । चित् । अस्य । वरिमा । वि । पप्रथे । इन्द्रम् । न । मह्ना । पृथिवी । चन । प्रति ।
भीमः । तुविष्मान् । चर्षणिऽभ्यः । आऽतपः । शिशीते । वज्रम् । तेजसे । न । वंसगः ॥ १ ॥

भाषायाम्.

१. अस्य [इन्द्रस्य] वरिमा (=उरुत्वं=महिमा) दिवश्चित् (=द्युलोकादपि) वि पप्रथे (=विशेषेण विस्तीर्णो बभूव) । इन्द्रं पृथिवी चन (=पृथिव्यपि) मह्ना (=स्वकीयेन महत्त्वेन) न प्रति [भवति] (=पृथिव्यपि इन्द्रस्य प्रतिमानं न भवति) । भीमः (=भयंकरः) तुविष्मान् (=बलवान्) चर्षणिभ्यः आतपः (=मनुष्येभ्यः संतापकारी=मनुष्येभ्यः सूर्यप्रकाशद्वारा स्वकीयं तेजो दर्शयन्) [स इन्द्रो] वंसगो न (=वृषभः स्वकीये शृङ्गे शिशीते तथा) तेजसे (=तैक्ष्ण्यार्थं) वज्रम् (=एतन्नामकं स्वकीयम् अस्त्रं) शिशीते (=तीक्ष्णीकरोति) ॥

द्यावापृथिवीभ्यामपि इन्द्रस्य महिमा गरीयान् तथा इन्द्रो भीमादिगुणविशिष्टः सन् स्वबलस्य दर्शयितृ वज्रं हस्ते धारयतीत्यर्थः ॥

'आम्हांला संपत्ति [आणि] सुसंततिसंपन्न अन्न दे '=' राये नः स्वपत्या इषे धाः.' अक्षरशः अर्थ, 'आम्हांस संपत्तीसाठीं आणि सुसंततियुक्त अन्नासाठीं कर,' अर्थात् 'योग्य कर' म्हणजे, 'आम्हांस मिळवून दे' असा पर्यवसानीं अर्थ आहे. या स्थळीं जसा 'धा' धातूशीं चतुर्थीचा प्रयोग केला आहे तसाच इतर पुष्कळ ठिकाणीं ऋग्वेदांत केलेला आढळतो. याचें एक प्रसिद्ध उदाहरण हें आहे कीं, 'आपो हि ष्ठा मयोभुवस्ता न ऊर्जे दधातन । महे रणाय चक्षसे '=' हे उदकांनो, तुम्ही ज्या अर्थी सुख करणारीं आहां त्या अर्थी आम्हांस अन्नाकरितां, आणि मोठें आणि रमणीय जें ज्ञान त्याजकरितां करा,' म्हणजे 'योग्य करा,' अर्थात् 'तें आम्हांस मिळे असें करा.' ऋ. १०. ९. १.

सूक्त ५५.

ऋषि–**सव्य** (पूर्व सूक्ताचा जो कर्ता तोच); देवता–**इंद्र**. वृत्त–**जगती.**

१. याचा महिमा द्युलोकापेक्षांहि विस्तीर्ण आहे. पृथिवी सुद्धा [आपल्या] मोठेपणानें [इंद्रा]-एवढी नाहीं. भयंकर, बलवान् [आणि] लोकांस [आपला] प्रताप दाखविणारा [इंद्र], वृषभ [आपलीं शिंगें घांसतो] तसें, [आपलें] वज्र तेजासाठीं घांसीत असतो.

HYMN 55.

To *Indra*. By *Savya* (author of the previous hymn). Metre—*Jagatî*.

1. His greatness has spread wider than heaven. Not even the wide earth with [her] greatness is Indra's match. Awful, mighty, [and] exhibiting his effulgence to the people, he sharpens [his] thunderbolt for brightness, like as the bull [sharpens his horns].

---

१. या मंत्रांत इंद्राचा महिमा सांगितला आहे. महिमा म्हणजे मोठेपण. 'इंद्राचें मोठेपण एवढें आहे कीं तें द्युलोकांतहि मावेनासें झालें, तेव्हां सर्व द्युलोक भरून त्याच्या बाहेरहि पसरलें आहे. पृथ्वी इतकी मोठी आहे तरी ती सुद्धा इंद्राची बरोबरी करूं शकत नाहीं, म्हणजे इंद्राचा महिमा पृथिवीपेक्षांहि मोठा आहे. तसाच तो भयंकर म्हणजे आपल्या मोठेपणानें आणि तेजानें भय उत्पन्न करणारा असून बळवान् आहे. आणि आपलें तेज सकळ जनांस दाखवून त्यांस संताप उत्पन्न करितो, तो आपलें वज्र आपल्या हातांत घेऊन त्यास वारंवार तीक्ष्ण करीत असतो, आणि प्रसंग येतांच त्याचा उपयोग करूं शकतो.' इंद्र द्युलोकापेक्षां आणि पृथिवीपेक्षांहि मोठा आहे याविषयीं पूर्वी सू. ५२ मं. १४ आणि त्याजवरील टीप पहा. इंद्राच्या मोठेपणाविषयीं वेदांत पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे, त्याजवरून ईश्वराचा जो मोठेपणा त्याविषयीं ज्ञान अतिपुरातन काळापासून आर्य लोकांत कसें वाढत आलें आहे तें दृष्टीस पडतें.

'लोकांस [आपला] प्रताप दाखविणारा [इंद्र]'= 'चर्षणिभ्यः आतपः.' अक्षरशः अर्थ 'लोकांस संतापकारी' इतकाच आहे. तात्पर्य असें आहे कीं, इंद्राचें तेज किती आहे तें तो आकाशांत सूर्य चढवून दाखवितो, आणि मध्यान्हीं सूर्याचे 'किरण तापूं लागले' म्हणजे मनुष्यांस इंद्राच्या प्रतापाचा अनुभव ये-

सो अर्णवो न नद्यः समुद्रियः प्रति गृभ्णाति विश्रिता वरीमभिः ।
इन्द्रः सोमस्य पीतये वृषायते सनात्स युध्म ओजसा पनस्यते ॥२॥

सः । अर्णवः । न । नद्यः । समुद्रियः । प्रति । गृभ्णाति । विऽश्रिताः । वरीमऽभिः ।
इन्द्रः । सोमस्य । पीतये । वृषऽयते । सनात् । सः । युध्मः । ओजसा । पनस्यते ॥ २ ॥

भाषायाम्.

२. स [इन्द्रः] वरीमभिः (=उरुत्वैः) विश्रिताः (=व्याप्ताः=विस्तृताः) समुद्रियः (=समुद्रः=समुद्रीः=अन्तरिक्षरूपसमुद्रस्य संबन्धिनीः=अन्तरिक्षाद् मेघोदकरूपैः प्रवाहैः सरन्तीः) नद्यः (=नदीः) अर्णवो न (=समुद्रः प्रतिगृभ्णाति=स्वीकरोति तथा) [सोमरूपा नदीः] प्रतिगृभ्णाति (=प्रतिगृह्णाति=स्वीकरोति) । इन्द्रो [हि] सोमस्य पीतये (=पानाय) वृषायते (=वृषवद् आचरति=अत्युत्सुको भवति) [सोमं पीत्वा च] स युध्मः (=स योधः) ओजसा (=वृत्रवधादिरूपेण शौर्यकर्मणा) सनात् (=चिरादेव) पनस्यते (=स्तुतिमिच्छति सोमपानेन जाते हर्षे स्तुत्यर्हाणि शौर्ययुक्तानि कर्माणि करोति) ॥

अत्रेदमुक्तं भवति । इन्द्रः सोमस्य पाने प्रभूतमेव तृष्णालुर्भवति । अत एव अनेकैरुपासकैरर्पितान् सोमान्, समुद्रो नदीरिव, स्वीकरोति, सोमं पीत्वा च स्तुत्यर्हाणि वृत्रहननादीनि कर्माणि करोतीति ॥

तो. आकाशांत सूर्य आहे तो इंद्रानेंच तेथें स्थापिला आहे असें वेदांत पुष्कळ ठिकाणीं आलें आहे.

'वृषभ' इ० ही उपमा थोडी चमत्कारिक आहे. इंद्राच्या मोठेपणाविषयीं उत्कृष्ट रीतीनें वर्णन करितांना अशी क्षुद्र उपमा कां दिली व ती शोभते असें ऋषीस कशानें वाटलें नकळे.

'वज्र तेजासाठीं घांसीत असतो.' म्हणजे, नित्य वृत्रहननासाठीं वगैरे वज्रप्रहार करण्यास सिद्ध असतो. नित्य युद्ध करण्याच्या तयारींत असतो असें तात्पर्य. शस्त्र सदैव घांसीत राहणें हें युद्धाच्या सिद्धतेचें लक्षण होय. इंद्र हा मोठा शूर योद्धा आहे असें विवक्षित आहे.

हा मंत्र फार थोड्या फेरफारानें वंशस्थ श्लोकाला लागतोः—

दिवश्चिदस्य वरिमा वि पप्रथे ।
इन्द्रं न मह्ना पृथिवी चन प्रति ।
भीमस्तुविष्मान् चर्षणिभ्य आतपः ।
शिशीते वज्रं तेजसे न वंसगः ॥

२. इंद्र [हा], समुद्र अंतरिक्षांतील अतिविस्तीर्ण प्रवाह ग्रहण करितो तसा, [सोमाचे प्रवाह] ग्रहण करितो. इंद्र सोमपानाविषयीं अति तृष्णाक्रान्त होतो, [आणि] तो योद्धा [आपल्या] शौर्यानें नित्य स्तवनाची इच्छा करीत असतो.

2. He receives [the streams of Soma] as the ocean[receives]the ethereal streams swollen with magnitude; Indra feels thirsty to drink the Soma. That warrior with his valour ever desires praise.

---

२. भावार्थः—' इंद्र हा सोम पिण्याविषयीं फार उत्सुक असतो त्यामुळें अनेक उपासकांनीं अनेक पात्रांत भरून अर्पण केलेले जे सोमरस ते तो पीतो; तेव्हां असें दिसतें कीं, अंतरिक्षांतून अनेक ठिकाणीं अनेकशः धारांनीं उदकें वाहून अनेकशः प्रवाहांनीं समुद्राकडे धांवतात तीं जसा समुद्र ग्रहण करितो, त्यासारिखा इंद्र सोम ग्रहण करितो. आणि सोम पिऊन इंद्राला इतका आवेश येतो कीं, तो मोठमोठीं शौर्ययुक्त कर्में करितो कीं जेणेंकरून ऋषिजन त्याची स्तुति गातात'.

' अंतरिक्षांतील '=' समुद्रियः'. 'समुद्रियः ' हें ' समुद्री ' या स्त्रीलिंगी विशेषणाचें ' समुद्र्यः' याऐवजीं अनेकवचन आहे. याचा अर्थ 'समुद्रसंबंधी.' समुद्र हें नांव जसें सागराचें आहे तसेंच अंतरिक्षाचेंहि नांव आहे. आणि 'समुद्री नदी ' म्हणजे अंतरिक्षांतून मेघवृष्टिरूपानें वाहणारी नदी अथवा प्रवाह. ऋ. १०. ६५. १३; ५. ७३. ८; १०. ६५. १३ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा.

' अतिविस्तीर्ण ' = ' विश्रिताः वरीमभिः.' शब्दशः अर्थ, 'विस्तारांनीं पसरलेले.' पुष्कळ विस्तार होऊन वाढलेले.

'[सोमाचे प्रवाह] ग्रहण करितो.' समुद्र नद्या पीतो तसा इंद्र सोमाचे प्रवाह पीतो याविषयीं अथवा नद्यांसारिखे सोमाचे किंवा स्तुतीचे प्रवाह इंद्राकडे धांवतात याविषयीं उल्लेख वेदांत बरेच आले आहेत.

' सोमपानाविषयीं अति तृष्णाक्रान्त होतो ' = ' सोमस्य पीतये वृषायते. ' अक्षरशः अर्थ, ' सोमाच्या पानाविषयीं बैलाप्रमाणें करितो, ' म्हणजे बैलास गाईची इच्छा झाली म्हणजे तो जसा आर्त होतो तसा सोमपानाविषयीं अति आर्त अथवा आतुर होतो.

' स्तवनाची इच्छा करितो ' =' पनस्यते,' हा अर्थ अगदी अक्षरशः आहे. स्तुतीची इच्छा धरून, ऋषींनीं गाण्यास योग्य अशीं शूरतेचीं कर्में करितो. म्हण-

त्वं तमिन्द्र पर्वतं न भोजसे महो नृम्णस्य धर्मणामिरज्यसि ।
प्र वीर्येण देवताति चेकिते विश्वस्मा उग्रः कर्मणे पुरोहितः ॥३॥

त्वम् । तम् । इन्द्र । पर्वतम् । न । भोजसे । महः । नृम्णस्य । धर्मणाम् । इरज्यसि ।
प्र । वीर्येण । देवता । अति । चेकिते । विश्वस्मै । उग्रः । कर्मणे । पुरःऽहितः ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. हे इन्द्र, त्वं तं पर्वतं (=तं प्रसिद्धं पर्ववन्तं=मेघं) भोजसे (=भोजनाय=लोका यथा भोजनं कुर्वन्ति तथा) न (=अवर्तमानं) [करोषि] (=हंसि) । [त्वं हि] महो (=महतो) नृम्णस्य (=धनस्य) [तथा] धर्मणां (=यज्ञादिकर्मणाम्) इरज्यसि (=ईश्वरोसि) । उग्रः (=उद्गूर्णः=बलवान्) [इन्द्रः] विश्वस्मै कर्मणे (=सर्वस्मै कर्मणे=सर्वेषामपि कर्मणां करणे) [देवैः] पुरोहितः (=पुरस्तादवस्थापितः=पुरस्कृतः) [सन्] वीर्येण (=स्वकीयेन बलेन) देवता (=सर्वेषु देवेषु) प्रातिचेकिते (=ज्ञातो भवति=दृश्यते) ॥

अत्र 'त्वं तमिन्द्र पर्वतं न भोजसे' इत्येतद् दुर्बोधतरं सायणाचार्यैरेवं व्याख्यातम् । "हे इन्द्र त्वं भोजसे भोजनाय पर्वतं पर्ववन्तं मेघं नाकार्षीः । नहि हतो "भुङ्क्ते । इन्द्रो हि वर्षणार्थ मेघं हन्ति" इति ।

जे शूरतेचीं कर्मे करून ऋषिजनांनीं आपली स्तुति करावी अशी इच्छा करितो. इंद्रानें सोमपान केल्यावर शूरतेचीं कर्मे करण्याविषयीं त्यास आवेश येतो याविषयीं ऋग्वेदांत जिकडे तिकडे सांगितलें आहे.

३. हे इंद्रा, तूं त्या पर्वताला नाहीं[सा करून] [लोकांला] खावयास [अन्न मिळे असें करितोस]. [तूं] मोठ्या धनाचा [आणि] कर्मांचा राजा होस.—[इंद्र आपल्या] वीर्यानें देवांमध्यें श्रेष्ठ आहे. प्रत्येक कार्य करण्यासाठीं सकल देव बलवान् इंद्रास पुढें करीत असतात.

3. O Indra, thou destroyest that mountain that [people] may enjoy [their food]. Thou art master of great wealth [and] of actions.—With [his] puissance [Indra] is conspicuous among the gods. For achieving every exploit mighty [Indra] is placed in front.

---

३. 'वृत्र जोंपर्यंत जीवंत असतो तोंपर्यंत लोकांस अन्नाचें वगैरे सुख भोगावयास सांपडत नाहीं, तें सांपडावें म्हणून हे इंद्रा, तूं त्या पर्वतसदृश मेघाला (म्हणजे वृत्रालाच) नाहींसा करून टाकितोस. आणि या जगांत जितकें धन आहे त्याचा आणि सकल यजमान लोक जीं यज्ञादि कर्में करितात त्यांचा तूं राजा आहेस, म्हणजे तुला पाहिजे तितकें धन मिळेल आणि तुझ्या प्रीत्यर्थच सर्व लोक यज्ञयागादिक करितात. त्यामुळेंच सर्व देव कांहीं झाला तरी पराक्रम करावयाचा असला तर तुलाच पुढें करितात, आणि तुजकडून तो करवितात. यास्तव सकळ देवांत तूं श्रेष्ठ असा साजत असतोस' असें ऋषीच्या मनांतील म्हणणें आहे.

'हे इंद्रा, त्या पर्वताला नाहीं[सा करून लोकांला] खावयास [अन्न मिळे असें करितोस]' = 'त्वं तम् इन्द्र पर्वतं न भोजसे.' हें वाक्य फार संदिग्ध आहे आणि त्याच्या अर्थाविषयीं विप्रतिपत्ति आहे. यांत क्रियापदाचा अध्याहार करावा लागतो आणि 'न' या अव्ययाचा नेहमीच्या अर्थास सोडून थोडा निराळा अर्थ करावा लागतो. तथापि निर्वाह करण्याचा दुसरा कांहीं चांगला मार्ग दिसत नाहीं.

'धनाचा' = 'नृम्णस्य.' हा अर्थ आम्हीं सायणानुसारेंच केलेला आहे. 'नृम्ण' याचा साधारण आणि मूळ अर्थ वीर्य अथवा बळ जरी आहे, तरी 'धन' असा सायणाचार्यांनीं दिलेला कां होऊं नये याचें कारण दिसत नाहीं. सायणाचार्य ऋ. ५. ३८. ४; ६. २५. ९; ६. ४६. ७; ७. ५६. ५; आणि ८. ९. २ यांतहि धन असा अर्थ करितात. तेव्हां शार्मण्य पंडित ग्रास्मन बळ इतकाच अर्थ करितात तो चिंत्य दिसतो.

'कर्मांचा' = 'धर्मणाम्.' ऋ. ८. ४३. २४; १. १३. ७; २. ३६. ६; ३. ३८. २; ३. ३. १ आणि १. १६४.

स इद्वने नमस्युभिर्वचस्यते चारु जनेषु प्रब्रुवाण इन्द्रियम् ।
वृषा छन्दुर्भवति हर्यतो वृषा क्षेमेण धेनां मघवा यदिन्वति ॥४॥

सः । इत् । वने । नमस्युऽभिः । वचस्यते । चारु । जनेषु । प्रऽब्रुवाणः । इन्द्रियम् ।

वृषा । छन्दुः । भवति । हर्यतः । वृषा । क्षेमेण । धेनाम् । मघऽवा । यत् । इन्वति ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. जनेषु (=लोकेषु) चारु (=सुन्दरम्) इन्द्रियं (=स्वकीयं बलं) प्रब्रुवाणः (=प्रकटयन्) स इत् (=इन्द्र एव) नमस्युभिः (=नमसा स्तोत्रेण पूजयितृभिः) वने (=अरण्ये) वचस्यते (=स्तूयते) । यद् (=यदा) [च] मघवा (=धनवान् इन्द्रः) क्षेमेण (=रक्षणेच्छया) धेनां (=स्तुतिम्) इन्वति (=प्रेरयति=स्तोतृभिः कारयति) [तदा] वृषा (=सेचनसमर्थो वीर्यवान् इन्द्रः) छन्दुः (=छन्दोभिः स्तोतृभिः स्तवनीयः) [सत्यमेव] भवति वृषा (=वीर्यवान् इन्द्रो) हर्यतः (=कमनीयो) [भवति=भवत्येव] ॥

अत्रेदमुक्तं भवति । इन्द्रो वृत्रहननादीनि कर्माणि कृत्वा स्वबलं जनेषु प्रकटयति । तेन स्तोतारस्तमेव वने स्तुवन्ति । न च असत्येव स्तुत्यर्हत्वे स्तूयते सः । अपि तु तस्य स्तोत्रकरणे यदा यदा प्रेरणा जायते तदा तदा वीर्यसंपन्न इन्द्रः सत्यमेव=छन्दनीयः कमनीयश्च अर्थात् स्तवनीयो भवतीति ॥

४३ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा. या ठिकाणीं ‘ कर्म ’ म्हणजे सोमादिक अर्पण करून जें यज्ञादिक कर्म लोक करितात तें समजावयाचें.

‘प्रत्येक कार्य.’ म्हणजे वृत्राला मारणें, उदकें खालीं पाडणें इत्यादि जीं मोठीं कार्यें तीं करण्याला.

‘ पुढें करीत असतात ’=‘ पुरोहितः’ अक्षरशः ‘ पुढें केलेला [असतो].’ ‘ पुरोहित ’ या शब्दाचा हा मूळ अर्थ येथें आला आहे तिकडेस लक्ष द्यावें. आपल्याऐवजीं अथवा दुसऱ्याच्या ऐवजीं पुढें केलेला अथवा पुढें ठेविलेला तो ‘पुरोहित.’ आपण आपल्याऐवजीं अग्नीला ‘ पुढें करितों ’ आणि देवांकडेस आम्हांविषयीं बोलावयास लावितों म्हणून तो ‘ पुरोहित ’ होय. कांहीं धर्मसंबंधी विद्वत्तायुक्त कर्म करावयाचें असलें आणि तें करण्यासाठीं कोणाहि विद्वान् मनुष्याची आपण योजना केली म्हणजे तो ‘पुरोहित’ होय. केवळ पुरोहित बोवाचा जन्मानें मुलगा असला म्हणजे तितक्यावरूनच तो ‘ पुरोहित ’ होत नाहीं.

४. लोकांत आपलें सुंदर बळ प्रगट करणाऱ्या त्या इंद्राचीच स्तुति भाविकजन वनांत करितात. जेव्हां मघवा कृपा करून स्तुतीची प्रेरणा करितो [तेव्हां] वीर्यवान् [मघवा] स्तवनीय असतोच, वीर्यवान् [मघवा] प्रीतिपात्र [असतोच असतो].

4. Proclaiming his own beautiful might among the people, he—Indra—alone is praised by the pious in the forest. The hero [Indra] is praiseworthy, the hero [is] loveable [indeed], when [he] the Maghavâ inspires the prayer with a desire to protect.

४. 'वृत्रहननादि मोठमोठीं कामें करून इन्द्र आपलें बळ लोकांत प्रगट करीत असतो. तेणेंकरून भाविक जन त्याचेंच स्तोत्र रानांत गातात. आणि गातात तें उगीच अयोग्य म्हणजे इंद्रास तशी योग्यता नसतां उगीच गातात असें नाहीं, तर जेव्हां त्याचें स्तोत्र करण्याची प्रेरणा लोकांस होते, तेव्हां तो खरोखरच स्तवनीय आणि प्रीतिपात्र असतो' असा या मंत्राचा भावार्थ आहे.

हा जरी भावार्थ उघड दिसून येतो, तरी या मंत्रांत एक दोन अडचणी आहेत. १ ली, 'वनांत' स्तुति गातात म्हणजे काय? दुसऱ्या पादांत 'लोकांत' (जनेषु) असें पद आहे तेव्हां, 'वनांत' आणि 'लोकांत' यांच्यामध्यें कांहीं विरोध विवक्षित आहे कीं काय? भाविक जन वनांत स्तुति गातात यावरून ऋषिजन अरण्यांत राहत होते असें सिद्ध होत नाहीं, कारण त्याविरुद्ध पुष्कळ ज्ञापकें आहेत. तेव्हां 'रानोमाळ,' 'रानीं वनीं' म्हणजे 'जिकडे तिकडे' असा अर्थ समजावयाचा असेल तरी कोण जाणे. २ री अडचण ही कीं 'कृपा करून' ('क्षेमेण') म्हणजे काय? आणि या पदाचें येथें प्रयोजन काय आहे? सायणाचार्य 'क्षेमकरेण मनसा' = 'बरें करणाऱ्या मनानें' असा अर्थ करितात, त्यालाच अनुसरून आम्हीं निर्वाह केला आहे. इंद्राची स्तुति केल्यापासून कल्याण होतें असें तात्पर्य दिसतें, आणि तें व्हावें अशी इच्छा धरूनच इंद्र आपली स्तुति लोकांनीं करावी अशी प्रेरणा तो लोकांच्या मनांत करितो असें विवक्षित दिसतें.

'स्तुतीची प्रेरणा करितो' = 'धेनाम् इन्वति.' हा 'धेना' शब्दाचा अर्थ आम्हीं सायणानुसारें केला आहे आणि आम्हांस वाटतें तो खरा आहे. शार्मण्य पंडित ग्रास्मन 'धेना' म्हणजे 'गाय' असा अर्थ करितात, आणि 'क्षेमेण धेनां मघवा यद् इन्वति' याचा अर्थ 'सुखरूपपणें गाईस हाकतो' असें भाषांतर करूं इच्छितात. परंतु 'गाय' हा अर्थ सायणांनींच जरी (३.३४. ३ यांत)

स इन्महानि समिथानि मज्मना कृणोति युध्म ओजसा जनेभ्यः ।
अधा चन श्रद्दधति त्विषीमत इन्द्राय वज्रं निघनिघ्नते वधम् ॥ ५ ॥ १९ ॥

सः । इत् । महानि । सम्ऽइथानि । मज्मना । कृणोति । युध्मः । ओजसा । जनेभ्यः ।

अध । चन । श्रत् । दधति । त्विषिऽमते । इन्द्राय । वज्रम् । निऽघनिघ्नते । वधम् ॥ ५ ॥ १९ ॥

भाषायाम्.

५. स इत् (=स एव) युध्मः (=योद्धा) [इन्द्रः] मज्मना (=स्वकीयेन बलेन) [तथा] ओजसा (=स्वतेजसा) [च] जनेभ्यः (=जनहितार्थं) महानि (=महान्ति) समिथानि (=युद्धानि) [वृत्रादिभिः सह] कृणोति (=करोति)। अधा चन (=अत एव कारणाद्) वधं (=वधकरं) वज्रं निघनिघ्नते (=पुनःपुनर्घ्नते वज्रस्य प्रहारप्राचुर्येण दारुणं युद्धं कुर्वते) त्विषीमते (=दीप्तिमत) इन्द्राय [जनाः] श्रद्दधति (=अयं बलवानस्त्यस्माकं रक्षणं कर्तुम् इति श्रद्धां धारयन्ति)॥

दिला आहे आणि दुसऱ्या एक दोन स्थळीं इष्ट दिसतो तथापि तो सर्वत्र बसत नाहीं, आणि 'स्तुति' हा अर्थ सायण बहुतकरून सर्वत्र देतात; यावरून तो त्यांच्या पदरचा अर्थ नव्हे, परंपरागत आलेला आहे. तो एकीकडे टाकून अन्यथा कल्पना करण्यांत कांहींच लाभ नाहीं असें आम्हांस वाटतें (ऋ. १०. १०४. १०; १. १४१. १; ७. ९४. ४; ८. ३२. २२; १०. ४३. ६; १०. १०४. ३ हे मंत्र आणि त्यांजवरील भाष्य पहा).

'प्रीतिपात्र'='हर्यतः.' हें प्रथमेचें एकवचन आहे. 'लोकांनीं ज्यावर प्रीति करावी तो' असा अर्थ आहे. ऋ. १०. ९६. १०. आणि ऋ. ३. ५. ३ यांजवरील भाष्य पहा.

'आपलें सुंदर बळ'='चारु इन्द्रियम्.' 'आपलें बळ' हा अर्थ 'इन्द्रियम्' इतक्या शब्दाचा आहे. 'इन्द्रिय' शब्द तर आपल्या ओळखीचा आहेच, पण त्याची उत्पत्ति कशी झाली तें या मंत्रावरून सुंदर रीतीनें दिसून येतें. 'इन्द्रियम्' म्हणजे 'इन्द्राचें आत्मत्व', ='इन्द्रपण,' अर्थात् 'इन्द्राचें बळ.' यावरून 'इन्द्राच्या प्रभुत्वासारिखें प्रभुत्व' किंवा 'बळ' 'इन्द्र देतो तसलें धन' असे अर्थ होऊं लागले. इंद्रानें लोकांस

५. तोच योद्धा जन[हिता]-साठीं [आपल्या] बळानें [आणि] प्रतापानें मोठीं युद्धें करितो. यास्तवच घातक वज्राचा प्रहारामागें प्रहार करणाऱ्या महाबळी इंद्रावर [लोक] विश्वास ठेवितात.

5. That warrior alone fights for the people great battles with [his] power [and] valour. It is therefore that [they] believe in Indra possessed of puissance, [and] used to strike over and over again the deadly thunderbolt.

'इंद्रिय (इंद्रपण) दाखविलें' म्हणजे इंद्रानें आपली स्वताहाची शक्ति दाखविली, हा प्रयोग स्वाभाविक आहे. ऋ. १. ८५. २ यांत मरुतांनीं इंद्रास उत्तेजन येण्याजोगें भाषण करून इंद्रिय उत्पन्न केलें (जनयन्तः इन्द्रियम्) असें सांगितलें आहे; म्हणजे, इंद्राचें बळ उत्पन्न केलें. ऋ. १. १११. २ यांत ऋषि ऋभु या नांवाच्या देवांस म्हणतो कीं आम्हांस इंद्र देतो तसें धन अथवा बळ द्या (=धासथ इन्द्रियम्). यावरून उत्तरोत्तर बळ इतकाच अर्थ होऊं लागला, आणि नंतर 'बळ संपादण्याचे जे अवयव ते' हा शेवटील अर्थ आतां प्रसिद्ध आहेच. जसा इंद्रशब्दापासून 'इंद्रिय' तसा रुद्रशब्दापासून 'रुद्रिय' हा शब्द निघाला आहे आणि त्याचाहि अर्थ 'रुद्राचें बळ' असा होतो.

---

५. 'जनांचें हित करण्यासाठीं महायोद्धा जो इंद्र, तोच आपल्या बळानें आणि प्रभावानें वृत्रादिक शत्रूंबरोबर मोठें प्रचंड युद्ध करून मेघोदकांची वृष्टि करितो. आणि यास्तवच इंद्र हा बलवान् आहे, तो आपलें संरक्षण करील, त्यासारिखा वज्रप्रहारानें शत्रूंचा नाश करणारा दुसरा कोणी नाहीं, असा सर्वांनां भरंवसा असतो.'

'बळानें'='मज्मना.' सायणाचार्य या ठिकाणीं 'मज्मना' शब्दाचा अर्थ 'शुद्ध करणार' असा विशेषणार्थी करून 'प्रतापानें' ('ओजसा') याशीं संबंध लावितात. परंतु 'मज्मन्' शब्दाचा अर्थ 'बळ' असा होतो याविषयीं ऋ. ७. ८२. ५, १. ६४. ३ हे मंत्र, आणि त्यांजवरील सायणाचेंच भाष्य पहा. कित्तीएक पाश्चात्य विद्वान् 'मज्मन्' म्हणजे 'मोठेपणा,' 'महिमा' असा अर्थ करितात. तो जरी शब्दशास्त्रानुसारें संभवतो तरी पर्यवसानीं 'बळ' हाच अर्थ वेदांत आहे.

'जन[हिता]साठीं'='जनेभ्यः.' हें जनहित म्हणजे वृष्टि होऊन जनांस उदक मिळावें हें होय. ही चतुर्थी ध्यानांत ठेवण्याजोगी आहे.

स हि श्र॒व॒स्युः सद॑नानि कृ॒त्रिमा॑ क्ष्म॒या वृ॑धा॒न ओज॑सा वि॒ना॒शय॑न्। ज्योतीं॑षि कृ॒ण्वन्न॑वृ॒काणि॒ यज्य॒वेऽव॑ सु॒क्रतु॒ः सर्त॒वा अ॒पः सृ॒जत् ॥ ६ ॥

सः । हि । श्र॒व॒स्युः । सद॑नानि । कृ॒त्रिमा॑ । क्ष्म॒या । वृ॒धा॒नः । ओज॑सा । वि॒ऽना॒शय॑न् ।
ज्योतीं॑षि । कृ॒ण्वन् । अ॒वृ॒काणि॑ । यज्य॑वे । अव॑ । सु॒ऽक्रतु॑ः । सर्त॒वै । अ॒पः । सृ॒जत् ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. हि (=यस्मात् कारणात्) स [इन्द्रः] श्रवस्युः (=कीर्तिमात्मन इच्छन्) क्ष्मया वृधानः (=पृथिव्या समानं वर्धमानः) ओजसा (=स्वतेजसा) कृत्रिमाणि (=क्रियया रचितानि) [वृत्रादीनां] सदनानि (=गृहाणि) विनाशयन् (=विध्वंसयन्) [सन्] [तेन च] यज्यवे (=यष्ट्रे=यजमानाय= उपासकहितार्थं) ज्योतींषि (=सूर्यादीनि तेजांसि) अवृकाणि (=आवरकवृत्रमुक्तानि) कृण्वन् (=कुर्वन्) [सन्] सुक्रतुः (=शोभनप्रज्ञावान्) [इन्द्रः] अपः (=उदकानि) सर्तवै (=सर्तुं=यथा ताः सरन्ति वहन्ति तथा) अव सृजत् (=अवामृजत्=भूमावावर्जितवान्) ॥

अत्रेदमुक्तम् । वृत्रहा आकाशे बहुरूपवर्णयुक्तानि मेघरूपाणि गृहाणि रचयति। तानि सर्वाणि इन्द्रः पृथिव्या समानं स्थूलो भूत्वा विनाशयति यथा ऋषयस्तस्य कीर्तिं गायेयुरिति । वृत्ररचितानि च गृहाणि नाशयित्वा महाप्रज्ञ इन्द्रः स्वोपासकहितार्थं सूर्यादीनि तेजांसि पूर्वं वृत्रेण निरुद्धानि वृत्रनिरोधमुक्तानि करोति तथा मेघोदकान्यपि वृत्रनिरोधमुक्तानि कृत्वा तानि भूमौ वर्षयति यथा तानि नदीप्रवाहद्वारा सरन्तीति । एतस्मादेव कारणाद् इन्द्राय श्रद्धतीति पूर्वस्थेन सह हेः संबन्धः ॥

'विश्वास ठेवितात'=' श्रद्धति.' म्हणजे, इंद्र आपलें संरक्षण करण्यास शक्तिमान आहे असा भरंवसा ठेवितात.

वंशस्थ वृत्ताला आणि या मंत्राला किती थोडें अंतर आहे पहाः—

स इन्महानि समिथानि मज्मना ।
कृणोति युध्मः ओँजसा जनेभिअः ।
अधा चन श्रद्धति त्विषीमते ।
इन्द्राय वज्रं निघनिघ्नते वधम् ।

६. कारण कीं कीर्तीविषयीं उत्कंठित [असा] तो [इंद्र] पृथ्वीप्रमाणें मोठा होऊन [आपल्या] बळानें [शत्रूचीं] कृत्रिम घरें विध्वंसणारा, [आणि] उपासकांच्या हितासाठीं [सूर्यादि] तेजें प्रगट करणारा, [आणि] सुप्रज्ञासंपन्न [असा होत्साता], उदकांस खालीं सोडून वाहविता झाला.

6. For he, desirous of renown, grew as large as the earth, [and] destroying with [his] splendor the artificial homes [of the demons], [and] freeing the heavenly lights from [their] besieger,–he, the possessor of good wisdom–let down the water that they might flow.

६. इन्द्रावर भरंवसा ठेवितात म्हणून वरच्या मंत्रांत सांगितलें, त्याचें कारण या मंत्रांत स्पष्ट करून सांगतोः—'कारण कीं वृत्र हा आकाशांत अभ्ररूपी अनेक रंगांचीं आणि अनेक आकृतींचीं घरें जिकडे तिकडे बांधितो, तीं सर्व इन्द्र पृथ्वीप्रमाणें मोठा वाढतो आणि आपल्या तेजानें नाहींसीं करितो, म्हणजे मेघ फोडून नाहींसे करून टाकितो; आणि तसें करून सूर्यचंद्रतारकादिक जीं अनेक तेजें आकाशांत आहेत आणि ज्यांच्या प्रकाशानें सकल प्रजांचे सर्व कांहीं व्यापार चालतात आणि असें असतांहि ज्यांस वृत्र अंधकारानें आणि ढगांनीं वगैरे आच्छादित करितो, त्यांस त्या आच्छादनापासून मुक्त करितो, आणि मेघांतून उदकें वृष्टिरूपानें खालीं पाडितो, कीं जीं नदीप्रवाहरूपानें जमिनीवरून वाहत जातात.' इन्द्रानें वृत्रास मारून प्रकाश आणि उदकें हीं आपल्या उपासकांच्या हितासाठीं मोकळीं केलीं हीच गोष्ट रूपान्तरानें या ऋचेंत सांगितली आहे.

'कीर्तीविषयीं उत्कंठित'='श्रवस्युः.' म्हणजे आपली कीर्ति ऋषींनीं गावी अशी उत्कंठा म्हणजे इच्छा आहे ज्यास तो;— आपली कीर्ति ऋषिजन गातील अशा हेतूनें.

'पृथिवीप्रमाणें मोठा होऊन'= 'क्ष्मया वृधानः.' म्हणजे पृथिवीएवढा मोठा, पृथिवी समान स्थूळ असा जो इंद्र इतकेंच विवक्षित दिसतें. या शब्दांचा दुसरा अर्थ करून कसा निर्वाह करावा समजत नाहीं. 'पृथिवीशीं आनंद पावणारा' असा जो पाश्चिमात्य पंडित अर्थ करितात तो चिंत्य दिसतो.

'कृत्रिम घरें'='कृत्रिमा सदनानि.' म्हणजे साधारण घरांप्रमाणें स्थिर राहणारीं घरें नव्हेत, तर घटकेंत एक रंग घटकेंत दुसराच रंग, आतां एक आकृति आणि पुनः लागलीच दुसरी

दानाय मनः सोमपावन्नस्तु तेऽर्वाञ्चा हरी वन्दनश्रुदा कृधि ।
यमिष्ठासः सारथयो य इन्द्र ते न त्वा केता आ दभ्नुवन्ति भूर्णयः ॥७

दानाय । मनः । सोमऽपावन् । अस्तु । ते । अर्वाञ्चा । हरी इति ।
वन्दनऽश्रुत् । आ । कृधि ।
यमिष्ठासः । सारथयः । ये । इन्द्र । ते । न । त्वा । केताः । आ ।
दभ्नुवन्ति । भूर्णयः ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. हे सोमपावन् (=सोमस्य पातः) [इन्द्र], ते (=तव) मनः दानायास्तु (=अस्मभ्यम् अभिमतं दातुं कृतनिश्चयं भवतु), हे वन्दनश्रुत् (=वन्दनस्य स्तोत्रस्य श्रोतः) [इन्द्र], [तव] हरी (=एतन्नामकावश्वौ) अर्वाञ्चा (=अर्वाञ्चौ=अस्मद्यज्ञाभिमुखौ) आकृधि (=आकुरु=आभिमुख्येन स्थापय)। ये हि, हे इन्द्र, ते (=तव) सारथयः [सन्ति] [ते] यमिष्ठासः (=यमिष्ठाः=अतिशयेन यन्तारः=अश्वनियमने अतिकुशला) [भवन्ति], [तेन च] [तव] भूर्णयः (=क्षिप्रगामिनः) केताः (=केतवः=अश्वाः) त्वा (=त्वां) न आदभ्नुवन्ति (=न हिंसन्ति) ॥

हे इन्द्र, त्वम् अत्रागत्य नः सोमं पीत्वा अस्मभ्यम् अस्मदभीष्टं देहि । न च तवागमनसमये तव क्षिप्रा अश्वास्त्वाम् उच्चावचप्रदेशेषु पादाघातादिना पतित्वा हिंसिष्यन्ति तव सारथीनाम् अश्वनियमनेतिकुशलत्वादिति भावगतम् ॥

आकृति, अशी ज्यांची अवस्था होत असते तीं. हीं घरें म्हणजे आकाशांत जीं ढगें अनेक प्रकारचीं अनेक वेळीं येतात आणि प्रकाशास आणि उदकांस अडवून जणुं टाकितात तीं समजावयाचीं आहेत. त्यांस 'कृत्रिम,' हें विशेषण चांगलें साजतें.

'उदकांस खालीं सोडून वाहविता झाला '=' अपः सर्तवै अव सृजत्.' अक्षरशः अर्थ, 'उदकांस वाहण्यासाठीं खालीं सोडिता झाला,' म्हणजे, 'उदकांनीं वाहावें म्हणून त्यांस आकाशांतून खालीं सोडिता झाला.' 'सोडून वाहविता झाला' हा भूतकाळ घालण्याचें कारण इतकेंच कीं, इंद्रानें पूर्वीं वृष्टि केली ती अशा रीतीनें केली. अजून तरी सदैव तशी करीत असतोच म्हणून वर्तमानकाळीं भाषांतर केलें तरी चालेल. या पृथिवीवर पाऊस कोठून पडला ? असा प्रश्न कल्पून ऋषीनें या मंत्रांत उत्तर दिलें आहे यास्तव भूतकाळाचा प्रयोग घातला आहे.

७. हे सोम पिणाऱ्या इंद्रा, तुझें मन [आम्हांस] [इच्छिलेलें] देण्याला [सिद्ध] असो. हे स्तवनश्रोत्या इंद्रा, [तूं] [आपले] घोडे इकडे वळीव. हे इंद्रा, तुझे जे सारथि [आहेत] [ते] घोडे हाकण्याविषयीं परमकुशल [आहेत]. तुला [तुझे] वेगवान् घोडे दुखविणार नाहींत.

7. May thy will, O drinker of the Soma, be disposed to liberality; O [Indra] that hearest the praise, turn [thy] pair of tawny horses hitherward. [For] those who [are] thy chariot-drivers [are] most skilful, [thy] swift horses will not hurt thee.

हा मंत्र वंशस्थाप्रमाणें होण्यास थोडीच अडचण आहे:-
स हि श्रवस्युः सदनानि कृत्रिमा ।
क्ष्मया वृधानः ओजसा विनाशयन् ।
ज्योतींषि कृण्वन्नवृकाणि यज्यवे ।
अव सुक्रतुः सर्तवा अपः सृजत् ॥

७. या मंत्रांत ऋषि असें प्रार्थितो कीं, ‘हे इंद्रा, तूं आपले घोडे इकडे वळीव, आणि आमच्या सोमाप्रत ये. येतांनां तुझे अतिवेगवान घोडे मस्ती वगैरे करून तुला दुःख होई असें करणार नाहींत, कारण कीं तुझे जे सारथि आहेत, ते रथ चालविण्याविषयीं फारच कुशल आहेत.

‘तुझें मन आम्हांस इच्छिलेलें देण्याला सिद्ध असो’=‘दानाय मनः अस्तु ते.’ हा अर्थ सायणांस अनुसरून आम्हीं केला आहे. परंतु ‘सोमपावन्’ (=सोम पिणाऱ्या) या हेतुगर्भ विशेषणाच्या संबोधनावरून पाहातां, आणि मंत्रांतील वाक्यसंदर्भाच्या साहचर्यावरून पाहातां, आणि ‘दान’ शब्दाचा अर्थ देवांस सोमादिक जें अर्पण करितात तें असाहि होतो (सू. ४८. मं. ४ याजवरील टीप पहा) यावरून पाहातां, ‘तुझें मन आम्हीं अर्पण केलेल्या या सोमाप्रत असो,’ म्हणजे ‘या सोमाकडेस यावें असें तुला वाटो’ असा अर्थ चांगला संभवतो.

‘स्तवनश्रोत्या’=‘वन्दनश्रुत्.’ ज्याची प्रार्थना करावयाची त्याला हें विशेषण लावण्यास अत्यंत योग्य आहे. यांत देवांची बुद्धि मनुष्यांविषयीं क्रूर नाहीं, तर ते जे त्यांचें स्तोत्र गातात तें ऐकून घेत असतात असें देवांविषयीं योग्य ज्ञान दर्शविलें आहे.

‘तुला तुझे वेगवान् घोडे दुखविणार नाहींत’–‘न त्वा केताः आ दभ्नुवन्ति भूर्णयः.’ आम्ही ‘केत’ शब्द ‘केतु’-शब्दार्थक आहे असें समजून भाषांतर

अप्रक्षितं वसु बिभर्षि हस्तयोरषाळ्हं सहस्तन्वि श्रुतो दधे ।
आवृतासोऽवतासो न कर्तृभिस्तनूषु ते क्रतव इन्द्र भूरयः॥८॥२०॥

अप्रऽक्षितम् । वसु । बिभर्षि । हस्तयोः । अषाळ्हम् । सहः । तन्वि । श्रुतः । दधे ।
आऽवृतासः । अवतासः । न । कर्तृऽभिः । तनूषु । ते । क्रतवः । इन्द्र । भूरयः ॥ ८ ॥ २० ॥

भाषायाम्.

८. [हे इन्द्र], [त्वं] हस्तयोः (=त्वदीययोः करयोः) [स्तोतृभ्यो दातुम्] अप्रक्षितं (=प्रक्षेयरहितं) वसु (=धनं) बिभर्षि (=धारयसि)। [तथा] [स्तोतारं रक्षितुं] श्रुतो (=विख्यातः) [त्वम्] अषाळ्हम् (=अपराजितं) सहः (=बलं) तन्वि (=तन्वां=तव शरीरे=आत्मनि) दधे (=धारयसि)। [अपि च] हे इन्द्र, ते तनूषु (=त्वदीयेषु शरीरेषु=विविधासु विभूतिषु) [जलोद्धर्तृभिः] आवृतासः (=आवृताः =वेष्टिता) अवतासो न (=आवृताः=कूपा इव), कर्तृभिः (=यज्ञकर्तृभिः) [जिज्ञासार्थमागतैः] [आवृताः] क्रतवः (=प्रज्ञाः) भूरयः (=बहवः) [सन्ति] ॥

अत्रेदं भावगतम्। इन्द्रो न केवलं यजमानेभ्यो धनं दातुं सिद्धो वर्तते अपि तु तान् भयादिभ्यो रक्षितुं बलवान् अस्ति। तथा न केवलम् इन्द्रस्य धनदातृत्वं बलं च प्रसिद्धं तर्हि तस्य विविधाः प्रज्ञा अपि प्रसिद्धा वर्तन्ते ताश्च, जलोद्धरणार्थमागतैः पुरुषैः कूपा इव, ज्ञानग्रहणार्थम् आगतैरिन्द्रस्योपासकैर्वेष्टिता भवन्तीति ॥

केलें आहे (‘ केतु ’ शब्दाचा अर्थ ‘घोडा’ कसा होतो याविषयीं सू. ५० मं. १ याजवरील सायणभाष्य पहा). आणि ‘ भूर्णि ’ शब्दाचा ‘ वेगवान् ’ असा अर्थ तर ऋग्वेदावरील सायणभाष्यांत प्रसिद्ध आहे (ऋ. ९. ५२. ४; ८. २५. १५; ९. ७३. ४; ९. १७. १ आणि ९. ४१. १ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा). यावरून आमचा अर्थ सिद्ध होतो असें आम्हांस वाटतें. सायणाचार्य या चवथ्या पादाचा अर्थ “[आयुध]-धारी शत्रु तुला दुखवीत नाहींत ” असा एक आणि “ तीक्ष्ण शत्रु तुला दुखवीत नाहींत ” हा एक असे दोन करितात. ‘ केत ’ शब्द ऋग्वेदांत पुष्कळ स्थळीं आलेला आहे पण बहुतकरून ‘ प्रज्ञान ’ या अर्थी आहे. तरी ‘ केतु ’ हाहि त्याच अर्थी आलेला आहे आणि दोनहि शब्दांची व्युत्पत्ति एकच धातूपासून आहे.

वरचा मंत्र जर वंशस्थ श्लोकाप्रमाणें सहज वाचतां येतो तर यांत किती अंतर आहे तें पहाः—

८. [हे इंद्रा], [तूं] अक्षय धन [आपल्या] हातांत धरीत असतोस. कीर्तिमान् [असा जो तूं तो] आपल्या आंगीं अपराजित बळ धारण करितोस. हे इंद्रा, [पाणी काढणाऱ्या लोकांनीं] जशा विहिरी [घेरलेल्या असतात तशा] [यज्ञ]-कर्त्यांनीं घेरलेल्या प्रज्ञा तुझ्या आंगीं अनेक आहेत.

8. Indestructible wealth, [O Indra], dost [thou] hold in [thy] hands. Renowned [Indra] holds in himself puissance that has not been conquered. O Indra, in thee [are] numerous wisdoms surrounded by [consulting] sacrificers, as wells [are surrounded by persons to draw water].

दानाय मनः सोमपावन्नस्तु ते ।
अर्वाञ्चा हरी वन्दनश्रुदा कृधि ।
यमिष्ठासः सारथयो य इन्द्र ते ।
न त्वा केता आ दभ्नुवन्ति भूर्णयः॥

आणि दोनहि मंत्रांचें वृत्त 'जगती' आहे. यावरून पाहतां, अमुक वृत्तांत अमुक अक्षरें असावीं आणि पादांच्या शेवटीं शेवटीं अमुक दीर्घ अमुक ऱ्हस्व असावीं असें जरी धरून सूक्तें रचीत, तरी इतर अक्षरें ऱ्हस्व असावीं किंवा दीर्घ असावीं याविषयीं आलीकडे जसा आम्हीं इतर वृत्तप्रमाणें वंशस्थ वृत्ताविषयीं कडक नियम पाळितों, तसा वेदयुगांत पाळीत नसत असें उघड दिसून येतें, आणि याविषयीं आश्चर्य वाटण्यास कारण नाहीं; कारण आपल्या ओवीवृत्तांत जरी कांहीं साधारण नियम आहेत, तरी अमुक अक्षर ऱ्हस्वच आणि अमुक अक्षर दीर्घच असावें असा नियम कोणीहि कवि पाळीत नाहींत. आणि अभंग आणि अनुष्टुप् या वृत्तांविषयीं तरी असेंच म्हटलें पाहिजे.

---

८. हा सूक्ताचा उपसंहार आहे. आणि यांत इंद्राची कृपा भक्तांवर केवढी असते आणि ती कोणकोणत्या प्रकारची तें यांत सांगितलें आहे. ऋषि म्हणतोः– 'उपासकांस धन देण्यासाठीं इंद्र इतका तयार असतो कीं, तो तें हातांतच जणु घेऊन उभा असतो; आणि भयापासून वगैरे तारण्यासाठीं इंद्राच्या अंगीं पुष्कळ बळ आहे हें प्रसिद्ध होय, आणि तें बळ इतकें आहे कीं, त्याचा कोणीहि शत्रु पराजय करूं शकत नाहीं; आणि इंद्र धन आणि बळ यांहींच संपन्न आहे असें नाहीं, तर त्याच्या अंगीं अनेक प्रसंगीं अनेक रीतीनें उपयोगीं पडणाऱ्या अशा अनेक प्रज्ञा म्हणजे शहाणपणें भरलेलीं आहेत. आणि पाण्यानें भरलेल्या कूपाजवळ पाणी काढून घेण्यास आलेलीं मनुष्यें जशीं त्या कूपास वेष्टितात तसे इंद्राजवळ

सूक्तम् ५६.

आङ्गिरसः सव्य ऋषिः । इन्द्रो देवता । जगती च्छन्दः ॥

एष प्र पूर्वीरव तस्य चम्रिषोऽत्यो न योषामुदयंस्त भुर्वणिः ।
दक्षं महे पाययते हिरण्ययं रथमावृत्या हरियोगमृभ्वसम् ॥ १ ॥

एषः । प्र । पूर्वीः । अव । तस्य । चम्रिषः । अत्यः । न । योषाम् ।
उत् । अयंस्त । भुर्वणिः ।
दक्षम् । महे । पाययते । हिरण्ययम् । रथम् । आऽवृत्य । हरिऽयोगम् ।
ऋभ्वसम् ॥ १ ॥

भाषायाम्.

१. एष भुर्वणिः (=अत्ता=सोमस्य विशेषेण भक्षयिता) [इन्द्रः], अत्यो योषां न (=अश्वो वडवाम् इव=अश्वो वडवामारोहति तद्वत्), तस्य (=यजमानस्य) पूर्वीः (=प्रभूताः) चम्रिषः (=चमूषु स्थिताः सोमरूपा इषः=अन्नानि) प्रावोदयंस्त (=तासामुपरि प्रकर्षेण आत्मानमुद्यच्छति=प्रकर्षेणारोहति)। [स इन्द्रो] हिरण्ययं (सुवर्णमयं) हरियोगं (=हरिद्वर्णाश्वयुक्तम्) ऋभ्वसं (=महान्तं) रथम् आवृत्य (=अस्मदाभिमुख्येन प्रवर्त्य=तं रथमधिष्ठाय अत्रागत्य) दक्षं (=प्रवृद्धमात्मानं=स्वकीयबलं) महे (=महते) [कर्मणे] (=वृत्रवधादि महत् कर्म कर्तुं) [सोमं] पाययते (=पानं कारयति=महत् कर्म कर्तुं बलं यथा वर्धते तथा स्वयमेव पिबति)॥

अस्यामृचि इन्द्रपदस्याभावात् 'एष' इत्यस्य तथा 'तस्य' इत्यस्य संबन्धग्रहणे किंचिद्दुर्बोधत्वमनिवार्यम्। तदपि इन्द्रः स्वर्णमयं स्वकीयं महान्तं हरिद्वर्णाश्वयुक्तं रथमधिष्ठाय अत्रागत्य यजमानेनार्पितसोमलक्षणानि पेयानि, वडवां कामी वाजीव, आक्रमति वृत्रवधादि च महत् कर्म कर्तुं स्वकीयं बलं यथा वर्धते तथा सोमपानं करोतीति भावगतं स्पष्टम्॥

शहाणपणा विचारण्यास आलेले यजमान म्हणजे इंद्रभक्त इंद्राच्या प्रज्ञांस वेष्टून टाकितात.

या मंत्रांत प्रथम द्वितीयपुरुषीं निर्देश असून नंतर तृतीयपुरुषीं आणि पुनः शेवटीं तृतीयपुरुषीं निर्देश आहे. वस्तुतः सगळ्या मंत्रांत द्वितीयपुरुषच विवक्षित आहे, परंतु वृत्तानुसारें 'दधे' हें रूप मध्यें घालावें लागल्यामुळें पुरुषव्यतिरेक झाला आहे.

'[यज्ञ]कर्त्यांनीं' = 'कर्तृभिः' ऋ. ६. १९. १; ७. ६२. १ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पाहा. 'तुझ्या अंगीं' = 'तनूषु.' हें अनेक-

सूक्त ५६.

ऋषि–सव्य (पूर्व सूक्ताचा जो कर्ता तोच). देवता–इंद्र. वृत्त–जगती.

१. घोडा घोडी[वर चढतो] तसा हा [पहा] सोमपी [इंद्र] त्या [यजमाना]चे पात्रस्थ विपुळ सोमरसांवर चढत आहे! [इंद्र] [आपल्या] पिंवळे घोडे जोडलेल्या सुवर्णमय महारथांत बसून येऊन मोठें [काम करण्या]ची शक्ति येण्यासाठीं सोम पीत आहे.

HYMN 56.

To *Indra*. By *Savya* (author of the previous hymn). Metre—*Jagatî*.

1. This [Soma]-consuming [Indra here] alights on the plentiful drinks in the bowl of that [sacrificer], [even] as a stallion [alights] on a mare. [Indra], driving hither [his] great golden chariot, refreshes [his] vigour with the draught.

वचन कां योजिलें याविषयीं सायणाचार्य कांहीं सांगत नाहींत. ‘ प्रज्ञा ’ (=क्रतवः) हें अनेकवचन असल्यामुळें त्याच्या आकर्षणानें अनेकवचन झालें असावें एक, किंवा इंद्राच्या ज्या अनेक विभूति म्हणजे निरनिराळीं रूपें तीच शरीरें असतील म्हणून अनेकवचन घातलें असावें एक. किंवा ‘अवयव’ या अर्थी अनेकवचनाचा प्रयोग असावा. पण इंद्राच्या अनेक विभूति सांगितलेल्या ऋग्वेदांत प्रसिद्ध नाहींत. परंतु ‘ अवयव ’ अथवा ‘ अंगें ’ या अर्थी ‘ तनु ’शब्दाचा अनेकवचनीं प्रयोग ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं आढळतो. ऋ. १. १६२. २० आणि ५. ७०. ४ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा. तर तनूषु हें अनेकवचन ‘तन्वि’ या अर्थीच घातलें आहे असें समजावयाचें असा पर्यवसानीं शेवट दिसतो. अजून जसे विहिरीवर पाणी भरणारे लोक जाऊन जमत असतात तसेच वैदिक युगांतहि जमत असत असें या मंत्रांतील उपमेवरून उघड दिसून येतें. अनेक लोक पिणारे, पण विहीर एकच जशी, तसे इंद्राचे सेवक अनेक आहेत, ते एकट्या इंद्राच्याच अंगी असलेल्या प्रज्ञेचा उपयोग करून घेतात असें उपमेचें तात्पर्य.

वंशस्थवृत्ताप्रमाणें हा मंत्र बसतो तो असाः—

अप्रक्षितं वसु बिभर्षि हस्तयोः ।
अषाळ्हं सहस्तनुइ श्रुतो दधे ।
आवृतासो अवतासो न कर्मभिः ।
तनूषु ते क्रतव इन्द्र भूरयः ॥

---

१. हा मंत्र समजण्यास आपण अशी कल्पना केली पाहिजे कीं, कोणी यज-

तं गूर्तयो नेमन्निषः परीणसः समुद्रं न संचरणे सनिष्यवः ।
पतिं दक्षस्य विदथस्य नू सहो गिरिं न वेना अधि रोह तेजसा॥२

तम् । गूर्तयः । नेमन्ऽइषः । परीणसः । समुद्रम् । न । संऽचरणे । सनिष्यवः ।
पतिम् । दक्षस्य । विदथस्य । नु । सहः । गिरिम् । न । वेनाः । अधि । रोह । तेजसा ॥ २ ॥

भाषायाम्.

२. संचरणे (=समुद्रसंचारे कर्तव्ये सति) सनिष्यवः (=धनेच्छवो वणिजः) समुद्रं न (=समुद्रं यथा) [स्तुवन्ति] [तथा] नेमन्निषः (=नीतहविष्काः) परीणसः (=बहवो) गूर्तयः (=स्तोतारः) तम् [इन्द्रं] [स्तुवन्ति]। [तस्मात् हे स्तोतः], वेना (=कान्ताः स्त्रियः) गिरिं न (=पर्वतं यथा) [पुष्पोपचयार्थम् अधिरोहन्ति= आरोहन्ति] [तथा] [त्वं] नु (=इदानीं) सहः (=बलवन्तं) दक्षस्य विदथस्य (=महतो यज्ञस्य) पतिं (=स्वामिनम्) [इन्द्रम्] अधिरोह (=आरोह=अभिमत- धनप्राप्त्यर्थम् उपसर्प)॥

पूर्वर्चोपि इयं दुर्बोधतरा। वयं तु सायणमनुसृत्य व्याख्यामः। तदपि 'गूर्तयः,' 'सहः,' 'वेनाः' 'अधिरोह' तथा 'तेजसा' इत्येतानि पदानि वादोत्पादकानि भवन्ति। 'गूर्ति' पदं स्तुत्यपरपर्यायम् इति कृत्वा सायणोन्यत्र (ऋ. ९. १०५. १ १०. ६१. १५) व्याचष्टे। 'सहः' इत्यस्य बलवत्त्वार्थग्रहणे गरीयस्येव विप्रतिपत्तिः। तथा 'तेज' इति शब्दस्य तेजस्विस्तोत्रार्थग्रहणे सायणानुसृतिः अनिर्वाहपक्ष एव साध्वी॥

मानानें 'कवीस' म्हणजे 'ऋषीस' इंद्राची स्तुति करण्यास सांगून आपण पात्रांत सोम घालून इंद्राला अर्पण करित आहे, तें पाहून स्तोत्रकर्ता म्हणतोः— 'हा पाहा इंद्र येऊन सोम पिऊं लागला आहे, आणि सोमपी इंद्र सोमरसांकडे इतक्या आवेशानें आणि उत्कंठेनें धांवला आहे कीं, तो घोडीच्या आंगावर जसा कामाविष्ट घोडा धांवतो तसा दिसतो. इंद्र आपल्या सोन्याच्या मोठ्या रथांत, कीं ज्याला पिंवळे घोडे जोडले आहेत त्यांत, बसून जात असतां ह्या यजमानाचे सोम पाहून रथ इकडे फिरवून, वृत्रवधादिक जे मोठे पराक्रम ते करण्याकरितां आपल्या आंगीं बळ यावें म्हणून सोमपान करित आहे.' हा या मंत्राचा भावार्थ दिसतो. तरीहि हा मंत्र कांहींसा कठीण आहे. एक तर यांत दिलेली उपमा कांहींशी विलक्षण आहे इतकेंच नव्हे पण किंचित् दुर्बोधहि आहे; दुसरें असें कीं इंद्राविषयीं हा मंत्र असून इंद्र हें पद मंत्रांत मुळींच नाहीं, आणि

२. [समुद्रावर] संचार करावयाचा असला म्हणजे धनार्थी [लोक] जसे समुद्राला [स्तवितात], [तसे] अनेक स्तोत्रकर्ते हवि अर्पण करून त्या [इंद्रा]ला [स्तवितात]. [तर] [हे स्तोत्या], स्त्रिया जशा [पुष्पग्रहणार्थ] पर्वतावर चढतात [तसा तूं] आज महायज्ञाचा प्रबळ प्रभु [जो] इंद्र त्याजवर तेजस्वी स्तोत्रानें चढ.

2. As when a voyage is to be undertaken the merchants [pray] to the sea, many praisers after offering an oblation [pray to] that [Indra]. [Therefore] do thou, [O worshipper], just as beautiful damsels [mount] the hill [for flowers], now mount with resplendent prayer Indra the puissant lord of the mighty sacrifice.

तिसरें असें कीं, यजमानाचे सोमरस असें विवक्षित असतां यजमान हें पद मंत्रांत नाहीं, केवळ ‘ त्याचे ’ (=तस्य) इतकेंच आहे.

‘सोमपी’=‘भुर्वणिः.’ सायणाचार्य भक्षण करणारा असा अर्थ करितात त्याला अनुसरून आम्हीं भाषांतर केलें आहे.

‘ पात्रस्थ विपुळ सोमरसावर चढत आहे ’=‘प्र पूर्वाः अव चक्रिषः उत् अयंस्त.’ यांत उपमेस अनुलक्षून ‘ अव ’ आणि ‘ उत् ’ यांचा अर्थ केला पाहिजे.

‘महारथांत बसून इकडे येऊन’=‘ऋभ्वसं रथम् आवृत्य.’ अक्षरशःअर्थ, ‘महारथ इकडे फिरवून’. ‘ऋभ्वस’ याचा अर्थ ‘ ऋभ्वन् ’ शब्दाप्रमाणें महा अथवा मोठा असा आहे. प्रस्तुत स्थळीं सायणाचार्य तेजानें वेष्टित असा अर्थ करितात, तथापि ऋ. ५. ५२. ८, ८. ७०. ३, आणि ९. ८६. ५ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा.

‘ शक्ति येण्यासाठीं सोम पितो ’= ‘ दक्षं पाययते.’ अक्षरशः अर्थ, ‘[आपल्या] शक्तीला [सोम] पाजतो,’ म्हणजे शक्ति वाढावी म्हणून सोमपान करितो. सोमपान केल्यानें शक्ति वाढते अथवा नसलेलें बळ अंगांत येतें, आणि त्यावरूनच इंद्र उपासकांनीं दिलेला सोम पिऊन त्यांजकरितां मोठमोठे पराक्रम करितो असें वेदांत प्रसिद्ध आहे.

वंशस्थ वृत्ताला आणि या मंत्राला किती थोडें अंतर आहे पहाः—

एष प्र पूर्वीरव तस्य चम्रिषः ।
अत्यो न योषामुदयंस्त भुर्वणिः ।
दक्षं महे पाययते हिरण्ययं ।
रथम् ऑवृत्य हरियोगम् ऋभ्वसम् ।

---

२. हा मंत्र फार कठीण आहे, आणि ऋषीच्या मनांत काय सांगावयाचें आहे तें स्पष्ट समजत नाहीं. च्यार पांच पदांचा अर्थ तर फारच संदिग्ध आहे. आम्हीं

(सायणाचार्यांच्या भाष्याप्रमाणें) केलेल्या भाषांतराचें तात्पर्य असें आहे कीं, एक स्तोता दुसऱ्या स्तोत्याला म्हणतो, 'समुद्रांत जहाज घालून सफर करावयाची असली म्हणजे जहाजांतून जाणारे व्यापारी जशी समुद्राची प्रार्थना करितात, तशी पुष्कळ स्तोते हवि अर्पण करून इष्ट वस्तु प्राप्त करून घ्यावयाच्या असतात तेव्हां इंद्राची स्तुति करितात; आणि आज आपणांस इष्टप्राप्ति करून घ्यावयाची आहे, तर फुलें तोडण्यास जशा स्त्रिया पर्वतावर चढतात तसा इष्टप्राप्तीसाठीं बलवान् इंद्रावर तूं चढ, म्हणजे इंद्राची तूं प्रार्थना कर.'

'समुद्रावर संचार करावयाचा असला म्हणजे धनार्थी लोक जसे'='समुद्रं न संचरणे सनिष्यवः.' या शब्दांच्या अर्थाविषयीं संशय नाहीं, आणि या उपमेवरून असें दिसून येतें कीं वैदिक युगांत जहाजांत बसून समुद्रावर जात असत, आणि तारवांत बसण्यापूर्वी समुद्राची प्रार्थना करीत. हीच उपमा ऋग्वेदांत आणखी एका मंत्रांत आली आहे ती हीः–'नू रोदसी अहिना बुध्न्येन स्तुवीत देवी अप्येभिरिष्टैः । समुद्रं न संचरणे सनिष्यवो'=हे देवी द्यावापृथिवीहो धनेच्छु जन समुद्रावरून संचार करावयाचा. असतां जसा समुद्राला स्तवितात तसा धनप्राप्तीसाठीं मी तुम्हांस अहिर्बुध्न्य देवासहित स्तवितों, ४.५५. ६. यावरून समुद्रपर्यटन वेदांत प्रसिद्ध आहे आणि त्याविषयीं उपमा देण्यांत येते ती अशा रीतीनें कीं, समुद्रपर्यटनांत कांहीं वाईट नाहीं आणि त्यांत निषेध करण्यासारिखें कांहीं नाहीं असें ऋषिजन समजत; जर न समजते तर समुद्रावर संचार करावयास जाणारे धनेच्छु समुद्राला स्तवितात तसे आम्ही धनाची इच्छा करून स्तवूंया अशी उपमा घेतली नसती.

'स्तोत्रकर्ते'='गूर्तयः.' 'गूर्ति' शब्दाचा अर्थ दुसऱ्या सर्व ठिकाणीं सायणांनीं स्तुति असा दिला आहे तरी या ठिकाणीं स्तोता असा जो अर्थ केला आहे तो निर्वाह करण्याच्या इच्छेनें केला आहे यांत संशय नाहीं.

'अनेक'='परीणसः' ऋ. ३. २४. ५; १. १६६. १४; १. १२९.९ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पाहा.

'हवि अर्पण करून'='नेमन्निषः' हाहि शब्द कठीण आहे. आम्ही सायणास अनुसरूनच अर्थ केला आहे. ऋग्वेदांत प्रयोगांतरें नाहींत.

'स्त्रिया जशा पुष्पग्रहणार्थ पर्वतावर चढतात'='वेना गिरिं न.' ही उपमा चमत्कारिक आहे, कारण स्त्रिया फुलें तोडण्यास पर्वतावर जातात ही प्रसिद्धि उपमा देण्याइतकी होणें म्हणजे फुलें आणण्याकरितां पर्वतावर जाण्याचा फारच प्रचार असला पाहिजे. पण या उपमेविषयीं संशयाची गोष्ट अशी आहे कीं यांत 'फुलें तोडण्यास' या अर्थाचा

शब्द मुळांत नाहीं. आणि सुंदर स्त्रिया असा ‘ वेना ’ शब्दाचा अर्थ जो आम्हीं आचार्यांप्रमाणें केला आहे त्याविषयीं तरी संशय नाहीं असें नाहीं.

‘ प्रबळ ’=‘ सहः.’ हा तर अर्थ अगदीच वादग्रस्त आहे. असलेल्या शब्दाचा कांहीं तरी निर्वाह झाला पाहिजे म्हणून हें भाषांतर केलें आहे.

‘ तेजस्वी स्तोत्रानें ’=‘ तेजसा.’ याच्या तरी अर्थाविषयीं संशय त्याप्रमाणेंच आहे आणि अनिर्वाहपक्षींच आम्हीं भाषांतर केलें आहे.

‘ चढ ’=‘अधिरोह.’ स्तोत्रानें इंद्रावर चढ म्हणजे इंद्राला स्तव असा भावार्थ आहे असें सायणाचार्य म्हणतात. आमचा अर्थ अक्षरशः आहे.

आतां हा आणि वरचा मंत्र दुर्बोध आहेत असें आम्हीं सांगितल्यावरून आपण निराश होण्यास कांहीं कारण नाहीं. कारण असेच दुर्बोध पुष्कळ मंत्र वेदांत येत जातील. आणि वेदाच्या प्राचीनतेविषयीं थोडासा विचार केला तर, कितीएक मंत्रांचा अर्थ समजत नाहीं याविषयीं दुःख न करितां हजारो मंत्रांचा अर्थ सहज आणि स्पष्ट समजतो याविषयीं आनंद मानण्यास विशेष कारण आहे. साडे पांचशें वर्षांची मराठी ज्ञानेश्वरी, तीनच्यारशें वर्षांपूर्वीं चालू असलेल्या मराठीप्रमाणें रूपांतर केलेली असतांहि, आज आपणांस समजण्यास फार कठीण जाते. मग ज्ञानेश्वराप्रमाणें एकानेंच एकाच काळीं रचिलेली नव्हे, तर अनेक काळीं अनेक ऋषींनीं अनेक प्रसंगीं वेगळ्या वेगळ्या संबंधांनीं रचिलेल्या फार फारच पुरातन सूक्तांची जी ऋक्संहिता तींतील कितीएक मंत्र कोठें कोठें दुर्बोध असले म्हणून कांहींच आश्चर्य नाहीं. वेदव्यासांनीं या वेदसूक्तांस संहितेचें रूप दिलें तें सूक्तें रचिलीं गेल्यावर महाकालावधीनें दिलें; म्हणजे सूक्तें वेगवेगळ्या ऋषींच्या कुटुंबांत होतीं तीं सर्व एकत्र करून आतां आहे तशी संहिता म्हणजे गाथा केला, तेव्हां गाथारचना करितांना ज्या मंत्रांचा किंवा सूक्तांचा एकमेकाशीं वस्तुतः अर्थसंबंध नाहीं असे मंत्र किंवा सूक्तें एका ठिकाणी घातलीं जाण्याचा प्रसंगवशात् केवढा संभव आहे याचा आपण विचार केला पाहिजे. अशी कल्पना करा कीं, महाराष्ट्र, गुजराथ, मध्यदेश, आणि पंजाब या वेगवेगळ्या काळीं होऊन गेलेले जे आपले अर्वाचीन ऋषि ज्ञानेश्वर, मुकुंदराज, तुकाराम, महीपति, नामदेव, सोहिरोबा आंब्ये, नरसई मेहता, सांभळभट, तुलसीदास, चांद, कबीर, नानक, आणि गुरु गोविंद यांणीं रचिलेलीं जीं सूक्तें म्हणजे पदें, अभंग, दोहरे, साक्या, ओव्या इत्यादि, तीं कोणीं देशकल्याणेच्छु महापुरुषानें एकत्र करण्याचें मनांत आणून त्यांचा एक गाथा केला, परंतु त्या गाथ्यांत एकाच प्रांताचीं किंवा एकाच ऋषीचीं म्हणजे कवीचीं अथवा साधूचीं

स तुर्वणिर्महाँ अरेणु पौंस्ये गिरेर्भृष्टिर्न भ्राजते तुजा शवः ।
येन शुष्णं मायिनमायसो मदे दुध्र आभूषु रामयन्नि दामनि ॥ ३ ॥

सः । तुर्वणिः । महान् । अरेणु । पौंस्ये । गिरेः । भृष्टिः । न । भ्राजते । तुजा । शवः ।
येन । शुष्णम् । मायिनम् । आयसः । मदे । दुध्रः । आभूषु । रमयत् । नि । दामनि ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. स [इन्द्रः] तुर्वणिः (=शत्रूणां हिंसिता) [तथा] महान् [भवति] । [तस्य] अरेणु (=रेणुरहितं=निर्मलम्=अनवद्यं) शवः (=बलं) पौंस्ये (=संग्रामे), गिरेः (=पर्वतस्य) भृष्टिर्न (=शृङ्गमिव), तुजा (=शत्रुहिंसकया शक्त्या सहितं यथा स्यात्तथा) भ्राजते (=दीप्यते) । येन [शवसा] आयसः (=अयोमयकवचयुक्तो) दुध्रः (=दुर्धर) [इन्द्रो] मदे (=सोमपानेन जाते हर्षे) मायिनं (=मायाविनं) शुष्णम् (=उदकानां शोषयितारम् एतन्नामानमसुरं) दामनि (=निगडे) [कृत्वा] आभूषु (=कारागृहेषु) निरमयत् (=न्यरमयत्=न्यवासयत्) ॥

तुजेति पदं वादमुत्पादयति । वयं यथाशक्यं सायणमनुसृताः स्मः । गिरेर्भृष्टिरिव भ्राजते इत्युपमाबलात् ' शवः'शब्देन अत्र वज्रग्रहणं शक्यम् । दुध्र इत्यत्र तच्छब्दयुक्तेषु मन्त्रान्तरेषु दृष्टेषु दुर्धर इति यत् सायणव्याख्यानं तदेव साधीयः । 'आभू'-शब्दस्य व्याख्यानं कारागृहमिति यत् सायणाचार्यैः कृतं तद् व्याख्यानान्तरप्राचुर्यापेक्षया संभाव्यतेतराम् इति कृत्वा गृहीतमस्माभिः ॥

किंवा एकाच शतकामध्यें रचिलेलीं सर्व सूक्तें एकाच अध्यायांत किंवा गाथ्याच्या भागांत घालावीं असा कडक निर्बंध न राखतां, जशीं हातास आलीं तशीं घातलीं आणि कांहीं पदांचीं कडवीं सोहिरोबा ऋषीचीं म्हणून इन्दुरास सांपडलेलीं घेऊन त्याचींच सूक्तें म्हणजे पदें सावंतवाडीस जीं सगळीं सांपडलीं असतील त्यांत कोठें घालावीं हें बरोबर न समजल्यामुळें थोड्याशा विचाराअंतीं ज्या पदांत घातलीं असतां जुळतील असें वाटलें त्यांत घातलीं. पण वस्तुतः त्या कडव्यांचा त्या पदांशीं कांहीं संबंध नसल्यामुळें आणि तीं कडवीं सोहिरोबाचींच किंवा दुसऱ्याचीं ह्याविषयींहि शंका असल्यामुळें गाथा झाल्यानंतर हजारो वर्षांवर तीं कडवीं दुर्बोध आहेत असें वाटूं लागल्यास काय आश्चर्य आहे? शिवाय गाथा केल्यानंतर तो शुद्ध राहवा म्हणून पुष्कळ काळजी घेण्यांत

३. तो रणधीर [आणि] [महान्] [होय], त्याचें निर्दोष [आणि] अनिवार्य बळ संग्रामांत पर्वताच्या शिखराप्रमाणें लखलखतें; ज्या [बळाच्या योगानें] लोहमय [आणि] दुर्धर [इंद्र] [सोमपानाच्या] हर्षामध्यें कपटी शुष्णाला बिड्या घालून कारागृहांत ठेविता झाला.

3. He [is] victorious [and] great. [His] stainless power in battle proudly shines like the peak of a mountain: with which [power] [Indra], armed in iron [and] invincible, in the exhilaration [of the Soma] kept the intriguing S'ushna fettered down in the prison.

आली, पण तो करण्याच्या पूर्वींच त्या त्या वेगवेगळ्या पदांत, अभंगांत, दोहऱ्यांत आणि साक्यांत शेकडो वर्षांत कांहीं तरी फेरफार झाल्याशिवाय राहिला असेल काय? तर ऋग्वेदसंहितेची स्थिति यासारिखीच आहे. म्हणून त्यांत किती एक मंत्र अति दुर्बोध असले तरी नवल नाहीं, आणि त्यामुळेंच वेदाचा अर्थ कोणत्याहि मर्त्यास समजावयाचा नाहीं अशी आपल्या लोकांची समजूत होऊन राहिली आहे यांतहि आश्चर्य नाहीं, मात्र हजारो मंत्र स्पष्ट आणि सहज व बिनचूक अजूनहि मर्त्यास समजण्यासारिखे आहेत हेंच आश्चर्य.

३. भावार्थः—' इंद्र जयशाली आणि मोठा आहे. कारण त्याचें बळ युद्धांत अनिवार्य असून इतरांच्या बळापेक्षां इतकें मोठें असतें कीं, तें जणुं पर्वताच्या शिखराप्रमाणें उंच आणि तेजःपुंज असें लकलकत असतें. याच बळाच्या योगानें सोम पिऊन हर्ष झालेला इंद्र आंगांत लोखंडाचें कवच घालून आणि दुर्धर होऊन कपटयुक्तिपूर्ण शुष्णासुराला जिंकून हस्तगत करून घेतो.'

'अनिवार्य'='तुजा.' हा अर्थ आम्हीं बहुत अंशीं सायणांस अनुसरून केला आहे. परंतु हें पद कठीण आहे असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. ' तुजा '-शब्दाचा अक्षरशः अर्थ ' हिंसक शक्तीनें ' असा आहे (ऋ. ५. १७. ३ यावरील सायणभाष्य पाहा.)

' बळ '=' शवः.' पर्वताच्या शिंगाप्रमाणें असें म्हटलें आहे त्यावरून 'बळ'-शब्दाचा अर्थ या ठिकाणीं वज्ररूप जें बळ तें होय असें संभवतें.

' शुष्णाला.' ' शुष्ण ' म्हणजे जगतामधील पाणी शोषून घेणारा जो अवर्षणरूपी रूपकसिद्ध असुर आहे तो होय. याविषयीं सू. ५१ मं. ११ आणि सू. ५४ मं. ५ हे पाहा. शुष्णास बंदिखान्यांत घालून टाकिलें असें जें या मंत्राच्या उत्तरार्धांत सांगितलें आहे त्याचें तात्पर्य

देवी यदि तविषी त्वावृधोतय इन्द्रं सिषक्त्युषसं न सूर्यः ।
यो धृष्णुना शवसा बाधते तम इयर्ति रेणुं बृहदर्हरिष्वणिः ॥४॥

देवी । यदि । तविषी । त्वाऽवृधा । ऊतये । इन्द्रम् । सिसक्ति ।
उषसम् । न । सूर्यः ।
यः । धृष्णुना । शवसा । बाधते । तमः । इयर्ति । रेणुम् । बृहत् ।
अर्हरिऽस्वनिः ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. [हे स्तोतः], यदि (=यदा) त्वावृधा (=त्वया स्तोत्रैः प्रवृद्धा) [इन्द्रस्य] देवी (=दिव्या) तविषी (=बलं), सूर्यः उषसं न (=सूर्यः उषसमिव), ऊतये (=संरक्षणाय) इन्द्रं सिषक्ति (=सचते=सेवते), [तदानीं] य [इन्द्रो] धृष्णुना शवसा (=धर्षकेण स्वबलेन) तमः (=तमोरूपं वृत्रं) बाधते (=अपनोदति) [स] अर्हरिष्वणिः (=शत्रुनाशक) [इन्द्रः] [सर्वं] रेणुं (=पापं) बृहत् (=प्रभूतं यथा स्यात् तथा) इयर्ति (=अपगमयति) ॥

अत्रेदमुक्तं भवति । हे स्तोतः, त्वत्कृतैः स्तोत्रैः प्रवृद्धम् इन्द्रस्य बलं यदा इन्द्रं समवैति (रक्षणार्थं ध्रियमाणम् अयःकवचमिव तेन सह संबद्धं भवति) तदा शत्रुनाशक इन्द्रस्तेन धृष्णुना स्वबलेन तमोरूपं वृत्रं हन्ति तथा कृत्वा च सकलमपि पापं समूलं नाशयति । अतस्त्वम् इन्द्रं स्तुहीति ॥

अर्हरिष्वणिरिति पदम् अस्माभिः सायणस्य भावगतम् अनुसृत्य व्याख्यातं प्रयोगान्तराभावेन तस्यार्थं साधीयो निर्णेतुमशक्यत्वात् । यत्तु हृष्धातोः शामेण्यपण्डितद्वयेन निर्वचनं कल्पयित्वा हर्षाद् उच्छृङ्खल इति व्याख्यातं तद् आधाराकाङ्क्षेव ॥

इतकेंच कीं, इंद्रानें वज्रप्रहार करून म्हणजे विजांचा लखलखाट आणि मेघांचा गडगडाट करून उदकवृष्टि केली आणि अवर्षण बंद केलें.

‘ कारागृहांत ’=‘आभूषु.’ या शब्दाचा अर्थ अन्य ठिकाणीं सायणाचार्यांनीं अन्य रीतीनें केला आहे तरी येथें दिलेला त्यांचा हा अर्थ चांगला संभवतो.

‘ बिड्या घालून ठेविता झाला ’=‘ रमयत् नि दामनि.’ या अर्थाविषयीं शंका नाहींच. या वाक्यावरून इतकें उघड होतें कीं आतांप्रमाणेंच वैदिक युगांतहि शत्रूचा पराभव केल्यावर त्याला बिड्या घालून बंदिखान्यांत ठेवण्याची चाल होती.

४. [हे स्तोत्या], जेव्हां त्वां वाढविलेली [इंद्राची] दिव्यशक्ति, सूर्य उषेच्या बरोबर राहातो तशी, रक्षणासाठीं इंद्राबरोबर राहाते, तेव्हां [आपल्या] धैर्ययुक्त बळानें अंधकार[रूप] वृत्राला हाकून देणारा शत्रुघातक [इंद्र] [सकल] पाप समूळ नाहींसें करितो.

4. When, [O praiser], [Indra's] divine power, augmented by thee [through thy prayers], attends upon Indra even as does Sûrya his Ushas, [then] the foe-destroying [Indra], who chases away the demon of darkness with [his] overwhelming strength, wholly removes the evil.

---

४. एक स्तोता दुसऱ्या स्तोत्यास म्हणतो कीं 'तूं जेव्हां इंद्राची स्तुति करून इंद्राचें बळ उत्तेजनानें वाढवितोस, तेव्हां तें इंद्रास साहाय्य करण्याकरितां इंद्राबरोबर जातें आणि त्याच्या योगानें इंद्र अंधकाररूप वृत्राला मारून सर्व पाप नाहींसें करून टाकितो. यास्तव तूं आज इंद्राची स्तुति कर.'

'त्वां वाढविलेली '=' त्वावृधा.' ऋ. १०. १४७. ४; १०. ६९. ९ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पाहा. इंद्राचें बळ स्तोत्यांच्या स्तोत्रांच्या योगानें वाढतें याविषयीं पूर्वीं आलेंच आहे.

'सूर्य उषेबरोबर राहतो तशी '= 'उषसं न सूर्यः.' 'उषा सूर्याबरोबर राहते तशी' असें असतें तर उपमा बरोबर बसली असती असें प्रथमदर्शनीं वाटतें, पण सूर्य हा उषेच्या मागाहून तिचें रक्षण करण्याकरितां जणुं लागलाच उगवतो, सूर्याच्या मागाहून उषा उगवत नाहीं, म्हणून लिंगव्यतिरेक असला तरी आहे तेंच बरोबर आहे. स्त्रियांचें संरक्षण करण्याकरितां पुरुषांनीं त्यांचें पाठबळ करावें असें विवक्षित घेऊन उपमा दिली आहे.

'अंधकार[रूप वृत्रा]ला '=' तमः.' अक्षरशः अर्थ 'अंधकाराला' इतकाच आहे. 'अंधकाररूप वृत्राला' हा सायणाप्रमाणें आम्हीं केलेला अर्थ योग्य आहे. यावरून इतकें स्पष्ट होतें कीं, वेदांत सांगितलेला वृत्र म्हणजे केवळ मेघोदकें आवरून धरणारा रूपकसिद्ध असुर इतकेंच नव्हे, पण आकाशांतील सूर्यप्रकाशाला अवरोधून धरणारा जो मेघरूप असुर त्याचेंहि नांव वृत्र होय. म्हणजे, मेघापासून दोन गोष्टी होतात; १ ली, तो सर्व उदकें आवरून धरितो असें वाटतें म्हणून तो उदकांचा अवरोधक होय, आणि २ री, सूर्यप्रकाशाला तो भूमीवर येऊं देत नाहीं. यास्तव वृत्र म्हणजे आकाशांतील उदकें वृष्टिद्वारें भूमीवर न पडूं देणारा, आणि सूर्यप्र-

वि यत्तिरो धरुणमच्युतं रजोऽतिष्ठिपो दिव आतासु बर्हणा ॥
स्वर्मीळ्हे यन्मद इन्द्र हर्ष्याहन्वृत्रं निरपामौब्जो अर्णवम् ॥ ५ ॥

वि । यत् । तिरः । धरुणम् । अच्युतम् । रजः । अतिस्थिपः । दिवः ।
आतासु । बर्हणा ।
स्वःऽमीळ्हे । यत् । मदे । इन्द्र । हर्ष्या । अहन् । वृत्रम् । निः । अपाम् ।
औब्जः । अर्णवम् ॥ ५ ॥

भाषायाम्.

५. [हे इन्द्र], यद् (=यदा) बर्हणा (=शत्रोर्हन्ता) [त्वं] धरुणम् (=उदकं) तिरः अच्युतं रजः (=च्यवनरहितं दृढम् अन्तरिक्षं तिरस्कृत्य=अन्तरिक्षं व्यवधायकं कृत्वा) दिव आतासु (=नभसो दिक्षु) वि अतिष्ठिपः (=विविधं स्थापितवानसि=विविधेषु स्थलेषु आसृष्टवानसि), यद् (=यदा) [च] मदे (=सोमपानेन हर्षे जाते सति) हर्ष्या (=सोमपानाज्जातेन हर्षेण) स्वर्मीळ्हे (=युद्धे) वृत्रम् अहन् (=हतवानसि), [तदा] अपाम् अर्णवं (=वृत्रान्मुक्तानाम् उदकानां संचयं) निरौब्जः (=वृष्ट्यर्थम् अधोमुखं कृतवानसि) ॥

अत्रेदं भावगतम् । हे इन्द्र, यदा त्वं सोमपानेन जातमदो जातहर्षश्च सन् वृत्रेण सह युद्ध्यन् तं हत्वा अनार्द्रान्तरिक्षाधिष्ठितं मेघं भित्त्वा उदकानि सर्वासु दिक्षु आसृष्टवानसि, तदा तान्युदकानि न क्षुद्राण्यासन् अपि तु उदकानां समुद्रमिव आसृष्टवानसीति ॥

अत्रापि 'बर्हणा'शब्दः सायणाननुसृत्य वयं व्याख्यामः । अनेकेषु स्थलेषु तैरस्यैव अर्थस्य कृतत्वात् तेन च अस्य अर्थस्य पूर्वव्याख्यानकृतां परंपरागतत्वसंभवात् इदानींतनव्याख्यातृभिः कल्पितार्थान्तरापेक्षया अस्यैव साधीयस्त्वाच्च ॥

काशहि भूमीवर न पडूं देणारा जो मेघरूपी रूपकसिद्ध असुर तो होय. आणि वृत्राला इंद्रानें मारून आकाशांतील गाई मुक्त केल्या आणि भूमीवर आणिल्या म्हणजे उदकवृष्टि केली आणि आकाश निरभ्र पृथ्वीवर उघडेड पाडिला असें तात्पर्य असतें.

'शत्रुघातक '=' अर्हरिष्वणिः.' हा शब्द कठीण आहे. प्रयोगान्तरें तर सांपडत नाहींत,पण सायणांनीं दिलेलें निर्वचन निर्विवाद नसलें तरी त्यांचा भावार्थ खरा दिसतो, तोच आम्हीं घेतला आहे.

'पाप '=' रेणुम्.' हें पाप म्हणजे जिकडे तिकडे पसरलेल्या अंधकारापा-

५. हे इंद्रा, शत्रुघातक [असा जो तूं तो] जेव्हां उदकाला कठिण अंतरिक्षामधून द्युलोकाच्या प्रांतांवर पाडिता झालास, [आणि] जेव्हां तूं सोमपानाच्या भरांत [आणि] हर्षांत वृत्राला युद्धांत मारिता झालास, [तेव्हां] तूं उदकांचा संचयच फोडून बाहेर काढिता झालास.

5. When, O Indra, [thou] the destroyer [of enemies], didst let down the water on the borders of Heaven through the hard firmament, [and] when in the exhilaration [and] the elevation [of the Soma] [thou] slewest Vritra in battle, [then] [thou] didst send forth the ocean of waters.

सून उत्पन्न होणारे जे अनेक अपाय आणि अपराध ते असा अर्थ. ऋ. ४. १७. १३ आणि ४. ४२. ५ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा.

‘ समूळ ’=‘ बृहत्.’ हें येथें क्रियाविशेषण आहे. अक्षरशः अर्थ ‘ मोठें ’ ‘ फार, ’ ‘ अतिशय.’

हा मंत्र साधारण श्लोकासारिखा म्हणण्यास विशेष ओढाताण नको:—

देवी यदि तविषी त्वावृधोतये ।
इन्द्रं सिषक्ति उषसं न सूरिअः ।
यो धृष्णुना शवसा बाधते तमः
इयर्ति रेणुं बृहदर्हरिष्वणिः ॥

---

५. हा मंत्र किंचित् कठिण आहे पण सारांश उघड दिसतो, तो असा कीं, ‘हे इंद्रा, तूं जेव्हां सोम पिऊन प्रसन्न झालास आणि सोमाच्या भरांत वृत्रास मारून टाकिलेंस आणि पाणी खालीं पडूं न देणारें जें खडकासारिखें कठिण अंतरिक्ष त्यांतून पाणी फेंकून देऊन सर्व दिशांभर पसरिलेंस, तेव्हां तें पाणी म्हणजे साधारण वृष्टीप्रमाणें क्षुल्लक होतें असें नाहीं, तर उदकांचा मोठा प्रवाह वाहे अशा रीतीनें मोठा उदकांचा समुद्रच जणुं खालीं सोडून दिलास.’

यांत कठिण म्हटलें म्हणजे ‘ तिरः धरूणम् अच्युतं रजः दिवः आतासु वि अतिष्ठिपः’ हे शब्द आहेत. यांचा अर्थ ‘ उदकाला कठिण अंतरिक्षामधून द्युलोकाच्या प्रांतांवर पसरिता झालास ’ असा आम्हीं केला आहे त्याचें तात्पर्य असें कीं उदक खालीं न पडूं देणारें जें पर्वतप्राय कठिण आकाश त्यांतून उदक काढून सर्वत्र टाकून दिलेंस, सर्वत्र वृष्टि केलीस. ‘ दिवः आतासु ’=‘ द्युलोकाच्या प्रांतांवर,’ म्हणजे द्युलोक आणि पृथिवी हीं जेथें मिळतात असें वाटतें असे जे क्षितिजप्रदेश यांच्या ठायीं; अर्थात्

त्वं दिवो धरुणं धिष ओजसा पृथिव्या इन्द्र सदनेषु माहिनः।
त्वं सुतस्य मदे अरिणा अपो वि वृत्रस्य समया पाष्यारुजः।
॥ ६ ॥ २१ ॥

त्वम् । दिवः । धरुणम् । धिषे । ओजसा । पृथिव्याः । इन्द्र । सदनेषु । माहिनः ।

त्वम् । सुतस्य । मदे । अरिणाः । अपः । वि । वृत्रस्य । समया । पाष्या । अरुजः ॥ ६ ॥ २१ ॥

भाषायाम्.

६. हे इन्द्र, माहिनः (=प्रवृद्धस्) त्वं दिवो धरुणं (=द्युलोकस्य धारकं=सोमम्) ओजसा (=बलेन) पृथिव्याः सदनेषु (=पृथिव्युपरि स्थितेषु गृहेषु=यज्ञमण्डपेषु) धिषे (=स्थापयसि) । त्वं सुतस्य (=अभिषुतस्य=सोमस्य) मदे (=पानेन जाते हर्षे) अपः (=उदकानि) अरिणाः(=अगमयः=गमयसि आसृजसि) वृत्रस्य [च] पाष्या (=पाषाणान्=पाषाणमयप्राकारान्?) समया (=समीपे गत्वा=अतिसंनिकटयुद्धे) वि अरुजः (=विविधम् अभाङ्क्षीः=भङ्क्त्वा तेषां खण्डान् नानादिक्षु अपास्यसि) ॥

अत्रेदमुक्तं भवति । हे इन्द्र, पार्थिवेषु मनुष्यगृहेषु यः सोमो वर्तते तं त्वमेव तव बलेन तत्र स्थापितवानसि । त्वमेव वृत्रेण सह युद्धं कृत्वा तस्य दुर्गाणि विनाशयसि तथा कृत्वा च वृत्रावृतानि उदकानि भूमौ त्वमेवावर्षयसीति ॥

'च्यारी दिशेला' असें तात्पर्य. 'दिव आतासु' हेच शब्द ऋ. १.११३.१४ 'वि अञ्जिभिः दिव आतासु अद्यौत्' यांत आले आहेत त्याजवरील सायणभाष्य पहा.

'अंतरिक्षामधून'=' तिरो रजः.' 'तिरः' हें शब्दयोगी अव्यय आहे. याचीं उदाहरणें ऋग्वेदांत अनेक आहेत. ऋ. ९. ६७. ७; ९. ६८. ३; ९. ११०. १६; ८. ६८. ३; ९. ३. ७, ८; आणि ९. ७७. २ हीं स्थळें व त्यांजवरील सायणभाष्य पहा; आणि प्रथमार्धांत 'बर्हणा' शब्द आहे याचा अर्थ आम्हीं सायणानुसार केला आहे. कारण ते त्याचा नित्य बहुत करून शत्रुघातक असाच अर्थ करीत असतात. कितीएक पाश्चिमात्य विद्वान् 'बर्हणा' म्हणजे 'बर्हणया'=शौर्यानें अथवा पराक्रमानें असा अर्थ करितात.

'सोमपानाच्या भरांत आणि हर्षांत' =' मदे हर्ष्या.' म्हणजे सोमपान केल्यानें जो आनंद म्हणजे अमल आणि हर्ष झाला तेणेंकरून. 'हर्षि' शब्दाविषयीं ऋ. ८. ६८. १४ हा मंत्र आणि त्याजवरील सायणभाष्य पहा.

६. हे इंद्रा, महान् [असा जो] तूं [तो] [आपल्या] पराक्रमानें स्वर्गाच्या स्तंभाला पृथिवीवरील घरांत स्थापितोस. तूं सोमाच्या भरांत उदकें सोडून देतोस, [आणि] वृत्राचे पाषाण हातघाईनें फोडून टाकितोस.

6. Thou, O Indra, [who art] great, settest through [thy] might the prop of heaven in the houses on earth. Thou sendest forth the waters in the exhilaration of the Soma, [and] breakest asunder the rocks of Vṛitra in close fight.

---

६. भावार्थः—'हे इंद्रा, स्वर्गातें उचलून धरणारा असा जो सोमरस पृथ्वीवर मर्त्यांच्या घरीं असतो तो तेथें तुझ्याच प्रभावानें असतो. आणि तो सोम उपासकांनीं तुला अर्पण केला म्हणजे तो पिऊन तूं वृत्राशीं लढून त्याचीं मेघरूप पाषाणांनीं बांधिलेलीं नगरें तूं फोडून टाकितोस आणि त्यांतून उदकें मुक्त करून त्यांचा भूमीवर वर्षाव करितोस.'

'स्वर्गाच्या स्तंभाला'='धरुणं दिवः' म्हणजे सोमरसाला. सोमरसाला 'स्वर्गाचा स्तंभ' म्हणजे स्वर्गानें (द्युलोकाला) धारण करणारा असें पुष्कळ ठिकाणीं ऋग्वेदांत म्हटलें आहे. ऋ. ९. २. ५; ९. ७४. २; ९. ७२. ७; ९. ८६. ८; ९. ८७. २; ९. ८९. ६ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा. सोमाविषयीं आर्यजनांची प्रीति आणि त्याचें महत्त्व आणि पराक्रम हे असे होते कीं, ते त्याचें वर्णन अतिशयोक्तीनें करीत, आणि त्याला पृथिवीचा आणि स्वर्गाचा खांब, म्हणजे न पडूं देणारा आश्रय असें म्हणत असत.

'वृत्राचे पाषाण हातघाईनें फोडून टाकित असतोस'='वि वृत्रस्य समया पाष्या अरुजः.' म्हणजे मेघरूप पाषाणांनीं बांधिलेले जे वृत्राचे किल्ले ते असें तात्पर्य दिसतें. सायणाचार्यः— "धैर्ययुक्त "पाषाणानें अथवा शक्तीनें वृत्राला मारून "टाकिता झालास," म्हणजे धैर्ययुक्त असें जें तुझें वज्र तेणेंकरून त्याला मारून टाकिता झालास, असा त्यांचा भावार्थ दिसतो. परंतु 'सम' शब्दाचा अर्थ धैर्ययुक्त असा आणि विशेषणार्थी होईल कीं नाहीं याविषयीं आणि 'वृत्रस्य' ही द्वितीया असावी तशी नसतां षष्ठी कां आहे याविषयीं आम्हांस अडचण दिसते. तथापि आम्हीं जो 'हातघाईनें' असा 'समया' या तृतीयान्त क्रियाविशेषणाचा अर्थ केला आहे त्याला तरी प्रयोगान्तरांची अपेक्षा आहे. 'समया'चा मात्र साधारण संस्कृतांत झाला तरी जवळ अथवा जवळून असाच अर्थ होतो.

सूक्तम् ५७.

आङ्गिरसः सव्य ऋषिः । इन्द्रो देवता । जगती च्छन्दः ।

प्र मंहिष्ठाय बृहते बृहद्रये सत्यशुष्माय तवसे मतिं भरे ।
अपामिव प्रवणे यस्य दुर्धरं राधो विश्वायु शवसे अपावृतम् ॥ १ ॥

प्र । मंहिष्ठाय । बृहते । बृहत्ऽरये । सत्यऽशुष्माय । तवसे । मतिम् । भरे ।
अपाम्ऽइव । प्रवणे । यस्य । दुःऽधरम् । राधः । विश्वऽआयु । शवसे ।
अपऽवृतम् ॥ १ ॥

भाषायाम्.

१. [अहं] मंहिष्ठाय (=दातृतमाय) बृहते (=महते) बृहद्रये (=महाधनाय) सत्यशुष्माय (=सत्यबलाय) तवसे (=प्रवृद्धाय) [इन्द्राय] [इमां] मतिं (=स्तुतिं) प्रभरे (=प्रकर्षेण संपादयामि प्रार्पयामि) । यस्य प्रवणे (=निम्नदेशे) [वहन्तीनाम्] अपामिव (=उदकानीव) दुर्धरं (=दुःखेन निवार्यं) राधः (=दत्तधनं) विश्वायु (=सकलव्यापि) [सत्] [स्तोतॄणां] शवसे (=बलाय=स्तोतॄणां बलमाहर्तुम्) अपावृतम् (=अपगतावरणम्=उद्घाटितं) [क्रियते] ॥

यस्येन्द्रस्य दानप्रवाहः, निम्नदेशे गच्छतामुदकानां प्रवाह इव, अनिवार्यः । विपुलः प्रेरणादनन्तरं च अप्रतिहत इति यावत् । तथा सर्वव्यापी सन् स्तोतॄन् प्रति बलमाहर्तुं स्वस्य बलं वा प्रकटयितुम् उद्घाटितो वर्तते तस्मा एतां स्तुतिं संपाद्य प्रार्पयामीति भावः ॥

सूक्त ५७.

ऋषि—सव्य (पूर्वसूक्ताचा जो कर्ता तोच). देवता— इंद्र. वृत्त—जगती.

१. परमदानशील, मोठ्या, महाधन, सत्यबल, [आणि] पराक्रमी [इंद्रा]प्रत [मी] [हें] स्तोत्र अर्पण करितों; ज्याचें औदार्य खोल जाग्याकडे [वाहणाऱ्या] पाण्यासारिखें अनिवार्य [आणि] सर्वव्यापी [असून] [स्तोत्यांला] बळ [येण्या]साठीं प्रगट होत असतें.

HYMN 57.

To *Indra*. By *Savya* (author of the previous hymn). Metre—*Jagatī*.

1. To the most liberal, the great, the vastly rich, the truly mighty [and] the puissant [Indra], I offer [this] praise; whose gifts, irresistible [in their flow] like waters on a declivity, [are] far-reaching [and] manifested for the strength [of his worshippers].

---

१. या सुंदर मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, ' ज्या इंद्राच्या प्रसादाचा प्रवाह वाहूं लागला म्हणजे डोंगरावरून वाहणाऱ्या उदकांच्या प्रवाहाप्रमाणें विपुळ, चपळ आणि मागें न फिरणारा, आणि सर्वत्र पोंहचणारा असून स्तोत्याचें बळ वाढविणारा होय, त्या महाउदार, मोठ्या, अतिसंपत्तिमान्, सत्यपराक्रमी आणि बलिष्ट इंद्राकरितां मी हें सूक्त रचून अर्पण करीत आहें.'

सूक्ताचा हा आरंभ आहे तेव्हां त्यांत स्तोत्र कोणासाठीं रचिलें आणि कां रचिलें, म्हणजे, ज्यासाठीं रचिलें तो कसा आहे, तें या मंत्रांत सांगितलें आहे. जशी एकाद्या ग्रंथास प्रस्तावना असावी तशी या सूक्ताला ही प्रस्तावनेसारिखी आहे.

' अर्पण करितों '=' प्रभरे.' सायणाचार्यप्रमाणें ' रचितों,' अथवा रचून अर्पण करितों. ' अर्पण करितों ' असें म्हटलें तरी रचून अर्पण करितों असाच भावार्थ आहे.

' खोल जाग्याकडे वाहणाऱ्या पाण्यासारिखें अनिवार्य '=' अपामिव प्रवणे दुर्धरम्.' म्हणजे डोंगरावरून खालीं वाहणारें पाणी जसें कोणीहि मागें फिरवूं शकत नाहीं अथवा बंद करूं शकत नाहीं, त्याप्रमाणें इंद्राची कृपा होऊं लागली म्हणजे कोणीहि तिला मागें फिरविण्यास अथवा बंद करण्यास समर्थ होत नाहीं.

' सर्वव्यापि '=' विश्वायु.' हें विशेषण वेदांत बऱ्याच ठिकाणीं आलें आहे आणि सर्वव्यापि हा अर्थ कसा होतो याविषयीं जरी वाद असला, तरी तो अर्थ खरा आहे असें मंत्रांतरांच्या उदाहरणांवरून

अर्ध ते विश्वमनु हासदिष्टय आपो निम्नेव सवना हविष्मतः ।
यत्पर्वते न समशीत हर्यत इन्द्रस्य वज्रः श्नथिता हिरण्ययः ॥२॥

अर्ध । ते । विश्वम् । अनु । ह । असत् । इष्टये । आपः । निम्नाऽइव । सवना । हविष्मतः ।
यत् । पर्वते । न । सम्ऽअशीत । हर्यतः । इन्द्रस्य । वज्रः । श्नथिता । हिरण्ययः ॥ २ ॥

भाषायाम्.

२. यद् (=यदा) इन्द्रस्य (=हे इन्द्र, तव) हर्यतः (=शोभनः) श्नथिता (=शत्रूणां हिंसनशीलो) हिरण्ययः (=सुवर्णमयो) वज्रः पर्वते (=मेघरूपे पर्वते=वृत्रे) न समशीत (=न संशयितोभूत्=निःशङ्कम् अभ्यपतत्) , अध ह (=अनन्तरमेव=तदैव=तत्क्षणमेव), [हे इन्द्र], विश्वं (=सकलं जगत्) ते (=तव) इष्टये (=यागाय =त्वदर्थं यजनपूजनादिकं कर्तुम्) अन्वसत् (=अनुकूलमभूत्=प्रवृत्तमभूत्), [तथा] हविष्मतः (=उपासकस्य=उपासकेन प्रार्पितानि) सवना (=सवनानि=अभिषुतसोमा), [निम्ना] आप इव (=निम्नप्रदेशे सरन्ति जलानीव), निम्ना (=सरन्ति) [अभूवन्] ॥

“ यदेन्द्रेण प्रेरितो वज्रोऽप्रतिहतः सन्वृत्रमवधीत् तदाप्रभृत्येव तं यष्टुं सर्वे यजमानाः प्रावर्तिषतेति भावः ” इति सायणाचार्याः ॥

निःसंशय सिद्ध होतें. कारण कीं सायणाचार्य दुसऱ्या पुष्कळ ठिकाणीं तोच अर्थ करितात. ऋ. ७. ३४. ११; ९. ४. १० हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पाहा. तथापि प्रस्तुत स्थळीं ‘सकळांचें आयुष्य ज्यांत आहे तें ’ असाहि अर्थ होऊं शकेल.

‘[स्तोत्याला] बळ [येण्या] साठीं ’= ‘ शवसे.’ अक्षरशः अर्थ ‘ बळासाठीं ’ इतकाच आहे. ‘ आपलें बळ किती आहे तें जगाला दाखविण्याकरितां ’ असाहि अर्थ होईल.

‘ प्रगट होत असतें ’= ‘अपावृतम्.’ अक्षरशः अर्थ, ‘ उघडलें [जातें]’ असा आहे. भांडार झांकलेलें असून जसें उघडतात तसें उघडलें जातें असें तात्पर्य.

या मंत्रावरून इंद्र कसा देव होय असें मानीत तें दिसून येतेः—तो अतिशय उदार, अतिशय मोठा, सर्वसंपत्तियुक्त, खरा पराक्रमी आणि महाबळी असा असून, त्यानें केलेलें कल्याण सर्वांस पोंहचतें आणि त्याच्या मनांत कल्याण करावयाचें आलें म्हणजे तें कोणाच्यानेंहि बंद करवणार नाहीं असा तो आहे. बहुत करून ईश्वराचे सर्व गुण यांत आले असें म्हटलें तरी चालेल.

२. हे इंद्रा, जेव्हां तुझें सुंदर शत्रुघातक [आणि] सुवर्णमय वज्र वृत्रावर निःशंक पडलें, तेव्हां एकाएकीं सकळ जग तुझ्या प्रीत्यर्थ यज्ञ करण्यास प्रवृत्त झालें, [आणि] उपासकांनीं अर्पिलेले सोम खोल जाग्याकडेस वाहणाऱ्या पाण्याप्रमाणें [वाहूं लागले].

2. Immediately that thy thunderbolt, bright, destructive [and] golden, unhesitatingly fell upon the mountain (Vṛitra), the whole [universe], O Indra, became obedient to thy worship, [and] the Somas of the sacrificer [flowed] like waters running down a declivity.

२. भावार्थः—' हे इंद्रा, तुझें तेजस्वी आणि सुवर्णाप्रमाणें सुशोभित पण शत्रुघातक असें वज्र तूं जेव्हां त्या पर्वतासारिखा दिसणाऱ्या मेघरूपी वृत्रावर मारिलेंस, आणि तें मागें न सरतां एकदम वृत्रावर जाऊन पडलें, तत्क्षणींच सगळें जग तुझ्या स्वाधीन झालें. सर्व लोक तुझी उपासना करून तुला हवि आणि सोम अर्पण करूं लागले; आणि तुला इतका सोम अर्पण केला कीं त्याचे प्रवाह खोल जाग्याकडे वाहून जाणाऱ्या पाण्याप्रमाणें खळखळ वाहूं लागले.' इंद्रानें वृत्राला मारून पाऊस पाडला हा जो प्रसिद्ध पराक्रम, तो आणि त्यामुळें सगळें जग इंद्राच्या स्वाधीन झालें हा जो त्याचा दुसरा पराक्रम, तो या मंत्रांत सांगितला आहे.

' हे इंद्रा, जेव्हां तुझें '=' यद् इन्द्रस.' अक्षरशः अर्थ 'जेव्हां इंद्राचें.' या ऋचेंत प्रथमार्धांत द्वितीयपुरुषीं निर्देश असून उत्तरार्धांत तृतीयपुरुषीं निर्देश आहे. पण असा पुरुषव्यतिरेक वेदांत पुष्कळ येतो त्याचीं उदाहरणें पूर्वीं आलींच आहेत.

' वृत्रावर निःशंक पडलें '=' पर्वते न समशीत.' अक्षरशः अर्थ, ' पर्वतावर [पडण्यास] साशंक झालें नाहीं,' 'पर्वतावर [पडण्यास] भ्यालें नाहीं.' पर्वत म्हणजे पर्वतासारिखा दिसणारा जो मेघ तद्रूप वृत्र. पर्वत शब्दाचे वेदांत डोंगर आणि मेघ हे दोनी अर्थ होतात याविषयीं पूर्वीं सांगितलेंच आहे.

' तुझ्या प्रीत्यर्थ यज्ञ करण्यास प्रवृत्त झालें '=' ते इष्टये अनुअसन्.' अक्षरशः ' तुझ्या उपासनेला अनुकूल झालें असा अर्थ.' इष्टि याचा अर्थ ' इच्छा ' असा करून ' तुझ्या इच्छेला अनुकूळ झालें ' असाहि अर्थ करितां येईल.

ही ऋचा श्लोकाप्रमाणें म्हणण्यास थोडीच अडचण पडतेः—

अर्ध तें विश्वमनु हासदिष्ये ।

आपो निम्नेव सवना हविष्मतः ।

अस्मै भीमाय नमसा समध्वर उषो न शुभ्र आ भरा पनीयसे ।
यस्य धाम श्रवसे नामेन्द्रियं ज्योतिरकारि हरितो नायसे ॥३॥

अस्मै । भीमाय । नमसा । सम् । अध्वरे । उषः । न । शुभ्रे । आ । भर । पनीयसे ।

यस्य । धाम । श्रवसे । नाम । इन्द्रियम् । ज्योतिः । अकारि । हरितः । न । अयसे ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. हे उषो न शुभ्रे (=उषोदेवीवन्मनोहारिणि भार्ये), अस्मै (=पुरोवर्तिने) भीमाय (=भयानकाय) पनीयसे (=अतिशयेन स्तवनीयाय) [इन्द्राय] अध्वरे (=अस्मिन् यज्ञे) नमसा (=नमस्कारेण) [सह] [श्रवः=हविरन्नं] समाभर (=संपादय=प्रार्पय)। यस्य (=यस्मात् तस्य इन्द्रस्य) धाम (=तेजो) नाम (=कीर्तिः) इन्द्रियं (=बलं) [तथा] ज्योतिः (=प्रकाशः), हरितः (=तस्याश्वा) अयसे न (=गमनायेव), श्रवसे (=हविरन्नाय) अकारि (=आविष्कृतमस्ति) ॥

यस्मात् कारणादिन्द्रस्य धामादीनि हविर्ग्रहणार्थम् आविर्भूतानि सन्ति तस्मात् कारणात् भयानकाय स्तवनीयाय चेन्द्राय, हे मम भार्ये, अस्मिन् यज्ञे नमस्कारं कृत्वा हविरन्नं समर्पयेति भावः। हरितः अयसेनेत्युपमा दुर्बोधतरा भाति। तस्या अपरिज्ञानेपि शिष्टं स्पष्टम्। कदाचिद् एवं स्यादर्थस्तस्याः। यथेन्द्रस्य धामादीनि हविर्ग्रहणार्थम् आविष्कृतानि सन्ति तथा तस्य हरितः (=अश्वा) अयसे (=गमनाय) सिद्धाः सन्ति, अत एव हे प्रिये, शीघ्रमिन्द्राय हविरन्नमर्पय यथा तद् गृहीत्वा गच्छेत् अगृहीत्वैव मा गच्छेदिति ॥

यत्पर्वते न समशीत हर्यतः ।
इन्द्रस्य वज्रः श्नथिता हिरण्ययः ।

कितीएक ऋचा यापेक्षांहि सरळ म्हणतां येतात. आणि कितीएक तर कांहींच फेरफार न करितां आलीकडच्या वृत्ताप्रमाणें म्हणतां येतात याचीं उदाहरणें:—

संजागृवद्भिर्जरमाण इध्यते
दमे दमूना इषयन्निळस्पदे ।
विश्वस्य होता हविषो वरेण्यो
विभुर्विभावा सुषखा सखीयते ।
ऋ. १०. ९१. २.

बृहस्पतिर्नः परिपातु पश्चाद्
उतोत्तरस्मादधरादघायोः ।
इन्द्रः पुरस्तादुत मध्यतो नः
सखा सखिभ्यो वरिवः कृणोतु ।
ऋ. १०. ४२. ११.

OXFORD, *August 10th* 1876.

I have examined the numbers of the Vedârthayatna published up to the present date and am glad to be able to bear testimony to the merit of the great and useful work on which Mr.————is engaged. He is well known to me as an able and accurate Scholar, and his Attempt to give his fellow country-men a correct interpretation of the Veda will in my opinion, not only advance his literary reputation but render incalculable service to the cause of progress and enlightenment by dissipating the false notions prevalent every where in regard to the books commonly appealed to in support of many objectionable practices and superstitious observances.

I have great pleasure in recommending the *Vedârthayatna* to the patronage of the Indian Governments.

MONIER WILLIAMS M. A., D. C. L.

Boden Professor of Sanskrit in the University of Oxford,

Honorary Doctor in Law of the University of Calcutta

POONA *August* 17.

MY DEAR MR.—

I have to thank you for the numbers of your *Vedârthayatna* which you have been good enough to send me. I have read the first number and have no hesitation in saying that your periodical will be a very useful one chiefly because it will show to your countrymen *for the first time* what the Rigveda really contains. At first I felt inclined to question the necessity of reprinting the Sanskrit texts, but it is only fair to you to say that the natives with whom I have spoken on the subject entirely approve of the plan which you have adopted. Of the accuracy of your Marâthi translation I can hardly judge but the English translation appears to have been prepared with *great* care, and, so far as I can see, it is intelligible without the original. I feel sure that your work well deserves the patronage of Government.

Yours truly,

F. KIELHORN

Mr-————'s *Vedârthayatna* is a very valuable contribution to Vedic philology. It appears to be based on the most trustworthy materials and shows, as might be expected from a scholar like Mr. ———, very careful and conscientious work.

It possesses a very great importance for India, as it is the first attempt to interpret to the Indian public at large the most ancient and the most important work of the Brahminical religion. I trust that eventually the *Vedârthayatna* will find a place in all public libraries of India.

G. BÜHLER.

5th September 1876.

I have no hesitation in stating that your work will prove of great use in spreading a knowledge among the people of a work which enjoys the highest veneration but of the contents of which they really know little or nothing. Every intelligent friend of this country ought to feel grateful to you. * * * As far as I can judge at present your translations both English and Marâthî appear to me fair and reasonable.

KRISHNA SHASTRI CHIPLONKAR.

"The attempt when completed will prove useful in India in "giving to the people an opportunity of reading the most ancient "monument of Aryan thought, which most of them can never ex-"pect to study in the original." *The Friend of India.*

"The present translation (both in Marâthi and Englsh) is "scholarly and accurate throughout though we might differ with the "translator in the interpretation of single words or passages. For the "better understanding of the Veda the Pada text and its rendering "into classical Sanskrit are added. * * * The foot notes in Marâthî "are explanatory and critical. Whenever a new deity is mentioned "for the first time, we have a note as to its functions, attributes, mode "of worship &c., as derived from the collation of various passages "bearing upon the subject. Some of these notes trace the current "mythological legends to the early times of the Vedas, and show the "reader, how religion in the hands of an unimagninative priesthood "degrades into absurd stories. * * * We cannot but admire the

"perseverance and the patience of the translator, which are so rare "amongst us, and for the want of which we are always taunted by "other nations. We hope that this work is the first of a long Series "which will serve for a complete refutation of the opinions of those "who think that the Hindus are behind other civilized nations in patient investigation and scientific research." *Native Opinion.*

"WE do not hesitate to say that this is the most important "publication in Sanskrit literature up to this date, which has been "produced in Bombay............a very faithful translation of the text "into English and into Marathi, together with a commentary.— *The Englishman.* 2nd June 1876.

"WE have been thus particular in noting what in our opinion "are the only inaccuracies in the generally excellent translation of "the first eight hymns of the first book contained in the first number "of the Vedárthayatna, in order that we might be able to show how "really intrinsically good the work is. What we have called errors "are, of course, really matters of opinion. The Editor's rendering in "each case can be backed by some respectable authority." *The Englishman.* 24th June 1876.

"WE wish the projector every success in his spirited and pa- "triotic undertaking."—*Madras Journal of Education.* July 1876.

"It appears that the translator is performing his difficult task "with due care and attention. He is not closely following like Pro- "fessor Wilson, the commentaries of Sâyana, nor is he servilely "adopting the interpretation of any particular European Sanskrit "Scholar." *The Bengalee.* 15th July 1876.

"THOUGH the work is directly intended for Marâthi readers, it "will be useful to others also on account of its English translation. "While it serves as a good guide to every Sanskrit Scholar in his "Vedic study, and initiates him into it, and thus benefits him as an "easy Marâthi exegesis for the Vedás............It is the duty of every "Hindoo to encourage such a noble and patriotic work and hail it "as a literary luminary, enlightening the most sacred province of "Sanskrit literature, which is veiled in impenetrable darkness...... "...We congratulate the author on his literary patriotism and ear- "nestly hope that he will meet with good encouragement and muni- "ficent patronage."—*Native Public Opinion.* 14th June 1876.

A publication standing on a strictly scientific basis............we can only wish it the best success.........we may well wish that Libraries &c. from Germany may numerously come forward to subscribe for this undertaking which is apparently in the right hands. A. WEBER in the LITERATURZEITUNG, Jena 1876.

It is to be hoped that this important work may be continued. F. MAX MÜLLER in *The Academy*, November 1876.

सायणाचार्यभाष्यादिदुरूहग्रन्थेभ्यो वेदार्थं ज्ञातुमसमर्थानां भूयसां जनानां महोपकारकं स्तुत्यं कर्म पश्यन् भवतां भूयोभूयो धन्यवादान् करोमि । प्रार्थये च परेशमचिरेण ग्रन्थसमाप्त्यै साहाय्यं कुरुताद् भगवानिति ।

महाराष्ट्रभाषायां कृतस्यानुवादस्य भाषाटीकायाश्च विषये स्वीयमाशयमेवमाविष्करोमि । अद्य त्वनेककार्यगणव्यापृतो **वेदार्थयत्नं** साकल्येन निरीक्षितुमशक्नुवानो यावन्ति तस्य पत्राण्यवाचयं तावत्सु स्थितौ भाषाटीकानुवादौ मूलार्थानुगुणावेव समुपलभ्य स्थालीपुलाकन्यायेन भूयसोऽदृष्टभागस्यापि मूलार्थानुसारितामनुमिनोमि । कुत्रचित्स्थलविशेषेष्वन्यथाभावः स्याच्चेदपि, "गच्छतः स्खलनं क्वापि यत्र क्वचन जायते । हसन्ति दुर्जनास्तत्र समादधति सज्जनाः" इति चिन्तामण्युक्त्यनुसारेण **वेदार्थयत्न**मेनं श्लाघनीयकार्याणामेकतममिति हृदयेनाभिनन्दनपुरः स्वीकरोमीत्यलं सुज्ञवरेषु बहुना लेखनीव्यापारेणेति । शुभम् ।

वाराणसीनिवासी रानडोपनामक-

बाळशास्त्री.

वेदार्थयत्नपुस्तके संहितालेखनं पदलेखनं टीकालेखनं च अतीव शुद्धम् अतीव लोकोपयोगि च । टीकालेखनं भाष्यान्तरं चातीव सुबोधमपि । एतादृशो लोकोपकारको यत्न इतः प्राक् केनापि न कृत इति मे भाति ॥

दातारोपनामकगङ्गाधरशर्मशास्त्रिणः

संमतमिदम् ।

पोंच ता. १ नागायत एप्रिल अखेर १८७० पर्यंत.

	रु. आ.
धी. डायरेक्टर आफ् पब्लिक इ. बॉबे.	९००- ०-०
धी. डायरेक्टर आफ् पब्लिक इ. बेंगाल.	६३-१२-०
सेक्रेटरी गुजराथ व्हर्नाक्युलर सोसायटी अहमदाबाद.	७६- ०-०
कर्नल डब्ल्यू. सी. पार साहेब पोलि. एजेंट.	६- ६-०
रा. सा. आबाजी विष्णु कायवटे, ड. ए. इ. ....,	६- ६-०
,, ,, श्रीकृष्ण शास्त्री तळेकर डे. ए. इ.	६- ६-९
,, ,, जनार्दन सखाराम गाडगीळ जज्ज, बडोदें.	६- ६-०
रा. सी. एस्. रंगास्वामी.	६- ६-०
,, ,, वामनराव बाळकृष्ण बर्वे, ठाणेदार	१२-१२-०
,, ,, गौरीशंकर उदेशंकर ओझा, जाइंट आडमि.	६- ६-०
,, ,, वजेशंकर गौरीशंकर ओझा, रेवि. कमि....	६- ६-०
,, ,, प्रेमशंकरभाई गौरीशंकर वहिवाटदार.	६- ६-०
,, ,, एस्. तिमय्या नायब शिरस्ते० फ. असि. कमि.	६- ६-०
,, ,, रामेशचंद्र बानरजी..	६- ६-०
,, ,, व्यंकटरमणा अय्या नाडकर्णी..	४-१२-६
,, ,, मार्तंड बापुजी गुप्ते मुनसिफ	१२-१२-०
,, ,, सी. कन्ही कानन.	६- ६-०
,, ,, एन्. व्यंकटापाथी नायडु.	६- ६-०
,, ,, वामनराव नारायण ओक, फ. ग्रे. व्होल्हरसि.	६- ६-०
,, ,, मंजेश्वर रंगापा....	६- ६-०
,, ,, दामोदर चिंतामण, ड्राफ्समन..	६- ६-०
,, ,, दिवाकर सदाशिव जोशी, असि. मास्तर....	६- ६-०
सेक्रेटरी नेटिव लायब्ररी, बागलकोट....	६- ६-०
नेटिव लायब्ररी, सोलापूर.	६- ६-

Registered No. 98 of 1877.

सूचना.

	रु.	आ.
वर्षाची वर्गणी, आगाऊ	६	०
मुंबईबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दरवर्षाचे	०	६

All communications to be addressed to the Manager Mr. Mahâdev Nârâyan Pandit, No. 79. *Loharchawl, Bombay.*

ग्रंथकर्त्यांच्या नांवचा वगैरे सर्व प्रकारचा पत्रव्यवहार मुंबई लोहारचाळ घर नंबर ७९, या पत्त्यावर रा. रा. महादेव नारायण पंडित "म्यानेजर वेदार्थयत्न" यांच्याशीं ठेवावा.

विशेष सूचना.–आमच्या कितीएक वर्गणीदारांस १२ वा अंक पोंचून १३ वा पोंचण्याची वेळ आली असतांही त्यांजकडून अद्यापि वर्गणीचा पैसा आला नाहीं. तर मेहेरबानी करून तो त्यांनीं "आगाऊ" शब्दाकडे विशेष लक्ष देऊन लवकर पाठवावा.

THE
VEDÂRTHAYATNA
OR
AN ATTEMPT TO INTERPRET THE VEDAS.

वेदार्थयत्न.

ऋग्वेदसंहिता
पदांसहित व
तिचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

पुस्तक १. Vol I | मे सन १८७७. May 1877 | अंक १४. No 14

मुंबई:
"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

(हें सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदलें आहे.)

माझे

सर्व आर्य बंधु व भगिनी

यांस

हें भाषांतर

सादर समर्पण केलें आहे.

भाषांतरकर्ता.

३. हे उषेप्रमाणें सुंदर स्त्रिये, ह्या भयानक [आणि] अत्यंत स्तवनीय इंद्राकारणें या यज्ञांत नमस्कारासहित हवि अर्पण कर. ज्या [इंद्रा]चें, तेज, कीर्ति [आणि] बळ [आणि] प्रकाश हीं, त्याचे घोडे धावण्याकरितां तयार आहेत तशीं, हविरन्न [घेण्या]करितां प्रगट झालीं आहेत.

3. [O fair one], beautiful as the Dawn, offer to the solemn [and] praiseworthy [Indra] in this sacrifice [food] together with obeisance, since for food his strength, [his] glory, his puissance [and his] splendor are manifested, like as his horses [stand ready] to go.

---

३. ह्या मंत्रांत ऋषि आपल्या स्त्रियेस म्हणतो कीं, ‘ हे उषेप्रमाणें सुंदरी प्रिये, हा पाहा इंद्र आपल्या तेजासहित, कीर्तीसहित, वीर्यासहित आणि प्रकाशासहित रथांत बसून हवि घेण्यास आला आहे; तर ह्या प्रचंड आणि स्तवनीय इंद्राला नमस्कार करून लौकर हविरन्न अर्पण कर, नाहीं तर तो हविरन्न घेतल्याशिवायच निघून जाईल. कारण कीं आमचें हवि स्वीकारून घेण्यास जसा तो आपल्या तेजास व कीर्ति इत्यादिकांसहित प्रगट झाला आहे, तसे त्याचे घोडेहि त्याला येथून घेऊन जाण्याविषयीं सिद्ध आहेत, यास्तव त्वरा कर.’ या मंत्रांत ऋषि, हा पाहा इंद्र आला आहे त्याला लौकर हवि दे, नाहीं तर हा असाच निघून जाईल असें आपल्या स्त्रियेस म्हणत आहे. ‘हरितः न अयसे’ हे जे उपमादर्शक शब्द ऋचेंत आहेत ते दुर्बोध दिसतात. आम्हांस जो त्याचा अर्थ वाटतो त्याप्रमाणें हा भावार्थ दिला आहे. त्यांत ‘ न ’ याचा अर्थ ‘ आणि ’ असा केला म्हणजे बरीच अडचण दूर होते.

‘ उषेप्रमाणें सुंदर स्त्रिये ’=‘ उषो न शुभ्रे.’ यांत ‘ उषः’ ही संबोधनविभक्ति ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. ‘शुभ्रे’ ही संबोधनी असल्यामुळें उपमेंत सुद्धां ‘ उषः’ ही संबोधनी शब्दसाहचर्याच्या आकर्षणामुळें झालेली आहे. अशा प्रयोगांचीं दुसरीं उदाहरणें वेदांत सांपडतात.

‘ त्याचे घोडे ’=‘ हरितः.’ ‘ हरित् ’ हें पाहिजे त्या घोड्याचें नांव आहे असें नाहीं; इंद्राचे, सूर्याचे, आणि अग्नीचे जे पिवळे घोडे त्यांस ‘ हरित् ’ हें नांव आहे. सूर्याचे आणि [illegible] पिवळे घोडे म्हणजे पिवळ्या वर्णांचे किरणरूप घोडे होत. बालसूर्याचे किरण सुवर्णाप्रमाणें पिवळ्या रंगाचे असतात त्यामुळें त्यांस ‘हरित्’ म्हणजे पिवळ्या रंगाचे घोडे असें नांव पडलें आहे. आणि सूर्याचा तेजःपुंज रथ किरणरूप पिवळे घोडे ओढतात

इमे तं इन्द्र ते वयं पुरुष्टुत ये त्वारभ्य चरामसि प्रभूवसो ।
नहि त्वदन्यो गिर्वणो गिरः सघत्क्षोणीरिव प्रति नो हर्य तद्वचः ४

इमे । ते । इन्द्र । ते । वयम् । पुरुऽस्तुत । ये । त्वा । आऽरभ्य । चरामसि । प्रभुवसो इति प्रभुऽवसो ।
नहि । त्वत् । अन्यः । गिर्वणः । गिरः । सघत् । क्षोणीःऽइव । प्रति । नः । हर्य । तत् । वचः ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. हे पुरुष्टुत (=बहुभिः स्तुत) प्रभूवसो (=प्रभूतधन=प्रभूतधनस्य पते) इन्द्र इमे (=त्वत्पुरोवर्तिनो) ये वयं त्वा आरभ्य (=त्वाम् आरभ्य=त्वय्यवलम्ब्य) चरामसि (=चरामः=स्मामः), [ते वयं] ते (=तव) [स्मः] । हे गिर्वणः (=प्रियस्तोत्र) [इन्द्र], त्वत् (=त्वत्तः) अन्यः [कोपि देवो] गिरः (=स्तुतीः) न सघत् न (=प्राप्नोति=तासाम् ईश्वरो न भवति), तत् (=तस्मात्) नः (=अस्माकं) वचः (=वचांसि=वचोरूपाः स्तुतीः) क्षोणीरिव (=कश्चिद्यथा स्वपरिचरा) [हर्यति=कामयते] [तथा], प्रतिहर्य (=कामयस्व तान् प्रति स्निग्धदृशा दृष्ट्वा ताः कामयमानो भव) ॥

अशी प्रसिद्धि झाल्यावर उपासकाचा सोमरस पिण्याकरितां यज्ञाप्रत रथांत बसून येणारा इंद्रहि सूर्याप्रमाणें पिवळे घोडे आपल्या रथास जोडितो असें मानणें हें स्वाभाविक आहे. शिवाजीच्या तलवारीचें नांव ‘ भवानी ’ होतें हें प्रसिद्ध आहे, आणि शिवाजी छत्रपति आपल्या भवानीच्या योगानें अनेक पराक्रम करीत असे याविषयीं एकदा प्रसिद्धि झाल्यावर दुसरा कोणीएक तसाच विख्यात राजा होईल आणि त्याजवळ तसेंच पराक्रम करणारी तलवार असेल तर तिला सुद्धां आपण ‘ भवानी ’ असें नांव सहज देऊं. याचप्रमाणें वेदांत इंद्राच्या घोड्यास ‘ हरित् ’ हें नांव पडलें आहे.

४. हे बहुतांनीं स्तविलेल्या विपुलसंपत्तिमान् इंद्रा, आम्ही ज्यापेक्षां तुजवर अवलंबून चालतों त्यापेक्षां आम्ही तुझे आहोंत. कारण कीं हे स्तुतिप्रिय इंद्रा, तुजशिवाय दुसऱ्या कोणालाहि स्तुति प्राप्त होत नाहींत. तर आमच्या ह्या स्तुतींवर, दासींवर प्रीति केल्याप्रमाणें, प्रीति कर.

4. O Indra, praised by many, O Lord of bliss, thine are we who live in dependence on thee. For none else than thee owns the praises, O prayer-loving Indra. Look, therefore, with kindness upon our praises as [though they were thy] attendants.

---

४. भावार्थः—' हे इंद्रा, ज्यापेक्षां आम्ही तुजवर अवलंबून आहों आणि तुला तनमनधनेंकरून हे शरण आलों आहों, त्यापेक्षां आम्ही तुझेच आहोंत. आणि आम्ही तुझ्याच स्तुति गात आहों. कारण कीं आमच्या स्तुतींचा तूंच स्वामी आहेस, दुसरा कोणी नाहीं. यास्तव तुझ्या स्तुति आम्ही आज गात आहों. त्या तूं आपल्या दासी असें समजून त्यांजवर कृपा कर.'

' बहुतांनीं स्तविलेल्या '= ' पुरुष्टुत. ' म्हणजे ज्याची स्तुति पुष्कळजण करितात.

' आम्ही ज्यापेक्षां तुजवर अवलंबून चालतों त्यापेक्षां आम्ही तुझे आहों '= 'ये वयं त्वा आरभ्य चरामसि ते [वयं] ते [स्मः].' अक्षरशः अर्थ, 'जे आम्ही तुजवर अवलंबून चालतों ते आम्ही तुझे आहों.'

भूरि॑ त इन्द्र वी॒र्यं१॒॑ तव॑ स्मस्य॒स्य स्तो॒तुर्म॑घव॒न्काम॒मा पृ॑ण ।
अनु॑ ते॒ द्यौर्बृ॑ह॒ती वी॒र्यं॑ मम इ॒यं च॑ ते पृथि॒वी ने॑म॒ ओज॑से ॥५॥

भूरि॑ । ते॒ । इ॒न्द्र॒ । वी॒र्य॑म् । तव॑ । स्म॒सि॒ । अ॒स्य । स्तो॒तुः । म॒घ॒ऽ
व॒न् । काम॑म् । आ । पृ॒ण ।
अनु॑ । ते॒ । द्यौः । बृ॒ह॒ती । वी॒र्य॑म् । म॒मे॒ । इ॒यम् । च॒ । ते॒ । पृ॒थि॒वी ।
ने॒मे॒ । ओज॑से ॥ ६ ॥

भाषायाम्.

५. हे इन्द्र, ते (=तव) वीर्यं (=सामर्थ्यं) भूरि (=महद्) [अस्ति] । [वयं तव स्मसि (=स्मः) । हे मघवन् (=धनवन्निन्द्र), [त्वम्] अस्य स्तोतुः (=मम) कामम् (=अभिलषितम्) आपृण (=पूरय) । ते (=तव) वीर्यं (=सामर्थ्यं) महती द्यौः (=महान् द्युलोकोपि) अनुममे (=पश्चात् मीयते=तव वीर्यादनन्तरं मीयते, ननु पूर्वं तेन समं वा=तव वीर्याद् अल्पीयसी भवति) इयं (=पुरोदृश्यमाना) पृथिवी च ते (=तव) ओजसे (=बलाय=त्वद्बलाद् भीत्वा) नेमे (=नता बभूव) ॥

महान् द्युलोकोपि तव सामर्थ्यादल्पीयानेव तथा इयं विस्तीर्णा पृथिवी त्वद्बला-द्भीत्वेव त्वद्बलभाराद्वा अधोनता भूत्वा तिष्ठतीति भावः ॥

५. हे इंद्रा, तुझें सामर्थ्य मोठें [आहे]. [आम्ही] तुझे आहों. हे संपत्तिमान् [इंद्रा], [तूं] या स्तोत्याची मनकामना पूर्ण कर. महान् द्युलोकहि तुझ्या सामर्थ्याच्या बरोबर नाहीं; आणि ही पृथिवी तुझ्या बळास भिऊन नमून खालीं राहिली आहे.

5. Vast [is] thy heroism, O Indra. We are thine. Fulfil the desire of this [thy] praiser, O blessed [Indra]. The vast heaven falls short of thy heroism: and this earth bows to thy strength.

---

५. या सुंदर ऋचेचा भावार्थ असा आहे कीं, 'हे इंद्रा, तुझें सामर्थ्य अपरिमित आहे, याकरितां आम्ही तुझेच आहों, दुसऱ्या देवांस शरण जात नाहीं. यास्तव मी जी ही तुझी स्तुति करीत आहें त्या माझी मनकामना तूं पूर्ण कर. कारण कीं तूं सर्व प्रकारच्या संपत्तींनीं परिपूर्ण आहेस. तुझें सामर्थ्य तर इतकें मोठें आहे कीं, हा जो महान् द्युलोक आमच्या डोक्यावर दिसतो तोहि त्यापेक्षां लहान आहे. आणि ही बापडी पृथिवी तर तुझ्या बळाच्या भारानें नमूनच जणुं अशी खालीं पडून राहिली आहे.' या ऋचेंत इंद्राच्या मोठेपणाविषयीं, सामर्थ्याविषयीं, आणि संपत्तीविषयीं उत्तम वर्णन आहे, आणि इतकेंहि असून अर्थ किती सरळ आहे पाहा!

पुरातनकाळचे ऋषींचा असा पूर्ण समज होता कीं देव अति मोठे, अति बलाढ्य, अति श्रीमान्, आणि आपण च्यार दिवस जगणारे, निर्बळ आणि निर्धन अल्प प्राणी आहों, यास्तव आपण त्यांस शरण जावें आणि त्यांचे अंकित व्हावें यांतच आपलें संरक्षण, आणि मोठेपण आहे.

त्वं तमिन्द्र पर्वतं महामुरुं वज्रेण वज्रिन्पर्वशश्चकर्तिथ ।
अवासृजो निवृताः सर्तवा अपः सत्रा विश्वं दधिषे केवलं सहः
॥ ६ ॥ २२ ॥ १० ॥

त्वम् । तम् । इन्द्र । पर्वतम् । महाम् । उरुम् । वज्रेण । वज्रिन् ।
पर्वऽशः । चकर्तिथ ।
अव । असृजः । निऽवृताः । सर्तवै । अपः । सत्रा । विश्वम् । दधिषे ।
केवलम् । सहः ॥ ६ ॥ २२ ॥ १० ॥

भाषायाम्.

६. हे इन्द्र, त्वं तं (=प्रसिद्धं) महां (=महान्तम्) उरुं (=विस्तीर्णं) पर्वतं (=मेघं=वृत्रं) पर्वशः (=पर्वणि पर्वणि) वज्रेण चकर्तिथ (=शकलीचकृषे)। [त्वं] निवृताः (=अवरुद्धा) अपः (=उदकानि=मेघोदकानि) सर्तवै (=सर्तुं=सरणाय) अवासृजः (=अवाङ्मुखमस्राक्षीः=आवर्जितवानसि) । सत्रा (=सत्यमेव) [त्वं] विश्वं (=नानाविधं) सहः (=बलं) केवलं (=समस्तं=संगृहीतं) दधिषे (=धारयसि)॥ नानाविधं बलं केवलं तवैवास्तीत्यर्थः ॥

अत्र सत्रेत्यस्य केचित् 'सह'शब्देन व्याख्यानं कुर्वन्ति । तच्चिन्त्यम् । ऋ. ४. ३०. २ सत्रा ते अनु कृष्टयो विश्वा चक्रेण वावृतुः । सत्रा महां असि श्रुतः इत्यत्र सत्रेत्यस्य सत्यमेवेत्येव व्याख्यानं कर्तुं योग्यत्वात् बहुषु मन्त्रान्तरेषु सायणाचार्यैस्तथैव व्याख्यातत्वाच्च ।

६. हे इंद्रा, हे वज्रधरा, त्या महान् [आणि] विस्तीर्ण पर्वताला तुकडे तुकडे करून तूंच तोडून टाकिता झालास. [आणि] अवरोधून ठेविलेल्या उदकांस तूं वाहण्यासाठीं खालीं सोडिता झालास. [आणि] खरोखर तूंच सर्व कांहीं बळ एकटाच धारण करितोस.

6. Thou didst, O Indra, thou, O thunderer, with thy thunderbolt didst cut to pieces that great and vast mountain (the Cloud): thou didst pour down the confined waters that they might flow. Truly thou alone dost possess all power undivided.

---

६. 'वृत्राला मारून त्याचे तुकडे तुकडे करून टाकिले ते त्वांच टाकिले, आणि वृत्राला मारून मेघोदक भूमीवर पाडिलें तें त्वांच पाडिलें. या प्रकारेंकरून सर्व प्रकारचें बळ एकट्या तुझ्याच अंगीं मिळालें आहे, तुझ्या शिवाय दुसऱ्या कोणाच्या अंगीं नाहीं', असें तात्पर्य होय.

१– 'त्या महान् [आणि] विस्तीर्ण पर्वताला'=' तं पर्वतं महान् उरुं.' हा पर्वत म्हणजे पर्वतासारिखा दिसणारा जो मेघ तद्रूपी वृत्रासुर. त्याला पर्वत म्हणतात याविषयीं पूर्वीं पुष्कळ वेळ सांगितलेंच आहे. तो 'महान् पर्वत' म्हणजे ज्याला इंद्रानें विध्वंसिल्याविषयीं प्रसिद्धि आहे तो.

खालीं लिहिल्याशिवाय अधिक फेरफार न करितां ही ऋचा साधारण श्लोकाप्रमाणें म्हणतां येतेः–

तुअं तमिन्द्र पॅर्वतं महामुरुं ।
वज्रेण वज्रिन् पॅर्वशश्चकर्तिथ ।
अवासृजो निवृताः सर्तवा अपः ।
सत्रा विश्वं दधिषे केवलं सहः ।

सूक्तम् ५८.

गौतमो नोधा ऋषिः । अग्निर्देवता । आद्याः पञ्च जगत्यः । शिष्टास्त्रिष्टुभः ।

नू चित्सहोजा अमृतो नि तुन्दते होता यद्दूतो अभवद्विवस्वतः ।
वि साधिष्ठेभिः पथिभी रजो मम आ देवताता हविषा विवासति ॥ १ ॥

नु । चित् । सहः ऽजाः । अमृतः । नि । तुन्दते । होता । यत् । दूतः । अभवत् । विवस्वतः ।
वि । साधिष्ठेभिः । पथिऽभिः । रजः । ममे । आ । देवऽताता । हविषा । विवासति ॥ १ ॥

भाषायाम्.

१. सहोजाः (=बलेन जातः) अमृतः (=मरणरहितो) होता (=देवानाम् आह्वाता) [अग्निः] यद् (=यदा) विवस्वतः (=यजमानस्य) दूतो (=हविषां हर्ता देवानामाहर्ता च) अभवत् (=भवति) [तदा] [स] नूचित् (=क्षिप्रमेव) वितुन्दते (=अरण्योः सकाशात् निर्गच्छति)। [अनन्तरं च] साधिष्ठेभिः (=साधिष्ठैः=साधकतमैः) पथिभिः (=मार्गैः) रजः (=अन्तरिक्षं) विममे (=विशेषेण परिमितं करोति=अन्तरिक्षं विचरति)। [एवं प्रकारेण आविष्कृतस्वरूपः सन् देवांश्च आनीतवान् सन्] देवताता (=देवतातौ=यज्ञे) [देवान्] हविषा आविवासति (=परिचरति=यजति)॥

स्वीकृतदूत्योऽग्निः सहसा अरण्योर्निर्मथ्यमानो झटिति तयोः सकाशाज् जनितो भूत्वा अन्तरिक्षं प्रति गच्छति। तस्माच्च देवान् आनीय यज्ञे तान्परिचरतीत्यर्थः॥

सूक्त ५८.

ऋषि—**गोतम**कुळांत जन्मलेला **नोधा** या नांवाचा कोणीएक. देवता—**अग्नि**. वृत्त—पहिल्या पांच ऋचांचें **जगती**, आणि राहिलेल्यांचें **त्रिष्टुभ्**.

१. बळानें उत्पन्न झालेला मरणरहित होता [अग्नि] जेव्हां यजमानाचा दूत होतो, [तेव्हां] तो सत्वर [अरणींतून] बाहेर पडतो. [तो] अगदी जवळच्या मार्गांनीं अंतरिक्षांत जातो [आणि] हवीनें यज्ञांत [देवांची] उपासना करितो.

Hymn 58.

To *Agni.* By *Nodhas* of the Family of *Gotama.* Metre—*Jagatî* of the first five, and the *Trishṭubh* of the rest.

1. Quickly does the strength-born, immortal invoker (Agni) come out [from the wood] when he becomes the messenger of the sacrificer. By the best paths he passes through the aerial regions. With the oblation he serves [the gods] in the sacrifice.

---

१. भावार्थः—' बलपुत्र आणि अमर असा जो अग्निरूप होता तो जेव्हां उपासकांचें दूतत्व स्वीकारितो; तेव्हां तो आपल्या आईबापांच्या पोटांतून म्हणजे अरणींतून एकाएकीं बाहेर पडतो, आणि अगदी जवळच्या वाटेनें आकाशांतून स्वर्गीं जाऊन देवांस घेऊन येतो, आणि त्यांस यज्ञांत हवि अर्पण करून पूजितो.' म्हणजे अग्नीला उपासक जन अरणींत संघर्षणानें उत्पन्न करून त्याला पेटवितात आणि देवांस खालीं आणण्याकरितां आकाशमार्गानें वर पाठवितात. तो जाऊन देवांस घेऊन येतो, आणि त्यांस यजमानानें सिद्ध केलेलें हवि अर्पण करितो.

' बलानें उत्पन्न झालेला '=' सहोजाः.' म्हणजे बलाचा अथवा शक्तीचा पुत्र सू. २६ मं. १० आणि त्याजवरील टीप पहा.

' होता.' म्हणजे देवांस यज्ञाप्रत बोलावून आणणारा. अग्नीस ' होता ' म्हणण्याचें कारण पूर्वी पुष्कळ ठिकाणीं सांगितलेंच आहे.

' अरणी ' म्हणून पिंपळाच्या लांकडाचे दोन तुकडे असत. ते एकमेकावर घांसून अग्नि उत्पन्न करीत असत. या अरणींस वेदांत अग्नीचीं मातापितरें असें म्हटलें आहे. उदाहरणार्थः—आ यो मात्रोरुशेन्यो जनिष्ट देवयज्याय सुक्रतुः पावकः (=' जो सुंदर, सुप्रज्ञ आणि तेजःपुंज अग्नि आपल्या आईबापांपासून यज्ञकर्मासाठीं जन्मला'). ऋ. ७. ३.९.

' अगदी जवळच्या मार्गांनीं.' ऋ. ७. ६४. ३ पहा.

आ स्वमद्म युवमानो अजरस्तृष्वविष्यन्नतसेषु तिष्ठति ।
अत्यो न पृष्ठं प्रुषितस्य रोचते दिवो न सानु स्तनयन्नचिक्रदत्॥२

आ । स्वम् । अद्म । युवमानः । अजरः । तृषु । अविष्यन् । अतसेषु ।
तिष्ठति ।
अत्यः । न । पृष्ठम् । प्रुषितस्य । रोचते । दिवः । न । सानु । स्तनयन् ।
अचिक्रदत् ॥ २ ॥

भाषायाम्.

२. स्वम् अद्मं (=भक्ष्यं) तृषु (=क्षिप्रम्) आयुवमानः (=स्वकीयज्वालया संमिश्रयन्=गृह्णन्) अजरः [=जरारहितः] [अग्निः] अविष्यन् (=भक्षयितुमिच्छन्] [सन्] अतसेषु (=समित्काष्ठेषु) तिष्ठति (=आरोहति)। प्रुषितस्य (=घृतसिञ्चितस्य) [=अग्नेः] पृष्ठम्, अत्यो न (=अश्व इव=घर्षणसंवाहनादिना संस्कृतस्याश्वस्य पृष्ठमिव), रोचते (=शोभते)। [स] दिवः सानु स्तनयन्न (=द्युलोकस्य समुच्छ्रितं पृष्ठं पादाघातेन गर्जयन्निव), अचिक्रदत् (=गम्भीरशब्दं करोति)॥

अत्रेदमुक्तं भवति। अस्माभिः प्रथमं दत्तं भक्ष्यं शीघ्रं गृह्णन् अजरोग्निरधिकं भक्षयितुमिच्छन् (=अस्माभिरर्पिष्यमाणं हविः सेवितुमिच्छन्) सन् समित्काष्टेष्वारोहति। घृतसिञ्चितः संश्च घर्षणसंवाहनादिसंस्कारेण प्रसाधितोश्व इव रोचमानः सन् देवानावोढुं द्युलोकं प्रति गच्छति सत्वरगमनाच्च द्युलोकस्य पृष्ठं पादाघातेन गर्जयन्निव नादं करोतीति॥

'अंतरिक्षांत जातो' ='वि रजो ममे' अक्षरशः अर्थ, 'अंतरिक्ष मोजतो.' म्हणजे अंतरिक्षांतून चालून स्वर्गांत जातो. सायणाचार्य येथें 'अंतरिक्ष उत्पन्न करितो' असें भाष्य करितात. 'वि+मा' याचा अर्थ जरी 'निर्माण करणें' असा कितीएक ठिकाणीं होतो असा दिसतो, तरी 'मोजणें' म्हणजे जमिनीवरून, आकाशांतून वगैरे चालणें, जाणें असाहि अर्थ होतो. त्याचीं उदाहरणें ऋ. ५. ८५. ५; १. १६४. ५; ६. ४९. १३; आणि ५. ८१. ३ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्यांत आहेत.

या ऋचेंत तर खडबडीतपणा फारच थोडा आहे; दुसऱ्या आणि तिसऱ्या चरणांत प्रत्येकीं एकेक दीर्घ ऱ्हस्व म्हणावा लागतोः—

नू चित्सहोजा अमृतो नि तुन्दते।
होता यद्दूतो अभवद्विवस्वतः।
वि साधिष्ठेभिः पथिभी रजो ममे।
आ देवताता हविषा विवासति।

२. जरारहित [अग्नि] आपला भक्ष सत्वर घेऊन, मग भक्षण करण्याच्या इच्छेनें लांकडांवर उभा राहतो. घृतानें शिंपडलेल्या [अग्नी]ची पाठ घोड्या[च्या पाठी]प्रमाणें शोभते. तो द्युलोकाचें शिखर जणुं गर्जविता होत्साता मोठा नाद करितो.

2. Quickly seizing his own food, [and] wishing to eat, the ever youthful [Agni] stands upon the fuel. The back [of Agni] anointed [with ghee] shines like [the back of] a horse. He makes a noise as if causing the ridge of heaven to resound.

---

२. 'अरणींतून अग्नि बाहेर पडून वृद्धिंगत होऊन आम्हीं अर्पण केलेलें भक्ष्य त्वरित खाऊन हविरन्नादि जें आम्हीं अर्पण करणार तें खाण्याची इच्छा करून हा तरुण अग्नि समिधांवर चढून बसला आहे. याजवर आम्हीं तूप ओतल्यामुळें, खरारा करून घांसून सजिवलेल्या घोड्याप्रमाणें, याची पाठ दिसत आहे. आणि हा नाद करीत आहे, जसा काय देवांस आणण्यास जात असून स्वर्गाच्या पाठीवरून धांवत असतां तेथें प्रतिशब्दच उत्पन्न करीत आहे,' असा भावार्थ.

'जरारहित'='अजरः.' अग्नि नित्य तरुणच असतो, कधींहि म्हातारा होत नसतो, असें वेदांत पुष्कळ ठिकाणीं आलें आहे. सू. ३६, मं. १५; सू. २२ मं. १० इत्यादि पहा.

'लांकडावर उभा राहतो'='अतसेषु तिष्ठति.' म्हणजे जो समिधांचा ढीग घालून ठेविला आहे त्यावर. समिधा पेटूं लागल्या आहेत आणि अग्नीच्या ज्वाळा जिकडे तिकडे पसरत आहेत इतकें विवक्षित दिसतें.

या ऋचेचा उत्तरार्ध तर अगदी साधारण श्लोकाप्रमाणें वाचतां येतो, प्रथमार्धांतील शेवटचा भाग विशेष ओढाताणीशिवाय म्हणतां येतो, परंतु प्रथम पाद मात्र बराच खडबडीत आहेः—

आ सुअमद्म युवमानो अजरः ।
तृषु अविष्यन्नतसेषु तिष्ठति ।
अत्यो न पृष्ठं प्रुषितस्य रोचते ।
दिवो न सानु स्तनयन्नचिक्रदत् ।

क्राणा रुद्रेभिर्वसुभिः पुरोहितो होता निषत्तो रयिषाळमर्त्यः ।
रथो न विक्ष्वृञ्जसान आयुषु व्यानुषग्वार्या देव ऋण्वति ॥ ३ ॥

क्राणा । रुद्रेभिः । वसुऽभिः । पुरःऽहितः । होता । निऽसत्तः । रयि-षाट् । अमर्त्यः ।

रथः । न । विक्षु । ऋञ्जसानः । आयुषु । वि । आनुषक् । वार्या । देवः । ऋण्वति ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. क्राणा (=हविर्वहनं कुर्वाणो) रुद्रेभिः (=रुद्रैरेतन्नामकैर्देवैः) वसुभिः (=एतन्नामकैर्देवैश्) [च] पुरोहितः (=पुरस्कृतः=हविरानयनार्थं प्रेषितः) रयिषाट् (=रयीणां शत्रुधनानामभिभविता) अमर्त्यः (=मरणरहितः) [एतादृशः] [अग्निरूपो] होता निषत्तः (=निषण्णः=स्थानापन्नोस्ति) । [अयं] देवः ऋञ्जसानः (=स्तोत्रैः प्रसाधितः=स्तुतः सन्) आयुषु (=उपासकेषु=उपासकानां गृहेषु) आनुषक् (अनुक्रमेण=सातत्येन) वार्या (=वार्याणि=धनानि) विऋण्वति (=प्रापयति), ऋञ्जसानः (=प्रसाधितो) रथो विक्षु न (=कृषिजनानां गृहेष्विव=कृषिकारिणां गृहेषु यथा धान्यमानयति तथा) ॥

वसन्तर्तौ क्षेत्रे लूनेषु धान्यभारेषु गृहं प्रत्यानेतव्येषु सत्सु इदानीमपि क्षेत्रकारा रथं पुष्पादिभिः प्रसाध्य क्षेत्रेषु नीत्वा धान्यराशीन् रथे स्थापयित्वा ततो वाद्यगीतनृत्यैः सह रथं स्वगृहमानयन्तीति दक्षिणदेशे प्रसिद्धम् ॥

अत्र ऋञ्जसानः इत्येतत् पदं कैश्चिच्छार्मण्यविद्वद्भिः ‘ रजिष्ठपथेन धावन् ’ इति व्याख्यातं तत् तु चिन्त्यं भाति, ‘ तमीळत प्रथमं यज्ञसाधं विश आरीराहुतमृञ्जसानम् (ऋ. १. ९६. ३)’ इत्यत्र तथा ‘ उप यो नमो नमसि स्तभायन्नियर्ति वाचं जनयन्यजध्यै । ऋञ्जसानः पुरुवारः उक्थैः आ इन्द्रं कृण्वीत सदनेषु होता (ऋ. ४. २१. ५)’ इत्यत्र ऋञ्जसानशब्दस्य सायणाचार्येण स्तोत्रैः प्रसाधित इति स्थाने व्याख्यातत्वात् । ‘ सरलं धावन् ’ इति व्याख्यानस्य केवलं धात्वर्थाश्रयत्वाच्च । क्राणेत्याकारान्तं पदं ‘ बर्हणा ’ (ऋ. १. ५६. ५ इत्यादौ) साधुया (ऋ. ५. ११. ४; १. ४६. ११) इतिवच्च पुंसि प्रथमान्तम् ॥

३. रुद्रांनीं [आणि] वसूंनीं पुढें केलेला, हविर्वहनाविषयीं कुशळ, मरणरहित [आणि] धनें जिंकणारा [असा] हा [अग्निरूप] होता स्थानापन्न [झाला आहे]. लोकांचे घरीं [जसा सजविलेला] रथ [धनें आणून देतो] तसा उपासकांचे घरीं [हा अग्नि]देव [स्तोत्रांनीं] सजविलेला होत्साता धनांची रास आणून देतो.

3. [Agni], active in the sacrifice, put forward by the Rudras [and] by the Vasus, winner of wealth, the immortal invoker, has taken his seat. [This] god adorned [with praises] brings a stream of wealth to the houses of [his] worshippers, as [does] an adorned car [bring grain] to the houses of the cultivators.

---

३. 'अग्नि प्रदीप्त होऊन हवि ग्रहण करण्यासारिखा झाला आहे असें पाहून ऋषि जवळ असलेल्या मित्रांस म्हणतो कीं, 'हा पाहा हवि वाहून नेण्याविषयीं कुशळ, रुद्रगणनामक देवांनीं आणि वसुगणनामक देवांनीं आम्हीं अर्पण केलेलें हवि त्यांजकडेस घेऊन जाण्यासाठीं पुढें केलेला म्हणजे पाठविलेला, आणि युद्धांत शत्रूंशीं लढून त्यांचें धन हरण करणारा, आणि मरणरहित जो अग्नि तो आमचा होता म्हणजे होमनिष्पादक होऊन बसला आहे. तर आपण याची स्तुति करून हवि अर्पण करूं. कारण कीं याची स्तुति करून याला सजविला असतां, सजविलेली गाडी जशी धान्याची रास शेतकऱ्याच्या घरीं आणिते तसा हा संपत्तीची रास उपासकांच्या घरीं आणीत असतो.'

यांत जी उपमा दिली आहे तिचा अर्थ असा आहे कीं, शेतकरी लोक सुगीच्या दिवसांत शेतांतून दाण्यांची रास आणावयाची झाली म्हणजे गाडी सजवून तींतून घरीं आणीत असतात. ही चाल दक्षिण महाराष्ट्र देशांत अजून आहे. पाडव्याच्या सुमारें शाळु जोंधळा अथवा हरभरे किंवा गहूं शेतांत मळून राशी केल्या असतील त्या घरीं आणावयाच्या असल्या म्हणजे शेतकरी आपल्या गाड्या फुलें, हार वगैरे लावून शोभवितात, आणि त्यांत दाणे भरून वाजत गाजत, नाचत गात घरीं घेऊन येतात. याच चालीला अनुलक्षून यांत उपमा दिली आहे असें आम्हांस वाटतें.

'रुद्रांनीं आणि वसूंनीं.' 'रुद्र आणि वसु' हे कोण देव आहेत याविषयीं सू. ४५ मं. १ याजवरील 'वसु,' 'वसुगण' यांजवरील टीप पहा. रुद्रांनीं आणि वसूंनीं पुढें केलेला असें विशेषण अग्नीस या मंत्रांत देण्याचें प्रयोजन इतकें आहे

वि वातजूतो अतसेषु तिष्ठते वृथा जुहूभिः सृण्या तुविष्वणिः ।
तृषु यदग्ने वनिनो वृषायसे कृष्णं त एम रुशदूर्मे अजर ॥ ४ ॥

वि । वातऽजूतः । अतसेषु । तिष्ठते । वृथा । जुहूभिः । सृण्या । तुविऽस्वनिः ।
तृषु । यत् । अग्ने । वनिनः । वृषऽयसे । कृष्णम् । ते । एम । रुशत्ऽऊर्मे । अजर ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. वातजूतः (=वायुना प्रेरितः) [अग्निः] जुहूभिः (=ज्वालारूपाभिर्जिह्वाभिः) सृण्या [च] (=तेजोयष्टिरूपेण=लवित्रेण च) तुविष्वणिः (=महास्वनः) [सन्], अतसेषु (=उन्नतेषु वृक्षेषु) वृथा (=अनायासेन) वितिष्ठते (=विशेषेण तिष्ठति=विविधं प्रसरति) ।–हे रुशदूर्मे (=दीप्तज्वाल) अजर (=जरारहित) अग्ने, यद् (=यदा) [त्वं] तृषु (=शीघ्रं) वनिनो (=वनवृक्षान्) वृषायसे (=धारयसि) [तदा] ते (=तव) एम (=मार्गः) कृष्णं (=कृष्णवर्णं) [भवति]॥

एतस्यामृचि वातप्रेरितोग्निर्वनं कथं दहतीति स्वभावोक्तिः क्रियते ।

कीं, 'वसु आणि रुद्र' या देवांस ऋषीच्या मनांत हवि अर्पण करावयाचें आहे.

'धनें जिंकणारा'='रयिषाट्' म्हणजे, उपासक शत्रूंशीं लढूं लागले म्हणजे शत्रूंचा पराजय करवून त्यांचें धन उपासकांस मिळवून देणारा. शत्रूंचा पराजय झाला म्हणजे त्यांची संपत्ति सहजच जिंकणारास प्राप्त होते.

'शेतकरी लोकांचे घरीं' 'विक्षु.' हा शब्द आणि त्याच्या संबंधानें हा सगळाच मंत्र मोठ्या महत्त्वाचा आहे. कारण कीं 'ब्राह्मण,' 'क्षत्रिय,' 'वैश्य,' 'शूद्र,' असे जे च्यार वर्ण आपण मानितों, त्यांतून 'वैश्य' म्हणजे खरोखर कोण समजावयाचे तें या मंत्रावरून दिसून येतें. 'क्षत्रिय' अथवा राजन्य म्हणजे जसा राज्य करणाऱ्या अथवा अधिकार चालविणाऱ्या जातींतील मनुष्य होय, आणि याप्रमाणें ब्राह्मण म्हणजे ब्रह्म अथवा यज्ञकर्म चालविणाऱ्या मनुष्याचा मुलगा अथवा तशा कुळांत झालेला मनुष्य होय, तसा वैश्य म्हणजे 'विश्' यांत जन्मलेला मनुष्य. 'विश्' म्हणजे साधारण लोक, प्रजा; कीं जे यज्ञादिक कर्मे संपादण्याचा धंदा करणारेहि नव्हेत आणि राज्यहि करणारे म्हणजे (क्षत्रियहि) नव्हेत, ते 'वैश्य' होत. म्हणजे साधारण प्रजा, शेतकरी, कुणबी. हा अर्थ मोठ्या महत्त्वाचा आहे. कारण

४. वातप्रेरित [अग्नि] [आपल्या] जिह्वांनीं [आणि] कोयतीनें मोठा आवाज करीत करीत सहजच मोठमोठ्या वृक्षांवर पसरतो.—हे उज्ज्वलज्वालायुक्त अग्नी, हे जरारहित अग्नी, [तूं] जेव्हां एकाएकीं महावृक्षांवर घालून घेतोस [तेव्हां] तुझा मार्ग काळा [होत असतो].

4. [Agni] propelled by the wind, [and] roaring with his tongues [and] with [his] sickle, easily spreads among the trees.—When, O youthful Agni of burning flames, [thou] dost quickly attack the forest-trees, thy path [becomes] black.

कीं आतां वैश्य म्हणजे बहुतकरून वाणी लोकांसच समजतात, आणि शेतकरी लोकांस शूद्र समजतात आणि त्यांच्याशीं शूद्राप्रमाणें व्यवहार ठेवितात; म्हणजे 'ब्राह्मणांनीं वैश्यांचें अन्न घ्यावें, पाणी प्यावें, त्यांची मुलगी करावी असें शास्त्रांत सांगितलें आहे तरी त्यांतून कांहींच करीत नाहींत. गुजराथेंत मात्र कुणब्यांस शूद्र असें न समजतां वैश्य म्हणतात.'

'सजविलेला होत्साता'=' ऋञ्जसानः.' हा सायणानुसारें केलेला अर्थ आम्हांस योग्य दिसतो. प्रोफेसर ग्रास्मान या शार्मण्य पंडितांनीं 'समोर धांवणारा' असा अर्थ कल्पिला आहे त्यास पुरता आधार नाहीं असें दिसतें. यास्कांस अनुसरून सायणाचार्य सर्वत्र अर्थ आम्हीं येथें केलेलाच देतात. तेव्हां सायणाचार्यांचा अर्थ स्वकपोलकल्पित नसतां पुरातन काळापासून व्याख्यापरंपरागत आलेला आहे, आणि तो सर्वत्र जुळतो, तसा शार्मण्य पंडितांचा जुळत नाहीं.

'धनांची रास आणून देतो'='वार्या आनुषक् वि ऋण्वति.' अक्षरशः अर्थ 'धनें एकामागून एक आणून देतो,' म्हणजे 'धनांचा प्रवाह वाहवितो.'

आधुनिक वृत्तांत आणि या ऋचेंत विशेष भेद नाहीं:—

ऋाणा रुद्रेभिर्वसुभिः पुरोहितो ।
होता निषत्तो रयिषाळमर्त्यः ।
रथो न विक्षु ऋञ्जसान आयुषु ।
वि आनुषग् वार्या देव ऋण्वति ।

---

४. या मंत्रांत अग्नि काय काय करीत असतो त्याची स्वभावोक्ति केली आहे. म्हणजे अग्नि हा दावाग्नि होऊन अरण्याचीं अरण्यें कशीं जाळून खाक करितो तें सांगितलें आहे. ऋषि म्हणतो, 'अग्नीला वायूनें म्हणजे वाऱ्यानें प्रेरणा केली म्हणजे, तो आपल्या ज्वालारूप अनेक जिभांनीं आणि कांतिरूप कोय-

तपुर्जम्भो वन आ वातचोदितो यूथे न साह्वाँ अव वाति वंसगः ।
अभिव्रजन्नक्षितं पाजसा रजः स्थातुश्चरथं भयते पतत्रिणः ॥५॥
॥ २३ ॥

तपुःऽजम्भः । वने । आ । वातऽचोदितः । यूथे । न । सह्वान् । अव । वाति । वंसगः ।
अभिऽव्रजन् । अक्षितम् । पाजसा । रजः । स्थातुः । चरथम् । भयते । पतत्रिणः ॥ ५ ॥ २३ ॥

भाषायाम्.

५. तपुर्जम्भः (=तपूंषि ज्वाला एव मुखानि यस्य स) वातचोदितः (=वातेन प्रेरितः) [अग्निः], यूथे सह्वान् वंसगो न (=गोसमूहे बलवान् वृषेव), अववाति (=व्याप्नोति), [अपि च] अक्षितं (=सकलं) रजः (=अन्तरिक्षम्=आकाशं) पाजसा (=तेजोरूपेण बलेन) अभिव्रजन् (=अभिभवन्) [भवति] । [एवं सति] पतत्रिणः (=पक्षिवदभिपततोऽग्नेः सकाशात्) स्थातुश्चरथं (=सर्वं स्थावरं जङ्गमं च वस्तुजातं=सकलमपि स्थावरजङ्गमरूपं पदार्थजातं) भयते (=बिभेति) ॥

तीनें मोठा अवाज करून मोठमोठ्या वृक्षांत पसरतो.—आणि हे दीप्तज्वाल आणि अजर अग्नी, तूं जेव्हां एकाएकीं मोठमोठ्या वृक्षांवर घालून घेतोस, तेव्हां तूं सगळें रान जाळून टाकून ज्या रस्त्यानें तूं जातोस तो मार्ग काळा करून टाकितोस.' ज्याणीं कोंकणांत अथवा सातपुड्यांत वणवा पाहिला असेल त्यांस हें वर्णन अगदी स्वाभाविक दिसेल यांत संशय नाहीं.

'कोयतीनें '=' सृण्या.' म्हणजे अग्नि गवताला किंवा झाडांस वगैरे लागला म्हणजे कोयतीनें गवत, झाड वगैरे कापल्याप्रमाणें आवाज होत असतो. आणि अग्नि त्यांतून फिरतो तेव्हां एकादी लकलकीत कोयतीच जणुं फिरते आहे असें भासूं लागतें. ' सृणि ' शब्दाचा असाच अर्थ होतो अशाविषयीं ऋ. १०. १०१ ३, आणि १०. १०६. ६ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा.

' महावृक्षांवर घालून घेतोस '=' वनिनः वृषायसे.' अक्षरशः अर्थ वृक्षांशीं माजलेल्या बैलाप्रमाणें वागतोस. म्हणजे एकादा माजलेला पोळ जसा एकाएकीं धांवून येतो तसा त्या वृक्षांवर जाऊन पडतोस. ' वृषायसे ' हें सकर्मक आहे. (ऋ. १०. ४४. ४ पहा).

' तुझा मार्ग काळा होतो '=' ते एम कृष्णम्.' जेथून अग्नि गेला असेल तें

५. ज्वालामुख [आणि] वातप्रेरित [अग्नि], बळकट बैल गाईंच्या कळपांत [फिरतो] तसा, अरण्यांत फिरतो, आणि [आपल्या] तेजानें सर्व अवकाश व्यापून टाकितो. [अग्निरूप] पक्ष्याला सकल स्थावरजंगम सृष्टि भीते.

5. Fire-jawed [Agni], propelled by the wind, sweeps in the forest as a mighty bull in a flock; pervading the entire space. From winged [Agni] [all creation], that which stands, [and] that which moves, receives fear.

स्थळ काळें होतें हें प्रसिद्धच आहे म्हणूनच अग्नीस ‘ कृष्णवर्त्मा ’ (काळा आहे मार्ग ज्याचा तो) असें नांव पडलें आहे.

हा मंत्र तर सहजच श्लोकाप्रमाणें म्हणतां येतोः—

वि वातजूतो अतसेषु तिष्ठते ।
वृथा जुहूभिः सृणिआ तुविष्वणिः ।
तृषु यदग्ने वनिनो वृषायसे ।
कृष्णं त एम रुशदूर्मे अजर ।

---

५. ‘ज्वालादंष्ट्र आणि वायुप्रेरित अग्नि अरण्यांत झपाट्यानें धांवूं लागला म्हणजे एकाद्या गुरांच्या कळपांत जसा एकादा फार बळकट बांगर फिरतो आणि अनिवार्य होतो, तसा दिसतो. हा अग्नि आपल्या तेजानें सर्वहि आकाश आणि सर्व जग भरून टाकितो, आणि जसा काय धगधगीत ज्वाळेचाच एक महाप्रचंड पक्षी जिकडे तिकडे उडतो असें भासतें. तेव्हां सकल स्थावरजंगम पदार्थ आणि प्राणी याला भितात ’ असा भावार्थ. मोठ्या अरण्यास वणवा लागला म्हणजे अग्नि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पाखराप्रमाणें कसा उडतो आणि सगळी जागा कशी व्यापून टाकितो, आणि पशु, पक्षी, झाडें, गवत इत्यादि जे सर्व प्राणी आणि पदार्थ त्यांस कोठेंच पळून जाण्यास व लपून जाण्यास कशी जागाच नाहींशी होते आणि ते सर्व कसा नाश पावतात त्याविषयीं स्वभावोक्ति या ऋचेंत आहे. यांत सांगितलेल्या गोष्टींवरून अग्निदेवाचें खरें स्वरूप काय आहे, म्हणजे अग्निशब्दानें ईश्वर समजावयाचा किंवा अग्निरूप एक देव समजावयाचा तें उघड दिसून येतें.

‘ आकाश ’=‘ रजः.’ म्हणजे जमिनीवरील आणि आकाशांतील जी सर्व पोकळी ती असा अर्थ.

हीहि ऋचा सहज साधारण श्लोकाप्रमाणें थोडक्याच फेरफारानें म्हणतां येतेः—

तपुर्जम्भो वन आ वातचोदितो ।
यूथे न साह्वाँ अव वाति वंसगः ।
अभिव्रजन्नक्षितं पाजसा रजः ।
स्थातुश्चरथं भयते पतत्रिणः ।

दधुष्ट्वा भृगवो मानुषेष्वा रयिं न चारुं सुहवं जनेभ्यः ।
होतारमग्ने अतिथिं वरेण्यं मित्रं न शेवं दिव्याय जन्मने ॥ ६ ॥

दधुः । त्वा । भृगवः । मानुषेषु । आ । रयिम् । न । चारुम् । सुऽहवम् । जनेभ्यः ।
होतारम् । अग्ने । अतिथिम् । वरेण्यम् । मित्रम् । न । शेवम् । दिव्याय । जन्मने ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. हे अग्ने, भृगवः (=एतत्संज्ञा महर्षयः) सुहवं (=सुखेनाहूतं) त्वा (=त्वां) जनेभ्यः (=मर्त्यानां हिताय) मानुषेषु आ (=मर्त्येषु=मर्त्यानां गृहेषु), रयिं न चारुं (=शोभनं धननिधिमिव कृत्वा), दधुः (=स्थापयामासुः) । दिव्याय जन्मने (=दिव्याय जनाय=देवजनाय=देवानां हिताय) [च] होतारं (=देवानामाह्वातारं) मित्रं न शेवं (=मित्रवत् सुखकरं) वरेण्यं (=वरणीयं=श्रेष्ठम्) अतिथिं [च] [कृत्वा] [दधुः=स्थापयामासुः] ॥

अत्रेदमुक्तं भवति । हे अग्ने, त्वं मर्त्यानां गृहेषु स्थित्वा यथा मर्त्येभ्यो धनं ददासि अपि च देवेभ्यो हविर्यथा प्रापयसि तथा त्वां धनं कृत्वा होतारं च कृत्वा मर्त्यानां गृहेषु भृगवो नाम ऋषयः स्थापयामासुरिति ॥

'मानुषेषु आ' इत्यत्र 'आ' सप्तमीद्योतकः । भृगवो नाम महर्षयः किल स्वर्गाद् अग्निमानीय मृत्युलोके प्रथमं स्थापयामासुरिति तत्पूर्वमग्निर्भूलोके नासीदिति च वेदेषु प्रसिद्धिः ॥

६. [हे अग्नी], ज्याला उपासक सहज बोलावूं शकतात अशा तुला भृगूंनीं, एकाद्या सुंदर खजिन्याप्रमाणें, [मर्त्य] जनांसाठीं मानवांच्या घरीं स्थापिला आहे: हे अग्नी, तुला होता, आणि मित्राप्रमाणें सुखदायक श्रेष्ठ अतिथि करून देवांसाठीं स्थापिला आहे.

6. Thee, O Agni, who can be easily invoked, the Bhṛigus have established in the houses of men as a dear treasure for the benefit of men, [and] as an invoker [and] excellent guest pleasing like a friend, for the benefit of the gods.

---

६. यज्ञशाळेंत प्रदीप्त झालेल्या अग्नीस पाहून ऋषि म्हणतो कीं, ‘हे अग्नी, तूं प्रथम या मृत्युलोकीं नव्हतास, तेव्हां तुला भृगु या नांवांच्या ऋषींनीं स्वर्गाहून भूमीवर आणून मनुष्यांच्या घरीं स्थापिलें; आणि दोन हेतूंनीं स्थापिलें. १ ला हा कीं, तूं मनुष्यांस देवांपासून धन आणून द्यावें; आणि २ रा हा कीं, मनुष्यांनीं अर्पण केलेलें हवि खाण्यासाठीं तूं देवांस यज्ञाला आणून त्यांजकडून तें खावयास लावावें. याप्रमाणें मर्त्यांच्या आणि अमर्त्यांच्या हितासाठीं तुला या भूलोकीं भृगूंनीं स्थापिलें आहे. आणि तूं मानवांस आणि देवांस सारिखा प्रिय आहेस.’

‘ज्याला उपासक सहज बोलावूं शकतात’=‘सुहवं.’ अक्षरशः अर्थ ‘ज्याचा धांवा सोपा आहे तो.’ म्हणजे, ज्याचा धांवा केला असतां तो प्रसन्न होऊन त्वरित येतो, इतर देवांप्रमाणें विलंब करणारा नव्हे. आलीकडे कोंकणांत कितीएक गांवीं भूतें अथवा समंद काढावयाचे असतात त्यांस हाक मारिली तरी, म्हणजे ढोल वाजवून गाऱ्हाणें घातलें तरी, लौकर वारें येत नाहीं आणि ते उभे राहत नाहींत. तर अग्नि तसा नव्हे. स्तोत्र म्हणून फूक मारिल्याबरोबर ज्वाला टाकून लागलाच प्रगट होतो असें तात्पर्य. ऋ. ६. ५२. ६ यांत ‘अग्निः सुशंसः सुहवः पितेव’=‘अग्नि हा बापाप्रमाणें ज्याच्याशीं सहज बोलावें आणि बापाप्रमाणें ज्यास सहज हाक मारितां येते असा होय’ असें म्हटलें आहे. याप्रमाणें अग्नि हा मोठा प्रिय देव होय, भयंकर नव्हे.

‘भृगूंनीं स्थापिला आहे’=‘भृगवो दधुः.’ भृगु हें नांव येथेंच प्रथम आलें आहे यास्तव याजविषयीं वेदांत काय सांगितलें आहे त्याचें दिग्दर्शन येथें केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:—‘भृगु हे प्रख्यात महापुरातन महर्षि होत. पूर्वीं या जगांत अग्नि नव्हता, तो भृगूंसाठीं मातरिश्व्यानें म्हणजे वायूनें पृथ्वीवर आणिला (ऋ. १. ६०. १). भृगु हे अग्नीला प्रदीप्त करून भजूं लागले (ऋ. १. १२७. ७). अग्नीला प्रथम भृगूंनीं वेदीवर स्थापिलें (ऋ. १. १४३. ४). भृगूंनीं अग्नीला प्रथम यजमानाच्या घरीं स्थापिलें (ऋ. २. ४. २; ४. ७. १). भृगूंनीं अग्नीला मित्राप्रमाणें घरांत स्थापिलें.’ यावरून काय समजावयाचें?

होतारं सप्त जुह्वो ३ यजिष्ठं यं वाघतो वृणते अध्वरेषु ।
अग्निं विश्वेषामरतिं वसूनां सपर्यामि प्रयसा यामि रत्नम्॥ ७ ॥
होतारम् । सप्त । जुह्वः । यजिष्ठम् । यम् । वाघतः । वृणते । अध्वरेषु ।
अग्निम् । विश्वेषाम् । अरतिम् । वसूनाम् । सपर्यामि । प्रयसा । यामि ।
रत्नम् ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. यम् [अग्निं] यजिष्ठं (=यष्टृतमम्=अतिशयेन कुशलं यष्टारं) होतारं (=देवानाम् आह्वातारं) [कृत्वा] सप्त जुह्वः (=सप्तसंख्याका होतारो) वाघतः (=ऋत्विजः) अध्वरेषु (=यागेषु) वृणते (=संभजन्ते=स्वीकुर्वन्ति) [तं] विश्वेषां वसूनां (=सर्वेषां धनानाम्) अरतिम् (=ईश्वरम्) अग्निं पयसा (=हविरन्नेन) सपर्यामि (=परिचरामि) रत्नं (=रमणीयम् उत्तमं धनं) [च] यामि (=याचे) ॥

' सप्त जुह्वः ' इत्येतस्य ' सप्तसंख्याका होतार ' इति यद् व्याख्यानम् अनु सायणमस्माभिः कृतं तत्र बहूनि प्रमाणानि । "तमित्त्वा सप्त होतारः ईळते" ऋ. ८. ६०. १६; " सप्त दिशो नानासूर्याः सप्त होतारः ऋत्विजः देवाः आदित्याः ये सप्त तेभिः नः अभिरक्ष " ९. ११४. ३; " समीचीनाः आसते होतारः सप्तजामयः पदम् एकस्यः पिप्रतः " ९. १०. ७; " इदमित्था रौद्रं गूर्तवचाः " इत्यादि १०. ६१. १; " सादय सप्त होतॄन् " १०. ३५. १०; " स केतुः अध्वराणाम् अग्निः देवेभिः आगमत् अञ्जानः सप्त होतृभिः हविष्मते " ३. १०. ४; " येभ्यो होत्रां प्रथमाम् आयेजे मनुः समिद्धः मनसा सप्त होतृभिः " १०. ६३. ७ इत्यत्र होतॄणां सप्तत्वं प्रतिपादितम् । एवं सत्यपि शार्मण्यपण्डितो विदुष्टरो ग्रास्मान् यदन्यथा व्याचष्टे तच्चिन्त्यमिति भाति ॥

' अरतिं वसूनाम् ' इत्येतस्य 'धनानां स्वामी' इति यद् व्याख्यानं सायणाः कुर्वन्ति तत्रापि बहूनि प्रमाणानि । ऋ. १. १२८. ८; २. २. ३; इत्येते ऋचे दृश्येताम् । यज्ञस्य प्रसाधयितेति यद् विदुष्टरो ग्रास्मान् व्याचष्टे तन्न । " प्राग्नये तवसे भरध्वं गिरं दिवो अरतये पृथिव्याः" (ऋ. ५. ७. १), " अरतिं युवत्योः" (ऋ. ६. ४९. २.), तथा च "अरतिं मानुषाणां" (ऋ. ७. १०. ३) इत्यादिषु मन्त्रेषु अरतिशब्दस्य स्वामिशब्देनैव व्याख्यातुं योग्यत्वात् प्रसाधयिता इत्यस्यार्थस्य अरम् इति संशयग्रस्तनिर्वचनान्याधारस्याभावाच्च ॥

भृगु हे अतिप्राचीन देवोपासक असून अग्नि पेटवून अग्नीच्या मुखांत देवांप्रीत्यर्थ आहुति घालण्याचा प्रचार प्रथम त्यांनीं घातला असा गूढार्थ आहे कीं काय?

७. ज्याची उत्तम यजनकर्त्ता आणि देवांस बोलावून आणणारा असा समजून सात होते ऋत्विज् यज्ञांत योजना करितात असा जो सकलसंपत्तींचा स्वामी अग्नि, त्याला मी हविरन्नानें भजतों आणि [त्याजपाशीं] उत्तम धन प्रार्थितों.

7. Him whom the seven invoking priests choose as the best sacrificer [and] invoker in sacrifices—that Agni, the lord of all gifts, I worship with [my] oblation, [and] pray for the highest wealth.

किंवा भृगूंनीं अग्नि पृथ्वीवर आणिला हें केवळ रूपक आहे असें समजावयाचें कीं काय ? हा शेवटचा पक्ष स्वीकारिला तर त्याला आधार ऋ. ३. ५. १० यांत सांपडेल. त्यांत असें सांगितलें आहे कीं 'भृगुभ्यः परिमातरिश्वा गुहा सन्तं हव्यवाहं समीधे.' याचा अर्थ सायणाचार्य, "लपून राहिलेला जो अग्नि त्याला मातरिश्व्यानें भृगूंपासून म्हणजे सूर्यकिरणांपासून पेटविलें" असा करितात. यावरून भृगु म्हणजे सूर्यकिरण असा अर्थ परंपरागत आला आहे असें दिसतें, आणि त्यामुळें जेथें जेथें भृगूंनीं पृथिवीवर यज्ञकर्मासाठीं म्हणून अग्नि प्रथम आणिला किंवा पेटविला असें सांगितलें आहे, तेथें तेथें सूर्यकिरणांनीं अग्नीस प्रथम पृथ्वीवर आणिलें असा गूढार्थ समजतां येईल, आणि मातरिश्व्यानें अग्नि भृगूंसाठीं पेटविला म्हणजे सूर्यकिरणांपासून पृथिवीवर प्रगट होणारा जो अग्नि त्याला वाढवू वायूनें विस्तृत केलें असा अर्थ.

किंवा भृगु हे वास्तविक विद्यमान पुरातन महर्षि असून त्यांणीं अग्निभक्तीचा प्रचार प्रथम स्थापिला ही, आणि भृगु म्हणजे सूर्यकिरण आणि त्यांणीं अग्नीला पृथिवीवर आणिलें ही, अशा दोनी गोष्टी घेऊन त्यांचा संकर झाला आहे असें समजल्यास चालेल.

कसेंहि असलें तरी ऋग्वेदांत आणखी असें सांगितलें आहे कीं (ऋ.१०. ४६. २) विद्वान् भृगूंनीं गुराप्रमाणें पळून गेलेला, आणि लपून राहिलेला जो अग्नि त्याला शोधून काढिलें. भृगु हे अतिप्राचीन ऋषि होत असें वेदमंत्र रचले गेले तेव्हांहि मानीत असत. सगळ्या ऋग्वेदसंहितेंत भृगूंनीं केलेली सूक्तें नाहींत. आणि ऋग्वेदांत कितीएक ठिकाणीं अशी देवांस अशी प्रार्थना आहे कीं, 'सर्व एकतीस देव, आपो देवी, मरुत्, भृगु, उषा आणि सूर्य यांसहित तुम्ही येऊन आमचा सोम प्या' (ऋ. ८. ३५. ३). एका मंत्रांत (ऋ. १०. १४. ६) एका ऋषीनें म्हटलें आहे कीं, आमचे जे पितर म्हणजे प्राचीन पूर्वज त्यांचा प्रसाद आम्हांवर असो; आणि त्या पूर्वजांचीं जीं नांवें दिलीं आहेत त्यांत भृगु हे आहेत. तीं नांवें 'अङ्गिरस्', 'नवग्व,' 'अथर्वण' आणि 'भृगु' हीं होत.

याशिवाय ऋग्वेदांत भृगूंविषयीं विशेष कांहीं सांगितलेलें नाहीं. वेदाच्या आलीकडील जे पुराणादिक ग्रन्थ त्यांत तर भृगु हें नांव प्रसिद्ध आहेच, आणि

अच्छिद्रा सूनो सहसो नो अद्य स्तोतृभ्यो मित्रमहः शर्म यच्छ ।
अग्ने गृणन्तमंहस उरुष्योर्जो नपात्पूर्भिरायसीभिः ॥ ८ ॥

अच्छिद्रा । सूनो इति । सहसः । नः । अद्य । स्तोतृऽभ्यः । मित्रऽमहः । शर्म । यच्छ ।

अग्ने । गृणन्तम् । अंहसः । उरुष्य । ऊर्जः । नपात् । पूःऽभिः । आयसीभिः ॥ ८ ॥

भाषायाम्.

८. हे सहसः सूनो (=बलस्य पुत्र), मित्रमहः (=अनुकूलदीप्तिमन्) [अग्ने], [त्वम्] अद्य नः (=अस्मभ्यम्) अच्छिद्रा (=छिद्ररहितानि=क्षयरहितानि) शर्म (=शर्माणि=सुखानि) यच्छ (=प्रयच्छ) । हे अग्ने, हे ऊर्जो नपात् (=बलस्य पुत्र) गृणन्तं (=त्वां स्तुवन्तम्=अस्मत्सदृशं स्तोतारम्) अंहसः (=पापाद्) आयसीभिः पूर्भिः (=अयोवद्दृढतरैः पालनसाधनैः प्राकारैः) उरुष्य (=रक्ष) ॥

विष्णूनें जो परशुरामावतार घेतला तो भृगूच्याच पोटीं घेतला हेंहि प्रसिद्ध आहे.

हा मंत्र श्लोकाप्रमाणें वाचला जाण्यास खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावाः—

दधुष्टुआ भृगवो मानुषेषु आ ।
रयिं न चारुं सुहवं जनेभिअः ।
होतारमग्ने अतिथिं वरेणिअं ।
मित्रं न शेवं दिविआय जन्मने ।

---

७. या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, 'सातहि होते ज्या अग्नीला आपणांपेक्षां चांगला होता असें समजून यज्ञांत नेमितात, जो अग्नि सकल धनांचा प्रभु त्याला मी आज येथें हविरन्न देऊन भजतों आणि त्याजवळ संपत्ति प्रार्थितों.'

'सातहि होते.' होते ऋत्विज सात असतात याविषयीं ऋग्वेदांत सांगितलें आहे. ते सर्व मंत्र 'भाषे' खालीं उतरून घेतले आहेत, ते पहा. यज्ञांत रजो सात 'होते' म्हणजे देवांस आह्वान करणारे ऋत्विज आहेत, तरी ते देवांस बोलावून आणण्याचें काम आपणाकडून चांगलें होणार नाहीं, अग्नीकडून चांगलें होईल असें आणि देवांचें यजन व्हावें तसें उत्तम यजन आपणाकडून होणार नाहीं, अग्नीकडून उत्तम होईल असें, समजून अग्नीला आपणांवर श्रेष्ठ होता करून नेमितात, असें तात्पर्य.

८. हे बलपुत्रा, हे सुखदायकदीप्तिमान् [अग्नी], [तूं] आज आम्हां स्तोत्यांला अक्षय सुखें दे. हे अग्नी, हे शक्तिपुत्रा, तूं [या] स्तोत्याला संकटापासून लोखंडाच्या भिंतींनीं रक्ष.

8. O son of might, grant thou to-day, O [Agni] of friendly brightness, imperishable blessings unto us, thy praisers. O Agni, child of strength, save thou thy praiser from danger by means of iron walls.

---

८. या ऋचेंत ऋषि असें म्हणतो कीं, ‘ हे बलपुत्रा, हे शक्तिपुत्रा अग्नी, तूं आम्हांसारिख्या स्तोत्यांस आज अक्षय सुख दे, तूं मजसारिख्या स्तोत्याला लोखंडाच्या भिंती बांधून त्यांच्या आंत ठेवून संकटापासून रक्ष. ’ हा जरी स्तोत्राचा उपसंहार नाहीं तरी त्याच्या जवळ जवळ आहे, त्यामुळें उपसंहारांत जी प्रार्थना म्हणजे मागणें असतें तें यांत आहे. ‘ ह्या सूक्तानें तुझें आम्हीं स्तवन केलें आहे, तर तूं कृपा करून आम्हांसारिखे जे तुझे दीन स्तोते त्यांचें तूं संरक्षण कर.’

‘ सुखदायकदीप्तिमान् ’=‘ मित्रमहः.’ सू. ५० मं. २१ याजवरची टीप पहा.

‘ शक्तिपुत्रा ’=‘ ऊर्जो नपात्.’ प्रस्तुत स्थळीं सायणाचार्य ‘ अन्नाचा पुत्र ’ असा अर्थ करितात, पण ऋ. ५. ७. १ ; ६. ४८. २ ; ७. १६. १ यांजवरील त्यांचेंच भाष्य पहा.

‘ लोखंडाच्या भिंतींनीं’ = ‘आयसीभिः पूर्भिः.’ ऋ. ७. १५. १४ याजवरील सायणभाष्य पहा. शिवाय ऋ. ४. २७. १ यांतहि ‘ शतं मा पुरः आयसीः अरक्षन् ’=‘ लोखंडाच्या शंभर भिंतींनीं मला रक्षिलें ’ असें गर्भस्थ वामदेव ऋषीनें म्हटलें आहे.

अग्नीला बलपुत्र आणि शक्तिपुत्र कां म्हणतात याविषयीं पूर्वीं पुष्कळ वेळ सांगितलेंच आहे.

हा मंत्र खालीं लिहिल्यावरून पूर्वकाळीं कसा म्हणत असतील, याविषयीं समजून येईलः—

अच्छिद्रॅा सूनो सहसो नॅा अद्य ।
स्तोतृभ्यॅा मित्रमहॅः शर्म यच्छ ।
अग्ने गृणन्तमॅहसः उरुष्य ।
ऊर्जो नपात् पूरभिरायसीभिः ।

भवा वरूथं गृणते विभावो भवा मघवन्मघवद्भ्यः शर्म ।
उरुष्याग्ने अंहसो गृणन्तं प्रातर्मक्षू धियावसुर्जगम्यात् ॥९॥२४॥

भव । वरूथम् । गृणते । विभाऽवः । भव । मघऽवन् । मघवत्ऽभ्यः । शर्म ।
उरुष्य । अग्ने । अंहसः । गृणन्तम् । प्रातः । मक्षु । धियाऽवसुः । जगम्यात् ॥ ९ ॥ २४ ॥

भाषायाम्.

९. हे विभावः (=विभावन्=विशेषेण प्रभावन्) [अग्ने], [त्वं] गृणते (=स्तोत्रे=मत्सदृशाय) वरूथं (=रक्षणसाधनं=कवचं) भव, हे मघवन् (=धनवन्) [अग्ने], [त्वं] मघवद्भ्यः (=धनयुक्तेभ्यो) [यजमानेभ्यः] शर्म (=शरणस्थानं) भव । हे अग्ने, [त्वं] गृणन्तं (=मत्सदृशं स्तोतारम्) अंहसः (=पापाद्) उरुष्य (=रक्ष) । —धियावसुः (=धीमान् प्रज्ञायुक्तः) [अग्निः] प्रातः (=प्रातःकाले) मक्षु (=सत्वरं) जगम्यात् (=दिने दिन आगच्छतु) ॥

९. हे प्रकाशमान् [अग्नी], [तूं] स्तोत्रकर्त्याचें कवच हो, हे धनसंपन्न [अग्नी], [तूं] धनसंपन्न यजमानाचें शरणस्थान हो. हे अग्नी, [तूं] स्तोत्याला संकटापासून तार.—बुद्धिमान् [अग्नि] प्रतिदिवसीं सकाळीं येत जाओ.

9. Do [thou], O brilliant [Agni], become the coat of arms to the praiser, do [thou], O rich [Agni], become the shelter to the rich sacrificers, save [thou], O Agni, the praiser from danger.—May wise [Agni] come daily early in the morn.

---

९. हा या सूक्ताचा उपसंहार आहे. आणि उपसंहारांत जी प्रार्थना म्हणजे वर मागण्याचें मनांत असतें, तो यांत उपास्य देव जो अग्नि त्याजप्रत मागितला आहे. तो हा कीं, 'हे अग्नी, या स्तोत्राचा कर्ता स्तोता जो मी त्या माझें तूं कवच हो, म्हणजे, आंगांत घातलेल्या कवचाप्रमाणें माझें रक्षण करीत जा; आणि मला स्तोत्र करावयास लावणारे जे धनसंपन्न यजमान त्यांनां तूं शरणस्थान हो, म्हणजे, त्यांनीं तुला शरण यावें आणि त्वां संरक्षण करावें अशा प्रकारें त्यांजवर कृपा कर. कां कीं तूं धनसंपन्न आहेस. तर आणखी पुनः प्रार्थितो कीं, तूं मज स्तोत्याचें संरक्षण कर.—हा अग्नि प्रतिदिनीं प्रातःकाळीं प्रगट होओ, आणि आम्हीं दिलेलें हवि ग्रहण करीत जाओ.'

पूर्वीच्या काळीं सुद्धा अशी चाल होती कीं, जे देवभक्त श्रीमन्त असतील त्यांणीं गरीब ब्राह्मणांस म्हणजे सूक्तें ज्यांला रचितां येत अशा कवीस सूक्तें रचून तीं म्हणून आहुति देऊन यज्ञ करण्याच्या कामीं लावीत आणि यज्ञ संपादणारा यज्ञ करून उपास्य देवतेची स्तुति करून, आपणास यज्ञाच्या कामीं लावणाऱ्या यजमानाचें आणि आपलें स्वताहाचें कल्याण होओ, आणि नित्य संकट दूर होओ, अशी तिची प्रार्थना सूक्ताच्या शेवटच्या मंत्रांत म्हणजे उपसंहारांत स्पष्ट करीत अथवा जाणवीत. पण त्या वेळीं स्तोता अथवा यज्ञसंपादक एका जातींतील आणि यज्ञ करविणारा यजमान हा दुसऱ्या एका जातींतील हा भेद नसे. स्तोत्र करितां आलें आणि विद्वान् असला म्हणजे पुरे, अमुक जातींतील असला पाहिजे असें नव्हतें, अथवा होमसंपादक झाले तरी आम्ही उंच वर्णाचे ब्रह्मदेवाच्या मुखांतून जन्मलेले आहों आणि यज्ञ करविते यजमान आपणापेक्षां कमी आहेत असें मानीत नसत. म्हणूनच या मंत्रांत सूक्तकर्ता सव्य ऋषि अग्नीजवळ स्तोत्याचें आणि यजमानाचें कल्याण कर अशा अर्थाची प्रार्थना करितो, आपणा

सूक्तम् ५९.

गौतमो नोधा ऋषिः । अग्निर्वैश्वानरो देवता । त्रिष्टुप् छन्दः ।

वया इदग्ने अग्नयस्ते अन्ये त्वे विश्वे अमृता मादयन्ते ।
वैश्वानर नाभिरसि क्षितीनां स्थूणेव जनाँ उपमिद्ययन्थ ॥ १ ॥

वयाः । इत् । अग्ने । अग्नयः । ते । अन्ये । त्वे इति । विश्वे । अमृताः । मादयन्ते ।
वैश्वानर । नाभिः । असि । क्षितीनाम् । स्थूणाऽइव । जनान् । उपऽमित् । ययन्थ ॥ १ ॥

भाषायाम्.

१. हे अग्ने, अन्येग्नयः ते (=तव) वया इत् (=शाखा एव) [भवन्ति]। त्वे (=त्वयि) [एव] विश्वे अमृताः (=सर्वे देवा] मादयन्ते (=हृष्यन्ति)। हे वैश्वानर (="विश्वेषां नराणां जठररूपेण संबन्धिन् अग्ने)," [त्वं] क्षितीनां मनुष्याणां नाभिः (=अवस्थापयिता) असि । त्वम् उपमित् (=उपस्थापयिता सन्) जनान् (=मनुष्यान् स्थूणेव=स्तम्भ इव) ययन्थ (=धारयसि) ॥

स्वताहाला तारण्याची अवश्यकता नाहीं, यज्ञ करवित्या यजमानाला मात्र आहे असें समजून प्रार्थीत नाहीं.

दुसरी गोष्ट अशी ध्यानांत ठेवण्याजोगी दिसून येते कीं, आलीकडच्या काळांतील स्तोते अथवा ऋषि म्हणजे पुरोहित, भट, भिक्षुक यांच्याकडून यज्ञादिक कांहीं तरी कर्म करविलें म्हणजे ते यजमानाचें रक्षण अथवा कल्याण होओ अथवा त्याच्या स्त्रियेला, किंवा मुलीला नित्य सौभाग्य असो आणि त्याप्रमाणेंच आपलें रक्षण म्हणजे संरक्षण आणि कल्याण होओ किंवा आपल्या स्वताहाच्या कुटुंबांतील स्त्रियांसहि सदैव सौभाग्य असो अशी देवांची अथवा ईश्वराची प्रार्थना न करितां, यजमानालाच मात्र 'शांति असो, पुष्टि असो, संतोष असो, वृद्धि असो, विघ्नें दूर होओत, दीर्घायुष्य असो, आरोग्य असो, कर्मापासून कल्याण होओ, कर्मांचा उत्कर्ष होओ, धर्माची बढती होओ, सुखाची बढती असो, धन आणि धान्य यांचा उत्कर्ष असो, इच्छिलेली संपत्ति प्राप्त होओ, बाहेरच्या प्रदेशीं अरिष्टाचें निरसन होओ, जें बरें असेल तें होओ, पुढच्या कामास विघ्न न होओ, सौभाग्य होओ, सुमंगल असो,' (शान्तिरस्तु पुष्टिरस्तु तुष्टिरस्तु वृद्धिरस्तु निर्विघ्नमस्तु

सूक्त ५९.

ऋषि—**गोतमकुळांतील नोधा** या नांवाचा. देवता—**अग्नि.** वृत्त—**त्रिष्टुभ्,** म्हणजे ज्याला आतां आपण **उपजाति** म्हणतों तें.

१. हे अग्नी, दुसरे [सर्व] अग्नि तुझ्या शाखाच [होत]. सकळ अमर तुझ्याच ठायीं हर्ष पावतात. हे वैश्वानरा, [तूं] लोकांचा नाभि होस. [तूं] खांबाप्रमाणें जनांस आधार [होत्साता] धारण करितोस.

HYMN 59.

To Agni known as *Vais'vânara* or the Agni of all men. By *Nodhas* of the family of *Gotama*, same as the author of the previous hymn. Metre-*Trishtubh* i.e. the modern *Upajâti.*

1. O Agni, [all] other Agnis [are] thy branches. In thee all immortals are gratified. O Vais'vânara thou art the centre of all races. [Being] a support thou holdest the people like a pillar.

आयुष्यमस्तु आरोग्यमस्तु शिवं कर्मास्तु कर्मसमृद्धिरस्तु धर्मसमृद्धिरस्तु इष्टसंपदस्तु बहिर्देशे अरिष्टनिरसनमस्तु यच्छ्रेयस्तदस्तु उत्तरे कर्मण्याविघ्नमस्तु सौभाग्यमस्तु सुमङ्गल्यं चास्तु) असा लांबचलांब आशीर्वाद देतात, जणूं काय आशीर्वाद देणाऱ्याच्या घरीं तर ह्या सगळ्या संपत्ति भरूनच वाहत आहेत.

या ऋचेच्या पहिल्या तीन पादांत अग्नीविषयीं प्रत्यक्षनिर्देश असून चवथ्या पादांत परोक्षनिर्देश आहे तो लक्षांत ठेवावा. दुसरीं उदाहरणें आजपर्यंत पुष्कळ आलींच आहेत. शिवाय हा येथें परोक्षनिर्देश असण्याचें कारण असें आहे कीं, चवथा पाद म्हणजे 'प्रातर्मक्षू धियावसुर्जगम्यात्' हे शब्द उपासनाविसर्जनाच्या वेळीं उच्चारावयाची गोतमकुळांत चालच पडून गेली होती असें दिसतें. सूक्ताच्या शेवटील मंत्राच्या शेवटीं हे शब्द घातलेले इतर सूक्तांत आढळतात. या मण्डलाच्या साठाव्या सूक्ताचा नववा मंत्र पाहा, त्यांत अग्नीसच लाविले आहेत; पण ऋ. ८. ८० या सूक्ताच्या शेवटील मंत्राच्या शेवटील पादांत सोमरूपी देवास लाविले आहेत. ऋ. ९. ९३ या सूक्ताच्या शेवटील मंत्राच्या शेवटील पादांत सुद्धा सोमासच लाविले आहेत. दुसरींहि उदाहरणें पुष्कळ आहेत.

---

१. हें सूक्त वैश्वानर अग्नीविषयीं आहे. वैश्वानर अग्नि म्हणजे सर्व मनुष्यांचा जो अग्नि तो असें सायणाचार्य म्हणतात; आणि ते असें म्हणतात कीं,

मूर्धा दिवो नाभिरग्निः पृथिव्या अथाभवदरती रोदस्योः ।
तं त्वा देवासोऽजनयन्त देवं वैश्वानर ज्योतिरिदार्याय ॥ २ ॥

मूर्धा । दिवः । नाभिः । अग्निः । पृथिव्याः । अथ । अभवत् । अरतिः । रोदस्योः ।
तम् । त्वा । देवासः । अजनयन्त । देवम् । वैश्वानर । ज्योतिः । इत् । आर्याय ॥ २ ॥

आ सूर्ये न रश्मयो ध्रुवासो वैश्वानरे दधिरेऽग्ना वसूनि ।
या पर्वतेष्वोषधीष्वप्सु या मानुषेष्वसि तस्य राजा ॥ ३ ॥

आ । सूर्ये । न । रश्मयः । ध्रुवासः । वैश्वानरे । दधिरे । अग्ना । वसूनि ।
या । पर्वतेषु । ओषधीषु । अप्ऽसु । या । मानुषेषु । असि । तस्य । राजा ॥ ३ ॥

भाषायाम्.

२. अग्निः दिवो (=द्युलोकस्य) मूर्धा (=मूर्धस्थानीयः प्रधानभूतः) पृथिव्या नाभिः (=मध्यस्थानीयश्) [चास्ति] । अथ (=अनन्तरम्=अत एव) [स] रोदस्योः (=द्यावापृथिव्योः) अरतिः (=स्वामी) अभवत् । तं (=तादृशं) त्वा (त्वां) देवं, हे वैश्वानर [अग्ने], देवासः (=देवा) आर्याय (=आर्यजाताय= आर्यजनानामर्थे) ज्योतिरित् (=ज्योतीरूपेणैव) अजनयन्त (=उदपादयन्) ॥

३. ध्रुवासः (=ध्रुवाः=निश्चला) रश्मयः (=किरणा) आ सूर्ये न (=सूर्ये इव) वैश्वानरे अग्नौ [ध्रुवाणि] वसूनि (=धनानि) दधिरे (=ध्रियन्ते=आसते) । [अतः कारणात् हे अग्ने], या (=यानि) [वसूनि] पर्वतेषु, ओषधीषु (=वृक्षेषु) अप्सु (=उदकेषु), या (=यानि) [च] मानुषेषु (=मनुष्येषु) [विद्यन्ते], तस्य (=वसुजातस्य=तेषां सर्वेषां वसूनां) [त्वं] राजासि (=अधिपतिर्भवसि) ॥

सकळ मनुष्यांच्या जठरांत अग्नि असतो म्हणून वैश्वानर होय आणि त्यामुळेंच

सकळ देवांसाठीं अग्नीच्याच मुखांत हवि अर्पिलें जातें, म्हणून सकळ अमर जे

२. अग्नि [हा] द्युलोकाचा माथा [आणि] पृथिवीचा नाभि [होय]. आणि तो द्यावापृथिवींचा स्वामी झाला आहे.–असा जो देव तूं त्या तुला, हे वैश्वानर अग्नी, आर्यजनासाठीं ज्योतीरूपानें देव निर्माण करिते झाले.

३. सूर्याच्या ठायीं किरण अचल [आहेत] तसीं वैश्वानर अग्नीचे ठायीं धनें [अचल] आहेत.– [हे अग्नी], पर्वतांत जीं [धनें] [आहेत], जीं वृक्षांत, [जीं] उदकांत [आहेत], [आणि] जीं मनुष्यांमध्यें [आहेत], त्यांचा [तूं] राजा होस.

2. Agni [is] the head of Heaven [and] the navel of the Earth. So he became the master of both Heaven and Earth.—Such thou hast been begotten, O good Vais'vânara, by the gods as a light for the Ârya.

3. As eternal rays in the sun [even so] blessings stand constant in Agni Vais'vânara.—What [blessings] [are] in the mountains, in plants, in the waters, [and] what among men, of those thou, O Agni, art the king.

देव ते अग्नीच्याच ठायीं म्हणजे अग्नीच्या मुखानें हर्ष पावतात असें मंत्रांत म्हटलें आहे.

‘ लोकांचा नाभि होस ’=‘ नाभिरसि क्षितीनाम् ’. म्हणजे जनांची व्यवस्था करणारा असें सायणाचार्य म्हणतात. परंतु सकल जन ज्यापासून निघाले आहेत म्हणजे उत्पन्न झाले आहेत तो असा अर्थ संभवतो. आणि सकळ अग्नि, सकळ देव, सकळ मनुष्य यांचा उत्पन्नकर्ता आणि रक्षिता वैश्वानर अग्नीच होय असें सांगण्याचें तात्पर्य आहेसें दिसतें.

हा मंत्र उपजातीला खालीं दाखविल्याप्रमाणें मिळतो.

वया इदग्ने अॅग्नयस्तॅ अन्ये ।
तुए विश्वे अॅमृतॉ मादयन्ते ।
वैश्वानरॅ नाभिरसि क्षितीनां ।
स्थूणेव जनाँ उपमिद्ययन्थ ।

---

२. ‘ अग्नि हा एवढा मोठा आणि इतका व्यापक आहे कीं, तो द्युलोकाचा माथा होय आणि पृथिवीचा मध्यभाग होय ; म्हणजे द्युलोक आणि पृथिवी हीं त्याच्या जणूं अधिकाराखालीं आहेत. यामुळें तो या दोहोंचा पति होय. तर

बृहती इव सूनवे रोदसी गिरो होता मनुष्योऽन दक्षः ।
स्वर्वते सत्यशुष्माय पूर्वीर्वैश्वानराय नृतमाय यह्वीः ॥ ४ ॥

बृहती इवेति बृहतीऽइव । सूनवे । रोदसी इति । गिरः । होता । मनुष्यः । न । दक्षः ।
स्वःऽवते । सत्यऽशुष्माय । पूर्वीः । वैश्वानराय । नृऽतमाय । यह्वीः ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. रोदसी (=द्यावापृथिव्यौ) सूनवे (=पुत्राय=पुत्रभूताय अग्नये) बृहती इव (=बृहत्याविव=प्रभूते इव) [जाते स्तः] । [अयं] होता (=पुरोवर्ती देवानामाह्वाता) स्वर्वते (=तेजोयुक्ताय) सत्यशुष्माय (=सत्यबलाय) नृतमाय (=अतिशयेन पराक्रमवते) वैश्वानराय पूर्वीः (=बहुविधा) यह्वीः (=बृहतीः) गिरः (=स्तुतीः), दक्षो मनुष्यो न (=“यथा मनुष्यो लौकिको वन्दी दातारं प्रभुं बहुविधया स्तुत्या स्तौति तद्वत् ”), [प्रयुङ्क्ते] ॥

असा जो वैश्वानर अग्निदेव, त्याला देवांनीं आर्यजनांस प्रकाश मिळावा म्हणून उत्पन्न केला आहे’ असा या मंत्राचा भावार्थ आहे.

या मंत्रांत अग्नीला देवांनीं उत्पन्न केलें असें सांगितलें आहे. परंतु इतर ठिकाणीं अग्नि हा सर्व देवांत श्रेष्ठ आणि सर्व देवांपेक्षां पुरातन होय असें सांगितलें आहे.

‘पृथिवीचा नाभि’=‘नाभिः पृथिव्याः’ याचा अर्थ ‘पृथिवीचा रक्षक’ असा सायणाचार्य करितात.

उपजातिवृत्ताला आणि या त्रिष्टुप् ऋचेला किती थोडें अंतर आहे हें पहाः—

मूर्धा दिवो नाभिरग्निः पृथिव्याः ।
अथाभवदरती रोदसीओः ।
तं त्वा देवासोजनयन्त देवं ।
वैश्वानर ज्योतिरिदारिआय ।

३. या ऋचेंत वैश्वानर अग्नीचें वैभव सांगितलें आहेः- ‘हे वैश्वानर अग्नी, पर्वतांत जीं खनिज द्रव्यें, सस्यादि धान्यें आहेत; वृक्षापासून फलपुष्पगंधादि जीं द्रव्यें प्राप्त होतात ; जलांपासून वनस्पत्यादिकांची उत्पत्ति, रसोत्पत्ति, नौकावहनापासून होणारे व्यापार उदीम, जलचर, मनुष्यमात्रांपासून आदरातिथ्य, दानमानादि होणारे लाभ, या सर्वांचा

४. द्यावापृथिवी [आपल्या] पुत्राकरितांच जणुं काय विस्तीर्ण झाल्या आहेत. चतुर मनुष्यासारिखा [हा] होता तेजःपुंज, सत्यबल, [आणि] अतिपराक्रमी [अशा] वैश्वानराप्रीत्यर्थ नाना प्रकारचीं [आणि] मोठीं स्तोत्रें [अर्पण करीत आहे].

4. Earth and Heaven have as it were become vast for their son. [This] invoker like a civil man [is offering] varied [and] loud hymns to the effulgent, truly powerful [and] most valourous Vais'vânara.

तूं स्वामी असून हीं तुजजवळ क्षणिक राहणारीं नव्हेत, तर सूर्याचे किरण जसे त्याचे सहवासी आहेत, तशीं सहचर व शाश्वत आहेत.

४. 'अग्नि इतका मोठा आहे कीं, तो सगळी पृथ्वी आणि सगळा द्युलोक यांत मावत नाहीं, आणि तो त्यांत राहावा म्हणूनच जणूं पृथ्वी आणि स्वर्ग इतके विस्तीर्ण होऊन राहिले आहेत. तो तेजःपुंज, खरा बलवान् आणि अतिशयेंकरून शौर्ययुक्त असा होय. त्याला हा आमचा होता (म्हणजे यज्ञसंपादक) कुशळ स्तोत्याप्रमाणें, नानाविध स्तोत्रें रचून मोठ्यानें म्हणून अर्पित आहे' असा या मंत्राचा भावार्थ आहे. येथें अग्नीला द्यावापृथिवींचा मुलगा म्हटला आहे, तें लक्षांत ठेवावें. ऋ. ४. १५. ६ यांत अग्नीस 'दिवः शिशुः' म्हणजे द्युलोकाचा पुत्र असें म्हटलें आहे. त्याप्रमाणेंच अश्वी देव, आदित्यगण आणि सूर्य यांसहि द्युलोकाचे पुत्र असें वेदांत नांव दिलें आहे. उषा देवीस तर द्यूची म्हणजे द्युलोकाची कन्यका असें नांव वेदांत प्रसिद्ध असल्याविषयीं पूर्वीं पुष्कळ वेळ सांगितलेंच आहे. यावरून उघड दिसून येईल कीं, विस्तीर्ण पृथिवीवर महान् द्युलोक जो हा वर पसरला आहे त्या दोघांच्या मध्यें उषेची उत्पत्ति प्रतिदिनीं प्रभातकाळीं होत असते; आणि सूर्य, सविता, वरुण (म्हणजे रात्रीचा जो भयंकर अंधकार तद्रूप देव) आणि कोणीएक दोन तारे तद्रूप जे अश्वी देव त्यांची उत्पत्ति म्हणजे उगवणें अथवा आगमन होत असतें म्हणून त्या सर्वांस द्युलोकाचीं मुलें असें वेदांत वर्णिलें आहे. अग्नि हा सूर्यरूप तेजानें व विद्युद्रूप तेजानें पृथिवी आणि द्युलोक यांच्या पोटांत जन्मतो म्हणजे आविर्भूत होतो म्हणून त्याला द्यूचा पुत्र असें म्हटलें आहे.

'चतुर मनुष्याप्रमाणें, [हा] होता' =' होता मनुष्यो न दक्षः' सायणाचार्य

दिवश्चित्ते बृहतो जातवेदो वैश्वानर प्र रिरिचे महित्वम् ।
राजा कृष्टीनामसि मानुषीणां युधा देवेभ्यो वरिवश्चकर्थ ॥ ५॥

दिवः । चित् । ते । बृहतः । जातऽवेदः । वैश्वानर । प्र । रिरिचे । महिऽत्वम् ।
राजा । कृष्टीनाम् । असि । मानुषीणाम् । युधा । देवेभ्यः । वरिवः । चकर्थ ॥ ५ ॥

भाषायाम्.

५. हे जातवेदः (=सर्वेषां जातानां वेदितर्) वैश्वानर, ते (=तव) महित्वं (=महत्त्वं=बृहत्त्वं) बृहतो (=विस्तीर्णस्य) दिवश्चिद् (=द्युलोकादपि) प्र रिरिचे (=प्रववृधे=महीयोस्ति) । [त्वं] मानुषीणां कृष्टीनां (=मनोर्जातानां प्रजानां=मनुष्यजातस्य) राजासि (=प्रभुरसि) । [त्वं] युधा (=युद्धेन) देवेभ्यः (=स्तोतृभ्यो) वरिवः (=धनं) चकर्थ (=अकार्षीः=प्रयच्छसि) ॥

त्वं स्तोतृणां हितार्थं युद्धा संग्रामे तेभ्यः शत्रुधनं जित्वा ददासीत्यर्थः ।

'वरिवः 'शब्दः सायणमनुसृत्यैवास्माभिर्व्याख्यातः । यत्तु विदुष्टरो ग्रासमान् अन्ये च केचित् मुक्ततासुखादिशब्दैर्व्याख्यानं कुर्वन्ति तच्चिन्त्यम् । युधा इन्द्रो मह्ना वरिवश्चकारेति वाक्यं प्रभृतेषु मन्त्रेषु सायणेन धनशब्देनैव व्याख्यातत्वात् । यस्माच्चैवं सर्वत्र धनशब्देनैव व्याख्यानं कृतमस्ति तस्मात्सोर्थो पुरातनव्याख्यानपरंपरामनुसृत्यैव सायणेन कृतोस्तीति मन्तव्यम् । स चार्थः सर्वेष्वपि मन्त्रेषु योग्यो भाति । एवं सति ननु केवलं धात्वर्थपरं सायणस्य व्याख्यानं न तु पुरातनव्याख्यानपरंपरागतमिति कृत्वा भूयोभूयस्तद्दूषयन्तो व्याख्यातारः स्वयमेव पुरातनव्याख्यानपरंपरागतमर्थं त्यक्त्वा केवलधात्वर्थाधिगतमर्थान्तरं कुर्वन्तीत्यवधेयम् ॥

म्हणतातः– " कोणीतरी साधारण मनुष्य "दात्याची अनेक स्तुति करितो तसा. " 'हा होता' म्हणजे मंत्रवक्ता असेल एक किंवा मंत्रकर्त्यांच्या बरोबर देवयजन करण्यांत गुंतला आहे तो असेल. कितीएक विद्वान् 'होता मनुष्यो न दक्षः' हे शब्द अग्नीकडे लावून तितक्यांचेंच एक वाक्य करून 'अग्नि हा मनुष्याप्रमाणें कुशळ होता होय' असा अर्थ करितात, आणि 'अर्पण करा' याचा अध्याहार करितात.

'[अर्पण करीत आहे.]' याबद्दल मुळांत क्रियापद नाहीं. त्यामुळें हा मंत्र बराच कठिण म्हटला पाहिजे.

५. हे सर्वज्ञा वैश्वानरा, तुझें मोठेपण मोठ्या द्युलोकापेक्षांसुद्धा मोठें आहे. [तूं] मनुष्यलोकांचा राजा होस. [तूं] युद्धाच्या योगानें स्तोत्यांकरितां द्रव्य संपादन करितोस.

5. O all-knowing Vais'vânara, thy vastness exceeds even the vast heaven. [Thou] art the king of the human races. [Thou] dost secure wealth for [thy] praisers through battle.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें उपजातिवृत्ताला बसतोः—

बृहती इव सूनवे रोदसी ।
गिरो होता मनुषिओ न दक्षः ।
सुअर्वते सत्यशुष्माय पूर्वीः ।
वैश्वानराय नृतमाय यह्वीः ।

५. अग्नि मोठा आहे असें वर सांगितलेंच आहे. त्याच विचारसरणीला अनुसरून ऋषि म्हणतो कीं, ‘ अग्नि इतका मोठा आहे कीं, तो द्युलोकापेक्षांहि मोठा होय. आणि तो केवळ मोठा आहे इतकेंच नव्हे, पण या पृथ्वीवरील सकळ मनुष्यांचा तो राजा होय आणि त्यांतून जे मनुष्य त्याची स्तुति करितात त्यांचा पक्ष धरून तो युद्धांत लढतो आणि त्यांस यश आणि शत्रूचें द्रव्य मिळवून देतो. ’

‘मोठ्या द्युलोकापेक्षांहि मोठा ’=‘दिवश्चित् प्र रिरिचे.’ द्युलोक म्हणजे पृथ्वीवर जो अतिविस्तीर्ण आकाशप्रदेश आहे, आणि ज्यांत सूर्यचंद्रादिक तारे, ग्रह आणि असंख्य नक्षत्रें आहेत आणि ज्याचा पार नाहीं तो. त्याहून अग्नि मोठा आहे असें म्हणणें म्हणजे मोठेपणाची सीमाच झाली. येथें अग्नि म्हणजे केवळ आग नव्हे, तर पृथ्वीवर जो आपण अग्नि पाहतों तो, आकाशांत जे सूर्यकिरण आहेत तद्रूप, विजा चमकतात तद्रूप, आणि नक्षत्रादिक तेजें जिकडे तिकडे प्रकाशतात तद्रूप जें महातेज तें होय. आणि त्या अग्नीचें येथें केलेलें वर्णन विशेष अतिशयोक्तियुक्त आहे असें नाहीं.

‘ युद्धाच्या योगानें द्रव्य संपादन करितोस.’ असेंच इंद्रास कितीएक मंत्रांत म्हटलें आहे. ऋ. ३. ३४. ७; ७. ९८. ३; १. ६३. ७ हे मंत्र पहा. इतरहि पुष्कळ असेच मंत्र आहेत.

हा मंत्र उपजातीप्रमाणें थोडक्याच अडचणीनें म्हणतां येतोः—

दिवश्चित्ते बृहतो जातवेदो ।
वैश्वानर प्र रिरिचे महित्वम् ।
राजा कृष्टीनामसि मानुषाणां ।
युधा देवेभ्यो वरिवश्चकर्थ ॥

प्र नू महित्वं वृषभस्य वोचं यं पूरवो वृत्रहणं सचन्ते ।
वैश्वानरो दस्युमग्निर्जघन्वाँ अधूनोत्काष्ठा अव शम्बरं भेत् ॥६॥

प्र । नु । महिऽत्वम् । वृषभस्य । वोचम् । यम् । पूरवः । वृत्रऽहनम् । सचन्ते ।
वैश्वानरः । दस्युम् । अग्निः । जघन्वान् । अधूनोत् । काष्ठाः । अव । शम्बरम् । भेत् ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. वृषभस्य (=वर्षितुं रेतः सेक्तुं समर्थस्य=वीरस्य) [वैश्वानरस्याग्नेः] महित्वं नु (=क्षिप्रं) प्रवोचं (=प्रब्रवीमि), यं वृत्रहणं (=वृत्रस्य हन्तारं) [वैश्वानरं] पूरवः (=मनुष्याः) सचन्ते (=सेवन्ते) । वैश्वानरोग्निः दस्युं (=रसानामुपक्षपयितारं शम्बरं) जघन्वान् (=हतवान्) [सन्] काष्ठाः (=अपः=मेघोदकानि) अधूनोत् (=अधोमुखा न्यपातयत्) शम्बरं [च] अव भेत् (=भित्त्वा, अवक्षिप्तवान्)॥

अत्र काष्ठशब्दः सायणमनुसृत्यैवास्माभिर्व्याख्यातः । यत्तु शार्मण्यपण्डितैरन्यथा व्याख्यानं कृतं तदाधाराकाङ्क्षयैव । उदु त्ये सूनवो गिरः काष्ठा अज्मेष्वत्नत (ऋ. १. ३७. १०) इत्यत्र, तथा अतिष्ठन्तीनामनिवेशनानां काष्ठानां मध्ये निहितं शरीरम् (ऋ. १. ३२. १०) इत्यत्र च काष्ठशब्दस्य उदकशब्देनैव व्याख्यानं कर्तुं योग्यत्वात् सायणकृत एवार्थः साधुरिति मन्तव्यम् ॥

६. त्या महाशूराचें महाभाग्य मला त्वरित गाऊं दे [कीं] ज्या वृत्रहंत्या [शूरा]ला मनुष्यें सेवितात. वैश्वानर अग्नि दस्यूला मारून उदकें वर्षविता झाला, [तो] शंबराला छेदून खालीं टाकिता झाला.

6. Let me quickly sing the greatness of [that] hero, the killer of Vṛitra, whom men adore: Agni Vais'vânara having killed the Dasyu, shook the waters; he struck down S'ambara.

---

६. 'ज्या वृत्रघातक वैश्वानराची उपासना मनुष्यें करितात त्या शूर वैश्वानराचें महाभाग्य मी आतां वर्णितों. त्याचें मुख्य महाभाग्य हें होय कीं, त्याणें वृत्र आणि शंबर हे मेघोदकें चोरणारे असुर मारून उदकें मुक्त केलीं आणि खालीं सोडून दिलीं.'

'त्या महाशूराचें'='वृषभस्य.' अक्षरशः अर्थ 'वर्षण करणाराचें.' वर्षण करणारा म्हणजे जो नपुंसक नव्हे तो, जो शूर असा वीर होय तो. सायणाचार्य पाण्याचा वर्षाव करणारा म्हणून वृषभ असें म्हणतात. यास्कहि तसेंच म्हणतात.

या मंत्रांत वैश्वानर अग्नीनें वृत्र मारून उदकवृष्टि केली असें सांगितलें आहे. हें काम इंद्र करीत असतो असें वेदांत आढळतें. या ठिकाणीं वैश्वानर करितो म्हणून सांगण्याचें कारण काय असा प्रश्न निघाल्यामुळें वैश्वानर हा कोण याचा विचार यास्कांनीं निरुक्तांत केला आहे, व सायणांनींहि केला आहे. ते म्हणतात कीं, "कितीएकांचें मत वैश्वा-
"नर म्हणजे अंतरिक्षांत वास करणारा
"असा जो वायु अथवा इंद्र; आणि
"वायु किंवा इंद्र यांजकडून वर्षण होत
"असतें यास्तव ही स्तुति योग्य होय.
"दुसरे कितीएक म्हणतात कीं, द्युलो-
"कांत राहणारा जो सूर्य तोच वैश्वानर
"अग्नि होय, व याविषयीं त्यांणीं कांहीं
"युक्तिहि सांगितली आहे. परंतु हीं
"दोनींहि मतें योग्य नाहींत. वस्तुतः
"असें आहे कीं, वैश्वानर हें अग्नीचें
"नांव असून वैश्वानर आणि अग्नि ए-
"कच होत. वैश्वानर याची शब्दव्यु-
"त्पत्ति सर्व नरांस लोकान्तरास नेणारा
"म्हणून वैश्वानर अशी आहे; अथवा
"सर्व प्राणी अग्नीला यज्ञादिकांनीं भ-
"जतात म्हणून अग्नि हा वैश्वानर होय;
"अथवा अंतरिक्ष आणि द्युलोक हे
"सर्व प्राण्यांस व्यापून राहतात म्हणून
"ते विश्वानर, आणि त्यांपासून विद्युद्रू-
"पानें अग्नीची उत्पत्ति होते म्हणून त्या-
"चें नांव वैश्वानर होय. यास्तव वै-
"श्वानर या नांवाच्या व्युत्पत्तीवरून
"पाहिलें असतां वैश्वानर म्हणजे अग्नि

वैश्वानरो महिम्ना विश्वकृष्टिर्भरद्वाजेषु यजतो विभावा ।
शातवनेये शतिनीभिरग्निः पुरुणीथे जरते सूनृतावान् ॥७॥२५॥

वैश्वानरः । महिम्ना । विश्वऽकृष्टिः । भरत्ऽवाजेषु । यजतः । विभाऽवा । शातऽवनेये । शतिनीभिः । अग्निः । पुरुऽनीथे । जरते । सूनृताऽवान् ॥ ७ ॥ २९ ॥

भाषायाम्.

७. विश्वकृष्टिः (=विश्वाः कृष्टयः सर्वेपि मनुष्याः स्वभूता यस्य सः=विश्वासां प्रजानां स्वामी) विभावा (=विशेषेण प्रकाशयिता) [एतादृशो] वैश्वानरो महिम्ना (=स्वमहत्त्वेन) भरद्वाजेषु (=एतत्संज्ञकेषु ऋषिषु=तेषां गृहेषु) यजतो (=यष्टव्यो) [भवति] । सूनृतावान् (=प्रियसत्यवाग्) अग्निः शातवनेये (=शतवनेः पुत्रे=तस्य गृहे) [तथा] पुरुणीथे (=एतत्संज्ञके=पुरुणीथस्य गृहे) शतिनीभिः (=शतसंख्याकाभिः) [स्तुतिभिः] जरते (=स्तूयते) ॥

भरद्वाजाः शातवनेयाः पुरुणीथाश्च वैश्वानरमग्निं नित्यं यजन्त इति भावः ॥

" असें म्हणणें योग्य होय. आतां अ-
" ग्नीच्या कृतीवरूनहि त्याला ही स्तुति
" शोभते. कारण कीं 'अग्नींत टाकिलेली
" आहुति आदित्याप्रत पोंहचते; आ-
" दित्यापासून वृष्टि होते; वृष्टीपासून अ-
" न्न, आणि अन्नापासून प्रजा होते'
" असें स्मृतींत सांगितलें आहे आणि
" हा सर्व विस्तर निरुक्तांत सांगितला
आहे. "

यावरून वैश्वानर म्हणजे इंद्र अथवा वायु नव्हे, तर अग्नीच होय असें यास्क आणि सायण यांचें मत आहे. आणि आम्हांसहि तसेंच वाटतें. परंतु त्या मताविषयीं जी त्यांणीं युक्ति सांगितली ती एकदम ग्रहण करवत नाहीं. आतां अग्नीला वृत्रहंता कां म्हटला यांत विशेष अडचण नाहीं. वृत्रहंता हें जरी इंद्राचें नांव आणि वृत्राला मारणें जरी इंद्राचें काम होय, तरीहि ऋग्वेदांत इतर देवांलाहि 'वृत्रहंता' असें म्हटलें आहे. अग्नीलाच ऋ. १. ७४. ३; ३. २०. ४; ६. १६. १९ इत्यादि अनेक मंत्रांत म्हटलें आहे. सोमाला ऋ. ८. ८९. ७; १. ९१. ५ यांत म्हटलें आहे. ऋ. १. १०८. ३; ७. ९३. १ इत्यादिकांत इंद्राग्नीस म्हटलें आहे. आणि वृत्राला मारून उदकवृष्टि करणें हा इंद्राचा पराक्रम अग्नीनें केला असें कोठें कोठें सांगितलेलें आढळतें. उदाहरणार्थः— ऋ. ६. ५९. ३ यांत इंद्र आणि अग्नीस वज्रधारी म्हटलें आहे. शिवाय ऋ. १. ७८. ४ पहा. ऋ. ६. १६. १४, ४८ हाहि मंत्र पहा. ऋ. ७. ५. ३ यांत वैश्वानरानें नगरें म्हणजे मेघ फोडिले असें

७. सकळ मनुष्यांचा प्रभु [आणि] विशेष तेजस्वी वैश्वानर [आपल्या] मोठेपणामुळें भरद्वाजांच्या येथें यज्ञास पात्र [झाला आहे]. प्रियसत्यवाक् अग्नि शातवनेयाच्या येथें [आणि] पुरुणीथाच्या येथें शेकडो [स्तुतीं]नीं स्तविला जातो.

7. Vais'vânara, the lord of all men, [and] possessed of great brightness receives worship by his greatness among the Bharadvâjas. In the house of S'âtavaneya [and] Puruṇîtha sweet-singing Agni is praised with hundreds of hymns.

म्हटलें आहे. ऋ. ७. ६. २ हाहि मंत्र पहा.

यावरून असें समजावयाचें कीं जशी व्यासाची महाभारत आणि पुराणादिक यांच्या कर्तृत्वाविषयीं अथवा कालिदासाची काव्यसौंदर्याविषयीं प्रख्याति झाली असल्यामुळें यःकश्चित् ग्राम्य ऋषीनें केलेलें एकादें 'सूर्पालीमाहात्म्य' अथवा 'महाबलेश्वरमाहात्म्य' व्यासानें केलें, किंवा 'ज्योतिर्विदाभरणादिक' जैनबनावट ग्रंथ कालिदासानें केले अशी प्रख्याति त्या त्या ग्रंथांचे कर्ते करूं पाहतात; तसाच वृत्रहनन करून उदकवृष्टि करणें हा मोठा पराक्रम प्रसिद्धीस आल्यावर इंद्राव्यतिरिक्त जे दुसरे देव त्यांचे भक्त त्यांची स्तोत्रें करूं लागले म्हणजे ते ते इंद्राचे पराक्रम त्यांणीं केले असें वर्णन करूं लागतात.

'शंबर' हा कोण आहे याविषयीं सू. ५१. मं. ६ याजवरील टीप पहा. येथें शंबर म्हणजे वृत्रच समजावयाचा आहे.

या मंत्राचा प्रथमार्ध तर अगदी उपजातीप्रमाणें वाचतां येतो, उत्तरार्धांत विशेष फेरफार करावयाला नकोः—

प्र नू महित्वं वृषभस्य वोचं
यं पूरवो वृत्रहणं सचन्ते ।
वैश्वानरो दस्युमॅग्निर्जघन्वान्
अधूनॉत्काष्ठा अव शम्बरं भेत् ।

---

७. या मंत्रांत वैश्वानर अग्नीची उपासना कोणकोणत्या प्रसिद्ध उपासकांच्या घरीं होत असते तें सांगितलें आहे. 'भरद्वाजकुळांत, शातवनेयाचे घरीं आणि पुरुणीथ राजाचे घरीं वैश्वानर अग्नीची उपासना होत असते.' अग्नीची प्रख्याति आणि योग्यता कशी आहे त्याजविषयीं हा मंत्र आहे.

'भरद्वाजांच्या येथें'='भरद्वाजेषु.' अक्षरशः अर्थ, 'भरद्वाजांचे ठायीं.' ह्या सप्तम्यर्थाविषयीं पूर्वीं सांगितलेंच आहे. 'भरद्वाज' हें जें ऋषिकुळ तें वे-

दांत प्रसिद्ध आहे. आणि ऋग्वेदाचें साहावें मंडळ भरद्वाजकृत आहे. शिवाय पुराणादिक ग्रंथांत तर भरद्वाज ऋषि प्रसिद्धच आहे. आणि तूर्त जे ब्राह्मण भरद्वाजगोत्राचे आहेत ते भरद्वाजकुळांतील, म्हणजे, भरद्वाजापासून परंपरेनें जन्मलेले होत असा अर्थ आहे त्यापेक्षां भरद्वाजाची प्रसिद्धि अजूनहि कमी झाली आहे असें नाहीं.

'प्रियसत्यवाक्'='सूनृतावान्.' म्हणजे 'प्रिय अथवा रमणीय आणि खरें वर्णन करणारा.' अग्नि हा होता होय आणि होत्याचें काम म्हटलें म्हणजे मनोरमणीय स्तोत्रें गाऊन देवांस यज्ञांप्रत बोलाविणें हें आहे, म्हणून हें विशेषण अग्नीला लाविलें आहे.

'शातवनेयाच्या येथें'='शातवनेये.' 'शातवनेय' हा शतवनीचा मुलगा होय. पण शतवनि हा कोण होता हें ठाऊक नाहीं. आणि 'शातवनेय' याजविषयीं झालें तरी ऋग्वेदांत दुसऱ्या ठिकाणीं नांव सुद्धा आलेलें नाहीं.

'पुरुणीथाच्या येथें.' पुरुणीथ हा तरी कोण होता याजविषयीं कांहीं ठाऊक नाहीं. मात्र सायणाचार्य पुरुणीथ हा राजा होता इतकेंच म्हणतात. हें विशेषनाम दुसऱ्या मंत्रांतहि कोठें आलेलें आढळत नाहीं.

हें वैश्वानर अग्नीविषयींचें सूक्त येथें संपलें. पुनः पुनः या सूक्ताचा विचार करून पाहतां वैश्वानर अग्नि हा कोण, याविषयीं असें वाटतें कीं, साधारण जो भूमीवर अग्नि आपण पाहतों तो ध्यावयाचा नाहीं; तर सर्व आकाश, पृथिवी, द्युलोक इत्यादिकांनीं भरलेला जो प्रचंड अवकाश म्हणजे पोकळ प्रदेश, त्यांत साधारण अग्नीच्या रूपानें म्हणा, अथवा अपार प्रकाश देणारा जो सूर्य त्या रूपानें म्हणा, अथवा मेघवृष्टीच्या प्रसंगीं भयंकर वीज पडते त्या रूपानें म्हणा, जें जें म्हणून तेज सर्वत्र पसरलें आहे तो अग्नि समजावयाचा आहे. त्याला वैश्वानर हें नांव पडण्याचें कारण आम्हांस वाटतें तें असें:– 'विश्वानर' याचा अर्थ सकळ मनुष्यांवर ज्याचा अधिकार चालतो तो. हें नांव वेदांत इंद्रास एकदोन ठिकाणीं लाविलें आहे (ऋ. १०. ५०. १ पहा); 'विश्वकृष्टि' या शब्दाचा अर्थ ('विश्व' म्हणजे सगळे आणि 'कृष्टि' म्हणजे मनुष्यें यांपासून) जसा 'सर्व मनुष्यांवर ज्याचा अधिकार चालतो तो' असा होतो (ऋ. ४. ३८. २; १०. ९२. ६; १. १६९. २ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा); आणि 'विश्वदेवः' शब्दाचा अर्थ जसा सकळ देवांवरचा स्वामी असा होतो (ऋ. ५. ८२. ७ हा मंत्र आणि त्याजवरील सायणभाष्य पहा); आणि 'विश्वायु' याचा ('विश्व' म्हणजे सगळे आणि 'आयु' म्हणजे मनुष्य यांपासून) जसा सकळ मनुष्यांचा प्रभु असा अर्थ होतो (ऋ. ४. ४२. १ हा मंत्र आणि त्याज-

वरील सायणभाष्य पहा); तसा 'विश्वानर' याचा अर्थ 'सकळ मनुष्यांचा प्रभु,' 'सार्वभौम पदवी भोगणारा' असा होतो. हें विशेषण ऋग्वेदांत इंद्रास लाविलेलें आढळतें आणि त्याचा अर्थ सायणाचार्य सुद्धा असाच करितात. त्यावरून विश्वानराचा म्हणजे इंद्राचा पुत्र म्हणून 'वैश्वानर.' इंद्रानें अग्नीस जन्म दिलें असें ऋग्वेदांत एका प्रसिद्ध सूक्तांत सांगितलें आहे (ऋ. २. १२. ३ यो अश्मनोरन्तरग्निं जजान संवृक्समत्सु स जनास इन्द्रः = हे जनहो, जो दोन दगडांच्या मध्यें म्हणजे मेघांच्या मध्यें अग्नीला जन्म देता झाला आणि जो युद्धांत नाश करणारा होय तो इंद्र आहे असें समजा). आतां विश्वानर हें इंद्राचें नांवच जर असतें तर ही आम्हीं सांगितलेली युक्ति निर्विवाद घेण्यासारिखी झाली असती असें कोणीं म्हणेल, तर तितकें आम्ही मान्य करितों. पण दुसरी कोणतीहि युक्ति सांगून वैश्वानर हें नांव कां पडलें तें सांगूं लागलों तर त्यापेक्षां ही युक्ति बरी दिसते.

सूक्तम् ६०.

गौतमो नोधा ऋषिः । अग्निर्देवता । त्रिष्टुप् छन्दः ।

वह्निं यशसं विदथस्य केतुं सुप्राव्यं दूतं सद्योअर्थम् ।
द्विजन्मानं रयिमिव प्रशस्तं रातिं भरद्भृगवे मातरिश्वा ॥ १ ॥

वह्निम् । यशसम् । विदथस्य । केतुम् । सुप्रऽअव्यम् । दूतम् । सद्यःऽअर्थम् ।
द्विऽजन्मानम् । रयिम्ऽइव । प्रऽशस्तम् । रातिम् । भरत् । भृगवे ।
मातरिश्वा ॥ १ ॥

भाषायाम्.

१. वह्निं (=हविषो वोढारं) यशसं (=यशस्विनं) विदथस्य केतुं (=यज्ञस्य प्रकाशयितारं प्रज्ञापकं) सुप्राव्यं (=सुष्ठु प्रगच्छन्तं) सद्योअर्थं (="यदा हवींषि जुह्वति तदानीमेव हविर्भिः सह देवान्प्रति गन्तारं") दूतं (=देवानां दूतं) द्विजन्मानं (=द्यावापृथिव्योर्जातम्) [एतादृशम् अग्निं] मातरिश्वा भृगवे (=एतत्संज्ञकाय महर्षये=भृगुकुलोत्पन्नेभ्यो यजमानेभ्यः) प्रशस्तं (=प्रख्यातम्=उत्तमं) रयिमिव (=धनमिव) रातिम् [इव च] (=मित्रमिव च) भरत् (=अभरत्=आहरत्=आनिनाय) ॥

को नाम मातरिश्वेति सांप्रतं सनिश्चयं न निर्णेतुं शक्यते । योग्निः स एव मातरिश्वेत्येकोर्थस्तु तं शुभ्रमग्निमवसे हवामहे वैश्वानरं मातरिश्वानमुक्थ्यम् (ऋ. ३. २६. २) इत्यादौ निर्विवाद एव । यत्तु मातरिश्वा किल भृगुभ्यः (ऋ. ३. ५. ४) दूरदेशादग्निमाजहार, तथा च विवस्वदर्थे मातरिश्वने प्रथम आविरभूदग्निरिति (ऋ. १. ३१. ३; १. १४३. २) तथैव मनुष्याणामर्थे मातरिश्वा किल प्रथमोग्निं निरमथ्नादिति (ऋ. १. ७१. ४; १. १४१. ३; १. १४८. १) दृश्यते तत्र मातरिश्वशब्देन कस्य निर्देश इति जिज्ञासा । सायणाचार्यास्तु तादृशेषु सर्वेष्वपि मन्त्रेषु मातरिश्वा नाम वायुरिति विवृण्वन्ति । युक्तिं च मातर्यन्तरिक्षे श्वसिति प्राणिति (वर्तत इति यावत्) इति मातरिश्वेति कथयन्ति । विदुष्टरः शार्मण्यभट्टाचार्यो रोथस्तु तन्नेति । मातरिश्वशब्दस्य वेदे क्वापि वायुरित्यर्थो नैव भवतीति च प्रवदति । सूचयति च मातरिश्वेति कश्चिन्मनुष्यभावभाग्देवदूतो विवस्वांश्च तादृश एव कश्चिद्भवितुमर्हति यस्मै सोग्निं दूरदेशादाजहारेति । अस्माकं मते तु मातरिश्वा वैद्युतोग्निः । द्युलोकाद्भूमौ पतन्वैद्युतोग्निर्हि भौममग्निमुत्पादयति स्वर्गाद् यद्वा दूरदेशाद् विवस्वतो (=यजमानस्य) अर्थेत्र लोक आनयतीति युज्यत एव । मातरिश्वा यदमिमीत मातरीति (३. २९. ११) मन्त्रस्य व्याख्याने सायणेन **यदान्तरिक्षे विद्योतते तदा मातरिश्वनामको भवती**ति स्थान उक्तत्वात् ॥

सूक्त ६०.

ऋषि–नोधा (पूर्वसूक्ताचा जो तोच). देवता–अग्नि. वृत्त–त्रिष्टुभ्.

१. [हवि] वाहून नेणारा, यशस्वी, यज्ञाचा ध्वज, चांगल्या रीतीनें जाणारा [आणि] लवकर जाणारा दूत [असा जो] दोघांपासून जन्मलेला [अग्नि], त्याला मातरिश्व्यानें उत्तम निधि [आणि] मित्रच जणुं [करून] भृगूकरितां आणिला.

HYMN 60.

To *Agni*. By *Nodhas* (author of the previous hymn). Metre—*Trishṭubh*.

1. Mâtaris'vâ brought [Agni] to Bhṛigu [as] an excellent treasure [and] friend, [Agni] the carrier [of the oblation], the glorious, the banner of the sacrifice, the successful [and] quick messenger, [Agni] born of the two.

---

१ भावार्थः– ' मनुष्यांनीं अर्पण केलेलें हवि देवांकडे घेऊन जाणारा, महायशस्वी, यज्ञाचा तर केवळ ध्वजच, लवकर चालणारा आणि उत्तम कार्यसिद्धि करणारा, आकाश आणि पृथिवी या दोन आईपासून जन्मलेला असा जो अग्नि, त्याला मातरिश्व्यानें उत्तम द्रव्याचा निधिच जणूं समजून आणि मित्र समजून भृगूकडेस आणिलें.'

यांत तात्पर्य असें आहे कीं अग्नीला मातरिश्व्यानें भृगूप्रत आणिलें. मातरिश्वा कोण, आणि त्याणें अग्नीला आणिलें कसें, आणि भृगु कोण, याविषयीं पूर्वीं (सूक्त ३१ मंत्र ३ आणि सूक्त ५८ मंत्र ६ यांजवरील टीपेंत) सांगितलें आहे. तरी पुनः सांगणें अवश्य दिसतें. मातरिश्व्यानें दुरून म्हणजे स्वर्गाहून अग्नीला आणिला आणि तो विवस्वताकरितां, भृगूकरितां अथवा मनुष्यांकरितां आणिला असें वेदांत पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे (ऋ. १. ९६. ४; ३. २. १३; ३. ५. १०; ६. ८. ४); दुसऱ्या कितीएक मंत्रांत अग्नि हा मनुष्यजातीकरितां प्रथम मातरिश्व्याच्या दृष्टीस पडला (ऋ. १. १४३. २; १. १२८. २; १. ३१. ३); दुसऱ्या कितीएक ऋचांत असें सांगितलें आहे कीं मनुष्याकरितां मातरिश्व्यानें प्रथम अग्नि मथून काढिला, म्हणजे घर्षण करून सिद्ध केला (ऋ. १. ७१. ४; १. १४१. ३; १. १४८. १; ३. ९. ५); आणि ऋ. १०. ४६. ९ यांत अग्नीला प्रथम मातरिश्व्यानें उत्पन्न केला, आणि तो मनुष्याकरितां केला असें सांगितलें आहे. तर

मनुष्यांवर एवढा मोठा उपकार करून अग्नीला स्वर्गाहून आणून देणारा अथवा प्रथम ज्याणें या भूलोकावर अग्नि सिद्ध केला असा जो मातरिश्वा हा कोण?

सायणाचार्य वायु असें म्हणतात, आणि 'मातरि' म्हणजे अंतरिक्षरूप अथवा द्युलोकरूप आईच्या ठायीं श्वास टाकितो म्हणजे जगतो अथवा राहतो म्हणून 'मातरिश्वा' अशी व्युत्पत्ति सांगतात. ही व्युत्पत्ति आम्हांस खरी दिसते; आणि अंतरिक्षाला अथवा द्युलोकाला वायूची आई असें जरी वेदांत म्हटलेलें नाहीं, तथापि ऋ. ७. ९०. ३. (राये नु यं जज्ञतू रोदसीमे राये देवी धिषणा धाति देवम् । अध वायुं नियुतः सश्चत स्वा उत श्वेतं वसुधितिं निरेके= ज्या वायूला या द्यावापृथिवी म्हणजे द्युलोक आणि पृथिवी धनाकरितां निर्माण करितीं झालीं इ०) या मंत्रांत द्युलोक आणि पृथिवी यांणीं त्याला जन्म दिलें असें सांगितलें आहे. तेव्हां कदाचित् वायु असा अर्थ होऊं शकेल. परंतु वायूनें अग्नि द्युलोकाहून मनुष्याकरितां भूमीवर आणिला या समजुतीचें बीज वास्तविक काय आहे तें समजत नाहीं, व त्याणें अग्नीला मंथन करून मनुष्याकरितां पृथिवीवर आणिलें याचें बीज उघड नाहीं. आतां इतकें खरें आहे कीं जेथें जेथें मातरिश्व्यानें अग्नीला प्रथम आणिलें अथवा मंथिलें अथवा उत्पन्न केलें असें सांगितलें आहे त्या सर्व स्थळीं मातरिश्वा म्हणजे वायु होय असें सायणाचार्य म्हणतात. यावरून सायणाचार्यांचा अर्थ व्याख्यानपरंपरेनें आलेला प्राचीन आहे असें समजतां येईल, आणि 'यास्कानेंहि तोच सांगितला आहे. तथापि वायु ही देवता वेदांत क्षुद्र आहे; आणि तिणें अग्नीला प्रथम मनुष्यहितासाठीं भूमीवर आणिलें हें नीट जुळत नाहीं. यास्तव कितीएक विद्वान् मातरिश्वा म्हणजे कोणीएक देव आहे, पण तो वायुमात्र नव्हे, असें म्हणतात. पण तो कोण देव आणि त्याला मातरिश्वा कां म्हणतात, याचा निर्णय ते करीत नाहींत. तर मातरिश्वा म्हणजे खरोखर कोण आणि त्याला तें नांव कां पडलें ?

या गोष्टीचा निर्णय करण्यापूर्वी वेदांत जेथें जेथें मातरिश्वा हें नांव आलें असेल असे सर्व मंत्र पाहिले पाहिजेत. वर जे मंत्र सांगितले त्यांशिवाय दुसऱ्या बऱ्याच मंत्रांत मातरिश्वा हें नांव आलेलें आहे. ऋ. १. ९६. ४ यांत अग्नीलाच मातरिश्वा असें म्हटलें आहे. ऋ. १०. ८८. १९ यांत 'हे मातरिश्वः'= 'हे मातरिश्व्या' असें संबोधन अग्नीलाच केलें आहे. ऋ. ३. ५. ९ यांत अग्नीला मातरिश्वा हें नांव दिलें आहे. ऋ. १०. ८५. ४७ यांत मातरिश्वा आमचीं मनें ज्ञानयुक्त करो अशी प्रार्थना आहे, तेथें अग्नि हा अर्थ करणें उचित दिसतें. (याच संबंधानें ऋ. १०. १०९. ९पहा). ऋ. ३.२६.२ "तं शुभ्रम् अग्निम् अवसे हवामहे वैश्वानरं मातरिश्वानम् उक्थ्य-

म्''='तो तेजःपुंज आणि वैश्वानररूप आणि मातरिश्वरूप जो स्तुत्य अग्नि त्याला आम्हीं संरक्षणार्थ बोलावितों.' यांत अग्नीला जसें वैश्वानर असें म्हटलें आहे तसेंच मातरिश्वा म्हटलें आहे. "एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति अग्निं यमं मातरिश्वानमाहुः"= 'एकच अविनाशी जी वस्तु तिला विद्वान् अग्नि, यम, मातरिश्वा अशीं भिन्न भिन्न नांवें देतात.' ऋ. १. १६४. ४६ यांतहि मातरिश्वा ही अग्नीचीच विभूति आहे असें सांगितलें आहे. याशिवायहि दुसरे दोन तीन मंत्र (१०. १४४. १; ९. ६७. ३१) आहेत त्यांत झाला तरी मातरिश्वा या शब्दाचा अर्थ अग्नि असा जुळतो.

आतां अग्नीला मातरिश्वा कां आणि केव्हां म्हणतात याविषयीं ऋग्वेदांतच एका मंत्रांत सांगितलें आहे. तो मंत्र ३. २९. ११ हा होय. त्यांत अग्नीला 'तनूनपात्' कां म्हणतात, 'नराशंस' कां म्हणतात, आणि 'मातरिश्वा' कां म्हणतात तें सांगितलें आहे. त्याच्या संबंधानें सायणाचार्य म्हणतात कीं, अंतरिक्षांत जेव्हां प्रकाशतो तेव्हां त्याला 'मातरिश्वा' म्हणावें ("यदान्तरिक्षे विद्योतते तदा मातरिश्वनामको भवति.") यावरून स्पष्ट होतें कीं मातरिश्वा म्हणजे अंतरिक्षांत प्रकाशणारा म्हणजे विद्युद्रूप जो अग्नि तो, म्हणजे वीजच. ह्यावरून सर्व गोष्टींचें निराकरण होतें असें आम्हांस वाटतें. कारण पृथ्वीवर जो अग्नि आहे तो आकाशांतून पडणाऱ्या वीजेपासून उत्पन्न झालेला आहे अशी कल्पना करणें हें अगदी साहजिक आहे. आणि या वैद्युत मातरिश्व्यानें अग्नीला घर्षण करून प्रथम मानवांसाठीं उत्पन्न केलें म्हणणें हेंहि बसतें, कारण कीं वीज पडते तेव्हां दोन मोठे दगड घेऊन घर्षणाकरितां एकमेकावर आदळून आग पाडल्यासारिखें दिसतें. तसेंच मातरिश्व्यानें दूर प्रदेशाहून अथवा द्युलोकाहून अग्नीला पृथ्वीवर आणिलें हेंहि जुळतें; कारण वीज जमिनीवर पडते ती दूरप्रदेशाहून अथवा द्युलोकाहूनच पडते. आणि मातरिश्वा हेंहि नांव त्याला शोभतें, कारण कीं द्युलोकरूप अथवा अंतरिक्षरूप मातेच्या उदरांतच हा वैद्युत अग्नि राहत असतो. अग्नि द्युलोकापासून अथवा अंतरिक्षापासून उत्पन्न झाल्याविषयीं तर वेदांत प्रसिद्धच आहे. (ऋ. १०. ५. ७; १०. ४५. ८; ३. २. २; ३. २५. १ इत्यादि).

आणि याच संबंधानें 'विवस्वान्,' 'भृगु' आणि 'मनु' म्हणजे कोण यांचाहि विचार करणें अवश्य दिसतें. कारण कीं मातरिश्व्यानें यांजकरितां प्रथम अग्नीस दूर देशाहून आणिलें असें सांगितलें आहे. विवस्वान् म्हणजे 'उपासक,' 'यजमान' किंवा देवभक्त असा अर्थ वेदांत होतोच. तोच येथें घ्यावा. आणि भृगु म्हणजे अतिपुरातन देवभक्तांचें एक कुळ. आणि 'मनु' म्हणजे

अस्य शासुरुभयासः सचन्ते हविष्मन्त उशिजो ये च मर्ताः ।
दिवश्चित्पूर्वो न्यसादि होतापृच्छ्यो विश्पतिर्विक्षु वेधाः ॥ २ ॥

अस्य । शासुः । उभयासः । सचन्ते । हविष्मन्तः । उशिजः । ये । च । मर्ताः ।

दिवः । चित् । पूर्वः । नि । असादि । होता । आऽपृच्छ्यः । विश्पतिः । विक्षु । वेधाः ॥ २ ॥

भाषायाम्.

२. अस्य [अग्नेः] शासुः (=शासनम्) उभयासः (=उभयेपि) सचन्ते (=सेवन्ते) हविष्मन्तो (=हविर्गृह्णन्तः) उशिजः (=हविः कामयमाना) [अमर्त्या] ये च मर्ता (=मनुष्याः) [सन्ति] [ते उभयेपि सचन्ते] । [स] दिवश्चित् (=सूर्योदयादपि) पूर्वो होता (=देवानामाह्वाता) [भूत्वा] न्यसादि (=स्थापितो गृहीतासनो भवति), आपृच्छ्यः (=पूज्यो) वेधाः (=अभिमतफलस्य दाता) विश्पतिः (=राजा) [अग्निः] विक्षु (=प्रजासु) [न्यसादि=गृहीतासनो भवति] ॥

मनुष्य हा तर अर्थ प्रसिद्धच आहे. यास्तव विवस्वान् म्हणजे कोणीएक विशेष व्यक्ति मानण्याचें कांहीं कारण नाहीं असें आम्हांस दिसतें. ऋ. १. ३१. ३ यावर जें लिहिलें आहे त्याचा पुनः विचार केल्यावरून जें दिसलें तें आम्हीं येथें सांगितलें आहे.

'यज्ञाचा ध्वज '=' विदथस्य केतुम्.' म्हणजे, जेथें जेथें यज्ञ होतो तेथें तेथें असणारा. अग्नीशिवाय यज्ञ होणें नाहीं असें असल्यामुळें हें विशेषण दिलें आहे.

'दोघांपासून जन्मलेला '=' द्विजन्मानम्.' अग्नि हा द्यावापृथिवींपासून जन्मलेला आहे असें, पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे. (ऋ. ३. २. २; ३. २५. १; १०. १. २; १०. २. ७; १०. १४०. २ हे मंत्र पहा). पृथिवी आणि आकाश यांमध्यें विजेच्या रूपानें अग्नि उत्पन्न होतो म्हणून त्याला द्यावापृथिवींचा पुत्र असें म्हटलें आहे.

'उत्तम निधि [आणि] मित्रच जणुं करून भृगूकरितां आणिला '=' रयिमिव प्रशस्तं रातिं भरद्भृगवे मातरिश्वा.' म्हणजे अग्नीला आणून जो स्थापिला, तो केवळ द्रव्याचा निधीच जणुं होय आणि मूर्तिमंत हितकारी मित्र होय असा भावार्थ. यांत अग्नीविषयीं आपल्या आर्य पूर्वजांची प्रीति दिसून येते.

हा मंत्र वृत्तासाठीं खालीं लिहिल्याप्रमाणें वाचला पाहिजे असें समजावें:—

वह्निं यशसं विदथस्य केतुं
सुप्राव्यं दूतं सद्योअर्थम् ।
द्विजन्मानं रयिमिव प्रशस्तं
रातिं भरद्भृगवे मातरिश्वा ।

२. याची आज्ञा उभय[जन] पाळितात; हवि घेणारे उत्सुक [देव] आणि जे मर्त्य [यजमान] ते. [तो] सूर्योदयापूर्वींच होत्याच्या ठायीं स्थानापन्न झाला आहे. पूज्य [आणि] बुद्धिमान् राजा [अग्नि] प्रजांमध्यें [स्थानापन्न झाला आहे].

2. His mandate both obey, the earnest [gods] that receive the oblation and [those] that [are] mortals. Even before the rise of the sun [he] is established [as] an invoker, [established as] an honoured [and] wise king among [his] subjects.

---

२. 'अग्नि हा इतका मोठा आहे कीं, देव आणि मनुष्य असे उभयतां त्याची आज्ञा पाळितात. असा जो अग्नि, तो सूर्योदयापूर्वींच होत्याचे आसनावर बसतो, बुद्धिमान् आणि पूज्य राजा अग्नि आपल्या प्रजांचे मध्यें म्हणजे आम्ही जे यजमान आणि स्तोते त्यांजमध्यें स्थानापन्न होत असतो; म्हणजे सूर्योदयापूर्वींच आम्ही त्याला पेटवून त्याची सेवा करितों आणि तो आम्हांसाठीं देवांचें आह्वान करीत असतो.'

'हवि घेणारे उत्सुक [देव]'= 'हविष्मन्तः उशिजः.' ह्या शब्दांचा अर्थ 'हवि देणारे जे उत्सुक स्तोते ते' असाहि होऊं शकेल.

'प्रजांमध्यें' = 'विक्षु.' 'विश्'शब्दाविषयीं सू. ४४ मं. ७ याजवर दिलेली टीप पहा. प्रस्तुतच्या मंत्रावरून सुद्धा 'विश्'शब्दाचा मूळचा प्रजा हा जो खरा अर्थ तो स्पष्ट दिसून येतो.

'याची आज्ञा'='अस्य शासुः.' ऋ. १. ७३. १ हा मंत्र आणि त्याजवरील भाष्य पहा.

वृत्तसुखासाठीं खालीं दाखविल्याप्रमाणें मंत्र म्हटला पाहिजेः—

अस्ये शॉसुरुभयॉसः सचन्ते
हविष्मॅन्तः उशिजों ये च मर्ताः ।
दिवश्चित्पूर्वो निअसादि होता
आपृच्छिओ विश्पतिर्विक्षु वेधाः ।

तं नव्यसी हृद आ जायमानमस्मत्सुकीर्तिर्मधुजिह्वमश्याः ।
यमृत्विजो वृजने मानुषासः प्रयस्वन्त आयवो जीजनन्त ॥३॥

तम् । नव्यसी । हृदः । आ । जायमानम् । अस्मत् । सुऽकीर्तिः । मधुऽजिह्वम् । अश्याः ।
यम् । ऋत्विजः । वृजने । मानुषासः । प्रयस्वन्तः । आयवः । जीजनन्त ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. वृजने (=संग्रामे=संग्रामप्रसङ्गे) यम् [अग्निम्] ऋत्विजः (=यजनं कुर्वन्तः) प्रयस्वन्तः (=हविरन्नयुक्ताः=गृहीतहविष्का) मानुषासः (=मानुषाः=मनुष्या) आयवो (=यजमाना) जीजनन्त (=अजीजनन्त=जनयन्ति) तं मधुजिह्वं (=मधुरवाचम्) (=अग्निं) नव्यसी (=नवीयसी=अतिशयेन नूतना) हृद आ जायमानम् (=हृदयादेव उत्पद्यमाना) अस्मद् (=अस्माकं) सुकीर्तिः (=शोभना स्तुतिः) अश्याः (=आभिमुख्येन प्राप्नोतु=गच्छतु) ॥

सति युद्धप्रसङ्गे यं मेधाविनमग्निं मनुष्याः संरक्षणाय आहूय हविषा यजन्ते स्तुवन्ति च तमग्निम् एषाऽस्माकम् अतिशयेन नूतना सूक्तरूपा अन्तःकरणाज्जायमाना स्तुतिः प्राप्नोत्वित्यर्थः ॥

'जायमानम्' इति पदं व्यत्ययेन नपुंसकम् । हृदयान्मन्त्रस्य स्तुतेर्वा जायमानत्वं हि इमं स्वस्मै हृद आ सुतष्टं मन्त्रं वोचेम कुविदस्य वेदत् (ऋ. १. ३५. २) इत्यादिष्वनेकेषु स्थलेषु यथा प्रसिद्धं तथा हृदयादग्नेर्जायमानत्वं न प्रसिद्धम् ।

'वृजन'शब्दोत्र सायणानुसारेणैवास्माभिर्व्याख्यातः । सा च व्याख्या मन्त्रान्तरेष्वपि तैः स एवार्थो यस्मात्कृतोस्ति तस्माद्व्याख्यातृपरंपरागतेति ज्ञेयम् । युज्यतेपि च तेषु तेषु मन्त्रेषु ॥

३. युद्धप्रसंग आला म्हणजे ज्याला मनुष्यलोक हविरन्न देऊन यजन करून उत्पन्न करीत असतात, त्या मधुजिह्व [अग्नी]प्रत हें आमचें अंतःकरणापासून उत्पन्न होणारें अगदी नूतन सुस्तोत्र पावो.

3. May this our good praise, born of the heart [and] wholly new, reach that [Agni] of the sweet tongue, whom at the approach of battle human worshippers produce and honour with oblations.

३. भावार्थः—'युद्धप्रसंग आला म्हणजे मनुष्यें अग्नीला समिधांनीं जन्म देतात (म्ह० पेटवितात), आणि त्याला हवि इत्यादि देऊन त्याची सेवा करितात; तर असा जो अग्नि, त्याप्रत हें आमचें अगदी नवें आणि अंतःकरणापासून रचिलेलें सूक्त प्रविष्ट होओ.'

'अगदी नूतन स्तोत्र'='नव्यसी सुकीर्तिः' म्हणजे आतांचे आतांच रचिलेलें, पूर्वीं कोणी तरी दुसऱ्या ऋषीनें केलेलें नव्हे. प्राचीन आपले पूर्वज नित्य जुनीं सूक्तें म्हणून देवांची सेवा करीत नसत, तर केव्हां केव्हां नवीं रचूनहि म्हणत असत त्याचें हें एक चांगलें उदाहरण होय. आणि याच सूक्तावरून असाहि प्रश्न निघतो कीं, वेदाचीं सूक्तें अनादिकाळापासून आलेलीं आहेत, तर यांत ऋषि आपल्या सूक्तास अगदी नूतन म्हणतो याचा अर्थ काय ?

'युद्धप्रसंग आला म्हणजे'='वृजने.' अक्षरशः अर्थ 'युद्धांत' हा अर्थ सायणानुसारच केला आहे, आणि कितीएक पाश्चिमात्य विद्वान्—उदाहरणार्थ, डाक्टर ग्रास्मान् वगैरे— जो 'यज्ञशाळेंत' असा अर्थ करितात तो निराधार आहे असें आम्हांस वाटतें. युद्धप्रसंगीं आराध्य देवतेचा धांवा करणें ही चाल सर्व देशांत आणि सर्व युगांत प्रसिद्ध आहे. शिवाजी छत्रपति महाराज अफ्झुलखानावर गेला तेव्हां भवानीची उपासना करून गेला होता असें इतिहासप्रसिद्ध आहेच. शिवाय रावणादिक जे वेदोत्तरकालिक योद्धे तेहि शत्रूवर चाल करून जाण्यापूर्वीं अग्नीला वगैरे हवि देऊन भजत असत असें रामविजय वाचणाऱ्यांस ठाऊक आहेच.

'मधुजिह्व' म्हणजे गोड आहे जिह्वा ज्याची तो, अथवा मधुर हवि ज्याच्या जीभेवर घालतात तो, किंवा ज्याला मधुरवचनें म्हणजे मधुर अशीं स्तोत्रें गातां येतात तो. अग्नि हा होता आहे असें वर्णन येतें त्यापेक्षां त्याला मधुरवचन हें विशेषण चांगलें शोभतें.

'अंतःकरणापासून उत्पन्न होणारें'='हृदः आ जायमानम्.' या शब्दाविषयीं थोडी अडचण आहे. अक्षरशः अर्थ हृदयापासून उत्पन्न होणारा जो [अग्नि] त्याजप्रत, असें अग्नीचें विशे-

उशिक्पावको वसुर्मानुषेषु वरेण्यो होताधायि विक्षु ।
दमूना गृहपतिर्दम आँ अग्निर्भुवद्रयिपती रयीणाम् ॥ ४ ॥

उशिक् । पावकः । वसुः । मानुषेषु । वरेण्यः । होता । अधायि । विक्षु ।
दमूनाः । गृहऽपतिः । दमे । आ । अग्निः । भुवत् । रयिऽपतिः । रयीणाम् ॥ ४ ॥

तं त्वा वयं पतिमग्ने रयीणां प्र शंसामो मतिभिर्गोतमासः ।
आशुं न वाजंभरं मर्जयन्तः प्रातर्मक्षू धियावसुर्जगम्यात् ॥ ५ ॥ २६

तम् । त्वा । वयम् । पतिम् । अग्ने । रयीणाम् । प्र । शंसामः । मतिऽभिः । गोतमासः ।
आशुम् । न । वाजम्ऽभरम् । मर्जयन्तः । प्रातः । मक्षु । धियाऽवसुः । जगम्यात् ॥ ५ ॥ २६ ॥

भाषायाम्.

४. उशिक् (=कामयमानो) वसुः (=साधुः) [एतादृशः] पावकः (=शोधकोऽग्निः) मानुषेषु विक्षु (=मानुषरूपासु विक्षु=मानुषीषु प्रजासु) वरेण्यो (=वरणीयः=श्रेष्ठो) होता (=देवानामाह्वाता=होतृत्वे) अधायि (=स्थापितोऽस्ति) । रयीणां रयिपतिः (=धनानां पतिः=पतिः) [एतादृशः] अग्निः दमे आ (=गृहे) दमूनाः (=गृहमनाः=गृहप्रियो) गृहपतिः (=गृहस्य पतिः) भुवत् (=अभवत्) ॥

उपासकानां गृहेषु अग्निः खलु होतृकर्म कुर्वन् गृहपतिरिव भातीति भावः ॥
आ इति सप्तमीद्योतकः ॥

५. तं (=तादृशं) रयीणां पतिं (=धनानां पतिं) त्वा (=त्वां) हे अग्ने, वाजंभरं (=वाजस्य हविर्लक्षणस्यान्नस्य वोढारम्) आशुं न (=अश्वमिव), मर्जयन्तः (=मार्जयन्तो) वयं गोतमासः (=गोतमगोत्रोत्पन्नाः पुरुषा) मतिभिः (=स्तुतिभिः) प्र शंसामः (=प्रकर्षेण स्तुमः) । –धियावसुः (=धीमान्=प्रज्ञायुक्तः) [अग्निः] प्रातः (=प्रातःकाले) मक्षु (=सत्वरं) जगम्यात् (=दिने दिन आगच्छतु) ॥

षण आहे. परंतु अग्नि अंतःकरणापासून अथवा हृदयापासून उत्पन्न होतो असें कोठें प्रसिद्ध नाहीं, आणि स्तुति, मंत्र, सूक्त अथवा प्रार्थना हृदयापासून निघालेली आहे असें वर्णन वेदांत पुष्कळ ठिकाणीं येतें. उदाहरणार्थ ऋ. १. १७१. २; २. ३५. २; ३. ३९. १ इत्यादि पहा. तर 'जायमाना' असा पाठ अर्थलाभासाठीं घ्यावा असें आम्हांस वाटतें.

४. मायाळु [आणि] दयाळु जो पावक त्याला श्रेष्ठ होता [करून] मनुष्यलोकीं स्थापिलें आहे. सकल धनांचा स्वामी [जो] अग्नि [तो] घरांत घराचा प्रिय स्वामी झाला आहे.

५. यास्तव हे अग्नी, संपत्तींचा स्वामी जो तूं त्या तुला आम्ही गोतम [आपल्या] स्तोत्रांनीं स्तवितों, आणि अन्न वाहून नेणाऱ्या घोड्याप्रमाणें तुला [आम्ही] रगडतों.– बुद्धिमान् अग्नि प्रतिदिनीं सकाळीं येत जाओ.

4. The loving [and] kind Pâvaka is ordained [as] the best invoker among human beings. Lord of riches, Agni has become in the house the loving Lord of the house.

5. Therefore, with [our] hymns, we the sons of Gotama praise thee, O Agni, who art the Lord of riches, and rub thee like a horse that carries food.—May wise Agni come daily early in the morning.

---

४. भावार्थः–'प्रीति करणारा आणि दयाळु असा जो अग्नि, तो उत्तम होता समजून मनुष्यलोकीं त्याची होत्याच्या कामीं स्थापना झालेली आहे. सकल संपत्तींचा स्वामी असा जो अग्नि, तो प्रत्येक यजमानाच्या घरीं होत्याचें काम करितो आणि प्रिय गृहपतीसारिखाच शोभत असतो.' अग्नि हा उत्तम होता म्हणजे देवांस यज्ञाप्रत बोलावून आणण्याविषयीं अतिकुशल अशी प्रख्याति वेदांत सर्वत्र आहे.

'पावक' हें अग्नीचें नांव आहे. त्याचा अक्षरशः अर्थ शुद्ध अथवा पवित्र करणारा असा आहे. या अर्थी तें इतर देवांसहि वेदांत लाविलेलें आढळतें.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्तास लागतोः—

उशिक्पाॅवॅको वसुॅर्मानुषेषु
वरेणिओ होतॉ अधायि विक्षु ।
दमूनआ गृहपतिर्दमे आ
अग्निर्भुवद्रयिपती रयीणाम् ।

५. 'वर अग्नीचे गुण आणि माहात्म्य सांगितलें. तर असा जो अग्नि, जो संपत्तींचा स्वामी, त्याला आम्ही गोतमकुळांतील मनुष्य आमच्या स्तोत्रांच्या योगानें स्तवितों, आणि एकादा धान्य वाहून नेणारा घोडा असतो आणि त्याला जसा रगडतात तसा आम्ही याला रगडतों. तर हा अग्नि प्रतिदिनीं प्रातःकाळीं प्रगट होओ आणि आम्हीं दिलेलें हवि ग्रहण करीत जाओ.'

हा या सूक्ताचा उपसंहार आहे. आणि यांत ऋषि म्हणतो कीं आम्ही

सूक्तम् ६१.

गौतमो नोधा ऋषिः । इन्द्रो देवता । त्रिष्टुप् छन्दः ।

अस्मा इदु प्र तवसे तुराय प्रयो न हर्मि स्तोमं माहिनाय ।
ऋचीषमायाध्रिगव ओहमिन्द्राय ब्रह्माणि राततमा ॥ १ ॥

अस्मै । इत् । ऊम् इति । प्र । तवसे । तुराय । प्रयः । न । हर्मि ।
स्तोमम् । माहिनाय ।
ऋचीषमाय । अध्रिऽगवे । ओहम् । इन्द्राय । ब्रह्माणि । रातऽतमा ॥ १ ॥

भाषायाम्.

१. [अहं] तवसे (=प्रवृद्धाय) तुराय (=त्वरमाणाय) माहिनाय (=महते) अस्मै [इन्द्राय] इत् उ (=अस्मै प्रसिद्धाय इन्द्रायैव) प्रयो न (=अन्नमिव) [इमं] स्तोमं प्र हर्मि (=प्रहरामि=प्रभरामि=अर्पयामि) । ऋचीषमाय (=ऋचा समाय=यादृशी स्तुतिः क्रियते तत्समाय) अध्रिगवे (=अप्रतिहतं यथा तथा गच्छते= अप्रतिहतगमनाय) इन्द्राय ओहं (= ? वहनीयं=प्रशस्तं) [स्तोमं] [तथा] राततमा (=राततमानि=पूर्वैर्यजमानैर्यानि दत्तानि तेषूत्तमानि) ब्रह्माणि (=हविरन्नानि) [प्र हर्मि=अर्पयामि] ॥

इन्द्रमेव स्तुत्या हविषा च परिचरामीत्यर्थः ।

'ऋचीषम'शब्दोऽनुसायणमेवात्र व्याख्यातः । यत्र यत्र हि मन्त्रेष्वयं शब्दः प्रयुक्तो दृश्यते तत्र तत्र सायणा इममेवार्थं कुर्वन्ति । अतश्च सोऽर्थो व्याख्यानपरंपरयागतस्तैः पूर्वव्याख्यातृभ्य उपलब्ध इति मन्तव्यम् । निर्वचनदृष्ट्यापि स सर्वत्र युज्यत इति भाति । एवं सति यच्छार्मण्यपण्डिता अन्यथा व्याचक्षते तच्चिन्त्यमिति द्रष्टव्यम् ।

ओहमिति पदमीषद्दुर्बोधमनुसायणमेव व्याख्यातमस्माभिः । व्याख्यात्रन्तरैः सूचितार्थस्याधारसापेक्षत्वात् ॥

गौतमकुलोत्पन्न मनुष्य अग्नीला स्तोत्रांनीं भजतो. या सूक्ताचा कर्ता जो नोधा ऋषि तो गौतमकुळांत जन्मलेला आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. आणि वस्तुतः सूक्तकर्ता जरी एकटाच नोधा आहे, तरी नोधा हा एकटाच अग्नीच्या भजनांत गुंतला होता असें नाहीं. त्याच्याजवळ त्याच्या कुटुंबाचीं जीं माणसें आहेत त्यांस अनुलक्षून तो 'आम्ही गौतमकुलोत्पन्न' असें म्हणतो हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

'बुद्धिमान् अग्नि इ०.' सूक्त ५८, मं. २ पहा.

सूक्त ६१.

ऋषि—नोधा (पूर्व सूक्ताचा जो तोच). देवता—इन्द्र. वृत्त—त्रिष्टुभ्.

१. बलाढ्य, त्वरायुक्त [आणि] मोठा [जो] हा [इंद्र] त्यालाच [मी] अन्न [अर्पण केल्या]प्रमाणें [हें] स्तोत्र अर्पण करितों. स्तुतियोग्य [आणि] अप्रतिहत इंद्राला उत्तम [स्तोत्र] [आणि] सर्वोत्कृष्ट हविरन्नें [अर्पण करितों].

Hymn 61.

To *Indra.* By *Nodhas* (author of the previous hymn). Metre-*Trishṭubh.*

1. To Him, to Him alone who is mighty, impetuous [and] great, I offer [this] praise like food,—to Indra, who is equal to the praise, who is irresistible, [I offer] excellent [praise] [and] oblations the best [ever] given.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावाः—

तं त्वा वयं पतिमॅग्ने रयीणां

प्रशंसॉमो मतिभिर्गोतमासः ।
आशुं न वाजंभरं मर्जयन्तः
प्रातर्मक्षू धियॉवसुर्जगम्यात् ॥

---

१. हेंहि सूक्त नोधा ऋषीचेंच आहे. याची देवता इंद्र आहे. ऋषि म्हणतो, ' बलाढ्य, पराक्रमी, आणि मोठा आणि स्तोते जी स्तुति करितात त्यासारिखाच खरोखर असलेला, आणि ज्याच्या शक्तीविरुद्ध अथवा मनाविरुद्ध कोणीहि आड जाऊं शकत नाहींत असा जो इन्द्र, त्यालाच मी हें आतां केलेलें स्तोत्र आणि हीं हविरन्नें अर्पण करितों, दुसऱ्या देवाला अर्पण करीत नाहीं.' असा भावार्थ आहे. दुसऱ्या देवास भजत नाहीं, दुसऱ्या देवाचें इतकें महत्त्व नाहीं, इंद्रच मोठा, इंद्रच स्तवनीय, इंद्रच पराक्रमी अशा भावार्थानें ऋषि बोलतो आहे. या सर्व सूक्तभर ' इंद्रालाच ' असें म्हटलें आहे तें ध्यानांत ठेवावें.

'अन्न अर्पण केल्याप्रमाणें'='प्रयो न.' म्हणजे, भुकेलेल्या मनुष्याला जसें अन्न अर्पण करावें त्याप्रमाणें. हा भावार्थ सायणाप्रमाणें आहे.

' स्तुतियोग्य '=' ऋचीषमाय. ' म्हणजे अक्षरशः अर्थ, ' स्तुतीसारिखा ' असा आहे. जी स्तुति केली जाते तिच्या सारिखाच. स्तुति मोठी आणि तो तिजपेक्षां लहान अथवा कमी योग्यतेचा असें नव्हे.

' सर्वोत्कृष्ट '=' राततमानि. ' 'रात ' म्हणजे ' दिलेलें, ' त्यापासून अतिशयदर्शक ' तम ' प्रत्यय झाला आहे. ' अतिशयेंकरून दिलेलीं,' ' पूर्वीच्या उपासकांनीं अतिशयेंकरून अर्पण केलेलीं ' असा अक्षरशः अर्थ होतो. पण जसें स्तोत्र नवीन असलें म्हणजे देवांस प्रिय होतें तसें उत्तम अन्न असलें म्हणजे

अस्मा इदु प्रयं इव प्र यंसि भराम्याङ्गूषं बाधे सुवृक्ति ।

इन्द्राय हृदा मनसा मनीषा प्रत्नाय पत्ये धियो मर्जयन्त ॥ २ ॥

अस्मै । इत् । ऊम् इति । प्रयःऽइव । प्र । यंसि । भरामि । आङ्गूषम् ।
बाधे । सुऽवृक्ति ।

इन्द्राय । हृदा । मनसा । मनीषा । प्रत्नाय । पत्ये । धियः । मर्जयन्त ॥२॥

अस्मा इदु त्यमुपमं स्वर्षां भराम्याङ्गूषमास्येन ।

मंहिष्ठमच्छोक्तिभिर्मतीनां सुवृक्तिभिः सूरिं वावृधध्यै ॥ ३ ॥

अस्मै । इत् । ऊम् इति । त्यम् । उपऽमम् । स्वःऽसाम् । भरामि ।
आङ्गूषम् । आस्येन ।

मंहिष्ठम् । अच्छोक्तिऽभिः । मतीनाम् । सुवृक्तिऽभिः । सूरिम् । ववृ-
धध्यै ॥ ३ ॥

भाषायाम्.

२. अस्मा इदु (=अस्मा इन्द्रायैव) [न त्वन्यस्मै देवाय] प्रय इव (=अन्न-मिव) [स्तोत्रं] प्र यंसि (=प्रयच्छामि=प्रार्पयामि), [अस्मा एव] सुवृक्ति (=सु-संस्कृतम्) आङ्गूषं (=स्तोत्ररूपमाघोषं) बाधे (=शत्रूणां बाधनाय) भरामि (=प्रभ-रामि=प्रार्पयामि) । [अन्येपि] हृदा (=हृदयेन=अन्तःकरणेन) मनसा (=बुद्ध्या) मनीषा (=मनीषया =ज्ञानेन) प्रत्नायेन्द्राय पत्ये (=पुरातनाय स्वामिन इन्द्रायैव) धियः (=स्तुतीः) मर्जयन्त (=मार्जयन्ति=संस्कुर्वन्ति) ॥

इन्द्र एव श्रेष्ठः स्तोत्रार्हो हविरर्हश्च । तस्य पुरातनस्वामिभूतत्वात् ॥ अतः कार-णादहं तमेव स्तोत्रादिना भजे, अन्येपि तमेव भजन्ते नान्यं देवम् इति भावः ॥

३. अस्मा इदु (=अस्मा इन्द्रायैव) त्यं (=तं=प्रसिद्धम्) उपमम् (=उत्कृष्टं) स्वर्षां (=स्वर्गस्य दातारम्) आङ्गूषम् (=आघोषयुक्तं स्तोत्रम्), मंहिष्ठम् (=अति-शयेन दानशीलं) सूरिं (=विद्वांसम्) [इन्द्रं] मतीनां (=स्तुतीनां) सुवृक्तिभिः (=सुसंस्कृताभिः) अच्छोक्तिभिः (=आभिमुख्येन कृतैर्वचनैः) वावृधध्यै (=वर्ध-यितुम्), आस्येन (=मद्वदनेन) भरामि (=प्रभरामि=रचयित्वार्पयामि) ॥

उत्कृष्टतमं तथा स्वर्गदायकं स्तोत्रमिन्द्रायैव करोमि परमोदारं च विद्वांसमिन्द्रं प्र-त्येव स्तुतिवचनानि गात्वा तस्य कीर्तिं प्रवर्धयामि नान्यस्य देवस्येति भावः ॥

२. ह्या [इंद्रा]लाच [मी] अन्नाप्रमाणें [स्तोत्र] अर्पण करितों, [यालाच] [मी] [शत्रु]बाधक मधुर स्तोत्र अर्पण करितों. [दुसरे लोकहि] पुरातन प्रभु [जो] इंद्र [त्याच्याच] प्रीत्यर्थ अंतःकरणपूर्वक, मनःपूर्वक [आणि] आस्थापूर्वक स्तोत्रें रचीत असतात.

३. उत्कृष्ट [जें] स्वर्गदायक स्तोत्र [तें] [मी माझ्या] तोंडानें या [इंद्रा]प्रीत्यर्थच अर्पण करितों. परम उदार [आणि] बुद्धिमान् [इंद्रा]ची[च] कीर्ति मी भक्तिपूर्वक सुंदर स्तोत्रांनीं वाढवितों.

2. To Him alone I offer [a prayer] like an oblation, [to Him] I offer a well-fashioned loud prayer for the driving off [of the enemy]; to Indra, the ancient Lord, [they] prepare prayers with the heart, with the mind [and] with the thought.

3. To Him alone I offer with [my] mouth that most excellent heaven-giving prayer [which I can make]; I glorify the liberalest wise [Indra alone] with well-fashioned hymns of devotions.

देवांस प्रिय होतें, आणि आजपर्यंत जें उपासकांनीं अन्न अर्पण केलें त्यांत उत्तम असेल तें देतों असें म्हणणें हें साहजिक आहे.

'हविरन्नें '=' ब्रह्माणि. ' याचा अर्थ बहुतकरून ' स्तोत्रें ' असा होतो. पण सायणाचार्य केव्हां केव्हां (आणि प्रस्तुत स्थळींहि) ' हविरन्नें ' असाहि करीत असतात. आणि ' स्तोत्रें ' उच्चारून हविरन्न अर्पण करीत, यास्तव 'ब्रह्म' शब्दाचा ' हविरन्न ' असा अर्थ करणें यांत विशेष नवल नाहीं.

या मंत्रांत अक्षरांची भरती खालीं दाखविल्याप्रमाणें करावी लागतेः—

अस्मा इदु प्र तवसे तुराय
प्रयो न हर्मि स्तोमं माहिनाय ।
ऋचीषमायाध्रिगव ओहम्
इन्द्राय ब्रह्माणि राततमा ॥

---

२. भावार्थः—'इंद्रच पुरातन प्रभु होय; यास्तव, भुकेलेल्या मनुष्यास अन्न अर्पण केल्याप्रमाणें मी त्यालाच स्तोत्र अर्पण करितों. आणि मीच इंद्र श्रेष्ठ समजून त्याला भजतों असें नाहीं, तर इतर मनुष्यहि त्यालाच मनःपूर्वक, अंतःकरणपूर्वक आणि ज्ञानपूर्वक स्तोत्रें रचून तीं अर्पण करून भजत आले आहेत.' यांत सुद्धा इतर देवांवर इंद्राचें श्रेष्ठत्व आहे असें दर्शविलें आहे.

' [शत्रु]बाधक '=' बाधे.' अक्षरशः अर्थ 'बाधण्याला, बाधा करण्याला, नाहीसें करण्याला.' ' बाधे ' हें ' बाधितुं ' याऐवजीं तुमर्थी रूप आहे. शत्रूंस

अस्मा इदु स्तोमं सं हिनोमि रथं न तष्टेव तत्सिनाय ।
गिरश्च गिर्वाहसे सुवृक्तीन्द्राय विश्वमिन्वं मेधिराय ॥ ४ ॥

अस्मै । इत् । ऊम् इति । स्तोमम् । सम् । हिनोमि । रथम् । न । तष्टाऽइव । तत्ऽसिनाय ।
गिरः । च । गिर्वाहसे । सुऽवृक्ति । इन्द्राय । विश्वम्ऽइन्वम् । मेधिराय ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. अस्मा इदु (=अस्मा इन्द्रायैव), रथं न तत्सिनाय तष्टेव (=रथस्वामिने तष्टा रथकर्ता रथं करोति तद्वद्) [अहं] स्तोमं (=स्तोत्रं) सं हिनोमि (=प्रेरयामि=करोमि)। गिर्वाहसे च (=गीर्भिरुह्यमानाय=अश्ववद् गिर एव यं वहन्ति तमिन्द्रायैव) सुवृक्ति (=शोभनमावर्जनं यथा भवति तथा=शोभनं यथा भवति तथा) गिरः (=स्तोत्राणि) [सं हिनोमि] (=करोमि)। मेधिराय (=मेधाविने) [इन्द्रायैव] विश्वमिन्वं (=विश्वव्यापकं=स्तोत्रं) सं हिनोमि (=करोमि) ॥

अत्रेदमुक्तं भवति । स्तोतृभिः प्रेषितानि स्तोत्राणि रथवद् इन्द्रमानयन्ति । अतः-कारणाद् रथेच्छां कुर्वते रथकारो रथं करोति तद्वदहमिन्द्रायैव न त्वन्यदेवाय स्तोत्रं रचयामि । यत्स्तोत्रं रथवत् सुवृक्ति । सुसंस्कृतमिति यावत् । इन्द्ररथवत् सर्वव्यापि च करोमि । इन्द्रश्च सर्वेषु देवेषु स्तुत्यर्हस्तस्य मेधावित्वादिति ।

यत्तु 'गिर्वाहस्' शब्दं गिरो वाहः अर्पितं हविरन्नादिकं यस्य स इति प्रकारेण विदुष्टरग्रास्मानादयो व्याचक्षते तन्न । यथा कस्मैचिद् गन्तुं रथं कृत्वा रथकारः प्रेरयति तथा मम यज्ञं प्रत्यागन्तुम् इन्द्रायाहं स्तोत्रं रचयित्वा प्रेरयामि येन स आगमिष्यति स हि स्तोत्रं रथवद् अधिष्ठाय गच्छतीति भावार्थसद्भावात् ॥

हाकून देण्यासाठीं स्तोत्र अर्पण करितों म्हणजे, जेणेंकरून शत्रु नाहींसे होतील असें स्तोत्र अर्पण करितों.

'मधुर'='सुवृक्ति.' अक्षरशः अर्थ 'चांगलें तासलेलें,' 'चांगली तासणी ज्यांत झाली आहे.' म्हणजे गुळगुळीत; चांगलें दिसणारें; कानास चांगलें लागणारें. सू.५२, मं.१याजवरील टीप पहा.

'पुरातन प्रभु जो इंद्र त्याच्याच प्रीत्यर्थ'='प्रत्नाय पत्ये इन्द्राय.' यावरून दुसरे देव 'पुरातन' नव्हेत म्हणजे त्यांची भक्ति आलीकडे जन करूं लागले आहेत असें ऋषीचें हृद्ग आहे.

हा मंत्र खालीं लिहिल्याप्रमाणें आधुनिक वृत्ताला बसतोः—

४. रथाची वांछा करणाऱ्या [मनुष्या]करितां सुतार रथ [करितो] तसा मी या [इंद्रा]प्रीत्यर्थेच स्तोत्र रचितों; स्तोत्रवाहन इंद्राप्रीत्यर्थेच मी सुंदर स्तोत्र [रचितों], बुद्धिमान् [इंद्रा]प्रीत्यर्थेच सर्वव्यापि [स्तोत्र] रचितों.

4. To Him alone I prepare a hymn as a carpenter [prepares] a car for one that desires a car; yes, hymns to Indra who is carried on hymns, a beautiful hymn to [Indra], an all-pervading hymn to wise [Indra].

अस्मा इदु प्रय इव प्र यंसि
भरामि आङ्गूषं बाधे सुवृक्ति ।
इन्द्राय हृदा मनसा मनीषा
प्रत्नाय पत्ये धियो मर्जयन्त ॥

३. भावार्थः—'जें जें म्हणून उत्कृष्ट स्तोत्र होय असें लोक समजतात, आणि जेणेंकरून स्तोत्याला स्वर्गप्राप्ति होते, असें स्तोत्र मी आपल्या तोंडानें रचून इंद्राप्रीत्यर्थ म्हणत असतों, इतर देवांप्रीत्यर्थ म्हणत नसतों. मी अति उदार आणि बुद्धिमान् इंद्राचीच कीर्ति भक्तियुक्त स्तोत्रांनीं गाऊन वाढवितों, इतरांची वाढवीत नाहीं.'

'स्वर्गदायक'='स्वर्षाम्.' सायणाचार्य येथें 'धनदायक' असा अर्थ करितात. परंतु अक्षरशः अर्थ जुळत असतां तो सोडणें अवश्य दिसत नाहीं.

'भक्तिपूर्वक सुंदर स्तोत्रांनीं'='अच्छोक्तिभिः मतीनां सुवृक्तिभिः.' अक्षरशः अर्थ, 'भक्तींच्या सुंदर स्तोत्रांनीं.'

'वाढवितों'='वावृधध्यै.' अक्षरशः अर्थ 'वाढविण्यासाठीं.' परंतु अर्थ स्पष्ट समजावा म्हणून या मंत्राचें भाषान्तर आम्हीं किंचित् अक्षर सोडून केलें आहे.

या मंत्रांत जें ऋषीचें म्हणणें आहे त्याजकडेस लक्ष्य द्यावें. तो म्हणतो, मी स्तोत्रें, म्हणजे सूक्तें रचून इंद्रालाच अर्पण करितों, आणि इंद्राचीच कीर्ति वाढवितों. तो आपणास कोणत्याहि प्रकारची शक्ति इंद्रावर वर्चस्व करण्यासारिखी आहे असें जाणवीत नाहीं. दीन अनाथ मनुष्यानें अनन्यभावानें एकाच देवतेवर भरंवसा ठेवून त्या देवतेची स्तुति करावी तशी यांत केलेली आहे.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला बसतोः—

अस्मा इदु त्यमुपमं सुअर्षा
भरामि आङ्गूषअम् आसिएन ।
मंहिष्ठमच्छोक्तिभिर्मतिईनां
सुवृक्तिभिः सूअरिं वावृधध्यै ॥

४. भावार्थः—'इन्द्र गिर्वाहस आहे; म्हणजे, तो घोड्यावर अथवा गाडींत बसून फिरल्याप्रमाणें स्तोत्रांवर बसून फिरणारा आहे. यास्तव सुतार जसा रथ करून कोणाला तरी बसून जावयाला देतो, तसा मी स्तोत्रें रचून इन्द्राकडे पाठवून देतों म्हणजे तीं त्याजकडे प्रविष्ट होतील, आणि तो रथांत बसल्याप्रमाणें त्यांजवर बसून येईल. आणि हीं मी स्तोत्रें करितों तीं सुंदर आणि इंद्राच्या

अस्मा इदु सप्तिमिव श्रवस्येन्द्रायार्कं जुह्वा३ समञ्जे ।
वीरं दानौकसं वन्दध्यै पुरां गूर्तश्रवसं दर्माणम् ॥ ५ ॥ २७ ॥

अस्मै । इत् । ऊम् इति । सप्तिम्ऽइव । श्रवस्या । इन्द्राय । अर्कम् ।
जुह्वा । सम् । अञ्जे ।
वीरम् । दानऽओकसम् । वन्दध्यै । पुराम् । गूर्तऽश्रवसम् । दर्माणम् ।
॥ ५ ॥ २७ ॥

भाषायाम्.

५. अस्मा इदु (=अस्मा एव) इन्द्राय श्रवस्या (=अन्नेच्छया=अन्नलाभाय) सप्तिमिव (=अश्वं युञ्जन्ति तद्वत्) जुह्वा (=जिह्वया) अर्कं (=मन्त्रं) समञ्जे (=युनज्मि), दानौकसं (=दानानामेकनिलयं) पुरां (=शत्रूणां नगराणां) गूर्तश्रवसं (=प्रसिद्धकीर्तिं) दर्माणं (=विदारयितारं) वीरं (=शूरम्) [एतादृशमिन्द्रं] वन्दध्यै (=वन्देयेति) ॥

यथा कश्चिन्मित्राद्यानयनार्थम् अश्वं रथेन युनक्ति तथाहं त्वदागमनार्थं मन्त्रं जिह्वया युनज्मि । मन्त्रं रचयामीति यावत् । त्वं हि रथवत् मन्त्रमधिष्ठायागच्छसीति पूर्वमन्त्रे प्रतिपादितमेवेति भावः । एतेनापि पूर्वमन्त्रगतगिर्वाहस्शब्दस्य गीर्भिरुह्यमानः इति सायणाचार्यकृतोर्थ एव युक्तः न तु व्याख्यात्रन्तरकृत इति द्रष्टव्यम् ॥

रथाप्रमाणें पाहिजे तिकडे त्याला घेऊन जाणारीं अशीं रचितों. इंद्राप्रीत्यर्थच स्तोत्रें रचितों, कारण कीं तो सर्व देवांत उत्तम बुद्धिमान् आहे.'

'स्तोत्रवाहन इंद्राप्रीत्यर्थच '=' गिर्वाहसे.'. 'गिर्वाहस्' याचा अक्षरशः अर्थ 'गिरः' म्हणजे स्तोत्रेंच 'वाहः' म्हणजे वाहन आहे ज्याचें तो. इंद्राचें स्तोत्र गातांच तो रथांत बसून आल्याप्रमाणें येतो म्हणून त्यास 'गिर्वाहस्' असें नांव दिलें आहे.

'सर्वव्यापि '=' विश्वमिन्वम्.' म्हणजे इंद्राच्या मनांत जिकडे जावयाचें असेल तिकडे घेऊन जाणारें असें स्तोत्र.

ही ऋचा श्लोकाप्रमाणें खालीं दाखविल्याप्रमाणें वाचावीः—

अस्मा इदु स्तोमअँ सं हिनोमि
रथं न तष्टा इव तत्सिनाय ।
गिरश्च गिर्वाहस सुव्वऋक्ति
इन्द्राय विश्वँमिन्वँ मेधिराय ॥

५. ह्या इंद्राकरितांच मी द्रव्येच्छेनें घोडा [तयार केल्या]प्रमाणें [माझ्या] जिह्वेनें स्तोत्र तयार करितों, आणि दानांचें माहेर [आणि] शत्रूंच्या नगरांचा प्रख्यात विदारणारा [असा जो] वीर [इंद्र] त्याला वंदन करितों.

5 For Him alone, with a desire for food, I yoke with my tongue a eulogy like a horse, that I may do homage to Indra the hero, the home of gifts, the renowned destroyer of the cities [of the enemies].

५. भावार्थः—' जसा कोणीतरी मनुष्य आपल्या मित्राला दुरून आणविण्याकरितां घोडा जोडून पाठवून देतो, तसा इंद्रास इकडे आणविण्याकरितां मी आपल्या मंत्राला जोडितों, आणि सर्व वरप्रदानांचें माहेर, आणि शत्रूंच्या नगरांचें निर्दलन करण्याविषयीं ज्याची मोठी प्रख्याति आहे असा जो वीर इंद्र, त्याला वंदन करितों.'

' दानांचें माहेर'=' दानौकसम्.' अक्षरशः अर्थ, ' देण्ग्यांचें घर,' म्हणजे पाहिजे तो वर देणारा, पाहिजे त्याची इच्छा पुरविणारा. हा अर्थ स्पष्ट असतां दुसराच अर्थ जो कितीएक पाश्चिमात्य विद्वानांनीं कल्पिलेला आहे तो निराधार दिसतो.

' वंदन करितों '=' वन्दध्यै.' अक्षरशः ' वंदण्यास,' ' नमण्यास. ' याचा संबंध ' तयार करितों ' (='सम् अञ्जे') या क्रियापदाशीं आहे. परंतु पर्यवसानीं अर्थ आम्हीं केलेल्याप्रमाणेंच समजावयाचा.

' शत्रूंच्या नगरांचा प्रख्यात विदारणारा. ' सू. ५३ मं. ८ हा आणि त्याजवरील टीप पहा.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें वाचल्यास साधारण श्लोकाप्रमाणें बसतेः—

अस्मा इदु सप्तिमिव श्रवस्या
इन्द्रायार्कं जुहुआ समञ्जे ।
वीरं दानौकसं वन्दध्यै
पुरां गूर्तश्रवसं दर्माणम् ॥

अस्मा इदु त्वष्टा तक्षद्वज्रं स्वपस्तमं स्वर्यं रणाय।
वृत्रस्य चिद्विदद्येन मर्म तुजन्नीशानस्तुजता कियेधाः ॥ ६ ॥

अस्मै । इत् । ऊम् इति । त्वष्टा । तक्षत् । वज्रम् । स्वपःऽतमम् । स्वर्यम् । रणाय ।
वृत्रस्य । चित् । विदत् । येन । मर्म । तुजन् । ईशानः । तुजता । कियेधाः ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. अस्मा इदु (=अस्मा इन्द्रायैव) [न त्वन्यस्मै देवाय] त्वष्टा (=विश्वकर्मा) स्वपस्तमम् (=अतिशयेन शोभनकर्माणं=हननकर्मणि अतिशयेन कुशलं) स्वर्यं (=शब्दयन्तं) वज्रम् (=एतन्नामकम् आयुधं) रणाय (=युद्धार्थं) तक्षत् (=अतक्षत्=निर्मितवान्), तुजता (=हिंसता) येन [वज्रेण] तुजन् (=हिंसन्) कियेधाः (=बलवान्) ईशानः (=ऐश्वर्यवान्) [इन्द्रो] वृत्रस्य चित् (=वृत्रस्यापि) मर्म (=मर्मस्थानं हृदयादिकं) विदत् (=अविदत्=प्रहारार्थं लब्धवान्=प्राहार्षीत्)॥

शत्रुहिंसनकुशलतमं वज्रं त्वष्टा यन्निर्मितवांस्तदिन्द्रायैव निर्मितवान् न त्वन्यस्मै देवाय, तेन वज्रेण च प्रहरन्निन्द्रो वृत्रं जघानेति भावः॥

'कियेधाः' इत्येतत्पदमस्माभिः सायणमनुसृत्य व्याख्यातम्। यत्तु 'प्रभूतं ददत्' इति व्याख्यानं विदुष्टरेण ग्रास्मानेन कृतं तस्य संशयग्रस्ताच्छब्दनिर्वचनादृते नास्त्याधार इति द्रष्टव्यम्। ये च निर्वचनैकावलम्बी सायणः किलेति तं दूषयन्ति त एव निर्वचनैकावलम्बिनो भवितुं नार्हन्तीत्यलम्॥

६. ह्या [इंद्रा]साठींच विश्वकर्मा परमकौशल्ययुक्त [आणि] गर्जना करणारें वज्र रणाकरितां निर्माण करिता झाला; ज्या घातकी [वज्रा]नें प्रहार करणारा बळवान प्रभु [इंद्र] वृत्राचेंहि मर्मस्थान भेदून टाकिता झाला.

6. For Him alone Tvashṭâ fashioned [as a weapon] in battle the most skilful [and] rumbling thunderbolt; striking with which deadly [weapon], the mighty Lord [Indra] hit the vital part of Vṛitra himself.

---

६. भावार्थः– 'शत्रूला मारून टाकण्याविषयीं अतिकुशल आणि मोठी गर्जना करणारें असें वज्र त्वष्ट्या देवानें म्हणजे विश्वकर्म्यानें अथवा देवांच्या सुतारानें निर्माण केलें तें इंद्राप्रीत्यर्थ निर्माण केलें इतर कोणाहि देवासाठीं केलें नाहीं. त्या वज्राविषयीं तर प्रसिद्धि अशी आहे कीं, महाबलवान् जो सकळ जगाचा शत्रु वृत्र त्यालाहि त्याच्या योगानें इंद्रानें मारून टाकिलें, मग इतरांस मारून टाकील यांत काय आश्चर्य ?'

'त्वष्टा' हा देवांचा सुतार, ज्यास विश्वकर्मा असेंहि म्हणतात तो होय. याविषयीं सू. ३२, मं. २ हा आणि त्याजवरील आमची टीप पहा.

'गर्जना करणारें'='स्वर्यम्.' ऋ.५. ३०. ८ आणि ५. ५६. ४ यांजवरील सायणभाष्य पहा.

'वृत्राचेंहि'='वृत्रस्य चित्.' याजवरून समजून येईल कीं वृत्र म्हणजे यःकश्चित् शत्रु आहे असें नाहीं. त्याला मारणें म्हणजे अति दूरापास्त होय, आणि म्हणूनच त्याचा जो इंद्रानें वध केला त्याविषयीं इंद्राची कीर्ति जिकडे तिकडे वेदांत वर्णिलेली आहे.

ही ऋचा बरीच खडबडीत आहे. खालीं दाखविल्याप्रमाणें ह्रस्वदीर्घाचा व्यत्यय दिसतोः–

अस्मा इदु त्वॅषटॉ तक्षॅद्वज्रं
सुअॅपॅस्तमं सुरिअं रणाय ।
वृत्रस्य चिद्विददिएन मर्म
तुजन्नीशानस्तुजता कियेधाः ॥

यांत 'विदत् येन' याचा संधि प्रथम 'विदद्येन' असा होऊन मग 'विददिएन' असें संप्रसारण वृत्तासाठीं होतें तें लक्ष्यांत ठेवण्याजोगें दिसतें.

अस्येदु मातुः सवनेषु सद्यो महः पितुं पपिवाञ्चार्वन्ना ।
मुषायद्विष्णुः पचतं सहीयान्विध्यद्वराहं तिरो अद्रिमस्ता ॥ ७ ॥

अस्य । इत् । ऊम् इति । मातुः । सवनेषु । सद्यः । महः । पितुम् । पपिऽवान् । चारु । अन्ना ।
मुषायत् । विष्णुः । पचतम् । सहीयान् । विध्यत् । वराहम् । तिरः । अद्रिम् । अस्ता ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. अस्य इत् महः (=महत इन्द्रस्यैव) मातुः सवनेषु (=यज्ञेषु) सद्यः (=शीघ्रं) पितुं (=सोमलक्षणमन्नं) पपिवान् चारु अन्ना (=चारूणि अन्नानि =शोभनान्नानि) [च भक्षितवान्] सहीयान् (=शत्रूणामतिशयेनाभिभविता) विष्णुः (=एतन्नामको देवः) पचतं (=पक्कमन्नं) मुषायत् (=अपहरन्), अद्रिम् अस्ता (=अद्रेर्वज्रस्य क्षेपकः) [सन्], वराहं (=मेघं) तिरो विध्यत् (=तिर्यग्यथा तथा अताडयत्) ॥

एषा तु दुर्बोधा । सायणा एवं व्याचक्षते । इदु इत्येतन्निपातद्वयं पादपूरणम् । यद्वाऽवधारणार्थम् । मातुर्वृष्टिद्वारेण सकलस्य जगतो निर्मातुर्महो महतोऽस्य यज्ञस्य सवनेष्ववयवभूतेषु प्रातःसवनादिषु त्रिषु सवनेषु पितुं सोमलक्षणमन्नं सद्यः पपिवान् । यदाग्नौ हूयते तदानीमेव पानं कृतवानित्यर्थः । तथा चार्वन्ना चारूणि शोभनानि धानाकरम्भादिहविर्लक्षणान्यन्नानि भक्षितवानिति शेषः । किंच विष्णुः सर्वस्य जगतो व्यापकः पचतं परिपक्कमसुराणां धनं यदस्ति तन्मुषायत् अपहरन् । सहीयान् अतिशयेन शत्रूणामभिभवितादिमस्ताद्रेर्वज्रस्य क्षेपकः । एवंभूत इन्द्रस्तिरः । सत इति प्राप्तस्येति यास्कः । तिरः प्राप्तः सन् वराहं मेघं विध्यत् । अताडयत् । यद्वा । विष्णुः सुत्यदिवसात्मको यज्ञः । यज्ञो देवेभ्यो निलीय विष्णुरूपं कृत्वेत्याम्नानात् । स विष्णुः पचतं परिपक्कमसुरधनं यत्तन्मुषायत् । अचूचुरत् । तदनन्तरं दीक्षोपसदात्मनां दुर्गरूपाणां सप्तानामह्नां परस्तादासीत् । अद्रिमस्ता सहीयानिन्द्रो दुर्गाण्यतीत्य तिरः प्राप्तः सन् वराहमुत्कृष्टदिवसरूपं तं यज्ञं विध्यत् । तथा च तैत्तिरीयकम् । वराहोयं वाममोषः सप्तानां गिरीणां परस्ताद्वित्तं वेद्यमसुराणां बिभर्तीति । स दर्भपिञ्जूलमुद्धृत्य सप्त गिरीन् भित्त्वा तमहन्निति चेति ॥

अस्माकं तु पुरा किलेन्द्रस्य मात्रा कृतेषु सवनेषु इन्द्रसहायो विष्णुर्देवः क्षिप्रं सोमं पीत्वा अन्नानि च भक्षयित्वा अन्यच्च सर्वमन्नं यत्पक्कं तद्धृत्वा वज्रं प्रक्षिप्य मेघरूपं वराहं हतवानित्येतादृशीमधुना जनैर्विस्मृततरां कामपि व्याख्यायिकामुद्दिश्य

७. ह्या महान् [इंद्रा]च्याच आईच्या यज्ञांमध्यें एकाएकीं सोम पिऊन [आणि] चांगलीं अन्नें [भक्षून] परम बळवान विष्णु पक्क अन्न हरण करिता झाला [आणि] पाषाण टाकून वराहाचा छेद करिता झाला.

7. In the sacrifices of the mother of this great [Indra] alone all-powerful Vishnu drank quickly the juice [and ate] the good offerings, [and] carrying away what was cooked threw the stone [and] pierced through the boar.

७. ही ऋचा फार कठिण आहे. ऋग्वेदांत केव्हां केव्हां अशा ऋचा आढळतात कीं त्यांचा अर्थ परम दुर्बोध असतो. त्यांपैकींच ही एक होय. तथापि या ऋचेचें तात्पर्य असें दिसतें कीं, ‘ पूर्वीं इंद्राचे आईनें यज्ञ केले, त्यांत विष्णूनें येऊन एकदम सोम पिऊन आणि मधुर मधुर पक्वान्नें भक्षून वज्रप्रहार केला आणि मेघरूप वराहास म्हणजे डुकरास भेदून टाकिलें.’ अशी एकादी अतिपुरातन कथा असावी आणि तिला उद्देशून यांत ऋषि बोलत आहे असें दिसतें. इंद्राची माता ‘ अदिति ’ असें पुष्कळ ठिकाणीं वेदांत सांगितलें आहे. आणि ऋ. ३. ४८. २ यांत तर इंद्र जन्मतांच त्याच्या आईनें त्याला सोम काढून पाजला असें सांगितलें आहे. ‘ विष्णु ’ म्हणजे ऋग्वेदांत कोणता देव समजावयाचा याविषयीं सू. २२, मं. १६ इत्यादि पहा.

अथवा या ऋचेचें तात्पर्य असेंहि होऊं शकेलः– ‘ सर्व देवांत इंद्रालाच त्याच्या आईनें तो उपजतांच सोमपान केलें त्यामुळें तो बलवान् होऊन एकाएकीं मेघरूप वराहास भेदून मारून टाकिता झाला.’

‘ यज्ञांमध्यें ’=‘ सवनेषु. ’ अक्षरशः अर्थ ‘ सोम काढिले तेव्हां ’ असा आहे. या ठिकाणीं हा अक्षरशः अर्थच घेतल्यास बरें होईल.

‘ पाषाण ’=‘ अद्रिम्. ’ हा पाषाण म्हणजे वज्र समजावयाचा. तो गोफणीच्या धोंड्याप्रमाणें (=पाषाणाप्रमाणें) फेकला जातो म्हणून त्यास वेदांत पाषाण असें नांव आहे.

एकंदरींत ही ऋचा कठिण म्हटली पाहिजे, पण त्याला उपाय नाहीं. वेदासारिख्या अनादिकाळ ग्रंथांत कोठकोठें थोड्या ऋचा दुर्बोध असल्या तर कांहीं नवल नाहीं. बहुतकरून सर्वांचा अर्थ समजण्यासारिखा असतो याचेंच खरोखर नवल वाटलें पाहिजे.

अर्थास कठिण असली तरी वृत्तानें मात्र ही ऋचा सरळ आहेः–

अस्येदु मातुः सवनेषु सद्यः
महः पितुं पपिवाँन्चारु अन्ना ।
मुषायद्विष्णुः पचतं सहीयान्
विध्यद्वराहं तिरो अद्रिमस्ता ॥

अस्मा इदु ग्नाश्चिद्देवपत्नीरिन्द्रायार्कमहिहत्य ऊवुः ।
परि द्यावापृथिवी जभ्र उर्वी नास्य ते महिमानं परि ष्टः ॥ ८ ॥

अस्मै । इत् । ऊम् इति । ग्नाः । चित् । देवऽपत्नीः । इन्द्राय । अर्कम् ।
अहिऽहत्ये । ऊवुरित्यूवुः ।
परि । द्यावापृथिवी इति । जभ्रे । उर्वी इति । न । अस्य । ते इति ।
महिमानम् । परि । स्त इति स्तः ॥ ८ ॥

ब्रूते नोधा इति संमतम् । यद्वा महान्तम् इन्द्रमेव जन्मनोनन्तरं ("सद्यः") तस्य माताऽदितिरभिषुतसोमा सती सोममपाययत् पाययत् भक्षितसोमश्च इन्द्र एव मेवरूपं वराहं हतवान्नान्यो देव इति ॥ उक्तं च मन्त्रान्तरे, "यत् जायथाः तदहः अस्य कामे अंशोः पीयूषम् अपिबः गिरिस्थाम् । तं ते माता परि योषा जनित्री महः पितुः दमे आ असिञ्चत् अग्रे" इति ऋ. ३. ४८. २.

भाषायाम्.

८. अस्मा इदु इन्द्राय (=अस्मा इन्द्रायैव=इन्द्रप्रीत्यर्थमेव=इन्द्रं प्रत्यभिनन्दितुमेव) देवपत्नीः ग्नाश्चित् (=देवाः पतयो यासां ता देवता अपि) अहिहत्ये (=अहेर्वृत्रस्य हनने=वृत्रहननप्रसङ्गे) अर्कं (=स्तोत्रम्) ऊवुः (=समतन्वत =चक्रुः)। [इन्द्र एव] उर्वी (=विस्तीर्णे) द्यावापृथिवी (=द्यावापृथिव्यौ) परि जभ्रे (=परिवेष्टितवान्) अस्य (=इन्द्रस्य) महिमानं (=महत्त्वं) ते (=द्यावापृथिव्यौ) न परि स्तः (=नैव परिवेष्टयतः) ॥

द्यावापृथिव्योरपि सकाशाद् इन्द्रस्य महत्तरभूतत्वात् स एव ते परिवेष्टयति तयोरल्पीयस्त्वात् तं ते न परिवेष्टयत इति भावः ॥

८. ह्या इंद्राप्रीत्यर्थेच दिव्य देवपत्न्या सुद्धा वृत्रयुद्धाच्या प्रसंगीं गीत गात्या झाल्या. [इंद्रच] विस्तीर्ण द्यू आणि पृथिवी यांस वेष्टून राहिला, त्या ह्याच्या मोठेपणाला वेष्टूं शकल्या नाहींत.

8. To Him alone, to Indra alone, even the goddesses, the wives of the gods, knit a song when he slew the Serpent. He surrounded the vast Heaven and Earth, never did these surround his greatness.

---

८. भावार्थः—' वृत्रहनन केलें तेव्हां इंद्राचेच गीत देवपत्नी गात्या झाल्या. देवपत्न्यांनीं गीत गाणें हें सौभाग्य दुसऱ्या देवास नाहीं, इंद्रासच आहे. आणि इंद्राचें माहात्म्य इतकें मोठें आहे कीं, तें द्यावापृथिवींत मावत नाहीं. तें द्यावापृथिवींत मावत नाहीं इतकेंच नाहीं परंतु तें द्यावापृथिवींस वेष्टून राहतें, द्यावापृथिवी ह्या त्यास वेष्टित नाहींत. ' हा मंत्र चमत्कारिक आहे. राजानें शत्रूवर जय मिळविला म्हणजे त्याच्या नगरांतील स्त्रिया त्याचें यश गातात ही चाल गुजराथ वगैरे प्रांतांत अजून चालू आहे आणि मध्यंतरींहि आपल्या देशांत चालू होती तशी अत्यंत पुरातन जें वैदिक युग त्यांतहि होती असें दिसून येतें. आणि हे गीत गाणें म्हणजे पूर्वींचे दुसऱ्यांनीं रचिलेले श्लोक वगैरे म्हणत असत असें नाहीं, परंतु जेव्हांचे तेव्हां ओव्या किंवा गीत रचून गात असत असेंहि दिसून येतें. अजून तरी मंगळागौरीच्या दिवसीं, अथवा कार्तिकपौर्णिमेच्या दिवसीं, किंवा लग्नाच्यावेळीं, अथवा जात्याजवळ दळावयास बसल्यावेळीं जशा आपल्या बायका जेव्हांच्यातेव्हां नवीन गीत रचून म्हणत असतात तशा पुरातनकाळीं रचून म्हणत असत असें या मंत्रांतील जें ' ऊवुः ' हें क्रियापद आहे त्यावरून समजावयाचें आहे. कारण कीं ' ऊवुः ' म्हणजे ' गुंफत्या झाल्या ' असा अर्थ आहे. आपल्या 'ओवी' शब्दाचा तरी हाच अर्थ आहे. माळेंत फुलें ओवल्याप्रमाणें ज्यांत शब्द ' ओवलेले ' असतात ती ' ओवी ' होय. आणि दुसऱ्या एका अतिप्रसिद्ध वृत्ताच्या नांवाचें निर्वचनहि असेंच आहे. ज्यांत यमकाचें अक्षर एकाला एक ' लाविलेलें ' असतें ती ' लावणी ' होय. लावणींत टला ट आणि पला प लाविला म्हणजे कविता झाली असें समजतात म्हणून तिला ' लावणी ' हें नांव पडलें आहे.

राजांचें यश बायका गातात ही प्रसिद्धि असल्याविषयीं रघुवंश सर्ग ४, श्लोक १२ पहाः— शुश्राव कुञ्जेषु यशः समुच्चैरुद्गीयमानं वनदेवताभिः ॥ मेघदूत १.६० हाहि पहा.

' वृत्रयुद्धाच्या प्रसंगीं '=' अहिहत्ये. ' अक्षरशः अर्थ ' सर्पाच्या मारणांत. '

अस्येदेव प्र रिरिचे महित्वं दिवस्पृथिव्याः पर्यन्तरिक्षात् ।
स्वराळिन्द्रो दम आ विश्वगूर्तः स्वरिरमत्रो ववक्षे रणाय ॥ ९ ॥

अस्य । इत् । एव । प्र । रिरिचे । महिऽत्वम् । दिवः । पृथिव्याः । परि । अन्तरिक्षात् ।
स्वऽराट् । इन्द्रः । दमे । आ । विश्वऽगूर्तः । सुऽअरिः । अमत्रः । ववक्षे । रणाय ॥ ९ ॥

भाषायाम्.

९. अस्येत् एव (=अस्यैव) [इन्द्रस्य] महित्वं (=महिमा) दिवः (=द्युलोकात्) पृथिव्याः अन्तरिक्षात् [च] परि [एतेभ्यः सकाशात्] प्र रिरिचे (=अधिकं वर्तते)। इन्द्र [एव] स्वराट् (=स्वेनैव तेजसा राजमानो) दमे आ विश्वगूर्तः (=दमे दमे विश्वगूर्तः=गृहे गृहे सर्वैः स्तुतः) स्वरिः (=शोभनशत्रुकः) अमत्रः (=महान्) [सन्] रणाय (=युद्धाय=योद्धुं) ववक्षे (=प्रवृद्धोस्ति) ॥

स्वरिरिति पदं गर्जनावान् इति पदेनापि व्याख्यातुं शक्यम् । बृहस्पतिरमत हि त्यदासां नाम स्वरीणां सदने गुहा यत् इत्युक्तत्वात् । तदपि पदपाठे सुऽअरिः इत्यधीतत्वात् सायणकृतस्य शोभनशत्रुक इति व्याख्यानस्य परित्यागे न कोपि हेतुः साधुरिति द्रष्टव्यम् । त्यजन्ति हि तद्विट्टुरग्रासमानादयः शार्मण्यपण्डिताः ॥

म्हणजे ‘ वृत्ररूप जो सर्प त्याला मारिला तेव्हां.’ वृत्राला सर्प असें वेदांत पुष्कळ ठिकाणीं म्हणतात याविषयीं पूर्वी सांगितलेंच आहे.

‘ त्या ह्याच्या मोटेपणाला वेढूं शकल्या नाहींत ’=‘न अस्य ते महिमानं परि स्तः.’ म्हणजे ह्याचा महिमा (=आकार) द्युलोक आणि पृथिवी यांपेक्षां मोटा झाल्यामुळें त्या आकारास त्या आपल्या पोटांत ठेवून घेऊं शकल्या नाहींत.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें आधुनिक वृत्ताला बसते:—

अस्मा इदु ग्नाश्चिद्देवपत्नीः
इन्द्राय अर्कम् अहिहत्ये ऊवुः ।
परि द्यावापृथिवी जभ्र उर्वी
न अस्य ते महिमानं परि ष्टः ॥

९. या इंद्राचें मोठेपण द्युलोकापेक्षां, पृथिवीपेक्षां [आणि] अंतरिक्षापेक्षां मोठें होय. इंद्रच स्वतेजस्वी, सकल गृहीं स्तुत, महाशत्रुमान्, [आणि] बलवान् [असा होत्साता] युद्धासाठीं झालेला आहे.

9. Of Him alone the vastness exceeds the Heaven, the Earth [and] the Firmament; vast Indra [alone], praised by all in [every] home, self-resplendent, and having great enemies to fight, has grown for fight.

९. भावार्थः– ‘ द्युलोक, पृथिवी आणि अंतरिक्ष या सर्वांहूनहि ज्याचें मोठेपण म्हणजे आकार मोठा होय असा देव हा एक इंद्रच होय; इतर देवांचें मोठेपण एवढें नाहीं. आणि जो स्वतःसिद्ध तेजस्वी, जो प्रत्येक मनुष्याचे घरीं सर्वांनीं स्तुत, ज्याचे शत्रु मोठे, जो महान् आणि जो जणुं काय युद्धाकरितांच वाढला आहे असा इंद्रच होय, दुसरा कोणी नाहीं. ’ म्हणजे, युद्धें करण्यासच जणुं काय झाला आहे असा हा एक इंद्रच आहे, दुसरा देव कोणी नाहीं.

इंद्र हा द्युलोक, अंतरिक्ष आणि पृथिवी या तिन्हीपेक्षां मोठा आहे असें या ऋचेंत सांगितलें आहे त्याजकडेस लक्ष द्यावें. ईश्वराच्या मोठेपणाविषयीं आपल्या आर्य पूर्वजांचा विचार कसा होता तें याजवरून दिसतें. द्युलोक, अंतरिक्ष आणि पृथिवी यांपेक्षां मोठा म्हणणें म्हणजे यापेक्षां मोठेपणाविषयीं अधिक चांगलें वर्णन करणें अशक्य आहे. एक ईश्वर आहे हें ज्ञान आणि ईश्वराचा महिमा अपरिमित आहे हेंहि ज्ञान या सूक्तावरून आपल्या परमपुरातन पूर्वजांसहि बीजरूपानें तरी होतें असें निश्चयानें सांगतां येतें.

‘ सकल गृहीं स्तुत ’=‘ दमे आ विश्वगूर्तः. ’ हे शब्द किंचित् संदिग्ध आहेत. अक्षरशः अर्थ, ‘ घरांत सर्वांनीं स्तविलेला ’ म्हणजे, घरोघर ज्याची सर्वजण स्तुति करितात असा.

‘ युद्धासाठीं झालेला आहे ’=‘ ववक्षे रणाय. ’ म्हणजे युद्ध करण्यासच जणुं झालेला आहे. ‘ ववक्षे ’ याचा अक्षरशः अर्थ, ‘ वाढलेला आहे ’ असा होतो.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें वृत्तास बसते:—

अस्येदेव प्र रिरिचे महित्वं
दिवः पृथिव्याः परि अन्तरिक्षात् ।
स्वराळिन्द्रो दम आ विश्वगूर्तः
स्वरिरमत्रो ववक्षे रणाय ॥

अस्येदेव शवसा शुषन्तं वि वृश्चद्वज्रेण वृत्रमिन्द्रः ।
गा न व्राणा अवनीरमुञ्चदभि श्रवो दावने सचेताः ॥१०॥२८॥

अस्य । इत् । एव । शवसा । शुषन्तम् । वि । वृश्चत् । वज्रेण । वृत्रम् । इन्द्रः ।
गाः । न । व्राणाः । अवनीः । अमुञ्चत् । अभि । श्रवः । दावने । सऽचेताः ॥ १० ॥ २८ ॥

भाषायाम्.

१०. अस्य इत् एव शवसा [इन्द्रः] शुषन्तं [वि वृश्चत्] (=अयम् इन्द्र एव शोषकम् असुरं वृत्रं स्वबलेन व्यवच्छिनत्)। इन्द्र [एव] वज्रेण वृत्रं वि वृश्चत् (=व्यवच्छिनत्) । सचेताः (=समानचित्तः=दयालुः) [इन्द्रो] गा न व्राणाः (=गा इव वृत्रेणावृता) अवनीः (=अपः=मेघोदकानि) दावने (=हविर्दत्तवते यजमानाय=यज्ञं कुर्वत उपासकाय) अभि श्रवः (=कर्मफलभूतमन्नमभिलक्ष्य=कर्मफलान्नत्वेन) अमुञ्चत् (=अवर्षीत्) ॥

इन्द्र एव जलशोषकवृत्रं हत्वा यजमानहितार्थं मेघोदकान्यावर्जयतीत्यर्थः ॥

---

१०. भावार्थः– 'पाणी जिकडून तिकडून शोषून घेऊन चोर जसा गुरें चोरून एकाद्या गुहेंत लपवून ठेवितो तसा मेघाडंबरांत लपवून ठेवणारा जो वृत्र, त्याला इंद्रच आपल्या बळानें आणि वज्रानें छेदून टाकिता झाला; आणि यज्ञादि कर्म करणारा जो उपासक त्याच्या हितार्थ मेघोदकें सोडून देता झाला.' हा इंद्राचा पराक्रम वेदांत जिकडे तिकडे पसरलेला आहे.

या मंत्रांत जी कोंडून ठेविलेल्या गाईप्रमाणें अशी उपमा मेघोदकांस दिली आहे ती लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. गुरें चोरून गुहेंत नेऊन ठेवणें ही चाल सर्व युगीं सर्व देशीं प्रसिद्ध आहे. ग्रीक आणि रोमन लोकांचीं पुराणें (मैथालजी) वाचणारांस ही गोष्ट चांगली ठाऊक असेलच. आलीकडे विजापूर येथें दुष्काळाच्या संबंधानें आर किल्ल्यांतील जुन्या इमारती साफ करण्याचें काम चाललें असून त्यांपैकीं एकीच्या मोठ्या तळघराचा उपयोग आजपर्यंत बरींच वर्षे चोर लोक अशाच कामीं करीत असत, त्यामुळें त्यांत गुरांच्या हाडांचे आणि सगळ्या सांगाड्यांचे मोठमोठे ढीग सांपडले. ते जनावरांनीं आंत नेलेले

१०. हा इंद्रच आपल्या बळानें शोषक [असुरा]ला [छेदून टाकिता झाला], इंद्रच [आपल्या] वज्रानें वृत्राला छेदून टाकिता झाला. दयावान् [इंद्रच] गाईंप्रमाणें कोंडलेल्या उदकांस हविर्दात्या उपासकासाठीं अन्न मिळावें म्हणून मुक्त करिता झाला.

10. He alone, with his might, slew the Demon of drought; Indra [alone] with his thunderbolt slew Vṛitra. Sympathizing Indra [alone] let down, like confined cows, the waters for the giver of oblations for food.

नसून मांग महार वगैरे जातींच्या चोरांनीं आंत गुरें नेऊन तेथें त्यांचा आपल्या रीतीप्रमाणें विनियोग केलेला असे.

'शोषक असुराला'='शुष्नतम्'. हा शोषक असुर म्हणजे वृत्रच समजावयाचा आहे. यावरून वृत्राचें खरें (रूपकसिद्ध) स्वरूप दिसून येतें.

'अन्न मिळावें म्हणून'='अभि श्रवः.' म्हणजे आपली उपासना करणारे जे भक्त त्यांस अन्न मिळावें या उद्देशानें. पाऊस पडल्यावरच धान्य पिकत असतें.

या ऋचेंत वृत्तानुसरानें जें ह्रस्वदीर्घ अधिकउणें वाचावयाचें आहे तें चमत्कारिक आहे; तें असें,—

अस्ये इदेवँ शवसा शुषन्तं
वि वृश्चद्वज्रेण वृत्तरमिन्द्रः ।
गा न व्वराणा अवनीरमुञ्चत्
अभि श्शरॅवो दॉवने सचेताः ॥

यांत 'वृत्रम्' याऐवजीं 'वृत्तरम्,' 'व्राणा' याऐवजीं 'व्वराणा' आणि 'श्रवो' याऐवजीं 'श्शरवो' असें वाचावें लागतें याजकडेस लक्ष्य देण्यासारिखें आहे. यावरून असें सिद्ध होतें कीं रकारानें संयुक्त झालेलें जें अक्षर त्यांतील रकाराच्या पूर्वींचें जें व्यंजन तें, वृत्ताला अवश्य असल्यास, स्वतंत्र अक्षर होत असतें, म्हणजे रकार आणि त्यापूर्वींचें जें व्यंजन यांच्यामध्यें एक ह्रस्व किंवा दीर्घ स्वर घालतां येतो; जसें 'वृत् + र' यांत त् आणि र यांच्यामध्यें अ घातला; 'व् + राणा' यांतील व् आणि र यांच्यामध्यें अ घालून 'व्वराणा' केलें; आणि श् + रवो यांतील श् आणि र यांच्यामध्यें अ घालून 'शरवो' आणि मग 'श्शरवो' असें केलें आहे. याप्रमाणें दुसरेहि ठिकाणीं वृत्तरचनेचे प्रयोग येतील.

अस्येदु त्वेषसा रन्त सिन्धवः परि यद्वज्रेण सीमयच्छत् ।
ईशानकृद्दाशुषे दशस्यन्तुर्वीतये गाधं तुर्वणिः कः ॥ ११ ॥

अस्य । इत् । ऊम् इति । त्वेषसा । रन्त । सिन्धवः । परि । यत् । वज्रेण । सीम् । अयच्छत् ।
ईशानऽकृत् । दाशुषे । दशस्यन् । तुर्वीतये । गाधम् । तुर्वणिः । कुरिति कः ॥ ११ ॥

अस्मा इदु प्र भरा तूतुजानो वृत्राय वज्रमीशानः कियेधाः ।
गोर्न पर्व वि रदा तिरश्चेष्यन्नर्णांस्यपां चरध्यै ॥ १२ ॥

अस्मै । इत् । ऊम् इति । प्र । भर । तूतुजानः । वृत्राय । वज्रम् । ईशानः । कियेधाः ।
गोः । न । पर्व । वि । रद । तिरश्चा । इष्यन् । अर्णांसि । अपाम् । चरध्यै ॥ १२

भाषायाम्.

११. अस्येदु (=अस्यैव) त्वेषसा (बलेन) सिन्धवः (=समुद्रा) रन्त (=स्वे स्वे स्थाने विरमन्ति), यद् (=यथा) सीं (=तान् सिन्धून्) वज्रेण पर्ययच्छत् (=परितो नियमितवान्=तेन सिन्धुषु वज्रद्वारा परिवेष्टितेषु सत्सु यथा ते स्वस्वस्थानेषु विरताः स्युस्तथा विरता भवन्ति)। ईशानकृत् (=वृत्रादिवधेनात्मानमैश्वर्यवन्तं कुर्वन्) [स] दाशुषे (=हविर्दत्तवत उपासकाय) दशस्यन् (=फलं प्रयच्छन्) [वर्तते]। तुर्वणिः (=शत्रूणां हिंसिता) [एतादृश इन्द्रः] तुर्वीतये (=एतत्संज्ञाय कस्मैचिदुदके निमग्नाय ऋषये) गाधम् (=अवस्थानयोग्यं धिष्ण्यं प्रदेशं) कः (=अकः=अकरोत्)॥

१२. [हे इन्द्र], तूतुजानः (=क्षिप्रः) कियेधाः (=बलवान्) ईशानः (=प्रभुः) [त्वम्] अस्मा इदु (=अस्मा एव) वृत्राय वज्रं प्र भर (=प्रहर=इमं वृत्रं वज्रेण प्रहर)। अर्णांसि (=वृष्टिजलानि) इष्यन् (=मेघादवगमयन्) [त्वम्] अपां चरध्यै (=उदकानां चरणाय=उदकानि यथा चरन्ति तथा) गोः पर्व न (=गोः पर्वाणीव=गोर्मांसखण्डानिव) [तस्य वृत्रस्य] [पर्वाणि=खण्डान्] तिरश्चा (=तिर्यग्यथा भवति तथा) वि रद (=छिन्धि)॥

मेघरूपं वृत्रं गामिव छित्त्वा लौकिकाः पुरुषा गोर्मांसखण्डान् भृशं छिन्दन्ति तद्वद् वृत्रस्य खण्डांश्छित्त्वा तस्माद्वृष्टिं कृत्वा जलानि प्रवाहय। त्वं हि क्षिप्रतमो बलवान् प्रभुरसि न ते किमप्यसाध्यमिति भावः॥

११. याच्याच बळाच्या योगानें समुद्र [आपआपल्या स्थानीं] राहतात, कीं जणुं [तो] त्यांस [आपल्या] वज्रानें वेष्टूनच राहतो. ऐश्वर्यवान् [इंद्र] उपासकावर अनुग्रह करणारा [होय]; शत्रुघातक [इंद्र] तुर्वीतीसाठीं [पाण्यांस] उतार करिता झाला.

11. Through His might alone, the seas stand [in their places], as though he surrounded them with his thunderbolt. Supreme [Indra] [is] favourable to the worshipper: victorious [Indra] made a ford for Turvîti.

१२. [हे इंद्रा], अति आवेशी [आणि] बळवान् प्रभु [असा जो तूं तो] ह्याच वृत्रावर [आपलें] वज्र मार. [तूं] गाईचे आडवेतिडवे [तुकडे केल्या]प्रमाणें [वृत्राचे] तुकडे कर, आणि वृष्टि पाडून उदकें वाहायाला लाव.

12. [O Indra], strike [thou], the impetuous [and] mighty Lord, [thy] thunderbolt upon this very Vṛitra; cut [him] down into fragments like a cow, that the showers may fall, that the waters may flow.

११. 'मोठमोठाले समुद्र आपआपले ठिकाणींच राहतात, मर्यादा उल्लंघून जात नाहींत, तर जणुं काय त्यांस इंद्र आपल्या वज्रानेंच वेष्टून मर्यादेच्या आंत ठेवीत असतो; हा पराक्रम इंद्रच करूं शकतो, दुसरा कोणी नाहीं. सर्वांचा प्रभु जो इंद्र तोच उपासकांवर कृपा करीत असतो. पराक्रमी इंद्रच तुर्वीतिनांवाच्या उपासकाकरितां पाण्याला उतार पडे असें करिता झाला' असा भावार्थ.

'तुर्वीति.' सू. ५४, मं. ६, आणि सू. ३६, मं. १८ पहा. तुर्वीति या नांवाचा उपासक पाण्यांत सांपडला असून उतार नसल्यामुळें बुडून जात असतां इंद्रानें तो बुडूं नये म्हणून तेथें एकाएकी उतार होई असें केलें अशी प्रसिद्धि असल्यामुळें त्याला उद्देशून चवथ्या चरणाचा अर्थ समजावयाचा आहे. हा आश्चर्यकारक पराक्रम ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. कृष्णप्रभूला गोकुळांत नेत असतां यमुना नदीनें दुभागून मार्ग दिला, आणि जीजस क्रैस्ट समुद्राच्या पाण्यावरून चालले तेव्हां पाणी जमिनीप्रमाणें घट्ट झालें असें प्रसिद्ध आहे. ह्या सर्व कथांचें बीज परमपुरातन वेदांत आहे या संबंधानें पाहिलें असतां सकल धर्मांचें बीज वेद असें म्हटल्यास कांहीं अतिशयोक्ति होते असें वाटत नाहीं.

ह्या ऋचेचेंहि वृत्तरचन ध्यानांत ठेवण्याजोगें आहे, तें असें:—

अस्येदु प्र ब्रूहि पूर्व्याणि तुरस्य कर्माणि नव्य उक्थैः ।
युधे यदिष्णान आयुधान्यृघायमाणो निरिणाति शत्रून् ॥ १३॥

अस्य । इत् । ऊम् इति । प्र । ब्रूहि । पूर्व्याणि । तुरस्य । कर्माणि । नव्यः । उक्थैः ।
युधे । यत् । इष्णानः । आयुधानि । ऋघायमाणः । निऽरिणाति । शत्रून् ॥ १३ ॥

भाषायाम्.

१३. अस्य इत् उ (=अस्यैव) तुरस्य (=युद्धाय त्वरमाणस्य=जयशालिन) [इन्द्रस्य] पूर्व्याणि (=पुराणानि) कर्माणि (=वृत्रवधादीनि चरितानि) [हे स्तोतः, त्वं] प्र ब्रूहि (=प्रशंस) । [स हि] उक्थैः (=स्तोत्रैः) नव्यः (=स्तवनीयो) [भवति] । यद् (=यस्माद्) युधे (=योद्धुं=योधनार्थम्) आयुधानि इष्णानः (=वज्रादीन्यस्त्राणि प्रक्षिप्य) ऋघायमाणः (=हिंसन्) [स इन्द्रः] शत्रून् निरिणाति (=नितराम् अभिगच्छति=नाशयति) ॥

अस्य इदु त्वेषसा रन्त सिन्धवः
परि यद्वज्जरेण सीमयच्छत् ।
ईशानकृद्दाअशुषे दशस्यन्
तुर्वीतये गाअधं तुर्वणिः कः ॥

यांत 'वज्रेण' याला ओढून 'वज्जरेण' असें म्हणावें लागतें आणि 'दाशुषे' आहे तें 'दाअशुषे' आणि 'गाध' आहे त्याऐवजी 'गाअधं' असें म्हणावें लागतें. या दीर्घीकरणाचीं प्रयोगान्तरें वेदांत पुष्कळ आढळतात. त्यावरून जीं वृत्तें आपणास आतां मधुर लागतात आणि ज्यांत एक अक्षर ह्रस्वाचें दीर्घ आणि दीर्घाचें ह्रस्व चालत नाहीं तेंच वृत्त वैदिक युगांत कसें असे तें समजून येतें.

१२. भावार्थः– 'हे इंद्रा, जसा कोणी एकादा मनुष्य गाई मारून तिचे तुकडे तुकडे करितो तसा वृत्राला मारून त्याचे तूं तुकडे तुकडे कर, आणि वृष्टि पाडून उदकांचे प्रवाह नदीरूपांनीं वाहत असें कर. हें तुला असाध्य नाहीं, कारण कीं तूं बळवान् प्रभु आहेस आणि तुझ्या मनांत वृत्राचा वध करावयाचा असला म्हणजे कोणताहि अवकाश न लावितां एकदम आवेशानें जाऊन तूं वध करिशील. तर हे इंद्रा, तूं वज्रानें वृत्राचा वध कर,– म्हणजे वृष्टि पाड.'

'गाईचे आडवेतिडवे तुकडे केल्याप्रमाणें '=' गोर्न पर्व.' यांत जी उपमा दिली आहे तिच्याविषयीं कांहीं चमत्कारिक विचार मनांत येतात. आलीकडे साधारण शूद्र जरी लिहूं लागला

१३. ह्याचींच [ह्या] पराक्रमी [इंद्राचीं] च पूर्वींचीं चरितें गा. स्तोत्रें गाऊन त्याची स्तुति गाण्यास योग्य [होय]. कारण कीं तो आयुधें टाकून लढून नाश करणारा [होत्साता] शत्रूंचा संहार करीत असतो.

13. Of Him alone sing thou forth the ancient [exploits], the exploits of mighty [Indra]. [He] deserves to be praised with hymns; since throwing missiles for fighting, [he], the destroyer, crushes the enemies.

तरी अशी उपमा देणार नाहीं. तर वैदिक ऋषीनें ही उपमा दिली याचें तात्पर्य इतकेंच कीं, ज्या वस्तु खाऊं नयेत असें आम्हीं आतां योग्यरीतीनें समजतों आणि ज्यांचें नांव घेणें म्हणजे पातक आहे असें मानितों ते पदार्थ पूर्वी ऋषिजन अभक्ष्य समजत नसत, आणि त्यांचें नांव घेणें किंवा त्यांची उपमा देणें हें पातक आहे असें मानीत नसत. वस्तुतः पाहिलें असतां अभक्ष्यभक्ष्याचा विचार करूं लागलों तर वैदिक युगापेक्षां आमचें हें वापडें कलियुग अधिक पुण्यवान् आणि अधिक स्तुतिपात्र आहे अशाविषयीं हें तर केवळ ज्ञापक आहे, पण ऋग्वेदांत दुसरे ठिकाणीं बळकट प्रमाणें येत जातील.

'आणि वृष्टि पाडून उदकें वाहायाला लाव '=' इष्यन् अर्णांसि अपां चरध्यै. ' अक्षरशः अर्थ, ' वृष्टि येई असें करणारा तूं उदकांच्या वाहण्यासाठीं ' असा आहे, तो स्पष्ट समजावा म्हणून आम्हीं किंचित् विस्तारानें भाषांतर केलें आहे.

वृत्रासाठीं तिसरा आणि चवथा हे पाद खालीं लिहिल्याप्रमाणें वाचावेः—

गोर्न पर्व वि रदआ तिरश्चा

इष्यन्नर्णांसि अपआं चरध्यै ।

---

१३. ' इंद्र युद्ध करण्यांत अति कुशल होय; तो वज्रादिक आयुधें शत्रूवर टाकून देऊन आपणहि आंगावर धांवून जातो आणि शत्रूंस चिरडून नाहींसे करून टाकितो. यामुळें तो स्तोत्रें गाऊन स्तविला जाण्यास पात्र होय. तर असा जो इंद्र, त्याचींच वृत्रवधादिक जीं महाकृत्यें तीं तूं गा,' असें ऋषि लोकांस अथवा जवळ असलेल्या मित्रास म्हणतो आहे.

या ऋचेंत इंद्राचें स्वरूप कसें वर्णिलें आहे तिकडे आमच्या वाचकांनीं लक्ष्य द्यावें. आपले आर्य पूर्वज नित्य हातांत गोमुखी घेऊन तप करीत नसत. त्यांस युद्ध करण्याची सवई नित्य असे. त्यामुळें ते आपल्या उपास्य देवतेला सुद्धा

अस्येदु भिया गिरयश्च दृळ्हा द्यावा च भूमा जनुषस्तुजेते ।
उपो वेनस्य जोगुवान ओणिं सद्यो भुवद्वीर्याय नोधाः ॥ १४ ॥

अस्य । इत् । ऊम् इति । भिया। गिरयः। च । दृळ्हाः। द्यावा । च ।
भूम । जनुषः । तुजेते इति ।
उपो इति । वेनस्य । जोगुवानः । ओणिम् । सद्यः । भुवत् । वीर्याय ।
नोधाः ॥ १४ ॥

भाषायाम्.

१४. अस्य इदु (=अस्यैव) [इन्द्रस्य] भिया (=भयेन) दृळ्हा गिरयश्चित् (=दृढा निश्चलाः पर्वता अपि), द्यावाभूमा च (=द्यावापृथिव्यौ च) तुजेते (=कम्पेते), जनुषः (=जना) [अपि] [कम्पन्ते]। [अतः कारणाद्] वेनस्य (=कान्तस्य) [इन्द्रस्य] ओणिं (=रक्षणम्) उपो जोगुवानः (=सूक्तैः पुनःपुनरुपशब्दयन्=उपश्लोकयन्) नोधाः (=एतन्नामक ऋषिः) सद्यः (=क्षिप्रमेव) वीर्याय भुवत् (=वीर्यवानभवत्) ॥

युद्धकुशल आणि शत्रुहननाविषयीं योग्य अशी वर्णीत. आमचे अर्वाचीन कवि कोणत्याहि देवाचें वर्णन करूं लागले म्हणजे त्याला निजवितील, उष्मा लागतो म्हणून वारा घालवितील, किंवा पाय दुखतात म्हणून देवीकडून त्याचे पाय रगडवितील, अथवा त्याजकडून आंगाला विभूति लावून अनेक वर्षेंपर्यंत तप करवितील. हा जो भेद आम्हीं दाखविला तो, प्राचीन आपले आर्य पूर्वज जे आपला देव कसा आहे म्हणून मानीत आणि आम्हीं कसा मानितों तें दाखविण्याकरितां सांगितला आहे. वस्तुतः देवाचें स्वरूप कवींच्या कल्पनेव्यतिरिक्त असून तें तर बदलत नाहींच; देवाविषयीं आमचे विचार मात्र बदलत जातात.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावी लागतेः—

अस्मै इदु प्र ब्रूहि पूर्विआणि
तुरस्य कर्‍माणि नव्य उक्थैः ।
युधे यदिष्‍षणॉन आयुधानि
ऋघायमाणो निरिणाति शत्रून् ॥

यांत 'कर्माणि' आहे त्याऐवजीं वृत्तार्थ 'कर्‍माणि' असें समजावयाचें; आणि 'इष्णानः' आहे त्याऐवजीं 'इष्‍षणानः' असें म्हणावयाचें; त्याजवरून असा नियम निघतो कीं, 'र्' अथवा 'ष्' हे ज्यांच्या आरंभीं आहेत अशीं संयुक्त अक्षरें संहितेंत असलीं तर वृत्तानुरोधानें 'र्' बद्दल 'र्‍' असें आणि 'ष्' बद्दल 'ष्ष' असें म्हणावयास चिंता नाहीं; म्हणजे संयुक्त अक्षराचें पहिलें व्यंजन इतकें लांबवून म्हणण्याची चाल पूर्वी असावी कीं, त्याचें एक स्वतंत्र अक्षर

१४. ह्याच्याच भीतीनें अचल पर्वत सुद्धा [आणि] द्युलोक भूलोक [हे] सुद्धा [आणि] [सर्व] प्राणी सुद्धा थरथर कांपतात. प्रियकर इंद्राच्या अभयाची स्तुति करीत करीत नोधा एकाएकीं बळवान् झाला.

14. Through the dread of Him alone even the solid mountains, even heaven and earth [and] men tremble. Praising again and again the support of beloved [Indra] Nodhas instantly became powerful.

होईल व तेंहि आणखी संयुक्त अक्षर होत असे. खानदेशांत कांहीं एक वालेघांटी लावणी प्रसिद्ध आहे, त्यांत

अल्याड नर्मदा पल्याड वडोदा वडोदा ग वाई | नाकिं नथ सर्जांची | इ०

असे दोन चरण आम्हांस आठवतात. यांतहि 'सर्जांची' याऐवजीं 'सरजांची' असें झालें आहे. ऋषि प्राचीन असो अथवा अर्वाचीन असो, दिव्य असो किंवा ग्राम्य असो, व्याकरण आणि छंद इत्यादि शास्त्रांचे नियम एकच आहेत.

---

१४. 'इंद्राला भिऊन मोठमोठे प्रचंड असे जे निश्चळ पर्वत तेहि कांपतात, द्युलोकहि कांपतो, आणि पृथिवीहि कांपते, मग जन कांपतात म्हणून सांगावयास नकोच. असें असून तो सर्वांचें संरक्षण करितो, त्यामुळें तो सर्वांस प्रिय झालेला आहे. तर असा जो प्रियकर इंद्र त्याणें केलेल्या संरक्षणाची स्तुति करीत करीत मी जो नोधा ऋषि तो वलवान् झालों.'

नोधा हा या सूक्ताचा कर्ता आहे. तो म्हणतो कीं; इंद्राच्या संरक्षणशक्तीची कथा गात गात मी वलवान् झालों. ईश्वराचा गुणानुवाद अथवा प्रार्थना करणारे जे लोक असतात, त्यांस हा अर्थ समजून सांगावयास नकोच. कारण ईश्वरगुणानुवादाच्या योगानें तदनुकरणाची इच्छा उत्पन्न होते; तेणेंकरून सद्विचार आणि सदाचार हे निपजतात, आणि सद्विचारांच्या आणि सदाचारांच्या आंगीं जी शक्ति असते ती दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं नसते.

'प्राणी सुद्धा'='जनुषः'. प्रथमेचें वहुवचन.

या ऋचेचा चौथा चरण खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावा लागतोः—

सदिओ भुवद्वॉरिआय नोधाः

अस्मा इदु त्यदनु दाय्येषामेको यद्वव्ने भूरेरीशानः ।
प्रैतशं सूर्ये पस्पृधानं सौवश्व्ये सुष्विमावदिन्द्रः ॥ १५ ॥

अस्मै । इत् । ऊम् इति । त्यत् । अनु । दायि । एषाम् । एकः । यत् । वव्ने । भूरेः । ईशानः ।

प्र । एतशम् । सूर्ये । पस्पृधानम् । सौवश्व्ये । सुस्विम् । आवत् । इन्द्रः ॥ १५ ॥

भाषायाम्.

१५. अस्मा इदु (=अस्मा एव) [इन्द्राय] एषाम् (=अस्मद्रूपाणामेषां जनानां) त्यत् (=तत् प्रसिद्धं) [स्तोत्रम्] अनुदायि (=अकारि) यत् [स्तोत्रं] भूरेः (=बहुनः प्राणिजातस्य) एकः (=अद्वितीय) ईशानः (=स्वामी) वव्ने (=ययाचे =इष्टवान्)। इन्द्रः सूर्ये सौवश्व्ये (=सूर्यसौवश्व्यनामकेन केनचित्सह) पस्पृधानं (=युध्यन्तं) सुष्वि (=सोमानामभिषोतारम्) एतशम् (=एतन्नामानं कंचिदुपासकम्) प्रावत् (=प्रकर्षेण संरक्षितवान्)॥

अस्यामृचि 'सूर्ये पस्पृधानं सौवश्व्ये' इति वाक्यं दुर्बोधतरमनुसायणमेवास्माभिर्बोधितम्। ते हि वदन्ति। "उत्तरार्धस्येयमाख्यायिका। स्वश्वो नाम कश्चिद्राजा। स च पुत्रकामः सूर्यमुपासांचक्रे। तस्य च सूर्य एव पुत्रो बभूव। तेन सहैतशनाम्नो महर्षेर्युद्धं जातमिति।" अत्र यद्यपि सूर्यसौवश्व्ययोः पदयोर्निर्वचनं सायणेन व्याख्यायिकामनुसृत्य कृतं चिन्त्यं भवेत् तदपि सूर्यः सौवश्व्य इति नाम्ना कश्चित्प्रसिद्धः पुरुषो न भवेदिति न। केचित् पाश्चात्यपण्डितास्तु सूर्ये तेजस्विनि सौवश्व्ये शोभनानामश्वानां समूहे पस्पृधानं स्पृहां कुर्वन्तं शोभनाश्वरूपस्य धनस्येच्छां कुर्वन्तम् इतीच्छन्तीति भाति॥

१५. असंख्य लोकांचा एकला प्रभु [जो इंद्र] त्याला जें आवडतें तें हें आमचें [स्तोत्र] त्या इंद्रालाच अर्पण केलें आहे. सोम अर्पण करून उपासना करणारा एतश सूर्यसौवश्व्याशीं युद्ध करीत असतां त्याचें संरक्षण इंद्र करिता झाला.

15. To Him alone this hymn of ours is offered, which he, the single Lord of all, loves. Indra protected the Soma-pressing Etas'a who was fighting with Sûrya Sauvas'vya.

---

१५. 'अनेक लोकांचा एकला प्रभु असा जो इंद्र, त्याला जें आवडतें असें हें आमचें स्तोत्र आम्हीं इंद्रालाच अर्पण केलें आहे. तर तो आमचें संरक्षण करो. संरक्षण करण्याविषयीं इंद्राची प्रख्याति आहे. उदाहरणार्थ, एतश नांवाचा उपासक सूर्यसौवश्व्य या नांवाच्या मनुष्याबरोबर लढत असतां त्याला इंद्रानें रक्षिलें म्हणून प्रसिद्धि आहेच', असें तात्पर्य.

'सूर्यसौवश्व्याशीं युद्ध करीत असतां' ='सूर्ये पस्पृधानं सौवश्व्ये.' हा अर्थ आम्हीं सायणांस अनुसरून केला आहे. पण त्याच्या निर्विवादत्वाविषयीं विशेष सांगतां येत नाहीं. 'सूर्याची बरोबरी करणाऱ्या घोड्यांची इच्छा करणारा जो त्याला' असाहि अर्थ अक्षरशः होऊं शकेल.

'एतश' हा कोण होता अथवा 'सूर्यसौवश्व्य' कोण होता याविषयीं विशेष म्हणण्यासारिखें कांहीं ठाऊक नाहीं. सू. ५४, मं. ६ पहा.

वृत्तसुखार्थ ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें आहे असें समजावें.

अस्मा इदु त्यदनु दायि एषाम्
एको यद्वव्ने भूरेरीशआनः ।
प्र एतशं सूरिएँ पस्पृधानं
सौवश्विए सुषुइमावदिन्द्रः ॥

एवाते हारियोजना सुवृक्तीन्द्र ब्रह्माणि गोतमासो अक्रन् ।
ऐषु विश्वपेशसं धियं धाः प्रातर्मक्षू धियावसुर्जगम्यात् ॥
॥ १६ ॥ २९ ॥ ४ ॥

एव । ते । हारिऽयोजन । सुऽवृक्ति । इन्द्र । ब्रह्माणि । गोतमासः । अक्रन् ।
आ । एषु । विश्वऽपेशसम् । धियम् । धाः । प्रातः । मक्षु । धियाऽवसुः । जगम्यात् ॥ १६ ॥ २९ ॥ ४ ॥

भाषायाम्.

१६. हे हारियोजन (=हर्योरश्वयोर्योजनं युग्मं यस्य रथे स) इन्द्र, गोतमासः (=गोतमाः=गोतमगोत्रोत्पन्ना अस्मद्रूपा उपासका) एव (=एवम्=अनेन प्रकारेण) ते (=त्वदर्थं) सुवृक्ति (=सुवृक्तीनि=सुरचनानि=सुन्दराणि) ब्रह्माणि (=स्तोत्राणि) अक्रन् (=अकृषत), आ एषु (=एषु स्तोतृषु गोतमेषु) विश्वपेशसं (=सर्वरूपां) धियं (=धनं) धाः (=धेहि=स्थापय=अस्मभ्यं गोतमेभ्यो देहि)। —धियावसुः (=धीमान्=प्रज्ञायुक्त) [इन्द्रः] प्रातः (=प्रातःकाले) मक्षु (=सत्वरं) जगम्यात् (=दिनेदिन आगच्छतु) ॥

१६. या प्रकारेंकरून हे सुवर्णवर्णाचे घोडे जोडिलेल्या रथांत जाणाऱ्या इंद्रा, हे सुंदर मंत्र गोतमांनीं तुजप्रीत्यर्थ केले आहेत. तर तूं आमच्या ठायीं सर्व प्रकारचें धन स्थापित कर.—बुद्धिमान् [इंद्र] प्रतिदिवसीं सकाळीं येत जाओ.

16. Thus, O Indra, that harnessest a pair of golden steeds to thy car the Gotamas have made these well-fashioned hymns for thee. Confer thou upon us wealth of all forms.—May wise [Indra] come early each day in the morning.

---

१६. 'सोन्याचे घोडे रथास जोडून जाणाऱ्या हे इंद्रा, या प्रकारेंकरून आम्हीं गोतमांनीं तुझी स्तुति केली आहे आणि ती सुंदर रीतीनें केली आहे. तर ती तूं मान्य करून घे आणि आम्हां उपासकांला सर्व प्रकारचें धन दे' असा भावार्थ. हा या सूक्ताचा उपसंहार झाला आणि उपसंहार झाला असें दर्शविण्याकरितां ऋषीनें 'या प्रकारेंकरून' (एव) असें या ऋचेंत पद घातलें आहे; आणि उपसंहारांत कांहीं तरी वरप्रदान मागावयाचें असतें तें यांत मागितलें आहे. तें हें कीं, इंद्रानें स्तुति मान्य करून घ्यावी आणि स्तुतिकर्ते जे गोतमकुळांतील ऋषि त्यांजला सर्व प्रकारचें धन द्यावें.

'सुवर्णवर्णाचे' इ० = 'हारियोजन.' इंद्राचे घोडे सुवर्णवर्णाचे आहेत असें सांगितलें आहे.

'गोतमांनीं.' सूक्तकर्ता जो नोधा ऋषि तो गोतमकुळांतील आहे हें लक्षांत ठेविलें म्हणजे 'गोतमांनीं' कां म्हटलें तें समजेल; कारण कीं सूक्तकर्ता आपल्या कुटुंबांतील सर्व माणसें जवळ घेऊन त्यांजबरोबर इंद्रोपासना करीत आहे आणि त्यांजबरोबर मिळून सूक्त रचून म्हणत आहे असें समजलें पाहिजे.

'बुद्धिमान्' इ०. हा चवथा चरण ध्रुवपदासारिखा आहे तो पूर्वीं आलाच आहे. याचा संबंध या सूक्ताशीं अथवा या ऋचेशीं विशेष आहे अथवा इष्ट तरी आहे असें नाहीं.

संहितापदपाठयोरशुद्धानि ।

पृष्ठे	पङ्क्तौ	अशुद्धम्	शुद्धम्
१७	८	उ॒स्राः । इ॑व	उ॒स्राःऽइ॑व
१७	१०	जु॒षन्त॒	जु॑षन्त॒
४१	४	म॒न्दु॒ इति॑	म॒न्दू॒ इति॑
१२९	७	अ॒नु॒ऽका॒मम्	अ॒नु॒ऽका॒मम्
१८९	१२	०व॒रु॑णा हु॒वे	०व॒रु॑णा । हु॒वे
२०९	९	इ॒म॒हे॒	ई॒म॒हे॒
२१७	३	अनु॑ । ए॒त॒वै	अनु॑ऽए॒त॒वै
३६५	३	ते	ते॒
४२३	१	वि सु॒प॒र्णौ	वि सु॑प॒र्णौ
४२२	१	हि॒र॑रण्य०	हि॒र॑ण्य०
५३३	७	दु॒ःऽर्गा	दु॒ःऽगा
५७७	७	वि॒भा॒ऽव॒सो॒ इति॑	वि॒भा॒व॒सो॒ इति॑
६१३	८	शं॒ऽभु॒ इति॑	शं॒भु॒ इति॑
६२९	३	पु॒रु॒ऽव॒सू॒ इति॑	पु॒रु॒व॒सू॒ इति॑
६५३	३	म॒हि॒	म॒हि॒
६६५	१०	य॒न्ति । अ॒क्तु॒ऽभिः॑	य॒न्ति॒ । अ॒क्तु॒ऽभिः॑
६७५	२	०यी॒तिः॒	०यी॒ति॒
७०७	५	सु॒ऽक्र॒तो॒ इति॑	सु॒क्र॒तो॒ इति॑
७२७	३	ह्र॒दं॑म्	ह्र॒दम्
७३७	५	स्व॒१॒रि॑ति॒ स्वः॑	स्वः॑१॒रि॑ति॒ स्वः॑
७७९	१	नर्यं॑	नर्यं॑
८३१	५	अ॒पः	अ॒पः
८५१	४	अ॒ग्ने	अ॒ग्ने॒

भाषायामशुद्धानि ।

३९५	१५	अनवग्रगोहनौ	अवग्रगोहनौ
४०५	९	इषा०	ईषा०
८०१	१५	वृत्रहा	वृत्रः

पांच ता. १ पासून ता. ३१ मे १८७७ पर्यंत.

	रु. आ.
रा. सा. लालशंकर उमियाशंकर, सब जज्ज.	६-६
रा. रा. दलपतराम प्राणजीवन.	६-६
,, ,, जटाशंकर कृपाशंकर, हेड मास्तर.	६-६
,, ,, राजाराम रामकृष्ण हेड मास्तर खल्फान स्कूल.	६-६
,, ,, ओरा वागजी रूपजी कोतवाल....	६-६
,, ,, जगन्नाथ जेठालाल, मास्तर स्कूल नं. १.	६-६
,, ,, माधवजी वेलजी, मास्तर नं. २.	६-६
,, ,, अधिकारी कृष्णाजी द्वारकादास मदीर....	६-६
,, ,, श्रीनिवास मरतोबा नाडकर्णी.....	६-६
,, ,, चुनिलाल साराभाई, हुजूर असि.	६-६
,, ,, रामचंद्र काशिनाथ, वकील....	६-६
,, ,, मूळशंकर पुरणदास मेहेता, फर्स्ट असि. मास्तर.	६-६
,, ,, जदुराम मंगळजी, सेकंड असि. मास्तर.....	६-६
,, ,, नारायण जिवाजी देशपांडचे....	६-६
,, ,, विष्णु सदाशिव जांभेकर	६-६
डाक्टर नारायणराव अनंत..	६-६
,, भाऊ शिरके.	६-६
सेक्रेटरी, भूज दरबार लायब्ररी.	६-६
सेक्रेटरी, नेटिव लायब्ररी, लुनावाडा....	६-६

Registered No. 98 of 1877.

सूचना.

	रु. आ.
वर्षाची वर्गणी, आगाऊ	६ ०
मुंबईबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दरवर्षाचे	० ६

All communications to be addressed to the Manager Mr. Mahâdev Nârâyan Pandit, No. 29 *Moroba Popatji's Oart, Kalka Devi Road, Bombay.*

ग्रंथकर्त्याच्या नांवचा वगैरे सर्व प्रकारचा पत्रव्यवहार मुंबई मोरोबा पोप-टजीची वाडी घर नंबर २९, या पत्त्यावर रा. रा. महादेव नारायण पंडित "म्यानेजर वेदार्थयत्न" यांच्याशीं ठेवावा.

विशेष सूचना.—आमच्या कितीएक वर्गणीदारांस १२ वा अंक पोंचून १४ वा पोंचण्याची वेळ आली असतांही त्यांजकडून अद्यापि वर्गणीचा पैसा आला नाहीं. तर मेहेरबानी करून तो त्यांनीं "आगाऊ" शब्दाकडे विशेष लक्ष देऊन लवकर पाठवावा. तिकीटें पाठविणें झाल्यास अर्धा आणा द-राचीं असून दर रुपयास अर्धा आणा वर्ताळा असावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

THE

VEDÂRTHAYATNA

OR

AN ATTEMPT TO INTERPRET THE VEDAS.

वेदार्थयत्न.

ऋग्वेदसंहिता

पदांसहित व

तिचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

पुस्तक २. जून सन १८७७. अंक ~~१.~~
Vol 2 June 1877 No 15

मुंबई:

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

(हें सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदलें आहे.)

माझे

सर्व आर्य बंधु व भगिनी

यांस

हें भाषांतर

सादर समर्पण केलें आहे.

भाषांतरकर्ता.

माझे

सर्व आर्य बंधु व भगिनी

यांस

हें भाषांतर

सादर समर्पण केलें आहे.

भाषांतरकर्ता.

सूक्तम् ६२.

गौतमो नोधा ऋषिः । इन्द्रो देवता । त्रिष्टुप् छन्दः ।

प्र म॑न्महे शवसा॒नाय॑ शू॒षमा॑ङ्गू॒षं गिर्व॑णसे अङ्गिर॒स्वत् ।

सु॒वृ॒क्तिभिः॑ स्तुव॒त ऋ॑ग्मि॒याया॒र्चा॑मा॒र्कं नरे॒ विश्रु॑ताय ॥ १ ॥

प्र । म॒न्म॒हे॒ । श॒व॒सा॒नाय॑ । शू॒षम् । आ॒ङ्गू॒षम् । गिर्व॑णसे । अ॒ङ्गि॒र॒स्वत् ।
सु॒वृ॒क्तिऽभिः॑ । स्तु॒व॒ते । ऋ॒ग्मि॒याय॑ । अर्चा॑म । अ॒र्कम् । नरे॑ । विऽ-
श्रु॑ताय ॥ १ ॥

भाषायाम्.

१. शवसानाय (=बलवते) गिर्वणसे (=स्तुतिप्रियाय) [इन्द्राय] शूषं (=सुखकरम्) आङ्गूषं (=स्तोत्रम्) अङ्गिरस्वत् (=अङ्गिरसो यथा) प्र मन्महे (=प्रकर्षेण अवगच्छामः=प्रकर्षेण करवाम)। स्तुवते (=स्तूयमानाय=सर्वैरपि स्तुताय) ऋग्मियाय (=अर्चनीयाय) विश्रुताय (=विशेषेण प्रख्याताय) नरे (=नेत्रे) [इन्द्राय] सुवृक्तिभिः (=सुसंस्कृतिरूपाभिः स्तुतिभिः) अर्कं (=स्तोत्रम्) अर्चाम (=गायेम)

सूक्त ६२.

ऋषि– अंगिरसकुळांतील नोधा. देवता–इंद्र. वृत्त–त्रिष्टुभ्.

१. बलवान् [आणि] स्तुतिप्रिय [इंद्रा]प्रीत्यर्थ [आपण] अंगिरसांप्रमाणें सुखकारक स्तोत्र गाऊं. [सर्व लोकांनीं] स्तुत [आणि] स्तवनीय [असा जो] प्रख्यात शूर [इंद्र], त्याची सुंदर स्तोत्रांच्या योगानें स्तुति गाऊं.

HYMN 62.

To *Indra*. By *Nodhas* of the family of *Angiras*. Metre—*Trishṭubh*.

1. Let us think forth like the Angirases an agreeable hymn to mighty [Indra], who loves a prayer. With well-fashioned prayers let us sing a song to the renowned Hero, who is praised [and] deserves to be praised.

---

१. हा पांचव्या अध्यायाचा आरंभ आहे. ऋषि पूर्वसूक्ताचा कर्ता जो नोधा तोच आहे. आणि हें सूक्त इंद्राविषयीं आहे. ऋषि म्हणतो कीं, ' आमचे पूर्वज अङ्गिरस ऋषि जशी इंद्राची स्तुति करीत असत तशी आपण इंद्राची स्तुति करूं. कारण इंद्र बलवान् आहे आणि त्याला स्तोत्र आवडतें. इंद्राची स्तुति सर्वजण करितात, आणि ती सर्वांनीं करण्यास योग्य होय; कारण कीं तो प्रख्यात योद्धा होय. तर आमचे जे पूर्वज अंगिरस ते इंद्राची स्तुति करीत त्याप्रमाणें आम्हीहि करूं. '

नोधा ऋषि अंगिरसकुळांतील असल्यामुळें अंगिरसांप्रमाणें इंद्राची स्तुति करूं असें म्हणतो त्याचा अर्थ सहज समजण्यासारिखा आहे. आमचे वाडवडील इंद्राची उपासना करीत तशी आम्हीहि करूं असें तात्पर्य. आतां जसे आपले सर्वांचे कुलदेव आहेत तसेच पूर्वी वैदिकयुगांतहि असत. मात्र भेद इतकाच कीं आपल्या पूर्वजांचे कुलदेव म्हणजे जगाची घडामोड करणारे इंद्रादि देव असत, आणि आमचे कुलदेव म्हटले म्हणजे लहानशा गांवांतील एकाद्या आकुंचित देवळामध्यें स्थापिलेली जी मूर्ति तद्रूप असतात. याशिवायहि दुसरे भेद बरेच दृष्टीस पडतात. आपल्या कुळदेवतेच्या दर्शनासाठीं आपण जन्मांतून एकदा तरी गेलेंच पाहिजे असें आम्ही समजतों. आपले आर्य पूर्वज तसें समजत नसत. त्यांचे कुलदेव एका कोणत्या तरी ठिकाणीं बांधलेले नसल्यामुळें ते बसल्या ठिकाणींच कुळदेवतांची उपासना आणि तीहि साध्या रीतीनें करीत असत. ते यात्रेला जात नसत, आणि ब्राह्मणभोजनहि घालीत नसत. त्यांची उपासना म्हणजे केवळ स्तोत्रें रचावीं, तीं मोठ्या

प्र वो॑ म॒हे महि॒ नमो॑ भरध्वमाङ्गू॒ष्यं॑ शवसा॒नाय॒ साम॑ ।
येना॑ नः॒ पूर्वे॑ पि॒तरः॑ पद॒ज्ञा अर्च॑न्तो॒ अङ्गि॑रसो॒ गा अवि॑न्दन्॥२॥

प्र । वः॒ । म॒हे । महि॑ । नम॑ः । भ॒र॒ध्व॒म् । आ॒ङ्गू॒ष्य॑म् । श॒व॒सा॒नाय॑ । साम॑ ।
येन॑ । नः॒ । पूर्वे॑ । पि॒तर॑ः । प॒द॒ऽज्ञाः । अर्च॑न्तः । अङ्गि॑रसः । गाः ।
अवि॑न्दन् ॥ २ ॥

भाषायाम्.

२. [हे स्तोतारः], वः (=यूयं) महे (=महत) [इन्द्राय] महि (=महत्) नमः (=स्तोत्रं) प्र भरध्वं (=प्रार्पयत), शवसानाय (=बलवत) [इन्द्राय] आङ्गूष्यम् (=आघोषयुक्तं) साम (=गीतं) [प्र भरध्वम्] । येन [इन्द्रेण] नः (=अस्माकं) पूर्वे (=पुरातनाः) पितरः अर्चन्तः (=पूजयन्तः) अङ्गिरसः पदज्ञाः (=पदानि ज्ञातवन्तः सन्तो) गाः (=पणिनापहृता यास्ता) अविन्दन् (=लब्धवन्तः) ॥

येन नः पितरः पणिनामासुरहृता गा अविन्दन् तमिन्द्रं स्तुतेत्यर्थः । पुरा किल वलभटैः पणिभिर्मेघोदकरूपा गा अपहृत्य गुहायां स्थापिताः । तासां प्रवृत्तये सरमा नाम देवशुनी इन्द्रेण प्रेषिता । तया ज्ञातपदास्ता इन्द्रेण अङ्गिरोभिश्च प्रत्यपहृता इति वेदे प्रसिद्धम् ॥

प्रेमानें म्हणावीं, आणि जें आपल्याजवळ देवांस अर्पण करण्यासारिखें असेल तें अर्पण करावें. आणि त्यालाच ते ‘यज्ञ’ म्हणत असत.

‘प्रख्यात शूर इंद्र’ वेदांत आपले आर्य पूर्वज जीं विशेषणें देवाला लावीत तीं फार चमत्कारिक आणि लक्ष लावून विचार करण्यासारिखीं आहेत. जे जे उत्तम गुण मनुष्याच्या आंगीं असणें अवश्य होय असें ते समजत तेच देवांच्या आंगीं आहेत असें समजून त्यांचें वर्णन करीत असत. आपण आतां आपले पूज्य देव जे विठोबा इत्यादि ते ‘शूर’ होत असें वर्णन करीत नसतों; कारण शूरपण असणें हें अवश्य आहे असें आतां आम्ही समजत नसतों.

ही ऋचा साधारण श्लोकाप्रमाणें खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणतां येतेः—

प्र मन्महे शवसॉनाय शूषम्
आङ्गूषं गिर्वणसे अङ्गिरस्वत् ।
सुवृक्तिभिः स्तुवते ऋग्मियाय
अर्चाम अर्कं नरे विश्रुताय ॥

२. मोठ्या [इंद्रा]साठीं तुम्ही मोठें स्तोत्र अर्पण करा, बलवान् [इंद्रा]साठीं आघोषयुक्त गीत [अर्पण करा]; ज्या [इंद्रा]-च्या योगानें आमचे पूर्वींचे पितर भाविक अंगिरस गोष्पदज्ञ [होत्साते] गाईंप्रत पावले.

2. Offer ye a great hymn to the great [Indra], a loud psalm to mighty [Indra], through whom our worshipping ancient Fathers the Angirases, knowing the footsteps, found the cows.

---

२. भावार्थः— 'पूर्वी अंगिरसांच्या गाई पणि नांवाच्या असुरांनीं हरण करून नेल्या होत्या. त्या अंगिरसांनीं शोधून काढून पुनः आणिल्या, आणि असें करण्याची शक्ति त्यांस इंद्रानें दिली; इंद्रानेंच त्यांस गाईंची पावलट दाखविली आणि त्यामुळें हरण करून नेलेल्या गाईंचा पत्ता लागला. तर असा जो मोठा आणि बलवान् इंद्र त्याच्या प्रीत्यर्थ मोठें आणि गर्जनायुक्त असें स्तोत्र म्हणा'— हें नोधा ऋषि आपलेजवळ बसलेल्या दुसऱ्या उपासकांस म्हणतो आहे.

वेदांत अशी कथा आहे कीं, पूर्वी पणि नांवाच्या असुरांनीं गाई हरण करून नेल्या आणि गुहेंत लपवून ठेविल्या. त्यांचा थांग लागेना. तेव्हां देवांची सरमा या नांवाची जी कुतरी, तिला गाईंचा थांग लावण्यास इंद्रानें पाठविली. तिच्या योगानें इंद्र आणि अंगिरस यांणीं पत्ता लावून गाई परत आणिल्या. आतां ह्या गाई म्हणजे कोणत्या, आणि पणि ते कोण, आणि सरमा कोण? गाई म्हणजे मेघोदकें, पणि म्हणजे वृत्रादिक जे मेघावरोध करणारे रूपकसिद्ध असुर ते; आणि सरमा ही कुत्री वेदांत प्रसिद्ध आहे. कोणातरी धनगराच्या गाई अथवा गुरें चोरांनीं नेलीं तर पावलें पाहून पत्ता लावणें हें काम कुत्र्यानें न करावें तर कोणीं करावें? यास्तव इंद्रादि देवांला कुत्री आहे असें कल्पणें यांत विशेष नवल नाहीं. पणिनामक जे बलाचे प्यादे त्यांनीं गाई कोंडून ठेविल्या होत्या आणि त्यांस सरमेनें शोधून काढिलें आणि मग इंद्र आणि अंगिरस यांनीं त्या तेथून परत आणिल्या ही कथा वेदाच्या वेळीं प्रसिद्ध झालेली असे. ऋ. १०, १०८ हें सूक्त पहा. त्यांत सरमा आणि पणि यांचा संवाद वर्णिला आहे. सरमा पणींच्या गुहेंत पोंहचल्यावर पणींनीं तिला प्रथम भीति घातली. ती ऐकेना तेव्हां मग तिला तूं आपली बहिण हो, तूं आणि आम्ही मिळून या आम्ही आणिलेल्या गाई वांटून घेऊं, असें सांगितलें; तरी तिणें ऐकिलें नाहीं, आणि इंद्र आणि अंगिरस

इन्द्रस्याङ्गिरसां चेष्टौ विदत्सरमा तनयाय धासिम् ।
बृहस्पतिर्भिनदद्रिं विदद्गाः समुस्रियाभिर्वावशन्त नरः ॥ ३ ॥

इन्द्रस्य । अङ्गिरसाम् । च । इष्टौ । विदत् । सरमा । तनयाय । धासिम् । बृहस्पतिः । भिनत् । अद्रिम् । विदत् । गाः । सम् । उस्रियाभिः । वावशन्त । नरः ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. इन्द्रस्य अङ्गिरसां च इष्टौ (=प्रेषणे सति) सरमा तनयाय (=स्वपुत्रपौत्रादिहितार्थं) धासिं (=क्षीररूपमन्नं) विदत् (=अविन्दत्=लब्धवती) । [तदनन्तरं] बृहस्पतिः (=इन्द्रः?) अद्रिम् (=अद्रिसदृशरूपं मेघं) भिनत् (=अभिनत्=विभेद) [अपि च] गा विदत् (=गा लब्धवान्) । [अनन्तरं] नरः (=शूरा) [अङ्गिरसः] उस्रियाभिः (=ताभिः प्रत्यपहृताभिर्गोभिः) सं (=सह) वावशन्त (=हर्षशब्दमकुर्वन्) ॥

अत्र सायणाः । " अत्रेदमाख्यानम् । सरमा नाम देवशुनी । पणिभिर्गोष्वपहृता-
" सु तदन्वेषणाय तां सरमामिन्द्रः प्राहैषीत् । यथा लोके व्याधो वनान्तर्गतमृगान्वेष-
" णाय श्वानं विसृजति तद्वत् । सा च सरमैवमवोचत् । हे इन्द्र अस्मदीयाय शिशवे
" तद्गोसंबन्धि क्षीराद्यन्नं यदि प्रयच्छसि तर्हि गमिष्यामीति । स तथेत्यब्रवीत् । तथा
" च शाट्यायनकम् । अन्नादिनीं ते सरमे प्रजां करोमि या नो गा अन्वविन्द इति ।
"ततो गत्वा गवां स्थानमज्ञासीत् । ज्ञात्वा चास्मै न्यवेदयत् । तथा निवेदितासु गोषु
" तमसुरं हत्वा ता गाः स इन्द्रोलभतेतीति " ॥

यांस जाऊन सांगितलें. त्यावरून ते येऊन गाई घेऊन गेले. त्याच सूक्तावरून या गाई म्हणजे मेघोदकरूपी होत आणि पणि म्हणजे वृत्रादिक जे रूपकसिद्ध असुर ते होत हें उघड दिसून येतें.

'गोष्पदज्ञ होत्साते '='पदज्ञाः.' म्हणजे त्यांस गाई कोणत्या मार्गानें गेल्या होत्या तो मार्ग समजून.

हा मंत्र श्लोकाप्रमाणें म्हणतां येतो तो असाः—

प्र वो महे महि नमो भरध्वम्
आङ्गूषिअं शवसानाय साम ।
येना नः पूर्वे पितरः पदज्ञा
अर्चन्तो अङ्गिरसो गा अविन्दन् ॥

३. इंद्राची आणि अंगिरसांची आज्ञा झाल्यावर सरमा [आपल्या] मुलांकरितां दूध मिळविती झाली. बृहस्पति पर्वताला फोडिता झाला [आणि] गाई मिळविता झाला. [मग ते] शूर [योद्धे] गाईंबरोबर हर्षशब्द करिते झाले.

3. At the command of Indra and of the Angirases Saramâ found milk for [her] sons. Bṛihaspati broke the mountain [and] found the cows. The heroes shouted with the lowing cows.

३. भावार्थः– ' इंद्रानें सरमा कुत्रीला पणींनीं नेलेल्या गाईंच्या शोधार्थ पाठविलें. तेव्हां ह्या गाई शोधून काढिल्या तर आपल्या मुलांबाळांस दूध प्यावयास मिळेल असें समजून तिणें जाऊन त्या गाई कोठें लपवून ठेविल्या होत्या तें ठिकाण हुडकून काढिलें. मग इंद्रानें पर्वतासारिखा जो मेघ, कीं ज्याच्या गुहेंत त्या गाई झांकून ठेविल्या होत्या, तो फोडिला, आणि आंतून गाई मोकळ्या करून सोडून दिल्या. तेव्हां त्या गाईंस आनंद होऊन त्या जशा हंबरडा फोडून ओरडल्या त्याप्रमाणेंच अंगिरसांनींहि मोठ्या आनंदानें गर्जना केली. '

' आज्ञा झाल्यावर '= ' इष्टौ. ' अक्षरशः अर्थ ' पाठविणें झाल्यावर ' म्हणजे इंद्र आणि अंगिरस यांणीं तिला गाईंचा शोध लावण्याकरितां पाठविल्यावर.

'[आपल्या] मुलांकरितां दूध मिळविती झाली '= ' तनयाय धासिं विदत्.' म्हणजे आपल्या मुलांस दूध मिळेल या हेतूनें गाईंचा शोध लाविला, गाई शोधून काढिल्या, असें तात्पर्य.

' बृहस्पति. ' येथें बृहस्पति म्हणजे इंद्र समजावयाचा असें सायणाचार्य म्हणतात. ऋ. ९. १०८. ६ यांतहि यासारिखाच बृहस्पतीचा संबंध आला आहे. तेव्हां बृहस्पति म्हणजे इंद्र समजावयाचा, किंवा या सरमेनें गाई शोधून काढिल्याविषयींच्या गोष्टीशीं बृहस्पति या वैदिक स्वतंत्र देवतेचा खरोखरच कांहीं संबंध असून तो काय आहे तें आतां कोणास ठाऊक नाहीं असें झालें आहे कीं काय तें समजत नाहीं.

' पर्वताला '= ' अद्रिम्.' म्हणजे ज्या गुहेंत गाई लपवून ठेविल्या होत्या ती पर्वतांतील गुहा. पर्वत म्हणजे तरी येथें मेघच समजावयाचा आहे.

हीं ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें आहेः–

इन्द्रस्या॑ङ्गिरसां च इ॒ष्टौ
विदत्सरमा तनयाय धासिम् ।
बृहस्पतिर्भिनदद्रिं विदद्गाः
समुस्रियाभिर्वावशन्त नरः ।

स सुष्टुभा स स्तुभा सप्त विप्रैः स्वरेणाद्रिं स्वर्यो३ नवग्वैः ।
सरण्युभिः फलिगमिन्द्र शक्र वलं रवेण दरयो दशग्वैः ॥ ४ ॥

सः। सुऽस्तुभा। सः। स्तुभा। सप्त। विप्रैः। स्वरेण। अद्रिम्। स्वर्यः। नवऽग्वैः।
सरण्युऽभिः। फलिऽगम्। इन्द्र। शक्र। वलम्। रवेण। दरयः। दशऽग्वैः ४

गृणानो अङ्गिरोभिर्दस्म वि वरुषसा सूर्येण गोभिरन्धः ।
वि भूम्या अप्रथय इन्द्र सानु दिवो रज उपरमस्तभायः ॥५॥१॥

गृणानः। अङ्गिरःऽभिः। दस्म। वि। वः। उषसा। सूर्येण। गोभिः। अन्धः।
वि। भूम्याः। अप्रथयः। इन्द्र। सानु। दिवः। रजः। उपरम्। अस्त-
भायः ॥ ५ ॥ १ ॥

भाषायाम्.

४. स (=तादृशः) सुष्टुभा (=शोभनस्तोभयुक्तेन) स्वरेण स्वर्यः (=स्तवनीयः), स (=तादृशः) स्तुभा (=स्तुत्या) [स्वर्यः=स्तवनीयः] [त्वं] हे शक्र (=बलवन्) इन्द्र, सप्त विप्रैः (=मेधाविभिः) नवग्वैः (=एतन्नामकैरङ्गिरोभिः) सरण्युभिः (=शोभनगमनैः=शोभनाभियातिभिः) दशग्वैः (=एतन्नामकैरङ्गिरोभिः) [सह] [तम्] अद्रिम् (=अद्रिसदृशं) फलिगं (=मेघं) [तं] वलं (=मेघोदकानामावरकं) रवेण (=गर्जनेनैव, न तु प्रहारादिना) दरयः (=अदरयः=व्यदारयः)॥

पूर्वोक्तकर्मकारी त्वं वृत्रं हत्वा मेघजलान्यावर्जयसीत्यर्थः॥

५. हे दस्म (=पराक्रमवन्) [इन्द्र], अङ्गिरोभिः (= एतन्नामकैरस्माकं पितृभिः) गृणानः (=स्तुतः) [सन्], उषसा, सूर्येण, गोभिः (=किरणैश्च) अन्धः (=अन्धकारं) वि वः (=विविधम् अपावृणोः=उषसं सूर्यं किरणांश्च प्रकाश्य तमोपगमितवानसि)। हे इन्द्र, त्वं भूम्याः (=पृथिव्याः) सानु (=पृष्ठं) व्यप्रथयः (=विशेषेण व्यस्तारयः), [अपि च] दिवः उपरं (=द्युलोकाद् अधो) रजः (=अन्तरिक्षम्) अस्तभायः (=अस्तभ्नाः)॥

अत्रेदमुक्तं भवति। हे इन्द्र, यत्त्वं सूर्यादितेजसामावरकं वृत्रं हत्वा तत्तत्किरणरूपा गा मोचितवानसि तथा यत्त्वं पृथिवीं सृष्ट्वा तस्यास्तलं विस्तीर्णं कृतवानसि अन्तरिक्षस्योपरि च द्युलोकं सृष्ट्वा धारयसि तत्सर्वमस्माकं पितृभिः अङ्गिरोभिः स्तुतः सन्नेव कृतवानसि नान्यथा। अतः कारणात् तेषामेवाङ्गिरसां पुत्रा वयं त्वां स्तोतुमर्हामः त्वं च नः स्तोत्रं सावधानं श्रोतुमर्हसीति॥

४. असा जो शोभनस्तुतियुक्त स्वरानें [आणि] स्तुतीनें स्तवनीय तो तूं बुद्धिमान् सात नवग्व [आणि] आवेशयुक्त दशग्व यांच्या योगेंकरून, हे बलवान् इंद्रा, त्या पर्वताला, त्या मेघाला, त्या वलाला आपल्या गर्जनेनेंच फोडून टाकिता झालास.

4. Thus then, thus then thou, O mighty Indra, that deservest to be praised with praise [and] high-praising tone, didst thunderingly break, with the seven wise Navagvas [and] with the impetuous Das′agvas, [that] mountain, [that] cloud, [that] Vala.

५. हे पराक्रमकारी इंद्रा, तुझी अंगिरसांनीं स्तुति करितांच [तूं] उषेच्या [आणि] सूर्याच्या योगेंकरून [आणि] किरणांच्या योगेंकरून अंधकार विध्वंसिता झालास. [तूं] भूमीचें पृष्ठ पसरून विस्तीर्ण करिता झालास [आणि] [तूं] द्युलोकाच्या खालीं अंतरिक्ष स्थापिता झालास.

5. Praised by the Angirases, thou, O mighty [Indra], didst remove the darkness and didst manifest Ushas, the Sun [and] the [heavenly] Cows; thou, O Indra, didst spread out the surface of the earth, [and] didst support the firmament beneath the heaven.

---

४. ‘ तर असा जो तूं इंद्र, ज्याची स्तुति सुंदर स्तोत्रांनीं आणि शब्दांनीं करण्यास योग्य होय, तो सात नवग्व आणि दशग्व या अंगिरसकुळांतील पुरुषांसहित मेघास फोडून उदकें वाहविता झालास ’ असें तात्पर्य. इंद्रानें मेघमंडळ फोडून उदकें जमिनीवर पाडिलीं हा जो इंद्राचा हजारवेळ सांगितलेला पराक्रम तोच यांत रूपांतरानें वर्णिला आहे. नवीन विशेष सांगितलें आहे असें नाहीं.

‘ सात नवग्व आणि आवेशयुक्त दशग्व ’. नवग्व हे अंगिरसकुळांतीलच व्यक्तिविशेष असें सायणाचार्य म्हणतात. सू. ३३, मं. ६ याजवरची टीप पहा. नवग्वांच्या साहाय्यानें इंद्र वृत्रहनन करिता झाला असें जसें सांगितलें आहे तसेंच दशग्वांनींहि त्याला साहाय्य केलें म्हणून वर्णिलें आहे. जेथें जेथें नवग्वांविषयीं उच्चार येतो तेथें तेथें दशग्वांविषयींहि येत असतो. नवग्वांप्रमाणें दशग्व हेहि अंगिरसकुळांतीलच होत असें आढळतें. नवग्व आणि दशग्व हे इंद्राचे मित्र होत आणि त्यांच्या साहाय्यानें

तदु प्रयक्षतममस्य कर्म दस्मस्य चारुतममस्ति दंसः ।
उपह्वरे यदुपरा अपिन्वन्मध्वर्णसो नद्य१श्चतस्रः ॥ ६ ॥

तत् । ऊम् इति । प्रयक्षऽतमम् । अस्य । कर्म । दस्मस्य । चारुऽतमम् । अस्ति । दंसः ।
उपऽह्वरे । यत् । उपराः । अपिन्वत् । मधुऽअर्णसः । नद्यः । चतस्रः ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. तत् उ (=तदेव) अस्य (=इन्द्रस्य) कर्म प्रयक्षतमम् (=अतिशयेन पूज्यम्) [अस्ति], दस्मस्य (=पराक्रमवत) [इन्द्रस्य] [तत्] दंसः (=कर्म) चारुतमम् (=अतिशयेन शोभनम्) अस्ति, यद् [अयं] मध्वर्णसः (=मधुरोदकाः) चतस्र उपराः (=समीपस्था) नद्यः (=नदीः) उपह्वरे (=पृथिव्याः संबन्धिनि समीपदेशे) अपिन्वत् (=असिञ्चत्) ॥

अत्र चतस्रो नदीर्गङ्गादिका इन्द्रोसिञ्चदिति सायणपादाः । वस्तुतस्तु गङ्गादिकाश्चतस्रो नद्यः उत अन्या एव काश्चिदिति निश्चयेन वक्तुं न शक्यते ॥

वृत्रवधादिक पराक्रम इंद्रानें केले असें वर्णन आहे.

'आपल्या गर्जनेनेंच फोडून टाकिता झालास'= 'रवेण दरयः'. म्हणजे प्रहार मारण्याची अवश्यकता पडली नाहीं. मेघवृष्टि होते तेव्हां मोठी गर्जना होते आणि एकदम आकाश कोसळून खालीं गळतें असें दिसतें त्यामुळें इंद्राच्या गर्जनेनेंच मेघरूप पर्वत फुटतो असें म्हणणें साहजिक दिसतें.

ही ऋचा याप्रमाणें म्हणावीः—

स सुष्टुभा स स्तुभा सप्त विप्रैः
स्वरेण अद्रिं स्वर्यो नवग्वैः ।
सरण्युभिः फलिगमिन्द्र शक्र
वलं रवेण दरयो दशग्वैः ॥

५. 'उषा, सूर्य आणि प्रकाश यांस अवरोधून अंधकाररूप वृत्र सर्व आकाशाला व्यापून राहिला होता. तर त्या वृत्राला मारून इंद्रानें उषेला, सूर्याला आणि प्रकाशाला प्रादुर्भूत केलें तें अंगिरसांनीं त्याची स्तुति केल्यावर केलें आणि अंगिरसांनीं स्तुति केल्यावरच त्याणें पृथ्वीला उत्पन्न करून इतकी विस्तीर्ण केली, आणि अंतरिक्षावर द्युलोक उत्पन्न करून त्यांस वरचेवर सांवरून धरिलें. तर असा जो इंद्र, त्याणें आमचें स्तोत्र ऐकणें आणि आम्हीं त्याचें स्तोत्र गाणें हें योग्य होय,' असा अभिप्राय. इंद्राची स्तुति केली म्हणजे पाहिजे तें कृत्य करण्याची शक्ति त्याला येते असें

६. ह्याचें तें कृत्य परम पूज्य [होय], [तें] पराक्रमकारी [इं-द्रा]चें कृत्य अतिसुंदर होय, कीं याणें गोड पाण्याच्या च्यार खालच्या नद्या पृथिवीवर भरून पुष्ट केल्या.

6. That deed of His is the most praiseworthy, that exploit of mighty Indra is the most beautiful, that he fattened the four lower rivers of sweet water on earth.

जें वेदांत जिकडे तिकडे जाणविलें आहे त्याचें हें एक उत्तम उदाहरण होय. ऋषींनीं मंत्र म्हटले म्हणजे पाहिजे तें होत असे अशी जी पौराणिक समजूत, तिचें मूळ या आलंकारिक ऋषिवचनासारिख्या वचनांत आहे. येथें खरोखर ऋषीच्या मनांत विवक्षित इतकेंच आहे कीं, इंद्राचें स्तवन त्याचे भक्त जे अंगिरस त्यांनीं करितांच त्याला उत्तेजन येऊन त्यानें (इंद्रानें) पृथ्वीला उत्पन्न करून तिला विस्तीर्ण करणें इत्यादिक जीं महाकृत्यें तीं केलीं. परंतु या आलंकारिक भाषणाचें खरें ह्य जर समजलें नाहीं तर अंगिरसांनीं मंत्र म्हणतांच इंद्राला शक्ति आली असा अक्षरशः अर्थ समजणें हें साहजिक आहे, आणि पुराणादिकांत असाच प्रकार वस्तुतः घडून आला आहे.

ही ऋचा वृत्ताच्या संबंधानें खालीं दाखविल्याप्रमाणें समजावी:—

गृणानो अङ्गिरोभिर्दस्म वि वः
उषसा सूर्येण गोभिरन्धः ।
वि भूम्या अप्रथय इन्द्र सानु
दिवो रज उपरमस्तभायः ॥

यावरून पुरातनकाळीं आलीकडील प्रसिद्ध वृत्तें कशीं रचीत इतकेंच समजावयाचें, ह्रस्वदीर्घांचा पाहिजे तसा व्यतिरेक करीत असें नाहीं, पण जेथें आतां ऱ्हस्व पाहिजे तेथें पूर्वीं दीर्घ खपे, आणि जेथें दीर्घ पाहिजे तेथें तेव्हां ऱ्हस्व चालत असे. आतां तरी एकच वृत्त अक्षरसंख्येच्या संबंधानें पाहिल्यास महाराष्ट्र आणि गुजराथ यांत एकच असतां दीर्घऱ्हस्वाच्या संबंधानें त्या देशांत भिन्न भिन्न असतें.

६. भावार्थः— 'भूलोकींच्या च्यार गोडपाण्याच्या नद्या उत्पन्न करून त्यांत पुष्कळ पाणी वाहवितो हें जें इंद्राचें कृत्य तें फारच वर्णनीय होय, आणि फारच सुंदर होय.' यांत इतकेंच कठिण आहे कीं, पृथिवीवरच्या च्यार नद्या त्या कोणत्या? सायणाचार्य गंगा यमुना इत्यादि च्यार मुख्य नद्या असें म्हणतात. पण खरोखर त्याच च्यार नद्या कीं काय तें सांगवत नाहीं. कोणत्याहि असल्या तरी आपल्या आर्य पूर्वजांची नद्यांविषयीं मोठी सप्रेम प्रीति या मंत्रावरून दिसते.

द्विता वि वव्रे सनजा सनीळे अयास्यः स्तवमानेभिरर्कैः ।
भगो न मेने परमे व्योमन्नधारयद्रोदसी सुदंसाः ॥ ७ ॥

द्विता । वि । वव्रे । सनऽजा । सनीळे इति सऽनीळे । अयास्यः ।
स्तवमानेभिः । अर्कैः ।
भगः । न । मेने इति । परमे । विऽओमन् । अधारयत् । रोदसी इति ।
सुऽदंसाः ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. [स इन्द्रः] स्तवमानेभिरर्कैः (=स्तुवद्भिः स्तोत्रैः=स्तोत्रैः स्तूयमानः सन्) सनजा (=नित्यजाते=सर्वदाविद्यमानस्वभावे) सनीळे (=संलग्ने) [द्यावापृथिव्यौ] अयास्यः (=आयासरहितः सन्=सुखेनैव) द्विता वि वव्रे (=द्विधा विवृते अकरोत् =भेदेनास्थापयत्) । भगो मेने न (=भगः कामिन्याविव) सुदंसाः (=सुपराक्रमः =महापराक्रम) [इन्द्रः] परमे व्योमन् (=परमे व्योमनि=उत्तुङ्गतमे नभसि) रोदसी (=द्यावापृथिव्यौ) अधारयत् (=धारितवान्) ॥

अत्र ' भगो न मेने ' इति वाक्यं दुर्बोधतरम् । तथैव ' अयास्य ' इति विशेषणमपि वादग्रस्तार्थं द्रष्टव्यम् । सायणास्तु " यासः प्रयत्नः । तत्साध्यो यास्यः । न यास्योऽयास्यः । युद्धरूपैः प्रयत्नैः साधयितुमशक्य इत्यर्थ " इति ॥

नद्या भरून जाताहेत त्यांजवर त्यांचें अतिशय मोठें प्रेम असल्यामुळें ह्या च्यार नद्या उत्पन्न करून वाहविल्या हें इंद्राचें कृत्य परम वर्णनीय होय असें ऋषि म्हणतो.

वृत्तसुखासाठीं खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावें;—

तदु प्रयक्षतममस्य कर्म
दस्मस्य चारुतममस्ति दंसः ।
उपह्वरे यदुपरा अपिन्वन् ।
मध्वर्णसो नदिअश्चतस्रः ।

७. [उपासकांनीं] स्तोत्रें म्हटल्यामुळें [पराक्रमकारी] इंद्र सनातन [आणि] सहचारी [द्यावापृथिवींस] सहज विभागून टाकिता झाला. भग जसा उभय स्त्रियांस [धरितो तसा] पराक्रमकारी [इंद्र] अत्युच्च आकाशांत द्यावापृथिवींस अंतराळीं धारण करीत असतो.

7. He divided with ease the ancient sisters (earth and heaven), when praised with hymns,—mighty [Indra] held in the highest space earth and heaven like as Bhaga [holds] the two women.

---

७. 'अक्षय आणि एकमेकाला लागलेल्या ज्या द्यावापृथिवी त्यांला विभागून वेगवेगळ्या स्थापन करण्याची शक्ति इंद्राला आली ती त्याचें स्तोत्र उपासकांनीं केल्यावर आली, आणि त्याचें पृथक्करण इंद्रानें केलें तें सहज केलें, त्याला आयास पडले नाहींत. महापराक्रम इंद्रानें द्यावापृथिवींला परम उंच आकाशांत अंतराळीं ठेविलें आहे.' यांत तात्पर्य इतकेंच आहे कीं, प्रथम द्युलोक आणि पृथिवी हे एकमेकाला चिकटून लागलेले होते, नंतर त्यांस इंद्रानें निरनिराळे करून अंतराळीं आधाराशिवाय स्थापिले. आणि तसें करण्याची शक्ति इंद्राला आली ती त्याचीं स्तोत्रें उपासकांनीं गाइल्यामुळें आली. यांत कल्पना अशी दिसते कीं, द्युलोक आणि पृथिवी हीं पूर्वी एकच होतीं, नंतर त्यांस इंद्रानें विभागून पृथक् केलीं. ही जी कल्पना तेंच आमच्या ब्रह्माण्डगोळाचें बीज होय. म्हणजे, द्युलोक आणि पृथिवी हीं एका अंड्याचीं दोन शकलें होत आणि प्रथम तीं दोनीं मिळून एकच अंडें होतें अशी जी पौराणिक कल्पना तिचें मूळ बीज या येथील कल्पनेंत आहे.

या मंत्रांत 'भग जसा उभय स्त्रियांस धरितो तसा' ह्या उपमेचा अर्थ समजत नाहीं. दोन स्त्रिया कोण आणि त्यांस भग कसा धरितो तें समजत नाहीं. कदाचित् उभय स्त्रिया म्हणजे रात्र आणि उषा ह्या दोघी स्त्रियांस भग म्हणजे सविता जसा धरितो तसा, असा अर्थ होऊं शकेल. भग म्हणजे कोणता देव याविषयीं सू. १४, मंत्र ३ याजवरची टीप पहा.

'सहचारी'='सनीळे.' म्हणजे दोघीजण मिळून एकत्रच राहणाऱ्या.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला लागतो;—

द्विता वि वव्रे सनजा सनीळे
अयास्यिः स्तवमॉनेभिरर्कैः ।
भगो न मेने परमे विॲोमन्
अधारयद्रॉदसी सुदंसाः ॥

सनाद्दिवं परि भूमा विरूपे पुनर्भुवा युवती स्वेभिरेवैः ।
कृष्णेभिरक्तोषा रुशद्भिर्वपुर्भिरा चरतो अन्यान्या ॥ ८ ॥

सनात् । दिवम् । परि । भूम । विरूपे इति विऽरूपे । पुनःऽभुवा । युवती इति । स्वेभिः । एवैः ।
कृष्णेभिः । अक्ता । उषाः । रुशत्ऽभिः । वपुःऽभिः । आ । चरतः । अन्याऽअन्या ॥ ८ ॥

सनेमि सख्यं स्वपस्यमानः सूनुर्दाधार शवसा सुदंसाः ।
आमासु चिद्दधिषे पक्वमन्तः पयः कृष्णासु रुशद्रोहिणीषु ॥ ९ ॥

सनेमि । सख्यम् । सुऽअपस्यमानः । सूनुः । दाधार । शवसा । सुऽदंसाः ।
आमासु । चित् । दधिषे । पक्वम् । अन्तरिति । पयः । कृष्णासु । रुशत् । रोहिणीषु ॥ ९ ॥

भाषायाम्.

८. विरूपे (=शुक्लकृष्णतया विषमरूपे) पुनर्भुवा (=दिने दिने पुनःपुनर्जायमाने) युवती (=तरुण्यौ) [रात्र्युषसौ] स्वेभिरेवैः (=स्वैरेवैः=स्वकीयैर्गमनैः) सनात् (=चिरकालादेव), अक्ता (=रात्रिः) कृष्णेभिर्वपुर्भिः (=कृष्णैः अन्धकाररूपैर्वर्णैः) उषा रुशद्भिर्वपुर्भिः (=शुक्लैर्वर्णैः) [एतेन क्रमेण] अन्यान्या (=परस्परव्यतिहारेण) दिवं भूम परि (=द्यावापृथिव्यौ परितः) आचरतः (पर्यावर्तेते) ॥
"हे इन्द्र एतत्सर्वं त्वयैव कार्यते त्वदधीनत्वात्सर्वासां देवतानामित्यर्थः" ॥

९. शवसा सूनुः (=शवसः सूनुः=बलस्य पुत्रः=अतिबली) सुदंसाः (शोभनकर्मवान्=पराक्रमवान्) स्वपस्यमानः (=शोभनकर्मकारी=कुशलः) [एतादृश] [इन्द्रः] सनेमि सख्यम् (=अक्षयं सख्यं) दाधार (=उपासकानामुपरि महत् सख्यं कृतवान्) । [अपि च] आमासु चित् रोहिणीषु अन्तः (=अपरिपक्वास्वपि गोषु) पक्वं पयः (=परिपक्वं दुग्धं) [हे इन्द्र, त्वं] दधिषे (=धारयसि=स्थापयसि) [तथा] कृष्णासु (=कृष्णवर्णासु) रोहिणीषु (=गोषु) रुशत् (=शुक्लवर्णं) पयो दधिषे (=धारयसि) ॥

आमाः इत्यनेन निरुदकमेघमालारूपा गावः तथा कृष्णा रोहिण्यः इत्यनेन प्रकाशहीनाः किरणमालारूपा गावोवगन्तव्या भवन्ति । निरुदकेषु मेघेषूदकं स्थापितवान् तथा अन्धकारमपहार्य किरणान्प्रादुरभावयदिति भावः ॥

८. विषमरूप [आणि] पुनः पुनः जन्मणाऱ्या [ह्या] दोघी तरुण स्त्रिया आपल्या गमनांनीं द्युलोकाच्या [आणि] भूमीच्या सभोतालीं सनातन काळापासून एकामागून एक क्रमण करीत आहेत— रात्र [ही] कृष्णरूपानें [आणि] उषा [ही] प्रकाशमान रूपानें.

९. बळाचा पुत्र [असा जो] पराक्रमी [आणि] कौशल्यपूर्ण इंद्र [तो] [जनांवर] पूर्ण अनुग्रह करिता झाला, [आणि] अपक्क गाईंतहि पक्क दुग्ध घालिता झाला [आणि] काळ्या गाईंत शुभ्र [दुग्ध] घालिता झाला.

8. From eternity the dissimilar two young women, that are daily born, have in their own courses one after the other gone round the heaven [and] the earth,—Night with dark complexions [and] Ushas with fair ones.

9. The mighty son of might, full of skill, became a full friend [of the people], [and] placed the ripened milk even in the raw cows [and] fair milk in the black cows.

---

८. या मंत्रांत ऋषि म्हणतो, 'एकमेकापासून भिन्नरूपाच्या आणि प्रतिदिनीं पुनःपुनः जन्म पावणाऱ्या अशा ज्या रात्र आणि उषा, ह्याच कोणी तरुण स्त्रिया, त्या अगणित काळापासून आजपर्यंत पृथिवी आणि द्युलोक यांच्या सभोतालीं प्रदक्षिणा करीत आल्या आहेत, त्यांतून रात्र ही आपल्या काळ्या रूपानें आणि उषा ही आपल्या गौरवर्णानें याप्रमाणें एकामागून एक पृथिवी आणि द्युलोक यांच्या सभोतालीं फिरत आल्या आहेत. तर हे इंद्रा, हा सगळा तुझाच पराक्रम होय, कारण कीं सकळ देवता तुझ्याच आज्ञेंत वागत असतात'.

प्रतिदिनीं रात्र आणि रात्रीच्या मागोमाग उषा जन्मत असते, आणि चंद्रसूर्यादि तारे पृथिवीला आणि द्युलोकाला प्रदक्षिणा घालून जातात तशी प्रदक्षिणा घालून जात असते, असें म्हणणें यांत कल्पनासौंदर्य किती आहे तें सांगावयास नकोच. आपल्या आधुनिक कवींस अशा कल्पना बहुतकरून सुचणार नाहींत. त्यांचें लक्ष्य फारकरून आकाशाकडे जाणार नाहीं, आणि गेलेंच तर चंद्रावर जें काळें दिसतें तें अमुक राजाचा वाडा चंद्रमंडळापर्यंत गेला आणि तेणेंकरून त्यांत आरपार भोंक पडलें म्हणून काळें दिसतें इत्यादिक बालिशकल्पना ते पुष्कळ करितील.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला लागतेः—

सनाद्दिवं परि भूमा विरूपे

सनात्सनीळा अवनीरवाता व्रता रक्षन्ते अमृताः सहोभिः ।
पुरू सहस्रा जनयो न पत्नीर्दुवस्यन्ति स्वसारो अह्रयाणम् ॥
॥ १० ॥ २ ॥

सनात् । सऽनीळाः । अवनीः । अवाताः । व्रता । रक्षन्ते । अमृताः । सहःऽभिः ।
पुरु । सहस्रा । जनयः । न । पत्नीः । दुवस्यन्ति । स्वसारः । अह्रयाणम् ॥ १० ॥ २ ॥

भाषायाम्.

१०. सनात् (=चिरकालादारभ्य) सनीळाः (=समाननिवासस्थाना) अवाता (=अनन्यगमना) अमृताः (=मरणरहिता) अवनीः (=अवन्यः=अङ्गुलयः) सहोभिः (=स्वकीयैर्बलैः) [इन्द्रस्य] व्रता (=व्रतानि=कर्माणि) रक्षन्ते (=पालयन्ति) । पुरु (=पुरूणि) सहस्रा (=सहस्राणि) स्वसारः (=अङ्गुलिरूपा भगिन्यः), जनयः पत्नीर्न (=जनयः पत्न्य इव=जनयित्र्यः पत्न्य इव), अह्रयाणं (=लज्जारहितम्) [इन्द्रं] दुवस्यन्ति (=परिचरन्ति) ॥

चिरकालादारभ्य सर्वेषामपि मनुष्याणामङ्गुलयो यज्ञादि कर्म कृत्वा इन्द्रं भजन्ते । तत्र दृष्टान्तः । यथा अनेकाः स्वसार एकमेव पतिं परिचरन्ति स च अलज्जाहतः सन् परस्परस्वसृभावयुक्तानामपि सर्वासां तासां सेवां गृह्णीते तद्वद् इन्द्रोपि सकलानामङ्गुलीनां सेवां गृह्णीत इत्यर्थः ॥

पुनर्भुवा युवती स्वेभिरेवैः ।
कृष्णेभिरक्ता उषआ रुशद्भिः
वपुर्भिरा चरतो अन्यान्या ॥

९. ‘अति बलवान्, महापराक्रमी आणि महाकृत्यें करण्याविषयीं कुशल असा जो इंद्र, त्याणें उपासक जनांवर पूर्ण अनुग्रह करून दूध नसलेल्या गाईंत म्हणजे हिरव्या गाईंत अथवा ज्यांत दूध असण्याचा संभव नाहीं अशा गाईंच्या आंगीं दूध घातलें आणि काळ्या गाईंच्या आंगीं पांढरें दूध घातलें.’ याचें तात्पर्य असें दिसतें कीं, ज्यांत पाणी नव्हतें अशा ढगांत पाणी उत्पन्न केलें आणि जेथें प्रकाश नसून अंधकार पडला होता, तेथें उझेड उत्पन्न केला, आणि तेणेंकरून उपासकांवर मोठा अनुग्रह केला.

‘ बलाचा पुत्र ’=‘ शवसा सूनुः.’ बहुतकरून ‘ शवसः सूनुः ’ असें रूप वेदांत आढळतें आणि तें अग्नीला लाविलेलें असतें. तथापि क्वचित् इंद्रालाहि

१०. पुरातन काळापासून सहनिवासी [आणि] अनन्यभाव [अशा ज्या] मरणरहित अंगुळ्या त्या [आपल्या] बळानें [इंद्राच्या] आज्ञा पाळीत आल्या आहेत. [अंगुलिरूप] सहस्रावधि ज्या भगिनी त्या निर्भीड इंद्राला देवपत्न्यांप्रमाणें भजत आल्या आहेत.

10. From eternity the faithful [and] immortal fingers of one heart have followed [Indra's] ordinances with all their might; the sister [finger]s like many thousand wives of a common husband have waited upon the unabashed [Indra].

लाविलेलें आहे. उदाहरणार्थ, 'का सुष्टुतिः शवसः सूनुमिन्द्रमर्वाचीनं राधस आ ववर्तत्=कोणत्या प्रकारची चांगली स्तुति केल्यास बळाचा पुत्र इंद्र धन घेऊन आम्हांकडेस येईल?' ऋ. ४. २४. १. येथें बलाचा पुत्र म्हणजे 'अतिबळी' असें सायणाचार्य म्हणतात, आणि तें खरें दिसतें.

'अनुग्रह करिता झाला आणि' इ० म्हणजे अपक्व गाईंत दूध घालणें एतद्रूप जो मोठा अनुग्रह तो करिता झाला.

'दूध घालिता झाला'='दधिषे पयः'. अक्षरशः अर्थ, 'दूध घालिता झालास' असा द्वितीय पुरुषीं प्रयोग आहे. प्रथम तृतीय पुरुषीं निर्देश असून मग द्वितीय पुरुषीं आहे, या पुरुषव्यत्ययाचीं उदाहरणें अन्यत्र आलींच आहेत. प्रस्तुत मंत्रांत वृत्तानुरोधानें द्वितीय पुरुष घातला आहे. 'दधे' हें रूप घातलें असतें तर एक अक्षर कमी पडलें असतें, म्हणून दधिषे या रूपाचा प्रयोग करावा लागला.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला बसते:—

सनेमि सख्यं सुअपस्यमानः
सूनुर्दाधारि शवसा सुदंसाः ।
आमासु चिद्दधिषे पक्वमन्तः
पयः कृष्णासु रुशद्रोहिणीषु ॥

---

१०. या मंत्राचें तात्पर्य असें आहे कीं, 'अनादि काळापासून इंद्राची सेवा हजारो मनुष्यें करीत आलीं आहेत.' विस्तारानें अर्थ केल्यास असा होतो कीं, 'सहवासिनी म्हणजे एकत्रच वास करणाऱ्या, दुसऱ्याकडे न जाणाऱ्या, आणि अमर, अशा ज्या मनुष्यांच्या अंगुल्या त्याच कोणी बहिणी, त्या जशा एकाद्या मनुष्याला अनेक बायका असून त्या परस्पर बहिणी असतांहि त्याच्या सेवेंत त-

सनायुवो नमसा नव्यो अर्कैर्वसूयवो मतयो दस्म दद्रुः ।
पतिं न पत्नीरुशतीरुशन्तं स्पृशन्ति त्वा शवसावन्मनीषाः ॥ ११

सनाऽयुवः । नमसा । नव्यः । अर्कैः । वसुऽयवः । मतयः । दस्म । दद्रुः । पतिम् । न । पत्नीः । उशतीः । उशन्तम् । स्पृशन्ति । त्वा । शवसाऽवन् । मनीषाः ॥ ११ ॥

भाषायाम्.

११. हे दस्म (=पराक्रमवन्) [इन्द्र], सनायुवः (=सनातनाः=पुरातना) वसूयवः (=धनमात्मन इच्छन्तो) मतयः (=मेधाविन उपासका) नमसा (=हविषा) अर्कैः (=स्तोत्रैश्च) [सह] नव्यः (=नवीयः=नवीनं यथा तथा=पुनःपुनः) [त्वां प्रति] दद्रुः (=बहुना प्रयासेन जग्मुः)। हे शवसावन् (=बलवन्) [इन्द्र], उशतीः (=उशत्यः=कामयमानाः) पत्नीः (=पत्न्यः) उशन्तं पतिं न (=कामयमानं पतिमिव) मनीषाः (=उपासकानां स्तुतयः) त्वा (=त्वां) स्पृशन्ति (=संभजन्ते) ॥

त्पर होतात आणि त्या वहिणी असतांहि तो त्या सर्वांकडून निर्भीडपणें सेवा करून घेतो, त्याप्रमाणें, इंद्राची सेवा आजपर्यंत अनादि काळापासून यज्ञादि कर्मांच्या रूपानें करीत आल्या आहेत.’ म्हणजे अनादि काळापासून असंख्य मनुष्यें आपल्या हातांनीं इंद्राची सेवा करीत आलीं आहेत.

‘सहनिवासी’=‘सनीळाः’. म्हणजे एकत्रच वास करणाऱ्या. एकाच हातापासून सर्व अंगुलींचें जन्म असल्यामुळें हें विशेषण लाविलें आहे.

‘अनन्यभाव’=‘अवाताः’. हा शब्द कठिण आहे. आम्हीं सायणानुसरानें अर्थ केला आहे. त्याचें तात्पर्य, पतिव्रता स्त्रीप्रमाणें दुसरीकडे मन न जाऊं देणाऱ्या, एकट्या इंद्राचीच सेवा करणाऱ्या.

‘मरणरहित’=‘अमृताः’. या विशेषणाचें तात्पर्य इतकेंच दिसतें कीं, कितीएक अंगुलि मेल्या तरी त्यांच्या जागीं दुसऱ्या तयार होतच असतात. एवंच सेवा अव्याहत होत असते असें तात्पर्य.

‘[आपल्या] बळानें’=‘सहोभिः.’ म्हणजे, आपलें सर्व बळ खर्च करून असें तात्पर्य दिसतें.

‘[इंद्राच्या] आज्ञा पाळीत आल्या आहेत’=‘व्रता रक्षन्ते.’ म्हणजे यज्ञ करावा, सत्कर्म करावें ही आणि यासारिख्या ज्या दुसऱ्या आज्ञा त्यांप्रमाणें वर्तत आल्या आहेत, इंद्राची सेवा करीत आल्या आहेत.

११. हे पराक्रमी [इंद्रा], धनाची वांछा धरून पुरातन काळापासून बुद्धिमान् उपासक पुनः-पुनः हवीनिशीं आणि स्तोत्रांनिशीं तुजकडे धांवत आले आहेत. हे बलवान् [इंद्रा], जशा कामी स्त्रिया आपल्या कामी पतीकडे [जातात] तशा उपासकांच्या स्तुति तुजकडे जात असतात.

11. O mighty [Indra], ancient wise men with the desire of blessings have again and again run to thee with oblation [and] with hymns. The praises [of thy worshippers], O mighty [Indra], go to thee as loving wives go to [their] loving husband.

'निर्भीड इंद्राला भजत आल्या आहेत'= 'दुवस्यन्ति अह्रयाणम्.' म्हणजे अनेक बायका असून त्या जर बहिणी बहिणी असल्या तर सर्वांची सेवा एकाच समयीं घेतांना लाज वाटेल, तर तशी ज्यास वाटत नाहीं अशा इन्द्राला. या मंत्रावरून एकच पुरुषास अनेक स्त्रिया प्राचीन काळीं असत असें ज्ञापक मिळतें असें आम्हांस वाटतें.

या ऋचेंत चवथा चरण खेरीज करून श्लोकाप्रमाणें म्हणण्यास विशेष अडचण होत नाहीं:—

सनात्सनीळा अवनीरवाता
व्रता रक्षन्ते अमृताः सहोभिः ।
पुरू सहस्रा जनयो न पत्नीः
दुवस्यन्ति स्वसारो अह्रयाणम् ॥

---

११. 'हे इंद्रा, अनादि काळापासून विद्वान् लोकांस धनाची इच्छा उत्पन्न झाली म्हणजे ते हवि आणि स्तोत्रें सिद्ध करून पुनःपुनः तुजप्रत धांवून गेले आहेत. उपासकांच्या स्तुति मोठ्या प्रेमानें तुजप्रत धांवून जात असतात, आणि त्यांचा तूं अव्हेर न करितां तूंहि त्यांशीं प्रेमानें रममाण होत असतोस. जशा एकाद्या पुरुषाच्या अनेक स्त्रिया प्रेमानें त्याजकडेस धांवतात आणि तो त्या सर्वांस प्रेमानें भेटतो तशा त्या स्तुति तुजकडे धांवतात, आणि तूं त्यांचा स्वीकार करीत असतोस,' याप्रमाणें उपासकांच्या स्तुतींची प्रीति इंद्रावर आणि इंद्राची प्रीति उपासकांच्या स्तुतींवर कशी असते ती या मंत्रांत सांगितली आहे.

या मंत्रावरूनहि असें ज्ञापक मिळतें कीं पुरातनकाळीं आपल्या लोकांत एकाच पुरुषास अनेक बायका असत.

'पुरातन काळापासून' ='सनायुवः.' अक्षरशः अर्थ, 'पुरातन काळचे,' 'पुरातन काळासंबंधींचे.'

'पुनःपुनः'= 'नव्यः.' अक्षरशः 'नवीन रीतीनें,' 'नूतन काळीं.'

सनादेव तव रायो गभस्तौ न क्षीयन्ते नोप दस्यन्ति दस्म ।
द्युमाँ असि क्रतुमाँ इन्द्र धीरः शिक्षा शचीवस्तव नः शचीभिः ॥
॥ १२ ॥

सनात् । एव । तव । रायः । गभस्तौ । न । क्षीयन्ते । न । उप । दस्यन्ति । दस्म ।
द्युऽमान् । असि । क्रतुऽमान् । इन्द्र । धीरः । शिक्ष । शचीऽवः । तव । नः । शचीभिः ॥ १२ ॥

भाषायाम्.

१२. सनादेव (=चिरकालादारभ्यैव) तव गभस्तौ (=हस्ते) रायः (=धनानि) [सन्ति], [ता] न क्षीयन्ते (=न नश्यन्ति), [अपि च] हे दस्म (=पराक्रमवन्) [इन्द्र], नोप दस्यन्ति (=उपक्षयं न प्राप्नुवन्ति)। [त्वं] द्युमान् (=दीप्तिमान्) असि, क्रतुमान् (=बुद्धिमान्) [असि] [अपि च] हे इन्द्र, [त्वं] धीरः (=धीमान्) [असि]। [तस्मात्] हे शचीवः (=कर्मवन्=वृत्रवधादिकर्मकारिन्) [इन्द्र], तव शचीभिः (=वृत्रवधादिकर्मभिः) नः (=अस्मभ्यं) [धनं] शिक्ष (=देहि) ॥

'न क्षीयन्ते नोप दस्यन्ति' इत्यत्र "स्तोतृभ्यो दत्तेपि त्वद्धस्तगतं धनमुपक्षयं न प्राप्नोती"त्यनुसंधेयम् ॥

वृत्तानुरोधानें ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें आहे असें समजावें:—

सनायुवो नमसा नव्यो अर्कैः
वसूयवो मतयो दस्म दद्रुः ।
पतिं न पत्नीरुशतीरुशन्तं
स्पृशन्ति त्वा शवसावन्मनीषाः ॥

१२. हे पराक्रमकारी [इंद्रा], पुरातन काळापासूनच तुझ्या हातांत संपत्ति [आहेत] [त्या] क्षीण होत नाहींत, [त्या] नष्ट होत नाहींत. हे इंद्रा, [तूं] प्रकाशवन्त आहेस, [तूं] बुद्धिमान् [आहेस], [तूं] प्रज्ञावान् [आहेस.] हे पराक्रमकारी [इंद्रा], [तूं] आपल्या पराक्रमांनीं आम्हांस [धन] दे.

12. From all eternity [there have been] blessings in thy hand, they do not diminish, nor, O mighty [Indra], do they perish. Thou art full of light, [thou art] full of wisdom, thou, O Indra, art wise. Give us [blessings], O mighty Indra, with thy might.

१२. 'हे इंद्रा, तुझ्या हातांत अनादि काळापासून धनें भरलेलीं आहेत, आणि तीं तूं आपल्या उपासकांस देत असतोस, तरीहि कधींच उणीं होत नसतात. कधींहि नष्ट होत नसतात. तूं प्रकाशमय आहेस, तूं ज्ञानमय आहेस. आणि हे इंद्रा, तूं बुद्धिमय आहेस. तर हे पराक्रमकारी इंद्रा, तूं आपल्या पराक्रमांनीं आम्हांस धन दे.' हा अर्थ सरळ आणि स्पष्टच आहे. आणि यांत जें इंद्राचें स्वरूप वर्णिलें आहे, तें खरोखर दिव्य आहे यांत संशय नाहीं; कारण यांत सांगितलेल्या संपत्ति म्हणजे भौतिक सुखांचे उत्पादक पदार्थच होत असें दिसत नाहीं. त्यांहून जीं मोठीं दुसरीं सुखें तद्रूप संपत्तींचाहि त्यांत समावेश होतो असें आम्हांस वाटतें. तीं सुखें सनातन काळापासून इंद्राचे हातीं आहेत म्हणणें, आणि तीं नष्ट न होणें, आणि इंद्राच्या अंगीं प्रकाश, बुद्धि आणि ज्ञान हीं आहेत असें मानणें म्हणजे ईश्वराचें खरें स्वरूप काय आहे याचेंच ज्ञान दर्शविणें असें म्हटल्यास चिंता नाहीं.

या ऋचेंत चवथा चरण सरळ श्लोकाप्रमाणें म्हणतां येतो, पहिल्या तीन चरणांत मात्र थोडें ह्रस्वदीर्घ फिरवावें लागतें.

सनादेव तव रायो गभस्तौ
न क्षीयन्ते नोप दस्यन्ति दस्म ।
द्युमाँ असि क्रतुमाँ इन्द्र धीरः
शिक्षा शचीवस्तव नः शचीभिः ॥

सनायते गोतम इन्द्र नव्यमतक्षद्ब्रह्म हरियोजनाय ।
सुनीथाय नः शवसान नोधाः प्रातर्मक्षू धियावसुर्जगम्यात् ॥
॥ १३ ॥ ३ ॥

सनाऽयते । गोतमः । इन्द्र । नव्यम् । अतक्षत् । ब्रह्म । हरिऽयोजनाय ।
सुऽनीथाय । नः । शवसान । नोधाः । प्रातः । मक्षु । धियाऽवसुः । जगम्यात् ॥ १३ ॥ ३ ॥

भाषायाम्.

१३. हे इन्द्र, गोतमः (=गोतमकुलोत्पन्नो) [नोधाः] सनायते (=सनातनर्षिवद् आचरति) [अपि च], हरियोजनाय (=हरी अश्वौ रथे योजयतीति तादृशाय) [तुभ्यं] नव्यं (=नूतनं) ब्रह्म (=इदं स्तोत्रम्) अतक्षत् (=अकरोत्), हे शवसान (=बलवन्) [इन्द्र], नोधा [ऋषिः] नः (=अस्माकं) सुनीथाय (=सुष्ठुनेत्रे) [तुभ्यं] [नव्यं स्तोत्रमकरोत्] ।—[तस्मात्] धियावसुः (=धीमान्=प्रज्ञावान्) [इन्द्रः] प्रातः (=प्रातःकाले) मक्षु (=क्षिप्रं) जगम्यात् (=दिने दिन आगच्छतु) ॥

---

१३. हा या सूक्ताचा उपसंहार आहे, आणि उपसंहाराप्रमाणें ऋषीनें या ऋचेंत सर्व सूक्ताचा शेवट झाला असें दाखविलें आहे. तो म्हणतो, 'गोतमकुळांतील नोधा ऋषि पुरातन ऋषींप्रमाणें इंद्राच्या सेवेस तत्पर होऊन त्याणें हें नवीन सूक्त इंद्राप्रीत्यर्थ रचिलें आहे. गोतमकुळांतील मनुष्यांचा पुरस्कर्ता जो इंद्र त्याजकरितां हें नवीन स्तोत्र नोधा ऋषीनें रचिलें आहे.– तर बुद्धिमान् इंद्र प्रसन्न होऊन हें आमचें स्तोत्र ग्रहण करो, आणि प्रतिदिनीं आम्ही अर्पण केलेला सोम पिण्याकरितां पहांटेस येत जाओ.'

ह्या मंत्रांत एकदोन गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. यांत ऋषि म्हणतो कीं, हें नवीन सूक्त इंद्राकरितां मीं रचिलें आहे. यावरून तो आपलीं सूक्तें अनादि काळापासूनचीं कोणीहि न रचिलेलीं असें म्हणत नाहीं, तर जुनें स्तोत्र न म्हणतां नवीन स्तोत्र रचून इंद्रास अर्पण केलें आहे असें सांगण्यांत आनंद मानून घेत आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट ही कीं, 'सूक्त' अथवा स्तोत्र या अर्थाचा शब्द 'ब्रह्म' हा येथें आला आहे. 'ब्रह्म' याचा मूळ अर्थ 'स्तोत्र,' तोच यांत घ्यावयाचा आहे. 'ब्रह्म' करणारा म्हणजे

१३. हे इंद्रा, [हा] गोतम [नोधा]पुरातन काळच्या [ऋषीं]प्रमाणें वर्तत आहे, [आणि] सुवर्णाश्वांची जोडी [रथास] जोडणाऱ्या तुजप्रीत्यर्थ [हें] नवीन स्तोत्र त्याणें रचिलें आहे; हे बलवान् [इंद्रा], आमचा उत्तम नायक [जो तूं] त्या [तु]जप्रीत्यर्थ नोधानें [स्तोत्र रचिलें आहे].– [तर] बुद्धिमान् [इन्द्र] प्रतिदिनीं प्रातःकाळीं शीघ्र येत जाओ.

13. Gotama is acting the ancient sage. He has, O Indra, composed this new hymn for thee that drivest a pair of tawny steeds; Nodhas [composed a new hymn] for [thee] our excellent guide.—May, [therefore], wise [Indra] daily come [unto us] quickly in the morning.

स्तोत्र रचणारा तो ‘ ब्रह्मा ’ असा शब्द वेदांत अनेक ठिकाणीं आढळतो. जो स्तोत्र गातो, जो इंद्रादि देवांचें स्तोत्र रचितो त्यास ‘ब्रह्मा ’ अथवा ब्राह्मण असें वेदांत म्हणतात. वेदांत ‘ब्रह्मा’ अथवा ‘ब्राह्मण’ याचा अर्थ आतांप्रमाणें एक जातीचा पुरुष असा होत नसे. जो जो ‘ ब्रह्म ’ रची, मग तो कोणत्याहि वर्णाचा मनुष्य असो, त्यास ‘ब्रह्मा’ अथवा ‘ब्राह्मण’ म्हणत असत. नंतर ब्रह्मकर्त्यांची एक हळूहळू जात झाली. आमच्या देशांत पूर्वी घड्याळें करण्याचा धंदा नव्हता. पण तो आतां बराच प्रचारांत येत आहे. हे सगळे ‘ घड्याळची ’ मिळून प्राचीन काळाप्रमाणें एक जात बनल्यास जाती कशा निर्माण झाल्या आहेत तें उघड दिसून येईल. यांत जें ब्राह्मण जातीचें आदिकारण सांगितलें त्याला ऋग्वेदांत पुष्कळ प्रमाणें आहेत. आणि ‘ ब्राह्मणोस्य मुखमासीद् बाहू राजन्यः कृतः ’ ही श्रुति आलंकारिक आहे आणि एकटी आहे.

‘ पुरातन काळच्या [ऋषीं]प्रमाणें वर्तत आहे ’= ‘ सनायते. ’ म्हणजे पुरातन काळचे ऋषि जशीं सूक्तें रचीत तशीं सूक्तें रचीत आहे.

‘ सुवर्णाश्वांची जोडी [रथास] जोडणाऱ्या तुजप्रीत्यर्थ ’=‘ हरियोजनाय. ’ सू. ६१, मं. १६ यावरची टीप पहा.

‘ तर बुद्धिमान् इन्द्र इ०.’ हें पालवपद आहे आणि नोधानें केलेल्या प्रत्येक सूक्ताच्या शेवटीं येत असतें. सू. ५८, ५९, ६०, ६१ यांच्या शेवटील मंत्रांचा शेवटील पाद पहा.

सूक्तम् ६३.

गौतमो नोधा ऋषिः । इन्द्रो देवता । त्रिष्टुप् छन्दः ।

त्वं म॒हाँ इ॑न्द्र॒ यो ह॒ शुष्मै॒र्द्यावा॑ जज्ञा॒नः पृ॑थि॒वी अमे॑ धाः ।
यद्ध॑ ते॒ विश्वा॑ गि॒रय॑श्चि॒दभ्वा॑ भि॒या दृ॒ळ्हासः॑ कि॒रणा॒ नैज॑न् ॥ १

त्वम् । म॒हान् । इ॒न्द्र॒ । यः । ह॒ । शुष्मैः॑ । द्यावा॑ । ज॒ज्ञा॒नः । पृ॒थि॒वी इति॑ । अमे॑ । धाः॒ ।
यत् । ह॒ । ते॒ । विश्वा॑ । गि॒रयः॑ । चि॒त् । अभ्वा॑ । भि॒या । दृ॒ळ्हासः॑ । कि॒रणाः॑ । न । ऐज॑न् ॥ १ ॥

भाषायाम्.

१. हे इन्द्र, त्वं महान् [असि], यो ह (=यः खलु) जज्ञानः (=प्रादुर्भूतः सन्) शुष्मैः (=आत्मीयैर्बलैः) द्यावापृथिवी (=द्युलोकभूलोकौ) अमे (=भये) धाः (=स्थापितवानसि) । यद्ध (=तदा खलु) ते भिया (=तव भयेन) दृळ्हासः (=दृढा) गिरयश्चित् (=पर्वता अपि) [तथा] विश्वा अभ्वा (=विश्वानि महान्ति) [वस्तून्यपि] किरणा न (=रेणव इव) ऐजन् (=अकम्पिषत) ॥

त्वयि जायमाने सति द्यावापृथिव्यावपि तथा अचलाः पर्वता अपि तथैव इतराणि सकलानि महान्त्यपि वस्तूनि त्वद्भिया रजःकणा इवावकम्पन्त । अतः कारणात् त्वं महानसीत्यर्थः ॥

सूक्त ६३.

ऋषि–गोतमकुळांतील नोधा या नांवाचा (पूर्वी सूक्ताचा जो कर्ता तोच). देवता– इन्द्र. वृत्त– त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, तूं मोठा आहेस, कारण कीं तूं उपजतांच आपल्या बळानें द्युलोक [आणि] पृथिवी यांस भीति उत्पन्न करिता झालास; कारण कीं तुझ्या भीतीनें प्रचंड पर्वत सुद्धा [आणि] सकळ मोठमोठे पदार्थ [सुद्धा] परमाणूंप्रमाणें कंपायमान झाले.

HYMN 63.

To *Indra*. By *Nodhas*, of the family of the *Angirases* (author of the previous hymn). Metre–*Trishṭubh*.

1. Thou, O Indra, art great, who when born didst put by thy powers the heaven and the earth in dread [of thee]: when even the hard mountains, and even all great things trembled with dread of thee like atoms.

---

१. हेंहि सूक्त नोधा ऋषीचेंच आहे. तो म्हणतो, 'हे इंद्रा, तूं मोठा आहेस; कारण कीं तूं जन्मतांच तुझ्या शक्तीला भिऊन द्युलोक आणि पृथिवी ह्या दोनींहि भयानें कांपल्या, आणि मोठमोठे अचल पर्वत आणि समुद्रादि दुसरे मोठमोठे सकल पदार्थ रजःकणांप्रमाणें भयानें कांपले.'

इंद्र उपजतांच सर्व पृथिवी, द्युलोक आणि पर्वतादि सकळ अचल वस्तु थरथरां कांपल्या असें वेदांत पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे. उदाहरणार्थ, 'तव त्विषः जनिमन् रेजत् द्यौः रेजत् भूमिः भियसा स्वस्य मन्योः ऋघायन्त सुभ्वः पर्वतासः आर्दन् धन्वानि सरयन्ते आपः' (ऋ.४.१७.२)='हे इंद्रा, तुज बळवंताचें जन्म होतांच द्युलोक कंपायमान झाला, पृथिवी तुझ्या भीतीनें थरथर कांपली, मोठमोठे पर्वत हालले, भूकम्प झाले, आणि उदकें भिऊन वाहूं लागलीं.' याप्रमाणेंच अग्नि जन्मतांच सर्व पदार्थ कंपायमान झाले असें सांगितलें आहे. सू. ३१, मंत्र ३ पहा. आणि मरुत् जाऊं लागले म्हणजे द्युलोकभूलोकादि सकल विश्व कांपतें असें सांगितलें आहे. सू. ३७, मं. ८ इत्यादि पहा.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें आहे असें समजावयाचें:–

तुअं महानिन्दर यो ह शुष्मैः
द्यावा जॅज्ञानः पृथिवी अमे धाः ।
यद्ध ते विश्वा गिरयश्चिदभ्वा
भिया दॅृळ्हासः किरणा न ऐजन् ॥

आ यद्धरी इन्द्र विव्रता वेरा ते वज्रं जरिता बाह्वोर्धात् ।
येनाविहर्यतक्रतो अमित्रान्पुर इष्णासि पुरुहूत पूर्वीः ॥ २ ॥

आ । यत् । हरी इति । इन्द्र । विऽव्रता । वेः । आ । ते । वज्रम् ।
जरिता । बाह्वोः । धात् ।
येन । अविहर्यतक्रतो इत्यविहर्यतऽक्रतो । अमित्रान् । पुरः । इष्णासि ।
पुरुऽहूत । पूर्वीः ॥ २ ॥

भाषायाम्.

२. हे इन्द्र, यद् (=यदा) [त्वं] विव्रता (=विव्रतौ=विविधकर्माणौ=विविधं धावन्तौ) हरी (=हरिद्वर्णौ तवाश्वौ) आ वेः (=आगमयसि=रथे योजयसि) [तदा] जरिता (=स्तोता) ते वज्रं (=तव वज्रं) [तव] बाह्वोः (=बाह्वोरुपरि) आ धात् (=स्थापयति=स्तोत्रेण तत्र आरोहयति)। येन [वज्रेण] हे अविहर्यतक्रतो (=अप्रेप्सितबुद्धे=केनापि अलब्धबुद्धे), हे पुरुहूत (=बहुभिराहूत) [इन्द्र], [त्वम्] अमित्रान् (=तव शत्रून्) [तथा] पूर्वीः पुरः (=तेषामनेकानि पुराणि) इष्णासि (=अभिगच्छसि)॥

यदा त्वं संग्रामाय हरी रथे योजयसि तदा तवोपासकाः स्तोत्रद्वारेण प्रयत्नमन्तरेणैव तव वज्रं तव बाह्वोः स्थापयन्ति। तद्वज्रं च गृहीत्वा त्वं शत्रून् तेषां च बहूनि नगराणि नाशयसीति भावः॥ अविहर्यतक्रतुरिति पदं वादोत्पादकार्थम्। प्रयोगान्तराभावाच्च तस्यार्थो न निर्णेतुं शक्य इति द्रष्टव्यम्॥

२. हे इंद्रा, जेव्हां [तूं आपल्या] चौताळलेल्या पिवळ्या घोड्यांची जोडी हाकितोस, [तेव्हां] स्तोता तुझें वज्र [तुझ्या] खांद्यावर ठेवितो; ज्या [वज्राच्या योगा]नें हे पुरुहूत [इंद्रा], हे असाध्यबुद्धिमान् [इंद्रा], [तूं] [आपल्या] शत्रूंला [आणि] [त्यांच्या] अनेक नगरांला संहारितोस.

2. When, O Indra, [thou] drivest [thy] furious pair of tawny horses, [thy] praiser places thy thunderbolt on [thy] shoulders; with which, O [Indra], invoked by many, O [Indra] of unparalleled wisdom, [thou] attackest the enemies [and] [their] numerous cities.

२. 'हे इंद्रा, तुझे एकीकडे एक, दुसरीकडे दुसरा अशा रीतीनें ओढाताण करणारे जे चौताळलेले पिवळे दोन घोडे ते जेव्हां तूं आपल्या रथास जोडितोस, तेव्हां स्तोत्यानें स्तोत्र म्हटल्यानें तुझें वज्र आपोआप तुझ्या खांद्यावर जाऊन बसतें; आणि तें तूं घेऊन तुझे शत्रु आणि त्यांचीं अनेक नगरें यांच्यावर तूं चाल करून जातोस.' यांत स्तोत्यानें स्तोत्र म्हणतांच इंद्राचें वज्र इंद्राच्या खांद्यावर जाऊन बसतें आणि शत्रुजन व त्यांचीं नगरें यांचें निर्दालन करण्याची शक्ति इंद्राला येते अशी ऋषीची कल्पना आहे. उपासकांनीं स्तोत्र म्हटलें म्हणजे इंद्राला पाहिजे ते पराक्रम करण्याची शक्ति येते याविषयीं पूर्वीं सांगितलेंच आहे.

'चौताळलेल्या'= 'विव्रता.' अक्षरशः अर्थ, 'विविध कर्म करणारे.' म्हणजे दोनी घोडे इतके आवेशी असतात कीं एकीकडे एक आणि दुसरीकडे दुसरा याप्रमाणें ते ओढावयास लागतात.

'हे असाध्यबुद्धिमान् [इंद्रा],'= 'अविहर्यतक्रतो.' हा शब्द फार कठिण आहे. सायणाचार्य 'अप्रेप्सितकर्म' (म्हणजे ज्याचे कर्माची कोणी इच्छा करीत नाहीं तो ?) असा अर्थ करितात. त्यालाच अनुसरून पण 'क्रतु' शब्दाचा अर्थ किंचित् निराळा समजून आम्हीं भाषांतर केलें आहे. आम्हीं केलेल्या भाषांतराचें तात्पर्य 'ज्याची बुद्धि कोणास साधत नाहीं' असें आहे.

ही ऋचा वृत्तानुरोधानें खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावयाचीः—

आ यद्धरी इन्दर विव्रता वेः
आ ते वॅज्रं जरितॉ बाहुओर्धात् ।
येनाविहर्यतॅक्रतो अमित्रान्
पुरः इॅष्णासि पुरूहूत पूर्वीः ॥

यांत 'इन्द्र' या पदाबद्दल 'इन्दर' असें म्हणावें लागतें तिकडे लक्ष्य पुरवावें.

त्वं सत्य इन्द्र धृष्णुरेतान्त्वमृभुक्षा नर्यस्त्वं षाट् ।
त्वं शुष्णं वृजने पृक्ष आणौ यूने कुत्साय द्युमते सचाहन् ॥३॥

त्वम् । सत्यः । इन्द्र । धृष्णुः । एतान् । त्वम् । ऋभुक्षाः । नर्यः । त्वम् । षाट् ।

त्वम् । शुष्णम् । वृजने । पृक्षे । आणौ । यूने । कुत्साय । द्युऽमते । सचा । अहन् ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. हे इन्द्र, त्वं सत्यो [भवसि], [त्वं] धृष्णुः (=शूरो) [भवसि], त्वम् ऋभुक्षाः (=ऋभूणामधिपतिः=कुशलानामेतन्नामकानां देवानामधिपतिः=परमकुशलो) [भवसि], [त्वं] नर्यः (=वीर्यवान्) त्वं षाट् (=शत्रूणामभिभविता) [भवसि] [त्वम्] एतान् (=वृत्रादीन् शत्रून्) [अभिभवसि] । त्वं वृजने (=संग्रामे) पृक्षे आणौ [च] (=अन्नसाधके युद्धे च) यूने (=तरुणाय) द्युमते (=दीप्तिमते= तेजस्विने) कुत्साय (=एतन्नाम्ने तवोपासकाय) शुष्णम् (=एतन्नामकम् असुरं) सचा अहन् (=तस्य कुत्सस्य सहायो भूत्वा तस्य हिताय शुष्णं हतवानसि) ॥

अत्रार्चे ' एतान् ' इति पदम् अर्थसंदर्भायानपेक्षितमनन्वितं च । तत् स्थितस्य गतिचिन्तनमिति न्यायेन सायणानुसारेणास्माभिर्व्याख्यातम् । तदपि त्वं सत्य इन्द्र धृष्णू रेवान्त्वमृभुक्षा इति पाठे सति समीचीनोर्थः स्यात् ।

वृजनपदस्य आणिपदस्य च या सायणेन व्याख्या कृता (या च अस्माभिर्गृहीता) सैव साधीयसी न तु पाश्चात्यानां पण्डितानामिति नो भाति ॥

३. हे इंद्रा, तूं सत्य [आहेस], [तूं] शूर, तूं परम कुशल, [तूं] वीर्यवान् [आणि] तूं विजयी [होस], [आणि] त्या [त्या शत्रूंस तूं मारून टाकिता झाला आहेस]. तूं तेजस्वी [आणि] तरुण कुत्साला साहाय्य करून त्याजकरितां शुष्णाला संग्रामांत [आणि] अन्नसाधक युद्धांत मारिता झालास.

3. Thou, O Indra, [art] true. [Thou art] brave, thou the master of the Ribhus. [Thou art] manly, thou [art] victorious. [Thou conquerest] those [enemies]. Thou becamest, in battle [and] in food-bringing fight, the ally of valiant youthful Kutsa, and slewest S'ushṇa for him.

३. 'हे इंद्रा, तूं सत्यरूप, धैर्यरूप, कौशल्यरूप, शौर्यरूप आणि विजयरूप आहेस. तूं हे सर्व गुण उपासकांच्या हितार्थ उपयोगांत आणितोस. उदाहरणार्थ, तूं कुत्साला साहाय्य करून युद्धांत शुष्णाला मारून टाकिता झालास.' कुत्स कोण आणि शुष्ण कोण याविषयीं सू. ५१, मं. ६ आणि त्याजवरील टीप पहा.

'परमकुशल'= 'ऋभुक्षाः.' अक्षरशः अर्थ 'ऋभूंचा प्रभु.' ऋभु हे कौशल्यसंपन्न तीन देव होत याविषयीं सू. २० वें पहा. ऋभूंचा अधिपति म्हणजे ऋभूंपेक्षांहि अधिक चतुर अथवा कौशल्यपूर्ण.

या मंत्रांत 'त्या [त्या शत्रूंस तूं मारून टाकिता झाला आहेस]' याबद्दल 'एतान्' इतकेंच पद आहे, त्याचा अर्थ 'यांस' अथवा 'त्यांस' इतकाच आहे. आणि बाकीचें सर्व सायणानुसरानें आम्हीं अध्याहृत घेतलें आहे, तें केवळ निर्वाहासाठीं आहे. वस्तुतः 'एतान्' या पदाचें ऋचेंत कांहींच प्रयोजन नसतां त्याचा संबंध कोणत्याच दुसऱ्या पदाशीं लागत नाहीं, यावरून पाठांत कांहीं तरी घोटाळा आहे, असा आम्हांस संशय येतो. कदाचित् 'त्वं सत्य इन्द्र धृष्णू रेवांन्त्वमृभुक्षा' असा कांहीं तरी मूळचा पाठ असावा. अर्थाकरितां तरी निदान असा पाठ इष्ट दिसतो. हा पाठ घेतला तर मग 'हे इंद्रा, तूं सत्य [आहेस], [तूं] शूर, [तूं] धनसंपन्न, तूं परमकुशल, [तूं] वीर्यवान् [आणि] तूं विजयी [होस]. तूं तेजस्वी तरुण कुत्साला' इ० भाषांतर करावें, व तसें केल्यास सर्व संबंध सरळ लागतो.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला बसतेः—

तुअं सत्यें इन्दर धृष्णुरेतान्
तुअम् ऋभुक्षा नरिअस्तुअं षाट्।
तुअं शुॅष्णं वृजनें पृक्ष आणौ
यूने कुॅत्साय द्युमते सचाहन् ॥

त्वं ह॒ त्यदि॑न्द्र चोदीः॒ सखा॑ वृ॒त्रं यद्व॑ज्रिन्वृषकर्मन्नु॒भ्नाः ।

यद्ध॑ शूर वृषमणः परा॒चैर्वि दस्यूँ॒र्योना॒वकृ॑तो वृथा॒षाट् ॥ ४ ॥

त्वम् । ह॒ । त्यत् । इ॒न्द्र॒ । चो॒दीः॒ । सखा॑ । वृ॒त्रम् । यत् । व॒ज्रि॒न् । वृ॒ष॒ऽक॒र्म॒न् । उ॒भ्नाः ।

यत् । ह॒ । शू॒र॒ । वृ॒ष॒ऽम॒नः॒ । प॒रा॒चैः । वि । दस्यू॑न् । योनौ॑ । अकृ॑तः । वृ॒था॒षाट् ॥ ४ ॥

त्वं ह॒ त्यदि॑न्द्रारि॑षण्यन्दृ॒ळ्हस्य॑ चि॒न्मर्ता॑ना॒मजु॑ष्टौ ।

व्य१॒॑स्मदा काष्ठा॒ अर्व॑ते वर्घ॒नेव॑ वज्रिञ्छ्नथिह्य॒मित्रा॑न् ॥५॥४॥

त्वम् । ह॒ । त्यत् । इ॒न्द्र॒ । अरि॑षण्यन् । दृ॒ळ्हस्य॑ । चि॒त् । मर्ता॑नाम् । अजु॑ष्टौ ।

वि । अ॒स्मत् । आ । काष्ठाः॑ । अर्व॑ते । व॒ः । घ॒ना॒ऽइ॒व । व॒ज्रि॒न् । श्न॒थि॒हि॒ । अ॒मित्रा॑न् ॥ ५ ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. हे इन्द्र, हे वज्रिन्, हे वृषकर्मन् (=वीर्ययुक्तकर्मकारिन्), हे शूर, हे वृषमणः (=वीर्ययुक्तमनस्क), यत् [त्वं] [कुत्सस्य] सखा (=साहाय्यकर्ता) [भूत्वा] वृत्रं (=शुष्णरूपं शत्रुम्) उभ्नाः (=हतवानसि), यत् ह (=यच्च खलु) वृथाषाट् (=अनायासेन शत्रूणामभिभविता) [सन्] योनौ (=? संग्रामे) दस्यून् (=शुष्णस्य भटरूपान् शत्रून्) पराचैः वि अकृतः (=पराङ्मुखा यथा भवन्ति तथा व्यच्छिनः), त्यत् ह (=तत् ह=तत्खलु) त्वं चोदीः (=त्वमेव चोदितवान्=त्वमेव प्रेरितवान्= त्वमेवाकार्षीः=अन्यो न तथा कर्तुं समर्थोभविष्यत्) ॥

अत्रेदमुक्तं भवति । हे इन्द्र, कुत्सशुष्णयोर्युद्धे प्रवर्तमाने सति त्वं कुत्सस्य सखा भूत्वा तेन शुष्णमघातयः तथैव तस्मिन्संग्रामे कुत्सम् अनायासेन विजयिनं कृत्वा शुष्णभटान् अकर्तयः परागमयश्च एतत्सर्वं त्वमेव कर्तुं समर्थोभवः नान्यः समर्थोभविष्यदिति तव श्रेष्ठत्वमिति ॥

'उभ्ना' इति क्रियाम् अवभ्रा इति यद्विदुष्टरो ग्रास्मानो व्याचष्टे तदाधारापेक्षीति द्रष्टव्यम् । सायणपादास्तु तत्सम्यग्व्याचक्षत इति नः संमतम् ॥

५. हे इन्द्र, त्यत् (=एतत्=वक्ष्यमाणं) त्वं ह (=त्वं खलु=त्वमेव) [करोषि] [यत्] मर्तानां (=मर्त्यानां मध्ये) दृढस्य चित् (=अतिबलिनोपि) अजुष्टौ (=अ-

४. हे इंद्रा, हे वज्रधरा, हे शूरकर्मा, हे शूरमनस्का, हे शूर इंद्रा, तूं जो [कुत्साचा] सारथि [होऊन] [शुष्ण]शत्रूचा नाश करिता झालास, [आणि] तूं जो सहज यश मिळविणारा [होऊन] युद्धांत शत्रूंस तोडून तोडून हाकून लाविता झालास, तें सर्व तूंच म्हणून करिता झालास.

4. Thou alone, O Indra, couldst do this that [becoming] [Kutsa's] ally, O wielder of the thunderbolt, O achiever of brave exploits, thou slewest [his] enemy, [and] that [thou] O hero, O possessor of a manly mind, didst cut away, [being] an easy victor, the enemy's men in the battle.

५. हे इंद्रा, मानवांतून कोणत्याहि प्रबळ [मानवा]ची अवकृपा झाली तरी तूंच पाळण करीत असतोस. [तूं] आमच्या घोड्यांला फिरण्याकरितां मोकळी जागा दे, [आणि] हे वज्रधरा, घनानें [मारिल्या]प्रमाणें आमच्या शत्रूंस मारून टाक.

5. Thou alone, O Indra, dost this that thou becomest the protector when the displeasure of even the mightiest of mortals is incurred. Throw open the plains to our horses, [and] O wielder of the thunderbolt, strike our enemies as with a hammer.

---

४. भावार्थः— 'हे इंद्रा, कुत्स आणि शुष्ण यांचें युद्ध होत असतां तूं कुत्साचा साहाय्यकर्ता झालास आणि त्याच्या हातून शुष्णशत्रूस मारविलेंस, आणि शुष्णाचे योद्धे जे युद्धांत आले होते त्यांस मारून मारून हाकून देवविलेंस. तर असा पराक्रम करण्याची प्रेरणा अथवा शक्ति तूं म्हणून कुत्साला दिलीस, दुसऱ्याच्यानें देवविली नसती. याप्रमाणें तुझें श्रेष्ठत्व सिद्ध आहे.'

यांत जीं इंद्राचीं संबोधनें आहेत तिकडेस वाचकांनीं लक्ष्य द्यावें. हीं सर्व विशेषणें शौर्यदर्शक आणि वीर्यदर्शक आहेत. यांजवरून आपले आर्य पूर्वज देवांचें वर्णन कसें करीत तें उघड होतें.

'युद्धांत'= 'योनौ.' 'योनि' शब्दाचा हा अर्थ येथें आम्हीं सायणांस अनुसरून केला आहे. तसा इष्ट दिसतो खरा. कितीएक विद्वान् यज्ञमंडपांत (ऋतस्य योनौ) असा अर्थ करितात.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें वाचावी, म्हणजे वृत्ताला बसेलः—

तुअं हि त्यद्दिन्दर चोदिईः सखा
वृत्रं यँद्वज्रिन् वृषकर्मन्नुभ्नाः ।
यद्ध शूँर वृषमणः पराचैः
वि दस्यूँन्योनावकृतो वृथाषाट् ॥

त्वां ह त्यदिन्द्राणसातौ स्वर्मीळ्हे नर आजा हवन्ते ।

तव स्वधाव इयमा समर्य ऊतिर्वाजेष्वतसाय्या भूत् ॥ ६ ॥

त्वाम् । ह । त्यत् । इन्द्र । अर्णऽसातौ । स्वःऽमीळ्हे । नरः । आजा । हवन्ते ।

तव । स्वधाऽवः । इयम् । आ । सऽमर्ये । ऊतिः । वाजेषु । अतसाय्या । भूत् ॥ ६ ॥

प्रीतौ) [तवोपासकेषु] [जातायां] [त्वं] [तेषाम्] अरिषण्यन् (=पालको) [भवसि] । [एवं सति अस्मासु कस्यचिद् बलिनोऽप्रीतौ सत्याम् अस्माभिः सह युद्धे च प्रवर्तमाने सति] अस्मत् अर्वते (=अस्मदीयेभ्योश्वेभ्यः) काष्ठाः (=दिशो) वि आ वः (=आसमन्तात् विवृताः कुरु=" यथा सर्वासु दिक्षु अस्मदीया अश्वाः प्रतिरोधमन्तरेण गच्छन्ति तथा कुरु"), [अपि च] हे वज्रिन् (=वज्रधर) अमित्रान् (=अस्माकं शत्रून्) घनेव श्नथिहि (=घनेनेव जहि) ॥

अत्रेदमुक्तं भवति । असमर्थेषु मनुष्येषु समर्थानां मनुष्याणामप्रीतौ जातायाम् असमर्थानां पालयिता त्वमेव भवसि । तस्मात् कारणाद् अस्मासु कस्यचिद् द्वेषे सति अस्मासु च तेन सह युध्यत्सु अस्माकमश्वाः प्रतिरोधमन्तरेण स्वेच्छया सर्वत्र यथा गच्छन्ति विजयिनश्च यथा भवन्ति तथा कुरु शत्रूंश्च तव वज्रेण जहीति ॥

भाषायाम्.

६. हे इन्द्र, अर्णसातौ (=उदकलाभनिमित्ते) [तथा] स्वर्मीळ्हे (=सुष्टुधनस्य यस्मिन् लाभस्तस्मिन्) आजौ (=संग्रामे) नरः (=योद्धुकामाः शूरा) [यद्] [हवन्ते] त्यद् (=तद्) त्वां ह (=त्वामेव) हवन्ते (=आह्वयन्ति) । हे स्वधावः (=स्वधावन्=बलवन्), इयं तव ऊतिः (=योद्धुकामास्त्वामाहूय यं तवाश्रयं लभन्ते स तवाश्रयः) आ समर्ये (=संग्रामे) वाजेषु (=युद्धेषु) [च] [अस्माकम्] अतसाय्या भूत् (=प्राप्तव्या भवतु) ॥

इदमुक्तं भवति । हे इन्द्र, सकलेषु संग्रामेषु योद्धारस्त्वामेवाहूय तव रक्षणं लभन्ते । अतः कारणात् सकलेष्वपि संग्रामेषु तादृशं तव रक्षणमस्माकं सुलभं भवत्विति ॥

यांत ' इन्द्र ' याबद्दल ' इन्दर ' व 'चोदीः ' याच्या ठिकाणीं ' चोदिईः' असें वाचावें लागतें. पूर्वीचीच ऋचा पहा, तेथें सुद्धा ' इन्दर ' असें वाचलें पाहिजे.

५. भावार्थः— ' समर्थाची अवकृपा गरीबावर झाली तर गरीबाला रक्षणें हें काम तूंच करीत असतोस, दुसरा कोणी नाहीं. तर आम्हांवर कोणा बलिष्ठ मनु-

६. हे इंद्रा, उदकनिमित्त [जें युद्ध आणि] उत्तम धनलाभार्थ [जें] युद्ध त्यांत योद्धे [जे] धांवा करितात तो तुझाच [करीत असतात]. तर हे बलवान् [इंद्रा], हें [जें] तुझें पाठबळ [तें] संग्रामांत [आणि] युद्धांत [आम्हांस] सुलभ होओ.

6. It is thee, O Indra, that heroes invoke in the battle for water [and] in the [battle] for excellent wealth. May this thy protection, O mighty [Indra], be accessible to [our] prayers in battle [and] in fights.

ज्याची अवकृपा होऊन त्याचें आमचें युद्ध होऊं लागलें आणि आमचे घोडे त्याच्या प्रदेशांत गेले तर त्यांस सर्व दिशा मोकळ्या होतील आणि त्यांस सर्वत्र यश येईल असें कर, आणि आमच्या शत्रूंस घनानें फोडून टाकिल्याप्रमाणें फोडून कुटून टाक.'

ही ऋचा महत्त्वाची आहे. इजवरून असें सिद्ध होतें कीं आपले आर्य पूर्वज संकट आलें आणि मानवाची अवकृपा झाली तरी देव आपणास तारील असें मानीत, आणि ते घोड्यावर बसून शत्रूंबरोबर लढत, आणि लढाईंत यश येणें तें देवाच्याच कृपेनें येतें असें मानीत. हा मंत्र नोधा ऋषीनें केलेला आणि नोधा ऋषि गोतम या प्रसिद्ध कुळांतील असे, ही गोष्ट ध्यानांत आणिली म्हणजे असें सिद्ध होतें कीं, वेदाचीं सूक्तें सदैव तप करण्यांत गुंतलेल्या आणि गुहेगुंफेंत राहणाऱ्या ऋषींनीं रचिलेलीं नाहींत, तर प्रपंचांत गुंतलेल्या, मुलांबाळांसहित संसार करणाऱ्या, आणि घोड्यावर स्वार होऊन शत्रूशीं नित्य लढाई करीत असलेल्या अशा कवींनीं रचिलेलीं आहेत. त्या कवींस आपण ऋषि म्हणतों आणि त्यांजविषयीं अनेक अनन्वित आणि निराधार कल्पना करितों. ह्या ऋषींतून जर एकादा पुनः जीवंत होऊन या जगांत येईल, तर त्याला आपल्याविषयीं लोकांचा ग्रह कसा आहे तें पाहून मोठें आश्चर्य वाटेल.

ह्या ऋचेची वृत्तरचना खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

तुअं हि त्यदिन्दर अरिषण्यन्
दृळ्हस्य चिन्मर्तानआमजुष्टौ ।
वि अस्मदा काष्टआ अर्वते वः
घनेव वज्रिन् श्नथिहि अमित्रान् ॥

६. भावार्थ:— 'हे इन्द्रा, सर्व प्रकारच्या युद्धांत योद्धे धांवा करितात तो तुझाच करीत असतात, दुसऱ्या कोणाचा नाहीं. तर हे बलवान् इंद्रा, कोणत्याहि युद्धाचा प्रसंग आम्हांस येतांच आणि आम्ही तुझा धांवा करितांच तूं इतर लोकांचें संरक्षण करितोस तसें आमचेंहि कर.'

यांतहि ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे कीं नोधा ऋषि युद्धांत आमचें रक्षण इंद्रानें करावें अशी इंद्राची प्रार्थना करीत आहे. यावरून वेदसूक्तांचे कर्ते गो-

त्वं ह त्यदिन्द्र सप्त युध्यन्पुरो वज्रिन्पुरुकुत्साय दर्दः ।
बर्हिर्न यत्सुदासे वृथा वर्गंहो राजन्वरिवः पूरवे कः ॥ ७ ॥

त्वम् । ह । त्यत् । इन्द्र । सप्त । युध्यन् । पुरः । वज्रिन् । पुरुऽकुत्साय । दर्दरिति दर्दः ।
बर्हिः । न । यत् । सुऽदासे । वृथा । वर्क् । अंहोः । राजन् । वरिवः । पूरवे । करिति कः ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. हे इन्द्र, [यद्] युध्यन् (=युद्धं कुर्वन्) पुरुकुत्साय (=एतन्नामकाय कस्मैचिदुपासकाय राज्ञे) सप्त पुरः (=नगराणि) दर्दः (=विदारितवानसि) त्यत् (=तत्) त्वं ह (=त्वमेव) विदारितवानसि । [अपि च] सुदासे (=एतन्नामकोपासकाय राज्ञे) यद् वृथा (=अनायासेन) बर्हिर्न (=तृणमिव) [शत्रून्] वर्क् (=अवृणक्=अच्छिनः), [यच्च] हे राजन् [इन्द्र], अंहोः (=दारिद्र्यात्) पूरवे (=पूरूनामकाय कस्मैचिद् राज्ञे) वरिवः (=धनरूपं मोचनं) कः (=अकरोः) [तत् त्वमेवाकरोः] ॥

पूरुशब्दस्य राजविशेषवाचकत्वम् ऋ. ७. ५. ३ (वैश्वानर पूरवे शोशुचानः पुरो यदग्ने दरयन्नदीदेः) इत्यत्र सायणेनैव प्रतिपादितम् । अपि च पुरुकुत्ससुदासोः साहचर्येणापि नापेक्षितमिति न ॥

'वरिवः'शब्दो वेदे यत्र यत्र दृश्यते तत्र तत्र सायणाचार्यैर्धनशब्देनैव व्याख्यातोऽस्ति । अतः कारणात्सायणास्तस्यार्थस्य विषये यास्कादीन् पूर्वव्याख्यातॄननुसरन्ति न तु स्वयमेव तमर्थं कल्पयन्तीति स्पष्टम् ॥

मुखींत हात घालून रात्रंदिवस तपश्चर्या करणारे ऋषि नव्हते, सदैव युद्ध करणारे शूर आर्यजन होते असें स्पष्ट सिद्ध होतें.

'उदकनिमित्त जें युद्ध' = 'अर्णसातौ आजौ.' हें युद्ध म्हणजे उदकवृष्टि न होऊं देणाऱ्या वृत्राशीं जें युद्ध तें असें सायणाचार्य म्हणतात.

'उत्तमधनलाभार्थ जें युद्ध त्यांत' = 'स्वर्मीळ्हे आजौ.' म्हणजे उत्तम धन प्राप्त व्हावें अशा हेतूनें केलेलें जें युद्ध त्यांत.

'हें जें तुझें पाठवळ' = 'इयं तव ऊतिः.' म्हणजे संग्रामांत योद्धे जें साहाय्य प्रार्थीत असतात आणि त्यांला जें मिळत असतें तें.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावयाची आहेः—

तुआं हॅं त्यदिन्दर अर्णसातौ
सुअर्मॉळ्हे नॅर ऑजा हवन्ते ।
तव स्वधावः इयमा समर्ये
ऊतिर्वॉजषु अतसाइआ भूत् ॥

७. हे इंद्रा, हे वज्रधरा, युद्ध करून करून पुरुकुत्सासाठीं सात नगरें विध्वंसून [टाकिलीं] तीं तूंच टाकिलींस; सुदासाला साहाय्य करून [त्याचे शत्रु] दर्भाप्रमाणें जे सहज तोडून [टाकिले ते] तूंच टाकिलेस, [आणि] हे राजा [इंद्रा], पूरूचें दारिद्र्य हरण करून त्याला द्रव्य दिलें तें तूंच दिलेंस.

7. It is thou, O Indra, that didst fight and destroy, O wielder of the thunderbolt, the seven cities for Kutsa. It is thou that didst easily cut [the enemies] for Sudâs like grass [and], O King Indra, didst confer wealth on Pûru when in poverty.

७. 'हे इंद्रा, हे वज्रधरा, पुरुकुत्साच्या शत्रूला जिंकून त्याचीं सात नगरें विध्वंसिलीं तीं तूंच विध्वंसिलींस; सुदासाच्या शत्रूला गवताच्या काडाप्रमाणें मोडून टाकिलें तें तूंच, आणि पूरूला दारिद्र्यांतून मुक्त करून त्याला संपत्ति दिली ती तूंच.'

'पुरुकुत्स.' हा कोण होता याविषयीं कांहीं विशेष ठाऊक नाहीं. मात्र ऋ. १. ११२. ७ यांत अश्वी देवांनीं पुरुकुत्साला संरक्षिलें होतें असें सांगितलें आहे. ऋ. १. १७४. २ यांत इंद्रानें पुरुकुत्साकरितां शत्रूचीं सात नगरें फोडिलीं, आणि त्या मंत्रांत पुरुकुत्साला 'युवा' म्हणजे (सायणाचार्यांप्रमाणें) 'नित्य तरुण' राजा असें म्हटलें आहे. आणि ऋ. ६. २०. १० यांत असें सांगितलें आहे कीं, इंद्रानें शरद राक्षसाला मारून पुरुकुत्स राजाच्या हितासाठीं शरदाचीं सात नगरें विध्वंसून टाकिलीं आणि पुरुकुत्साला धन मिळवून दिलें (=सप्त यत् पुरः शर्म शारदीः दर्त् हन् दासीः पुरुकुत्साय शिक्षन्). याशिवाय आणखी पुरुकुत्साविषयीं ऋग्वेदांत कांहीं सांगितलेलें आढळत नाहीं. शरद हा कोण होता आणि सात नगरें कोणतीं याचा निश्चय करितां येत नाहीं, परंतु वृत्ररूपी जो असुर तोच शरद होय, आणि शरदाचीं नगरें म्हणजे मेघरूप नगरें होत असें वाटतें. मात्र तीं सात कां असावीं याविषयीं संशय आहे.

'सुदास.' सू. ४७, मं. ६ पहा.

'पूरु' हें येथें सुदासाचेंच नांव आहे असें सायणाचार्य म्हणतात. परंतु 'पुरुकुत्स' आणि 'सुदास्' हीं विशेषनामें आहेत यावरून पाहतां 'पूरु' हेंहि स्वतंत्र विशेषनाम असावें असें वाटतें. इतर मंत्रांतही पूरुसाठीं इंद्रानें दारिद्र्य हरण करून त्याला धन मिळवून दिलें असें सांगितलें आहे. 'भाषा' पहा.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटली पाहिजे, म्हणजे वृत्ताला बसतेः—

तुअं हि त्यदिन्दर सप्त युध्यन्
पुरो वज्रिन्पुरुकुत्साय दर्दः ।
बर्हिर्न यत्सुदअसे वृथा वर्क्
अंहो राजन्वरिवः पूरवे कः ॥

त्वं त्यां न इन्द्र देव चित्रामिषमापो न पीपयः परिज्मन् ।
यया शूर प्रत्यस्मभ्यं यंसि त्मनमूर्जं न विश्वध क्षरध्यै ॥ ८ ॥

त्वम् । त्याम् । नः । इन्द्र । देव । चित्राम् । इषम् । आपः । न । पीपयः । परिऽज्मन् ।
यया । शूर । प्रति । अस्मभ्यम् । यंसि । त्मनम् । ऊर्जम् । न । विश्वध । क्षरध्यै ॥ ८ ॥

अकारि त इन्द्र गोतमेभिर्ब्रह्माण्योक्ता नमसा हरिभ्याम् ।
सुपेशसं वाजमा भरा नः प्रातर्मक्षू धियावसुर्जगम्यात् ॥९॥५॥

अकारि । ते । इन्द्र । गोतमेभिः । ब्रह्माणि । आऽउक्ता । नमसा । हरिऽभ्याम् ।
सुऽपेशसम् । वाजम् । आ । भर । नः । प्रातः । मक्षु । धियाऽवसुः । जगम्यात् ॥ ९ ॥ ५ ॥

भाषायाम्.

८. हे देव इन्द्र, त्यां (=तादृशीं=वक्ष्यमाणां) चित्रां (=चायनीयाम्=उत्कृष्टाम्) इषम् (=अन्नं) त्वं (=त्वमेव) नः (=अस्मान्) आपो न (=आप इव =आपो यथा पाययन्ति तद्वत्) परिज्मन् (=भूमौ) पीपयः (=अपीपयः=पाययसि)। यथा, हे शूर, ऊर्जं न विश्वध क्षरध्यै (=उदकमिव सर्वत्र क्षरितुम्=उदकमिव यथा सर्वत्र विपुलं वहति) तथा, त्मनं (=जीवनम्) अस्मभ्यं प्रतियंसि (=प्रयच्छसि) ॥

अत्रांत्रे उदकं यथा अस्मान् विपुलं पाययसि तथा अन्नमपि त्वमेव विपुलं ददासि नहि त्वदृते भवति कोपि जलवद्विपुलस्यान्नस्य दाता देव इति भावः ॥

९. हे इन्द्र, [अनेन प्रकारेण] ते (=तुभ्यं) गोतमेभिः (=गोतमैः=गोतमकुलजातैः पुरुषैरस्माभिः) अकारि (=स्तोत्रं कृतमस्ति), [अपि च] हरिभ्यां (=तव हरिद्वर्णाश्वाभ्यां=तयोः प्रीत्यर्थं) ब्रह्माणि (=स्तोत्राणि) नमसा (=नम्रीभावेन सह) ओक्ता (=ओक्तानि=गीतानि) [सन्ति]। [एवं सति] त्वं नः (=अस्मभ्यं) सुपेशसं (=सुरूपं=सुन्दरं) वाजम् (=अन्नरूपां संपदम्) आ भर (=आवह)।— धियावसुः (=धीमान्=प्रज्ञावान्) [इन्द्रः] प्रातः (=प्रातःकाले) मक्षु (=क्षिप्रं) जगम्यात् (=दिनेदिन आगच्छतु) ॥

८. हे देवा इंद्रा, भूतलावर आम्हांला पाण्याप्रमाणें उत्तम अन्नरस पाजितोस तो तूंच पाजितोस, आणि हे शूर [इंद्रा], त्या अन्नरसानें पाण्याप्रमाणें सर्वत्र वाहणारें इतकें विपुळ जीवन तूं आम्हांला देत असतोस.

९. हे इंद्रा, [या प्रकारेंकरून] गोतमांनीं तुझी उपासना केली आहे, [आणि] नम्रभावेंकरून [तुझ्या] अश्वांप्रीत्यर्थ स्तोत्रें गाइलीं आहेत. [तर] तूं आम्हांला सुंदर संपत्ति घेऊन ये.—बुद्धिमान् [इंद्र] प्रतिदिनीं प्रातःकाळीं शीघ्र येत जाओ.

8. It is thou, O divine Indra, that makest us drink the sap of excellent food on earth like water; with which sap, O valiant [Indra], thou givest unto us a livelihood everywhere as affluent as water.

9. [Thus], O Indra, have the Gotamas sacrificed to thee, [thus] with humility have praises been sung of thy tawny pair of horses. Bring thou beautiful wealth unto us.—May [therefore] wise Indra daily come unto us quickly in the morning.

---

८. 'हे इंद्रा, पाण्याप्रमाणें विपुल अन्न देणारा आणि तेंहि उत्तम देणारा तुजसारिखा दुसरा देव कोणी नाहीं. या तुझ्या अन्नाच्या योगानें आम्हांस इतकें जीवन प्राप्त होतें कीं तें पाण्याप्रमाणें जिकडे तिकडे वाहतें' असा या किंचित् कठिण मंत्राचा भावार्थ आहे. कितीएक शब्दांविषयीं थोडाबहुत वाद असला तरी एकंदरींत तात्पर्य आम्हीं लिहिल्याप्रमाणें आहे यांत संशय दिसत नाहीं. 'उत्तम अन्नरस पाजतोस' असें म्हटलें आहे तो कोणता त्याची कल्पनाच करणें आहे. सोमरस असेल एक; अथवा गोरसादि पातळ अन्नें तरी असतील एक. 'पाण्याप्रमाणें सर्वत्र वाहणारें इतकें विपुल जीवन.' हें जीवन (त्मन्) म्हणजे जीव अथवा आयुष्य समजावयाचें असें दिसतें. परंतु तें पाण्याप्रमाणें वाहतें अशी उपमा देणें हें किंचित् विलक्षण दिसतें.

ही ऋचा खालीं लिहिल्याप्रमाणें वृत्ताला लागतेः—

तुअं त्यां न इन्दर देव चित्राम्
इषमॉपो न पॅपयः परिज्मन् ।
यया शूॅर प्रति अॅस्मभ्यॅ यंसि
त्मनॅमूॅर्ज न विश्वध क्षरध्यै ॥

९. हा या सूक्ताचा उपसंहार आहे आणि यांत ऋषीनें काय सेवा केली आहे

सूक्तम् ६४.

गोतमो नोधा ऋषिः । मरुतो देवता । पञ्चदशी त्रिष्टुप् । शिष्टा जगत्यः ।

वृष्णे शर्धाय सुमखाय वेधसे नोधः सुवृक्तिं प्र भरा मरुद्भ्यः ।
अपो न धीरो मनसा सुहस्त्यो गिरः समञ्जे विदथेष्वाभुवः ॥ १ ॥

वृष्णे । शर्धाय । सुऽमखाय । वेधसे । नोधः । सुऽवृक्तिम् । प्र । भर । मरुत्ऽभ्यः ।
अपः । न । धीरः । मनसा । सुऽहस्त्यः । गिरः । सम् । अञ्जे । विदथेषु । आऽभुवः ॥ १ ॥

भाषायाम्.

१. हे नोधः, वृष्णे (=सेचनसमर्थाय=वीर्यवते) सुमखाय (=सुपूजनीयाय) वेधसे (=मेधाविने) शर्धाय (=गणाय) [मेधाविने] मरुद्भ्यः (=मरुद्गणाय) सुवृक्तिं (=सुष्टु तष्टं=सुसंस्कृतं=सुरचितं=सुन्दरं स्तोत्रं) प्र भर (=प्रार्पय=प्रगाय) ।— धीरः (=धीमान्=ध्यानयुक्तः सन्) सुहस्त्यः (=शोभनाङ्गुलियुक्तः=कृताञ्जलिः) [एतादृशोहम्] आभुवः (=देवताभिमुखीकरणाय समर्थाः) गिरः (=स्तुतिलक्षणा वाचो) विदथेषु (=यज्ञेषु) अपो न (=मेघजलानीव) मनसा समञ्जे (=मनसा रचयित्वा आविष्करोमि=प्रसृजामि) ॥

अत्र पूर्वार्धेन स्तुतौ नोधा आत्मानं प्रेरयति । प्रेरितश्च सन् अहं मरुतः स्तौमीति प्रतिजानाति ॥

आणि त्याला इंद्रानें काय द्यावें तें सांगितलें आहे. तो म्हणतो कीं, ‘ हे इंद्रा, आतां हें आम्हां गोतमांचें सूक्त येथें संपलें. याप्रमाणें आम्हीं स्तोत्र म्हणून तुझी उपासना केली आहे. आणि याप्रमाणें तुझे जे पिवळे घोडे त्यांची आम्हीं स्तुति केली आहे. तर तेणेंकरून तूं प्रसन्न हो, आणि आम्हांला सुंदर संपत्ति आणून दे. सूक्तकर्ता नोधा ऋषि गोतमकुळांतील असल्यामुळें आणि त्याचे कुळांतील दुसरीं माणसेंहि त्याजवरोवर इंद्रोपासनेंत गुंतलेलीं असल्यामुळें ‘ गोतमांनीं तुझी उपासना केली आहे ’ असें या मंत्रांत म्हटलें आहे.

‘ [तुझ्या] अश्वांप्रीत्यर्थ स्तोत्रें गाइलीं आहेत ’=‘ ब्रह्माणि आ उक्ता नमसा हरिभ्याम्. ’ शिवाचें स्तोत्र आपण करूं लागलों म्हणजे नंदीविषयीं त्यांत वर्णन येत असतें, आणि विष्णूची प्रार्थना केली तर त्यांत शेषाचें अथवा गरुडाचें स्तोत्र सहज होत असतें. त्याप्रमाणेंच इंद्राचें स्तोत्र गातांनां त्याच्या पिवळ्या घोड्यांचें स्तोत्र केलेंसें होतें. या सूक्ताच्या दुसऱ्या मंत्रांत इंद्राच्या पिवळ्या घोड्यां-

सूक्त ६४.

ऋषि–गोतमकुळांतील नोधा नांवाचा (पूर्वे सूक्ताचा जो तोच). देवता– मरुत्. वृत्त–जगती, १५ वीचें मात्र त्रिष्टुभ्.

१. हे नोधा, वीर्यवान्, सुपूजनीय [आणि] प्रज्ञावान् जो गण, जो मरुद्गण, त्याजप्रीत्यर्थ तूं सुंदर स्तोत्र अर्पण कर.—ध्यानयुक्त [आणि] प्रांजल [होऊन मी] अनुग्राहक स्तोत्रें मनांत रचून यज्ञांत त्यांची उदकांप्रमाणें वृष्टि करितों.

Hymn 64.

To the *Maruts.* By *Nodhas* of the family of the *Angirases.* Metre—*Jagatî* except of verse 15 which is *Trishṭubh.*

1. Offer, O Nodhas, an excellent hymn to the manly, the worshipful [and] the wise troop, [the troop of] the Maruts.—Contemplating [and] meek I compose in [my] mind and shower out like water hymns in the sacrifices, that shall propitiate [the gods].

विषयीं उच्चार आलाच आहे. 'तुझी उपासना या प्रकारेंकरून आम्हीं गोतमांनीं केली आहे, तर तूं आपले पिवळे घोडे रथास जोडून त्या रथांत बसून ये आणि सुंदर संपत्ति आम्हांस दे, आणि प्रतिदिनींहि तूं असाच येत जा.' इतकेंच सर्व मंत्राचें तात्पर्य दिसतें.

'स्तोत्रें'='ब्रह्माणि.' सू. ६२, मंत्र १३ आणि त्याजवरील टीप पहा.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावयाची आहेः–

अकारि ते इन्दर गोतमेभिः
ब्रह्माणि ओक्ता नमसा हरिभ्याम् ।
सुपेशसं वाअजमा भरा नः
प्रातर्मक्षू धीयॅावसुर्जगम्यात् ॥

या सूक्ताच्या नऊ मंत्रांतून प्रत्येक मंत्रांत 'इन्द्र' हें संबोधन आलें आहे, आणि प्रत्येक मंत्रांत 'इन्द्र' असें न म्हणता वृत्तानुरोधानें 'इन्दर' असा उच्चार केला पाहिजे ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. आणि ६२व्या सूक्तांत ३रा, ४था, ५वा, १२वा आणि १३वा या सर्व मंत्रात 'इन्द्र' हा शब्द आला आहे त्यांतून ३ऱ्या मंत्रांत मात्र 'इन्दरस्' असा उच्चार केला पाहिजे, इतर ठिकाणीं 'इन्द्र' असा उच्चार व्हावयाचा आहे. परंतु या ४, ५, १२ आणि १३व्या मंत्रांत 'इन्द्र' हें पद चरणाच्या उत्तरभागांत आलें आहे, पूर्वभागांत आलेलें नाहीं, आणि ६३व्या सूक्तांतील प्रत्येक मंत्रांत चरणाच्या पूर्वभागांत आलें आहे.

---

१. हेंहि सूक्त नोधा ऋषीनेंच रचिलेलें आहे. प्रथम तो आपणालाच म्हणतो, 'हे नोधा, जे वीर्यवान्, ज्यांची पूजा सर्वांनीं करण्यास योग्य होय, आणि जे प्रज्ञावान् अशा मरुतांप्रीत्यर्थ तूं एक सुंदर स्तोत्र गा.' असें आपणासच म्हणून

ते जज्ञिरे दिव ऋष्वास उक्षणो रुद्रस्य मर्या असुरा अरेपसः ।
पावकासः शुचयः सूर्या इव सत्वानो न द्रप्सिनो घोरवर्पसः २

ते । जज्ञिरे । दिवः । ऋष्वासः । उक्षणः । रुद्रस्य । मर्याः । असुराः । अरेपसः ।
पावकासः । शुचयः । सूर्याःऽइव । सत्वानः । न । द्रप्सिनः । घोरऽवर्पसः ॥ २ ॥

भाषायाम्.

२. ते (=मरुतः) ऋष्वासः (=महान्त) उक्षणः (=वीर्यवन्तो) रुद्रस्य मर्याः (=रुद्रपुत्राः), असुराः (=बलवन्तः) अरेपसः (=पापरहिताः) पावकासः (=पावकाः=शोधकाः) सूर्या इव शुचयः (=सूर्या इव दीप्तिमन्तः) द्रप्सिनः (=वृष्टिबिन्दुयुक्ताः=वृष्टिजलोपेता) [अपि च] सत्वानो न घोरवर्पसः (=योद्धार इव भयंकररूपा) [एतादृशा] दिवः (=द्युलोकात्) जज्ञिरे (=जाताः सन्ति) ॥

मरुतो द्युलोकाज्जाताः सन्ति अपि च जातमात्रा एव महान्तो वीर्यवन्तो बलवत्त्वादिगुणविशिष्टाश्चासन्निति भावः ॥ मरुतां रुद्रपुत्रत्वम् आ ते पितर्मरुतां सुम्नमेतु (ऋ. २. ३२. १) इत्यादिषु स्थलेषु स्पष्टमेव ।

मग पुढें म्हणतो, 'होय, हा पहा मी ध्यानस्थ होऊन आणि हात जोडून मनांतल्यामनांत स्तोत्र रचितों, आणि या यज्ञांत त्याचा पावसाप्रमाणें एकदम वर्षाव करितों, आणि तें स्तोत्र अशा प्रकारचें रचितों कीं, तें देवांस इकडे घेऊन येईल.'

या मंत्रावरून स्पष्ट होतें कीं, वेदसूक्तांचे कर्ते, 'आम्हीं सूक्तें रचितों' असें म्हणून दाखविण्यास मागें सरत नसत. 'सूक्त रचिलें' असें म्हटलें तर आपलीं सूक्तें देवप्रणीत नव्हेत अशी पुढें कोणी तरी शंका काढील, तर 'सूक्त रचणें,' 'सूक्त करणें,' 'सूक्त नवें आहे' इत्यादि वाक्यांचा प्रयोग करूं नये इत्यादि गोष्टी त्यांच्या ध्यानींमनीं सुद्धा नव्हत्या असें वेदांतील अनेक मंत्रांवरून उघड दिसून येतें.

'प्राञ्जल' = 'सुहस्त्यः.' याचा अर्थ 'कुशल' असा सुद्धा चांगला संभवतो.

'अनुग्राहक' = 'आभुवः.' म्हणजे देवांची कृपा होई असें करणारीं. या शब्दाचा अर्थ, 'तयार असलेलीं,' 'मला ज्यांची स्फूर्ति सहज होत आहे अशीं' असाहि कितीएक विद्वान् करितात. पण आम्ही सायणांस अनुसरलों आहों.

या ऋचेची वृत्तरचना खालीं दाखविल्याप्रमाणें आहेः—

२. ते द्युलोकापासून महान्, वीर्यवन्त, रुद्रपुत्र, बलवान्, निर्दोष, पवित्र, सूर्यांप्रमाणें तेजस्वी, वृष्टियुक्त [आणि] योद्ध्यांप्रमाणें भयंकर दिसणारे [असे] जन्मले आहेत.

2. They were born of the heaven, great, [and] powerful, [they the] sons of Rudra, [were born of heaven], mighty, stainless, pure, resplendent like suns, and endowed with showers, [and] of awful appearance like fighting men.

वृ॑ष्णे॒ शर्धा॑य॒ सुम॑खाय वे॒धसे
नोध॑: सुवृ॒क्तिं प्र भ॑रा म॒रुद्भ्य॑: ।
अ॒पो न धीरो॒ मन॑सा सु॒हस्त्यो॒
गिर॑: सम॑ञ्जे वि॒दथे॑ष्वा॒भुव॑: ॥

पहिला चरण शिवाय करून सर्व ऋचा श्लोकाप्रमाणें सरळ वाचतां येते.

---

२. या मंत्रांत मरुत् जन्मले तेव्हां कसे होते तें सांगतोः—'मरुत् द्युलोकापासून म्हणजे प्रकाशमय जो महान् आकाशप्रदेश त्यापासून जन्मले, आणि जे जन्मले तेच मोठे, वीर्यवन्त, बलवन्त, पापरहित, पवित्र, सूर्यांप्रमाणें तेजःपुंज, उदकवृष्टींनीं युक्त आणि योद्ध्यांप्रमाणें भयंकर दिसणारे असेच जन्मले.' ते मागाहून मोठे इत्यादि झाले असें नाहीं.

या मंत्रांत मरुतांस रुद्रपुत्र असें म्हटलें आहे त्याविषयीं सू. ३८, मंत्र ७ आणि त्याजवरील टीप पहा.

मरुतांचें जन्म द्युलोकापासून झालें असें इतर पुष्कळ ठिकाणीं आलें आहे. ऋ. १०.७७. २ यांत मरुतांला 'दिवस्पुत्रासः' म्हणजे 'द्यूचे पुत्र' असें म्हटलें आहे, आणि ३. ५३. १३; ५. ५९. ६ इत्यादि मंत्रांत त्यांस 'दिवो मर्याः' म्हणजे 'द्यूचे पुत्र' असें नांव दिलें आहे. आणि मरुत् म्हणजे 'वादळें' अथवा 'वारे' असा अर्थ आहे आणि 'वादळें' आकाशांत निष्पन्न होतात त्यापेक्षां ते 'द्यूचे पुत्र' होत असें म्हणणें यांत कांहीं ओढाताण नाहीं.

'वृष्टियुक्त' = 'द्रप्सिनः.' अक्षरशः अर्थ 'बिन्दुयुक्त' असा आहे. म्हणजे जेथें जेथें मरुत् जातात तेथें तेथें वृष्टि होते यास्तव त्यांस वृष्टिजलयुक्त असें विशेषण दिलें आहे. सू. ३८, मंत्र ९, १० इत्यादि पहा.

ही ऋचा किंचित् खडबडीत लागते, श्लोकाप्रमाणें सरळ म्हणतां येत नाहींः—

ते ज॑ज्ञिरे दि॒व ऋ॒ष्वास॑ उ॒क्षणो॑
रु॒द्रस्य॒ मर्या॒ असु॑रा अरे॒पस॑: ।
पा॒व॒कास॑: शु॒चय॒: सूर्या॑ इव
सत्वा॑नो॒ न द्र॒प्सिनो॑ घो॒रव॑र्पसः ॥

युवा॑नो रु॒द्रा अ॒जरा॑ अभो॒ग्घनो॑ ववृ॒क्षुरध्रि॑गावः॒ पर्व॑ता इव ।
दृ॒ळ्हा चि॒द्विश्वा॒ भुव॑नानि॒ पार्थि॑वा॒ प्र च्या॑वयन्ति दि॒व्यानि॑ म॒ज्मना॑ ३

युवा॑नः । रु॒द्राः । अ॒जराः॑ । अ॒भो॒क्ऽहनः॑ । व॒वृ॒क्षुः । अध्रि॑ऽगावः ।
पर्व॑ताःऽइव ।
दृ॒ळ्हा । चि॒त् । विश्वा॑ । भुव॑नानि । पार्थि॑वा । प्र । च्य॒व॒य॒न्ति॒ । दि॒व्या-
नि॑ । म॒ज्मना॑ ॥ ३ ॥

चि॒त्रैर॒ञ्जिभि॒र्वपु॑षे॒ व्य॑ञ्जते॒ वक्षः॑सु रु॒क्माँ अधि॑ येतिरे शु॒भे ।
अंसे॑ष्वेषां॒ नि मि॑मृक्षुर्ऋ॒ष्टयः॑ सा॒कं ज॑ज्ञिरे स्व॒धया॑ दि॒वो नरः॑॥४॥

चि॒त्रैः । अ॒ञ्जिऽभिः॑ । वपु॑षे । वि । अ॒ञ्ज॒ते । वक्षः॑ऽसु । रु॒क्मान् ।
अधि॑ । ये॒ति॒रे॒ । शु॒भे ।
अंसे॑षु । ए॒षा॒म् । नि । मि॒मृ॒क्षुः॒ । ऋ॒ष्टयः॑ । सा॒कम् । ज॒ज्ञि॒रे । स्व॒-
धया॑ । दि॒वः । नरः॑ ॥ ४ ॥

भाषायाम्.

३. रुद्राः (=रुद्रपुत्रा) [मरुतो] युवानः (=तरुणा) अजरा (=जरारहिता) अभोग्घनः (=देवान् हविर्भिर्न भोजयन्ति तेषां हन्तारः) अध्रिगावः (=अधृतगमनाः=अप्रतिहतगमना) पर्वता इव (=पर्वतसदृशा) [एतादृशा] ववक्षुः (=ववृधुः) । [ते मरुतो] मज्मना (=स्वकीयबलेन) दृळ्हाचित् (=दृढान्यपि=महान्त्यपि) विश्वा (=विश्वानि) पार्थिवानि दिव्यानि भुवनानि (=पृथिवीसंबन्धीनि तथा द्युलोकसंबन्धीनि वस्तूनि) प्र च्यावयन्ति (=प्रचालयन्ति) ॥

४. [मरुतः] चित्रैः (=चायनीयैः=सुन्दरैः) अञ्जिभिः (=आभरणैः) वपुषे (=शोभार्थं) वि अञ्जते (=आत्मानं व्यक्तं कुर्वन्ति=अलंक्रियन्ते) [अपि च] वक्षःसु (=अंसयोरन्तरेषु) रुक्मान् (=हारान्) शुभे (=शोभार्थम्) अधि येतिरे (=उपरि चक्रिरे=धारयन्ति) । एषां (=तेषां मरुताम्) अंसेषु ऋष्टयः (=भल्लाः) नि मिमृक्षुः (=निमृष्टाः स्थिता बभूवुः=धृता भवन्ति) । नरः (=नेतारः शूरा) [मरुतः] स्वधया साकं (=स्वबलेन सह) दिवः (=द्युलोकात्) जज्ञिरे (=जाताः सन्ति) ॥

अत्रेदमुक्तं भवति । मरुतः शरीरेषु आभरणानि धारयन्ति वक्षःस्थलेषु हारान् धारयन्ति, अंसेषु भल्लान् धारयन्ति । अपि च आभरणादीनां यद्धारणं तद्रूपेण बलेन सहैव जज्ञिरे न तु जन्मनोनन्तरं लोके पुरुषा यथैतानि धारयन्ति तथा दधत इति॥

३. रुद्रपुत्र [मरुत्] तरुण झाले ते जरारहित, अधार्मिकांस मारून टाकणारे, अनिवार्य, [आणि] पर्वतांसारिखे झाले. ते आपल्या बळाच्या योगानें पृथिवींतील [आणि] द्युलोकांतील सर्व प्रचंड वस्तूहि कांपवून टाकितात.

४. [ते] सुंदर आभरणांनीं [आपलें] शरीर शोभवितात, [आणि] शोभा येण्यासाठीं वक्षःस्थळीं हार घालितात. त्यांच्या खांद्यांवर भाले चकाकतात. [हे] शूर आपल्या बळासहितच द्युलोकापासून जन्मले.

3. The sons of Rudra grew young, undecaying, killers of the infidel, irresistible [and massive] like mountains. With their might they make to tremble even the strongest earthly [and] heavenly things.

4. They adorn themselves with ornaments, they wear neck-laces on their chests for beauty ; on their shoulders the spears glitter. The heroes were born of heaven along with their might.

---

३. 'मरुद्देव वाढले आणि तरुण झाले ते अजर, अधार्मिकांचें निर्दालन करणारे, अनिवार्य, पर्वतप्राय जड आणि मोठे असे झाले. ते आपल्या बळाच्या योगानें सकल वस्तु कांपवून टाकितात, मग त्या वस्तु पृथिवीवरील असोत अथवा द्युलोकसंबंधी असोत, लहान असोत अथवा समुद्राप्रमाणें प्रचंड असोत,' असा भावार्थ आहे.

'कांपवून टाकितात'='प्र च्यावयन्ति.' जे वादळांत कधींतरी सांपडले असतील त्यांस मरुत् सकल प्रचंड वस्तूंलाहि कसे हालवून टाकितात तें सहज समजेल.

या ऋचेची वृत्तरचना खालीं दाखविल्याप्रमाणें आहेः—

युवानो॑ रुद्रा अजरा अभोग्घनो
ववक्षुरध्रिगावः पर्वता इव ।
दृळ्हाचिद्विश्वा भुवनानि पार्थिवा
प्रच्यावयन्ति दिविआनि मज्मना ॥

४. भावार्थः— 'मरुत् द्युलोकापासून जेव्हां जन्मले तेव्हांच त्यांच्या आंगावर अलंकार होते, तेव्हांच त्यांच्या वक्षःस्थलीं सुवर्णाचे हार होते, तेव्हांच त्यांच्या खांद्यावर भाले शोभत होते. या प्रकारेंकरून आपल्या सकळ शक्तीनिशींच ते द्यूपासून जन्मले, जन्मल्यानंतर हीं धारण केलीं असें नाहीं.'

'हे सुंदर आभरणांनीं आपलें शरीर शोभवितात'= 'चित्रैर्वपुषे वि अञ्जते अञ्जिभिः.' अक्षरशः अर्थ, 'शोभेकरितां

ई॒शा॒न॒कृतो॒ धुन॑यो रि॒शाद॑सो॒ वाता॑न्वि॒द्युत॒स्तवि॑षीभिरक्रत ।
दु॒हन्त्यूध॑र्दि॒व्यानि॒ धूत॑यो॒ भूमिं॑ पिन्वन्ति॒ पय॑सा॒ परि॑ज्रयः ॥५॥६

ई॒शा॒न॒ऽकृत॑: । धुन॑यः । रि॒शाद॑सः । वाता॑न् । वि॒ऽद्युत॑: । तवि॑षीभिः ।
अ॒क्र॒त॒ ।

दु॒हन्ति॑ । ऊध॑: । दि॒व्यानि॑ । धूत॑यः । भूमि॑म् । पि॒न्व॒न्ति॒ । पय॑सा ।
परि॑ऽज्रयः ॥ ५ ॥ ६ ॥

भाषायाम्.

५. ईशानकृतः (=आत्मानं सर्वस्याधिपतिं कुर्वन्तो) धुनयः (=वस्तुमात्रं कम्पयितारो) रिशादसः (=हिंसकान् अत्तारः) [एतादृशा मरुतस्] तविषीभिः (=आत्मीयैर्बलैः) वातान् (=वायून्) विद्युतः (=तडितश्च) अक्रत (=कुर्वन्ति= जनयन्ति)। धूतयः (=वस्तुमात्रस्य कम्पयितारः) परिज्रयः (=परितो गन्तारः =सर्वव्यापिन) [एतादृशा मरुतो] दिव्यानि (=दिवि भवानि) ऊधः (=ऊधांसि=ऊधःस्थानीयान्यभ्राणि) दुहन्ति (=तेभ्यो दुग्धं गृहीत्वा रिक्तीकुर्वन्ति) [अपि च] पयसा (=तेन दुग्धेन) भूमिं (=पृथिवीं) पिन्वन्ति (=वर्धयन्ति)॥

मेघेभ्यो वृष्टिं कारयित्वा जलैर्भूमिं सिञ्चन्ति तद्द्वारा च तां धान्यादिना परिपूर्णां कुर्वन्तीत्यर्थः॥

सुंदर आभरणांनीं शोभविले जातात.

या मंत्रांत जें मरुतांचें स्वरूप वर्णिलें आहे तसेंच इतर ठिकाणींहि वर्णिलेलें आहे. सू. ३९, मंत्र २ पहा. मरुतांच्या खांद्यांवर भाले असतात असें इतर ठिकाणींहि सांगितलें आहे.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटल्यास श्लोकवृत्ताला वसते:—

चित्रैरञ्जिभिर्वपुषे वि अञ्जते
वक्षःसु रुक्माँ अधि येतिरे शुभे ।
अंसेषु एषां नि मिमृक्षुर्ऋष्टयः
साकं जज्ञिरे स्वधया दिवो नरः ॥

५. सर्वाधिपति, [वस्तुमात्रास] कांपविणारे, [आणि] शत्रूंला खाऊन टाकणारे [जे मरुत्, ते] [आपल्या] शक्तींच्या योगानें वायूंस [आणि] विद्युल्लतांस उत्पन्न करितात. [वस्तुमात्रास] कांपविणारे [आणि] सर्वव्यापी [मरुत्] आकाशांतील कासी पिळून दूध काढितात [आणि] [त्या] दुधानें पृथिवीला पुष्ट करितात.

5. Exercisers of supreme power, shakers [of every thing] [and] destroyers of the enemy, the Maruts make the winds [and] the lightnings by [their power]. The shakers [of every thing] [and] the pervaders [of all] milk the heavenly udders [and] fatten the earth with the milk.

५. भावार्थः— 'सकल वस्तूंवर ज्यांचें आधिपत्य आहे, सकल वस्तूंस जे थरथर कांपवितात, शत्रूंला तर जे खाऊन टाकितात, असे जे मरुत् ते आपल्या पराक्रमानें आकाशांत वारा आणि वीज यांस उत्पन्न करितात. ते आकाशाच्या कासींप्रमाणें दिसणारीं जीं अभ्रें त्यांतून दूध पिळून काढितात; म्हणजे मेघजलांची वृष्टि करितात. आणि त्या मेघजलरूप दुधानें पृथिवीला पुष्ट करितात; म्हणजे पृथिवीवर पाणी पाडून तिला धनधान्यादिकांनीं समृद्ध करितात; यांत मरुत् आकाशांत काय काय पराक्रम करितात तें सांगितलें आहे. आकाशांतून वृष्टि होण्याचा प्रसंग आला म्हणजे प्रथम मोठें वादळ होतें, मग विजा चमकूं लागतात, आणि मग पाणी पडून जिकडे तिकडे जलमय होतें, आणि उन्हानें शोषून गेलेली आणि तेणेंकरून जणुं कृश झालेली जी भूमि तिजला पुष्टि येते. तर ह्या ज्या सर्व गोष्टी त्या वायुरूपी मरुत् करितात असें वर्णन करणें अगदी स्वाभाविक आहे. आणि यावरून मरुत् या देवांचें खरें स्वरूप काय आहे तेंहि दिसून येतें.

'सर्वाधिपति' = 'ईशानकृतः.' सूक्त ६१, मं. ११ याजवरील सायणभाष्य पहा.

'सर्वव्यापी' = 'परिज्रयः.' म्हणजे 'जिकडे तिकडे फिरणारे,' 'सर्वत्र जाणारे.' हें विशेषण मरुतांस योग्य आहे, कारण वायूचा संचार कोठें होत नसतो ?

'आकाशांतील कासी' = 'दिव्यानि ऊधः.' आकाशांत जे पांढरे भुरकट मेघ जमलेले असतात आणि पाऊस पडण्याच्या सुमारास आकाशांत लोंबतच जणुं राहिले आहेत असे दिसतात, ते आकाशरूपी प्रचंड गाईच्या कासीच होत अशी कल्पना करणें, आणि त्यांच्या दुधानें पृथिवी पुष्ट होते असें म्हणणें, यांत पुष्क-

पिन्वन्त्यपो मरुतः सुदानवः पयो घृतवद्विदथेष्वाभुवः।
अत्यं न मिहे वि नयन्ति वाजिनमुत्सं दुहन्ति स्तनयन्तमक्षितम्
॥ ६ ॥

पिन्वन्ति । अपः । मरुतः । सुऽदानवः । पयः । घृतऽवत् । विदथेषु । आऽभुवः ।
अत्यम् । न । मिहे । वि । नयन्ति । वाजिनम् । उत्सम् । दुहन्ति । स्तनयन्तम् । अक्षितम् ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. सुदानवः (=शोभनदानाः=दानशीला) मरुतः अपः पयः (=पयस्वतीरपः) आभुवो विदथेषु घृतवत् (=ऋत्विजो यज्ञेषु घृतं यथा तथा), पिन्वन्ति (=सिञ्चन्ति=भूमौ पातयन्ति)। [ते] अत्यं न (=अश्वमिव=यथा लोके सादिनोऽश्वं विनयन्ति तद्वत्) वाजिनं मिहे विनयन्ति (=मेघं वृष्ट्ये शिक्षयन्ति=तं शिक्षयित्वा तस्माद् वृष्टिं कुर्वन्ति)। [अपि च ते] स्तनयन्तं (=गर्जन्तम्) अक्षितम् (=अक्षीणम्) उत्सं (=प्रस्रवणं=प्रस्रवणसदृशं मेघं) दुहन्ति (=तस्माद् दुग्धं गृहीत्वा तं रिक्तं कुर्वन्ति) ॥

अत्रेदमुक्तं भवति। यथा लोके सादिनोऽश्वं शिक्षयित्वा यथेच्छं चालयन्ति तथा मरुतोपि मेघं शिक्षयन्तोव यथेच्छं च तं वर्षयन्ति ते प्रस्रवणवत् सगर्जनम् अक्षीणं च मेघं दुहन्ति यच्च पयस्वज्जलं दुहन्ति तद्, ऋत्विजो यज्ञेषु घृतमावर्जयन्ति तद्वद्, भूमावावर्जयन्तीति ॥

ळ सौंदर्य आहे. आधुनिक कवींच्या कल्पना फार निराळ्याच दिशेला धांवतील यांत संशय नाहीं.

ही ऋचा विशेष ह्रस्वदीर्घव्यत्ययाशिवाय वाचतां येते. ती अशीः—

ईशानकृतो धुनयो रिशादसो
वातान्विद्युतस्तविषीभिरक्रत।
दुहन्ति ऊधर्दिविआनि धूतयो
भूमिं पिन्वन्ति पयसा परिज्रयः॥

यांत चवथ्या चरणांत 'भूमिं पिन्वन्ति' याबद्दल 'पिन्वन्ति भूमिं' असा पाठ असता तर तो चरण अगदी अडचणीशिवाय सरळ वाचतां आला असता.

६. यज्ञांत ऋत्विज् तूप [ओ-तितात] तसे दानशाली मरुत् रसानें भरलेलीं उदकें ओतीत असतात. [ते] घोड्याला [शिकविल्या]प्रमाणें मेघाला शिकवून वृष्टि करवितात. ते गर्जनायुक्त [आणि] अक्षय [अशा] झऱ्याला दोहतात.

6. Aye, the liberal Maruts pour out the rich waters like as the priests do clarified butter in sacrifices. They train the cloud like a horse and make it to rain: they milk the noisy [and] the never-failing spring.

६. 'पूर्वील मंत्रांत मेघमालारूप आकाशाच्या कासींचें दूध मरुत् पिळतात म्हणून सांगितलें, त्याच कल्पनातरंगाला अनुसरून या मंत्रांत म्हणतो, 'होय, ते जें जमिनीवर पाडतात तें दूधच असतें, आणि तें यज्ञांत ऋत्विज् तुपाच्या आहुत्या अग्नींत घालितात त्यासारिखें दाट आणि चिकणाईनें जणुं भरलेलें असतें. आणि ते मेघाकडून वृष्टि करवितात ती मेघाच्या मनांत येईल तेव्हां पडणारी अशी नव्हे, तर जसा घोडा शिकविलेला असला म्हणजे स्वार सांगेल त्याप्रमाणें तो ऐकतो आणि स्वार फिरवील तिकडे जातो, थांबवील तेव्हां थांबतो, आणि धांववील तेव्हां धांवतो, तसा मेघ जणुं मरुतांनीं शिकविलेलाच आहे, त्यामुळें ते आपल्या इच्छेप्रमाणें त्याला वर्षवितात. ते मेघाला दोहून दूध पाडितात तेव्हां एकाद्या गर्जना करणाऱ्या आणि कधींहि न सुकणाऱ्या झऱ्यांतून दूध वाहविल्याप्रमाणें वाहवितात असें भासतें.'

'शिकवून वृष्टि करवितात'='मिहे वि नयन्ति'. अक्षरशः अर्थ, 'वृष्टी-करितां शिकवितात', म्हणजे वृष्टि कशी पाडावी तें शिकवितात.

'गर्जनायुक्त [आणि] अक्षय झऱ्याला'='स्तनयन्तम् अक्षितम् उत्सम्.' पहिल्या दोन उपमा सांगितल्या. १ली, ऋत्विज् यज्ञांत तूप घालतात तसें; २री, शिकविलेल्या घोड्याला चालविल्याप्रमाणें यथेच्छ वृष्टि करवितात; आणि आतां ही तिसरी, कीं उदकवृष्टि करितात ती कधींहि न वाळून जाणाऱ्या झऱ्याचें दूध काढिल्याप्रमाणें होय.

खालीं लिहिल्याप्रमाणें आधुनिक वृत्तांत आणि या ऋचेंत भेद आहेः—

पिन्वन्त्यपो मरुतः सुदानवः
पयो घृतवद्विदथेष्वाभुवः ।
अत्यं न मिहे वि नयन्ति वाजिनम्
उत्सं दुहन्ति स्तनयन्तमक्षितम् ॥

म॒हि॒षासो॑ मा॒यिन॑श्चि॒त्रभा॑नवो गि॒रयो॒ न स्वत॑वसो रघु॒ष्यद॑: ।
मृ॒गा इ॑व ह॒स्तिन॑: खादथा॒ वना॒ यदारु॑णीषु॒ तवि॑षी॒रयु॑ग्ध्वम् ॥७॥

म॒हि॒षास॑: । मा॒यिन॑: । चि॒त्रऽभा॑नवः । गि॒रय॑: । न । स्वऽत॑वसः ।
रघु॒ऽस्यद॑: ।
मृ॒गाःऽइ॑व । ह॒स्तिन॑: । खा॒द॒थ॒ । वना॑ । यत् । आरु॑णीषु । तवि॑षीः ।
अयु॑ग्ध्वम् ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. [हे मरुतः], यद् (=यदा) [यूयम्] आरुणीषु (=युष्माकम् अरुणवर्णासु वाहनभूतासु हरिणीषु) तविषीः (=बलानि=युष्माकं बलानि) अयुग्ध्वं (=संयोजितवन्तः=बलवन्तो यूयं बलवतीर्वडवा रथेषु यदा योजयथ) [तदा] महिषासः (=महिषाः=महान्तो) मायिनः (=ज्ञानवन्तः) चित्रभानवः (=शोभनदीप्तयो), गिरयो न स्वतवसः (=पर्वतवत् स्वकीयेन बलेन युक्ता), रघुष्यदः (=शीघ्रगमना) [एतादृशा यूयं], हस्तिनो मृगा इव (=गजा इव), वना (=वनानि=वृक्षान्) खादथ (=भक्षयथ) ॥

युष्माकं बलवतीर्हरिणी रथेषु योजयित्वा यदा यूयं गच्छथ तदा तासां वेगैर्वर्धितस्ववेगा यूयं मार्गस्थान् वृक्षान् प्रभङ्क्थेत्यर्थः ॥ मरुतो हि हरिणीः स्वरथेषु युञ्जन्तीति ऋ. १. ३८. ६ इत्यादिषु मन्त्रेषु प्रसिद्धम् ॥

७. [हे मरुतांनो], [तुम्ही] जेव्हां [आपलें] बळ [आपल्या ज्या] लाल हरिणी [त्यांच्यावळा]ला जोडितां [तेव्हां] महान्, प्राज्ञ, सुशोभिवंत, पर्वतप्राय, स्वतःसिद्ध-बलवंत [आणि] शीघ्रगामी [असे जे तुम्ही ते] हत्तींप्रमाणें वृक्षांस खाऊन टाकितां.

7. When, [O Maruts], [ye who are] vast, intelligent, of agreeable splendor, self-powerful like mountains, [and] swift, join [your] might to [your] red deer, [ye] eat up the trees like elephants.

७. भावार्थः ' हे मरुतांनो, तुम्ही मोठे, महाज्ञानी, सुंदरतेजस्क, पर्वतांप्रमाणें जड आणि मोठे, आणि फार चपळ आहां त्यामुळें तुम्ही जाऊं लागलां म्हणजे तुमच्या मार्गांत आलेले कोणतेहि पदार्थ मोडतीलच; परंतु जेव्हां तुम्ही आपलें बळ आणि वेग हीं आपल्या लाल हरिणींच्या वेगाला जोडितां, म्हणजे बळयुक्त आणि वेगयुक्त अशा तुमच्या लाल हरिणी आपल्या रथाला जोडून जात असतां तेव्हां तुम्हांला फार बळ आणि वेग हीं येत असतात, आणि तुम्ही हत्तींप्रमाणें मोठमोठे वृक्ष सहज मोडून खाऊनच जणूं टाकीत असतां.'

' लाल हरिणी '=' आरुणी.' मरुत् हे रथाला हरिणी जोडून जात असतात असें इतर ठिकाणींहि सांगितलें आहे. सू. ३८, मं. ६ व त्याजवरील आमची टीप पहा. आणि मरुत् जाऊं लागले म्हणजे वाटेंत झाडें मोडून टाकितात याविषयीं त्याच सूक्ताचा ५ वा मंत्र पहा.

' हत्तींप्रमाणें '=' मृगा इव हस्तिनः'. हत्ती याला ' हस्ती मृगो ' म्हणजे ' हात (=सोंड) असलेला पशु ' असें म्हटलें आहे. यावरून ' हस्ती ' हें प्रथम केवळ विशेषण होतें, ' मृग ' अथवा यासारिखाच दुसरा एकादा शब्द लाविल्याशिवाय त्याचा अर्थ ' गज ' असा प्रथम होत नसे.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें आहेः—

महिषासो मायिनश्चित्रभानवो
गिरयो न स्वतवसो रघुष्यदः ।
मृगा इव हस्तिनः खादथा वना
यदारुणीषु तविषीरयुग्ध्वम् ॥

सिंहा इंव नानदति प्रचेतसः पिशा इंव सुपिशों विश्ववेंदसः ।
क्षपो जिन्वंन्तः पृषतीभिर्ऋष्टिभिः समित्सबाधः शवसाहिंमन्यवः ॥ ८ ॥

सिंहाःऽइंव । नानदति । प्रऽचेंतसः । पिशाःऽइंव । सुऽपिशंः । विश्वऽवेंदसः ।
क्षपंः । जिन्वंन्तः । पृषंतीभिः । ऋष्टिऽभिः । सम् । इत् । सऽबाधंः । शवंसा । अहिंऽमन्यवः ॥ ८ ॥

भाषायाम्.

८. प्रचेतसः (=प्रकृष्टज्ञानाः), पिशा इव सुपिशः (=रुरवो नाम मृगा इव स्वशरीरगतैः श्वेतविन्दुभिरलंकृताः), विश्ववेदसः (=सर्वज्ञाः) क्षपः (=शत्रून् क्षपयन्तः), सबाधः (=ऋत्विजः=उपासकान्) पृषतोभिः (=श्वेतविन्द्वङ्किताभिः स्वमृगीभिः) ऋष्टिभिः (=भल्लसदृशैरायुधविशेषैश्च) समित् (=साकमेव) जिन्वन्तः (=प्रीणयन्तः) शवसा अहिमन्यवः (=बलेन सर्पक्रोधाः) [एतादृशा मरुतः] सिंहा इव नानदति (=भृशं शब्दं कुर्वन्ति) ॥

अत्र 'क्षपः'शब्दो भृशमेव दुर्बोधः । तस्यार्थम् अनेके व्याख्यातारोनेकधा कुर्वन्ति तथापि तत्संबन्धिनीः शङ्काः केपि न समादधति । यद्धि विद्वन्मणिना मोक्षमूलरेण ' क्षपो जिन्वन्तः समित् सबाधः ' इत्येतस्य रात्रिसमये मरुतो मित्राणि साकं जागरयन्तीत्यनुवादः कृतस्तद्विषय एतद्वक्तव्यमस्ति । न खलु मरुतो रात्रौ मित्राणि जागरयन्तीति कुत्रचित् प्रसिद्धम् । सबाधः इत्येतस्य च सायणेन मन्त्रान्तरेष्वपि (ऋ. ३. ५१. ४; १०. १०१. २; ८. ६६. १; ७. २६. २; ८. ७४. ६ इत्यत्र) ऋत्विज इत्येतमेवार्थः कृतोस्ति । एवं सति सायणव्याख्यासकाशात्साधीयसोर्थस्यालाभात् सांप्रतं सायणव्याख्यानमेव योग्यमनुसर्तुमिति ॥

८. परमप्राज्ञ, रुरूंप्रमाणें सुशोभित, [आणि] सर्वज्ञ, [आणि] [आपल्या] टिपक्यांच्या हरिणींनीं [आणि] भाल्यांनीं [शत्रूंचा] नाश करणारे [आणि] उपासकांला संतोष देणारे [असे जे] बळाच्या योगानें सर्पासारिखे रागीट [मरुत् ते] सिंहांप्रमाणें गर्जत असतात.

8. They roar like lions, [they who are] wise, [who are] handsome like Rurus, possessed of all knowledge, destroyers [of the enemies], [and who] with their might [are] angry like snakes, and succour with [their] spotted deer [and] [their] spears the worshippers together.

---

८. या मंत्रांत मरुत् सिंहांप्रमाणें गर्जना करीत असतात इतकें सांगितलें आहे, बाकी सर्व विशेषणें आहेत. त्यांतून दोन तीन विशेषणांच्या अर्थाविषयीं वाद आहे.

' रुरूंप्रमाणें सुशोभित '=' पिशा इव सुपिशः '. रुरु म्हणून एक टिपक्याटिपक्यांचा हरिण आहे असें सायणाचार्य म्हणतात.

'टिपक्यांच्या हरिणींनीं'='पृषतीभिः'. मरुतांच्या रथास टिपक्यांच्या हरिणी जोडलेल्या असतात, असें सांगितलें आहे त्याच ह्या येथें सांगितलेल्या होत. पूर्वीचा मंत्र आणि त्याजवरील टीप पहा. ह्या टिपक्यांच्या हरिणी म्हणजे चित्रविचित्र रंगांच्या मेघमाला होत असें जें नैरुक्तकारांचें मत आहे तेंच खरें आहे. मात्र त्यांस हरिणी असें म्हणण्याचें कारण असें आहे कीं, मरुतांसारिख्या शीघ्रगामी देवांच्या रथांस जोडण्यास योग्य असें हरिणीपेक्षां चपळ जनावरच नाहीं, म्हणून हरिणी असें त्यांस वेदऋषि म्हणत.

' भाल्यांनीं '=' ऋष्टिभिः'. मरुतांच्या खांद्यावर भाले (म्हणजे विद्युद्रूपी भाले) असतात असें वेदांत सांगितलें आहे. सू. ३७, मं. २ आणि त्याजवरील टीप पहा.

' [शत्रूंचा] नाश करणारे'='क्षपः'. हा अर्थ आम्हीं सायणांस अनुसरून केला आहे. परंतु आम्हांस त्याविषयीं संशय आहे. या ऋचेचा उत्तरार्ध बराच कठिण आहे. आणि याचा वेगवेगळे विद्वान् वेगवेगळा अर्थ करितात. त्यांतून एकहि सायणाचार्यांच्या अर्थापेक्षां बरा नाहीं. यास्तव आम्हीं सायणांनीं दिलेलाच अर्थ घेतला आहे.

' उपासकांला संतोष देणारे '=' सबाधः जिन्वन्तः'. हा सुद्धा अर्थ सायणाचार्यांप्रमाणें केला आहे. ' सबाधः ' याचा ऋत्विज् अथवा उपासक असा अनेकवचनीं अर्थ आचार्यांनीं अन्य मंत्रांतहि केला आहे (ऋ. ७. २४. ५; ८. ७४.

रोदसी आ वदता गणश्रियो नृषाचः शूराः शवसाहिमन्यवः ।
आ वन्धुरेष्वमतिर्न दर्शता विद्युन्न तस्थौ मरुतो रथेषु वः ॥९॥

रोदसी इति । आ । वदत । गणऽश्रियः । नृऽसाचः । शूराः । शवसा । अहिऽमन्यवः ।
आ । वन्धुरेषु । अमतिः । न । दर्शता । विऽद्युत् । न । तस्थौ । मरुतः । रथेषु । वः ॥ ९ ॥

भाषायाम्.

९. हे गणश्रियः (=गणभावमाश्रयन्तो), नृषाचः (=नॄन् मनुष्यान् सेवमानाः), शूराः (=शौर्योपेता) [मरुतः], शवसा (=वलेन) अहिमन्यवः (=सर्पक्रोधा) [यूयं] [रथचक्रैस्तथा कशाभी] रोदसी (=द्यावापृथिव्यौ) आ वदत (=आ नादयत=रथचक्राणां कशानां च नादैस्ते पूरयत)। [वो] वन्धुरेषु (=रथानां सारथिस्थानेषु) [हि] अमतिर्न दर्शता (=सूर्यदीप्तिवत्तेजस्विनी) [युष्माकं कान्तिः] [तस्थौ=आरूढवत्यस्ति] [अपि च] हे मरुतः, वो (=युष्माकं) रथेषु [च] विद्युत् न (=सौदामिनीव) दर्शता (=तेजस्विनी) [युष्माकं कान्तिः] तस्थौ (=आरूढवत्यस्ति) ॥

अत्रेदमुक्तं भवति । हे मरुतः, युष्माकं रथा युष्मद्गमनार्थं सिद्धाः सन्ति । तेषु यूयं स्थिताः स्थ । तेषां सारथिस्थानेषु सूर्यदीप्तिवत्तेजस्विनी युष्मद्दीप्तिर्द्योतते तथा युष्मद्रथेषु सौदामिनीवद्देदीप्यमाना युष्माकं दीप्तिर्द्योतते । एतादृशेषु रथेषु स्थिता यूयं गच्छत । गच्छन्तश्च रथचक्राणां कशादीनां च नादैर्द्यावापृथिव्यावापूरयतेति ॥

‘ रोदसी आ वदत ’ इत्येतद् वाक्यं विद्वन्मण्डलशिरोमणिर्मोक्षमूलरो “ द्यावापृथिव्यौ वन्दध्वम् ” इति व्याचष्टे । रोदस्योः पुनर्मरुत्कृतं वन्दनं वेदेष्वप्रसिद्धं तेषां कशानां तु इहेव शृण्व एषां कशा हस्तेषु यद्वदान् (ऋ. १. ३७. ३) इत्यत्र नादः प्रसिद्धः । तथा रथारूढानां गच्छतां मरुतां गर्जनं यद्य यान्ति मरुतः सं ह ब्रुवतेऽध्वन्ना । शृणोति कश्चिदेषाम् (ऋ. १. ३७. १३) इत्यत्र अध स्वनान्मरुतां विश्वमा सद्म पार्थिवम् । अरेजन्त प्र मानुषाः (ऋ. १. ३८. १०) इत्यत्र च दृष्टम् ॥

६; ७. २६. २; ८. ६६. १; ३. ५१. ५४; १०. १०१. २ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा).

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला बसतेः—

सिंहा इव नानदति प्रचेतसः
पिशा इव सुपिशो विश्ववेदसः ।
क्षपो जिन्वन्तः पृषतीभिर्ऋष्टिभिः
समित्सबाधः शवसाहिमन्यवः ॥

९. हे समुदायरूपानें फिरणारे मरुत् हो, हे मनुष्यहितकारक हो, हे शूर मरुत् हो, बळानें सर्पक्रोधी [असे जे तुम्ही ते] द्युलोक आणि भूलोक [हे] गर्जनेनें भरून टाका. [तुमचें तेज] [तुमच्या] बैठकींवर लकलकीत सूर्यकांतीप्रमाणें [आणि] तुमच्या रथांत विजेप्रमाणें आरूढ झालें आहे.

9. Ye Maruts, who go in troops, who are friendly to men, O brave ones, fill ye, who by [your] power are irate like snakes, the earth and heaven with your roar. On your chariot-seats is mounted [a brightness] like the bright effulgence [of the sun], [and] on your chariots, O Maruts, a [brightness] like the lightning.

---

९. या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, 'हे मरुतांनो, तुमचे रथ तयार आहेत आणि तुम्ही त्यांत बसले आहां. आणि त्यांच्या ज्या सारथि बसण्याच्या बैठकी त्यांजवर तुमचें तेज सूर्याच्या लकलकीत तेजाप्रमाणें शोभत आहे, आणि रथांत तुम्ही जेथें बसलां आहां तेथें तर तुमचें तेज विजेसारिखें चमकत आहे. तर अशा रथांत बसून तुम्ही जा आणि जातां जातां तुम्ही मोठा गंभीर नाद करीत असतां तो करा, म्हणजे सर्व द्युलोक आणि पृथिवी हीं तेणेंकरून भरून जातील.'

'समुदायरूपानें फिरणारे' = 'गणश्रियः'. म्हणजे एकएकले जाणारे नव्हेत, सर्व मिळून एक गण होऊन जाणारे. ऋ. ५. ६०. ८ यांत असें म्हटलें आहे कीं, "हे अग्नी, समुदायरूपानें फिरणारे जे मरुत् त्यांच्यासहित तूं येऊन आमचा सोम पी."

'बळानें सर्पक्रोधी.' म्हणजे ज्यांचें बळ इतकें आहे कीं त्याच्या योगानें त्यांला कांहींच वाईट सहन होत नाहीं आणि ते सर्पाप्रमाणें रागीट होतात.

'द्युलोक आणि भूलोक हे गर्जनेनें भरून टाका' = 'रोदसी आ वदत'. अक्षरशः अर्थ, 'द्युलोक आणि भूलोक यांभर बोला.' भाषा पहा.

या मंत्राचा उत्तरार्ध किंचित् कठिण आहे. यांत 'तुमचें तेज' हे शब्द आम्हीं सायणांस अनुसरून अध्याहृत घेतले आहेत. त्याशिवायच (म्हणजे एक 'न' व्यर्थ मानून) जो कितीएक विद्वान् निर्वाह करितात तो चिंत्य दिसतो.

'बैठकींवर' = 'वन्धुरेषु'. ह्या बैठकी म्हणजे रथावर सारथि बसावयाची जी जागा असते ती समजावयाची आहे.

ही ऋचा खालीं लिहिल्याप्रमाणें म्हणावयाची आहेः–

विश्ववेदसो रयिभिः समोकसः संमिश्लासस्तविषीभिर्विरप्शिनः।
अस्तार इषुं दधिरे गभस्त्योरनन्तशुष्मा वृषखादयो नरः॥१०॥७

विश्वऽवेदसः । रयिऽभिः । सम्ऽओकसः । संऽमिश्लासः । तविषीभिः ।
विऽरप्शिनः ।
अस्तारः । इषुम् । दधिरे । गभस्त्योः । अनन्तऽशुष्माः । वृषऽखादयः ।
नरः ॥ १० ॥ ७ ॥

भाषायाम्.

१०. विश्ववेदसः (=सर्वज्ञाः), रयिभिः समोकसः (=धनैर्युक्ताः) तविषीभिः संमिश्लासः (=बलैः संयुक्ताः), विरप्शिनः (=महान्तः), अस्तारः (=इषुक्षेपणशीलाः), अनन्तशुष्माः (=अनवच्छिन्नबलाः), वृषखादयः (=सोमः खाद्यो येषां ते) [एतादृशा] नरः (=शूरा) [मरुतः] इषुं (=बाणं) गभस्त्योः (=हस्तयोः) दधिरे (=धारयन्ति) ॥

'वृषखादय' इति संदिग्धार्थं पदमस्माभिः सायणाननु व्याख्यातम् । तेषां व्याख्यायाः साधीयसोर्थस्य, सत्स्वपि नानाविधेषु व्याख्यानान्तरेषु, अलाभात् । आ तादृशस्यार्थस्य लाभाद्धि वरं सायणाचार्यस्यैव व्याख्यायाः स्वीकरणम् ॥

रओदसी आ वदता गणश्रियो
नृषाचः शूरा शवसाहिमन्यवः ।
आ वन्धुरेषु अमतिर्न दर्शता
विद्युन्न तस्थौ मरुतो रथेषु वः ॥

१०. सर्वज्ञ, संपत्तींनीं युक्त, पराक्रमांनीं संयुक्त, महान्, बाण मारणारे, अमितबलवान् [आणि] सोमपान करणारे [असे जे] शूर [मरुत्, ते] खांद्यावर बाण घेत असतात.

10. Possessed of all knowledge, accompanied by all wealth, possessing all powers, great, archers, having endless prowess, drinkers of Soma, the brave [Maruts] hold arrows on [their] shoulders.

---

१०. 'सकळ वस्तूंचें ज्यांस ज्ञान आहे, सर्व संपत्ति ज्यांच्या घरीं नांदत आहेत, सकळ पराक्रम ज्यांच्या हातीं आहेत, असे जे मोठे आणि धनुर्धर मरुत् आणि ज्यांचें बळ तर अत्यंत होय, जे सोम पीत असतात असे जे शूर मरुत्, ते आपल्या खांद्यावर बाण ठेवून जात असतात.'

'सोमपान करणारे'='वृषखादयः'. हा अर्थ आम्हीं सायणांस अनुसरून केला आहे, पण आम्हांस त्याविषयीं संशय आहे. या मंत्रांत इतका हा एकच शब्द कठिण आहे. सायण तरी याचा अर्थ निश्चयानें सांगूं शकत नाहींत. ते म्हणतात, "इंद्र हेंच आयुध ज्यांचें ते, अथवा सोम हेंच ज्यांचें खाद्य अथवा पेय ते." मोक्षमूलर यांणीं 'भारी वजनाचीं कडीं आंगावर घालणारे' असा अर्थ केला आहे. दुसऱ्या विद्वानांनीं दुसरेच अर्थ केले आहेत. परंतु निर्विवाद एकहि नाहीं. यास्तव आम्हीं सायणांच्या अर्थांपैकीं एक अर्थ घेतला आहे.

ही ऋचा खालीं लिहिल्याप्रमाणें वाचावीः—

विश्वेवेदसो रयिभिः समोकसः
संमिश्लासस्तविषीभिर्विरप्शिनः ।
अस्तार इषुं दधिरे गभस्तिओः
अनन्तशुष्मा वृषखादयो नरः ॥

हिरण्ययेभिः पविभिः पयोवृध उज्जिघ्नन्त आपथ्यो न पर्वतान् ।
मखा अयासः स्वसृतो ध्रुवच्युतो दुध्रकृतो मरुतो भ्राजदृष्टयः ॥ ११

हिरण्ययेभिः । पविऽभिः । पयःऽवृधः । उत् । जिघ्नन्ते । आऽपथ्यः । न । पर्वतान् ।
मखाः । अयासः । स्वऽसृतः । ध्रुवऽच्युतः । दुध्रऽकृतः । मरुतः । भ्राजत्ऽऋष्टयः ॥ ११ ॥

भाषायाम्.

११. पयोवृधः (=पृश्नेः पयोभिर्वर्धमाना) मरुतः, आपथ्यो न (=रथा मार्गे मृत्तिकाखण्डान् भित्त्वा रेणून् उज्जिघ्नन्ते तद्वत्), हिरण्ययेभिः (=हिरण्यैः=सुवर्णमयैः) पविभिः (=चक्रैः) पर्वतान् (=पर्वतसदृशान् मेघान्) उज्जिघ्नन्ते (=हत्वा ऊर्ध्वं गमयन्ति)। [कीदृशा मरुतः ?] मखाः (=मंहनीयाः=पूजनीयाः), अयासः (=सततगमनशीलाः), स्वसृतः (=स्वयमेव गमनं कुर्वन्तः), ध्रुवच्युतः (=ध्रुवाणां निश्चलानामपि पदार्थानां च्यावयितारः), दुध्रकृतः (=अन्यैर्धर्तुमशक्यमात्मानं कुर्वाणाः), [तथा] भ्राजदृष्टयः (=दीप्यमानायुधाः) ॥

अत्रेदमुक्तम् । यथा रथा मार्गेषु गच्छन्तः स्वभारेण भूमिं विदार्य रेणून् उत्किरन्ति तथा मरुतो गमनसमये पर्वतसदृशानपि मेघान् भित्त्वा तेषां रेणून् उत्किरन्तीति ॥

'पयोवृधः' इत्यत्र "जम्भे रसस्य वावृधे" (ऋ. १. ३७. ५) इति मन्त्रान्तरे मरुतां पयोभिः पुष्टत्वं प्रतिपादितमिति द्रष्टव्यम् ॥

'दुध्रकृतः' इत्येतस्य व्याख्यानविषय एवमवधेयम् । यथा "ईशानकृतः" इत्येतद् आत्मानमीशानं कृतवन्त इति व्याख्यातुं योग्यम् (ऋ. १. ६४. ५) तथा 'दुध्रकृतः' इत्येतस्य आत्मानं दुध्रं कृतवन्तः इत्येव व्याख्यानं साधीयः । दुध्रपदस्य तु दुर्धरत्वार्थत्वं सू. ५६, मं. ३ इत्यत्र प्रतिपादितमिति ॥

मखशब्दः संदिग्धार्थो भाति । अनेकैरनेकधा व्याचख्युः । वयं तु सायणानुसरामः साधीयसोऽर्थस्यानुपलब्धेः ॥

११. दुधानें पुष्ट झालेले [मरुत्] रथांसारिखे सुवर्णमय चक्रांनीं मेघांला चूर्ण करून उडवितात. [जे] मरुत् पूजनीय, सतत गमन करणारे, स्वतः जाणारे, अचल पदार्थांलाहि हालवून टाकणारे, दुसऱ्यांकडून हालविले न जाणारे, [आणि] लकलकीत भाले धारण करणारे [असे होत].

11. With golden wheels the milk-fattened [Maruts] reduce the mountains (the clouds) to powder, like chariots; Maruts, who deserve to be worshipped, always moving, endowed with self-motion, the shakers of unshakable things, themselves unshaken, [and] armed with shining spears.

११. 'पूजनीय, सतत चालतच असणारे, ज्यांला दुसऱ्यांनीं कोणी गति दिलेली नसतां स्वताहाचीच गति आहे, जे अचळ पदार्थांलाहि हालवून टाकणारे परंतु ज्यांस हालविणारे कोणी नाहींत, ज्यांच्या खांद्यावर लकलकीत भाले असतात, असे जे पृश्नि आईचें दूध पिऊन पिऊन पुष्ट झालेले मरुत्, ते जाऊं लागले म्हणजे, रथ मार्गानें जाऊं लागले असतां मातीचा चुराडा करून धूळ वर उडवितात तसे, पर्वताप्रमाणें जे मेघ त्यांचा चुराडा सुवर्णमय चक्रांनीं करून त्यांचे कण वर उडवितात' असा या मंत्राचा भावार्थ आहे.

मरुत् जाऊं लागले म्हणजे विजा चमकतात त्यामुळें ते सोन्याच्या चक्रांनीं मेघ फोडून टाकितात अशी ऋषीनें येथें कल्पना केली आहे.

'दुधानें पुष्ट झालेले'=' पयोवृधः'. हा सायणानुसारी अर्थ आम्हांस इतर व्याख्यानकारांच्या अर्थापेक्षां योग्य दिसतो. सू. ३७, मं. ५ आणि त्याजवरील टीप पाहा.

'सतत गमन करणारे'=' अयासः'. म्हणजे कधींहि उगीच स्वस्थ न वसणारे. हें विशेषण मरुतांस फार योग्य दिसतें.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटली पाहिजेः—

हिरण्ययेभिः पविभिः पयोवृधः
उज्जिघ्नन्ते आपथिओ न पर्वतान् ।
मखा अयासः स्वसृतो ध्रुवच्युतो
दुध्रकृतो मरुतो भ्राजदृष्टयः ॥

घृषुं पावकं वनिनं विचर्षणिं रुद्रस्य सूनुं हवसा गृणीमसि ।
रजस्तुरं तवसं मारुतं गणमृजीषिणं वृषणं सश्चत श्रिये ॥ १२ ॥

घृषुम् । पावकम् । वनिनम् । विऽचर्षणिम् । रुद्रस्य । सूनुम् । हवसा । गृणीमसि ।
रजःऽतुरम् । तवसम् । मारुतम् । गणम् । ऋजीषिणम् । वृषणम् । सश्चत । श्रिये ॥ १२ ॥

भाषार्थम्.

१२. [वयं] घृषुं (=शत्रूणां बलस्य घर्षकं=शौर्योपेतं) पावकं (=सर्वेषां शोधकं) वनिनम् (=उदकवन्तं=वृष्टिं कारयित्वा जलं ददतं) विचर्षणिं (=विशेषेण सर्वस्य द्रष्टारम्) [एतादृशं] रुद्रस्य सूनुं (=रुद्राज्जातं) [मरुद्गणं] हवसा (=आह्वानेन) गृणीमसि (=गृणीमः=स्तुमः) । [हे ऋत्विजः], [यूयं] रजस्तुरं (=रजसां लोकानां गन्तारम्=अन्तरिक्षादिषु लोकेषु गन्तारं) तवसं (=प्रवृद्धम्) ऋजीषिणं (=सोमवन्तं) वृषणं (=सेचनसमर्थं=वीर्यवन्तं) मारुतं गणं (=मरुतां गणं) श्रिये (=ऐश्वर्याय) सश्चत (=प्राप्नुत=उपाद्ध्वम्) ॥

ऋजीषिणमित्यस्य व्याख्यानविषय एतच्चिन्तनीयम् । तद्युक्तेषु सर्वेष्वपि मन्त्रान्तरेषु सायणाचार्याः सवनद्वयेऽभिषुतः सोमो यस्तृतीयसवने पुनः सूयते स ऋजीषः मरुतस्तु तृतीयसवने हूयन्ते । अतस्तेषाम् ऋजीषित्वमिति व्याचख्युः । एवं सत्यपि मोक्षमूलरादयो विदुष्टराः पाश्चिमात्यपण्डितास्तमर्थं विहाय ऋज्धातोस्तस्य निर्वचनं कृत्वा 'त्वरमाण' इति निर्वचनैकावलम्बि भाष्यमिच्छन्ति । सायणभाष्यगतः पुनरर्थो भारतवर्षीयवेदव्याख्यातृपरंपरागतस्तमर्थं त्यक्त्वा निर्वचनैकाधारस्यार्थस्य कल्पनमत्राकारणम् इति । अतः कारणाद्वयमत्र सायणमनुसरामः ॥

१२. या मंत्रांत ऋषि आपल्या मित्रांस म्हणतो, 'पराक्रमी, वृष्टि करणारा आणि सर्वदर्शी, असा जो रुद्रापासून जन्मलेला मरुतांचा गण त्याचा मी धांवा करीत आहें, आणि त्याची स्तुति करीत आहें. तर मित्रहो, आकाशमार्गानें जिकडे तिकडे धांवणारा, प्रबळ, सोमपी आणि वीर्यवंत असा जो मरुतांचा गण त्याची तुम्ही धनादिसुखासाठीं उपासना करा.'

'उदकयुक्त'='वनिनम्'. म्हणजे जिकडे जातात तिकडे उदकवृष्टि करितात असे जे मरुत्. सू. ३७, मं. १०; सू. ३८, मं. ७, ९ हे मंत्र आणि त्यांज-

१२. महान्, पवित्र, उदकयुक्त, [आणि] विशेषेंकरून सर्वदर्शी [असा जो] रुद्रापासून जन्मलेला [मरुद्गण त्या]ला [आम्ही] आह्वान करून स्तवितों. आकाशांतून गमन करणारा, पराक्रमशाली, सोमपी [आणि] प्रबळ [असा जो] मरुतांचा गण [त्या]ची [तुम्ही] सुखाकरितां उपासना करा.

12. We glorify with prayer the valiant, the purifying, the water-giving [and] the wise [troop of Maruts] born of Rudra. Worship ye for wealth the troop of Maruts that sweeps through the sky, that is mighty, that drinks the Soma, [and] that is endowed with manliness.

वरील टीप पहा. पाश्चिमात्य विद्वान् ' पूजा करणारे ' असा अर्थ करितात.

' विशेषेंकरून सर्वदर्शी ' =' विचर्षणिम् '. सू. ३५, मं. १० याजवरील टीप पहा. ह्या शब्दाचा परंपरागत आलेला आणि सर्वत्र चांगला जुळणारा अर्थ जो सायणांस अनुसरून आम्हीं केला आहे, तो सोडून देऊन ' चर् ' चालणें या धातूपासून व्युत्पत्ति कल्पून ' विशेषेंकरून फिरणारा ', ' चपल, ' असा अर्थ पाश्चिमात्य पंडित करितात.

' आकाशांतून गमन करणारा ' =' रजस्तुरम् '. अक्षरशः अर्थ, ' आकाशांतून धांवत जाणारा ' असा आहे. प्रस्तुत स्थळीं ' जमिनीवरून धूळ उडविणारा ' असा अर्थ सायणाचार्य करितात, पण ऋ. ६. २. २ याजवरील त्यांचेंच भाष्य पहा.

' सोमपी ' =' ऋजीषिणम् '. अक्षरशः अर्थ, ' सकाळीं एकदा आणि दोनप्रहरीं एकदा रस काढून घेऊन पुनः संध्याकाळीं जो सोमवल्लीचा रस काढितात तो ज्यांला आहे अथवा तो जे पितात ते '. सोमवल्लीचा सकाळीं एकदा रस काढून घेऊन देवांस अर्पण केल्यानंतर दुसऱ्यानें दोनप्रहरींहि त्याच वल्लीचा रस काढून दुसऱ्या देवांस अर्पण करीत, आणि पुनः त्याच वल्लीचा रस तिसऱ्या खेपेला संध्याकाळीं काढून मरुतांस अर्पण करीत असत. त्या रसाला ' ऋजीष ' असें नांव असे. आणि हा संध्याकाळीं काढिलेला सोमरस मरुतांस अर्पण करीत म्हणून त्यांस ' ऋजीषी ' असें म्हणत. हाच अर्थ ' ऋजीषी ' शब्दाचा सायणांनीं दिला आहे, आणि यास्कांनींहि तोच दिला आहे. यावरून तो अनादिकाळापासून परंपरागत आहे असें उघड होतें. परंतु तो न घेतां ' ऋजू '

प्र नू स मर्तः शवसा जनाँ अति तस्थौ व ऊती मरुतो यमावत ।
अर्वद्भिर्वाजं भरते धना नृभिरापृच्छ्यं क्रतुमा क्षेति पुष्यति॥ १३॥

प्र । नु । सः । मर्तः । शवसा । जनान् । अति । तस्थौ । वः । ऊती । मरुतः । यम् । आवत ।
अर्वत्ऽभिः । वाजम् । भरते । धना । नृऽभिः । आऽपृच्छ्यम् । क्रतुम् । आ । क्षेति । पुष्यति ॥ १३ ॥

भाषायाम्.

१३. हे मरुतः, यं [मर्तं] [यूयं] व ऊती (=युष्माकं संरक्षणेन) आवत (=अरक्षत=रक्षथ) स मर्तो नु (=क्षिप्रं) शवसा (=बलेन) जनान् (=अन्यान् पुरुषान्) प्रातितस्थौ (=प्रकर्षेण अतीत्य तिष्ठति=अन्येभ्यः श्रेष्ठो भवति), [सः] अर्वद्भिर्वाजं भरते (=स्वकीयाश्वै रणजिद्भिरन्नं संपादयति), [तथा] नृभिर्धना (=स्वकीयैर्वीरैर्धनानि शत्रूणां संपदो) [भरते=संपादयति], [स] आपृच्छ्यं (=पूज्यं) क्रतुं (=प्रज्ञाम्) आ क्षेति (=आप्नोति), [स च] पुष्यति (=प्रजया पशुभिः पुष्टो भवति) ॥

अर्वद्भिर्वाजं भरते धनानि नृभिर्भरत इत्यत्र स्वकीयैरश्वैर्वीरैश्च शत्रूञ्जित्वा तेभ्योऽन्नं तथा धनान्यपहृत्यानयतीति भावः ॥

धातूपासून 'सरळ जाणें' असा अर्थ कल्पून 'ऋजीषी' म्हणजे 'सरळ रेषेनें जोरानें जाणारा' असा अर्थ पाश्चिमात्य पंडित कल्पितात. परंतु आम्हांस वाटतें, ज्याच्या अर्थाविषयीं अव्याहत परंपरेनें भारतवर्षांत खात्री आहे त्या शब्दाचा अर्थ केवळ धात्वर्थावर अवलंबून अन्यथा कल्पणें आणि तोहि विशेष कारणांशिवाय कल्पणें यापेक्षां परंपरागत आलेला अर्थ स्वीकारणें हेंच योग्य आहे, यांत संशय नाहीं.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावी लागतेः—

घृषुं पावकं वनिनं विचर्षणिं
रुद्रस्य सूनुं हवसा गृणीमसि ।
रजस्तुरं तवसं मारुतं गणम्
ऋजीषिणं वृषणं सश्चत श्रिये ॥

१३. हे मरुतांनो, ज्या [मर्त्या]ला [तुम्ही] आपला आश्रय देऊन रक्षीत असतां तो मर्त्य बळानें लोकांपेक्षां श्रेष्ठ होतो. तो घोड्यांच्या योगानें अन्न हरण करून आणितो, [तो] आपल्या वीरांच्या योगानें लूट घेऊन येतो. त्याला उत्कृष्ट बुद्धि प्राप्त होते, आणि [तो] उत्कर्षाप्रत पावतो.

13. That mortal speedily excels [other] men with [his] power whom, Maruts, you protect with your support. He carries off wealth with [his] horses, [carries off] booties with [his] men ; he attains excellent wisdom. He prospers.

१३. या मंत्रांत, ज्या मनुष्यावर मरुतांची कृपा होते तो मर्त्य इतर मर्त्यांपेक्षां कसा श्रेष्ठ होतो, त्याचा उत्कर्ष कसा होतो आणि त्याला समरांगणांत जय प्राप्त होऊन शत्रूचीं सकल धनें कशीं मिळतात तें सांगितलें आहे.

'तुम्ही आपला आश्रय देऊन रक्षीत असतां '=' व ऊती आवत '. अक्षरशः 'तुम्ही आपल्या रक्षणानें रक्षिलें आहे ' असा अर्थ होतो. या मंत्रावरूनहि उघड होतें कीं देवांच्या कृपेनें मनुष्याचें कल्याण होत असतें, तप आचरल्यानें त्याचें फल प्राप्त होऊन देवांच्या मनांत आमचें कल्याण करावयाचें नसलें तरीहि होतें असें नाहीं अशी वेदकर्त्या ऋषींची समजूत होती. पण त्यांच्या आधुनिक वंशजांची समजूत निराळीच आहे हें कितीहि वेळ सांगितलें तितकें थोडेंच.

' घोड्यांच्या योगानें अन्न हरण करून आणितो' =' अर्वद्भिर्वाजं भरते '. आपले पूर्वज आर्य अनार्यजनांशीं वगैरे लढाई करीत असत, आणि लढाईंत जय आला म्हणजे शत्रूंचें धनधान्य, मालमिळकत जें हाताला सांपडेल तें सर्व लुटून आणीत. त्या चालीला अनुलक्षून या मंत्रांत ऋषि म्हणतो आहे कीं, ज्याला मरुतांचा प्रसाद होतो त्याचे घोडे आणि योद्धे यांस लढाईंत यश येतें आणि शत्रूचें द्रव्य लुट मिळतें. या सूक्ताचा कर्ता ब्राह्मण म्हणून सांगणें नकोच, तो परमपवित्र जें पुरातन गोतमकुळ त्यांतील नोधा या नांवाचा महर्षि होता. तेव्हां पुरातन ऋषि खरोखर कसे असत त्याविषयीं या मंत्रावरून अनुमान काढावयाला येतें.

या ऋचेचे पहिले तीन चरण फारच थोड्या अडचणीनें सरळ लागतातः—

प्र नू स मर्तः शवसा जनाँ अति
तस्थौ व ऊती मरुतो यमावत ।
अर्वद्भिर्वाजं भरते धना नृभिः
आपृच्छिअं क्रतुमा क्षेति पुष्यति ॥

चर्कृत्यं मरुतः पृत्सु दुष्टरं द्युमन्तं शुष्मं मघवत्सु धत्तन ।
धनस्पृतमुक्थ्यं विश्वचर्षणिं तोकं पुष्येम तनयं शतं हिमाः॥ १४॥

चर्कृत्यम् । मरुतः । पृत्ऽसु । दुस्तरम् । द्युऽमन्तम् । शुष्मम् । मघवत्ऽसु । धत्तन ।
धनऽस्पृतम् । उक्थ्यम् । विश्वऽचर्षणिम् । तोकम् । पुष्येम । तनयम् । शतम् । हिमाः ॥ १४ ॥

भाषायाम्.

१४. हे मरुतः, [यूयं] चर्कृत्यं (=पुनःपुनः स्तुत्यम्=अतिशयेन स्तुत्यं) पृत्सु दुष्टरं (=युद्धेषु दुस्तरणीयम्=अजेयं) द्युमन्तं (=दीप्तिमन्तं) शुष्मं (=बलं) मघवत्सु (=यजमानेषु) धत्तन (=स्थापयत) । [वयं] धनस्पृतं (=धनस्य संपादयितारम्) उक्थ्यं (=स्तुत्यं) विश्वचर्षणिं (=विशेषेण द्रष्टारं=सर्वज्ञं) तोकं तनयं [च] (=पुत्रं पौत्रं च) शतं हिमाः (=शतं संवत्सरान्) पुष्येम (=पोषयेम=लभेमहि) ॥

पुत्रपौत्रान् लभेमहि ते च शतसंवत्सरान् जीवेयुरिति प्रार्थ्यते नोधसेति द्रष्टव्यम् । अनया वेदसूक्तकृतामपि मनुष्याः शतवर्षायुष्का एवेति संमतमासीदिति स्पष्टम् । एवं सति पुराणादिकेषु वेदोत्तरग्रन्थेषु दशरथादयः शतसहस्रवर्षाण्यजीवन्निति यदुक्तं तच्चिन्त्यमिति ज्ञातव्यम् ॥

---

१४. यांत ऋषि म्हणतो कीं, ' हे मरुतांनो, तुम्ही परमवर्णनीय, आणि युद्धांत शत्रूकडून जिंकलें न जाणारें असें शौर्य तुमच्या उपासकांच्या म्हणजे तुम्हांप्रीत्यर्थ जे यज्ञ करितात त्यांच्या अंगीं स्थापन करा,–म्हणजे त्याला त्या प्रकारचें बळ द्या. आणि आम्ही जे गोतमकुळांतील स्तोत्रकर्ते तुमचें स्तोत्र या सूक्ताच्या द्वारें करीत आहों त्यांला धनसंपादन करून आणणारे आणि स्तुतीला पात्र आणि ज्ञानसंपन्न असे पुत्रपौत्र देऊन ते शंभर वर्षेंपर्यंत जगतील असें करा.'

हा मंत्र सूक्ताच्या शेवटीं शेवटीं आला आहे तेव्हां येथपासून ऋषि वर मागावयाला आरंभ करितो आहे. या वरप्रार्थनेविषयीं दोन प्रकारांनीं तात्पर्य काढतां येतें. १ ला प्रकार, यज्ञ करणार आणि स्तोत्र करणार नोधा ऋषि हे एकच आहेत असें समजावें, आणि असें मानिलें तर पूर्वार्धातील आणि उत्तरार्धातील प्रार्थना नोधा याजकडेसच लागेल, आणि मग ' यज्ञ करणारे जे आम्ही त्यांला उत्तम शौर्य द्या, आणि उत्तम पुत्रपौत्र देऊन त्यांला शंभर वर्षें जगवा ' असें ता-

१४. हे मरुतांनो, तुम्ही उपासकांच्या अंगीं परम स्तुत्य [आणि] समरांगणांत अजिंक्य असें तेज:पुंज बळ स्थापित करा. आम्हांस धनसंपादक, प्रशंसायोग्य, [आणि] परमबुद्धिमान् पुत्र [आणि] पौत्र शंभर वर्षेपर्यंत लाभो.

14. May you, O Maruts, confer upon the sacrificers brilliant strength, that is exceedingly praiseworthy [and] unconquerable in battles. May we enjoy for a hundred winters a son [and] a grandson that shall be a gainer of wealth, praiseworthy [and] all-knowing.

त्पर्य होईल. २ रा प्रकार, नोधा ऋषीला कोणी यजमानानें स्तोत्रें (म्हणजे सूक्तें) रचण्यास लावून तीं म्हणून यज्ञ करणारा तो यजमान वेगळाच असावा, आणि नोधा ऋषीनें केवळ सूक्त मात्र रचिलें पण यज्ञ करणारा वेगळाच; असें मानिलें तर ' हे मरुतांनो, आमच्या यजमानांला उत्तम बळ द्या आणि आम्ही जे स्तोत्र करणारे त्या आम्हांस उत्तम पुत्रपौत्र देऊन त्यांस शंभर वर्षें जगवा, या प्रकारेंकरून यजमान आणि ऋत्विज या दोघांवरहि प्रसाद करा ' असें तात्पर्य होईल. परंतु यांतून पहिला पक्ष आम्हांला स्वीकार्य दिसतो; कारण नोधा ऋषीनें रचिलेलीं सूक्तें आपल्या कुटुंबांतील मनुष्यांकरितां रचिलीं, दुसऱ्या यजमानांच्या हितार्थ रचिलीं नाहींत असें सू. ६३, मं. ९ इत्यादिकांवरून दिसून येतें.

' स्थापित करा '=' धत्तन '. म्हणजे ' द्या ', ' प्राप्त होई असें करा'.

' शंभर वर्षेपर्यंत '=' शतं हिमाः '. अक्षरशः अर्थ ' शंभर हिंवाळे '. एक वर्षांत एकच हिंवाळा असतो, म्हणून वर्ष असा अर्थ घ्यावयाचा. ' वर्ष ' या शब्दाचा झाला तरी मूळ अर्थ संवत्सर असा नाहीं, तर पावसाळा इतकाच आहे. आणि प्रतिसंवत्सराला एकच पावसाळा असतो म्हणून ' संवत्सर ' असा अर्थ होऊं लागला आणि अजूनहि चालू आहे. इतर भाषांतहि वर्षांतून कोणत्या तरी एका ऋतूच्या नांवाचा संवत्सर या अर्थी प्रयोग करण्याची चाल पुष्कळ आहे. लाटीनमध्यें centum hiemes =शंभर हिंवाळे, आणि इंग्रजींत a hundred winters = शंभर हिंवाळे हे शब्द शंभर संवत्सर याच अर्थी योजीत असतात. या मंत्रावरून उघड होतें कीं परम पुरातन जें वैदिक युग म्हणजे ज्या काळीं नोधा ऋषीसारिखे ऋषि स्तोत्रें रचीत त्या काळीं, विचाऱ्या मनुष्याचें आयुष्य आतांसारिखें शंभरच वर्षेपर्यंत होतें. ह्या गोष्टीला याच ऋचेसारिखीं दुसरीं अनेक प्रमाणें आहेत. आणि अमुक राजानें दाहा हजार वर्षें राज्य केलें, अमुक ऋषि शंभर कल्पपर्यंत तप करीत असे, इत्यादि ज्या अतिशयोक्तिपरिपूर्ण कथा त्यांस वेदांत तर आधार नाहीं इतकेंच नव्हे, पण त्या मागाहून अतिशयोक्तीच्या भोक्त्यांसाठीं उगाच रचिलेल्या आहेत असें उघड होतें. असें नसतें तर नोधा ऋषि आपल्या पुत्र-

नू ष्ठिरं मरुतो वीरवन्तमृतीषाहं रयिमस्मासु धत्त ।
सहस्रिणं शतिनं शूशुवांसं प्रातर्मक्षू धियावसुर्जगम्यात्
॥ १५ ॥ ८ ॥ ११ ॥

नु । स्थिरम् । मरुतः । वीरऽवन्तम् । ऋतिऽसहम् । रयिम् । अस्मासु । धत्त ।
सहस्रिणम् । शतिनम् । शूशुऽवांसम् । प्रातः । मक्षु । धियाऽवसुः । जगम्यात् ॥ १५ ॥ ८ ॥ ११ ॥

भाषायाम्.

१५. नु (=अपि च) हे मरुतः, [यूयम्] अस्मासु स्थिरं (=स्थास्नुं) वीरवन्तं (=वीर्ययुक्तपुत्रवन्तम्). ऋतीषाहं (=शत्रूणामभिभवितारं) सहस्रिणं (=सहस्रसंख्याकं) शतिनं (=शतसंख्याकं) शूशुवांसं (=वृद्धं=वर्धमानं=शतगुणं सहस्रगुणं च वर्धमानम्) [एतादृशं] रयिं (=सौभगं) धत्त (=स्थापयत=अस्मभ्यं दत्त)। —धियावसुः (=धीमान्=प्रज्ञावान्) [मरुद्गणः] प्रातः (=प्रातःकाले) मक्षु (=क्षिप्रं) जगम्यात् (=दिनेदिन आगच्छतु) ॥

ऋतीषा इत्येतस्य शत्रुकृतहिंसायाः परिहर्तेति पण्डितशिरोमणिर्मोक्षमूलरो व्याचख्यौ तदपि सायणानुसार्येव भातीति (ऋ. ८. ४५. ३५) इति द्रष्टव्यम्। अन्यत्र तु सर्वेष्वपि मन्त्रेषु सायणाः शत्रोरभिभवितेति व्याचख्युः ॥

पौत्रांस शंभर वर्षेपर्यंत जगवा असें मरुतांस प्रार्थितेना.

दुसरी एक गोष्ट ही सिद्ध होते कीं वेदाचा अर्थ समजून वेद म्हणणें अथवा वाचणें हें फार दिवसांपासून बंद झालें असावें, आणि जरी वेदाचा अर्थ पुष्कळजणांस समजत असे तरी लौकिक जनांपैकीं फारकरून सर्व मनुष्यें वेदाविषयीं आतांच्याप्रमाणेंच कांहीं जाणत नसत. कारण कीं जर वेदांत, म्हणजे परमपुरातनकाळच्या ग्रंथांत, काय आहे तें लोकांस ठाऊक असतें, तर लोकांसाठीं म्हणून निर्मिलेलीं जीं पुराणें आणि त्यांसारिखे अतिशयोक्तीचे दुसरे आगर, त्यांत वेदकाळच्या लोकांविषयीं, राजांविषयीं, ऋषींविषयीं, आणि यज्ञांविषयीं अनन्वित कथा आणि अतिशयोक्ति रचितां आल्या नसत्या. पुराणादिकांचे जे कर्ते त्यांस वेदाचा अर्थ आणि अभ्यास हे उत्तम अवगत असतील यांत आम्हांस संशय नाहीं, पण ज्या प्रजांसाठीं पुराणकर्त्यांनीं पुराणें रचिलीं त्या प्रजांस आलीकडील लोकांप्रमाणेंच वेदाविषयीं ज्ञान फारच कमी होतें म्हणून पुराणकर्त्यांनीं वेदाविषयीं, वेदमंत्रांच्या शक्तीविषयीं, कर्त्यांविषयीं आणि वेदकाळच्या इतर

पॉंच ता. १ पासून ता. ३० जून १८७७ पर्यंत.

	रु. आ.
हिजहायनेस श्री. ठाकुरसाहेब, आफ पालिटाणा	१६९– ६
रा० सा० माधवराव गंगाधर चिटणीस.	१२–१२
,, ,, मोतीलाल लालभाई मुनसिफ.	६– ६
,, ,, त्रिंबकराय वृजराय परसनल सुभे................	६– ०
रा० रा०के. शेषाद्रि अय्यर, जुडिशिअल कमि.	१२–१२
,, ,, दुलभराम प्राणशंकर.	६– ६
,, ,, बालकृष्णराव तहशिलदार	६– ६
,, ,, जयाशंकर लालशंकर सरन्यायाधीश............	६– ६
,, ,, वासुदेव रामचंद्र मोहनी, हेडमास्तर.	९–१३
,, ,, रामदाससेन जमीनदार	६– ६
,, ,, रामचंद्र परशुराम चीफ कानस्टेबल............	६– ६
,, ,, जगजीवन भवानीशंकर असि. मास्तर.	६– ६
,, ,, लक्ष्मणराव गोविंद वकील......................	६– ०
,, ,, एस. व्यंकट वरदी अयंगार, बी. ए.	६–१२
नेटिव लायब्ररी दमढेरे तळेगांव.	६– ६

Registered No. 98 of 1877.

सूचना.

	रु.	आ.
वर्षाची वर्गणी, आगाऊ	६	०
मुंबईबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दरवर्षाचे	०	६

All communications to be addressed to the Manager Mr. Mahâdev Nârâyan Pandit. No. 29 *Moroba Popatji's Oart, Kalka Devi Road, Bombay.*

ग्रंथकर्त्याच्या नांवचा वगैरे सर्व प्रकारचा पत्रव्यवहार मुंबई मोरोबा पोपटजीची वाडी घर नंबर २९, या पत्त्यावर रा. रा. महादेव नारायण पंडित "म्यानेजर वेदार्थयत्न" यांच्याशीं ठेवावा.

विशेष सूचना.—आमच्या कितीएक वर्गणीदारांस एक वर्ष पुरें होऊन दुसऱ्या वर्षाचे २ अंक पोंचले असूनही त्यांच्याकडून मागील सालच्या वर्गणीचा पैसा अद्याप येत नाहीं. तर मेहेरबानी करून तो त्यांनीं "आगाऊ" शब्दाकडे विशेषलक्ष देऊन लवकर पाठवावा. तिकीटें पाठविणें झाल्यास अर्धा आणा दराचीं असून दर रुपयास अर्धा आणा वर्णाळा असावा. नाट-पेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

THE

VEDÂRTHAYATNA

OR

AN ATTEMPT TO INTERPRET THE VEDAS.

वेदार्थयत्न.

ऋग्वेदसंहिता

पदांसहित व

तिचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

पुस्तक २. Vol 2 जुलै सन १८७७. July 1877 अंक २. № 16

मुंबईः

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

(हें सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदलें आहे.)

माझे

सर्व आर्य बंधु व भगिनी

यांस

हें भाषांतर

सादर समर्पण केलें आहे.

भाषांतरकर्ता

१५. आणि आतां हे मरुतांनो, स्थिर, वीरयुक्त, शत्रूंला जिंकणारी [आणि] शतपट [आणि] सहस्रपट वाढणारी [अशी] संपत्ति [तुम्ही] आम्हांला द्या.—बुद्धिमान् [मरुद्गण] प्रतिदिनीं प्रातःकाळीं शीघ्र येत जाओ.

15. And now, O Maruts, confer upon us a prosperity that is constant, full of brave sons, [and] able to vanquish the enemy—a prosperity growing hundred-fold [and] thousand-fold.—May the wise [troop of Maruts] daily come unto us quickly in the morning.

गोष्टीविषयीं वेदांत ज्यांला कांहीं आधार नाहीं अशा कथा रचिल्या असाव्या असें म्हणावें लागतें.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें थोडक्याच अडचणीनें आधुनिक श्लोकवृत्ताला बसतेः—

चर्कृतिअं मरुतः पृत्सु दुष्टरं
द्युमन्तं शुष्मं मघवत्सु धत्तन ।
धनस्पृतमुक्थिअं विश्वचर्षणिं
तोकं पुष्येम तनयं शतं हिमाः ॥

---

१५. हा या सूक्ताचा उपसंहार आहे आणि सूक्ताचे शेवटीं ऋषि वर मागत आहे. तो हा कीं, ' हे मरुतांनो, आतां शेवटीं इतकी प्रार्थना आहे कीं, तुम्ही आम्हांला असें वैभव द्या कीं तें शाश्वत राहावें, त्यांत शूर पुत्र असावे, आणि त्यांत शत्रूंला जिंकण्याची शक्ति असावी,आणि ती प्रतिदिनी कमी कमी न होतां, उत्तरोत्तर शतपट आणि सहस्रपट वाढतच जावी.' सूक्त संपल्यामुळें ' बुद्धिमान् इ०' पालवपद आलें आहे. नोधानें केलेलीं जितकीं सूक्तें आहेत त्यांच्या शेवटीं हें पालवपद येत असतें. तुकारामानें केलेले जितके अभंग आहेत त्यांच्या शेवटीं ' तुका म्हणे ' इत्यादि चरण आलाच पाहिजे, तसाच नोधाऋषीनें केलेलीं जितकीं सूक्तें आहेत त्यांच्या शेवटीं "प्रातर्मक्षू धियावसुर्जगम्यात्" हे शब्द आलेच पाहिजेत.

या मंत्रांत ऋषि काय वर मागतो त्याचा विचार करावा. नोधा ऋषि ब्राह्मण आहे आणि परम विद्वान् आणि परमपवित्र ऋषि आहे तरी, आम्हांला गोब्राह्मणांचें पालन करणारा क्षत्रिय अथवा शूद्र राजा प्राप्त होओ आणि आम्हांस नित्य तप आचरण्याला विघ्न न होओ असा वर मागत नाहीं, तर जी संपत्ति स्थिर राहील, जिच्या बरोबर शौर्यानें भरलेले पुत्रपौत्र आमच्या घरीं असतील आणि जिच्या योगानें शत्रूंला जिंकून टाकण्याची शक्ति आम्हांला येईल अशी संपत्ति मागतो. यावरून प्राचीन ऋषि जसे होते असें आपण समजत आलों आहों त्यापेक्षां फार भिन्न असत हें अगदी उघड होतें.

सूक्तम् ६५.

शक्तिपुत्रः पराशर ऋषिः । अग्निर्देवता । द्विपदा विराट् छन्दः ।

पश्वा न तायुं गुहा चतन्तं नमो युजानं नमो वहन्तम् ।

सजोषा धीराः पदैरनु ग्मन्नुप त्वा सीदन्विश्वे यजत्राः ॥ १ ॥

पश्वा । न । तायुम् । गुहा । चतन्तम् । नमः । युजानम् । नमः । वहन्तम् ।
सऽजोषाः । धीराः । पदैः । अनु । ग्मन् । उप । त्वा । सीदन् ।
विश्वे । यजत्राः ॥ १ ॥

भाषायाम्.

१. [हे अग्ने,] नमो युजानं (=हविरन्नमात्मना संयुजानं = हविर्लक्षणमन्नमुपासकैरात्मने दापयन्तं] नमो वहन्तम् (=उपासकैर्देवेभ्यो दत्तं हविर्लक्षणमन्नं देवेषु वहन्तं) गुहा चतन्तं (=गुहायां लीनं) [त्वां] धीरा (=मेधाविनः) सजोषाः (=समानप्रीतयः=सखिभूता देवाः), पश्वा न तायुं (=यथा कश्चित् चोरितपशोः पदलाञ्छनैश्चोरम्) [अनुगच्छति तद्वत्] पदैः (=तव पदलाञ्छनैः) अनु ग्मन् (=अन्वगमन्=अनुगत्य लब्धवन्तः), [अपि च] [ते] विश्वे यजत्राः (=सकला अपि यजनीया देवास्) त्वा (=त्वाम्) उप सीदन् (=समीपं न्यषीदन्) ॥

गुहा चतन्तमित्यत्र सायणा एवं वदन्ति । "गुहा चतन्तम् अप्रूपायां गुहायां गच्छन्तं
" वर्तमानं...... तथा च तैत्तिरीयैरग्नेरप्सु प्रवेशः समाम्नायते । स निलायत । सोपः
" प्राविशदिति । यद्वा । अश्वत्थगुहायां गच्छन्तं वर्तमानम् । श्रूयते च । अग्निर्देवेभ्यो
" निलायत । अश्वो रूपं कृत्वा सोऽश्वत्थे संवत्सरमतिष्ठदितीति । " ईदृशीं कांचिदाख्यायिकामुद्दिश्यैव गुहा चतन्तमग्निं देवा अन्वगच्छन्निति ब्रूते पराशर इति द्रष्टव्यम् ॥

'शत्रूला जिंकणारी'=' ऋतीषाहम्'. शत्रूनें आक्रमण केलें असतां त्यापासून आपलें संरक्षण करण्यास समर्थ असा अर्थ कितीएक विद्वान् करितात. त्याला ऋ. ८. ४५. ३५ याजवरील सायणभाष्याचा आधार आहे तरी, ऋ. ४. १४. ४ आणि ८. ६८. १ आणि ८. ८८. १ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा.

ही ऋचा वृत्तसुखार्थ खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटली पाहिजेः—

नुऊं स्थिरं मरुतो वीरवन्तम्
ऋतीसहं रयिमँस्मासु धत्त ।
सहस्रिणं शतिनँ शूशुवांसं
प्रातर्मक्षू धीयाँवसुर्जगम्यात् ॥

नोधा ऋषीचीं सूक्तें येथें संपलीं. आतां पुढें पराशर ऋषीचीं लागणार.

सूक्त ६५.

ऋषि– **शक्तीचा पुत्र पराशर** या नांवाचा. देवता–**अग्नि.** वृत्त–**द्विपदा विराट्.**

१. [हे अग्नी], गुहेंत लपून राहिलेला, उपासकांकडून उपासना करविणारा, [आणि] उपासना वाहून नेणारा, [असा जो] तूं त्या तुझा शोध, चोराचा शोध पशूच्या योगानें लावितात तसा, [तुझे] सखे [जे] प्रज्ञावान् पूजनीय सर्व [देव] त्यांणीं पावलांच्या योगानें लाविला [आणि] [ते] तुझ्या जवळ जाऊन बसले.

HYMN 65.

To *Agni.* By *Parâs'ara* son of *S'akti.* Metre— *Dvipadâ Virâṭ*, consisting of four lines of ten syllables each.

1. Thee, [O Agni], who hidest in the cave, who promptest the offering [and] who carriest the offering, the wise [gods] [thy] companions traced through the footprints, as [people trace] the thief through [the stolen] cow, [and] the adorable [gods] all sat by thee.

---

१ हें सूक्त पराशर या नांवाच्या ऋषीचें आहे. त्याचें वृत्त ‘ विराट् द्विपदा’. ‘विराट् द्विपदा’ वृत्ताचें लक्षण असें कीं त्यांतील प्रत्येक चरणांत दहा अक्षरें असतात, आणि चरण दोनच असतात, च्यार नसतात. परंतु दोन विराट् द्विपदा मिळून एक ऋचा करण्याचा आणि म्हणण्याचा प्रघात आतां पडला आहे. वस्तुतः ही जी पहिली ऋचा ‘ पश्वा ’ पासून ‘ यजत्राः ’ पर्यंत आहे त्यांत दोन ‘ विराट् द्विपदा ’ आहेत, म्हणजे दोन ऋचा मिळून झालेली आहे. आणि त्याप्रमाणेंच सर्व ‘ विराट् द्विपदां’विषयीं समजावयाचें आहे.

यांत ऋषि म्हणतो कीं, ‘ हे अग्नी, उपासकांकडून देवांची उपासना करविणारा आणि त्यांनीं उपासना करून हवि दिलें म्हणजे तें देवांकडे घेऊन जाणारा जो तूं, तो जेव्हां पळून गेलास आणि लपून राहिलास, तेव्हां सर्वज्ञ जे देव ते, चोरून नेलेल्या गुराची पावलट पाहून चोराचा शोध लोक लावितात तसा, तुझ्या पावलटीवरून तुझा शोध लाविते झाले आणि ते तुजजवळ येऊन बसले.’ यांत अग्नि पळून गेला होता, म्हणजे देवांला पोंहचविण्याकरितां जें हवि अग्नीकडे अर्पण केलें होतें तें देवांकडेस न नेतां आपणच घेऊन पळून गेला, आणि लपून राहिला; तेव्हां देवांला आपलें भक्ष्य मिळेनासें झाल्यामुळें देवांनीं अग्नीचा पाठलाग केला, अशी कांहीं तरी एकादी कथा असावी, आणि तिला उद्देशून ही ऋचा केली आहे. आणि तशी कथा आहे असें तैत्तिरीय शाखेंत सांगितलें आहे.

ऋतस्य॑ दे॒वा अनु॑ व्र॒ता गु॒र्भुव॒त्परि॑ष्टि॒र्द्यौर्न भूम॑ ।
वर्ध॑न्ती॒माप॑ः प॒न्वा सुशि॑श्विमृ॒तस्य॒ योना॒ गर्भे॒ सुजा॑तम् ॥ २ ॥

ऋतस्य॑ । दे॒वाः । अनु॑ । व्र॒ता । गुः॒ । भुव॑त् । परि॑ऽष्टिः । द्यौः । न । भूम॑ ।
वर्ध॑न्ति । ई॒म् । आप॑ः । प॒न्वा । सुऽशि॑श्विम् । ऋ॒तस्य॑ । योना॑ । गर्भे॑ ।
सुऽजा॑तम् ॥ २ ॥

भाषायाम्.

२. ऋतस्य (=सत्यरूपस्य) [अग्नेः] व्रतानि (=शासनानि) देवा [अपि] अनु गुः (=अन्वगच्छन्=अपालयन्=पालयन्ति), द्यौर्न भूम (=द्युलोक इव पृथिव्यपि=द्यौश्च पृथिवी च) [अग्नये] परिष्टिः (=परितः सत् वर्तमानं=गृहं) भुवत् (=अभूत्) । ऋतस्य योना गर्भे (=सत्यरूपस्य यज्ञस्य स्थाने गर्भे=यज्ञस्य यत् स्थानं तद्रूपे गर्भाशये) सुजातं (=सुष्टु प्रादुर्भूतं) पन्वा सुशिश्विं (=स्तोत्रेण प्रवृद्धम्) ईम् (=एनम्=अग्निम्) आपः (=आपो देव्यो) वर्धन्ति (=पोषयन्ति) ॥

अत्रेदमुक्तं भवति । अग्नेः शासनानि राजाधिराजस्य माण्डलिका इव देवाः पालयन्ति । अग्नेरर्थं द्यावापृथिव्यौ गृहत्वमापतुः । तथैव वेदिरूपायां योनौ सुष्टु जातं स्तोत्ररूपेणान्नेन च प्रवर्धितमप्यापो देव्यो वर्धयन्तीति तस्य महिमेति ॥ आपो वर्धयन्तीत्यस्य अन्तरिक्षस्थे मेघोदके विद्युद्रूपेण प्रवृद्धोऽग्निः प्रादुर्भवतीति भावः ॥

परिष्टिरिति दुर्बोधम् । एतामृचं सायण एवं व्याचख्यौ । देवा ऋतस्य गतस्य पलायितस्याग्नेर्व्रता व्रतानि कर्माणि गमनावस्थानशयनादिरूपाण्यनु गुः । अन्वेष्टुमगमन् । तदनन्तरं परिष्टिः परितः सर्वतोन्वेषणं भुवत् । अभवत् । भूम भूमिरप्यग्नेरन्वेष्टृभिर्देवैर्द्यौर्न स्वर्ग इवाभूत् । इन्द्रादयः सर्वे देवा अग्नेर्गवेषणाय भूलोकं प्राप्ता इत्यर्थः। आपोऽब्देवता ईमेनमुदके प्रविष्टमग्निं वर्धन्ति । प्रवर्धयन्ति । यथा देवा न पश्यन्ति तथारक्षन्नित्यर्थः । कीदृशम् । पन्वा स्तोत्रेण सुशिश्विं सुष्टु प्रवर्धितम् । ऋतस्य योना । योनिरित्युदकनाम । ऋतस्य यज्ञस्यान्नस्य वा कारणभूते जले गर्भे गर्भस्थाने मध्ये सुजातं सुष्टु प्रादुर्भूतम् । एवमप्सु वर्तमानमग्निं देवेभ्यो मत्स्यः प्रावोचत् । तदनन्तरं देवास्तमज्ञासिषुरिति भावः । तथा च तैत्तिरीयकम् । स निलायत । सोऽपः प्राविशत्तं देवाः प्रैषमैच्छन् । तं मत्स्यः प्राब्रवीदितीति ॥

त्यांत सांगितलें आहे कीं, अग्नि गुप्त झाला आणि उदकांत जाऊन शिरला. ऋ. मंडल १० सूक्तें ५१, ५२ यांत अग्नि आणि देव यांचा संवाद दिला आहे. पण त्यांत लपून राहण्याचें कारण मात्र निराळें सांगितलें आहे.

२. सत्यभूत [जो अग्नि त्या]-चीं शासनें देवहि पाळितात; द्यु-लोक [आणि] त्याप्रमाणेंच पृथि-वी[हि] त्याला आश्रयभूत झाली; स्तोत्राच्या योगानें वाढलेला [आ-णि] यज्ञस्थानरूप गर्भांत सुंदर रीतीनें जन्मलेला [जो अग्नि त्या]-ला उदकें वाढवितात.

2. Of the truthful [Agni] the gods obey the ordinances; [to him] the earth like heaven became the home. Him the waters nourish who is well-born in the womb, the altar of the sacrifice, [and] well nourished with prayers.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें वृत्तसुखार्थ म्हटली पाहिजेः—

पश्वा न तायुं गुहा चतन्तं
नमो युजानं नमो वहन्तम् ।
सजोषाॅ धीराः पदैरनु ग्मन्
उप त्वाॅ सीदन् विश्वे यजत्राः ॥

यावरून समजून येईल कीं 'द्विपदा विराट्' म्हणजे त्रिष्टुभच होय, मात्र त्रिष्टुभाच्या प्रत्येक पादांतील जें सातवें (ह्रस्व) अक्षर तें यांत मुळींच नसतें. विराट् द्विपदा म्हणतांना त्रिष्टुभ् (म्हणजे उपजाती)प्रमाणेंच म्हटली पाहिजे. सातवें अक्षर नाहींसें समजून एकदम उडी मारिल्याप्रमाणें सहावें अक्षर म्हटल्यानंतर आठवें अक्षर म्हटलें पाहिजे.

---

२. या ऋचेंत अग्नीचा महिमा वर्णिला आहेः—'अग्नीची आज्ञा सकल देव सुद्धा मानितात. अग्नीला राहण्याला ठिकाण तर स्वतः सर्व द्युलोक आणि पृथिवी ह्याच झाल्या आहेत. उपासकांच्या स्थंडिलरूपी योनींत जन्मलेला आणि उपासकांनीं स्तोत्रांच्या योगानें वाढवून पुष्ट केलेला असा जो अग्नि त्याला स्वतः आपोदेवी, म्हणजे उदकरूपी देवीहि आईप्रमाणें दूध पाजून पुष्ट करीत असतात. याप्रमाणें सर्व मनुष्यें, देव, उदक, भूमि, आकाश, स्वर्गलोक इत्यादि सर्व जीवजंतु, प्राणी, आणि पदार्थ अग्नीची सेवा करीत असतात; असा अग्नीचा महिमा आहे.'

'सत्यभूत'='ऋतस्य.' म्हणजे 'खरा', ज्याच्या आंगीं खोटेपणा नाहीं असा.

'त्याचीं शासनें देवहि पाळितात'= 'देवा अनु व्रता गुः' (ऋ.३.७.७ आणि त्याजवरील सायणभाष्य पहा). हीं शासनें म्हणजे अग्नीची उपासना करणें, त्याची प्रीति जेणेंकरून संपादिली जाईल तीं कर्में करणें इत्यादि.

'द्युलोक आणि त्याप्रमाणेंच पृथिवीहि त्याला आधारभूत झाली'='भुवत् परिष्टिः द्यौः न भूम.' हें वाक्य कठिण आहे. 'परिष्टिः' हा शब्द वेदांत पुष्कळ ठिकाणीं आलेला नाहीं. ऋ. ८. ८८. ६ यांत 'उपद्रवकारक विघ्न,' ७. १९. ७ यांत 'अन्वेषण' म्हणजे शोधणें आणि १०. १४७. ३ यांत 'धन' असे तीन ठिकाणीं तीन अर्थ सायणांनीं केले आहे-

पुष्टिर्न र॒ण्वा क्षि॒तिर्न पृ॒थ्वी गि॒रिर्न भुज्म॒ क्षोदो॒ न शं॒भु ।
अत्यो॒ नाज्म॒न्त्सर्गप्रतक्तः सिन्धु॒र्न क्षोदः॒ क ईं॑ वराते ॥ ३ ॥

पुष्टिः । न । र॒ण्वा । क्षि॒तिः । न । पृ॒थ्वी । गि॒रिः । न । भुज्म॑ । क्षोद॑ः । न । श॒म्ऽभु ।

अत्य॑ः । न । अज्म॑न् । सर्ग॑ऽप्रतक्तः । सिन्धु॑ः । न । क्षोद॑ः । कः । ई॒म् । व॒रा॒ते ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. रण्वा (=रमणीया) पुष्टिर्न (=अभिमतलब्धिरूपाग्रभिवृद्धिरिव=लक्ष्मीवत्) [रमणीयं], पृथ्वी (=विस्तीर्णा) क्षितिर्न (=भूलोक इव) [विस्तीर्णं], भुज्म (=भोजयिता=फलपुष्पादिभोजनपदार्थयुक्तो) गिरिरिव (=पर्वत इव) [संपन्नः], शंभु क्षोदो न (=सुखकारकं जलमिव) [सुखकारकम्], अज्मन् (=अज्मनि=समराङ्गणे) सर्गप्रतक्तः (=विसर्जनेन प्रगमितः=शीघ्रगामी), अत्यो न (=जात्यश्व इव) [शीघ्रगामिनं], क्षोदः (=अनिवार्यः) सिन्धुर्न (=नदीप्रवाह इव) [अनिवार्यम्], [एतादृशम्] ईम् (=एतम्=अग्निं) को वराते (=निवारयेत्)?

हे अग्ने त्वदपेक्षयाहं श्रेष्ठोस्मीति क एनं प्रत्यादिशेद्? न कोपीत्यर्थः ॥

त. प्रस्तुत मंत्रांत आम्हीं दिलेला अर्थ संदर्भाला इष्ट असून निर्वचनसिद्ध आहे. (‘परिष्टि’ शब्द ‘परि’ आणि ‘स्ति’ =अस्ति या अवयवांपासून झाला आहे असें समजलें पाहिजे). परंतु याहून निर्विवाद अर्थाची अपेक्षा खरी.

‘यज्ञस्थानरूप गर्भांत’=‘ऋतस्य योना गर्भे.’ यज्ञस्थान अथवा ‘ऋतस्य योनिः’ म्हणजे ‘ज्या स्थंडिलांत अग्नि पेटवितात आणि हवि घालतात तें.’ त्यांत अग्नि उत्पन्न होतो म्हणून त्यापासून अग्नीचें जन्म होतें असें म्हणणें स्वाभाविक आहे. या स्थंडिलास अग्नीचें जन्मस्थान असें ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं नांव दिलें आहे.

‘स्तोत्रानें वाढलेला’=‘पन्वा सुशिश्विम्.’ उपासकांनीं दिलेल्या हवीनें आणि गाइलेल्या स्तोत्रांनीं अग्नि आणि दुसरेहि देव वाढतात असें आम्हीं पूर्वी पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे.

‘उदकें वाढवितात.’ म्हणजे लहान मुलाला जशी आई दूध पाजून वाढविते तशीं. याचें तात्पर्य इतकेंच आहे कीं, आकाशांत जीं मेघरूपानें उदकें असतात त्यांत प्रचंड विद्युद्रूपानें अग्नि वास करितो आणि प्रसंगवशात् दृष्टीसहि पडतो. ऋ. १०. २. ७ यांत अग्नि उदकांपासून जन्मला असें सांगितलें आहे (यं त्वा द्यावापृथिवी यं त्वापस्त्वष्टा यं त्वा सुजनिमा जजान=ज्या तुला अग्नीला द्युलोक

३. लक्ष्मीप्रमाणें आनंदकारक, पृथिवीप्रमाणें मोठा, पर्वताप्रमाणें फलोत्पादक, उदकाप्रमाणें शांतिकारक, समरांगणांतील घोड्याप्रमाणें चपलगामी, [आणि] नदीप्रमाणें अनिवार्य [असा जो हा अग्नि] त्याला निवारण्यास कोण समर्थ आहे ?

3. Delightful as prosperity, vast as the earth, nourishing as the mountain, gratifying as water, swift like a war-horse, impetuous as a rapid—who can excel Him?

आणि भूलोक यांणीं, ज्या तुला आपोदेवींनीं आणि ज्या तुला सुजात असा जो त्वष्टा देव त्याणें जन्म दिलें तो इ०). ऋ. १०. ९१. ६ यांत आपोदेवी ज्या माता त्यांच्या पोटीं अग्नि जन्मला असें सांगितलें आहे (तम् आपो अग्निं जनयन्त मातरः).

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटली पाहिजेः—

ऋतस्य देवा अनु व्रता गुः
भुवत्परिष्टिर्दिऔर्न भूम ।
वर्धन्तीमापः पन्वा सुशिश्विम्
ऋतस्य योना गर्भे सुजातम् ॥

३. यांतहि अग्नीचें श्रेष्ठत्व सांगून त्याला कोण मागें टाकील असें ऋषि विचारीत आहे. ‘ लक्ष्मीप्रमाणें (म्हणजे समृद्धि अथवा उत्कर्षाप्रमाणें) आनंदकारक, पृथ्वीसारिखा विस्तीर्ण, फलपुष्पादिकांनीं भरलेल्या पर्वताप्रमाणें समृद्ध आणि तृषाक्रांत मनुष्याला जसें पाणी तसा सुखकारक, युद्धांत धांवणाऱ्या घोड्याप्रमाणें चपळ आणि तेजस्वी, आणि एकाद्या मोठ्या नदीच्या प्रवाहाप्रमाणें अनिवार्य असा जो हा अग्नि देव त्याला कोण निवारील ? म्हणजे तुझ्यापेक्षां मी श्रेष्ठ असें अग्नीला कोण म्हणण्यास समर्थ होईल?’

‘ पर्वताप्रमाणें फलोत्पादक’=‘ गिरिर्न भुज्म.’ (सुगम अर्थलाभासाठीं ‘ गिरिर्न भुज्मा ’ असा पाठ असावा अशी ग्रास्मनादि विद्वान् इच्छा करितात). ही उपमा चमत्कारिक दिसते; कारण पर्वतच विशेष फलोत्पादक अथवा फलपुष्पांनीं समृद्ध असतात अशी आतां प्रसिद्धि नाहीं. परंतु वैदिक युगांत पर्वताला फलपुष्पांनीं समृद्ध असें म्हणण्याविषयीं विशेष कारणें असावीं असें वाटतें. आम्हांस वाटतें कीं वैदिक युगांत डोंगरावर शेतकी करण्याची चाल आणि झाडें आणि फलपुष्पादि पदार्थ उत्पन्न करणारे वृक्ष लावण्याची चाल विशेष असावी. म्हणजे आपले लोक आतां बहुतकरून सपाट मैदानांवर राहत असतात; परंतु पुरातनकाळीं पर्वतांच्या सुरक्षित प्रदेशांत अथवा त्यांच्या जवळ खालील मैदानांत राहत असत असें अनुमान होतें. आणि पूर्वी पर्वतावर फल-

जामिः सिन्धूनां भ्रातेव स्वस्रामिभ्यान्न राजा वनान्यत्ति ।
यद्वातजूतो वना व्यस्थादग्निर्ह दाति रोमा पृथिव्याः ॥ ४ ॥

जामिः । सिन्धूनाम् । भ्राताऽइव । स्वस्राम् । इभ्यान् । न । राजा । वनानि । अत्ति ।
यत् । वातऽजूतः । वना । वि । अस्थात् । अग्निः । ह । दाति । रोम । पृथिव्याः ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. [अग्निः] स्वस्रां (=स्वसॄणां) भ्रातेव सिन्धूनाम् (=अन्तरिक्षसंबन्धिनीनाम् अपां) जामिः (=बन्धुः=संबन्धी) [भवति] । [अग्निः], राजा इभ्यान् न (=राजा शत्रूनिव), अत्ति (=भक्षयति=राजा यथा स्वशत्रून् नाशयति तथा वनान्यग्निर्नाशयति) । यद् (=यदा) वातजूतः (=वातप्रेरितः) (अग्निः) वना (=वनानि) वि अस्थात् (=विविधम् आतिष्ठति) [तदा] [स] पृथिव्या रोम (=रोमाणि=केशान्) दाति ह (=छिनत्तीव) ॥

अत्र ' इभ्यान् न राजा वनानि अत्ति ' इत्युपमा दुर्बोधा । राजा हि शत्रून् भक्षयतीति कुत्रापि न प्रसिद्धिर्वर्तते । एतच्च दुर्बोधत्वम् इभ्यशब्दस्य परिचरार्थत्वे पाश्चिमात्यान् अनु कांश्चित् पण्डितान् गृहीतेपि न परिहार्यते ॥

पुष्पें आणि धान्यें उत्पन्न करीत अशाविषयीं ऋग्वेदांत तीनच्यार मंत्रांत चांगलें ज्ञापक आहे असें दिसतें. ते मंत्र येणेंप्रमाणें:– ऋ. ८. ४९. २ (वालखिल्यसूक्त) यांत इंद्राविषयीं ऋषि म्हणतो, इंद्राचें आयुध जणुं शंभर धारांचें आहे आणि तें मोठ्या धैर्यानें उपासकासाठीं धांवतें आणि शत्रूंचा नाश करून टाकितें. धनधान्यसंपन्न गिरीवर (म्हणजे, डोंगरावर) असलेले रस जसे पुष्ट करितात तसे इंद्राचे वर उपासकाला पुष्ट करितात (=शतानीकेव प्रजिगाति धृष्णुया हन्ति वृत्राणि दाशुषे गिरेरिव प्र रसा अस्य पिन्विरे दत्राणि पुरुभोजसः). ऋ. ८.५०. २ यांतहि इंद्राविषयीं असें सांगितलें आहे कीं ' इंद्राचीं शस्त्रें शंभर धारांचीं आणि अजिंक्य होत. त्याचे बाण मोठे होत. इंद्राला सोमरस पाजून आनंद केला म्हणजे तो अनेकधनधान्यसंपन्न गिरीप्रमाणें (म्ह. डोंगराप्रमाणें) उपासकाला पुष्ट करितो (=शतानीका हेतयो अस्य दुष्टरा इन्द्रस्य समिषो महीः । गिरिर्न भुज्मा मघवत्सु पिन्वते यदीं सुता अमन्दिषुः). ऋ. ८. ८८. २ यांत इंद्राला डोंगराप-

४. वहिणींचा जसा भाऊ [तसा] उदकांचा [हा] आप्त [होय]. राजा शत्रूचा [संहार करितो] तसा [हा] वृक्षांला संहारून टाकितो. वातप्रेरित अग्नि जेव्हां अरण्यांत शिरतो [तेव्हां] तो पृथिवीचे केसच जणुं कापितो.

4. Allied to the waters as a brother to sisters [Agni] eats the forests as a king [his] enemies. When Agni has spread in the forests, he indeed shaves the hairs of the earth.

माणें फलपुष्पधान्यादिकेंकरून संपन्न असें विशेषण दिलें आहे (द्युक्षं सुदानुं तविषीभिरावृतं गिरिं न पुरुभोजसम् । क्षुमन्तं वाजं शतिनं सहस्रिणं मक्षू गोमन्तमीमहे). डोंगराच्या माथ्यावर झाडें असल्याविषयीं प्रसिद्धि ऋ. ५. ४१. ११ यांत 'वृक्षरूप केश ज्यांला आहेत असे डोंगर' या शब्दांवरून उघड होते (कथामहे रुद्रियाय ब्रवाम कद्राये चिकितुषे भगाय । आप ओषधीरुत नोऽवन्तु द्यौर्वना गिरयो वृक्षकेशाः = 'महान् जो रुद्रोत्पन्न मरुद्गण त्याजप्रीत्यर्थ कोणतें स्तोत्र आपण गावें? धनलाभासाठीं आपण सर्वज्ञ भगाप्रीत्यर्थ कोणतें स्तोत्र गावें ? आपोदेवी, आणि वनस्पति, द्युलोक, वनें हीं आणि वृक्षच केश ज्यांचे असे गिरि, आम्हांला रक्षोत ').

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें वृत्तानुरोधासाठीं म्हटली पाहिजेः—

पुष्टिर्न रण्वा क्षितिर्न पृथ्वी
गिरिर्न भुज्म क्षोदो न शंभु ।
अत्यो न अज्मन् सर्गप्रतक्तः
सिंधुर्न क्षोदः क ईं वराते ॥

---

४. 'जसा भाऊ वहिणींला आप्त असतो तसा अंतरिक्षांत विजेच्या रूपानें उत्पन्न होणारा अग्नि अंतरिक्षांत मेघोदकरूपानें असणाऱ्या ज्या नद्या त्यांचा आप्त होय. तो जसा एकादा राजा शत्रूंचा संहार करितो तसा वृक्षांचा संहार करून टाकितो. अग्नि अरण्यांत शिरून पसरला आणि त्याला वायूची वळकटी असली म्हणजे तो पृथिवीवरील सर्व वृक्ष नाहींसे करितो. तो जणुं काय पृथिवीचे केसच कापून टाकीत आहे असा दिसतो.'

अग्नीची उत्पत्ति आकाशांत विद्युद्रूपानें होते आणि उदकांचीहि तेथेंच होते म्हणून अग्नीला उदकांचा बंधु असें म्हटलें आहे.

'राजा शत्रूंचा संहार करितो तसा हा वृक्षांला संहारून टाकितो' = 'इभ्यान् न राजा वनानि अत्ति.' अक्षरशः अर्थ, 'राजा शत्रूंला खातो तसा अग्नि अरण्यें खातो.' ही उपमा जरी प्रत्येक

श्वसित्यप्सु हंसो न सीदन् क्रत्वा चेतिष्ठो विशामुषर्भुत् ।
सोमो न वेधा ऋतप्रजातः पशुर्न शिश्वा विभुर्दूरेभाः ॥५॥९॥

श्वसिति । अप्ऽसु । हंसः । न । सीदन् । क्रत्वा । चेतिष्ठः । विशाम् । उषःऽभुत् ।
सोमः । न । वेधाः । ऋतऽप्रजातः । पशुः । न । शिश्वा । विऽभुः । दूरेऽभाः ॥ ५ ॥ ९ ॥

भाषायाम्.

५. हंसो न (=हंस इव) सीदन् (=उदकमध्ये निषीदन्) श्वसिति (=सीत्कारनादं करोति)। [स खलु] क्रत्वा चेतिष्ठः (=प्रज्ञया अतिशयं प्रज्ञापयिता=तेजस्वी) विशाम् उषर्भुत् (=प्रजानां प्रातःकाले विबोधयिता=स्वयम् उषःकाले विबुध्य प्रजा अपि तदैव विबोधयिता), सोमो न वेधा (=सोमदेव इव प्रज्ञावान्), ऋतप्रजातः (=यज्ञाय प्रादुर्भूतः), पशुः शिश्वा न विभुः (=गर्भस्थेन शिशुना गौर्यथा प्रभूता भवति तथा प्रभूतः), [अपि च] दूरेभाः (=विप्रकृष्टदेशेपि प्रकाशमानो) [भवति] ॥

शब्दाचे संबंधानें स्पष्ट आहे तरी यांत ‘इभ्य’ हा शब्द कठिण आहे. आम्हीं सायणांस अनुसरून भाषांतर केलें आहे. कितीएक पाश्चिमात्य पंडित इभ्य म्हणजे ‘चाकर’ असा अर्थ करितात. परंतु हा अर्थ क्षणभर ग्रहण केला तरी उपमा कठिण राहते ती राहतेच; कारण राजा शत्रूंस खातो तसा, हें जसें दुर्बोध आहे तसेंच राजा चाकरांस खातो तसा असें म्हणणें हेंहि दुर्बोध आहे. ‘इभ्य’ शब्दाचा अर्थ दुर्बोध आहे त्यामुळें ही उपमा समजत नाहीं. अथवा, सायणाचार्य म्हणतात तो ‘इभ्य’ शब्दाचा अर्थ खरा असेल, पण मग मात्र पुरातनकाळीं राजांचा युद्धांत जय झाला म्हणजे ते आपल्या शत्रूंचें काय करीत असत त्याविषयीं विलक्षण अनुमान काढावें लागतें.

‘पृथिवीचे केसच जणुं कापितो’= ‘अग्निर्ह दाति रोम पृथिव्याः.’ वृक्षांस पृथिवीचे केस म्हणणें याविषयीं वेदांत अन्य ठिकाणींहि उदाहरणें आहेत. ऋ. ५. ४१. ११ आणि त्यावरील सायणभाष्य पहा.

ही ऋचा वृत्तानुरोधेंकरून खालीं लिहिल्याप्रमाणें म्हटली पाहिजे.

जामिः सिन्धूनां भ्रातेव स्वस्राम्
इभ्यान्न राजा वनानि अत्ति ।
यद्वातजूतो वना वि अस्थात्
अग्निर्ह दाति रोमा पृथिव्याः ॥

५. तो उदकांत हंसाप्रमाणें बसून फुसफुसतो. तो प्राज्ञेनें परम देदीप्यमान आणि लोकांस प्रातः-काळीं जागृत करणारा [होय], [तो] सोमाप्रमाणें बुद्धिमान् [होय], [तो] यज्ञासाठीं उत्पन्न झालेला [होय], [तो] गाभण्या गाईप्र-माणें पुष्ट, [आणि] दूरपर्यंत प्रकाश पाडणारा [असा होय].

5. Lying like a duck he hisses in the waters—he who is mightiest with his wisdom [and is] the waker of the people at dawn; wise like Soma, born for the sacrifice, fat like a pregnant cow, [and] shining afar.

---

५. या मंत्रांत अग्नीविषयीं स्वभावो-क्ति आहे. 'ज्याची प्रज्ञा परम श्रेष्ठ, जो नित्य प्रातःकाळीं जागृत होऊन जनांस जागृत करितो, म्हणजे ज्याला यज्ञकर्मा-साठीं जन पहांटेस उठून प्रदीप्त करि-तात, जो सोमदेवाप्रमाणें बुद्धिमान्, जो पुष्ट, आणि ज्याचा प्रकाश दूर पडत असतो असा जो अग्नि, तो उदकांत हंसाप्रमाणें बसून फुसफुसतो, म्हणजे आकाशांत जीं मेघोदकें बाष्परूपानें अ-सतात त्यांत वीजेचे रूपानें अग्नि बसून हंसाप्रमाणें नाद करितो' असा भावार्थ दिसतो.

'तो सोमाप्रमाणें बुद्धिमान् होय'= 'सोमो न वेधाः.' येथें सोम म्हणजे सोमरसरूपी जो देव तो समजावयाचा आहे. सोमपान केल्यापासून महाबुद्धि आणि मोठें ज्ञान प्राप्त होतें आणि बळ येतें असें सांगितलें आहे. तेच गुण सोम-रसाभिमानी जो सोमदेव त्याच्या आंगीं आहेत म्हणणें साहजिक आहे. ऋ. ६. ४४. ८ यांत सोमाला बुद्धिमान् अथवा ज्ञानी ("वेधाः") असें म्हटलें आहे.

'यज्ञासाठीं उत्पन्न झालेला'='ऋत-प्रजातः.' हवि देवांला अर्पण करावयाचें तें अग्नींत घालावयाचें असतें, म्हणून अग्नीला प्रदीप्त करीत असतात. यास्तव त्याला यज्ञासाठीं उत्पन्न झालेला अथवा जन्मलेला असें विशेषण दिलें आहे.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्ह-णावयाची असें समजलें पाहिजे.

श्वसिति अप्सु हंसो न सीदन्
क्रत्वा चेतिष्ठो विशामुषर्भुत् ।
सोमो न वेधा ऋतप्रजातः
पशुर्न शिश्वा विभुर्दूरेभाः ॥

सूक्तम् ६६.

शक्तिपुत्रः पराशर ऋषिः । अग्निर्देवता । द्विपदा विराट् छन्दः ।

रयिर्न चित्रा सूरो न संदृगायुर्न प्राणो नित्यो न सूनुः ।
तक्वा न भूर्णिर्वना सिषक्ति पयो न धेनुः शुचिर्विभावा ॥ १ ॥

रयिः । न । चित्रा । सूरः । न । संऽदृक् । आयुः । न । प्राणः । नित्यः । न । सूनुः ।
तक्वा । न । भूर्णिः । वना । सिसक्ति । पयः । न । धेनुः । शुचिः । विभाऽवा ॥ १ ॥

भाषायाम्.

१. चित्रा (=चायनीया=उत्तमा) रयिर्न (=धनमिव) [सुखकरः], सूरो न संदृक् (=सूर्यस्य प्रभेव) [तेजोयुक्तः], आयुः प्राणो न (=व्यवस्थापयिता प्राणवायुरिव=जीव इव) [प्रियः], नित्यः सूनुर्न (=निजः पुत्र इव) [हितकारी], तक्वा न भूर्णिः (=गतिमानश्व इव नेता), पयो न धेनुः (=दुग्धमिव पोषयिता) शुचिः (=तेजस्वी), विभावा (=विशेषेण प्रभायुक्तः) [एवंविधोऽग्निः] वना (=वनानि) सिषक्ति (=सेवते=दग्धुं धावति) ॥

सूरो नेत्यत्र सूरो न यस्य दृशतिररेपा इति मन्त्रगतम् (ऋ. ६. ३. ३) सायणभाष्यं द्रष्टव्यम् ॥

सूक्त ६६.

ऋषि—पराशर (पूर्वे सूक्ताचा जो कर्ता तोच). देवता—**अग्नि.** वृत्त—**द्विपदा विराट्** (पूर्वे सूक्ताचें जें तेंच).

१. सुंदर संपत्तीप्रमाणें [सुखकारक], सूर्याच्या कांतीप्रमाणें [तेजःपुंज], जिवाप्रमाणें [प्रिय], स्वताच्या पुत्राप्रमाणें [हितकारक], शीघ्रगामी अश्वाप्रमाणें चपळ, दुधाप्रमाणें पुष्टिकारक, [आणि] प्रकाशमान् [आणि] विशेषेंकरून तेजस्वी [असा जो अग्नि तो] अरण्यें आक्रमितो.

HYMN 66.

To *Agni*. By *Parâs'ara* (author of the previous hymn). Metre—*Dvipadâ Virâṭ*.

1. [Agreeable] like excellent wealth, [splendid] like the brightness of the sun, [dear] like the vital breath, [affectionate] like one's own son, rapid like a quick horse, nourishing like milk, bright [and] resplendent—[Agni] attacks the forests.

---

१. या मंत्रांत अग्नि अरण्यें भक्षावयास धांवून जात असतो असें सांगितलें आहे. पुष्कळ उपमा देऊन अग्नीचें ऋषिहृद्गत स्वरूपहि यांत वर्णिलें आहे.

'सुंदर संपत्तीप्रमाणें [सुखकारक]' =' रयिर्न चित्रा.' अक्षरशः अर्थ 'सुंदर संपत्तीप्रमाणें.' संपत्तीचा जो प्रधान गुण आहे तो उपमेंत विवक्षित असल्यामुळें 'सुखकारक' याचा अध्याहार केला आहे. (पूर्वीच्या सूक्ताच्या तिसऱ्या मंत्रांतील 'पुष्टिर्न रण्वा' हे शब्द पहा.) याचप्रमाणें 'तेजःपुंज,' 'प्रिय,' 'हितकारक,' हीं विशेषणें अध्याहृत घेतलीं आहेत.

'सूर्याच्या कांतीप्रमाणें तेजःपुंज' = 'सूरो न संदृक्.' सायणाचार्य 'संदृक्' हें येथें विशेषण घेऊन 'सूर्याप्रमाणें सर्वदर्शी' असा अर्थ करितात. पण 'संदृक्' हें इतर ठिकाणीं नाम असून 'कांति,' 'प्रभा,' असा त्याचा अर्थ होतो. म्हणून या ठिकाणीं सुद्धा नामाप्रमाणेंच समजून निर्वाह करावा हें योग्य दिसतें. 'सूरः' ही 'स्वर्' (=सूर्य) या शब्दाची षष्ठी आहे असें समजावें.

'शीघ्रगामी अश्वाप्रमाणें चपळ' = 'तक्वा न भूर्णिः.' याचा अर्थ कितीएक पाश्चिमात्य विद्वान् 'पक्ष्याप्रमाणें झडप घालणारा,' असा करितात, पण 'तक्वा' याचा अर्थ "झडप घालणारा पक्षी" असा होईलसा आधार दिसत नाहीं.

दाधार क्षेममोको न रण्वो यवो न पक्को जेता जनानाम् ।
ऋषिर्न स्तुभ्वा विक्षु प्रशस्तो वाजी न प्रीतो वयो दधाति ॥२॥

दाधार । क्षेमम् । ओकः । न । रण्वः । यवः । न । पक्वः । जेता । जनानाम् ।
ऋषिः । न । स्तुभ्वा । विक्षु । प्रऽशस्तः । वाजी । न । प्रीतः । वयः । दधाति ॥ २ ॥

भाषायाम्.

२. ओको न रण्वः (=निवासस्थानं गृहमिव रमणीयः), यवो न पक्वः (=पक्वयववत्) [आनन्दकरः], जनानां जेता (=लोकानामभिभविता) [अग्निः] क्षेमं दाधार (=रक्षणं धारयति=रक्षणं करोति) । ऋषिर्न स्तुभ्वा (=ऋषिः कविरिव स्तोत्रकर्ता), विक्षु प्रशस्तः (=जनेषु स्तुतः), वाजी न प्रीतः (=युद्धाभिमुखोश्व इव हर्षयुक्तः) [एतादृशोग्निः] वयो दधाति (=अन्नं ददाति) ॥

'अरण्यें आक्रमितो '=' वना सिषक्ति.' म्हणजे अरण्यें खाऊन टाकण्याकरितां अरण्यांच्या आंगावर जणुं धांवतो. पूर्व सूक्ताच्या ४ थ्या मंत्रांतील 'वनानि अत्ति' हे शब्द पहा. अग्नि वनें खातो म्हणणें यांत कांहीं ओढाताण नाहीं.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें आहे असें समजावें:—

रयिर्न चित्रा सूरो न संदृक्
आयुर्न प्राणो नित्यो न सूनुः ।
तक्वा न भूर्णिर्वना सिषक्ति
पयो न धेनुः शुचिर्विभावा ॥

२. घराप्रमाणें सुखकारक, [आणि] शिजविलेल्या यवांप्रमाणें [आनंदकारक] [असा जो] जनांतें जिंकणारा [अग्नि तो] [आमचें] संरक्षण करितो. ऋषीप्रमाणें स्तोत्रकर्ता, लोकांमध्यें स्तविलेला, [आणि] रणांतील घोड्याप्रमाणें सुप्रसन्न [अग्नि] संपत्ति देतो.

2. He confers safety—he who is [agreeable] as the home, delightful as the barley that is cooked, the conqueror of the people. Praising like a poet, praised among the people, pleased like a war-horse [Agni] confers food.

---

२. 'जसें माहेर सुख देतें तसें सुख देणारा, शिजलेले यव पाहून जसा आनंद होतो तसा ज्याला पाहतांच आनंद होतो, जो शत्रुजनांला जिंकून टाकणारा तो अग्नि आमचें संरक्षण करितो. कवीप्रमाणें स्तवन करण्याविषयीं कुशल, जनांनीं स्तविलेला आणि युद्धाप्रत निघालेल्या घोड्याप्रमाणें सुप्रसन्न असा जो अग्नि तो आम्हांस अन्न देतो.'

'घराप्रमाणें सुखकारक' = 'ओको न रण्वः.' आपलें घर कोणाहि मनुष्याला जसें आवडतें तसें दुसरें कांहींच आवडत नाहीं ही गोष्ट जशी आतां आपल्यास अनुभवसिद्ध आहे तशीच वेदाच्या वेळींहि होती.

'शिजविलेल्या यवांप्रमाणें [आनंदकारक]' = 'यवो न पक्वः.' अक्षरशः अर्थ 'यवाप्रमाणें शिजलेला.' 'पिकलेल्या यवाप्रमाणें' असाहि अर्थ होऊं शकेल. यव म्हणजे आपण ज्याला 'जव,' अथवा 'सातु' म्हणत असतों तें धान्य. तें शेतांत 'पिकलें' म्हणजे अथवा शिजवून खाणाऱ्यापुढें ठेविलें म्हणजे जसा आनंद होतो तसा अग्नीला पहातांच आनंद होतो असा भावार्थ. ऋग्वेदांत 'तंडुल' (=तांदुळ) याचें नांव नाहीं. साळी यालाहि शब्द नाहीं, 'श्यामाका' (सांवे) म्हणून जें मागाहून संस्कृत कवितेंत प्रसिद्ध झालें आहे त्याचाहि कोठें उच्चार नाहीं. 'यव' याचा मात्र पुष्कळ ठिकाणीं उच्चार येतो. आणि ऋषिपंचमी इत्यादि जे व्रतांचे दिवस त्या दिवशीं तांदुळ निषिद्ध आहेत. वऱ्या, सांवे, यव हे निषिद्ध नाहींत. यावरून वेदाच्या वेळीं तांदुळ ठाऊक नव्हते, त्यांचा शोध मागाहून लागला असें अनुमान काढावयाचें कीं काय ? 'नीवार' (=हरीक ?) म्हणून जें धान्य कालिदासादिकांच्या कवितेंत प्रसिद्ध आहे त्याचेंहि नांव ऋग्वेदांत आढळत नाहीं. त्याप्रमाणेंच गोधूम (गहूं) याचाहि ऋग्वेदांत कोठें उच्चार नाहीं. यावरून हीं धान्यें

दुरोकशोचिः क्रतुर्न नित्यो जायेव योनावरं विश्वस्मै ।
चित्रो यदभ्राट् श्वेतो न विक्षु रथो न रुक्मी त्वेषः समत्सु॥३॥

दुरोकऽशोचिः । क्रतुः । न । नित्यः । जायाऽइव । योनौ । अरम् । विश्वस्मै ।
चित्रः । यत् । अभ्राट् । श्वेतः । न । विक्षु । रथः । न । रुक्मी । त्वेषः । समत्ऽसु ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. दुरोकशोचिः (=दुःष्प्रापतेजा) [अग्निः], नित्यः क्रतुर्न (=निजः कर्मकर्तेव=निजः शौर्योपेतकर्मणां कर्ता पुत्र इव) [अथवा] योनौ जायेव (=शय्याख्ये स्थाने भार्येव) विश्वस्मै (=सर्वस्मा अपि) अरं (=पर्याप्तं) [भवति] (=आ तृप्तेः उपभोग्यो भवति) । यद् (=यस्मात् कारणात्) श्वेतो न (=श्वेतोश्व इव) चित्रः (=विचित्रदीप्तिः) [स] विक्षु (=जनेषु) अभ्राट् (=भ्राजते) [अपि च] रुक्मी (=सुवर्णमयो) रथो न (=रथ इव) त्वेषः (=तेजस्वी) [सन्] समत्सु (=संग्रामेषु) [भ्राजते] ॥

अपरिमिततेजस्कोग्निर्यस्मात्कारणात् सर्वेषु जनेषु निवसति तथैव सर्वेष्वपि संग्रामेषु दृश्यते अतः कारणात् यथा औरसः शौर्योपेतः पुत्रो यथा वा शय्यायां वर्तमाना भार्या सर्वेभ्योपि आ तृप्तेरुपभोग्या भवति तथा सोपि भवतीत्युक्तं भवति ॥

मागाहून प्रचारांत आलीं असें अनुमान होतें. ऋग्वेदांत 'माष' (उडीद) हेहि कोठें सांगितलेले नाहींत. यवांचें नांव फार येतें आणि अद्यापि तरी सर्व हव्यकव्यांत यवच पवित्र गणितात यावरून पाहतां यव हेंच धान्य आमचे आर्यपूर्वज मुख्यत्वेंकरून खात असत असें दिसतें.

'रणांतील घोड्याप्रमाणें सुप्रसन्न '= 'वाजी न प्रीतः.' लढाईत जाण्याकरितां निघालेला घोडा जसा आपल्या शक्तीविषयीं सगर्व आणि कशाचीच पर्वा न करणारा असतो तसा अग्नि होय असें तात्पर्य. आतांचे आपले कवि समरांगणांतील घोड्याविषयीं उपमा देणारे थोडे; कारण समरांगणाचा परिचय असणारेच थोडे आहेत.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावयाची आहेः—

दाधारॅ क्षेमं ऑको न रण्वो
यवो न पक्को जॅता जनानाम् ।
ऋषिर्नॅ स्तुभ्वा विक्षु प्रशस्तो
वाजी नॅ प्रीतो वयो दधाति ॥

३. अतितेजस्वी [अग्नि], औरस शूर पुत्राप्रमाणें [आणि] शय्येवर [निजलेल्या] जायेप्रमाणें सर्वांस तृप्तिदायक [होतो]; कारण कीं [तो] सुंदर शुभ्र घोड्याप्रमाणें लोकांत प्रकाशतो [आणि] सुवर्णमय रथाप्रमाणें बलाढ्य [होत्साता] समरांगणांत [प्रकाशतो].

3. [Agni] of unattainable brightness, is enjoyable to gratification by all, like one's own hero, like a wife in bed; since he shines brilliant like a white horse among the people, [shines] mighty like a golden car in battles.

३. भावार्थः– 'जसा शौर्याचीं कृत्यें करणारा आपला औरस पुत्र सर्वांस तृप्ति होईपर्यंत पहावयास मिळतो, अथवा जशी भार्या शय्येवर असली म्हणजे पतीला तृप्ति होईपर्यंत उपभोगावयास मिळते, तसा हा अग्नि सर्वांस तृप्ति होईपर्यंत उपभोगावयास मिळतो. कारण कीं, तो एका ठिकाणीं असतो, दुसऱ्या ठिकाणीं नसतो असें नाहीं; तर तो जसा सर्वांच्या घरीं प्रीतीनें पाळलेल्या शुभ्र घोड्याप्रमाणें असतो तसाच समरांगणांतहि असतो'.

'औरस शूर पुत्राप्रमाणें'= 'क्रतुर्न नित्यः.' अक्षरशः अर्थ, 'औरस शूराप्रमाणें.' 'नित्य' शब्दाचा अर्थ येथें (आणि पहिल्या मंत्रांतहि) 'निज' शब्दासारिखाच होतो. शूर पुत्रांविषयीं आणि उत्तम घोड्यांविषयीं आपल्या आर्य पूर्वजांची केवढी भक्ति होती ती वेदांत सर्वत्र आपणांस दृष्टीस पडते.

'शय्येवर'='योनौ.' ह्या आम्हीं केलेल्या अर्थास प्रमाण ऋ. १०. १०. ७ या मंत्रावरील सायणभाष्यांत आहे तें पहा.

'रथाप्रमाणें .... समरांगणांत प्रकाशतो'= 'रथो न .... समत्सु.' वैदिक काळीं म्हणजे ज्याला आपण आतां कृतयुग म्हणतों त्या युगांत युद्धांत रथांनीं युद्ध करीत असत असें ऋग्वेदांतील अनेक मंत्रांवरून समजतें. त्याआलीकडे जीं महाभारतांत सांगितलेलीं युद्धें त्यांत तर रथांत बसून युद्ध करीत म्हणून प्रसिद्धच आहे.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटली पाहिजे:–

दुरोकशोचिः क्रतुर्न नित्यो
जायेव योनावरं विश्वस्मै ।
चित्रो यदभ्राट् श्वेतो न विक्षु
रथो न रुक्मी त्वेषः समत्सु ॥

सेनेव सृष्टामं दधात्यस्तुर्न दिद्युत्त्वेषप्रतीका ।
यमो ह जातो यमो जनित्वं जारः कनीनां पतिर्जनीनाम् ॥ ४ ॥

सेनाऽइव । सृष्टा । अमम् । दधाति । अस्तुः । न । दिद्युत् । त्वेषऽप्रतीका ।
यमः । ह । जातः । यमः । जनिऽत्वम् । जारः । कनीनाम् । पतिः । जनीनाम् ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. [स], सृष्टा सेनेव (=धनुषः प्रेरितो बाण इव) [अथ च] त्वेषप्रतीका (=दीप्तमुखा) अस्तुः (=क्षेप्तुः संबन्धिनी) दिद्युत् न (=इषुरिव), अमं दधाति (=भयं विदधाति=भीषयति) । यमो ह जातः (=यत्सर्वं वस्तुजातं प्रादुर्भूतमस्ति तत्सर्वं यम एव अग्निरेव), यमो जनित्वं (=यच्च भविष्यत् तत्सर्वं यमः अग्निरेव) । [स च] जारः कनीनाम् (=उषोरूपाणां कन्यकानां जारः) [अपि च] जनीनां पतिः (=कृतविवाहानां ज्वालारूपाणां स्त्रियां भर्ता) [भवति] ॥

सेनेव सृष्टेत्यत्र सायणास्तु प्रेरिता सेनेव......भटसंहतिरिवेति व्याचक्षते । यमशब्दोत्र संशयग्रस्तः । तस्य अग्निवाचकत्वमाश्रित्य यद् व्याख्यानं तत्र वयं सायणमनुसरामः । केचित्तु यमशब्दस्य यमो वैवस्वत इत्यर्थं मत्वा मन्त्रोत्तरार्धं यमदेवताकमिति वदन्ति ॥

---

४. भावार्थः—‘ अग्नीचा वेग आणि अनिवार्यता इतकी आहे कीं, तो जणुं धनुष्यापासून सोडलेला बाण जसा भीति उत्पन्न करितो, अथवा एकाद्या वीराच्या हातांतून तेजःपुंज टोंक असलेला भाला जसा सुटतो आणि भीति उत्पन्न करितो, तसा तो धांवतो आणि भयंकर दिसतो. सर्व जन्मलेले प्राणी ते अग्निरूपच होत, सर्व पुढें जन्मणारे जे प्राणी तेहि अग्निरूपच होत. अविवाहित कन्यकांचा जार आणि विवाहित स्त्रियांचा पति अग्नीच होय.’

हा मंत्र कांहीं चमत्कारिक आहे. बाणासारिखा अग्नि भयंकर आहे असें म्हणण्याचा भावार्थ असा दिसतो कीं, आकाशांतून वीजेच्या रूपानें धांवणारा जो अग्नि, तो बाणासारिखा दिसतो. उत्तरार्धांत जें सांगितलें आहे त्याचा मात्र अर्थ स्पष्ट समजत नाहीं. जे जे पदार्थ आजपर्यंत जन्मले आणि पुढें जन्मतील ते सर्व अग्निरूपच होत असें म्हणणें म्हणजे सर्व पदार्थ अग्नीच्या पोटांत जळून गेले व जातील असा अर्थ दिसतो. आणि ज्या सुंदर कन्यका अविवाहित असून लग्न झाल्यानंतर सुखोपभोगाची आशा करीत असतात, अथवा ज्या स्त्रि-

४. [अग्नि हा] फेकलेल्या तिराप्रमाणें [अथवा] धनुर्धराच्या तेजोमुख बाणाप्रमाणें भीति उत्पन्न करितो. जे प्राणी जन्मले ते अग्नीच [होत] [आणि] जे जन्मणार तेहि अग्नीच [होत]. [अग्नि] कुंवारींचा जार आणि विवाहित स्त्रियांचा पति [होय].

4. Like a shaft thrown, like an archer's arrow with a burning point, [he] causes terror. Yama is all that was born, Yama all that shall be born, the lover of the maidens, the husband of the wives.

यांचा विवाह होऊन ज्या सुखांचा उपभोग करीत असतील, त्यांचा सुद्धा स्वामी अग्नीच होय. म्हणजे त्या सर्व केव्हांना केव्हां तरी मरून अग्नींतच नाहींशा होतील असा भावार्थ दिसतो. याशिवाय दुसरा अर्थ केला तर सर्व कन्यकांचा जार आणि सर्व स्त्रियांचा पति अग्नि कसा होतो तें समजत नाहीं. मात्र इतका संभव आहे कीं, ह्या कन्यका आणि स्त्रिया म्हणजे उषा देवी होत (आणि कदाचित् आपोदेवीहि असतील). ऋ. १. १५२. ४ यांत सूर्यास उषोरूप 'कन्यकांचा जार' (जारं कनीनाम्) असें म्हटलें आहे. आणि अग्नि हा सूर्यरूप होय म्हणजे अग्नि आणि सूर्य एकच होत असें वेदांत पुष्कळ ठिकाणीं मानिलेलें आढळतें.

'कुंवारींचा जार'=' जारः कनीनाम्.' जार म्हणजे येथें अविवाहित स्त्रीशीं विवाह करण्याच्या इच्छेनें तिजवर प्रीति करणारा असा अर्थ दिसतो. अश्लील अर्थ विवक्षित नसेल, तथापि ऋग्वेदांत जार शब्दाचा आलीकडचा उपपति हा अर्थहि प्रसिद्ध आहे. ऋ. १०. १६२. ५ हा मंत्र अपप्रसवप्रशमनार्थ (म्हणजे पोटचें पडूं नये म्हणून जें कर्म करावयाचें त्यासंबंधी) जपतात; त्यांत म्हटलें आहे कीं, 'हे स्त्रिये, जो राक्षस तुझा भ्राता अथवा पति होऊन अथवा तुझा जार होऊन तुझ्याशीं संग करितो आणि तुझ्या गर्भाचा नाश करूं इच्छितो त्याला आम्ही येथून हाकून लावितों' (=यस्त्वा भ्राता पतिर्भूत्वा जारो भूत्वा निपद्यते । प्रजां यस्ते जिघांसति तमितो नाशयामसि ॥).

या मंत्राच्या उत्तरार्धांत 'यम' शब्द आहे त्याचा अर्थ सायणानुसारें आम्हीं अग्नि असा केला आहे. कितीएक यम म्हणजे यम देवच समजतात. परंतु त्याचा संबंध येथें लागत नाहीं. तथापि इतर ठिकाणीं अग्नीला यम हें नांव दिलेलें आढळत नसल्यामुळें यम शब्दाच्या संबंधानें हा उत्तरार्ध कठिण आहे असें म्हटलें पाहिजे.

खालीं लिहिल्याप्रमाणें हा मंत्र म्हणावाः—

सेनेव सृष्टा अमं दधाति
अस्तुर्न दिद्युत्त्वेषप्रतीका ।
यमो ह जातो यमो जनित्वं
जारः कनीनां पतिर्जनीनाम् ॥

तं वश्चराथा वयं वसत्यास्तं न गावो नक्षन्त इद्धम् ।
सिन्धुर्न क्षोदः प्र नीचीरैनोन्नवन्त गावः स्व१र्दृशीके ॥५॥१०॥

तम् । वः । चराथा । वयम् । वसत्या । अस्तम् । न । गावः । नक्षन्ते । इद्धम् ।
सिन्धुः । न । क्षोदः । प्र । नीचीः । ऐनोत् । नवन्त । गावः । स्वः । दृशीके ॥ ५ ॥ १० ॥

भाषायाम्.

५. तं वः (=तं त्वां) [हे अग्ने], इद्धं (=समिद्धं सन्तम्) अस्तं गावो नक्षन्ते न (=गावः स्वगृहं प्रति गच्छन्ति तद्वद्) वयं चराथा (=चरथेन=जङ्गमेन पश्वादिसाध्ययाहुत्या) वसत्या (=स्थावरेण=धान्यादिसाध्ययाहुत्या) [सह] [नक्षामहे=प्राप्नुयामः] । [अयमग्निः] सिन्धुर्न क्षोदः (=नदः पूरसमये स्वप्रवाहजलम् आसमन्तात् प्रेरयति तद्वत्) नीचीः (=नितरामञ्चतीः=प्रवणे गच्छन्तीः) [ज्वालारूपा गाः] प्रैनोत् (=प्रेरयति) । [ता] गावः (=ज्वालारूपा गावः) स्वर्दृशीके (=स्वर्दृशे=आदित्यं द्रष्टुम्=आदित्यप्रकाशयुक्तं स्वर्लोकं प्रति) नवन्त (=नवन्ते=स्वनं कुर्वत्यो गच्छन्ति) ॥

' चराथा वसत्या ' इत्येतत् सायणा यास्कमनुसृत्यैवं व्याचक्षते । चरतीति चरथः । पशुः । तत्प्रभवैर्हृदयादिभिः साध्याहुतिरपि चरथेत्युच्यते । उपचारात् कार्ये कारणशब्दः । चराथा चरथया पशुप्रभवहृदयादिसाधनयाहुत्या । वसत्या । वसति निवसतीति स्थावरी व्रीह्यादिर्वसतिः । पूर्ववत्तत्साध्याहुतिर्लक्ष्यते । वसत्या पुरोडाशाद्याहुत्या च वयमिद्धं प्रदीप्तमग्निमित्यादि ॥ यत्तु गमने वसतौ चेति रोधग्रासमानादयो विदुष्टराः शार्मण्याचार्या व्याख्यानं कुर्वन्ति तदपर्याप्ताधारमिति भाति । चराथे वसताविति सप्तम्यर्थे हि चराथा वसत्येति तृतीया न संभवति । चरथशब्दस्य पश्वर्थत्वं तु पशून् स्थातॄन् चरथं च पाहि (ऋ. १. ७२. ६), प्र नः पूषा चरथं......अवतु (ऋ. १०. ९२. १३), गर्भो यो अपां गर्भो वनानां गर्भश्च स्थातां गर्भश्चरथाम् (ऋ. १. ७०. २) इत्यादिषु मन्त्रेषु दृश्यते । वसतिशब्दस्यापि स्थावरार्थत्वं धात्वर्थाच्चरथपदसाहचर्याच्च सिध्यति ।

पूरकाले महानदस्य प्रवाहोदकं यथासमन्तात् प्रसृत्य निम्नस्थलेषु गच्छति तथाग्नेर्ज्वाला इतस्ततः प्रसरन्ति स्वर्लोकं प्रति च आरोहमाणा दृश्यन्त इत्युत्तरार्धस्य भावार्थः ॥

स्वर्दृशे स्वर्दृशीके समानार्थके स्त इति द्रष्टव्यम् ॥

५. तर [हे अग्नी], तुला प्रदीप्त करून जंगमासहित [आणि] स्थावरासहित आम्ही, गाई [आपल्या] गोठ्याकडे धांवल्याप्रमाणें तुजजवळ धांवतों.–[अग्नि हा], नद [आपल्या] प्रवाहाच्या पाण्याला मोकळें सोडितो [त्या]प्रमाणें,[ज्वालारूप गाईंस] मोकळ्या सोडितो. [मग त्या] गाई हंबरडा फोडीत आकाशाकडेस जातात.

5. To thee kindled we therefore run with that which moves [and] with that which stands, like as cows run to [their] home.—[Agni] sendeth forth his spreading flames as a river its swollen waters: the cows (the flames) low to see the bright heaven.

---

५. हा या सूक्ताचा उपसंहार असल्यामुळें स्तोत्रकर्ता ऋषि म्हणतो, 'वर सांगितल्याप्रमाणें पराक्रमी जो तूं अग्नि त्या तुजजवळ आम्हीं गाई गोठ्याकडेस धांवल्याप्रमाणें प्रेमानें धांव घेतों आणि तुला प्रदीप्त करून पशु आणि धान्यादिक पदार्थांच्या आहुत्या अर्पण करीत असतों. मग तूं विशेष प्रदीप्त होऊन पुरानें भरून वाहणाऱ्या एकाद्या महानदाचें पाणी आसपास वाहून जातें आणि पसरतें त्याप्रमाणें तुझ्या ज्वाळा जिकडे तिकडे पसरतात आणि आकाशाकडेस धांवतात. म्हणजे अग्नीच्या ज्वाळा जिकडे तिकडे पसरून मोठ्या होऊन आकाशाकडेस जणुं चढतात असें दिसतें.'

'जंगमासहित आणि स्थावरासहित' =' चराथा वसत्या.' चराथा=चरथा. ही 'चरथ' शब्दाची तृतीया आहे (चरथाम् ही सू. ७०, मं. २ यांत षष्ठी झाली आहे ती पहा). चरथ म्हणजे जंगम. म्हणजे, पशु असा अर्थ होतो याविषयीं भाषेंत दिलेलों प्रमाणें पहा. 'स्थावरजंगम पदार्थांच्या आहुत्या घेऊन' असा जो अर्थ आम्हीं दाखविला तो यास्क आणि सायण यांस अनुसरून आहे. भाषांतरांत अक्षरशः अर्थ केला आहे.

या मंत्राचें उत्तरार्ध बरेंच कठिण आहे. त्यांत 'नीचीः' हें कशाचें विशेषण आहे तें स्पष्ट कळत नाहीं. तथापि सू. ७२, मं. १० यांत, 'अध क्षरन्ति सिन्धवो न सृष्टाः प्र नीचीरग्ने अरुषीरजानन्' या वाक्यात प्रस्तुत मंत्राप्रमाणेंच उपमा असून 'नीची' शब्दानें अग्नीच्या ज्वाळा समजावयाच्या आहेत असें सायणभाष्यावरून स्पष्ट होतें. यास्तव येथेंहि ज्वाळा असा आम्हीं अर्थ केला आहे.

'आकाशाकडेस' = 'स्वर्दृशीके.'

सूक्तम् ६७.

शक्तिपुत्रः पराशर ऋषिः । अग्निर्देवता । द्विपदा विराट् छन्दः ।

वनेषु जायुर्मर्तेषु मित्रो वृणीते श्रुष्टिं राजेवाजुर्यम् ।
क्षेमो न साधुः क्रतुर्न भद्रो भुवत्स्वाधीर्होता हव्यवाट् ॥ १ ॥

वनेषु । जायुः । मर्तेषु । मित्रः । वृणीते । श्रुष्टिम् । राजाऽइव । अजुर्यम् । क्षेमः । न । साधुः । क्रतुः । न । भद्रः । भुवत् । सुऽआधीः । होता । हव्यऽवाट् ॥ १ ॥

भाषायाम्.

१. वनेषु (=अरण्येषु) जायुः (=जेता=शत्रुः) मर्तेषु (=मरणधर्मेषु मनुष्येषु) मित्रः (=सखा) [एतादृशोग्निः], राजा अजुर्यमिव (=यथा राजा तरुणं भृत्यं द्रव्यादिरक्षणाय वृणीते तथा), [अजुर्य=तरुणं], श्रुष्टिं (=यजमानं) वृणीते (=संभजते=कामयते) । [एवं सति] [तरुणभूतैरस्माभिरुपास्यमानः स] क्षेमो न साधुः (=निधिरक्षक इव साधयिता), क्रतुर्न भद्रः (=कर्मकारी वीर इव कल्याणः), स्वाधीः (=शोभनध्यानो) होता (=देवानामाह्वाता) [अग्निः] [नो] हव्यवाट् (=अस्माभिः प्रत्तानां हविषां वोढा) भुवत् (=भवतु) ॥

वनेषु जायुर्मर्तेषु मित्र इति विरोधेन सत्यप्यग्नेर्दाहकत्वे नैव स मर्त्यान् दहति वनान्येव दहतीति भावः ॥

'दृशीके' हें 'दृशे' याऐवजीं तुमन्तार्थी अव्यय आहे. अक्षरशः अर्थ 'आकाश पाहावयाला' म्हणजे 'आकाशाच्या दिशेनें,' 'आकाशाकडेस.'

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटली पाहिजेः—

तं वश्चराथा वयं वसत्या
अस्तं न गावो नक्षन्त इद्धम् ।
सिन्धुर्न क्षोदः प्रनीचीरैनोत्
नवन्त गावः स्वर्दृशीके ॥

सूक्त ६७.

ऋषि– **पराशर** (पूर्वसूक्ताचा जो कर्ता तोच). देवता– **अग्नि.** वृत्त– **द्विपदा विराट्.**

१. अरण्यांचा शत्रु [आणि] मर्त्यांचा मित्र [असा जो अग्नि त्याला,] तरुण चाकर राजाला आवडतो तसा, तरुण यजमान आवडतो. [तर] रक्षकाप्रमाणें चांगला [आणि] वीराप्रमाणें सुखकारक [असा जो] बुद्धिमान् होता [अग्नि, तो] [आमचा] हव्यवाहक होओ.

HYMN 67.

To *Agni*. By *Parâs'ara* (author of the previous hymn). Metre—*Dvipadâ Virâṭ*.

1. Enemy of the forests, [and] friend of the mortals, [Agni] loves the young sacrificer as a king [loves] the young servant. Safe like a guard, beneficent like a champion, may [Agni] the wise invoker become the bearer of [our] oblation.

---

१. हेंहि सूक्त पराशर ऋषीनेंच केलेलें आहे. तो म्हणतो कीं, 'अग्नीला वस्तुमात्राला जाळून टाकण्याची शक्ति आहे, तरी त्या नाशक शक्तीचा, तो मर्त्यांच्या म्हणजे मनुष्यांच्या ठायीं उपयोग करीत नाहीं; तर केवळ अरण्यांविषयीं मात्र त्या शक्तीचा प्रादुर्भाव करितो. आणि मनुष्यांचा तो मित्र असतो, म्हणजे त्याच्या आंगीं जे चांगले गुण आहेत त्यांचा उपयोग तो मनुष्यांच्या संबंधानें करितो. असा जो अग्नि त्याला, राजाला जसे तरुण चाकर आवडतात तसे तरुण उपासक आवडतात. तर तरुण असे जे आम्ही त्यांनीं अर्पण केलेलें हवि अग्नि आपल्या स्वाधीन करून घेओ, आणि देवांस बोलावून आणून त्यांजप्रत तें प्रविष्ट करो. कारण कीं अग्नि पाहरेकऱ्यासारिखा रक्षण करणारा, शूर वीरासारिखा सांगितलेलें काम साधणारा आणि देवांस बोलावून आणण्याविषयीं फार कुशल असा आहे.

'अरण्यांचा शत्रु '=' वनेषु जायुः '. अक्षरशः अर्थ ' वनांत जिंकणारा' असा आहे. ' जायु ' शब्दाचा आम्ही येथें केल्याप्रमाणें अर्थ होतो याविषयीं ऋ. १. १३५. ८ याजवरील सायणभाष्य पहा.

' यजमान '=' श्रुष्टिम्. ' हा सायणानुसारी अर्थ आम्हांस बरा दिसतो. कितीएक पाश्चिमात्य विद्वान् ' सेवा,' ' उपासना ' असा अर्थ करितात, पण मग राजाविषयींची उपमा जुळत नाहीं. आणि

हस्ते॒ दधा॑नो नृ॒म्णा विश्वा॒न्यमे॑ दे॒वान्धा॒द्गुहा॑ नि॒षीद॑न् ।
वि॒दन्ती॒मत्र॒ नरो॑ धियं॒धा हृ॒दा यत्त॒ष्टान्मन्त्राँ॒ अशं॑सन् ॥ २ ॥

हस्ते॑ । दधा॑नः । नृ॒म्णा । विश्वा॑नि । अमे॑ । दे॒वान् । धा॒त् । गुहा॑ । नि॒ऽसीद॑न् ।

वि॒दन्ति॑ । ई॒म् । अत्र॑ । नर॑ः । धि॒यं॒ऽधाः । हृ॒दा । यत् । त॒ष्टान् । मन्त्रा॑न् । अशं॑सन् ॥ २ ॥

भाषायाम्.

२. विश्वानि (=सकलानि) नृम्णा (=नृम्णानि=धनानि, हविर्लक्षणानि ?) हस्ते दधानः (=धारयन्) [अग्निः] गुहा निषीदन् (=गुहायां निषीदन्=यदा गुहायां न्यषीदत् तदा) देवान् अमे धात् (=देवान् भयेऽस्थापयत्)। [अनन्तरम्] धियंधाः (=बुद्धीनां धारयितारो=बुद्धिमन्तो) नरः (=शूरा) [देवा] यद् (=यदा) हृदा तष्टान् मन्त्रान् (=हृदयावस्थितया भक्त्या निर्मितान्यग्निस्तुतिपराणि सूक्तानि) अशंसन् (=अगायन्) अत्र (=तदा) ईम् (=एनमग्निं) विदन्ति (=लेभिरे) ॥

'अमे देवान् धात्' इत्यत्र सायणाचार्या अग्नौ हविर्भिः सह पलायिते सति सर्वे देवा अभैषुरित्यर्थ इत्याहुः ॥

'श्रुष्टि' शब्दाचा अर्थ 'उपासक,' 'शुश्रूषा' करणारा असा धात्वर्थावरून सिद्ध होतो.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटली पाहिजेः—

वनेषु जायुर्मर्तेषु मित्रो
वृणीते श्रुष्टिं राजेवाजुर्यम् ।
क्षेमो न साधुः क्रतुर्न भद्रो
भुवत्स्वाधीर्होता हव्यवाट् ॥

२. सकल धनें हातांत घेऊन [अग्नि] जेव्हां गुहेंत [जाऊन] बसला [तेव्हां] त्यानें देवांस भयभीत केलें. [मग] ते बुद्धिमान् वीर जेव्हां मन लावून रचिलेले मंत्र ह्मणते झाले, तेव्हां हा त्यांस अवगत झाला.

2. [Agni] holding all the wealth in his hand put the gods in fear when he sat in the cave. The wise heroes found him then when they sang hymns composed from the heart.

---

२. अग्नि देवांकरितां उपासकांनीं दिलेलें हवि घेऊन गेला आणि पळून जाऊन गुहेंत लपून बसला असें पूर्वीं (सू. ६५, मं. १) सांगितलें आहे. त्या गोष्टीस अनुलक्षून हा मंत्र आहे असें समजून सायणाचार्य भाष्य करितात, त्यालाच अनुसरून आम्हीं भाषांतर केलें आहे. ‘अग्नि हा सकल धनें आपल्या हातांत घेऊन पळून जाऊन गुहेंत लपून बसला. तेव्हां देवांस भीति वाटली, कारण अग्नि नसल्यास त्यांस हविरन्न मिळणार नाहीं. यास्तव देव मोठ्या भक्तीनें अग्नीचें स्तोत्र रचिते झाले, आणि अग्नीप्रीत्यर्थ तें म्हणते झाले. तेव्हां अग्नि त्यांस पुनः लाभला,’ असा अर्थ आहे.

‘ सकल धनें हातांत घेऊन ’=‘विश्वानि नृम्णा हस्ते दधानः ’. हीं धनें म्हणजे उपासकांनीं अर्पण केलेलीं जीं हव्यें तींच होत असें सायण म्हणतात. पण तसा ओढूनताणून ‘ नृम्ण’शब्दाचा अर्थ करण्याची अवश्यकता दिसत नाहीं. अग्नीच्या जवळ जी संपत्ति नित्य असते ती कोणास न मिळावी म्हणून अग्नि आपल्या हातांत घेऊन गुहेंत लपून बसला असें समजल्यास अर्थ चांगला होईल.

‘ ते बुद्धिमान् वीर ’=‘ धियंधा नरः.’ म्हणजे देव समजावयाचे असें सायणाचार्य म्हणतात तेंच मान्य करणें अवश्य दिसतें.

हा मंत्र खालीं लिहिल्याप्रमाणें म्हटला पाहिजेः—

हस्ते॑ दधा॒नो नृ॒म्णा विश्वा॑नि
अमे॑ दे॒वान् धा॑द्गुहा॑ निषीदन् ।
वि॒दन्ती॑मत्र॒ नरो॑ धियं॒धा
हृ॒दा यत्त॒ष्टान् मन्त्रा॒नशं॑सन् ॥

अजो न क्षां दाधार पृथिवीं तस्तम्भ द्यां मन्त्रेभिः सत्यैः ।
प्रिया पदानि पश्वो नि पाहि विश्वायुरग्ने गुहा गुहं गाः ॥ ३ ॥

अजः । न । क्षाम् । दाधार । पृथिवीम् । तस्तम्भ । द्याम् । मन्त्रेभिः । सत्यैः ।
प्रिया । पदानि । पश्वः । नि । पाहि । विश्वऽआयुः । अग्ने । गुहा । गुहम् । गाः ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. अजो न (=जन्मरहित ईश्वर इव) [अग्निः] पृथिवीं (=विस्तीर्णा) क्षां (=भूलोकं) द्यां (=द्युलोकं) [च] सत्यैर्मन्त्रेभिः (=सत्यैर्मन्त्रैः=अवितथैः सूक्तैः) दाधार (=धारयति)। [तस्मात्] हे अग्ने, विश्वायुः (=सकलान्नयुक्तस्) [त्वं] पश्वः (=पशोः) प्रिया (=प्रियाणि) पदानि (=स्थलानि) नि पाहि (=नितरां पालय=मा धाक्षीः) [त्वं च] गुहा गुहं गाः (=गुहाया अपि गुहां प्रति गाः=अतिनिर्जनस्थले निवस)॥

अत्र अजशब्देन सूर्यो ज्ञातव्य इति सायणाः॥ सत्यैर्मन्त्रेभिरित्यत्र सत्यैर्मन्त्रैः=स्तूयमानोग्निर्द्यां तस्तम्भेति च त एव॥

३. जन्मरहित [ईश्वरा]प्रमाणें अग्नि विस्तीर्ण पृथिवीला धारण करितो आणि सत्य मंत्रांच्या योगानें द्युलोकास सावरून धरितो. [तर] हे सकलान्नसंपूर्ण अग्नी, गुरांस प्रिय जीं स्थानें तीं तूं संरक्षण कर आणि तूं गुहेंत लपून राहा.

3. [Agni] held the vast earth [and] with true hymns supported the heaven, like God. O Agni, protect thou, who dost possess all food, the places dear to cattle and hide thyself in the cave.

---

३. ‘अग्नीचा प्रताप साधारण नव्हे. तो अजाप्रमाणें (ईश्वराप्रमाणें) पृथिवी आणि द्युलोक या दोहोंलाहि धारण करितो आणि खालीं पडूं देत नाहीं. आणि असें करण्याची इच्छा त्याला होते ती त्याचीं स्तोत्रें मनापासून उपासकांनीं गाइलीं म्हणजे होते. तर असा जो तूं अग्नि तो आमचीं गुरें जेथें चरतात तीं स्थळें जाळूं नकोस. इतकें नाहीं केलेंस म्हणजे पाहिजे त्या गुहेंत खोल लपून राहिलास तरी आम्ही नको म्हणत नाहीं. आम्ही तुला देवांनीं पूर्वी शोधून काढून बाहेर आणिला तसें करण्यास इच्छिणार नाहीं’ असा या मंत्राचा भावार्थ दिसतो.

‘जन्मरहित [ईश्वरा] प्रमाणें’= ‘अजो न.’ या ठिकाणीं अज म्हणजे ईश्वर अथवा ईश्वरगुणविशिष्ट कोणीएक देवविशेष असा अर्थ होतो यांत संशय नाहीं. ‘अज’ म्हणजे ज्याला जन्म नाहीं तो, जो उत्पन्न झालेला नव्हे तो. ह्या अजाविषयीं ऋग्वेदांत विशेष सांगितलेलें नाहीं. तथापि जें सांगितलें आहे त्यावरून त्याचें खरें स्वरूप ईश्वरात्मक अथवा ईश्वररूपसदृश आहे असें सहज ध्यानात येईल. सांप्रतच्या मंत्रांत जशी अजाप्रमाणें अग्नीनें पृथ्वी आणि आकाश धारण केल्याची उपमा दिली आहे, तशीच ऋग्वेद ८.४१.१० यांत अजाप्रमाणें वरुणानें पृथिवी आणि आकाश हीं धारण केलीं अशी उपमा आहे (यः स्कम्भेन वि रोदसी अजो न द्यामधारयत्). ऋ. १.१६४.६ यांतहि अजानें साहा लोक धारण केल्याविषयीं उक्ति आहे. ऋ. १०.८२.६ या मंत्रांत असें सांगितलें आहे कीं, ‘अजाच्या नाभीवर सर्व ब्रह्माण्ड राहिलेलें आहे आणि त्यांत सकल भुवनाचा समावेश होत असतो’ (अजस्य नाभावध्येकमर्पितं यस्मिन्विश्वानि भुवनानि तस्थुः). हा शेवटचा मंत्र विश्वकर्म्याविषयीं असल्यामुळें विश्वकर्मा आणि अज एकच आहे असें विचाराअंतीं सहज दिसून येतें. विश्वकर्मा म्हणजे सर्व जगाचा कर्ता जो परमेश्वर तो. तो सर्वांस उत्पन्न करितो, पण त्याला कोणी निर्माणकर्ता नाहीं यास्तव त्याला अज हें नांव दिलेलें आहे असें

य ईं चिकेत गुहा भवन्तमा यः ससाद धारामृतस्य ।
वि ये चृतन्त्यृता सपन्त आदिद्वसूनि प्र ववाचास्मै ॥ ४ ॥

यः । ईम् । चिकेत । गुहा । भवन्तम् । आ । यः । ससाद । धाराम् । ऋतस्य ।
वि । ये । चृतन्ति । ऋता । सपन्तः । आत् । इत् । वसूनि । प्र । ववाच । अस्मै ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. यः (=यः पुरुषः) ईम् (=एतं) गुहा भवन्तं (=गुहायां सन्तं=गुह्यरूपेण विद्यमानम्) [अग्निं] चिकेत (=जानाति) यश् [च] ऋतस्य (=सत्यरूपस्य सोमस्य) धारां (=कुल्याम्) आ ससाद (=आसीदति=उपास्ते) ये [च पुरुषाः] सपन्तः (=परिचरणाख्येन कर्मणा स्पृशन्तः=परिचरन्तः सन्तः) ऋता (=ऋतानि= सत्यरूपाणि स्तोत्राणि) वि चृतन्ति (=ग्रथ्नन्ति), अस्मै (=एतादृशाय जनाय= तेभ्य) आदित् (=स्तुत्याद्यनन्तरमेव=शीघ्रम्) [अग्निः] वसूनि (=धनानि) प्र ववाच (=प्रोवाच=प्रकथयति=धनलाभमार्गं दर्शयति) ॥

अग्नेर्गुह्यस्वरूपं यः पुरुषो जानाति यश्च सततं सोममभिषूय परिचर्यायुक्तः सन् अग्नेः स्तोत्राणि रचयति तस्मै शीघ्रमेव धनानि ददातीत्यर्थः ।

एतामृचं सायण एवं व्याचख्यौ । यः पुमान् ईमेनं गुहा भवन्तं गुहायां सन्तमग्निं चिकेत । जानाति । यश्च ऋतस्य सत्यस्य यज्ञस्य वा [धारां] धारयितारमग्निमाससाद । आसीदति । उपास्त इत्यर्थः । ये च ऋता ऋतानि सत्यानि यज्ञान् वा सपन्तः समवयन्तः स्पृशन्तो वा पुरुषा एतमग्निं वि चृतन्ति । अग्निमुद्दिश्य स्तुतीर्ग्रथ्नन्ति । कुर्वन्तीत्यर्थः । आदित् स्तुत्यनन्तरमेवास्मै सर्वस्मै स्तोतृजनाय वसूनि धनानि प्र ववाच । प्रकथयतीति ॥

दिसतें. प्रस्तुत मंत्रांत (आणि दुसऱ्या दोनहि मंत्रांत सुद्धा) सायणाचार्य अज म्हणजे सूर्य होय असें म्हणतात.

'सकलान्नसंपूर्ण'='विश्वायुः'. सर्वव्यापी असाहि अर्थ संभवतो.

'गुरांस प्रिय जीं स्थानें तीं' इ०. हीं अग्नीनें रक्षावीं असें सांगण्याचें तात्पर्य असें कीं, त्यांस आग लागून तीं जळूं नयेत अशी प्रार्थना आहे.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें आहे असें समजावें:—

अजो न क्षां दाधार पृथिवीं
तस्तम्भ द्यां मन्त्रेभिः सत्यैः ।
प्रिया पदानि पश्वो नि पाहि
विश्वायुरग्ने गुहा गुहं गाः ॥

४. गुह्यरूपानें असणाऱ्या अग्नीला जो जाणत असतो, जो सोमाचे धारेला धरून वसतो, [आणि] जे भक्तिभावेंकरून स्तोत्रें रचितात, त्यांस तो तत्काळ संपत्तींचा मार्ग दाखवितो.

4. He that knows Him when remaining concealed, he that sits by the stream of the Soma, they that reverentially compose hymns [in honor of Him], to them he quickly proclaims riches.

४. या मंत्राचा भावार्थ असा दिसतो कीं, 'जो मनुष्य अग्नीचें गुह्य स्वरूप जाणतो, आणि जो सोमरस काढून भक्तिभावानें अग्नीचें स्तोत्र रचून गातो, त्याला अग्नि शीघ्र प्रसन्न होऊन इष्टलाभाचा मार्ग दाखवितो.'

यांत 'यः आ ससाद धारामृतस्य' हें आणि 'वि ये चृतन्ति ऋता सपन्तः' हे शब्द कठिण आहेत.

'संपत्तीचा मार्ग दाखवितो'='प्र ववाच अस्मै.' अक्षरशः अर्थ संपत्ति सांगतो, म्हणजे संपत्ति कशा मिळतील अथवा कोठें आहेत तें सांगतो.

वृत्ताचा प्रकार खालीं दाखविल्याप्रमाणें आहेः—

य ईं चिकेत गुहा भवन्तम्
आ यः ससाद धारामृतस्य ।
वि ये चृतन्ति ऋता सपन्तः
आदिद्वसूनि प्र ववाच अस्मै ॥

वि यो वीरुत्सु रोधन्महित्वोत प्रजा उत प्रसूष्वन्तः ।
चित्तिरपां दमे विश्वायुः सद्मेव धीराः संमाय चक्रुः ॥५॥११॥

वि । यः । वीरुत्ऽसु । रोधत् । महिऽत्वा । उत । प्रऽजाः । उत । प्रऽसूषु । अन्तरिति ।
चित्तिः । अपाम् । दमे । विश्वऽआयुः । सद्मऽइव । धीराः । संऽमाय । चक्रुः ॥ ५ ॥ ११ ॥

भाषायाम्.

५. यः [अग्निः] महित्वा (=स्वमहत्त्वेन) वीरुत्सु (=विविधं रोहन्तीषु ओषधीषु) वि रोधत् (=विशेषेण रोहति=उत्पाद्यमानः सन् प्रसरति), उत [यः] प्रसूषु अन्तः (=स्वमातृभूतानाम् ओषधीनामुदरे) प्रजाः (=प्रजायमानोस्ति=प्रजायते), [यश्च] विश्वायुः (=सर्वव्यापी) चित्तिः (=प्रज्ञापकः=प्रसिद्धः) [अग्निः] अपां दमे (=उदकरूपे गृहे) [वर्तते], [तं] धीरा (=मेधाविनो देवा) सद्मेव संमाय (=तस्यासनपरिमाणं कृत्वेव) चक्रुः (=तत्र तत्र स्थापयामासुः) ॥

सायणास्तु । योग्निर्वीरुत्सु ओषधीषु महित्वा यानि महत्त्वानि सन्ति तानि विरोधत् । विरुणद्धि । विशेषेणावृणोति । नावशेषयति । उत अपि च प्रजाः प्रकर्षेणोत्पन्नाः पुष्पफलादिलक्षणाः प्रसूषूत्पादयित्रीषु मातृस्थानीयास्वोषधीष्वन्तर्मध्ये विरुणद्धीत्येव । द्वितीय उतशब्दः पादपूरणः । तथा चित्तिश्चेतयिता ज्ञापयितापां दमे जलानां मध्यभूते गृहे विश्वायुः सर्वान्नो योऽग्निर्वर्तत इति शेषः । तमग्निं धीरा मेधाविनः संमाय संमाननं पूजनं कृत्वा । स्तुतिभिः स्तुत्वेत्यर्थः । चक्रुः । कर्माणि कुर्वन्ति । तत्र दृष्टान्तः । सद्मेव । यथा सदनं गृहं प्रथमतः संपूज्य पश्चात्तत्र कर्माण्याचरन्ति तद्वदिति ॥

५. जो [आपल्या] मोठेपणाच्या योगानें वनस्पतींच्या पोटीं वाढतो आणि [जो] [आपल्या] आयांच्या पोटीं जन्मतो; [जो] सर्वव्यापी बुद्धिमान् [अग्नि] उदकांच्या ठायीं [असतो], [त्याला] [त्या स्थलीं] [त्याचें] आसनच जणूं मोजून देवांनीं स्थापिलें आहे.

5. Him who by his greatness spreads within the Plants and [becomes] a child in the womb of [his] mothers, wise [and] omnipresent [Agni], [who exists] in the home of the Waters–Him the wise [gods] have [there] established as if after measuring [his] seat.

५. ही ऋचा सुद्धा वरच्या ऋचेप्रमाणेंच कांहींशी दुर्बोध आहे. पण आम्ही जो भावार्थ समजतों तो असाः–' जो अग्नि वनस्पतींच्या (म्हणजे वृक्षांच्या) पोटांत उत्पन्न होतो, म्हणजे दोन लांकडें एकमेकावर घांसलीं म्हणजे प्रगट होतो आणि आपल्या मोठेपणामुळें त्यांतून बाहेर पडून वाढतो, आणि जो उदकांत म्हणजे उदककणपरिपूर्ण आकाशांत विजेच्या रूपानें प्रादुर्भूत होत असतो असा जो सर्वव्यापी अग्नि, त्याला त्या वृक्षांत आणि उदकांत त्याला पुरे इतकी जागा मोजूनच जणों देवांनीं स्थापिला आहे.' म्हणजे सर्वव्यापी आणि मोटा अग्नि लहानशा लांकडाच्या तुकड्यांत आणि लहानशा ढगांत प्रगट होतो, असें पाहून ऋषीला आकांक्षा उत्पन्न झाली कीं, हा त्या लहान स्थळीं कसा मावत असेल. त्याला ऋषि असें समाधान करितो कीं, त्याला लहानसें स्थळ देवांनीं जणुं मोजून दिलें आहे. आणि तें सोडून दुसरे ठिकाणीं जाऊं नये असें त्याला देवांनीं सांगितलें आहे.

' वाढतो '=' वि रोधत्.' ' रुह् ' धातूचें रूप.

' आपल्या आयांच्या पोटीं '=' प्रसूषु अन्तः.' आया म्हणजे येथें वनस्पति अथवा लांकडेंच घ्यावयाचीं आहेत. कारण लांकडाच्या पोटीं (घर्षणाअंतीं) उत्पन्न होतो म्हणून तीं जीं लांकडें त्याच त्याच्या माता होत.

' जन्मतो '=' प्रजाः.' ' प्रजाः ' हें आम्ही प्रजास् शब्दाचें प्रथमेचें एकवचन समजतों, आणि ' भवति ' या क्रियापदाचा अध्याहार करितों. (' दुष्प्रजाः ' यांत ' प्रजा ' शब्द सकारान्त आहे).

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावयाचा आहेः–

विर्यो वी॒रुत्सु रो॒धन्महित्वा
उत प्रजोत (?) प्रसूषु अन्तः ।
चित्तिरपआं दमे वि॒श्वायुः
सद्मेव धीराः सं॒माय चक्रुः ॥

सूक्तम् ६८.

शक्तिपुत्रः पराशर ऋषिः । अग्निर्देवता । द्विपदा विराट् छन्दः ।

श्रीणन्नुप॑ स्थाद्दिवं॑ भुर॒ण्युः स्था॒तुश्च॒रथ॑म॒क्तून्व्यू॑र्णोत् ।

परि॒ यदे॑षा॒मेको॒ विश्वे॑षां॒ भुव॑द्दे॒वो दे॒वानां॑ महि॒त्वा ॥ १ ॥

श्रीण॑न् । उप॑ । स्था॒त् । दिव॑म् । भु॒र॒ण्युः । स्था॒तुः । च॒रथ॑म् । अ॒क्तून् । वि । ऊ॒र्णो॒त् ।

परि॑ । यत् । ए॒षा॒म् । एकः॑ । विश्वे॑षाम् । भुव॑त् । दे॒वः । दे॒वाना॑म् । म॒हि॒ऽत्वा ॥ १ ॥

भाषायाम्.

१. भुरण्युः (=हविषां वोढा) [अग्निः] श्रीणन् (=हवींषि मिश्रयन् देवानां भक्षणाय संस्कुर्वन्) दिवम् उपस्थात् (=द्युलोकं प्राप्नोति) [अपि च] अक्तून् (=रात्रिषु) स्थातुश्चरथं (=स्थावरं जङ्गमं च वस्तुमात्रं) वि ऊर्णोत् (=अपोदघाटयत्=स्वतेजसा प्रकाशयति)। यद् (=यस्मात् कारणात्) देवानां देवो (=देवाधिदेवः) [स] विश्वेषाम् एषाम् (=पूर्वोक्तानां स्थावरजङ्गमानां) महित्वा (=महित्वानि=महत्त्वानि) एकः (=एक एव) परि भुवत् (=परिगृह्णाति=परितो व्याप्य वर्तते) ॥

अल्पभौतिकस्वरूपेण देवेभ्यः प्रदातव्यं हविः पाचयन्नप्यग्निः स्वतेजोमहत्त्वेन ज्वाला ऊर्ध्वं प्रसारयन् मार्गे तमसावृतानि स्थावरजङ्गमानि सकलानि वस्तूनि प्रकाशयन् दिवमपि स्पृशति, देवाधिदेवस्याग्नेर्महत्त्वं हि सकलानामपि वस्तूनां महत्त्वान्महीयः । अतः कारणात् स आ दिवः प्रकाशत इति संबन्धः ॥

'श्रीणन्'शब्दं 'भुरण्यु'शब्दं च सायणमनुसृत्यैव वयं व्याचक्ष्महे । सत्स्वपि हि व्याख्यान्तरेषु नास्त्येकमपि तेषां निर्विवादम् ॥

दुसऱ्या चरणांत एक अक्षर अधिक आहेसें दिसतें. म्हणून आम्हीं दाखविल्याप्रमाणें म्हटलें नाहीं तर निर्वाह दिसत नाहीं. बोलेन्सन हे शार्मण्य पंडित 'उत प्रजासु प्रसूषु अन्तः' असा पाठ असावा अशी इच्छा करितात. कसें असलें तरी हा द्वितीय पाद कठिण आहे.

सूक्त ६८.

ऋषि– **पराशर** (पूर्वसूक्ताचा जो कर्ता तोच). देवता– **अग्नि.** वृत्त– **द्विपदा विराट्.**

१. हविर्वाहक [अग्नि] हविरन्नें मिश्र करीत करीत द्युलोकाकडेस जातो; [आणि] स्थावर [आणि] जंगम पदार्थ रात्रीच्या वेळीं दृष्टीस पाडितो. कारण कीं त्या एकट्या देवाधिदेव [अग्नी]च्या आंगीं त्या सर्व पदार्थांचें मोठेपण एकत्र झालेलें आहे.

HYMN 68.

To *Agni*. By *Parās'ara* (author of the previous hymn). Metre—*Dvipadā Virāṭ*.

1. Cooking [the oblation], the carrier [of the oblation] touches heaven, and makes visible at night that which stands [and] that which moves: since he the god of the gods singly combines [in himself] the greatnesses of all this universe.

---

१. 'अग्नि हा लहानसें विस्तवाचें स्वरूप धारण जरी करून मनुष्यांनीं देवांस अर्पावयाचें हवि भांड्यांत शिजवावयाचें काम करितो, तथापि तो सकळ देवांत मोठा देव असल्यामुळें आणि स्थावरजंगमरूप सकल विश्वाचें माहात्म्य त्याच्या एकट्याच्या आंगीं असल्यामुळें तो स्वर्गापर्यंत प्रकाशतो, आणि जेथें रात्र असेल तेथें प्रकाश पाडून सकल स्थावरजंगमरूप जग दृष्टिगोचर करितो.' म्हणजे, आकाशाच्या माथ्यापर्यंत पोंहचणारें जें सूर्यरूपी तेज तो अग्नीच समजावयाचा आहे. याप्रमाणें अग्नीचें जें मोठें आणि भौतिकव्यतिरिक्त स्वरूप तें यांत जाणविलें आहे असें आम्हांस वाटतें.

'हविरन्नें मिश्र करीत करीत '= 'श्रीणन्.' हा अर्थ आम्हीं सायणानुसारें केला आहे. चुलींत घातलेला अग्नि हविरन्नें मिश्र करितो म्हणजे वेगवेगळे दुग्धादिक पदार्थ मिश्र करून शिजावयाला ठेविलेले असतात ते शिजवितो असें तात्पर्य.

'रात्रीच्या वेळीं '=' अक्तून्.' म्हणजे विजेच्या अथवा नक्षत्रांच्या प्रकाशरूपानें; अथवा रात्रीसारिखा आंधार असतांहि, इतकाच अर्थ होऊं शकेल.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटला पाहिजेः–

श्रीणन्नुप स्थाद्दिवं भुरण्युः
स्थातुश्चरथम् अक्तून् वि ऊर्णोत् ।
परि यदेषामेको विश्वेषां
भुवद्देवो देवानां महित्वा ॥

आदित्ते विश्वे क्रतुं जुषन्त शुष्काद्यद्देव जीवो जनिष्ठाः ।
भजन्त विश्वे देवत्वं नाम ऋतं सपन्तो अमृतमेवैः ॥ २ ॥

आत् । इत् । ते । विश्वे । क्रतुम् । जुषन्त । शुष्कात् । यत् । देव । जीवः । जनिष्ठाः ।
भजन्त । विश्वे । देवऽत्वम् । नाम । ऋतम् । सपन्तः । अमृतम् । एवैः ॥ २ ॥

भाषायाम्.

२. हे देव [अग्ने], यद् (=यदा) शुष्कात् (=नीरसाद् अरणिरूपात्काष्ठात्) जीवः (=जीवन्) [त्वं] जनिष्ठाः (=प्रादुरभूः) आद् इत् (=तदानीमेव=तस्मात् कालात् प्रभृत्येव) विश्वे (=सर्वेपि पुरुषाः) ते (=तव) क्रतुं (=कर्म=त्वत्प्रीतिकरं कर्म) जुषन्त (=अजुषन्त=असेवन्त) । विश्वे (=सर्वे) [च] एवैः (=स्वकर्मभिः=यज्ञस्तोत्ररूपैः) ऋतं (=सत्यम्) अमृतं (=मरणरहितं) [त्वां] सपन्तः (=परिचरन्तः सन्तः) देवत्वं नाम (=देव इति नाम) भजन्त (=अभजन्त=प्राप्नुवन्) ॥

यदा त्वं मनुष्येषु प्रथमतः निर्जीवकाष्ठात् जीवः सन् प्रादुरभूस्तदाप्रभृत्येव सर्वेपि त्वदुपासनायां निरता भूताः सन्ति तथा भूत्वा च स्वकर्मभिः सत्यरूपं मरणरहितं च त्वामुपासाना देवत्वं प्राप्ता इति तव महिमेति भावः ॥

'एवैः' शब्दस्य शार्मण्यपण्डितवर्या ग्रास्मानप्रभृतयो यथाप्रचारमिति व्याख्यानं कुर्वन्ति । यत्र यत्र पुनः स शब्दो वर्तते तत्र तत्र मन्त्रेषु सोर्थो न युज्यत इति भाति । अपि च सायणेन भारतवर्षीयव्याख्यात्रन्तरैर्वा सोर्थो नैव दृष्टोस्तीति कृत्वा सांप्रतं सायणानुसरणमेव वरं प्रतिभाति ॥

२. हे देवा [अग्नी], जेव्हां [निर्जीव] [आणि] शुष्क [काष्ठा]पासून सजीव [तूं] जन्मलास, तेव्हांपासूनच सकळ [लोक] तुझी उपासना करूं लागले. [आणि] सत्यरूप [आणि] मरणरहित [जो तूं त्या तु]ला [आपल्या] कर्मांनीं भजून [ते] सकळ [लोक] देवत्वाप्रत पावले.

2. From thence forward all followed thy worship, when thou, O god [Agni], wast born living from the dry [and lifeless] wood. And all serving thee, the true [and] the immortal, with their actions attained to godhead.

---

२. भावार्थः–' हे अग्नी देवा, तूं जेव्हां निर्जीव आणि शुष्क अशा लांकडाच्या तुकड्यापासून (म्हणजे अरणीपासून) सजीव असा जन्मलास आणि तेणेंकरून आपली अचाट शक्ति लोकांत प्रगट केलीस, तेव्हांपासून सकल लोक तुझी सेवा करूं लागले. आणि सत्यरूप आणि मरणरहित असा जो तूं त्याची सेवा आपल्या यज्ञादि कर्मांनीं ज्यांनीं ज्यांनीं केली ते सर्व लोक देवत्वाप्रत पावले,' असा तुझा महिमा आहे.

' शुष्क आणि निर्जीव काष्ठापासून सजीव तूं जन्मलास.' म्हणजे जसा एकादा साधु अथवा स्थानिक अथवा ग्राम्य देव नवीन प्रचारांत येऊं लागला म्हणजे लोकांचा विश्वास बसावा म्हणून भिंतीला चालविणें, ऋणग्रस्त उपासकाचें ऋण त्याला नकळत देऊन टाकणें, अथवा लहानशा एका थाळींत अन्नाचें एक शीत असलें तरी त्यावर असंख्यात मनुष्यांची भूक निववीणें इत्यादि चमत्कार करून दाखवितो, तसा निर्जीव वस्तूपासून सजीव वस्तु उत्पन्न होणें हा जो अग्नीनें पराक्रम करून दाखविला, तेव्हांपासून अग्नीच्या श्रेष्ठत्वाविषयीं लोकांची खात्री झाली आणि त्या दिवसापासून अग्नीच्या उपासनेंत सर्व लोक निमग्न झाले असें कवीचें हृद्ग आहे.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावयाचा आहेः–

आदित्तें विश्वे क्रतुं जुषन्त
शुष्काद्यद्देव जीवो जनिष्ठाः ।
भजन्त विश्वे देवत्वं नाम
ऋतं सपन्तो अमृतमेवैः ॥

ऋतस्य प्रेषा ऋतस्य धीतिर्विश्वायुर्विश्वे अपांसि चक्रुः ।
यस्तुभ्यं दाशाद्यो वा ते शिक्षात्तस्मै चिकित्वान्रयिं दयस्व ॥३॥

ऋतस्य । प्रेषाः । ऋतस्य । धीतिः । विश्वऽआयुः । विश्वे । अपांसि । चक्रुः ।

यः । तुभ्यम् । दाशात् । यः । वा । ते । शिक्षात् । तस्मै । चिकित्वान् । रयिम् । दयस्व ॥ ३ ॥

होता निषत्तो मनोरपत्ये स चिन्न्वासां पती रयीणाम् ।
इच्छन्त रेतो मिथस्तनूषु सं जानत स्वैर्दक्षैरमूराः ॥ ४ ॥

होता । निऽसत्तः । मनोः । अपत्ये । सः । चित् । नु । आसाम् । पतिः । रयीणाम् ।

इच्छन्त । रेतः । मिथः । तनूषु । सम् । जानत । स्वैः । दक्षैः । अमूराः ॥ ४ ॥

भाषायाम्.

३. प्रेषाः (=स्तुतयः) ऋतस्य (=सत्यरूपस्याग्नेः) [वर्तन्ते], धीतिः (=यागः) ऋतस्य (=सत्यरूपस्याग्नेः) [वर्तते]। [ऋतः=सत्यरूपोऽग्निः] विश्वायुः (=सर्वव्यापी) [भवति]। [तस्मा एव] विश्वे (=सर्वेपि) अपांसि (=यज्ञयागादीनि स्तोत्ररूपाणि च कर्माणि) चक्रुः (=कुर्वन्ति)। [तस्मात् हे अग्ने], यः [पुरुषः] तुभ्यं दाशात् (=हविर्दद्यात्) यो वा ते शिक्षात् (=त्वदीयं कर्म कर्तुं शक्तो भूयासमितोच्छेत्) चिकित्वान् (=तस्योपासनां बुद्धवान्) [त्वं] तस्मै रयिं दयस्व (=धनं प्रयच्छ)॥

४. [अग्निः] मनोरपत्ये (=प्रजापतेर्मनोः प्रजासु मानुषीरूपासु) होता (=देवानामाह्वाता) [भूत्वा] निषत्तः (=निषण्णः=स्थापितोस्ति)। स चित् नु (=स एव खलु) आसां (=पुरो दृश्यमानानां=सर्वासां) [रयीणां=संपदां] पतिः (=स्वामी) [भवति]। [ता रायस्] तनूषु (=स्वशरीरेषु=आत्मनि) मिथो रेत इच्छन्त (=अग्निरूपपतिना सह सङ्गेन संसृष्टं रेत ऐच्छन्=अग्निरेतोनुग्रहेण आत्मने पुत्रानैच्छन्)। [तदनन्तरं लब्धपुत्रास्ता] अमूराः (=अमूढा) [रायः] स्वैर्दक्षैः (=स्वकीयैर्बलवद्भिः पुत्रैः सह) सं जानत (=समजानत=संमनसो भूत्वा चिरकालमजीवन्)॥

३. सत्यरूप [अग्नी]प्रीत्यर्थ स्तोत्रें [गातात], सत्यरूप [अग्नी]-प्रीत्यर्थ यज्ञ [करितात]. [असा जो] सर्वव्यापी [अग्नि त्याप्रीत्यर्थ-च] सकळ लोक सत्कर्मे करितात. [तर हे अग्नी], जो [कोण] तुला हवि देईल अथवा जो [कोण] तुझ्या उपासनेची इच्छा करील त्याला [त्याची उपासना] जाणून तूं संपत्ति दे.

४. [तो] मानवांच्या घरीं होता [होऊन] बसला [आहे]. तोच सकल संपत्तींचा पति [होय]. [सकल संपत्तींला] [अग्नीचा] संग आपणास घडावा अशी इच्छा झाली. [आणि नंतर] [त्या] प्रौढ [संपत्ति] आपल्या बलवान [पुत्रां]शीं सुखानें राहिल्या.

3. Of truthful [Agni] [are] hymns [chanted], to truthful [Agni] [is] sacrifice [offered]. [He is] omnipresent. [For him] all perform actions.—He that shall give thee the oblation, or he that shall desire to serve thee, to him, O Agni, mayest thou give wealth after knowing [him].

4. [He is] established [as] the invoker among the posterity of Manu. He [is] the lord of [all] these riches. [The riches] desired to become pregnant by him. The intelligent [riches] lived in happiness with their own valiant [sons].

---

३. 'जें जें म्हणून स्तोत्र गातात तें अग्नीचेंच गातात, तें सत्यरूप अग्नीचेंच गातात. जी जी म्हणून उपासना होते ती अग्नीचीच होत असते. तर असा जो सर्वव्यापक अग्नि त्याप्रीत्यर्थच सर्व लोक यज्ञादि सत्कर्मे करीत आले आहेत. यास्तव हे अग्नी, जो तुला भजून हवि देईल अथवा जो तुझा भक्त होऊं इच्छील त्याची तूं उपासना जाणून घेऊन त्याला संपत्ति देत जा.'

हा मंत्र खालीं लिहिल्याप्रमाणें म्हटला पाहिजेः—

ऋतस्यँ प्रेषा ऋतस्य धीतिः
विश्वायुँर्विश्वे अपांसि चक्रुः ।
यस्तुभ्यँ दाशाद्यो वा तेँ शिक्षात्
तस्मैँ चिकित्वान् रयिं दयस्व ॥

४. पहिल्या अर्धाचा भावार्थ असा आहे कीं, 'अग्नि मानवी प्रजांचे घरीं होतृत्व स्वीकारून राहिला आहे. आणि अग्नीच सकल संपत्तींचा पति होय.' उत्तरार्ध स्पष्ट नाहीं. परंतु आम्हांस जो त्याचा अर्थ दिसतो तो असाः— 'अग्नि हा सकळ संपत्तींचा पति म्हणून सांगितलें, तर तो त्यांस आपल्या अधि-

पितुर्न पुत्राः क्रतुं जुषन्त श्रोषन्ये अस्य शासं तुरासः ।
वि राय और्णोद्दुरः पुरुक्षुः पिपेश नाकं स्तृभिर्दमूनाः ॥५॥१२॥

पितुः । न । पुत्राः । क्रतुम् । जुषन्त । श्रोषन् । ये । अस्य । शासम् । तुरासः ।
वि । रायः । और्णोत् । दुरः । पुरुऽक्षुः । पिपेश । नाकम् । स्तृऽभिः । दमूनाः ॥ ९ ॥ १२ ॥

अस्या ऋच उत्तरार्धस्य दुर्बोधत्वमनिवार्यम् । अग्निः सकलसंपदां पतिर्भूत्वा तासु पुत्रान् जनयति ताश्च तस्मात् लब्धपुत्रपौत्रादिका अग्नेः समीपे वसन्ति । एतावता न केवलमग्निः संपदां पतिः अपि तु तासां प्रवर्धयिता भवतीत्युक्तं भवति ॥ सायणेनेयमृगेवं व्याख्याता । हे अग्ने त्वं मनोरपत्ये यजमानस्वरूपायां प्रजायां होता देवानामाह्वाता सन् निषत्तो निषण्णः । मानव्यो हि प्रजा इति हि ब्राह्मणम् । स चित्रु स एव त्वमासां प्रजानां रयीणां गवादीनां धनानामपि पतिः स्वामी । अतस्ताः प्रजास्तनूष्वात्मीयेषु शरीरेषु मिथः संसृष्टमेकीभूतं पुत्ररूपेण परिणतं रेतो वीर्यमिच्छन्त । ऐच्छन् । त्वदनुग्रहेण पुत्रमलभन्तेति यावत् । लब्धपुत्राश्च ताः प्रजा अमूरा अमूढाः सत्यः स्वैः स्वकीयैर्दक्षैः समर्थैः पुत्रैः सह संजानत सम्यग् अवगच्छन्ति चिरकालं जीवन्तीत्यर्थः । यद्वा दक्षशब्दः प्राणवाची । प्राणो वा दक्षोपानः क्रतुरिति श्रुतेः । स्वैर्दक्षैः स्वकीयैः प्राणैरमूराः संगतास्त्वय्येव सर्वं जानन्तीति ॥

भाषायाम्.

५. ये [पुरुषा] अस्य (=अग्नेः) शासं (=शासनं) तुरासः (=तुराः=त्वरया सहिताः=सत्वरं यथा तथा) श्रोषन् (=श्रोतुं कर्तुमिच्छन्ति) [ते], पितुः पुत्रा न (=यथा पितुः प्रीत्यर्थं पुत्राः कर्माणि कुर्वन्ति तद्वत्), [अस्य प्रीत्यर्थं] क्रतुं (=कर्म यज्ञादिकं) जुषन्त (=सेवन्ते=नित्यं कुर्वन्ति)। पुरुक्षुः (=बह्वन्नः) [स हि] [उपासकानामर्थे] रायो दुरः (=धनस्य द्वाराणि) वि और्णोत् (=अपावृणोत्= अपवृणोति=उद्घाटयति)। दमूनाः (="गृहे मनो यस्य सः"=उपासकगृहप्रियोऽग्निः) नाकं (=द्युलोकशिखरं) स्तृभिः (=नक्षत्रैः) पिपेश (=अलमकारयत्) ॥

अत्रेदमुक्तं भवति । येऽग्नेः शासनं कर्तुमिच्छन्ति ते तस्य प्रीतिकराणि यज्ञादिकानि कर्माणि कर्तुमर्हन्ति । ये च तथा कुर्वन्ति तेषामर्थे स धनभाण्डारस्य द्वाराणीवोद्घाट्य यथाकामं धनं ददाति । यथाकामधनदानं हि न द्युलोकस्य नक्षत्रैः शोभयितुरग्नेर्दुस्तरमिति ॥

५. जे [कोण] ह्याची आज्ञा त्वरित ऐकून घेऊं इच्छितात [ते] पित्याचें [काम] पुत्र [करितात] तसे [त्याजप्रीत्यर्थ] उपासनाकर्म करीत असतात. विपुलान्नपरिपूर्ण [अग्नि] [उपासकांसाठीं] संपत्तीचें दार उघडें टाकीत असतो. प्रियकर [अग्नी]नें आकाश नक्षत्रांनीं शोभविलें आहे.

5. [They] who would obey his command with alacrity perform actions [for him] even as sons for [their] father. The lord of food throws open the door of prosperity : [he] has ornamented the highest heaven with the stars.

कारांत केवळ ठेवून घेतो असें नाहीं, तर त्यांची संपत्ति आपण वाढवितो,– म्हणजे संपत्तींचा वाढविणाराहि तोच आहे. संपत्तींची त्याजकडून वृद्धि होते, पुनः त्या वृद्धीची आणखी वृद्धि होत जाते, याप्रमाणें संपत्ति उत्तरोत्तर अधिक अधिक होतात त्या अग्नीच्याच योगानें होत जातात,' तथापि अग्नीच्याच प्रसादेंकरून संपत्तींला पुत्रपौत्र होतात, आणि त्या आपणास अग्नीपासून प्राप्त झालेल्या पुत्रपौत्रांसह सुखानें राहतात असें रूपक करणें म्हणजे भाषालंकाराच्या मर्यादेचें किंचित् उल्लंघन झाल्याप्रमाणें दिसतें. सायणाचार्य सुद्धा या ऋचेच्या उत्तरार्धाचा अर्थ निश्चयानें एकच करीत नाहींत, आणि दोन अर्थ सांगतात. भाषा पहा.

'मानवांच्या घरीं '=' मनोरपत्ये.' अक्षरशः अर्थ, 'मनूच्या अपत्याच्या येथें.' मनुष्यांच्या आदिपुरुषास वेदांत मनु असें म्हणतात आणि मनूच्या पोटचीं लेकरें आम्ही आहोंत यास्तव आम्ही ' मानव ' होतों. सू. ३६, मं. १९ आणि त्याजवरील टीप पहा.

'सकल संपत्तींचा'='आसां रयीणाम्.' अक्षरशः अर्थ, ' ह्या संपत्तींचा,' म्हणजे ह्या ज्या संपत्ति जिकडे तिकडे दिसत आहेत त्यांचा; अर्थात् ' सर्व संपत्तींचा.'

' अग्नीचा संग आपणास घडावा अशी इच्छा झाली '=' तनूषु मिथो रेतः इच्छन्त.' अक्षरशः अर्थ, ' परस्पर रेत आपल्या शरीरांत [पडावें असें] इच्छित्या झाल्या.'

' आपल्या बलवान पुत्रांशीं सुखानें राहिल्या '=' सं जानत स्वैर्दक्षैः'. आम्हीं सायणानुसार भाषांतर केलें आहे. परंतु या चतुर्थ पादाविषयीं आम्हांस फार संशय आहे.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें समजावयाचीः–

होता निषत्तो मनोरपत्ये
स चिन्नु आसां पती रयीणाम् ।
इच्छन्त रेतो मिथस्तनूषु
सं जानत स्वैर्दक्षैरमूराः ॥

---

५. ' ज्यांला अग्नीची आज्ञा पाळावयाची, म्हणजे अग्नीचे अंकित अथवा भक्त होण्याची इच्छा असेल त्यांनीं, बापानें सांगितलेलें काम पुत्र करितात

सूक्तम् ६९.

शक्तिपुत्रः पराशर ऋषिः । अग्निर्देवता । द्विपदा विराट् छन्दः ।

शुक्रः शुशुक्वाँ उषो न जारः पप्रा समीची दिवो न ज्योतिः ।
परि प्रजातः क्रत्वा बभूथ भुवो देवानां पिता पुत्रः सन् ॥ १ ॥

शुक्रः । शुशुक्वान् । उषः । न । जारः । पप्रा । समीची इति सम्ऽईची ।
दिवः । न । ज्योतिः ।
परि । प्रऽजातः । क्रत्वा । बभूथ । भुवः । देवानाम् । पिता । पुत्रः ।
सन् ॥ १ ॥

भाषायाम्.

१. उषो न जारः (=उषसो जार इव=बालसूर्यवत्) शुक्रः (=शुभ्रवर्णः) [अथवा] दिवो न ज्योतिः (=द्युलोकस्य ज्योतिर्दीपः सूर्य इव=द्युलोकस्थितप्रखरतेजस्कसूर्यवत्) शुशुक्वान् (=परमदीप्तिमान्) [अग्निः] समीची (=समीच्यौ=परस्परं संगते द्यावापृथिव्यौ) [स्वप्रकाशेन] पप्रा (=पप्रौ=पूरयति)। -[हे अग्ने], प्रजातः (=प्रकर्षेण जात एव सन्) [त्वं] क्रत्वा (=तव प्रज्ञया) परि बभूथ (=सकलं परितो व्याप्तवान्=जितवानसि) [तेन च] देवानां पुत्रः सन् (=सूनुः सन्नपि) [तेषां] पिता भुवः (=अभवः)॥

बालसूर्यस्य कान्त्या तथा मध्याह्नगतसूर्यस्य प्रखरया कान्त्या युक्तोऽग्निर्द्यावापृथिव्यौ स्वतेजसा पूरयति । ज्ञातमात्रश्च स्वप्रज्ञया विश्वं पर्यभवत् अपि च देवानां दूतो भूत्वा हविर्भिस्तेषां पितेव पालकोऽभवदिति भावगतम् ॥

सायणस्तु । दीव्यन्तीति देवा ऋत्विजः । तेषां पुत्रः सन् * * * पिता पालयिता भवसि । यद्वा देवानामिन्द्रादीनामेव पुत्रः सन् पुत्र इव दूतो भूत्वा पिता हविर्भिः पालयिता भवसीति ॥

आणि बापाचें मन प्रसन्न करितात त्याप्रमाणें, अग्नीप्रीत्यर्थ यज्ञादिक सत्कर्में करावीं. आणि जे कोण तसें करितील त्यांस तो त्यांचे इच्छेस येईल तितकें धन देऊन सुखी करितो. आणि असें करणें त्याला कांहीं कठिण नाहीं, कारण त्याची शक्ति आणि दानबुद्धि इतकी मोठी आहे कीं, त्याणें सगळ्या द्युलोकाला नक्षत्रांनीं जडून सुशोभित केलें आहे.'

'ऐकून घेऊं इच्छितात'=' श्रोषन्.' म्हणजे त्याचे अंकित होऊं इच्छितात. 'इच्छितात' हा अर्थ, लेट्चें रूप 'श्रोषन्' हें क्रियापद आहे म्हणून निष्पन्न होतो.

सूक्त ६९.

ऋषि–शक्तीचा पुत्र पराशर (पूर्वसूक्ताचा जो तोच). देवता–अग्नि. वृत्त– द्विपदा विराट्.

१. उषेच्या जारासारिखा शुभ्र [आणि] द्युलोकाच्या ज्योतीसारिखा परम देदीप्यमान [अग्नि] [आपल्या तेजानें] पृथिवी आणि द्युलोक यांस भरून टाकितो. [तर] [हे अग्नी], [तूं] जन्मतांच [आपल्या] प्रज्ञेनें [सकल जग] जिंकिता झालास, [आणि] [तूं] देवांचा पुत्र असतांहि [त्यांचा] पिता झालास.

HYMN 69.

To *Agni*. By *Parâs'ara* son of *S'akti* (same as the author of the previous hymn). Metre—*Dvipadâ Virâṭ*.

1. Bright like the lover of Ushas, [and] resplendent like the light of Heaven, [Agni] has filled Earth and Heaven [with his brightness].—[No sooner] born [than], [O Agni], thou didst surpass [the universe] with [thy] wisdom : being the son of the Gods, [thou] becamest [their] father.

'दार उघडें टाकीत असतो.' म्हणजे पाहिजे असेल तितकें घ्या असें म्हणून भांडाराचें दारच जणुं उघडें टाकितो कीं काय.

'अग्नीनें आकाश नक्षत्रांनीं शोभविलें आहे'='पिपेश नाकं स्तृभिः.' द्युलोकास नक्षत्रांनीं शोभविलें आहे असें म्हणणें म्हणजे तसें करणाऱ्याला परम शक्ति आणि औदार्य हीं आहेत असें सांगावयाचें आहे. ऋ. १०. ६८. ११ यांत देव मोत्यांनीं काळ्या शिंगरास सजविल्याप्रमाणें द्युलोकाला नक्षत्रांनीं शोभविते झाले (अभि श्यावं न कृशनेभिः अश्वं नक्षत्रेभिः द्याम् अपिंशन्) असें म्हटलें आहे.

मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावा लागतोः–

पितुर्न पुत्राः क्रतुं जुषन्त
श्रोषन्ये अस्य शॉसं तुरासः ।
वि राय और्णोद्दुरः पुरुक्षुः
पिपेश नाकं स्तृभिर्दमूनाः ॥

---

१. 'एकादे स्त्रियेचा जार जसा तिच्या मागून जातो तसा प्रभातकाळीं उषेच्या मागून उगवून तिचे मागून आकाशांत चालणारा जो सूर्य त्याच्या कांतीप्रमाणें शुभ्रकांतिमान् अथवा मध्यान्हेला आकाशमध्यावर चढून जिकडे तिकडे महाप्रकाश पसरणारा जो सूर्य त्याजप्रमाणें अतिप्रखर तेजानें परिपूर्ण

वेधा अदृप्तो अग्निर्विजानन्नूधर्न गोनां स्वाद्मा पितूनाम् ।
जने न शेव आहूर्यः सन्मध्ये निषत्तो रण्वो दुरोणे ॥ २ ॥

वेधाः । अदृप्तः । अग्निः । विऽजानन् । ऊधः । न । गोनाम् । स्वाद्म । पितूनाम् ।
जने । न । शेवः । आऽहूर्यः । सन् । मध्ये । निऽसत्तः । रण्वः । दुरोणे ॥ २ ॥

भाषायाम्.

२. अग्निः वेधाः (=मेधावी) [सन्नपि] अदृप्तः (=दर्परहितो) विजानन् (=प्रज्ञावान्) [च] [भवति]। [तथा] गोनाम् ऊधर्न (=गवामूधरिव) पितूनाम् (=अन्नानां) स्वाद्मा (=स्वादयिता) [भवति]। [अपि च] जने (=लोके) आहूर्यो न (=आह्वातव्योतिथिरिव) शेवः (=सुखकरः) सन् दुरोणे मध्ये (=गृहमध्ये) रण्वो निषत्तः (=रमयिता निषीदति=निषद्य गृहस्थान् जनान् रमयति) ॥

अग्नि आपल्या तेजानें भूलोक आणि द्युलोक यांस भरून टाकीत असतो.– हे अग्नी, तूं जन्मतांच आपल्या महाप्रज्ञेनें सकळ विश्व जिंकून टाकिलेंस आणि देवांचा पुत्र असतांहि त्यांचा पिताच जणुं झालास.'

'उषेच्या जारासारिखा.' बालसूर्याला उषेचा जार असें वेदांत पुष्कळ स्थळीं म्हटलें आहे. कारण कीं, जसा जार आपल्या प्रियेच्या मागून जातो तसा बालसूर्य उषेच्या मागून नेहमीं उगवतो.

'देवांचा पुत्र असतांहि [त्यांचा] पिता झालास'='भुवो देवानां पिता पुत्रः सन्.' म्हणजे देवांचा दूत असून त्यांस हवि खावयास देऊन त्यांचा पिता झालास.

ह्या ऋचेचा विनियोग आमचे उपाध्ये जन ग्रहमखांत म्हणजे राहु, केतु इत्यादि ग्रह अनिष्ट होऊं नयेत म्हणून जें एक विशेष कर्म आचरितात त्यांत शुक्र या ग्रहाच्या संबंधानें म्हणजे शुक्र या ग्रहाचें आह्वान करण्याकडे, शुक्राच्या नांवानें होम करण्याकडे आणि बलि देण्याकडे करितात. पण शुक्रग्रहाशीं या मंत्राचा संबंध कांहीं नाहीं, मात्र यांत 'शुक्र' हा शब्द आला आहे; पण त्याचा अर्थ वेगळा असून तें अग्नीचें विशेषण आहे. तेव्हां हा मंत्र म्हणून शुक्राची सुप्रसन्नता संपादन करण्याकरितां ब्राह्मणांला सोनें, रुपें, हिरे, तांदुळ, श्वेताश्व, तूप, सुंदर वस्त्रें, पांढरीं पुष्पें इत्यादि दानें दिलीं तरी कांहीं गुण येत नाहीं तर नवल नाहीं. विशेष कांहीं विचार या आमच्या नित्यनैमित्तिक कर्माविषयीं न केला तरी खंडोबाचा

२. अग्नि [हा] प्रज्ञावान् निगर्वी, ज्ञानी [आणि] गाईच्या कासेप्रमाणें पेयरसानें भरलेला होय. [तो] जनांत आनंदकारी पाहुण्याप्रमाणें असून घराच्या मध्यभागीं [सर्वांस] हर्ष करीत करीत बसलेला असतो.

2. Agni [is] wise, free from pride, [and] knowing. [He is] the essence of beverages like the udder of cows. Being like an agreeable guest among men [he] sits in the middle of the house, delighting all.

धांवा केला तर म्हसोबा हाक ऐकून येणार नाहीं इतक्याचा तरी विचार आमच्या कर्मठ लोकांनीं करणें अवश्य आहे.

हा मंत्र खालीं लिहिल्याप्रमाणें म्हणावा लागतोः—

शुक्रः शुशुक्वान् उषो न जारः
पप्रा समीची दिवो नॅ ज्योतिः॰।
परि प्रजातः क्रत्वा बभूथ
भुवो दॅवानां पिता पुॅत्रः सन् ॥

---

२. ‘ अग्नि प्रज्ञावान् आणि ज्ञानसंपन्न असतांहि निगर्वी आहे. आणि जशी गाईची कास मिष्ट दुधानें भरलेली असते तसा अग्नि जणुं सर्व रसांच्या अर्कानें भरलेला आहे. असा जो अग्नि तो एकाद्या प्रिय पाहुण्यासारिखा लोकांचे घरीं राहतो, आणि आपल्या माधुर्यानें सर्वांस हर्ष करणारा होत्साता यज्ञशाळेच्या मध्यें होता होऊन बसतो.’

‘ निगर्वी ’=‘ अदृप्तः ’. म्हणजे प्रज्ञावान् आणि ज्ञानी असतांहि त्याला गर्व नाहीं, आणि तो पाहिजे त्याला सुगम आहे. त्याजवळ पाहिजे तो जाऊन प्रार्थना करूं शकतो.

‘ गाईच्या कासेप्रमाणें पेयरसानें भरलेला ’=‘ ऊधर्न गोनां स्वाद्मा पितूनाम्.’ म्हणजे गाईच्या कासेंत जसें मिष्ट दुधाचें सार भरलेलें असतें त्याप्रमाणें सर्व रसांचें तत्त्व अग्नीच्या आंगीं भरलेलें आहे. कारण कीं तो सकल रसांस पक्व करून म्हणजे शिजवून त्यांस रुचि आणितो. हा भावार्थ सायणांनीं दिला आहे. परंतु ही उपमा कांहींशी दुर्बोध आहे यांत संशय नाहीं.

ही ऋचा याप्रमाणें म्हटली पाहिजेः—

वेधा अदृप्तो अॅग्निर्विजानन्
ऊधर्न गोनां स्वॉद्मा पितूनाम् ।
जने न शेवः ऑहूरिअः सन्
मध्ये निषत्तो रॅण्वो दुरोणे ॥

या मंत्रावरून आणि दुसऱ्या मंत्रांवरूनहि या द्विपदा विराट् वृत्तांतील प्रत्येक पादांतील साहावें अक्षर दीर्घ वाचावयाचें असेल असें दिसून येतें. पुरातनकाळीं दीर्घ अथवा ह्रस्व यांतून

पुत्रो न जातो रण्वो दुरोणे वाजी न प्रीतो विशो वि तारीत् ।
विशो यदह्वे नृभिः सनीळा अग्निर्देवत्वा विश्वान्यश्याः ॥ ३ ॥

पुत्रः । न । जातः । रण्वः । दुरोणे । वाजी । न । प्रीतः । विशः । वि । तारीत् ।
विशः । यत् । अह्वे । नृऽभिः । सऽनीळाः । अग्निः । देवऽत्वा । विश्वानि । अश्याः ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. [अयमग्निः] जातः पुत्रो न (=औरसः पुत्र इव) दुरोणे (=गृहे) रण्वः (=रमयिता) [भवति] [युद्धे तु] प्रीतो वाजी न (=हर्षयुक्तो रणाश्व इव) विशो वि तारीत् (=शत्रुजनान् विशेषेण तरति=अतिक्रामति) । [अपि च] यद् (=यदा) नृभिः (=ऋत्विग्भिः सह) [अहं] सनीळा विशः (=सहवासिनीर्दैवीः प्रजाः= समस्तान् देवान्) अह्वे (=आह्वयामि), [तदा] अग्निः विश्वानि देवत्वा (=सर्वाणि देवत्वानि=सर्वेषां देवानां स्वरूपाणि) अश्याः (=प्राप्नोति) ॥

अत्रेदमुक्तं भवति । अग्निरुपासकानां गृहे वसन् औरसः पुत्र इव सुखकरो भवति रणे च हर्षयुक्तोश्व इव शत्रुजनानाक्रमति । एवमुभयत्रापि भद्रः । विश्वरूपश्चाग्निः । यदा ह्यहमृत्विग्भिः सहितो भूत्वा नाना देवानाह्वयामि तदा सर्वेषां देवानां स्थले स एवागच्छतीति ॥

कोणतें तरी म्हटल्यास चालत असे असें वाटतें. आधुनिककाळीं या वृत्ताच्या बरोबरीचें श्लोकवृत्त विशेष प्रसिद्ध नाहीं, पण वाचतांना साहावें अक्षर ह्रस्व जसें चालतें तसेंच दीर्घहि चालतें असें म्हटलें पाहिजे.

३. [अग्नि] घरीं पोटच्या मुलाप्रमाणें आनंदकारक [आहे] [आणि] [युद्धांत] हर्षयुक्त वारूप्रमाणें शत्रुजनांला जेर करितो. मी जेव्हां दुसऱ्या उपासकांबरोबर समस्त देवलोकांस बोलावितों [तेव्हां] [एकटा] अग्नि[च] सर्व देवांचें रूप घेतो.

3. In the house, agreeable like one's own son, [Agni] vanquishes the enemy [in battle] like a friendly warhorse. When I, with the priests, invoke all the divine race, Agni alone becomes all the Gods.

---

३. 'उपासकांच्या घरीं पाहिला तर अग्नि एकाद्या औरस पुत्राप्रमाणें आनंदकारक आणि सुखकारक असतो. आणि युद्धाचा प्रसंग आला म्हणजे तोच एकाद्या उत्तम घोड्याप्रमाणें शत्रुजनांला आक्रमून टाकितो आणि उपासकांस साहाय्य करितो. आणि अग्नीचें विश्वरूपत्व तर असें आहे कीं, मी आपल्या ऋत्विजांबरोबर मिळून वेगवेगळ्या अनेक देवांचें आह्वान करितों तेव्हां त्या सर्वांच्या स्थळीं एकटा अग्नीच येतो; म्हणजे अग्नि हा सर्व देवांचें रूपच जणुं घेऊन येत असतो.'

'हर्षयुक्त वारूप्रमाणें '=' वाजी न प्रीतः.' म्हणजे शत्रूंला जिंकण्याची ज्याला आशा आहे आणि त्यामुळें ज्याच्या आंगीं आवेश आलेला आहे अशा घोड्याप्रमाणें, असा भावार्थ दिसतो. 'हर्षयुक्त' हें भाषांतर सायणांस अनुसरून केलें आहे. सू. ६६, मं. २ पहा.

या मंत्रांत 'शत्रुजनांस' याऐवजीं आणि 'देवलोकांस' याच्या ऐवजीं एकच 'विशः' हा शब्द दोनदां आला आहे. याचे हे दोन्ही अर्थ अन्वयसंदर्भानें होत असतात. यास्तव केवळ शब्दविरोधालंकारासाठीं एकच शब्दाचा प्रयोग केला आहे असें दिसतें. याच सूक्ताच्या १ल्या मंत्रांत तरी 'पिता पुत्रः सन्' या शब्दांनीं विरोधालंकार दर्शविला आहे. दुसऱ्या मंत्रांत 'वेधा अदृप्तः' या शब्दांवरून 'विरोधालंकार' केला आहे. चवथ्या मंत्रांत तरी 'नृभ्यः' (=उपासक) आणि 'नृभिः' (=मरुत्) असा एकच शब्दाचा दोन अर्थी दोनदा प्रयोग केला आहे तो विरोधालंकारासाठींच केला आहे.

या मंत्राची वृत्तरचना खालीं लिहिल्याप्रमाणें समजावयाची आहेः—

पुत्रो न जातो रॅण्वो दुरोणे
वाजी नॅ प्रीतो विशो वि तारीत् ।
विशो यदह्वे नृभिः सनीळा
अग्निर्देवत्वा विॅश्वानि अश्याः ॥

तथापि म्हणतांना वैदिक युगांत 'रण्वो' आणि 'विश्वानि' हे शब्द

नकिष्ट एता व्रता मिनन्ति नृभ्यो यदेभ्यः श्रुष्टिं चकर्थ ।
तत्तु ते दंसो यदहन्त्समानैर्नृभिर्यद्युक्तो विवे रपांसि ॥ ४ ॥

नकिः । ते । एता । व्रता । मिनन्ति । नृऽभ्यः । यत् । एभ्यः । श्रुष्टिम् ।
चकर्थ ।
तत् । तु । ते । दंसः । यत् । अहन् । समानैः । नृऽभिः । यत् ।
युक्तः । विवेः । रपांसि ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. [हे इन्द्र], ते (=तव) एता (=एतानि) व्रता (=व्रतानि=त्वत्प्रीत्यर्थं कर्तव्यानि यज्ञयागादीनि कर्माणि) नकिः मिनन्ति (=केपि न हिंसन्ति), यद् (=यस्मात् कारणात्) [त्वम्] एभ्यो नृभ्यः (=एतेभ्यो दृश्यमानेभ्य ऋत्विग्भ्यः= सर्वेभ्योप्युपासकेभ्यः) श्रुष्टिं (=सुखं) चकर्थ (=करोषि)। [हे अग्ने], यत्तु (=यद्धि) [त्वं] समानैः (=मित्रभूतैः) नृभिः (=शौर्योपेतैर्मरुद्भिः) युक्तः (=सहितः) [सन्] रपांसि (=हिंसकान्) अहन् (=हतवानसि) यत् (=यच्च) [तानि] विवेः (=गमितवानसि) तत् दंसः (=तच्छौर्योपेतं कर्म) ते (=तवैव) ॥
अत्रेदमुक्तम् । हे अग्ने, त्वत्प्रीत्यर्थं यानि कर्माण्युपासकाः कुर्वन्ति तानि केपि न हिंसन्ति । अत एव त्वं सर्वेभ्यस्तवोपासकेभ्यः सुखं करोषि । तव बलाद्भीत्वा हिंसका न हिंसन्तीति यावत् । यच्च मरुद्भिः सह सहायैस्त्वमार्याणां शत्रूनहन् स तवैव पराक्रमः अन्ये तथा कर्तुं न समर्था इति ॥

'रॅण्वो' आणि 'विॅश्वानि' असेच म्हटले असतील असें नाहीं. तर आलीकडील काळांत या वृत्तावर श्लोक रचिल्यास मात्र कदाचित् तसे म्हणावे लागतील. वैदिक युगांत ह्रस्व किंवा दीर्घ म्हटल्यास दोनी चाललीं असतीं असें कितीएक मंत्रांचा विचार केल्यास समजेल. पूर्वमंत्रावरील टीप पहा.

४. [हे अग्नी], तुझ्या कोणत्याहि कर्मांचा विध्वंस करणारा कोणी नाहीं. कारण कीं [तूं] सकळ उपासकांला सुख प्राप्त करून देतोस. [हे अग्नी], [तूं] जो [आपले] मित्र मरुत् यांशीं मिळून राक्षसांला हाकून देता झालास आणि मारून टाकिता झालास तो तुझाच पराक्रम [होय].

4. None violates any of thy ordinances, since thou causeest happiness to all thy worshippers. That indeed [is] thine exploit that thou didst kill, that thou didst rout the injurers in company of the valiant Maruts [thy] allies.

---

४. ‘ हे अग्नी, तुजप्रीत्यर्थ जीं यज्ञयागादिक कर्मे उपासक लोक करितात त्यांला कोणीहि विघ्न आणूं शकत नाहीं. तूं निःशत्रु आहेस. यास्तवच तुजप्रीत्यर्थ करावयाचीं सकळ कर्मे शेवटास जातात, आणि तूं उपासकांला सुख प्राप्त करून देतोस. मरुतांसह जाऊन आर्यजनांच्या विघ्नकारी अनार्यादि द्वेष्टे लोकांस मारून नाहींसे जे केले ते तूं म्हणूनच केलेस, इतरांचे हातून तें महत् कार्य झालें नसतें. ’

‘सकळ उपासकांस’=‘ एभ्यो नृभ्यः.’ अक्षरशः अर्थ ‘ ह्या नरांस ’; म्हणजे हे जे उपासक तुझ्या सेवेंत सर्वत्र तत्पर दिसत आहेत त्यांस.

‘ मित्र मरुत् यांशीं ’=‘ समानैर्नृभिः’. ‘ नृ ’ शब्द मरुतांस पुष्कळ ठिकाणीं ऋग्वेदांत लाविलेला आहे. “ इन्द्रो नृभिः अजनत् दीद्यानः साकं सूर्यम् उषसं गातुम् अग्निम् ” (३. ३१. १५) इत्यादि उदाहरणें आहेत. या ठिकाणीं ‘ मरुत् ’ शब्दाचा उच्चार नसतांहि ‘नृ’-शब्दानें मरुत् असा अर्थ समजावयाचा आहे. मात्र मरुतांचें साहाय्य इन्द्र घेतो असें सर्वत्र सांगितलें आहे त्याप्रमाणें अग्निहि घेतो अशाविषयीं उदाहरणान्तरांची अपेक्षा आहे. प्रस्तुत स्थळीं आम्ही सायणांस अनुसरलों आहों. आणि त्याशिवाय दुसरा चांगला अर्थ जुळत नाहीं.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावा:—

नकिष्ट एता व्रता मिनन्ति
नृभ्यो यदेभ्यः श्रुष्टिं चकर्थ ।
तत्तु ते दंसो यदहन्समानैः
नृभिर्यद्युक्तो विवेरपांसि ॥

यांत तिसऱ्या चरणांत दहा अक्षरें

उषो न जारो विभावोस्रः संज्ञातरूपश्चिकेतदस्मै ।
त्मना वहन्तो दुरो व्यृण्वन्नवन्त विश्वे स्व१र्दृशीके ॥ ५ ॥ १३॥

उषः । न । जारः । विभाऽवा । उस्रः । संज्ञातऽरूपः । चिकेतत् । अस्मै ।
त्मना । वहन्तः । दुरः । वि । ऋण्वन् । नवन्त । विश्वे । स्वः । दृशीके । ॥ ५ ॥ १३ ॥

भाषायाम्.

५. उषो जारो न (=उषसो जार इव=सूर्यवद्) विभावा (=विशेषेण प्रभावान्) उस्रः (=तेजस्वी) संज्ञातरूपः (=सर्वैः सुखेनैव ज्ञातरूपः) [अग्निः] अस्मै (=स्तोत्रे मह्यं) चिकेतत् (=पश्यतु=मामनुग्रहदृष्ट्या प्रावलोकयतु) । [पश्य पश्य] [अस्याग्नेः] विश्वे (=सर्वेपि) [रश्मयो] वहन्तः (=हविर्वहन्तः सन्तः) त्मना (=स्वयमेव) दुरो (=यज्ञशालाया द्वाराणि) वि ऋण्वन् (=उदघाटयन्) [अपि च] स्वर्दृशीके (=स्वर्दृशे=तेजःपुञ्जमाकाशं द्रष्टुं=तेजःपुञ्जद्युलोकं प्रति) नवन्त (=अगच्छन्) ॥

त्मना वहन्तो दुरो वि ऋण्वन् नवन्त विश्वे स्वर्दृशीके इति दुर्बोधो विभागः । वयं त्वत्र प्रायः सायणमनुसृत्यैव व्याख्यामः । कृतेषु हि व्याख्यान्तरेषु विविधविद्वद्भिर्निर्विवादं नास्ति तत्रैकमपीति कृत्वा सायणानुसरणमेव वरम् ॥

असावीं तीं अक्षरा आहेत त्यामुळें तो त्रिष्टुभाचा पाद होय. यास्तव या ऋचेचे वृत्तांत द्विपदा विराट् आणि त्रिष्टुभ् यांचा संकर झालेला आहे.

५. उषेच्या जारासारिखा तेजस्वी, कान्तिमान् [आणि] ज्ञानस्वरूप [अग्नि] या [स्तोत्या]-कडे कृपादृष्टि करो. [अग्नीच्या] सर्व [किरणांनीं] आपणच [हवि] घेऊन द्वार उघडिलें आणि आकाशाला भेटावयाला जणुं धांवत आहेत.

5. Bright like the lover of Ushas, fair [Agni] of well-known shape—may he look upon this [worshipper] with favour.—Lo, all [his rays] carrying [the oblation] have themselves opened the door and hastened up to meet the sky.

---

५. 'उषेच्या जाराप्रमाणें म्हणजे बालसूर्याप्रमाणें तेजस्वी, लकलकीत, आणि सर्वांच्या दृष्टीस पडणारें आहे स्वरूप ज्याचें असा जो अग्नि देव, तो मज दीन स्तोत्यावर कृपावलोकन करो.' हा पूर्वार्धाचा भावार्थ झाला. उत्तरार्ध कशाविषयीं आहे तें उघड कळत नाहीं. 'विश्वे' हें कर्तृपद कशाचा बोध करवितें तें समजत नाहीं. परंतु बहुतकरून सायणांस अनुसरून आम्ही जो अर्थ केला आहे त्याचें तात्पर्य असें आहे कीं, 'अग्नीनें कृपावलोकन करावें असें ऋषीनें म्हटल्याबरोबर अग्नि प्रज्वलित झाला, आणि त्याचे किरण ऋषीनें अर्पण केलेलें हवि घेऊन दुसऱ्यानें दार उघडण्याची वाट न पहातां आपणच तें उघडून आकाशाकडे चढले आणि आकाशांत जें तेज आहे त्याला जाऊन मिळाले.' परंतु या उत्तरार्धाविषयीं आम्हांस संशय आहे.

'ज्ञातस्वरूप'='संज्ञातरूपः'. म्हणजे ज्याचें स्वरूप लोकांस समजतें. इंद्रादि देवांसारिख्यांचें स्वरूप कसें आहे तें कोणत्याहि उपासकाला कळावयाचें नाहीं, कारण ते अदृश्य होत. पण अग्नि तसा नाहीं. त्याचें स्वरूप कसें आहे तें आबालवृद्धास ठाऊक आहे. इतर देवांचें स्वरूप कसें आहे तें समजत नाहीं म्हणून जें या विशेषणानें सुचविलें त्यावरून आपले आर्य पूर्वज ज्या देवांस भजत त्यांच्या मूर्ति ते करीत नसत. जर करिते, तर त्यांच्या स्वरूपाचें वर्णन प्रसंगवशात् आलें असतें.

'भेटावयाला जणूं धांवत आहेत'='नवन्त स्वर्दृशीके.' सू. ६६, मं. ५ पहा.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावयाचा आहेः—

उषो न जारो विभावॉ उस्रः
संज्ञातरूपश्चिकेतदस्मै ।
त्मना वहन्तो दुरो वि ऋण्वन्
नवन्त विश्वे सुअर्दृशीके ॥

सूक्तम् ७०.

शक्तिपुत्रः पराशर ऋषिः । अग्निर्देवता । द्विपदा विराट् छन्दः ।

वनेम पूर्वीरर्यो मनीषा अग्निः सुशोको विश्वान्यश्याः ।
आ दैव्यानि व्रता चिकित्वाना मानुषस्य जनस्य जन्म ॥ १ ॥

वनेम । पूर्वीः । अर्यः । मनीषा । अग्निः । सुऽशोकः । विश्वानि । अश्याः ।
आ । दैव्यानि । व्रता । चिकित्वान् । आ । मानुषस्य । जनस्य । जन्म ॥१॥

भाषायाम्.

१. [वयं] मनीषा (=मनीषया=स्तुत्या) पूर्वीः (=प्रभूता) अर्यः (=अरीः= अरातीः=शत्रून्) वनेम (=हन्याम)। सुशोकः (=शोभनदीप्तिः) अग्निर्विश्वानि (=कर्माणि) अश्याः (=अश्यात्=व्याप्नोति)। [स] आ दैव्यानि व्रता (=सर्वाण्यपि देवजनसंबन्धीनि कर्माणि=देवानां प्रीत्यर्थं मनुष्यैः कर्तव्यानि सर्वाण्यपि यज्ञयागादीनि कर्माणि) [तथा] मानुषस्य जनस्य (=मनुष्यजनानाम्) आ जन्म (=सर्वमपि जन्म=सर्वमपि जन्महेत्वादि गुह्यं?) चिकित्वान् (=अवगच्छन्) [वर्तते]॥

अयं भावार्थः । यस्मात्कारणादग्निर्वरेण्यो होतास्ति तस्मात् स मानवैर्देवानां प्रीत्यर्थं कर्तुं योग्यानि सर्वाणि कर्माणि जानाति तथा मनुष्यजनानां जन्महेत्वादिकं (?) सर्वं जानाति । एवं सर्वस्य कर्मणः सर्वस्य ज्ञानस्य च प्रभुरग्निरेवास्ति । तस्मै स्तुतिमर्पयित्वा प्रभूतान्शत्रून्हन्यामेति ॥

वनेम पूर्वीरर्यो मनीषेत्यत्र अस्मानाचार्यो ' मनीषाः ' इति पाठान्तरमिच्छति । पूर्वीर्मनीषाः वनेमेति च पाठे प्रभूताः स्तुतीः प्रभरामहे इति स्याद्व्याख्यानम् ॥

' विभावा ' याचे ठिकाणीं 'विभावॉ ' म्हणणें याशिवाय या मंत्रांत दुसरें न्यूनाधिक कांहीं करावें लागत नाहीं. साधारण श्लोकाप्रमाणें म्हणतां येतो.

सूक्त ७०.

ऋषि–शक्तीचा पुत्र पराशर (पूर्वसूक्ताचा जो तोच). देवता–अग्नि. वृत्त–द्विपदा विराट्.

१. [आम्ही] स्तोत्राच्या योगानें अनेक शत्रूंला संहारून टाकूं असें होओ. सुप्रकाश अग्नीला सर्व [कर्मे] प्रविष्ट होतात. [तो] देवांप्रीत्यर्थ करावयाचीं सकळ सत्कर्मे जाणतो [आणि] सकळ मानवी जनाचें जन्म जाणतो.

HYMN 70.

To *Agni*. By *Parâs'ara* the son of *S'akti* (same as the author of the previous hymn). Metre—*Dvipadâ Virâṭ*.

1. May we destroy many enemies with [our] hymn. Resplendent Agni receives all [prayers]. [He] knows fully the actions to be performed for the Gods, [he knows fully] the origin of the human race.

---

१. 'अग्नीला देवांप्रीत्यर्थ मनुष्यांनीं कोणतीं यज्ञयागादि कर्मे कशीं केलीं म्हणजे देव प्रसन्न होतील ह्याचें परिपूर्ण ज्ञान आहे आणि तसेंच मनुष्य जातीचें जन्म कशानें झालें, त्यांची स्थिति काय, त्यांचीं कर्तव्यें काय ह्याचेंहि पूर्ण ज्ञान त्याला आहे. या प्रकारेंकरून सर्व कर्म आणि सर्व ज्ञान यांचा प्रभु अग्नि होय. तर त्याला आपण स्तोत्र गाऊं आणि तेणेंकरून अग्नीची प्रसन्नता संपादून अनेक शत्रूंस नाहींसे करून टाकूं' असा या मंत्राचा भावार्थ आहे. यांत कठिण विशेष नाहीं, आणि हें सूक्त अग्नीविषयीं आहे तेव्हां अग्नीची स्तुति कां करावी याविषयीं या मंत्रांत लहानसा उपोद्घात केला आहे.

'आम्ही स्तोत्राच्या योगानें अनेक शत्रूंला संहारून टाकूं असें होओ' = 'वनेम पूर्वीः अर्यः मनीषा'. म्हणजे आपण अग्नीला एक स्तोत्र गाऊंया कीं जेणेंकरून तो प्रसन्न होईल आणि अनेक शत्रूंचा नाश करून टाकण्याची आम्हांस शक्ति देईल. स्तोत्र म्हणून शत्रूंस जिंकूंया अथवा मारूंया असें इतर पुष्कळ मंत्रांतहि आलेलें आढळतें. ऋ. १०. १०५. ८ यांत ऋषि म्हणतो कीं, स्तोत्र न करणारे जे नास्तिक शत्रु त्यांस आम्ही स्तोत्राच्या द्वारें संहारूं (ऋचा वनेम अनृचः). तसेंच ५. ३. ५ यांतहि 'हे अग्नी, ज्याचा पाहुणा तूं होतोस तो यज्ञाच्या योगानें शत्रूंस जिंकून संहारितो' (स यज्ञेन वनवत् देव मर्तान्). वन् धातुचा अर्थ मारणें, संहारणें असा होतो याविषयीं आतां दिलेल्या उदाहरणांशिवाय ऋ. ६. २०. ९; ६. २५. ४; ७. ४८. ३ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा. आणि 'अरि' शब्द 'शत्रु' अथवा 'शत्रुसंबंधी' या अर्थी स्त्रीलिंग आहे याविषयीं ६. १६. २७; ८. ३९. २; १०. १३३. ३; ४. ५०. ११; आणि ७. ९७. ९ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा.

गर्भो यो अपां गर्भो वनानां गर्भश्च स्थातां गर्भश्चरथाम् ।
अद्रौ चिदस्मा अन्तर्दुरोणे विशां न विश्वो अमृतः स्वाधीः ॥२॥

गर्भः । यः । अपाम् । गर्भः । वनानाम् । गर्भः । च । स्थाताम् । गर्भः । चरथाम् ।
अद्रौ । चित् । अस्मै । अन्तः । दुरोणे । विशाम् । न । विश्वः । अमृतः । सुऽआधीः ॥ २ ॥

भाषायाम्.

२. यः [अग्निः] अपाम् (=उदकानां) गर्भो (=गर्भवदन्तर्वर्ती) [यो] वनानां (=वृक्षाणां) गर्भः, च (=अपि च) [यः] स्थातां (=स्थातॄणां=स्थावराणां) गर्भो [यश्च] चरथां (=चरतां=जङ्गमानां) गर्भो [भवति] [यश्च] अद्रौ चित् (=पर्वतेपि) [वर्तते] अस्मै (=तस्मा अग्नये) अन्तर्दुरोणे (=गृहमध्ये) [हविः प्रार्पयत] । [स हि] विशां (=जनानाम्) अमृतः (=अमरणः) स्वाधीः (=सुकर्मवान्=शोभनकर्मयुक्तः=यज्ञादिशोभनकर्मार्हो) विश्वो न (=एक एव अद्वितीय इव) [भवति] ॥

योग्निरपां मध्ये वर्तते यो वृक्षाणां मध्ये यः स्थावरेषु यो जङ्गमेषु वर्तते यश्च पर्वतेषु पर्वतसदृशेषु मेघेषु वा वर्तते तस्मा अग्नये हविरर्पयत। स हि केवलः सर्वासां प्रजानां मरणरहितो यज्ञार्हो देवोस्ति न चान्यस्तस्माद् वरीयानिति स एव केवलो यज्ञादिकर्मभिः संमाननीयोस्तीति भावगतम् ॥

सायणो द्वितीयार्धमेवं व्याचष्टे । एवंभूतायास्मा अग्नये दुरोणे दुस्तर्यगृहेऽद्रौचित् पर्वतेप्यन्तर्मध्ये हविः प्रयच्छन्तीति शेषः । सोयममृतोऽमरणधर्माग्निः स्वाधीः शोभनकर्मयुक्तः शोभनध्यानो वा । अस्माकं भवतीति शेषः । तत्र दृष्टान्तः । विश्वो निवेशयिता सुखेनावस्थापयिता राजा विशां न प्रजानां यथा रक्षणरूपशोभनकर्मयुक्तो भवति तद्वत् ॥

' सकल सत्कर्मे ' यांत ' सकल ' हा अर्थ ' आ ' या अव्ययापासून गम्यमान आहे.

' मानवी जनाचें जन्म '=' आ मानुषस्य जनस्य जन्म. ' हा अर्थ अक्षरशः केला आहे. ' मन्म ' असा पाठ असता तर ' मानवी जनाचें स्तोत्र ', मानवी जनांनीं स्तोत्र कसें करावें तेंहि जाणतो असा अर्थ झाला असता. ऋ. ८. ६. ११ यांत अहं प्रत्नेन मन्मना गिरः शुम्भामि कण्ववत् (=मी माझा पिता कण्व याप्रमाणें पुरातन स्तोत्रानें माझी वाचा अलंकृत करितों) असा पाठ आहे त्याऐवजीं सामवेदांत तीच ऋचा आली

२. ज़ो उदकांचा गर्भ, [जो] वृक्षांचा गर्भ, स्थावरांचा गर्भ [आणि] जंगमांचा गर्भ [होय], [आणि] जो पर्वतांत सुद्धा [असतो], त्याला घरांत [हवि अर्पण करा.] [तो] एकलाच जणुं सकळ जनांचा अमर देव [होय].

2. He who is the fœtus of the waters, the fœtus of the trees, the fœtus of the inmoveable, [and] the fœtus of the moveable, [He who is] in even the mountain—to Him [offer oblations] in the house. [He is] as though the sole immortal object of worship to all men.

आहे तेथें अहं प्रत्नेन जन्मना इत्यादि पाठ आहे (उत्तरार्चिक, ७वा प्रपाठक, १ला अर्धप्रपाठक २, ५). आणि ऋ. ८. ४४. १२ यांत अग्निः प्रत्नेन मन्मना शुम्भानस्तन्वं स्वाम् । कविर्विप्रेण वावृधे (=अग्निरूप जो कवि तो पुरातन स्तोत्राच्या योगानें आपल्याला शोभवून स्तोत्याबरोबर वाढलेला आहे) असा पाठ आहे त्याऐवजीं सामवेद उत्तरार्चिक, ८वा प्रपाठक, ३रा अर्धप्रपाठक यांत अग्निः प्रत्नेन जन्मना शुम्भमानः इत्यादि पाठ आहे. यावरून 'जन्म' शब्दाचा अर्थ 'मन्म' शब्दाप्रमाणें होत असला तर प्रस्तुत मंत्रांत 'आ मानुषस्य जनस्य जन्म' याचा अर्थ 'सकल मनुष्यजातीचें स्तोत्र' म्हणजे, मनुष्यमात्र जीं स्तोत्रें करितें तीं असा चांगला होईल.

ह्या मंत्राचा विनियोग 'शान्तिसूक्त' म्हणून जें आहे आणि ज्याचा विशेषसंकटसमयीं जप करण्याचा प्रचार आहे त्यांत आणि घराची 'वास्तुशान्ति' म्हणजे 'गृहप्रवेश' म्हणून जें कर्म नव्या घरांत राहण्यास जाण्यापूर्वी करण्याची चाल पडली आहे त्यांत करितात.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावयाचा आहे:—

वनेम पूर्वारॅयों मनीषा ।
अग्निः सुशोको विश्वानि अश्याः ।
आ दैविआनि व्रता चिकित्वान्
आ मानुषस्यँ जनंस्य जन्म ॥

---

२ भावार्थ:–'जो अग्नि उदकांच्या पोटीं जन्मतो, म्हणजे उदकांनीं भरलेल्या आकाशांत विजेच्या रूपानें जन्मतो, जो वृक्षांच्या पोटीं जन्मतो, म्हणजे लांकडाला लांकूड घांसलें म्हणजे बाहेर पडतो, जो स्थावरांच्या आणि जंगमाच्या पोटीं जन्मतो, म्हणजे दगड आणि प्राणी इत्यादिकांच्या पोटीं जन्मतो, आणि जो पर्वतांतहि असतो म्हणजे ज्वालामुखी पर्वतांत उत्पन्न होतो, त्या अग्नीला आपल्या घरीं हवि अर्पण करा. कारण कीं ज्याला सर्व मनुष्यांनीं यज्ञादिक कर्म करून भ-

स हि क्षपावाँ अग्नी रयीणां दाशद्यो अस्मा अरं सूक्तैः ।
एता चिकित्वो भूमा नि पाहि देवानां जन्म मर्तांश्च विद्वान् ॥३॥

सः । हि । क्षपाऽवान् । अग्निः । रयीणाम् । दाशत् । यः । अस्मै । अरम् । सुऽउक्तैः ।
एता । चिकित्वः । भूम । नि । पाहि । देवानाम् । जन्म । मर्तान् । च । विद्वान् ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. हि (=यस्मात् कारणात्) यो [यजमानः] सूक्तैः (=स्तोत्राणि कृत्वा) अस्मै (=अग्नये) अरं (=पर्याप्तं यथा स्यात्तथा) दाशत् (=हविरर्पयति) [तस्मै यजमानाय] सोग्नी रयीणां क्षपावान् (=धनानां दाता) [भवति]। —हे चिकित्वः (=चिकित्वन्=सर्वज्ञ) [अग्ने], देवानां जन्म (=देवानां जातं=दैव्यं जनं= देवान्) मर्तांश्च (=मरणधर्मणश्च मनुष्यान्) विद्वान् (=जानन्) [त्वम्] एता भूमा (=एतानि भूमानि=दृश्यमानानि भूतानि=सर्वाणि भूतानि) नि पाहि (=नितरां पालय) ॥

क्षपावच्छब्दविषये अर्थविप्रतिपत्तिर्भवति । सायणास्तु रयीणां क्षपावान् इति न संबध्नन्ति अपि तु स ह्यग्निः क्षपावान् । क्षपेति रात्रिनाम । रात्रिमान् । आग्नेयी वै रात्रिरिति श्रुतेः । रात्रेरग्निसंबन्धोऽप्यग्निर्ज्योतिर्ज्योतिरग्निः स्वाहेति हूयमानत्वात् । यद्वा । राक्षसादीनां क्षपणेन नाशेन युक्तः । एवंभूतोग्निः स्तोत्रे यजमानाय रयीणां धनानि दाशत् । दाशति प्रयच्छति । यो यजमानोऽस्मा अग्नये सूक्तैः सुष्ठूक्तैर्यथाशास्त्रं प्रयुक्तैर्मन्त्रैररमलं पर्याप्तं स्तोत्रं करोति तस्मा इत्यर्थ इति व्याचक्षते । परंतु स हि क्षपावान् अभवद् रयीणाम् अतन्द्रो दूतो यजथाय देवान् (ऋ. ७. १०. १) इत्यत्र रयीणां क्षपावानित्यन्वयो दुर्निवारः । तस्मात् क्षप् क्षपणे इति धातो राक्षसादीनां क्षपणेन युक्तः । त्राता । दाता । इति कामपि व्युत्पत्तिमाश्रित्य रयीणां क्षपावानित्येतस्य धनानां दातेत्यर्थो बोद्धव्यः ॥

जावें असा अमर देव तो हा एकलाच आहे.' यांत जीं अग्नीचीं स्थलें सांगितलीं त्यावरून अग्नि हा सर्वत्र भरलेला आहे, तो कोठें नाहीं असें नाहीं असें म्हणण्याचा उद्देश आहे.

हा मंत्र खालीं लिहिल्याप्रमाणें म्हणावा:—

गर्भो यो अपां गर्भो वनानां
गर्भश्च स्थातां गर्भश्चरथाम् ।

३. कारण कीं जो [कोणी] अग्नीला सूक्तांच्या योगानें विपुल [हवि] अर्पण करील त्याला तो द्रव्यदाता [होतो].—हे सर्वज्ञ [अग्नी], तूं सर्व प्राण्यांचें संरक्षण कर. कारण कीं तुला देवलोकांविषयीं आणि मर्त्यांविषयीं पूर्ण ज्ञान आहे.

3. For to him who sacrifices plentifully to Agni with hymns, he, Agni, is the giver of riches.—Omniscient Agni, protect all creatures, for thou knowest the race of the Gods and [knowest] the mortals.

अद्रौ चिदस्मा अन्तर्दुरोणे
विशां न विश्वो अमृतः स्वाधीः ॥

अथवा चवथा पाद त्रिष्टुभाचा आहे असें समजून विशां न विश्वो अमृतः सुआधीः असा एकादशाक्षरी म्हणावा. पूर्वील सूक्ताचा चवथा मंत्र आणि टीप पहा.

---

३. वरच्या मंत्रांत सांगितलें कीं अग्नीला घरांत हवि अर्पण करावें. त्याचें आणखी कारण सांगतोः—'कारण कीं जो कोण सूक्तें रचून अग्नीला हवि अर्पितो त्याला अग्नि संपत्ति देतो.—तर हे अग्नी, तूं सकल जीवजंतूंला रक्ष. कोणाला कसें रक्षावें याविषयीं तुला अडचण पडणार नाहीं, कारण कीं तूं सकल देव आणि मनुष्य यांविषयीं सर्व जाणतोस.'

'सूक्तांच्या योगानें'='सूक्तैः.' म्हणजे सूक्तें रचून तीं म्हणून. नवीन सूक्तें रचून जो कोण उपासना करील त्यावर कोणत्याहि देवाचें मन लवकर प्रसन्न होतें अशाविषयीं ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं आलें आहे. म्हणून पुष्कळ ऋषि उपास्य देवतेला म्हणत असतात कीं, हें माझें स्तोत्र अगदीं नवें आहे, हें तुला विशेष ग्राह्य आणि प्रिय असो. ऋ. ७. २६. १; ८. ९५. ५ इत्यादि पहा.

'द्रव्यदाता [होतो]'='क्षपावान् रयीणाम्.' 'क्षपावान्' शब्दाच्या अर्थाविषयीं थोडीशी अडचण आहे. हा शब्द वेदांत च्यार पांच ठिकाणीं आला आहे. त्या सर्व ठिकाणीं सायणाचार्य पदपाठांत 'क्षपाऽवान्' असा पदच्छेद आहे त्याला अनुसरून, रात्रिमान् असा अर्थ करितात. पण त्या कोणत्याहि ठिकाणीं तो अर्थ इष्ट दिसत नाहीं. आणि ऋ. ७. १०. १ यांत प्रस्तुतच्या मंत्राप्रमाणेंच 'रयीणां क्षपावान्' हे शब्द एकत्र आलेले आहेत आणि दोनहि मंत्रांत द्रव्यांचा दाता असा अर्थ इष्ट आहे. वास्तव 'क्षपावान्' म्हणजे क्षपण अथवा शत्रूंचा नाश करणारा=पाळणारा=देणारा असा अर्थ समजून निर्वाह करणें अवश्य दिसतें.

वर्धान्यं पूर्वीः क्षपो विरूपाः स्थातुश्च रथमृतप्रवीतम् ।
अराधि होता स्वर्निषत्तः कृण्वन्विश्वान्यपांसि सत्या ॥ ४ ॥

वर्धान् । यम् । पूर्वीः । क्षपः । विऽरूपाः । स्थातुः । च । रथम् । ऋतऽप्रवीतम् ।
अराधि । होता । स्वः । निऽसत्तः । कृण्वन् । विश्वानि । अपांसि । सत्या ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. ऋतप्रवीतम् (=ऋतेन सत्येन वेष्टितं) यम् [अग्निं] विरूपाः (=परस्परशुक्लकृष्णत्वाद्विसदृशरूपाः) पूर्वीः (=पूर्वा) [उषसः] क्षपः (=निशाश्च) वर्धान् (=वर्धयन्ति), स्थातुः (=स्थातृ=स्थावरं वस्तुमात्रं) चरथं (=चरत्=जङ्गमं वस्तुजातं) [च] [वर्धात्=वर्धयति] [स] स्वः निषत्तः (=प्रकाशमाने यज्ञस्थाने निषण्णः सन्) अराधि (=आराधितः), विश्वानि अपांसि (=सर्वाणि यज्ञयागादीनि कर्माणि) सत्या कृण्वन् (=सत्यानि कुर्वन्=यथार्थानि करोति च) ॥

अत्रेदमुक्तं भवति । योग्निरतिमात्रं पुरातनोस्ति यश्च अद्य यावत् स्थावरजङ्गमानि विविधानि प्रभूतानि वस्तूनि ददर्श एतादृशश्चिरकालं जीवितवाननेकवस्तूनि दृष्ट्वानग्निर्होतृत्वप्रयुक्तः सन् देवयजन उपवेशितोस्ति । स च तत्र अस्मादृग्भिरुपासकैर्यज्ञयागादीनि क्रियमाणानि कर्माणि सफलानि करोतीति ॥

'स्थातुश्च रथम्' इत्यत्र वयं विद्वद्वरं बेन्फीयमनुसृत्य 'स्थातुश्चरथम्' इति पाठं निर्विवादार्थलाभायेच्छामः । सायणा अपि वैदिकपाठं स्थातुश्च रथमित्येव बुद्ध्वा रथशब्दस्य कयापि युक्त्या चरथशब्देन समानार्थकत्वं प्रतिपादयन्ति । रथं रममाणं जङ्गमं मनुष्यादिकं चेति तैर्व्याख्यातत्वात् ॥

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटला पाहिजेः—

स हि क्षपावान् अॅग्नी रयीणां
दाशद्यो अस्मा अरं सुउक्तैः ।
एता चिकित्वो भूॅमा नि पाहि
देवानां जन्म मॅर्तांश्च विद्वान् ॥

यांत एता (=एतानि= हीं, म्हणजे हीं जीं जिकडे तिकडे दृष्टीस पडणारीं तीं) याचा 'सर्व' असा अर्थ करावा लागतो त्याजकडेस वाचकांनीं लक्ष्य द्यावें. ६९ व्या सूक्ताच्या चवथ्या मंत्रांत 'एतानि व्रतानि' व सू. ६८, मं. ४ यांत 'आसां रयीणाम्' हींहि यासारिखींच उदाहरणें होत. दुसरींहि उपलब्ध आहेत.

४. ज्या सत्यवेष्टित [अग्नी]ला भिन्नरूप अनेक [उषांनीं] [आणि] रात्रींनीं [आणि] स्थावरजंगमांनीं वाढविलें आहे, त्याला होता [करून] वेदीवर स्थापिलें आहे, आणि तो सकल कर्में सफल करीत आहे.

4. He who is surrounded by truth [and] whom many dissimilar [mornings] [and] nights have nourished, [whom] that which stands [and] that which moves [nourished], is honorably seated and worshipped in the sacrifice, [as] the invoker making all works fruitful.

---

४. 'ज्या अग्नीला आजपर्यंत अनेक उषांनीं आणि रात्रींनीं वाढविलें आहे. म्हणजे जो इतका पुराण आहे कीं त्याणें असंख्य रात्रि आणि उषा पाहिल्या आहेत; आणि ज्याला स्थावरांनीं आणि जंगमांनींहि वाढविलें आहे, म्हणजे वृक्षादिकांच्या समिधा आणि हवि यांनीं आणि मनुष्यांच्या उपासनांनीं जो वाढला आहे, अर्थात् ज्याणें हें स्थावरजंगम जग आजपर्यंत अनादि काळापासून पाहिलें आहे; आणि जो सत्यानें वेष्टिलेला आहे, अशा अग्नीला उपासक जन यज्ञशाळेंत वेदीवर होता नेमून वसवितात. कारण कीं मनुष्यांचीं सर्व कर्में सफळ करणारा तोच आहे. इतर होत्यांला ती शक्ति नाहीं.'

'सत्यवेष्टित'= 'ऋतप्रवीतम्'. हा शब्द ऋग्वेदांत दुसरे ठिकाणीं कोठें असल्याप्रमाणें दिसत नाहीं. आम्हीं सायणांनीं दिलेल्या तीन अर्थांतून एक निवडून घेतला आहे. अग्नीला 'सत्यरूप' (ऋतः) सत्यरूप यज्ञापासून आनंद पावणारा अथवा वाढलेला (ऋतावृध्) असें वेदांत पुष्कळ ठिकाणीं म्हटलें आहे (८.६०.५;३.२.१ इत्यादि पहा). त्यावरून त्याला सत्यानें वेष्टिलेला असें विशेषण दिलेलें समजण्यासारिखें आहे. 'भिन्नरूप'='विरूपाः'.म्हणजे उषा शुभ्रवर्णाच्या आणि रात्रि कृष्णवर्णाच्या होत, तेणेंकरून त्या एकमेकांपासून भिन्नरंगाच्या आहेत.रात्र आणि उषा यांचा एकत्र उच्चार येतो तेव्हां त्यांस 'विरूप' हें विशेषण बहुतकरून लाविलेलें आढळतें. ऋ. १. ११३. ३ 'नक्तोषासा समनसा विरूपे', १. ९५. १ 'द्वे विरूपे चरतः स्वर्थे', इत्यादि उदाहरणें आहेत. शिवाय सू. ६२, मं.८ हा पहा. शिवाय 'नक्ता च चक्रुः उषसा विरूपे' असें सू. ७३, मं. ७ यांत आहे तें पहा.

'स्थावरजंगमांनीं'= 'स्थातुः चरथम्.' आमच्या अर्थाविषयीं तर वाद नाहींच, आणि सायणांनींच तो केलेला

गोषु प्रशस्तिं वनेषु धिषे भरन्त विश्वे बलिं स्वर्णः ।
वि त्वा नरः पुरुत्रा सपर्यन्पितुर्न जिव्रेर्वि वेदो भरन्त ॥ ५ ॥

गोषु । प्रऽशस्तिम् । वनेषु । धिषे । भरन्त । विश्वे । बलिम् । स्वः । नः । वि । त्वा । नरः । पुरुऽत्रा । सपर्यन् । पितुः । न । जिव्रेः । वि । वेदः । भरन्त ॥ ५ ॥

भाषायाम्.

५. [हे अग्ने], [त्वं] गोषु वनेषु (=अस्मदीयपशुषु वृक्षेषु च) प्रशस्तिं धिषे (=प्रशस्तत्वम्=उत्कृष्टत्वं स्थापय) । विश्वे (=सर्वे जना) नः (=अस्मभ्यं) स्वः (=दिव्यं) बलिम् (=उपायनं) भरन्त (=आहरन्तु) । [हे अग्ने], त्वा (=त्वां) नरः (=मनुष्याः) पुरुत्रा (=विविधेषु स्थलेषु) सपर्यन् (=अपूजयन्=पूजयन्ति) । [अपि च] पितुर्न जिव्रेः (=वृद्धात्पितुः सकाशाद् यथा तथा) [त्वत्तः सकाशात्] वेदः (=धनं) वि भरन्त (=विविधेषु स्वेषु स्वेषु गृहेषु अहरन् नयन्ति) ॥

आहे. परंतु ' स्थातुः च रथम् ' असा पाठ आहे त्याच्या ऐवजीं स्थातुः चरथम् असा दोनच शब्दांचा पाठ असावा. ' स्थातुश्चरथम्' असा दोन शब्दांचा पाठ याच अर्थी ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं आला आहे. सू. ५८, मंत्र ५ यांत 'स्थातुश्चरथं भयते पतत्रिणः '=स्थावरजंगम आणि पक्षी भितात असें आहे. सूक्त ६८, मं. १ यांत स्थातुश्चरथमक्तून् व्यूर्णोत् असें आहे. सू. ७२, मं. ६ यांत स्थातॄन् चरथं च असें आहे, स्थातॄन् च रथं च असें नाहीं. यावरून मूळचा पाठ ' चरथं ' असा असावा, 'च रथं ' असा नसावासें दिसतें. दोनीहि पाठांला स्वर एकसारिखेच येतात. वाक्यसंदर्भावरून जो अर्थ पाहिजे आहे तोच सायणांनीं केला आहे, पण ' स्थातुः च रथम्' असा पाठ घेतला तर तसा वस्तुतः अर्थ होणार नाहीं. ' रथम् ' म्हणजे ' चालणारें ' असा प्रयोग अन्यत्र आढळत नाहीं. तर यावरून इतकें समजावयाचें कीं ' च रथम् ' हा पाठ जरी अतिपुरातन आहे तरी तो मूळ पाठ नसावा. आणि मूळ पाठ एक असतां पदांत तो एकीकडे राहून दुसराच शिरतो याचें हें एक उदाहरण होय.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटला पाहिजेः—

वर्धान्यं पूर्वीः क्षपो विरूपाः
स्थातुश्चरथमृतप्रवीतः ।
अराधि होता सुर्अनिषत्तः
कृण्वन् विश्वानि अपांसि सत्या ॥

५. [हे अग्नी], [तूं आमच्या] गाईंच्या आंगीं [आणि] वृक्षांच्या आंगीं उत्कृष्टपण आण. सकल [जन] आह्मांस दिव्य भेट घेऊन येओत. [हे अग्नी], तुला मनुष्य नानास्थळीं पूजित असतात, [आणि] वृद्ध पित्यापासून [धन मिळविल्या]प्रमाणें [तुजकडून] धन घेऊन आपआपल्या घरीं जात असतात.

5. Bring excellence, [O Agni], into [our] cows [and] into [our] trees. May all bring unto us a divine present. Men worship thee in different places, [and] carry home from thee wealth as from an aged father.

---

५. हा या सूक्ताचा उपसंहार असल्याप्रमाणें आहे या कारणानें अग्नीपाशीं ऋषि वर मागत आहे. तो म्हणतो कीं, 'हे अग्नी, तुला अनेक मनुष्य अनेक स्थळीं पूजित असतात. त्या सगळ्या स्थळीं तूं जात असतोस आणि प्रसन्न होऊन वृद्ध पित्याप्रमाणें त्यांस संपत्ति देतोस. तर ही आमची स्तुति ऐकून आमच्या गुरांढोरांचें कल्याण कर, आमच्या वेलावृक्षांचें कल्याण कर, आणि आम्हांस सर्वांकडून उत्तम धनें मिळत असें कर.'

'सकळ [जन]'=' विश्वे'. सकल देव तुझ्या द्वारें प्रसन्न होत्साते भेट आणोत, म्हणजे आम्हांस वरदान देओत, असाहि अर्थ चांगला संभवतो.

'वृद्ध पित्याप्रमाणें'=' पितुर्न जिव्रेः'. ही उपमा चमत्कारिक दिसते. पण वृद्ध पित्याला प्रसन्न करून जसे त्याचे पुत्र त्याजकडून द्रव्य घेतात तसे असा अभिप्राय आहे.

'आपआपल्या घरीं घेऊन जातात' =' वि भरन्त'. अक्षरशः अर्थ '[आजपर्यंत] वेगवेगळे घेऊन गेले आहेत', म्हणजे प्रत्येक उपासक आपआपल्या घरीं नेत असतो.

हें सूक्त प्रसिद्ध पराशर ऋषीचें आहे तेव्हां तो अग्निदेवतेपाशीं काय वर मागतो त्याजकडेस वाचकांनीं लक्ष्य द्यावें. त्याची मुख्य काळजी गुरेंढोरें आणि वृक्ष ह्यांविषयीं आहे.

मंत्र म्हणतांना श्लोकवृत्ताला लागतो तो असाः—

गोषु प्रशस्तिं वनेषु धिषे
भरन्त विश्वे बलिं स्वर्णः ।
वि त्वा नरः पुरुत्रा सपर्यन्
पितुर्न जिव्रेर्वि वेदो भरन्त ॥

साधुर्न गृध्नुरस्तेव शूरो यातेव भीमस्त्वेषः समत्सु ॥६॥१४॥

साधुः । न । गृध्नुः । अस्ताऽइव । शूरः । याताऽइव । भीमः । त्वेषः । समत्ऽसु ॥ ६ ॥ १४ ॥

भाषायाम्.

६. [अयमग्निः] साधुर्न गृध्नुः (=साधिष्ठेन मार्गेण गच्छन् बाण इव ग्रहीता धारयिता), अस्तेव शूरः (=धनुर्धर इव शौर्योपेतः), यातेव भीमः (=अभियातृवद्भयंकरः), समत्सु [च] (=युद्धेषु च) त्वेषः (=दीप्तो) [भवति] ॥

सूक्तम् ७१.

शक्तिपुत्रः पराशर ऋषिः । अग्निर्देवता । त्रिष्टुप् छन्दः ।

उप प्र जिन्वन्नुशतीरुशन्तं पतिं न नित्यं जनयः सनीळाः ।
स्वसारः श्यावीमरुषीमजुष्रञ्चित्रमुच्छन्तीमुषसं न गावः ॥१॥

उप । प्र । जिन्वन् । उशतीः । उशन्तम् । पतिम् । न । नित्यम् । जनयः । सऽनीळाः ।
स्वसारः । श्यावीम् । अरुषीम् । अजुष्रन् । चित्रम् । उच्छन्तीम् । उषसम् । न । गावः ॥ १ ॥

भाषायाम्.

१. उशतीः (=उशत्यः=कामयमानाः) सनीळाः (=सहनिवासाः=सहिता) जनयः (=अङ्गुलिरूपाः स्त्रियः) उशन्तं (=कामयमानम्) [अग्निम्], उशत्यो जनय उशन्तं नित्यं पतिं न (=कामयमानाः स्त्रियः कामयमानं स्वं पतिं यथा उप प्रजिन्वन्ति तद्वत्), उप प्र जिन्वन् (=" उपेत्य हविःप्रदानादिकर्मणा प्रीणयन्ति ") । स्वसारः (=एकपाणौ जातत्वात्स्वसृभूता अङ्गुलयः), श्यावीं (=रात्रिसंबन्धात्कृष्णवर्णाम्) अरुषीम् (=आरक्ताम्) उच्छन्तीम् (=अन्धकारस्य निरसनं कर्तुमारभमाणाम्) उषसं स्वसारो गावो न (=स्वसृभूताः किरणरूपा गावो यथा जुषन्ति तद्वत्), चित्रं (=चायनीयं=चित्रविचित्रम्) [अग्निम्] अजुष्रन् (=असेवन्त=सेवन्ते) ॥

अत्र एकहस्तप्रभूतत्वात्स्वसृभूता अङ्गुलयोग्निमुपतिष्ठन्ति परिचरन्ति चेति प्रतिपादयितव्ये द्वौ दृष्टान्तौ । यथा कस्यचित्पुरुषस्य बह्व्यः स्त्रियः संगताः सत्यस्तमुपतिष्ठन्ति तद्वत् अथवा यथा प्रथमं कृष्णवर्णां पश्चाच्छुक्लीभवन्तीमन्धकारं च निरस्यन्तीमुषसं समानस्थाने भूतत्वात्स्वसृभूता दीप्तिरूपा गावः सेवन्ते तद्वदिति ॥

६. [अग्नि] बाणाप्रमाणें झोंबणारा, धनुर्धराप्रमाणें शूर, चाल करून येणाऱ्याप्रमाणें भयंकर [आणि] युद्धांत पराक्रमी होय.

6. [Agni is] certain like an arrow, brave like an archer, terrible like an invader, [and] valiant in battles.

६. या मंत्रांत अग्नीचें स्वरूप तीन उपमा देऊन वर्णिलें आहे. आणि त्याशिवाय विशेषणानेंहि प्रतिपादिलें आहे. ऋषि म्हणतो, 'जसा एकादा बाण सोडला म्हणजे एकदम जाऊन लक्ष्य पदार्थाला झोंबतो तसा अग्नि होय; तो धनुर्धराप्रमाणें शूर होय आणि एकादा शत्रु दुसऱ्या देशावर चाल करून जातो आणि वाटेंत सांपडेल तें जाळतो अथवा लुटून फस्त करितो तसा आहे आणि लढाईत तर केवळ दावाग्नीप्रमाणें सर्व शत्रूंचा संहार करून टाकणारा होय.'

सूक्त ७१.

ऋषि—शक्तीचा पुत्र **पराशर** (पूर्वसूक्ताचा जो कर्ता तोच). देवता— **अग्नि.** वृत्त—**त्रिष्टुभ्.**

१. कोणा पतीच्या एकत्र मिळालेल्या कामी स्त्रिया आपल्या कामयमान पतीला [भजतात], तशा अंगुलिरूप स्त्रिया अग्नीला भजतात; [आणि] कृष्णवर्ण, आरक्त, [आणि] नुकत्याच उगवणाऱ्या उषेला [जशा तिच्या] किरण[रूपी] बहिणी [शोभवितात], तशा कान्तिमान [अग्नी]ला [अंगुलिरूप बहिणी] शोभवितात.

HYMN 71.

To *Agni.* By *Parâs'ara* son of *S'akti* (author of the previous hymn). Metre—*Trishṭubh.*

1. The sisterhood of the combined fingers have served [Agni], like as loving wives serve their loving husband—have honoured bright [Agni], as the sisterhood of the rays honour the dark bright Ushas as she dawns.

१. या मंत्रापासून ऋषि आणि देवता जरी बदलली नाहीं, तरी वृत्त बदललें. आतांचें सूक्त त्रिष्टुभ् म्हणजे उपजाति या वृत्तांत आहे.

या मंत्रांत अग्नीला हाताच्या बोटांनीं जागें करून पूजिलें असें सांगितलें आहे. आणि याला दोन दृष्टान्त दिले आहेत. १ला, जशा एकाद्या पुरुषाच्या पुष्कळ बायका असतात आणि त्या सगळ्या मिळून त्याला भजतात म्हणजे त्याजवळ उभ्या राहून त्याची सेवा करितात आणि त्याहि सकाम आणि तोहि सकाम असल्यामुळें एकमेकांस अतिप्रिय होतात, तसा अग्नीला उपासकाच्या हाताच्या आंगळ्यांनीं सेविला; आणि दुसरा दृष्टान्त हा कीं जशी मोठ्या पहांटेस उषा येऊं लागली म्हणजे प्रथम रात्रीचें प्राबल्य असल्यामुळें किंचित् काळी असते आणि शुभ्र होऊन उजळूं लागते आणि त्या वेळीं द्युलोकाच्या सर्व दीप्ति याच ज्या कोणी गाई त्या तिजकडेस धांवून येतात आणि तिला सेवितात, तशी अंगुळ्यांनीं अग्नीची सेवा केली आहे.'

'एकत्र मिळालेल्या' = 'सनीळाः'. अक्षरशः अर्थ 'एकाच घरच्यांतल्या.' म्हणजे, एकच ठिकाणीं ज्यांची स्थिति आहे अथवा एकाच ठिकाणीं असलेल्या. सू. ५९, मं. ३ यांतहि असाच प्रयोग आला आहे.

'अंगुलिरूप स्त्रिया अग्नीला भजतात' = 'उप प्र जिन्वन् जनयः.' 'जनयः' याचा अक्षरशः अर्थ 'स्त्रिया' इतकाच आहे. बोटें नित्य एकत्र आणि एकमेकांजवळ असतात म्हणून त्यांस एकमेकांच्या सवती ('जनयः') असें म्हटलें आहे. आणि अग्नीला अरणींतून बोटें घर्षण करून काढतात आणि अग्नीची नानातऱ्हेनें सेवा जणुं करितात म्हणून त्यांजवर सचेतनाचा आरोप केला आहे. ऋ. ३. २६. ३ यांत 'अश्वो न क्रन्दन् जनिभिः समिध्यते' = 'बोटें याच कोणी स्त्रिया त्यांच्या योगानें प्रचंड घोड्याप्रमाणें किंकाळणारा अग्नि प्रदीप्त होत असतो' असें सांगितलें आहे. यांसच कितीएक मंत्रांत 'बहिणी' (जामयः) असेंहि म्हटलेलें आढळतें. आणि अङ्गुलिरूप स्त्रियांनीं सोमरस काढला अथवा सिद्ध केला असें पुष्कळ ठिकाणीं आलें आहे. जसें 'तं* *जामयः हरिं हिन्वन्ति अद्रिभिः'(ऋ.९.२६.५)= 'त्या पीतवर्ण सोमाला अङ्गुलिरूप स्त्रिया दगडांनीं चेंचून काढितात'. 'स जामिभिः पवमानः' (ऋ.९.३७.४)'अङ्गुलिरूप स्त्रियांनीं गाळलेला असा जो सोम तो' असेंहि आहे.ऋ.९.२८.४ यांत 'एष वृषा कनिक्रदत् दशभिर्जामिभिर्यतः। अभि द्रोणानि धावति'='ह्या पराक्रमी सोमाला अङ्गुलिरूप दहा स्त्रियांनीं धरिलें असून तो द्रोणांकडेस धांवत आहे' असें म्हटलें आहे. ऋ.९.७२.३ यांत असें म्हटलें आहे कीं, 'सोम हा दोन हातांपासून झालेलीं जीं दहा बोटें त्याच कोणी बहिणी त्यांजबरोबर

वास करितो, म्हणजे हातांत धरिला जातो' (=सं द्वयीभिः स्वसृभिः क्षेति जामिभिः). अग्नीचो आणि सोमाची जशी काय सेवाच ह्या अंगुलिरूपी वहिणी करितात. त्या अग्नीच्या अथवा सोमाच्या बायका अथवा बहिणी होत असें विवक्षित नाहीं. परंतु त्या सदैव एकत्र राहून सगळ्या मिळून सोम काढण्याच्या कामीं अथवा अग्नि प्रदीप्त करण्याच्या कामीं गुंतलेल्या असतात यास्तव त्यांस परस्परांच्या बहिणी अथवा सवती असें रूपक वेदांत येत असतें.

'कृष्णवर्ण' ='श्यावीम्.' 'श्यावी' हें बहुतकरून रात्रीचें विशेषण येत असतें. पण येथें रात्र विवक्षित नसल्यामुळें आम्हीं सायणानुसारें अर्थ केला आहे.

'किरणरूप वहिणी'='स्वसारो गावः'. हे किरण सूर्याचे असतील अथवा उषेच्याच प्रभा असतील. हें शेवटलें मत सायणांस अभिमत आहे.

या ऋचेंत 'कोणा पतीच्या एकत्र मिळालेल्या कामी स्त्रिया आपल्या कामयमान पतीला' असे शब्द आहेत त्यावरून वैदिक युगांत, म्हणजे ज्या कृतयुगांत पराशरादिक महान् महान् ऋषि वेदसूक्तें रचीत तेव्हां, एकच पुरुष अनेक बायका करून घेत असे असें ज्ञापक सांपडतें. वेदांत पुरुषस्त्रियांविषयीं जे उच्चार येतात त्यांत बहुतकरून एका पुरुषास एकच स्त्री आहे अशा समजुतीनें येतात. पण कितीएकांस एकापेक्षां अधिकहि असत असे अपवाद प्रस्तुत मंत्रांत असल्यासारिखे दृष्टीस पडतात. तेव्हां या प्रकाराविषयीं कृतयुगांत आणि या आमच्या कलियुगांत कांहीं भेद नाहीं असें सहज दिसून येतें.

हा मंत्र खालीं लिहिल्याप्रमाणें म्हटला तर उपजातिवृत्ताला बसतो.

उप प्र जिन्वन्नुशती रुशन्तं
पतिं न नित्यं जनयः सनीळाः ।
स्वसारः श्यावीमरुषीमजुष्रन्
चित्रमुच्छन्तीमुषसं न गावः ॥

यांत प्रथमार्ध तर अगदी उपजातीवर लागतो. उत्तरार्धांत मात्र दोन दीर्घांचे ऱ्हस्व आणि एक ऱ्हस्वाचा दीर्घ वाचावा लागतो. बाकी सर्व सरळ आहे.

वीळु चिद्दृळ्हा पितरो न उक्थैरद्रिं रुजन्नङ्गिरसो रवेण ।
चक्रुर्दिवो बृहतो गातुमस्मे अहः स्वर्विविदुः केतुमुस्राः ॥ २ ॥

वीळु । चित् । दृळ्हा । पितरः । नः । उक्थैः । अद्रिम् । रुजन् । अङ्गिरसः । रवेण ।

चक्रुः । दिवः । बृहतः । गातुम् । अस्मे इति । अहरिति । स्वः । विविदुः । केतुम् । उस्राः ॥ २ ॥

भाषायाम्.

२ नः पितरः अङ्गिरसः (=एतत्संज्ञा अस्माकम् आर्यजनानां पितरः) उक्थैः (=सूक्तैः=सूक्तद्वारा) वीळु चित् दृळ्हा (=वीळूनि अपि दृढानि=बलवन्त्यपि दुर्गाणि=वृत्रस्य प्राकारान्) अरुजन् (=अभञ्जन्) रवेण (=स्तोत्ररूपेण ध्वनिना) अद्रिम् (=अद्रिसदृशं मेघमपि) [अरुजन्] । [ते] नः (=अस्मभ्यम्=अस्माकं हिताय) बृहतो दिवः (=महतो द्युलोकस्य) गातुं (=मार्गं) चक्रुः (=कृतवन्तः) । [अपि च] अहः (=दिवसं) स्वः (=तेजः) केतुं (=ज्ञापयितारम्=आदित्यम्) उस्राः (=कान्तिमतीर्दीप्तिरूपा गाश्च) विविदुः (=अलभन्त) ॥

अत्रेदमुक्तं भवति । पुरा काले नः पितरोङ्गिरसो मेघोदकस्य सूर्यप्रकाशस्य चावरकेण वृत्रेण पीडिताः सन्तः सूक्तानि रचयित्वा अग्न्यादिदेवांस्तुष्टुवुः । अनन्तरमग्न्यादयः स्तोत्रैस्तुष्टा वृत्रादीनां दुर्गाणि भित्त्वा मेघोदकानि तथा सूर्यादीनि दिव्यानि तेजांसि मुमुचुः । अग्नेः स्थापनाच्च स्तोत्रप्रचाराच्च स्वर्गाय गन्तुं मार्गमिव चक्रुरिति ॥

२. 'आमचे वाडवडील जे अंगिरस ते पूर्वी आपल्या सूक्तांनीं डोंगर सुद्धा फोडीत असत; आणि स्तोत्राच्या योगानें त्यांणीं दिवस, प्रकाश, आदित्य, आणि उदकें मुक्त करून आम्हांकरितां स्वर्गी जाण्याचा मार्ग त्यांणीं सिद्ध करून ठेविला आहे, म्हणजे, ते अग्नि इत्यादि देवांचीं स्तोत्रें गात आणि तेणेंकरून त्यांची प्रसन्नता संपादन करून घेऊन मेघमंडळ फोडून पाऊस पाडीत, आणि मेघाच्छादित सूर्यादिक जीं द्युलोकांतील तेजें त्यांस ते मुक्त करीत; आणि अग्नीची स्तोत्रांनीं आणि हवींनीं आराधना करून देवांस हवि अर्पण करण्याचा जो त्यांणीं प्रचार घातला तो केवळ स्वर्गी चढून जाण्याचा मार्गच होय.'

अंगिरस (सू. ५१, मं. ३ पहा) आपल्या सूक्तांनीं मोठमोठे दुर्ग आणि पर्वत फोडीत असत असें जें सांगितलें आहे त्याचा अर्थ सायणाचार्य सुद्धा असा करितात कीं, अंगिरस हे अग्न्यादि देवांचीं स्तोत्रें करीत तेणेंकरून त्या दे-

पोंच ता. १ पासून ता. ३१ जुलैपर्यंत.

	रु. आ. पै.
हिजहायनेस तात्या साहेब आफ सांगली	२५–६– ०
श्रीमंत कृष्णराव रेंगे जहागिरदार...	६– ६– ०
मेहेरबान डायरेक्टर आफ पब्लि.इ. बॉंब	३००–०– ०
रा. सा. नारायण विष्णु बापट, क्युरेटर ग.सें.बु. डेपो. मुंबई	६– ०– ०
,, ,, नारायण रामचंद्र जोगळेकर	६– ६– ०
रा. रा. गोविंद बल्लाळ गाकटे	६– ६– ०
,, ,, दलपत छगन, पोलि. एजेन्सी आफीस	६– ६– ०
,, ,, नरसिंग भट सुरत्राणा वाईकर	६– ०– ०
,, ,, ज्ञानप्रकाशकर्ते.	१२–१२– ०
,, ,, ललु भाई अंबालाल, वकील	६– ६– ०
,, ,, श्रीकन्हैयालालशर्मा शास्त्री	६– ६– ०
,, ,, शिवराम गोविंद धारकर मुंबई... ...	६– ०– ०
,, ,, गणपतराव अमृत मानकर.	१२–१२– ०
,, ,, विनायक प्रभाकर गोरे.	६– ०– ०
,, ,, हरीराम जगमल्ल, ओव्हरसियर... ...	६– ६– ०
,, ,, विठ्ठल नारायण फाटक, हेडमास्तर ...	६– ६– ०
,, ,, रघुनाथ वामन वैद्य असि. मास्तर. ...	६– ६– ०
,, ,, नरभेराम जिवनराम वकील	१२–१२– ०
,, ,, पांडुरंग नारायण चिटणीस	६– ६– ०
,, ,, अण्णा शास्त्री आठलेकर	६– ६– ०
,, ,, रामचंद्र मोरेश्वर बापट, डे. पो. मा.	६– ०– ०
,, ,, रामभाऊ आचार्य पब्लि. प्रासिक्युटर	१२–१२– ०
नेटिव लायब्ररी इलीचपूर	६– ६– ०
,, ,, दाभोय..................	१२–१२– ०
,, ,, कोलापूर	६– ६– ०
,, ,, दापोली	६–१२– ०
,, रीडिंगरूम, रामपूर	१२–१२– ०
,, लायब्ररी, कल्याण	६– ६– ०
,, ,, खंडवा	६– ६– ०
मि. के. जी. गुप्त सिविल सर्व्हिस..................	१०– ०– ०
रेवरेंड. जे. हल साहेब	६– ६– ०
प्रोफेसर पी. पिटर्सन.	६– ०– ०
डा. नारायणराव विनायक	६– ६– ०
गुजराथ व्हर्न्याक्युलर सोसायटी, अहमदाबाद.........	२५– ०– ०

Registered No. 98 of 1877.

सूचना.

	रु.	आ.
वर्षाची वर्गणी, आगाऊ	६	०
मुंबईबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दरवर्षीचे	०	६

All communications to be addressed to the Manager Mr. Mahâdev Nârâyan Pandit, No. 29 *Moroba Popatji's Oart, Kalka Devi Road, Bombay.*

ग्रंथकर्त्याच्या नांवचा वगैरे सर्व प्रकारचा पत्रव्यवहार मुंबई मोरोबा पोपटजीची वाडी घर नंबर २९, या पत्त्यावर रा. रा. महादेव नारायण पंडित "म्यानेजर वेदार्थयत्न" यांच्याशीं ठेवावा.

विशेष सूचना.—आमच्या कितीएक वर्गणीदारांस एक वर्ष पुरें होऊन दुसऱ्या वर्षाचे ३ अंक पोंचले असूनही त्यांच्याकडून मागील सालच्या वर्गणीचा पैसा अद्याप येत नाहीं. तर मेहेरबानी करून तो त्यांनीं "आगाऊ" शब्दाकडे विशेष लक्ष देऊन लवकर पाठवावा. तिकीटें पाठविणें झाल्यास अर्धा आणा दराचीं असून दर रुपयास अर्धा आणा वर्ताळा असावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

THE VEDÂRTHAYATNA

OR

AN ATTEMPT TO INTERPRET THE VEDAS.

वेदार्थयत्न.

ऋग्वेदसंहिता

पदांसहित व

तिचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

पुस्तक २. आगष्ट सन १८७७. अंक २.
Vol 2 Augt 1877 No 17

मुंबई:

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

(हें सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदलें आहे.)

माझे

सर्व आर्य बंधु व भगिनी

यांस

हें भाषांतर

सादर समर्पण केलें आहे.

भाषांतरकर्ता.

२. आमचे पितर अंगिरस [आपल्या] स्तोत्रांच्या योगानें प्रचंड दुर्गहि [फोडीत असत], [आपल्या] कवनस्वरानें पर्वतालाहि फोडीत असत. ते आम्हांकरितां महान् स्वर्गाचा मार्ग उत्पन्न करिते झाले, ते दिवस, प्रकाश, सूर्य [आणि] प्रभारूप गाई ह्यांस शोधून काढिते झाले.

2. Even the mighty fortresses [did] our ancestors [break] through [their] hymns, [did our ancestors] the Angirases, break the mountain with [their] prayer. They prepared for us the way of the vast heaven. They discovered the day, the effulgence, the sun, the heavenly cows.

वांस कृपा येऊन ते मेघ फोडून पाऊस पाडीत. परंतु हेच जर शब्द पुरातनकाळीं ऋषींस मोठमोठे चमत्कार करण्याची शक्ति होती असा आग्रह धरणारा कोणी मनुष्य अक्षरशः समजेल तर त्याला पाहिजे तसा अर्थ यांतून निघेल. आणि पुराणादिकांत ज्या ऋषींच्या चमत्कारांविषयीं, अद्भुतशक्तीविषयीं आणि विलक्षण दीर्घायुष्याविषयीं वगैरे कथा सांगितल्या आहेत, त्या जशा कितीएक वेदवाणीविरुद्ध (आणि वास्तवच कल्पित) आहेत, तशाच वेदवाणीचा भावार्थ न समजतां अक्षरशः अर्थ समजल्यामुळें निष्पन्न झाल्या आहेत.

'प्रचंड दुर्ग '=' वीळु चिद् दृळ्हा.' हे ' प्रचंड दुर्ग ' आणि ' पर्वत' एकच.

' महान् स्वर्गलोकाचा मार्ग उत्पन्न करिते झाले '=' बृहतो दिवो गातुं चक्रुः'. म्हणजे स्तोत्रांच्या द्वारें अग्निभक्तीचा प्रचार पाडिला, आणि तेणेंकरून स्वर्गी जाण्याचें साधन आम्हांला करून दिलें. अंगिरस हे जे अतिपुरातन देवभक्त यांणीं अग्नीचा आणि तेजाचा शोध प्रथम लावून त्यांणींच अग्निभक्तीचा प्रचार चालू केला अशा अर्थाचीं ज्ञापकें आणि स्पष्ट उच्चारहि ऋग्वेदांत आले आहेत. सू. ६२, मं. २, ५ पहा आणि ते उत्तम स्तोत्रकर्ते असत, त्यांचें स्तोत्र ऐकून इन्द्र प्रसन्न झाला आणि स्वर्गीच्या गाई (म्हणजे मेघोदकें आणि सूर्यप्रकाश) यांस वृत्रानें आपल्या गोठ्यांत कोंडून ठेविलें होतें तेथून मुक्त केल्या. तर देवांची उपासना करून अग्नीच्या द्वारें त्यांस प्रसन्न करणें हा जो त्यांणीं अति पुरातन काळापासून प्रचार घालून दिला तोच स्वर्गाचा मार्ग येथें सांगितलेला समजावयाचा आहे. ह्या सूक्ताचा कर्ता जो पराशर तो अंगिरसकुळांतील नव्हता. असें असतां अंगिरसांला तो

दर्धन्नृतं धनयंन्नस्य धीतिमादिदर्यो दिंधिष्वोऽ३विभृत्राः ।
अतृंष्यन्तीरपसौ यन्त्यच्छां देवाञ्जन्मं प्रयंसा वर्धयंन्तीः ॥ ३ ॥

दर्धन् । ऋतम् । धनयन् । अस्य । धीतिम् । आत् । इत् । अर्यः । दिधिष्वः । विऽभृत्राः ।
अतृंष्यन्तीः । अपसः । यन्ति । अच्छं । देवान् । जन्मं । प्रयंसा । वर्धयंन्तीः ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. [अङ्गिरसः] ऋतं (=सत्यभूतम् अग्निं) दधन् (=गार्हपत्यादिरूपेणास्थापयन्) [तथा] अस्य (=ऋतस्य सत्यभूतस्य अग्नेः) धीतिं (=कर्म=तत्प्रीत्यर्थं यज्ञादिकं कर्म) धनयन् (=अधनयन्=धनमकुर्वन्=धनवन्मेनिरे) । आदित् (=ततः प्रभृत्येव) अर्यः (=हविरादिदानेन सेवकभूता) दिधिष्वः (=वसूनां धारयित्र्यो= धनसंपन्ना) विभृत्राः (=विविधं हताः=पुत्रपौत्राद्यपत्यद्वारात्मानं विविधं प्रसारयन्त्यः) अतृष्यन्तीः (=अतृष्यन्त्यः=अनन्यतृषायुक्ता) अपसः (=कर्मकुशला=यज्ञनिष्णाता) [विशः=प्रजाः] देवान् जन्म प्रयसा वर्धयन्तीः (=देवान् जन्मानि प्रयसा वर्धयन्त्यः=देवजातं=सर्वान् देवान् हविःप्रदानेन वर्धयितुम्) अच्छ यन्ति (=अग्निं प्रति गच्छन्ति) ॥

अत्रायमर्थः । नः पितरोङ्गिरसः प्रथममग्न्याधानं चक्रुः अग्नेरुपासनाप्रचारं च स्थापयामासुः । ततः प्रभृत्येव सर्वाः प्रजा अग्नेः सेवायां निरता भूत्वा अनन्यभक्तिभावेन तं भजन्ते । अग्निभजनं च देवजनतर्पणाय कुर्वन्ति तेषामग्निमुखत्वादिति ॥

देवान् जन्मेत्यत्र शार्मण्यपण्डितो ग्रास्मानो देवानां जन्मेत्यर्थे देवान् जन्मेत्यार्षरूपमित्याह ॥

'आमचे पितर अथवा वडिल' असें म्हणतो याचें कारण असें आहे कीं, अंगिरस हे अतिपुरातन उपासक असून त्यांच्या भक्तीची आणि उपासनेची व उत्कृष्ट स्तोत्रकर्ते अशी प्रख्याति असल्यामुळें ते आमचे म्हणजे सर्व आर्य जनांचे पितर असें पराशर ऋषि म्हणतात. याप्रमाणेंच दुसऱ्या कितोएक मंत्रांतहि यांस आमचे पितर असें म्हटलें आहे (सू. ६२, मंत्र २, ऋ. १०.१४.१३० पहा.) यावरून आमचे आर्य पूर्वज आपल्या प्रसिद्ध वाडवडिलांविषयीं फार अभिमान बाळगीत आणि त्यांस पूज्य मानीत असत हें उघड आहे.

'दिवस, प्रकाश, सूर्य आणि प्रभारूप गाई, ह्यांस शोधून काढिते झाले.' अन्य मंत्रांतहि म्हटलें आहे कीं, 'अंगिरसांनीं इंद्राची स्तुति करितांच तो वलाला,

३. [अंगिरस] खऱ्या [अग्नी]ला स्थापिते झाले, [आणि ते] खऱ्या [अग्नी]च्या उपासनेला [आपलें] धन समजूं लागले. [आणि] त्या दिवसापासूनच सेवातत्पर, द्रव्यसंपन्न, विस्तार पावणाऱ्या, अनन्यभक्तिसंपन्न, कर्मकुशळ [अशा प्रजा] देवजनाला हविरन्नानें तृप्त करण्याच्या हेतूनें [अग्नी]ला भजूं लागल्या.

3. They established the holy [Agni]. They valued his worship. From that very day the people, pious, rich, spreading, free from passions [and] skilful in actions, serve him, with the desire of gratifying the divine race with [the] oblation.

म्हणजे वृत्राला, मारून टाकिता झाला, आणि वृत्ररूप पर्वताचीं प्रचंड शिखरें जिकडे तिकडे फेकून देता झाला (ऋ. २. १५. ८; ४. १६. ८), 'सत्य स्तुति करणाऱ्या अंगिरसांनीं इंद्राची स्तुति करितांच इंद्र वृत्राला मारिता झाला' (ऋ. ६. १८. ५). 'हे इंद्रा, तूं जेव्हां अंगिरसांकरितां गाईंचा गोठा उघडिलास' (१. १३२. ४), 'लपवून ठेविलेल्या ज्या गाई त्यांस मोकळ्या करून इंद्रानें अंगिरसांकरितां हाकून आणिल्या' (उत् गाः आजत् अङ्गिरोभ्यः आविः कृण्वन् गुहा सतीः ८. १४.८).

या ऋचेवरून वैदिक काळीं स्तोत्राच्या म्हणजे प्रार्थनेच्या शक्तीविषयीं किती मोठी भक्ति असे तें उघड दिसून येतें.

खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटल्यास हा मंत्र श्लोकाप्रमाणें म्हणतां येतोः—

वीळु चिद्दृळ्हा पितरो न उक्थैः
अद्रिं रुजन्नङ्गिरसो रवेण ।
चक्रुर्दिवो बृहतो गातुमस्मे
अहः स्वर्विविदुः केतुमुस्राः ॥

३. वरच्या मंत्रांत सांगितलें कीं अंगिरसांनीं आम्हांकरितां स्वर्गाचा मार्ग उत्पन्न केला. त्याच विचारतरंगाला अनुसरून ऋषि म्हणतो कीं, 'अंगिरसांनीं पवित्र अग्नीची स्थापना केली, त्यांनींच अग्नीची उपासना हेंच आपलें धन असें मानिलें. त्या दिवसापासून अग्नीची उपासना प्रचारांत आली, आणि सकळ भक्तिमान्, श्रीमान्, प्रजा त्याच्या सेवेला लागली आणि दुसऱ्या कशाची इच्छा न करितां अग्नीचीच सेवा करण्यांत प्रवृत्त झाली आणि देवांस हवि देऊन तृप्त करणें झालें म्हणजे या प्रकारें अग्नीच्या द्वारें (अग्नीच्या मुखांत हवि देऊन) करीत असतात. आणि त्या दिवसापासून या अग्निभजक प्रजांचा विस्तार होत गेला आहे'. म्हणजे अंगिरसांनीं अग्निदेवाची उपासना स्थापिल्यापासून ती उपासना प्रचारांत आली आहे. आणि त्या दिवसापासून देवांस हवि देण्यासाठीं सर्व लोक अग्नीजवळच जात असतात. याप्रमाणें या मंत्राचा भावार्थ आहे.

मथीद्यदीं विभृतो मातरिश्वा गृहेगृहे श्येतो जेन्यो भूत् ।
आदीं राज्ञे न सहीयसे सचा सन्ना दूत्यं१ भृगवाणो विवाय॥४॥

मथीत् । यत् । ईम् । विऽभृतः । मातरिश्वा । गृहेऽगृहे । श्येतः । जेन्यः । भूत् ।
आत् । ईम् । राज्ञे । न । सहीयसे । सचा । सन् । आ । दूत्यम् । भृगवाणः । विवाय ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. यद् (=यदा) ईम् (=एतमग्निं) मातरिश्वा मथीत् (=अमथ्नात्=मन्थनेन जनितवान्) [यदा च] विभृतः (=विहृतः=विहरणशीलः=क्रीडाप्रियः) श्येतः (=शुक्लवर्णो) जेन्यः (=अभिजातः) [एतादृशोऽग्निः] गृहे गृहे (=सर्वस्मिन्यज्ञगृहे) भूत् (=स्थापितोभवत्), आत् (= ततःप्रभृति) भृगवाणः (=भृगुरिव=सूर्यकिरणवदाचरन्=अतिमात्रत्वरायुक्तः) [स], सहीयसे राज्ञे न (=प्रबलाय राज्ञे यथा=यथा कश्चित्पुरुषो प्रबलस्य राज्ञो दूतत्वं स्वीकरोति तद्वत्) [उपासकाय] सचा सन् (=अनुचरवन्नित्यं संनिधौ तिष्ठन्) दूत्यं (=दूतत्वम्) आ विवाय (=स्वीचकार=अन्वतिष्ठत्) ॥

यदा मातरिश्वा निर्मथ्याग्निं गृहे गृहे स्थापितवान् ततःप्रभृति सोयमग्निर्मनुष्यप्रत्तं हविर्देवेभ्यो नेतुं त्वरिततमो दूतो भूतोस्तीत्यर्थः ॥

' सेवातत्पर '=' अर्यः '. म्हणजे उपासना अथवा सेवा करण्याविषयीं तत्पर. ऋ. १०. ३९. ५ हा मंत्र आणि त्याजवरील सायणभाष्य पहा.

' द्रव्यसंपन्न '=' दिधिष्वः '. हा शब्द कठिण आहे. तो ऋग्वेदांत च्यार पांचच ठिकाणीं आलेला आहे. आम्हीं येथें ऋ. १०. ७८. ५ यांतील ' दिधिषवो न रथ्यः सुदानवः' या शब्दांवरच्या सायणभाष्याला अनुसरून अर्थ केला आहे. परंतु त्या शब्दाचे प्रयोग फार येत नसल्यामुळें त्याचा अर्थ काय आहे तें निश्चयानें सांगूं शकवत नाहीं. ग्रास्मान या शार्मण्य पंडितांनीं धात्वर्थास अनुसरून या ठिकाणीं ' मिळविण्याविषयीं आशा करणाऱ्या' असा अर्थ केला आहे. पण तो येथें अथवा अन्यत्र तरी जुळतो असें आम्हांस वाटत नाहीं.

' विस्तार पावणाऱ्या '=' विभृत्राः '. हाहि शब्द कठिण आहे. ' अग्निहोत्राच्या कर्मांत वगैरे अग्नीला खेळविणाऱ्या' असा अर्थ सायणांनीं केला आहे.

' देवजनांला '=' देवान् जन्म. ' म्हणजे देवांची जी जात अथवा सर्व देवांची संख्या तिला. ' सर्व देवांला' इतकेंच विवक्षित आहे.

४. जेव्हां मातरिश्व्यानें याला मंथन करून जन्म दिलें [आणि] सुजात, शुक्लवर्ण, खिलाडू [अग्नि] घरोघर झाला त्या दिवसापासून, प्रबळ राजाचें [दूतपण पत्करावें] तसें, किरणासारिख्या चपळ [अग्नी]नें संनिध राहून [यजमानाचें] दूतपण पत्करिलें.

4. When Mâtaris'vâ churned Him out [and] He the playful, the fair [and] the well-bred became [established] in every home—from that time He, quick as light, has attended upon [the worshipper] and become [his] messenger as of a mighty King.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटला पाहिजे, म्हणजे उपजातिवृत्ताला बसतोः—

दधन्नृतं धनयँन्नस्य धीतिम्
आदिदर्यो दिधिषुओ विभृत्राः ।
अतृष्यँन्तीरपँसो यन्ति अच्छा
देवान् जँन्म प्रयसाँ वर्धयन्तीः ॥

'४. अग्नि हा प्रथम भूलोकीं नव्हता त्याला मातरिश्व्यानें पृथ्वीवर आणिलें आणि मनुष्यांजवळ दिलें अशी जी कथा (सू. ६०, मं. १ आणि टीप पहा) तिला अनुसरून ऋषि म्हणतो कीं, 'अग्नीला मातरिश्व्यानें प्रथम जेव्हां मंथून जन्म दिलें, आणि अशा प्रकारें जन्मलेला शुक्लवर्ण आणि सद्गुणी अग्नि खेळत खेळत घरोघर झाला, त्या दिवसापासून अग्नि उपासक लोकांचा सूर्यकिरणासारिखा मोठ्या वेगानें चालणारा, आणि देवांप्रत हवि पोंहचविणारा दूत झाला; आणि तो तरी सामान्य दूताप्रमाणें दिसत नाहीं तर एकाद्या महान् राजदूताप्रमाणेंच दिसतो.' म्हणजे मातरिश्व्यानें अग्नि निर्माण करून मनुष्यांस दिल्या दिवसापासून देवांप्रीत्यर्थ अग्नींत हवि घालण्याचा प्रचार लोकांत चालू झाला, आणि तेथपासून आजपर्यंत तसाच चालला आहे.

'सुजात'=' जेन्यः'. म्हणजे द्वाड नव्हे, एकाद्या सद्गुणी मुलाप्रमाणें उगीच राहणारा, त्रास न देणारा, सर्वांस आनंद करणारा, सांगितलेलें काम निमूटपणें करणारा, आणि नम्रतेनें भरलेला.

'शुक्लवर्ण'=' श्येतः'. हें स्वभावोक्तिविशेषण आहे. तरुण अग्नीला शुक्लवर्ण हें विशेषण शोभतें.

'किरणासारिखा'='भृगवाणः'. 'भृगु' शब्दाचा मूळ अर्थ किरण असा आहे. त्यावरून भृगवाणः म्हणजे भृगूप्रमाणें वागणारा अथवा चालणारा असा अर्थ होतो. ऋ. ४. ७. ४ यांत आजभ्रुः केतुम् आयवः भृगवाणं विशेविशे याजवरील भाष्यांत भृगूप्रमाणें म्हणजे 'सूर्यकिरणाप्रमाणें तेजस्वी' असा अर्थ सायणाचार्य करितात.

महे यत्पित्र ईं रसं दिवे करव त्सरत्पृशन्यश्चिकित्वान् ।
सृजदस्ता धृषता दिद्युमस्मै स्वायां देवो दुहितरि त्विषिं धात् ॥
॥ ५ ॥ १५ ॥

महे । यत् । पित्रे । ईम् । रसम् । दिवे । कः । अव । त्सरत् । पृशन्यः । चिकित्वान् ।
सृजत् । अस्ता । धृषता । दिद्युम् । अस्मै । स्वायाम् । देवः । दुहितरि । त्विषिम् । धात् ॥ ९ ॥ १९ ॥

भाषायाम्.

५. यद् (=यदा) ईम् (=अयम् ? यजमानः) महे पित्रे दिवे (=महते द्युरूपाय पित्रे) रसं (=हविरूपमन्नं) कः (=अकः=अकरोत्), [तदा] पृशन्यः (=अभिस्पर्शकुशलो=राक्षसः) चिकित्वान् (=एतत् ज्ञात्वा) अव त्सरत् (=भयात्पलायते स्म)। [तदानीम्] अस्ता देवः (=धनुर्धरो द्युरूपो देवो) धृषता (=धर्षकेण धनुषा) अस्मै (=राक्षसाय) दिद्युं (=दीप्यमानं बाणं) सृजत् (=विसृष्टवान्) [अपि च] स्वायां दुहितरि (=स्वकीयायां पुत्र्याम्=उषसि) त्विषिं (=दीप्तिं) धात् (=अधात्=स्थापितवान्) ॥

दुर्बोधेयमृक्। तदपि प्रायः अनेनार्थेन भवितव्यम्। मातरिश्वकृतादग्नेः स्वर्गानयनात्पूर्वं वृत्रादिका असुरा उषआदीनि तेजांसि व्याप्य भूमौ प्रकाशो यथा न पतति तथाकुर्वन्। यदा तु यजमाना उपासका मातरिश्वसकाशादग्निं दूतं लब्ध्वा महते द्युदेवाय हविः प्रेषितवन्तस्तदा तद्दृष्ट्वा वृत्रादयोसुराः पलायिताः। तान्प्रति द्यौः पिता बाणं विसृज्य उषसि पुनरपि दीप्तिं स्थापयित्वा सा यथा व्युच्छति तथाकरोदिति ॥

ही ऋचा आणि उपजाति श्लोक यांत खालीं दाखविल्याप्रमाणें ह्रस्वदीर्घांचें अंतर आहे:—

मथीद्यदीं विभृतॉ मातरिश्वा
गृहे गृहे शीऍतॉ जेनिओ भूत् ।
आदीं रॉज्ञे नॅ सॅह्यसे सचा सन्
आ दूतिअं भृगवॉणो विवाय ॥

उत्तरार्धांत बरेंच क्रमाज्यास्त करावें लागतें. त्यांत विशेष हें कीं ‘सहीयसे’ या पदाबद्दल ‘सॅह्यसे’ म्हणावें लागतें. जशीं एक अक्षराचीं दोन दोन अक्षरें करून म्हणावीं लागतात त्याप्रमाणेंच दोन अक्षरांचें एक अक्षर करून म्हणावें लागतें त्याचें हें पहिलेंच आणि एक चांगलें उदाहरण आहे.

५. जेव्हां महान् पिता [जो] द्यू [त्या]साठीं अन्नरस यानें सिद्ध केला [तेव्हां] राक्षसांनीं [तें] जाणून [ते] पळून गेले. [तेव्हां] धनुर्धर देव शौर्ययुक्त धनुष्यानें त्याच्या अंगावर तेजस्वी बाण मारिता झाला, [आणि] आपल्या कन्येच्या आंगीं तेज स्थापिता झाला.

5. When he (the sacrificer) prepared the oblation for great Father Dyaus, the demon knowing it ran away. The divine archer shot the burning arrow at him with [his] bow, [and] placed effulgence in his daughter.

---

५. हा मंत्र अतिशय कठिण आहे. आम्हीं केलेल्या भाषांतराचा भावार्थ असा आहे कीं, 'अग्नीला भूमीवर आणण्यापूर्वीं यज्ञयागादिक होत नसत, आणि वृत्रादि असुर उषेच्या वगैरे प्रकाशाला भूमीवर पडूं देत नसत, आणि उषेला जणुं निस्तेज करून टाकिली होती. तर अग्नीला भूमीवर आणिल्यानंतर उपासकांनीं देवांला पोंहचावें म्हणून हवि अग्नींत अर्पण केलें. तेव्हां तें पाहून वृत्रादि असुर पळूं लागले. त्याबरोबर धनुष्य धारण करण्याविषयीं परमकुशल असा जो द्यू त्याणें त्यांजवर दिव्य बाण (वीज हाच कोणी बाण) मारिला. आणि त्याची कन्या जी उषा, तिचे आंगीं प्रकाश पुनः स्थापित केला आणि तिला पुनः पूर्ववत् उगवूं दिली '.

' महान् पिता जो द्यू त्यासाठीं '='महे पित्रे दिवे. ' द्युलोक म्हणजे पृथ्वीच्यावर जो महान् तेजोमय अतिप्रचंड प्रदेश, ज्याच्या पोटीं सूर्यचंद्रादि तारे आणि उषा इत्यादि अनेक तेजें उगवतात आणि मावळतात, ज्याच्या आंत मेघमंडळ असतें तो. त्याला जसे ग्रीक लोक देव मानून ' जौस् पेतर ' आणि रोमन लोक ' ग्यौस् पेतर ' अथवा ' जूपितर ' असें म्हणत, तसेच त्यांचे बंधु जे आपले पूर्वज आर्य लोक ते त्याला देव मानून ' द्यौस् पितर ' असें म्हणत, तें या व यासारिख्या दुसऱ्या अनेक ऋचांवरून दिसून येतें. आणि जसे आपले आर्य पूर्वज द्यूला उषा इत्यादि देवतांचा बाप म्हणून समजत तसाच ग्रीक आणि रोमन लोकहि त्याला सगळ्या देवांचा बाप असें समजत. त्याप्रमाणेंच आर्य लोक जशी पृथिवीला द्यूची स्त्री असें मानीत (ऋ १. १६४. ३३; तन्माता पृथिवी तत्पिता द्यौः १. ८९. ४; द्यौर्वः पिता पृथिवी माता १. १९१. ६; ५.४३.२), तसेच ग्रीक आणि रोमन लोकहि पृथिवीला जूपितरची स्त्री आणि देवांची आणि दैत्यांची वगैरे माता असें समजत. आणि आमच्या वेदांवरून जसें सूर्याला द्यूचा पुत्र म्हटलेलें आढळतें (सू. ४८, मं. ८ याजवरील टीप पहा) तसाच ग्रीक आणि रोमन लोकांच्या पुराणांत सूर्याला (फीवस् याला) जूपितरचा पुत्र असें म्हटलेलें आढळतें.

स्व आ यस्तुभ्यं दम आ विभाति नमो वा दाशादुशतो अनु द्यून् ।
वर्धो अग्ने वयो अस्य द्विबर्हा यासद्राया सरथं यं जुनासि ॥६॥

स्वे । आ । यः । तुभ्यम् । दमे । आ । विऽभाति । नमः । वा । दाशात् । उशतः । अनु । द्यून् ।
वर्धो इति । अग्ने । वयः । अस्य । द्विऽबर्हाः । यासत् । राया । सऽरथम् । यम् । जुनासि ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. [हे अग्ने], य [उपासकः] स्वे आ दमे आ (=स्वकीये गृहे) तुभ्यं विभाति (=विभायै समिधो ददाति=त्वं यथा विभासि तथा समिधो ददाति) वा (=अथवा) उशतः (=कामयमानस्य=हविर्वाञ्छतस्तव=हविर्वाञ्छते तुभ्यम्) अनु द्यून् (=दिने दिने) नमः (=हविः) दाशात् (=दद्यात्) अस्य (=तस्योपासकस्य) वयः (=अन्नसंपदं) द्विबर्हाः (=द्वयोः स्थानयोर्द्यावापृथिव्याख्ययोः परिवृढः=उभयलोकप्रसिद्धमहिमा) [त्वं] हे अग्ने, वर्धो (=वर्ध उ=वर्धयैव) । [हे अग्ने], यं सरथं (=युयुत्सुं) [त्वं] जुनासि (=युद्धे प्रेरयसि=सहायो भूत्वा रक्षसि) [स] राया (=धनेन=शत्रुभ्यो हृतेन सह) यासत् (=गच्छेत्) ॥

य उपासकस्त्वां स्वकीये गृहे समेधयति हविर्दानादिना वा दिने दिने तर्पयति तस्य अन्नसंपदं त्वं वर्धयस्येव तं च युद्धे जेतारं कृत्वा तस्य रथं शत्रुभ्यो हृतेन धनेन पूरयसीति भावः ॥

द्विबर्हःशब्दव्याख्याने वयं सायणानेवानुसरामः । ते हि तेषु तेषु मन्वान्तरेषु तमेवार्थं कुर्वन्ति । यास्कोपि तमेवार्थं विवृवान् । एतावता पुराणव्याख्यानपरंपरागतः सोर्थ इति सिद्धम् । तेषु तेषु स्थलेष्वपि स न युज्यत इति न । अतः कारणात् सायणाननुसरामः ॥

'याणें'='ईम्.' म्हणजे येथें उपासक अथवा यजमान असें समजावयाचें आहे.

'धनुर्धर देव'='अस्ता देवः' म्हणजे 'द्यू.'

'राक्षसांनीं तें जाणून ते पळून गेले'='अव त्सरत् पृशन्यः चिकित्वान्.' 'पृशन्य' शब्दाचा हा अर्थ आम्हीं सायणांप्रमाणें केला आहे. परंतु आम्हांस संशय आहे. दुसऱ्या दोन तीन ठिकाणीं 'पृशन' शब्द आला आहे पण त्यावरून अर्थनिर्णय होत नाहीं.

'आपल्या कन्यकेच्या आंगीं'='स्वायां दुहितरि.' सू. ४८, मं.८ आणि त्याजवरील टीप पहा.

या मंत्रांत सायणाचार्य 'दिवे' म्हणजे

६. [हे अग्नी], जो [कोण] तुला आपल्या घरीं प्रदीप्त करितो अथवा [जो कोण] तुला हविरिच्छूला प्रतिदिवशीं [हवि] अर्पण करितो, त्याचीं अन्नसंपत्ति उभयलोकीं मोठा असा जो तूं तो वाढीव. ज्या योद्ध्याला [तूं] [रणांत] साहाय्य करिशील [तो] धन घेऊन जाईल.

6. He that burns [fuel] to Thee in his house, or that from day to day offers oblation to thee who desirest it,—do augment, O Agni, renowned in both worlds, the wealth of that [man]. That warrior whom thou inspirest shall return with wealth.

द्युरूप देव असा अर्थ न करितां 'दीप्तिमान् देवजनांचा समूह' असा करितात. एकंदरींत मंत्र कठिण आहे असें वर सांगितलेंच आहे.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटला पाहिजेः—

मह यॅत्पित्र ईं रसं दिवे कः
अव त्सरत् पृशनिअश्चिकित्वान् ।
सृजॅदस्ता धृषतॉ दिद्युमस्मै
स्वायां दॅवो दुहितरि त्विषिं धात् ॥

---

६. या मंत्रांत अग्नीचा कृपाळुपणा सांगितला आहे. ऋषि म्हणतो, 'हे अग्नी, जो उपासक तुला आपल्या घरीं पेटवून समिधा म्हणजे लांकडें तुला देईल, अथवा प्रतिदिनीं तुला हवि अर्पण करील, त्याचें धनधान्य वृद्धिंगत होई असें तूं करितोस. कारण कीं तूं भूमि आणि द्युलोक या दोनहि लोकांत मोठा गणिला जातोस; ज्या उपासकाला युद्धांत तुझें साहाय्य असेल तो समरांगणांत जयी होऊन शत्रूपासून हरण करून घेतलेली लूट आपल्याजवळ घेऊन घरीं जातो.'

'तुला आपल्या घरीं प्रदीप्त करितो' =' स्वे आ दमे आ तुभ्यं विभाति.' अक्षरशः अर्थ, 'तुजकरितां आपल्या घरीं जाळितो;' म्हणजे 'तुजकरितां लांकडें जाळितो,' अर्थात् 'तुला प्रज्वलित करितो.'

'हविरिच्छूला'=' उशतः.' अक्षरशः अर्थ 'प्रीति करणाऱ्याला' असा आहे. यावरून उपासकावर लाड अथवा प्रीति करणारा जो तूं त्याला, असाहि भावार्थ निघूं शकेल.

'उभयलोकीं मोठा असा जो तूं तो' ='द्विवर्हाः.' हा अर्थ आम्हीं सायणानुसार केला आहे. ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं हा शब्द आला आहे. आणि बहुतेक सर्व ठिकाणीं सायणाचार्य तोच अर्थ करितात, आणि यास्कांनींहि तोच दिला आहे. यावरून तो परंपरागत आले-

अग्निं विश्वा अभि पृक्षः सचन्ते समुद्रं न स्रवतः सप्त यह्वीः ।
न जामिभिर्वि चिकिते वयो नो विदा देवेषु प्रमतिं चिकित्वान्॥७

अग्निम् । विश्वाः । अभि । पृक्षः । सचन्ते । समुद्रम् । न । स्रवतः ।
सप्त । यह्वीः ।
न । जामिऽभिः । वि । चिकिते । वयः । नः । विदाः । देवेषु ।
प्रऽमतिम् । चिकित्वान् ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. यह्वीः (=यह्व्यः =महत्यः) सप्त (=सप्तसंख्याकाः) स्रवतः (=नद्यः) समुद्रं न (=समुद्रं यथा) [अभि सचन्ते=अभिगच्छन्ति] [तद्वत्] विश्वाः पृक्षः (=सर्वाण्यन्नानि=उपासकेभ्यो दातव्यानि सस्यादीनि) अग्निम् अभि सचन्ते (=आभिमुख्येन समवयन्ति)। नः (=अस्माकं) जामिभिः (=स्वसृभ्रात्रादिभिर्ज्ञातिभिः) वयः (=अन्नं) न विचिकिते (=न ज्ञायते=न लभ्यते)। [अतःकारणात्] चिकित्वान् (=सर्वज्ञस्) [त्वं] [हे अग्ने], देवेषु (=इन्द्रादिषु) प्रमतिम् (=अस्माकं विषयेऽनुग्रहं) विदाः (=अस्मभ्यं लम्भय)॥

अत्रेदमुक्तं भवति। यथा जलपरिपूर्णः समुद्रो भवति तथा सर्वविधैरन्नैः संपन्नोऽग्निर्भवति। वयं तु निष्किंचना अस्माकं पुत्रभृत्यादीन् स्वसृभ्रात्रादींश्चाप्तान् भर्तुमसमर्थाः स्मः। तस्मादग्निरेव देवान् अस्मद्विषये प्रसाद्य तेभ्यः सकाशाद् अस्मभ्यम् अन्नं लम्भयत्विति॥

स्रवतः सप्त यह्वीरित्यस्य प्रभूतप्रवाहरूपेण गच्छन्त्यः सर्वा अपि नद्य इति भावः। सप्त स्रवतां (सप्त सिन्धूनां) मेघोदकैः सह समानार्थकत्वं तु सू. ३५, मं. ८ इत्यत्र महाराष्ट्रटीकायां प्रतिपादितमेव॥

ला आहे, सायणांनीं कल्पनेनें बसविलेला नव्हे असें सिद्ध होतें. यास्तव आणि फारकरून तो सर्वत्र जुळतो म्हणून पाश्चिमात्य कितीएक पंडितांनीं ‘दुष्पट बळकट’ असा केलेला जो अर्थ त्यापेक्षां सायणांस अनुसरणें हें चांगलें असें आम्ही समजतों.

वृत्तसुखासाठीं हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटला पाहिजेः—

स्व आ यॅस्तुभ्यं दम आ विभाति
नमो वॉ दाशॅदुशतो अनु द्यून् ।
वर्धो ॲग्ने वॅयो ॲस्य द्विबर्हा
यासद्रॅया सॅरथॅं यं जुनासि ॥

७. सप्त महानद्या समुद्राकडेस धांवतात तशा सर्व अन्नसंपत्ति अग्नीकडेस धांवत असतात. आमच्या कुटुंबास तर अन्न ठाऊक नाहीं; [तर] [सर्व] जाणणारा [जो तूं तो] देवांची कृपा [आम्हांवर] होई असें कर.

7. All riches attend upon Agni as the Seven Rivers [attend upon] the sea. Food is unknown to our relations. Do thou [therefore] Agni, who knowest all, create in the Gods benevolence towards us.

---

७. या मंत्रांत ऋषि म्हणतो, 'अग्नि अतिश्रीमान् होय, आम्ही अतिदरिद्री आहोंत; अग्नीची लक्ष्मी इतकी आहे कीं जशीं मेघोदकें पडून चहूंकडून समुद्राकडेसच शेवटीं वाहून जातात तसे अन्नादिक सर्व संपत्तींचे प्रवाह अग्नीकडेस वाहतात; म्हणजे अग्नीचे घरीं अन्नादि संपत्ति भरून वाहत असतात, आणि आम्ही तर इतके दरिद्री आहोंत कीं आमच्या घरांतील माणसांस अन्न पाहावयास सुद्धा मिळत नाहीं. तर सर्व जाणणारा जो अग्नि तो देवांस आम्हांविषयीं प्रसन्न करो, आणि आम्हांस खावयास मिळे असें करो.' याप्रमाणें पराशर ऋषीनें आपलें दीनत्व यांत वर्णिलें आहे, आणि अग्नि आपणांस आणि आपल्या बहिणभावांस अन्न देओ अशी प्रार्थना आहे.

'सप्त महानद्या'='स्रवतः सप्त यह्वीः.' हा अर्थ अक्षरशः आहे. परंतु या ठिकाणीं सप्त नद्या म्हणजे मेघोदकांच्या योगेंकरून भूमीवरून समुद्राकडे वाहणारे जे पृथिवीवरील सर्व प्रवाह ते, असा अर्थ आहे. कोणत्या तरी अमुक सात नद्या असें विवक्षित नाहीं. सू.३५,मं.८ याजवरील 'अंतरिक्ष' शब्दाविषयीं टीप पहा.

'अन्नसंपत्ति'= 'पृक्षः.' अक्षरशः 'अन्नें.' म्हणजे देवांस जीं हविरन्नें द्यावयाचीं तीं नव्हेत, तर देवांनीं मनुष्यांस द्यावयाचीं जीं तीं. पृक्ष् शब्दाचा असाहि अर्थ होतो याविषयीं ऋ. १. १३९. ३; ४. २३. ९; ७. ७४.५ आणि १.७३. ५ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा. पृक्ष् म्हणजे हविरन्न हा अर्थ तर प्रसिद्धच आहे.

'आमच्या कुटुंबास'='नः जामिभिः.' 'जामि' शब्द साधारण संस्कृतांत येत नाहीं. तो वेदांत प्रसिद्ध आहे. त्याचा अर्थ कुटुंबांतील माणुस असा होतो. सायणाचार्य तर एकाच भांड्यांत जेवतात (जमन्ति) म्हणून 'जामि' अशी व्युत्पत्ति सांगतात. एकाच घरांत राहणारे अगदीं जवळचे जे बहीण, भाऊ इत्यादि आप्त ते असा अर्थ आहे. ऋ. १. १८५. ५ यांत द्युलोक आणि भूलोक ह्या ज्या बहिणी त्यांस 'जामि' असें नांव दिलें आहे (ऋ. ३. ११. १ हाहि मंत्र पहा). या व दुसऱ्या मंत्रांवरून भाऊ, बहिणी, आणि त्यांसारिखेच जे अगदीं जवळचे आप्त ते जामि होत.

वृत्तानुरोधानें हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावा लागतोः—

आ यदिषे नृपतिं तेज आनट् शुचि रेतो निषिक्तं द्यौरभीके ।
अग्निः शर्धमनवद्यं युवानं स्वाध्यं जनयत्सूदयच्च ॥ ८ ॥

आ । यत् । इषे । नृऽपतिम् । तेजः । आनट् । शुचि । रेतः । निऽसिक्तम् । द्यौः । अभीके ।

अग्निः । शर्धम् । अनवद्यम् । युवानम् । सुऽआध्यम् । जनयत् । सूदयत् । च ॥ ८ ॥

भाषायाम्.

८. यद् (=यदा) [अग्निरूपं] तेजः इषे (=हविरन्नाय) नृपतिं (=यजमानं प्रति) आ आनट् (=प्राप्नोति) [तदा] [यजमानस्य] शुचि (=शुद्धं) द्यौः (=? द्योतमानं) रेतः (=वीर्यम्) अभीके (=गर्भाशये) निषिक्तम् (=उत्सृष्टं) [भवति]। अग्निः शर्धं (=बलवन्तम्) अनवद्यम् (=अवद्यरहितं=दोषहीनं) युवानं (=यौवनोपेतं) सुआध्यं (सुप्रज्ञम्) [एतादृशं पुत्रं] जनयत् (=जनयतु) सूदयच्च (=प्रेरयतु च) ॥

दुर्बोधेयमृक् सायणाचार्यैरेवं व्याख्याता । " अग्नेर्यत्तेजो नृपतिं नृणामृत्विजां पालकं यजमानमानट् । जाठररूपेण आ समन्ताद्व्याप्नोत् । किमर्थम् । इषे अन्नाय । कीदृशम् । शुचि शुद्धम् । द्यौर्दीप्तम् । तेन तेजसा परिपक्वमन्नं रसरूपं रेतो वीर्यमभीकेऽभ्यक्तेऽभिगते गर्भस्थाने निषिक्तं नितरां सिक्तमग्निर्वक्ष्यमाणगुणविशिष्टपुत्ररूपेण जनयत् । जनयतु । शर्धं बलवन्तमनवद्यमवद्यरहितं युवानं तरुणम् । जरारहितमित्यर्थः । स्वाध्यं शोभनकर्माणं शोभनप्रज्ञं वा । उत्पन्नं पुत्रं सूदयच्च । यागादिकर्मसु प्रेरयतु च । यद्वा रेत इत्युदकनाम । निषिक्तं मेघेन वृष्टमुदकमिषेऽन्नाय सस्यादिनिष्पत्तयेऽग्नेर्यत्तेज आनट् । व्याप्नोत् । वृष्ट्युदकेन भौमाग्नेः संयोगे सति हि सस्यान्युत्पद्यन्ते । कीदृशं तेजः । नृपतिम् । नृणां रक्षकम् । शुचि दीप्तम्। तादृशेन तेजसा युक्तो द्यौर्दीप्तोऽग्निरभीके आसन्नकाल एव शर्धादिगुणविशिष्टं पुत्रं जनयतु तं च प्रेरयतु यज्ञादा"विति ॥

वयं प्रायः सायणमनुसरामः । साधीयसोऽर्थस्य करणेऽस्माकमसमर्थत्वात् । तदपि स्यादेवमर्थः । यद्यदा अग्निरूपं तेज इषे हविरन्नाय नृपतिं यजमानं प्रति आनट् आगच्छत् । यदा मनुष्याः प्रथममग्निं सेवितुं प्रवृत्ता अभवन्नित्यर्थः । तदानीमेव द्यौर्द्योदिवः द्युरूपस्य देवपितुः शुचि शुद्धं रेतः वीर्यम् अभीके गर्भाशये निषिक्तं पतितमभूत् । एवमग्निः अनवद्यं दोषरहितं युवानं सदातरुणं सुआध्यं शोभनप्रज्ञम् ए-

८. जेव्हां [अग्निरूप] तेज अन्नासाठीं यजमानाप्रत आलें [तेव्हां] [यजमानाचें] शुक्लवर्ण रेत गर्भाशयांत पडलें. अग्नि [हा] बलवान्, निर्दोष, यौवनयुक्त [आणि] तेजस्वी [आणि] बुद्धिमान् [पुत्राला] जन्म देओ आणि [यज्ञांविषयीं] प्रेरणा करो.

8. When the effulgence [of Agni] comes to the rich sacrificer, the pure [and] brilliant semen is sprinkled in the womb. May Agni generate and inspire a brave, stainless, youthful [and] wise [son].

अ॒ग्निं विश्वा॑ अ॒भि पृक्षः॑ सचन्ते
स॒मु॒द्रं न स्र॒वतः॑ स॒प्त य॒ह्वीः ।
न जा॒मिभि॒र्वि चि॑किते॒ वयो॑ नो
वि॒दा दे॒वेषु॒ प्रम॑तिं चिकि॒त्वान् ॥

८. हा मंत्र कठिण आहे. आम्हीं प्रायः सायणास अनुसरूनच भाषांतर केलें आहे. त्याचा भावार्थ असा कीं, 'अग्नीच्या तेजानें यजमानाच्या आंगीं प्रवेश केला म्हणजे यजमानाला स्त्रीसंगाची इच्छा होते, ती होऊन संग होतो. तर त्या गर्भाला सुखरूपपणें राखून ठेवणें आणि त्यापासून बलवान्, निर्दोषी, सदातरूण आणि बुद्धिमान् असा पुत्र जन्मे असें करणें आणि त्या पुत्राला 'सन्मार्गी' लावणें ही कृपा अग्नि करो.' परंतु सायणाचार्य तरी आणखी दुसरा एक अर्थ सूचवितातच. आणि दुसरा अर्थ सूचविणें म्हणजे खऱ्या अर्थाविषयीं निर्णय होत नाहीं असें दाखविल्याप्रमाणें होय. आम्हांला या ऋचेच्या अर्थाविषयीं फार संशय आहे. भाषेंत सायणाचे दोनीहि अर्थ देऊन आम्हींहि एक तिसरा सूचविला आहे तो पहा. ऋग्वेदासारिख्या अनादिसिद्ध ग्रंथांत इकडे तिकडे कितीएक ऋचा दुर्बोध असल्या तरी नवल नाहीं. सू. ५६, मं. २ याजवरील टीप पृष्ठ ८१२–१४ याजवर पहा.

'तेजस्वी '=' द्यौः.' 'द्यौः' हें रूप 'तेजस्वी' ह्या अर्थाचें नपुंसकलिंगीं विशेषण आहे असें सायणाचार्यांस अनुसरून भाषांतर केलें आहे. परंतु तसा अर्थ होऊं शकणार नाहीं. त्याप्रमाणें 'अभीके' याचा अर्थ, 'गर्भाशयांत' असा केला आहे त्याविषयींहि आम्हांस मोठाच संशय आहे. 'अभीके' म्हणजे 'युद्धांत' किंवा 'जवळ' असा बहुतकरून सर्वत्र अर्थ होत असतो. तो सोडून 'गर्भाशय' असा सायणाचार्य अर्थ निरूपायासाठींच करितात असें दिसतें.

प्रथम, तृतीय, आणि चतुर्थ या चरणांचा शब्दार्थ स्पष्ट आहे. मात्र तिसऱ्या चरणांत रेतः कोणाचें, आणि 'द्यौः

मनो न योऽध्वनः सद्य एत्येकः सत्रा सूरो वस्व ईशे ।
राजाना मित्रावरुणा सुपाणी गोषु प्रियममृतं रक्षमाणा ॥ ९ ॥

मनः । न । यः । अध्वनः । सद्यः । एति । एकः । सत्रा । सूरः । वस्वः । ईशे ।
राजाना । मित्रावरुणा । सुपाणी इति सुऽपाणी । गोषु । प्रियम् । अमृतम् । रक्षमाणा ॥ ९ ॥

तादृशं शर्धं मारुतं गणं जनयत् अजनयत् सूदयत् च इतस्ततोगमनाय प्रेरितवांश्च । अपूर्वजातान् मरुतोऽग्निसेवाप्रचारप्रवृत्तेरनन्तरमेव द्यौः पिताऽजनयदिति यावत् । उक्तं हि मन्त्रान्तरेषु (ऋ. ३. ५४. १३ विद्युद्रथाः मरुतः ऋष्टिमन्तः दिवः मर्या इत्यादिषु) मरुतो दिवस्पुत्रा भवन्तीति ।

भाषायाम्.

९ यः सूरः (=सूर्यो) मनो न (=मन इव) सद्यः (=शीघ्रम्) अध्वनो (=मार्गान्) एति (=आक्रमति) [स] एकः (=अद्वितीय एव) वस्वः (=वसुनः) सत्रा (=युगपदेव) ईशे (=ईश्वरो भवति) । सुपाणी (=सुहस्तौ) राजाना (=राजानौ) मित्रावरुणा (=मित्रावरुणौ) गोषु (=अस्माकं धेनुषु) प्रियं (=प्रीतिकरम्) अमृतम् (=अमृतवत् स्वादु पयो) रक्षमाणा (=रक्षन्तौ) [भवतः]

एकः सत्रा वस्व ईशे इत्यत्र समस्तस्यापि धनस्यैक एव प्रभुर्भवतीति भावः ॥

अभीके ' याचा अर्थ काय, इतक्याचा निर्णय होईल तर मग सगळ्या मंत्राचा सरळ अर्थ लागेल.

हा मंत्र बराच खडबडीत आहे:-

आ यदिषे नृपतिं तेज आनट्
शुचि रेतो निषिक्तं द्यौरभीके ।
अग्निः शर्धमनवद्यं युवानं
स्वाधियं जनयत्सूदयच्च ॥

९. मनासारिखा सत्वर मार्ग आक्रमण करितो [असा] जो सूर्य [तोच] एकला सकळ संपत्तींचा प्रभु होय. सुहस्त राजे मित्र आणि वरुण हे [आमच्या] गाईंच्या आंगीं प्रिय अमृत रक्षण करणारे [होत].

9. Sûrya who travels alone the paths rapidly like the mind, alone possesses all wealth. The good-handed Kings Mitra and Varuṇa preserve in the cows the dear [and] immortal drink.

---

९. या मंत्रांत सूर्य आणि मित्र, आणि वरुण या देवांविषयीं सांगितलें आहे. 'जो मनाप्रमाणें असंख्य कोटी योजनें दूर असलेले प्रदेश सत्वर चालून जातो, असा जो सूर्य तो सकळ संपत्तींचा एकला धनी आहे. आणि मित्रावरुण जे देव ते तर असे आहेत कीं, आमच्या गाईंच्या आंगीं जें अमृताप्रमाणें आनंदकारी दूध तें त्यांत राखून ठेवणारे ते राजे मित्रावरुणच होत.' याप्रमाणें हा मंत्र खरोखर अग्नीविषयीं नसतां, सूर्य आणि मित्रावरुण या तीन देवांविषयीं आहे. पण अग्निदेवताक सूक्तांत हा मंत्र आला आहे म्हणून सायणाचार्य अग्नीचा संबंध या मंत्राशीं दाखविण्याच्या उद्देशानें म्हणतात कीं, "हे अग्नी, सूर्य आणि मित्रावरुण हे देव जे आतां सांगितले तीं तुझींच रूपें होत."

'मनासारिखा सत्वर मार्ग आक्रमण करणारा.' हें विशेषण सूर्याला शोभतें म्हणून सांगावयास नकोच. वरुणास 'राजा' असें वेदांत पुष्कळ ठिकाणीं म्हटलें आहे. सू. २४, मं. ७, ८, ९, १४ आणि त्यांजवरील टीप पहा. त्याप्रमाणें मित्र या देवालाहि 'राजा' असें म्हटलेलें (ऋ. ३. ५९. ४ अयं मित्रः नमस्यः सुशेवः राजा सुक्षेत्रः इत्यादि मंत्रांत) आढळतें. याप्रमाणेंच इंद्र, अग्नि, सोम, यम, या देवांसहि राजा असें म्हटलेलें आहे. 'सुहस्त' म्हणजे 'चांगले हात ज्यांस आहेत ते' हें विशेषण ऋग्वेदांत बहुतकरून 'सविता' आणि 'त्वष्टा,' या देवांस लाविलेलें असतें. परंतु ३. ५६. ७ यांत मित्रावरुणांसहि तेंच विशेषण लाविलेलें आहे. (त्रिरा दिवः सविता सोषवीति राजाना मित्रावरुणा सुपाणी=सविता देव आणि सुहस्त राजे मित्रावरुण दिवसाला तीनवेळ आम्हांस द्रव्य देओत). या सर्व ठिकाणीं सायणाचार्य 'सुंदर आहेत हात ज्याला' असा अर्थ करितात. परंतु प्रथम हें विशेषण किरणरूप सुंदर हात ज्याला आहेत तो अशा अर्थीं सवित्यास लागून उत्तरोत्तर इतर देवांस लागत आलें असावें.

'गाईंच्या आंगीं प्रिय अमृत रक्षण करणारे'='गोषु प्रियम् अमृतं रक्षमाणा.'

मा नो॑ अग्ने स॒ख्या पित्र्या॑णि॒ प्र म॑र्षिष्ठा अ॒भि वि॒दुष्क॒विः सन् ।
नभो॒ न रू॒पं ज॑रि॒मा मि॑नाति पु॒रा तस्या॑ अ॒भिश॑स्ते॒रधी॑हि ॥
॥ १० ॥ १६ ॥

मा । न॒ः । अ॒ग्ने॒ । स॒ख्या । पित्र्या॑णि । प्र । म॒र्षि॒ष्ठा॒ः । अ॒भि । वि॒दुः ।
क॒विः । सन् ।
नभ॑ः । न । रू॒पम् । ज॒रि॒मा । मि॒ना॒ति॒ । पु॒रा । तस्या॑ः । अ॒भिऽश॑स्तेः ।
अधि॑ । इ॒हि॒ ॥ १० ॥ १६ ॥

भाषायाम्.

१०. हे अग्ने, नः (=अस्माकं) पित्र्याणि (=पितरं वसिष्ठम् तस्मादपि पूर्वान्पितॄन्वोपक्रम्यागतानि) सख्या (=सख्यानि=मित्रत्वानि) मा प्र मर्षिष्ठाः (=मा नाशय), विदुः कविः अभि सन् (=तर्हि विद्वान् मेधावी त्वमस्मभ्यमाभिमुख्येन तिष्ठ=सहायो भूत्वा अस्माकं समीप एव तिष्ठ)। नभो न (=तुहिनं यथा) [रूपं मिनाति=वस्तूनां स्वरूपं हिनस्ति तद्वत्] जरिमा (=जरा) रूपं (=मनुष्याणां सौन्दर्यं) मिनाति (=नाशयति)। [अतः कारणात्] तस्या अभिशस्तेः पुरा (=जरारूपहिंसाया आगमनात्पूर्वमेव) [त्वम्] अधि इहि (=अवगच्छ=मां जानीहि=मामनुगृह्णीहि)॥

यथा त्वं मम पितरम् पितॄन्वान्वगृह्णास्तथा मामप्यनुगृह्णीहि । त्वं हि सकलानां हृदयं विज्ञाता भवसि। अतो मम सेवां जानास्येव। अनुग्रहश्च जराया आगमनात्पूर्वमेव कर्तव्यः। सा हि तुहिनं यथा वृक्षपल्लवपुष्पादीनां रूपं विनाशयति तथा मम रूपं विनाशयिष्यतीति भावः॥

ह्या गाई म्हणजे साधारण घरच्या गाईच असाव्या. गाईच्या आंगीं दूध राही असें करणें हें विशेषेंकरून मित्रावरुणांचें काम आहे असें मन्त्रान्तरांवरून दिसत नाहीं.

'मित्रावरुण' या देवांच्या जोडप्याविषयीं सू.२, मं.८ याजवरील टीप पहा. सू.३५, मं.४ हाहि पहा आणि त्याजवरील टीप विशेषेंकरून पाहिली पाहिजे.

हा मंत्र असा म्हटला पाहिजेः—

मनो न यो अध्वनः सद्य एति
एकः सत्रा सूरो वस्व ईशे ।
राजाना मित्रावरुणा सुपाणी
गोषु प्रियममृतं रक्षमाणा ॥

१०. हे अग्नी, वडिलांपासून चालत आलेला [जो तुझा] आमचा स्नेह [तो तूं] विसरूं नकोस, तर विद्वान् [आणि] बुद्धिमान् [असा जो तूं तो] आमचें पाठबळ हो. जसें धुकें [पदार्थाच्या] रूपाला [नाहींसें करून टाकितें तसें] वृद्धपण रूपाला नाहींसें करून टाकितें. [तर] त्या दुर्भाग्यापूर्वींच [तूं आम्हांवर] प्रसन्न हो.

10. Do not, O Agni, destroy our ancestral friendship [with Thee], but be with [us] thou who art learned [and] wise. Age destroys beauty like mildew. Favour thou before that curse arrives.

१०. हा या सूक्ताचा उपसंहार आहे. यास्तव या सूक्तांत अग्नीची स्तुति केल्यानंतर शेवटीं त्याजजवळ जें काय मागावयाचें आहे तें यांत मागितलें आहे. पराशर ऋषि म्हणतातः—'हे अग्नी, तुझी सेवा आम्ही नवीन करावयास लागलों आहों असें नाहीं, तर वाडवडिलांपासून तुझी उपासना आमच्या कुळांत चालू आहे, आणि वाडवडिलांपासून तुझा आमचा स्नेहसंबंध आहे. तो आतां तूं तोडूं नकोस; तर तूं जसा आमच्या वाडवडीलांचा साहाय्यकर्ता होऊन त्यांचें पाठबळ होईस तसाच आमचाहि साहाय्यकर्ता हो आणि आमच्या बरोबर आमच्या संरक्षणासाठीं राहा. आमची भक्ति कशी आहे हें तुला ठाऊक आहे, कारण कीं तूं सर्वज्ञ आणि बुद्धिमान् आहेस. आणि याप्रमाणें जो आम्हांवर अनुग्रह करावयाचा आहे तो आम्ही म्हातारे होण्यापूर्वीं कर—म्हातारपण आलें म्हणजे, धुकें येऊन जसें वृक्षांच्या पालवीस आणि फळांफुलांस जाळून टाकितें तसें तें सर्व सौंदर्याला नाहींसें करून टाकितें.' ही प्रार्थना पराशर ऋषीनें केली आहे, यास्तव याचा विचार मन लावून करणें अवश्य आहे. कारण ज्या पराशराविषयीं महाभारतांत, पुराणांत आणि तसल्याच वेदोत्तरकालिक ग्रंथांत अद्भुत चमत्कार वर्णिले आहेत, आणि जो असंख्य वर्षें तप करीत बसला होता म्हणून सांगितलें आहे त्याचें खरें स्वरूप या मंत्रावरून दिसून येतें. जशी आम्हां कलियुगांतील बापड्या मर्त्यांस म्हातारपणाची भीति असते, तशीच पराशराला होती, त्याला पाहिजे तितकीं वर्षें तप करीत जगावें अशी शक्ति नव्हती, आणि अ-

सूक्तम् ७२.

शक्तिपुत्रः पराशर ऋषिः । अग्निर्देवता । त्रिष्टुप् छन्दः ।

नि काव्या वेधसः शश्वतस्कर्हस्ते दधानो नर्या पुरूणि ।
अग्निर्भुवद्रयिपती रयीणां सत्रा चक्राणो अमृतानि विश्वा ॥१॥

नि । काव्या । वेधसः । शश्वतः । करिति कः । हस्ते । दधानः । नर्या । पुरूणि । अग्निः । भुवत् । रयिऽपतिः । रयीणाम् । सत्रा । चक्राणः । अमृतानि । विश्वा ॥ १ ॥

भाषायाम्.

१. नर्या (=नर्याणि=नृभ्यो हितानि) पुरूणि (=बहूनि) [धनानि] हस्ते दधानः (=स्वोपासकेभ्यो दातुं स्वहस्ते धारयन्) [अग्निः] शश्वतः (=बहोः) वेधसः (=मेधाविन उपासकस्य) काव्या (=काव्यानि=स्तोत्राणि) नि कः (=नि अकरोत्=नि करोति=" नियमेन स्वात्माभिमुखानि करोति") । विश्वा (=विश्वानि=सर्वाणि) अमृतानि (=मरणरहितानि वस्तूनि कीर्त्यादीनि) सत्रा चक्राणः (=युगपदेव कारयन्=समकालमेव एक एव ददत्) अग्निः रयीणां रयिपतिः (=धनानां स्वामी) भुवत् (=अभवत्=जातोस्ति) ॥

यतः कारणात् अग्निर्बहूनि धनानि हस्ते धारयन्नागच्छति तानि च स्वोपासकेभ्यो ददाति अतः कारणाद् बहवः स्तोतारस्तं स्तुवन्ति । यतश्चाग्निरेव सर्वाणि मरणरहितवस्तूनि ददाति तस्मात् सर्वे तमेवैकं धनानां पतिं मत्वा तं धनानि याचन्त इति भावः ॥

ग्नीच्या देवत्वावर त्याचें ब्रह्मवर्चस्व नसे हें उघड दिसून येतें.

'वडिलांपासून चालत आलेला'='पित्र्या.' 'बापापासून चालत आलेला,' अथवा 'वाडवडिलांपासून चालत आलेला' असाहि अर्थ होईल. आम्हांस हा शेवटचा बरा दिसतो.

'त्या दुर्भाग्यापूर्वीच'='पुरा तस्या अभिशस्तेः.' म्हणजे म्हातारपण हेंच जें कोणी एक दुर्दैव तें येण्यापूर्वीच.

'प्रसन्न हो'='अधि इहि.' अक्षरशः अर्थ '[आम्हांला] जाण;' म्हणजे, आम्ही तुझी उपासना करीत आहों ती जाणून घे आणि जें आमचें कल्याण करावयाचें असेल तें कर.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटली पाहिजे, म्हणजे श्लोकवृत्ताला बसते:—

मा नो अॅग्ने सॅखिअॉ पित्रिआणि
प्रमॅर्षिष्ठा अॅभि विदुष्कविः सन् ।
नभो न रूपं जरिमा मिनाति
पुरा तॅस्या अॅभिशॅस्तेरधीहि ॥

सूक्त ७२.

ऋषि–शक्तीचा पुत्र **पराशर** (पूर्वे सूक्ताचा जो तोच). देवता–**अग्नि.** वृत्त– **त्रिष्टुभ्.**

१. [अग्नि] अनेक बुद्धिमान् उपासकांचीं स्तोत्रें आपलींशीं करून घेत असतो आणि मानवांस हितकारक अशीं अनेक धनें [आपल्या] हातांत धारण करीत असतो; अग्नि [हा] सकळ संपत्तींचा स्वामी होय, आणि तो एकलाच सकळ अमर वस्तू देणारा होय.

HYMN 72.

To *Agni.* By *Parâs'ara* the son of *S'akti* (author of the previous hymn). Metre—*Trishṭubh.*

1. Agni wins the praises of many a wise worshipper, and holds in his hand numerous blessings beneficial to men. Agni has become the master of riches, the sole bestower of all immortal things.

---

१. याचा भावार्थः–'अग्नि हातांत मनुष्यहितकारक विपुल धन घेऊन येतो आणि आपल्या उपासकांला देतो, म्हणूनच अनेक स्तोत्रकर्ते त्याचें स्तोत्र करितात. अग्नि हाच सुकीर्ति इत्यादि अमर वस्तूंचा लाभ करून देतो, या कारणास्तव तोच सकल संपत्तींचा स्वामी होय असें समजून उपासक लोक त्याजकडेसच धनाची प्राप्ति व्हावी अशी प्रार्थना करितात.' अशी ही या सूक्ताची प्रस्तावना पराशर महर्षीनें केली आहे. पराशर ऋषीविषयीं पुराणादिकांवरून जो आमचा ग्रह झाला आहे, त्याला आणि ह्या प्रार्थनेंतील पराशराला किती अंतर आहे त्याचा विचार वाचकांनीं करावा.

'अनेक बुद्धिमान् उपासकांचीं स्तोत्रें आपलींशीं करून घेतो'='नि काव्या वेधसः शश्वतः कः.' हा 'नि काव्या अकः' या शब्दांपुरता अर्थ सायणांस अनुसरूनच केला आहे. अनेक उपासक लोक आपली (अग्नीचीच) स्तुति करीत असें करितो. 'शश्वत्' याचा अर्थ 'अनेक' असा केला आहे त्याला ऋ. ६. ६१. १; ८. २३. २८; ९. ९८. ४; ७. १८. १८ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य ह्यांचा आधार आहे. 'अनेकबुद्धिमान् उपासकांच्या स्तोत्रांला तो मागें घालितो,' म्हणजे अनेक बुद्धिमान् कवींपेक्षां तो चांगलीं स्तोत्रें रचितो असाहि अर्थ होऊं शकेल.

'[सकल] संपत्तींचा स्वामीं'='रयीणां रयिपतिः.' अक्षरशः 'संपत्तींचा संपत्तिस्वामी' असा आहे. यांत 'संपत्ति' (रयि) शब्द दोनदा येतो. पण 'रयिपतिं' याचा मूळ अर्थ जरी संपत्तिस्वा-

अस्मे वत्सं परि षन्तं न विन्दन्निच्छन्तो विश्वे अमृता अमूराः ।
श्रमयुवः पदव्यो धियंधास्तस्थुः पदे परमे चार्वग्नेः ॥ २ ॥

अस्मे इति । वत्सम् । परि । सन्तम् । न । विन्दन् । इच्छन्तः । विश्वे ।
अमृताः । अमूराः ।
श्रमऽयुवः । पदऽव्यः । धियम्ऽधाः । तस्थुः । पदे । परमे । चारु ।
अग्नेः ॥ २ ॥

भाषायाम्.

२. विश्वे (=सर्वे) अमृताः (=मरणरहिता) अमूरा (=मूढत्वरहिता=देवा) इच्छन्तः (=अग्निलाभं वाञ्छन्तोपि) परि सन्तं (=परितः सर्वत्र वर्तमानम्) अस्मे (=अस्माकं) वत्सं (=वत्सवत् प्रियमेनमग्निं) न विन्दन् (=न लेभिरे)। [ततः] श्रमयुवः (=श्रमयुक्ताः=श्रान्ताः) पदव्यः (=पादैर्गच्छन्तो) धियंधाः (=ध्यानकृतस्) [ते] अग्नेः परमे (=उत्तमे) चारु (=चारुणि) पदे (=स्थाने) तस्थुः (=स्थितवन्तः)॥

देवेभ्यो निर्गत्य अश्वत्थवेण्वादिषु निलीनं सन्तमग्निमन्विष्यन्तो देवाः परमायासेन तस्य निलयस्थानं ददृशुरित्याख्यायिकामुद्दिश्येयमृक् प्रावर्ततेत्याहुः सायणाचार्याः ॥

अस्मे इति पदं सप्तम्यन्तमिति केचित् । पदवीशब्दं च ऋ. (९.९६.६) "ब्रह्मा देवानां पदवीः कवीनाम्" इत्यस्य "सहस्रणीथः पदवीः कवीनाम्" (९. ९६. १८) इत्येतस्य चभाष्ययोर्वर्तमानां "स्खलतां पदानां साधुत्वेन योजयिते"ति सायणोक्तिमनुसृत्य नायकशब्देन विवृण्वन्ति ग्रासमानादयो विद्वांसः । प्रस्तुते स्थले तु सोर्थो न युज्यत इति भाति । पादैर्गच्छन्त इति यत्सायणैरुक्तं तदेव युक्तमिति द्रष्टव्यम् । अपि च यः स्खलन्ति पदानि साधुत्वेन योजयति सोपि पादैरेव प्रायो गच्छति । अतः कारणात् 'नायक' इति तथा 'पादैर्गच्छन्' इत्युभावप्यर्थौ संभवत एवेति स्पष्टम्॥

मी असा आहे तरी व्यवहारांत 'स्वामी' इतकाच अर्थ मागाहून होऊं लागला असें वेदांत त्याचे प्रयोग आढळतात त्यावरून होतें. साधारण संस्कृतांत 'विदर्भाणां विशांपतिः'=विदर्भाचा प्रजाप्रभु=विदर्भाचा राजा, यांत 'विशां' हें पद अधिक आहे. तथापि विशांपति म्हणजे 'राजा' इतकाच अर्थ समजावयाचा असतो, तसें 'रयिपति' म्हणजे 'स्वामी' इतकेंच समजावयाचें आहे.

या मंत्रांत वेदसूक्तांस 'काव्य' असें ऋषीनें नांव दिलें आहे. आणि दुसऱ्याहि अनेक मंत्रांत काव्य शब्दाचा अर्थ स्तोत्र अथवा वेदसूक्त असा होतो. सांप्रत काळीं काव्य शब्दाचा अर्थ वेदसूक्त असा होत नाहीं. काव्य म्हणजे रचलेली

२. [अग्नीची] इच्छा करणारे मोहरहित [जे] सकल अमर [देव] त्यांजला सर्वत्र असणारा आमचा [हा] बाळ सांपडला नाहीं; [मग ते] ध्यान करीत करीत, पायांनीं चालून थकलेले [देव] अग्नीच्या सुंदर [आणि] अत्युच्च स्थलीं [जाऊन] उभे राहिले.

2. All the immortals, [though] above ignorance, [and] desirous [of Agni], did not discover [this] our darling: fatigued, walking on foot [and] contemplating [they] [then] stood on the beautiful [and] highest seat of Agni.

कवींची कृति असा अर्थ होतो. परंतु वेदांचे ऋषि आपणास 'कवि' म्हणजे सूक्तें रचणारे असें म्हणावयास लाजत नसत. उदाहरणार्थः—त्वं कविं चोदयोर्कसातौ त्वं कुत्साय शुष्णं दाशुषे वर्क्' (ऋ. ६. २६. ३) याचा अर्थ सायणाचार्य सुद्धा, 'हे इंद्रा, तूं अन्नलाभासाठीं केलेल्या युद्धांत भृगु ऋषीला प्रेरणा केलीस आणि उपासक कुत्स यासाठीं शुष्णाला मारिलेंस;' असा करितात. यांत भार्गव ऋषीला 'कवि' असें म्हटलें आहे. ऋ. १. १७४. ७ यांत असें म्हटलें आहे कीं 'रपत् कविः इन्द्र अर्कसातौ क्ष्मां दासाय उप बर्हणी कः'= हे इंद्रा, युद्धांत ऋषिजन तुला स्तवितात आणि तूं त्यांचा जय करून अनार्य शत्रूंला भूमीवर निजवितोस, म्हणजे त्यांस मारून टाकितोस. यांत 'ऋषि' याबद्दल 'कवि' असा शब्द आहे. शिवाय 'गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनाम् उपमश्रवस्तमम्' या (ऋ. २. २३. १) प्रसिद्ध मंत्रांत 'कवीनां कविः' म्हणजे 'कवींत उत्तम कवि'=ऋषींत उत्तम ऋषि असें ब्रह्मणस्पति म्हणून एक वेदांत देवता आहे (सू. १८, मंत्र ४ पहा,) तिला म्हटलें आहे. याप्रमाणें ऋषि आपणास 'कवि' म्हणत याविषयीं अनेक प्रमाणें आहेत. आणि ते आपल्या सूक्तांस 'काव्य' अथवा 'कविता' असें म्हणत. यावरूनच आम्ही ऋषींस कवि असें म्हणत असतों.

वृत्तानुरोधानें ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावी लागतेः—

नि काविआ वेधसॅः शश्वतस्कः
हस्ते दधानो नरिआ पुरूणि ।
अग्निर्भुवद्रयिपती रयीणां
सत्रा चॅक्राणो अमृतानि विश्वा ॥

---

२. या मंत्राचा अर्थ आम्हीं सायणांस अनुसरूनच केला आहे. त्यांचा भावार्थ असा आहे कीं, 'अग्नि पूर्वी एकदा देवांला सोडून गेला, आणि वड, पिंपळ, औदुंबर इत्यादि वृक्षांत लपून राहिला. अग्निरूप आमचा बाळ याप्रमाणें सर्वत्र जरी अंतर्गत होता आणि देव जरी अमर आणि अज्ञानाच्या पलीकडे असून ज्ञानसुखाचा उपभोग घेणारे होते तरीहि तो त्यांस मिळाला नाहीं. तेव्हां ते

तिस्रो यदग्ने शरदस्त्वामिच्छुचिं घृतेन शुचयः सपर्यान् ।
नामानि चिद्दधिरे यज्ञियान्यसूदयन्त तन्वः सुजाताः ॥ ३ ॥

तिस्रः । यत् । अग्ने । शरदः । त्वाम् । इत् । शुचिम् । घृतेन । शुचयः । सपर्यान् ।
नामानि । चित् । दधिरे । यज्ञियानि । असूदयन्त । तन्वः । सुऽजाताः ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. हे अग्ने, शुचयः (=दीप्तिमन्तो) [मरुतः] शुचिं (=दीप्तिमन्तं) त्वाम् इत् (=त्वामेव) घृतेन (=आज्येन) तिस्रः शरदः (=त्रीन् संवत्सरान्) यद् (=यदा) सपर्यान् (=पूजां कुर्युः=अपूजयन्), [तदा] चित् (=ततः प्रभृत्येव) [ते] यज्ञियानि नामानि (=यजनीयानि सत्त्वानि=यजनीयत्वं) दधिरे (=धृतवन्तः =यज्ञार्हा अभवन्) [अपि च] सुजाताः (=सुष्टु जाताः=सुष्टुजातपुरुषवद् दानशीलाः) [सन्तः] तन्वः (=तनूः=आत्मानम्) असूदयन्त (=उपासकाभीष्टवस्तूनि क्षारितवन्तः=ददुः) ॥

गूढार्थेयमृक् । भावार्थस्तु हे अग्ने, मरुतोपि त्वामेव पूजयित्वा देवत्वमापुः । ततः पूर्वं तेषामदेवत्वादुपासकास्तान्न पूजयन्ति । संजातदेवत्वास्तु जनैः पूजिता अभवन् जनानां च मनोरथांस्ततः प्रभृत्येवं पूरयन्तीति स्पष्टो दृश्यते ॥

असूदयन्तेति पदस्य यद् विदुष्टरेण ग्रासमानेन अपोषयन्नित्यर्थकं व्याख्यानं कृतमस्ति तत्प्रमाणापेक्षीति भाति । सूदधातौ च मिष्टं करोतीत्यर्थमन्यत्र यत्स्थापयन्ति तत् सायणस्य ऋ. १. १८७. ११ इति मन्त्रस्य व्याख्याने क्षारयामः इत्युक्तिमवलम्ब्य भवति चेद् अयुक्तम् । क्षारयाम इत्यस्य यथा क्षरति स्रवति स्रावयति वा तथा कुर्मो न तु क्षारेण योजयाम इत्यर्थस्य सद्भावात् ॥

भट्टमोक्षमूलरप्रकाशिते चारुतमे सायणभाष्यग्रन्थे तु उच्छन्तीर्मामुषसः सूदयन्तु (ऋ. ४. ३९. १) इत्यस्य भाष्ये यत् "मां प्रति सूदयन्तु । रक्षन्तु फलानि" इति वर्तते तत्र मुद्राङ्कप्रमादेन भवितव्यम् । क्षरन्तु फलानि प्रापयन्तु कामानिति हि युज्यते ॥

त्याचें ध्यान करीत करीत, आणि पायीं चालत चालत शोधास लागले. आणि जेव्हां फार थकले तेव्हां अग्नीच्या अति उंच आणि सुंदर स्थलाप्रत जाऊन पोंहचले.' मंत्र रचणाऱ्या कवीनेंच मनांत अर्थ गूढ ठेवून शब्दरचना केली आहे. त्याचा अर्थ सायणांनीं केला आहे त्याशिवाय दुसरा असेल असें वाटत नाहीं.

३. हे अग्नी, जेव्हां तुला प्रकाशवन्तालाच प्रकाशवन्त [मरुतांनीं] घृतानें तीन वर्षें[पर्यंत] पूजिलें, [तेव्हां]च त्यांला यज्ञयोग्यत्व प्राप्त झालें [आणि] [तेव्हांच] सुजात [मरुत्] मनोरथ पूर्ण करूं लागले.

3. When, O Agni, the brilliant [Maruts] worshipped three years with clarified butter thee [who art] brilliant, thenceforward did they attain renown worthy of worship [and] benevolently granted [the suppliant's desires].

'मोहरहित'='अमूराः.' मोहरहित म्हणजे जे दीन मर्त्यांप्रमाणें अज्ञान नव्हेत, तर सर्व वस्तूंविषयीं ज्यांला ज्ञान असतें असे. देवांच्या स्वरूपाविषयीं आमच्या आर्य पूर्वजांचा ग्रह कसा होता तें त्यांच्या विशेषणांवरून दिसून येतें. मनुष्यांप्रमाणें ते अज्ञानी नव्हेत, ते मनुष्याप्रमाणें मर्त्य आणि एकाच ठिकाणीं राहणारे नव्हेत. तर हे जे देवांचे दिव्य गुण त्यात्याप्रमाणें त्यांस विशेषणें दिलेलीं आढळतात.

'आमचा [हा] बाळ'='अस्मे वत्सम्.' म्हणजे अग्नि. अग्नीवर आपल्या आर्य पूर्वजांची फार प्रीति असे. ते त्याला 'पुत्र,' बाळ, प्रिय असें म्हणत, आणि त्याला पूजीत.

'अग्नीच्या सुंदर आणि अत्युच्च स्थळीं'='पदे परमे चारु अग्नेः.' हें स्थान म्हणजे, अग्नि जेथें लपून राहिला होता ती जागा असें सायण म्हणतात.

हा मंत्र म्हणावयाला पूर्वील मंत्राप्रमाणें सोपा नाहीं:—

अस्मे व॒त्सं परि॒ षन्तं॒ न वि॑न्दन्
इ॒च्छन्तो॒ विश्वे॑ अ॒मृता॒ अमू॑राः ।
श्र॒म॒युवः॑ पद॒व्यो॑ धियं॒धास्
त॒स्थुः प॒दे प॑र॒मे चार्व॒ग्नेः ॥

३. या मंत्राचा अर्थ किंचित् संदिग्ध आहे. परंतु आम्हीं प्रायः सायणांस अनुसरून भाषांतर केलें आहे. त्याचें तात्पर्य असें आहे कीं, 'हे अग्नी, तुझ्या सेवेचें माहात्म्य एवढें आहे कीं, मरुत् सुद्धा जे पूर्वीं देव झाले ते तुझीच उपासना केल्यावर झाले, आणि त्यांस देवपण प्राप्त झाल्यावर त्यांच्या प्रीत्यर्थ लोक यज्ञ करूं लागले, आणि तेव्हांपासूनच मरुत् भक्तजनांचे मनोरथ पूर्ण करूं लागले.' या मंत्रांत मरुत् शब्द नाहीं, तथापि 'शुचि' शब्दाचा अर्थ मरुत् असा आम्हीं केला आहे तो सायणाचार्यांस अनुसरून केला आहे. तो जर बरोबर नसेल तर 'शुचयः' म्हणजे 'भक्तजन' असाहि अर्थ होईल. दुसरी अडचण ही आहे कीं, यांत मरुत् हे तीन वर्षेंपर्यंत अग्नीची उपासना केल्यानंतर देवत्व पावले असें आहे. तर मरुत् हे पूर्वीं देव नसून अग्नीची उपासना करून देवत्व

आ रोदसी बृहती वेविदानाः प्र रुद्रिया जभ्रिरे यज्ञियासः ।
विदन्मर्तो नेमधिता चिकित्वानग्निं पदे परमे तस्थिवांसम् ॥४॥

आ । रोदसी इति । बृहती इति । वेविदानाः । प्र । रुद्रिया । जभ्रिरे । यज्ञियासः ।
विदत् । मर्तः । नेमऽधिता । चिकित्वान् । अग्निम् । पदे । परमे । तस्थिऽवांसम् ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. बृहती (=बृहत्यौ=विस्तीर्णे) रोदसी (=द्यावापृथिव्यौ) आ वेविदानाः (=अग्निलाभार्थं प्रयतमाना) यज्ञियासः (=यज्ञियाः=यज्ञार्हा) [मरुतो] रुद्रिया (=रुद्रियाणि=रुद्रस्य अग्नेः संबन्धीनि स्तोत्राणि) प्रजभ्रिरे (=प्रभृतवन्तः=कृत्वा प्रार्पयन्)। [तदनन्तरं] चिकित्वान् (=ज्ञातवान्=ज्ञानसंपन्नो) नेमधिता (=नेमधितेन=इन्द्रेण) [युक्तो] मर्तो (=मारुतो=मरुद्गणो) परमे (=उत्तमे) पदे (=स्थाने) तस्थिवांसं (=स्थितवन्तम्) अग्निं विदत् (=लेभे)॥

इयमपि दुर्बोधा। वयं तु सायणमनुसृत्यैव व्याचक्ष्महे। रुद्रशब्दस्य अग्न्यर्थे प्रवृत्तिर्भवति (ऋ. ३. २. ५ यतस्रुचः सुरुचं विश्वदेव्यं रुद्रं यज्ञानां साधदिष्टिम् अपसामित्यादौ)। तस्माद् रुद्रियशब्दस्य अग्निसंबन्धिस्तोत्रमित्ययमर्थः संभाव्यत एव। तथैव मर्तशब्दो मारुतशब्देन समानार्थको न भवेदिति न। नेमधितशब्दस्य पुनरिन्द्रवाचकत्वं विवादास्पदमिति सहनीयम्। सांप्रतं साधीयसोर्थस्य सत्यपि व्याख्यानान्तरबाहुल्येऽनुपलब्धेः।

पावले अशी प्रसिद्धि इतरत्र आढळत नाहीं. तरीहि ऋ. १. ८७. ५ पहा. शिवाय ६. ४८. २१ यांतहि मरुतांनीं मागाहून यज्ञयोग्य नाम धारण केलें असें सांगितलें आहे तें पहा.

'घृतानें पूजिलें'='घृतेन सपर्यान्.' म्हणजे तुपाच्या आहुत्या देऊन तुझी सेवा केली.

'त्यांला यज्ञयोग्यत्व प्राप्त झालें'= 'नामानि दधिरे यज्ञियानि.' अक्षरशः अर्थ, 'यज्ञयोग्य नांवें धारण करिते झाले,' म्हणजे ज्यांच्या नांवानें यज्ञ करावे असे झाले. ऋ. १. ८७. ५; ६. ४८. २१. यांतहि यज्ञयोग्य नांवें मरुतांनीं धारण केलीं असें सांगितलें आहे.

'सुजात'='सुजाताः.' म्हणजे अक्षरशः अर्थ, 'चांगला जन्मलेला,' चांगल्या अथवा संभावित कुळांत जन्मलेला, म्हणूनच दयाळु, दानशील, निगर्वी. हेंच विशेषण मरुतांस ऋ. १. ८८. ३ यांत

४. विस्तीर्ण द्यू आणि पृथिवी यांजमध्यें [अग्नीचा] शोध करीत करीत पूज्य [मरुत्] अग्नीचें स्तोत्र करिते झाले. तेव्हां इंद्रासमवेत [फिरणाऱ्या] ज्ञानसंपन्न मरुतांस अत्युच्च स्थळीं असलेला अग्नि अवगत झाला.

4. Searching through vast heaven and earth the worshipful Maruts offered prayers to the Rudra (Agni). [Then] the wise troop of the Maruts [accompanied] by Indra discovered Agni as he stood on the highest seat.

आणि १. १६६. १२ यांत तद् वः सुजाता मरुतो अहित्वनम् याप्रमाणें लाविलें आहे. आणि अग्नि, अश्विदेव, मित्रावरुण, सूर्य, उषा, आणि पृथिवी या देवतांस पुष्कळ ठिकाणीं लाविलेलें आहे. नीच कुळांत उपजलेले जे असतात ते सद्गुणी, दयाळु, दाते, आणि शूर नसतात अशा समजुतीनें सुजात हें विशेषण आतां सांगितलेल्या देवांस लाविलेलें आहे.

' मनोरथ पूर्ण करूं लागले '=' असूदयन्त तन्वः.' हे शब्द कठिण आहेत. सूद् धातूचा अर्थ ' क्षरण ' अथवा प्रेरणा असा होतो. ' क्षरण ' म्हणजे ' वाहणें,' 'गळणें.' त्यावरून 'सूदय्' म्हणजे 'वाहविणें' अथवा 'गळविणें.' उदाहरण 'हव्यसूदः उस्रियाः' (ऋ.१.९३.१२;४.५०.५)=ज्यांच्या पासून हव्य पदार्थ, म्हणजे दूध इत्यादि, गळतात किंवा प्राप्त होतात अशा गाई. त्यावरून ' यं सूदयन्ते ' (ऋ. ८. २३. ८) म्हणजे ज्या अग्नीला उपासक लोक दोहतात, ज्यांच्या कडून इष्टलाभ करून घेतात. यावरून ' असूदयन्त तन्वः' म्हणजे 'मरुतांनीं आपणा स्वताहाला दोहूं दिलें,' अर्थात् उपासकाच्या मनकामना पूर्ण करूं लागले.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला बसतेः—

तिस्रो यदग्ने शरदस्तुआमित्
शुचिं घृतेन शुचयः सपर्यान् ।
नामानि चिद्दधिरे यज्ञियानि
असूदयन्त तनुअः सुजाताः ॥

---

४. हाहि मंत्र कठिण आहे. पण आम्हीं सायणांस अनुसरून केलेल्या भाषांतराचा भावार्थ असा आहे कीं, ' पूजनीय मरुतांस अग्नि मिळेना; तेव्हां महाविस्तीर्ण असा जो द्युलोक आणि जो पृथिवीलोक त्या दोहोंतून अग्नीचा ते शोध करूं लागले. आणि अग्नीचीं स्तोत्रें गाते झाले. किती झालें तरी मरुत् ज्ञानी असल्यामुळें त्यांजला अग्नि आपल्या अति उंच स्थळीं उभा राहिला होता तो दृष्टीस पडला.' हा मंत्र मरुतांविषयीं आहे यांत संशय दिसत नाहीं. यास्तव

संजानाना उप सीदन्नभिज्ञु पत्नीवन्तो नमस्यं नमस्यन् ।
रिरिक्वांसस्तन्वः कृण्वत स्वाः सखा सख्युर्निमिषि रक्षमाणाः ॥
॥ ५ ॥ १७ ॥

सम्ऽजानानाः । उप । सीदन् । अभिऽज्ञु । पत्नीऽवन्तः । नमस्यम् ।
नमस्यन्निति नमस्यन् ।
रिरिक्वांसः । तन्वः । कृण्वत । स्वाः । सखा । सख्युः । निऽमिषि ।
रक्षमाणाः ॥ ५ ॥ १७ ॥

भाषायाम्.

५. संजानाना (=एकबुद्धयो भूत्वा) [देवा?] अभिज्ञु (=आभिमुख्येनावस्थितजानुयुक्तं यथा तथा) उप सीदन् (=अग्नेः समीपे न्यषीदन्), पत्नीवन्तः (=पत्नीसहिताश्) [च] नमस्यं (=नमनयोग्यं=पूजार्हम्) [अग्निं] नमस्यन् (=अपूजयन्)। स्वास्तन्वः (=स्वकीयानि शरीराणि=आत्मानं) रिरिक्वांसः (=रिक्तीकुर्वन्तः=बलिं ददतो) [देवा?] [अग्निं] सखा (=? सखायं) कृण्वत (=अकृण्वत=अकुर्वन्) [अपि च] सख्युः (=मित्रभूतस्य) [अग्नेः] निमिषि (=दर्शने सति रक्षमाणाः=रक्ष्यमाणा) [अभूवन्] ॥

इयमपि दुर्बोधा। कृतस्य पुनरनुवादस्य सर्वेपि देवाः सपत्नीका भूत्वा पूजार्हमग्निम् अभिज्ञु यथा तथा एकबुद्ध्येव पूजितवन्तः तथा च आत्मशरीराण्यपि तस्मा अर्पयित्वा तं स्वकीयं मित्रमकुर्वन् तेन च तस्याग्नेर्दर्शनाद्रक्षिता अभूवन्निति भावः॥

सखेति पदमस्पष्टसंबन्धम्। तथापि कविहृद्यं विशदं भाति। उक्तं हि सूक्तान्तरे तमित् नरो वि ह्वयन्ते समीके रिरिक्वांसः तन्वः कृण्वत त्राम्‌इति (ऋ. ४. २४. ३)। " नरो नेतारो मनुष्याः समीके युद्धे तमित्तमेवेन्द्रं विह्वयन्ते। विविधमाह्वानं कुर्वते। तन्वः स्वकीयानि शरीराणि रिरिक्वांसो * * * यजमानास्तमेवेन्द्रं त्रां त्रातारं कृण्वत। कृण्वते।" इति हि तस्य सायणकृतं भाष्यम्।

पूर्वमंत्रांत 'शुचयः' शब्दाचा अर्थ सायणांनीं मरुत् असा केला आहे तो योग्य असें दिसतें.

या मंत्रांत तीन अडचणी दिसतात. १ ली, 'रुद्रिया' हें पदपाठांत 'रुद्रियाः' असें असावें अशी इच्छा होते. कारण 'रुद्रिय' म्हणजे रुद्राचे पुत्र मरुत् असें प्रसिद्ध आहे. 'रुद्र' हें अग्नीचें नाम आढळतें तरी 'रुद्रिय' म्हणजे अग्नीप्रीत्यर्थ केलेलें स्तोत्र अशा विशेषणानें इतरत्र प्रसिद्ध दिसत नाहीं; २ री, 'मर्तः' शब्द 'मारुतः'

५. सर्व [देव] एका मनानें गुडघ्यावर बसून [आपल्या] स्त्रियांसह पूजनार्ह [अग्नीची] पूजा करिते झाले. [त्यांनीं] आपल्या शरीरांचा बळी दिला, [आणि] [अग्नीला आपला] मित्र केला [आणि] सख्या [अग्नी]चें दर्शन होतांच तरले गेले.

5. With one mind they (the Gods?) sat down on [their] knees [and] accompanied by their wives worshipped the venerable [Agni]. They sacrificed themselves, [and] made [Agni their] friend [and] [were] saved at the sight of friend [Agni].

(मरुतांचा गण) या अर्थी घ्यावा लागतो; आणि ३ री (सर्वांत मोठी अडचण ही कीं), 'नेमधिता' म्हणजे 'नेमधितेन' असें समजून त्याचा 'इंद्रासहित [असलेले]' असा क्लिष्ट अर्थ करावा लागतो. 'नेमधिति' म्हणजे युद्ध असा अर्थ प्रायः होत असतो, आणि 'नेमधिता' हें 'नेमधितौ' याऐवजीं सप्तम्यन्त एकवचन असावें, आणि त्याचा सरळ अर्थ युद्धांत असा असावा. एकंदरींत ऋचा कठिण आहे, पण उपाय दिसत नाहीं.

वृत्तानुरोधानें मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें म्हणावा लागतोः—

आ रोदसी बृहती वेविदानाः
प्र रुद्रिया जभ्रिरे यज्ञियासः ।
विदन्मर्तो नेमधिता चिकित्वान्
अग्निं पदे परमे तस्थिवांसम् ॥

५. या मंत्रांत तरी अडचण नाहीं असें नाहीं. परंतु आम्हीं (बहुतकरून सायणाचार्यांस अनुसरूनच) केलेल्या अर्थाचें तात्पर्य असें कीं:—'अग्नि साधारण देव नव्हे. तो नमन करण्यास योग्य होय, आणि सकल देव आपल्या स्त्रियांसहित त्याला भजते झाले आणि आपलीं शरीरेंहि त्याला अर्पण करून त्याला आपला मित्र करून घेते झाले. आणि याप्रमाणें आपला मित्र करून घेतलेला जो अग्नि त्याचें दर्शन होतांच त्यांचें रक्षण झालें.' सायणाप्रमाणें हा मंत्र देवांविषयीं सांगितला. परंतु 'देव' हें पद यांत नाहीं, आणि 'देव' याच पदाचा अध्याहार केला पाहिजे असें प्रमाणहि यांत नाहीं. म्हणून 'देव' पद अध्याहृत न घेतां 'यजमान' हें पद अध्याहृत घेतलें तर अर्थ चांगला जुळतो. देवांनीं आपलीं शरीरें अग्नीस अर्पण केलीं म्हणण्यापेक्षां उपासकांनीं केलीं असें म्हटल्यास खऱ्या अर्थाचा अधिक संभव आहे. ही ऋचा जरी या सूक्तांत आली आहे, तरी मूळची ही येथलीच आहे असें नसेल आणि हिचा संबंध व खरें स्थळ इतर ठिकाणीं असेल असेंहि होईल. सू. ५६, मं. २ याजवरील टीप

त्रिः सप्त यद्गुह्यानि त्वे इत्पदाविदन्निहिता यज्ञियासः ।
तेभी रक्षन्ते अमृतं सजोषाः पशूंश्च स्थातॄञ्चरथं च पाहि ॥६॥

त्रिः । सप्त । यत् । गुह्यानि । त्वे इति । इत् । पदा । अविदन् । निऽहिता । यज्ञियासः ।
तेभिः । रक्षन्ते । अमृतम् । सऽजोषाः । पशून् । च । स्थातॄन् । चरथम् । च । पाहि ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. [हे अग्ने,] यद् (=यानि) त्रिः सप्त (=एकविंशतिसंख्याकानि) गुह्यानि (=रहस्यानि) पदा (=पदानि) त्वे इत् (=त्वय्येव) [सन्ति] [तानि] यज्ञियासः (=यज्ञियाः=पूजनीया उपासकाः) [त्वयि] निहिता (=निहितानि=स्थापितानि) अविदन् (=अविन्दन्=अलभन्त)। तेभिः (=तैः पदैः) [ते] अमृतं (=मरणरहितं) [त्वां] रक्षन्ते [अतः कारणात्] सजोषाः (=उपासकैः समानप्रीतिः सखिभूतस्त्वं) पशून् च स्थातॄन् (=स्थावरपदार्थान्) चरथं च (=जङ्गमं वस्तुजातं च) पाहि (=संरक्ष)॥

अत्र सायणा एवं व्याचक्षते। त्रिः सप्त एकविंशतिसंख्याकानि गुह्यानि रहस्यानि वेदैकसमधिगम्यानि यद् यानि पदानि। पद्यते गम्यते स्वर्ग एभिरिति व्युत्पत्त्या पदशब्देनात्र यज्ञा उच्यन्ते। ते चैकविंशतिसंख्याकाः। औपासनहोमवैश्वदेवादयः सप्त पाकयज्ञाः। अग्न्याधेयदर्शपूर्णमासादयः सप्त हविर्यज्ञाः। अग्निष्टोमात्यग्निष्टोमादयः सप्त सोमयज्ञाः। एवमेकविंशतिसंख्याकानि यज्ञलक्षणानि पदानि हे अग्ने त्वे इत् त्वय्येव निहिता स्थापितानि। तेषां सर्वेषां त्वत्प्रधानत्वात्। न ह्यग्निमन्तरेण यागा अनुष्ठातुं शक्यन्ते। यज्ञियासो * * * यजमानास्तानि पदान्यविदन्। अलभन्त लब्ध्वा च तेभिर्यज्ञलक्षणैः पदैरमृतममरणधर्माणं त्वां रक्षन्ते। पालयन्ति। यजन्तीत्यर्थः। सजोषास्तैर्यजमानैः समानप्रीतिस्त्वं पशून् गवाश्वादिपशूंश्च स्थातॄन् व्रीह्यादिस्थावराणि चरथं पशुव्यतिरिक्तम् अन्यद् यत् प्राणिजातमस्ति तच्च पाहि। रक्ष। तेषु हि रक्षितेषु त्वदीया यागाः कर्तुं शक्यन्ते नान्यथा। अतस्त्वमेव पुज्यस इत्यर्थः॥

एषोऽर्थो न संभवतीति न। अतः कारणात्साधीयसो व्याख्यानस्याभावे तमेवार्थं वयमनुसरामः॥

६. [हे अग्नी], एकवीस जीं गुह्य पदें तीं तुझ्याचठायीं आहेत [अशीं] भाविक जनांनीं शोधून काढिलीं. त्या [एकवीस पदां]नीं [ते तुज] मरणरहिताचें संरक्षण करितात, [तर तूं] प्रसन्न [हो-ऊन] पशु, स्थावर आणि जंगम या वस्तूंस रक्ष.

6. [O Agni], the pious found established in thee the thrice seven steps [which lie] concealed in thee alone. With them [they] support [thee] the immortal. Do thou graciously protect the cattle, and that which stands and that which moves.

पृष्ठें ८१२–१४ यांजवर पहा. आणि ह्या ऋचेचें मूळस्थान बदललें नाहीं असें मानिलें तरी पुढच्या ऋचेंत उपास-कांविषयींच सांगितलें आहे, तेव्हां ही ऋचाहि देवांविषयीं नसतां उपासकांवि-षयीं आहे असें संभवतें.

'गुडघ्यावर बसून'='अभिज्ञु.' या अर्थाविषयीं संशय दिसत नाहींच. सा-यणांनींच तो दिला आहे. तर आपले आर्य पूर्वज गुडघे टेकून देवोपासना क-रीत असें समजावयाचें कीं काय ?

'आपल्या शरीराचा बळी दिला'= 'रिरिक्वांसः तन्वः स्वाः.' सायणाचार्य "शरीर शिवाय करून इतर सर्व धन यज्ञांत अर्पण करिते झाले" असा अर्थ करितात. परंतु ऋ. ४. २४. ३ ह्यांत सुद्धाहि रिरिक्वांसः तन्वः स्वाः हेच श-ब्द आले आहेत. तेथें सायणाचार्यच आम्हीं येथें केलेल्या अर्थाजवळ जवळ भाष्य करितात तें पहा.

'अग्नीला आपला मित्र केला'= 'कृण्वत सखा.' हे शब्द कठिण आहे-त. 'सखायम्' (अथवा सखा ?) या-बद्दल 'सखा' हें रूप येथें योजिलें आहे असें समजून अर्थ केला आहे. सायणाचार्य 'सखायः' याऐवजीं आहे म्हणतात. कसाहि निर्वाह केला तरी अ-डचण तर खरीच, पण ऋ. ४. २४. ३ या मंत्रांत उपासकांनीं आपलीं शरीरें इंद्रास अर्पण केलीं आणि त्याला आप-ला संरक्षक केला असें आहे त्यावरून आम्हीं वर दिलेला अर्थ केला आहे.

हा मंत्र खालीं लिहिल्याप्रमाणें आधु-निक वृत्ताला बसतोः–

संजानॅाना उॅप सीदन्नभिज्ञु
पत्नीवॅन्तो नॅमसिअं नमस्यन् ।
रिरिक्वॅांसस्तॅनुअॅः कृण्वत स्वाः
सखा सॅख्युर्नॅमिषि रक्षमाणाः ॥

---

६. ह्या मंत्राचा पदशः अर्थ जरी सो-पा आहे तरी भावार्थ गूढ आहे. आम्हीं सायणाचार्यांनीं दिलेल्या अर्थास अनुस-रून भाषांतर केलें आहे. त्याचें तात्पर्य

विद्वाँ अग्ने वयुनानि क्षितीनां व्यानुषक् शुरुधो जीवसे धाः ।
अन्तर्विद्वाँ अध्वनो देवयानानतन्द्रो दूतो अभवो हविर्वाट् ॥७॥

विद्वान् । अग्ने । वयुनानि । क्षितीनाम् । वि । आनुषक् । शुरुधः ।
जीवसे । धाः ।
अन्तःऽविद्वान् । अध्वनः । देवऽयानान् । अतन्द्रः । दूतः । अभवः ।
हविःऽवाट् ॥ ७ ॥

भाषायाम्.

७. हे अग्ने, वयुनानि (=ज्ञानानि) विद्वान् (=जानन्) [त्वं] क्षितीनां (=लोकानां) जीवसे (=जीवनाय) शुरुधः (=अन्नानि) व्यानुषक् (=सततं) वि धाः (=विदधासि=अन्नानि ददासि) । देवयानान् अध्वनः (=देवप्रापकान् मार्गान्) अन्तर्विद्वान् (=अतिसामीप्येन जानन्) [त्वम्] अतन्द्रः (=निरालसो) हविर्वाट् (=हविषां वाहको) दूतः अभवः (=जातोसि) ॥

केचित्तु क्षितीनां वयुनानीति संबध्नन्ति ॥

असें आहे कीं, 'हे अग्नी, एकवीस प्रकारचे यज्ञ त्याच स्वर्गी जाण्याच्या कोणीएक पायऱ्या होत, त्या उपासकांनीं तुझ्या ठायीं आहेत असें शोधून काढिलें आणि तेणेंकरून तुला भजूं लागले. तर तूं स्थावरजंगमांचें रक्षण कर.' एकवीस यज्ञ म्हणजे काय त्याचें दिग्दर्शन सायणांनीं केलें आहे तें भाषेंत पहा. एकवीस वृत्तें (गायत्री, जगती इत्यादि) जीं ऋ. ४. १. १६; ७. ८७. ४; १०. ९०. १५ इत्यादि स्थळीं सांगतलीं आहेत तींच 'पदें' अथवा पायऱ्या विवक्षित असतील. ह्या पायऱ्या अग्नीच्या ठायीं मिळाल्या म्हणजे कविता करण्याची प्रेरणा आद्य ऋषींस जी झाली ती अग्नीकडून झाली असें तात्पर्य होईल. सूक्तकर्त्या ऋषीनेंच 'एकवीस पदें' याविषयीं गूढ अर्थ मनांत ठेवून त्या पदांचा प्रयोग केल्यामुळें तीं 'पदें' कोणतीं याविषयीं वाद राहणें साहजिक आहे.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें वाचल्यास श्लोकवृत्ताला बसतोः—

त्रिः सप्त यद्गुहिआनि तुए इत्
पदाविदन् निहिता यज्ञियासः ।
तेभी रक्षन्ते अमृतं सजोषाः
पशून् च स्थातॄन् चरथं च पाहि ॥

७. हे अग्नी, [सकल] विद्या तुला येतात आणि तूं मानवांच्या उपजीविकेसाठीं सतत अन्नें देत असतोस. [हे अग्नी], देवांकडेस जाणारे [सकल] मार्ग पूर्णपणें जाणणारा [असा जो तूं तो] हवि वाहून नेणारा निरालस्य दूत झाला आहेस.

7. [Thou], O Agni, that knowest all wisdom, conferrest food after food for the sustenance of men. Intimately knowing the ways to the Gods, [thou] becamest the active messenger conveying the oblation.

७. या मंत्रांत ऋषि म्हणतो, 'हे अग्नी, तूं सकळ ज्ञानांतें जाणणारा होस, यास्तव तूं उपासक जनांच्या उपजीवनार्थ सतत अन्न प्राप्त करून देत असतोस. आणि देव जेथें राहतात तेथें जाण्याचे मार्ग तुला पूर्णपणें ठाऊक आहेत यास्तव मनुष्यांनीं दिलेलें हवि वाहून नेण्याकरितां तूं दूत झाला आहेस, आणि तुला हवि वाहून नेण्याविषयीं कधींहि आळस नसतो.'

'सकळ विद्या तुला येतात'=' विद्वान् वयुनानि.' सायणाचार्य 'जाणण्याचे पदार्थ सर्व जाणणारा' असें म्हणतात. 'वयुन' शब्द वेदांत पुष्कळ ठिकाणीं येतो, आणि त्याचा अर्थ बहुतकरून 'ज्ञान,' 'प्रज्ञान,' म्हणजे उत्कृष्ट ज्ञान असा होतो.

'देत असतोस'='वि धाः.' अक्षरशः अर्थ 'करीत असतोस,' 'उत्पन्न करून देत असतोस' असा आहे.

'देवांकडेस जाणारे सकल मार्ग जाणणारा'=' देवयानान् अध्वनः अन्तर्विद्वान्.' हें हेतुगर्भविशेषण होय. देवांला हवि नेऊन पोंहचविणारा दूत अग्नि झाला आहे त्यापेक्षां देवांकडेस जाणारे सकळ मार्ग जर अग्नि न जाणील तर त्याचें दूतकर्म बरोबर होणार नाहीं. सरळ मार्ग कोणता, फेऱ्याचा कोणता हें अग्नीला समजतें आणि अगदी जवळच्या मार्गानें अग्नि हवि घेऊन जातो असें तात्पर्य.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटल्यास श्लोकवृत्ताला बसतेः—

विद्वाँनग्ने वयुनाँनि क्षितीनां
वि आनुषक् शुरुधो जीवसे धाः ।
अन्तर्विद्वान् अध्वनों देवयानान्
अतन्द्रो दूतो अभवो हविर्वाट् ॥

स्वाध्यो॑ दि॒व आ स॒प्त य॒ह्वी रा॒यो दुरो॒ व्यृ॑त॒ज्ञा अ॑जानन् ।
वि॒दद्गव्यं॑ स॒रमा॑ दृ॒ळ्हमू॒र्वं येना॒ नु कं॒ मानु॑षी भोज॑ते॒ विट् ॥८॥

सु॒ऽआ॒ध्यः॑ । दि॒वः । आ । स॒प्त । य॒ह्वीः । रा॒यः । दुरः॑ । वि । ऋ॒त॒ऽज्ञाः । अ॒जा॒न॒न् ।
वि॒दत् । गव्य॑म् । स॒रमा॑ । दृ॒ळ्हम् । ऊ॒र्वम् । येन॑ । नु । क॒म् । मानु॑षी । भोज॑ते । विट् ॥ ८ ॥

भाषायाम्.

८. स्वाध्यः (=शोभनकर्माणः=सत्कर्माणि कुर्वन्तः) ऋतज्ञाः (=यज्ञरूपं सत्यं जानन्तः) [अङ्गिरआदयः पूर्वे] दिवः (=द्युलोकस्य) आ सप्त यह्वीः (=सर्वा अपि सप्त नदीः=द्युलोकसकाशात् पतन्ति पतित्वा च भूमिस्थितगङ्गाद्या नदीः प्रवाहयन्ति मेघोदकानि) [तथा] रायो दुरः (=धनस्य द्वाराणि) वि अजानन् (=विशेषेण ज्ञातवन्तः=लब्धवन्तः) । सरमा (=एतन्नाम्नी देवशुनी) गव्यं दृळ्हम् ऊर्वं (=गवां संबन्धिनं स्थूलं समूहं=जलरूपाणां गवां मेघरूपं बलवन्तं गोष्ठं) विदत् (=अविन्दत्=अलभत) । येन [लाभेन] नु कं (=सांप्रतमपि) मानुषी विट् (=मनोः प्रजा=मानवजातं) भोजते (=भुङ्क्ते=मेघजलभवानि सुखान्यनुभवति) ॥

अत्रेदमुक्तं भवति । अङ्गिरआदयः पूर्वर्षयो यस्मात् सत्कर्माण्याचरन् यज्ञरूपं सत्यधर्मं च अजानन् तस्मात् ते मेघजलान्यलभन्त तेषां द्वारा च धनभाण्डारस्य द्वाराणीवोदघाटयन् । अङ्गिरसां मित्रभूतेनेन्द्रेण प्रेषिता सरमा नाम देवशुनी हि पणिहृतानां गवां पिहितं गोष्ठं लब्धवती येन मेघजलानि भूमौ प्रावहन्, तेन प्रवाहेण चाधुनापि मनुष्याः सुखमनुभवन्तीति ॥

" [हे अग्ने] त्वत्साध्येन यागेन प्रीत इन्द्रो गवामन्वेषणाय सरमां नाम देवशुनीं प्रेषितवान् । सा च सरमा गवां स्थानमवगत्येन्द्रस्य न्यवेदयत् । इन्द्रश्च तान् अङ्गिरसो गाः प्रापयत् " इति सायणाः ॥

८. सुकर्मक [जे] सत्यधर्मज्ञ [पूर्व ऋषि] त्यांजला स्वर्गींच्या सप्त महानद्यांचें [आणि] संपत्तींच्या द्वारांचें ज्ञान झालें. सरमेनें गाईंचा प्रचंड गोठा शोधून काढिला, [कीं] जेणेंकरून मानव लोक अजूनहि सुख भोगीत आहेत.

8. [The ancients] knowing the true religion [and] performing good deeds came to know all the seven great rivers of heaven, [and] the gates of wealth: Saramâ discovered the strong cow-stall, on which the human race still subsists.

---

८. या मंत्रांत अग्नीची उपासना मनुष्यें करूं लागलीं त्यापासून मनुष्यांस काय लाभ झाला हें सांगितलें आहे. ऋषि म्हणतो, 'सत्कर्मे करणारे आणि यज्ञ करणें हाच खरा धर्म होय असें मानणारे जे अंगिरस आणि त्यांसारिखेच दुसरे पुरातन ऋषि त्यांनीं अग्नीची उपासना करण्याचा प्रचार पाडिला तेणेंकरून मेघवृष्टींचीं जीं विपुल उदकें तीं आणि त्यांजपासून उत्पन्न होणाऱ्या ज्या धनसंपत्ति त्यांचा लाभ त्यांस झाला. कारण, अंगिरस इत्यादिक ऋषींनीं यज्ञ करून इंद्रादिकांला प्रसन्न करून घेतल्यामुळें इंद्रानें आपली कुत्री पणीनें हरण केलेल्या गाईंचा शोध लावण्याकरितां पाठविली, आणि तिणें शोध लाविला, आणि तेणेंकरूनच मेघोदकरूप गाईंचा लाभ मनुष्यांस झाला आणि त्या लाभापासून अजूनपर्यंतहि मानवी प्राणी सुख भोगीत आहेत.' याप्रमाणें जें झालें तें अग्नीच्याच प्रतापानें झालें असें तात्पर्य. सरमा या देवांच्या कुत्रीविषयीं सू. ६२, मं. ३, ५ पहा. शिवाय सू. ५१, मं. ३, सू. ७१, मं. २ आणि त्यांजवरील टीप पहा.

'सत्यधर्मज्ञ'='ऋतज्ञाः.' अक्षरशः अर्थ, 'सत्य जाणणारे' इतकाच आहे. आपले आर्य पूर्वज देवांप्रीत्यर्थ यज्ञ करून त्यांची सेवा करणें हाच खरा धर्म, इतर सर्व असत्य असें मानीत, म्हणून ऋतज्ञ म्हणजे यज्ञ करणें हाच जो खरा धर्म त्यातें जाणणारे असा अर्थ आहे.

'स्वर्गींच्या सप्त महानद्या'='दिव आ सप्त यह्वीः.' या ठिकाणीं 'सप्त यह्वीः' म्हणजे 'सप्त सिन्धूः' असा अर्थ आहे. आणि 'सप्त सिन्धू' याचा अर्थ मेघोदकें असा कसा होतो तें सू. ३५, मं. ८ याजवरील 'अंतरिक्ष' या शब्दाविषयींच्या टीपेंत सांगितलें आहे तें पहा.

'ज्ञान झालें'='वि अजानन्.' म्हणजे 'प्राप्ति झाली' असें विवक्षित आहे.

'संपत्तीच्या द्वाराचें'='रायो दुरः.' म्हणजे धनाचें भांडार जणुं भरलेलें होतें आणि तें उघडून त्यांतून मनमानेल तेवढें घेण्याची मोकळीक झाली.

आ ये विश्वा॑ स्वप॒त्यानि॑ त॒स्थुः कृ॑ण्वा॒नासो॑ अमृत॒त्वाय॑ गा॒तुम् ।
म॒ह्ना म॒हद्भि॑: पृथि॒वी वि त॑स्थे मा॒ता पु॒त्रैरदि॑ति॒र्धाय॑से॒ वे:॥९॥

आ । ये । विश्वा॑ । सु॒ऽअ॒प॒त्यानि॑ । त॒स्थुः । कृ॒ण्वा॒नास॑: । अ॒मृ॒त॒ऽ-
त्वाय॑ । गा॒तुम् ।
म॒ह्ना । म॒ह॒त्ऽभि॑: । पृ॒थि॒वी । वि । त॒स्थे॒ । मा॒ता । पु॒त्रैः । अदि॑तिः ।
धाय॑से । वेरिति॒ वेः ॥ ९ ॥

भाषायाम्.

९. ये [अदितेः पुत्रा] अमृतत्वाय गातुं कृण्वानासः (=मनुष्यहितार्थम् अ-मरत्वसाधनाय मार्गं निष्पादयन्तो) विश्वा स्वपत्यानि (=सर्वाणि सत्कर्माणि) आ तस्थुः (=आस्थितवन्तः=सर्वेषां कर्मणां स्वामिनो भवन्ति) [तैः] महद्भिः (=महानुभावैः) पुत्रैः (=आदित्यैः) [सह] पृथिवी (=विस्तीर्णा) माता अदितिः (=एतन्नाम्नी आदित्यदेवानां माता लोकत्रयीनिःसीमावकाशाभिमानिनी देवी) मह्ना (=स्वकीयेन महत्त्वेन) वेर्धायसे (=अग्निरूपस्य महापक्षिणो भरणार्थं) वि तस्थे (=विस्तृतत्वेन तस्थौ=विस्तृता भूतास्ति) ॥

इयं दुर्बोधा सायणेनैवं व्याख्याता । य आदित्या अमृतत्वायामरणत्वसिद्धये गातुं मार्गमुपायं कृण्वानासः कुर्वाणाः सन्तो विश्वा विश्वानि सर्वाणि स्वपत्यानि शोभनान्यपतनहेतुभूतानि चतुर्दशरात्रषट्त्रिंशद्रात्रादित्यानामयनादीनि कर्माण्यातस्थुः । आस्थितवन्तः । कृतवन्त इत्यर्थः । तथा च तैत्तिरीयकम् । आदित्या अकामयन्त सुवर्गं लोकमियामेतीति । त एतं षट्त्रिंशद्रात्रमपश्यन् । तमाहरन्त तेनायजन्तेति च । महद्भिरनुशनेन महानुभावैस्तैः पुत्रैः सहिता माता जनयित्र्यदितिरदीना पृथिवी धायसे सर्वस्य जगतो धारणाय मह्ना स्वकीयेन महत्त्वेन वितस्थे विशेषेण तिष्ठति । हे अग्ने यतस्त्वं वेः । आदित्यैरनुष्ठितेषु यागेषु चरुपुरोडाशादीनि हवींष्यभक्षयः । अत एतत्सर्वं जातमित्यर्थ इति ॥

वरुणादीनां येषामादित्यानां प्रीत्यर्थं यज्ञयागादीनि शोभनानि कर्माणि यजमानाः कुर्वन्ति ये च यजमानेभ्योऽमरत्वप्राप्तिमार्गं निरपादयन् तैः सह तेषां माता निःसीमत्रैलोक्यावकाशाभिमानिनी अदितिर्नाम देव्यपि अग्निरूपस्य महापक्षिणः सुखार्थं महाविस्तारोपेता जातास्ति । एतावानग्नेर्महिमेति भावार्थस्तु स्पष्टः ॥

९. अमरत्वासाठीं मार्ग करणाऱ्या ज्या अदितिपुत्रांप्रीत्यर्थ सकळ सत्कर्में केलीं जातात त्या महान् पुत्रांसहित विस्तीर्ण माता अदिति [अग्निरूप] पक्ष्याच्या पोषणासाठीं [आपल्या] मोटेपणानें पसरून राहिली आहे.

9. With those [her] sons who preside over all good deeds, and who make a path to immortality—with those her great sons, vast Mother Aditi has extended herself with her greatness for the support of the Bird (Agni).

'गाईंचा प्रचंड गोठा '=' गव्यं दृढम् ऊर्वम्.' प्रचंड म्हणजे जो कोणाच्याहि हातीं न सांपडणारा, मेघजलरूप गाईंस चोरून नेणारा आणि त्यांस कोंडून ठेवणारा जो पणि अथवा वृत्र त्याणें खडकें आणि मोठमोठीं कवाडें दारावर लावून दुर्गम केलेला. ऋ. ५. २९. १२ आणि ५. ३०. ४ हे मंत्र आणि त्यांजवरील सायणभाष्य पहा.

मेघवृष्टीचा जो लाभ त्याजपासून मानवी प्रजा अजून सुख भोगीत आहेत असें म्हणणें हें अगदीं खरें आहे. आपल्या भरतवर्षांत मेघजलासारिखा मोठा लाभ दुसरा कोणताहि नाहीं. आणि तो न होईल तर केवढा अनर्थ होतो त्याविषयीं प्रमाण सांप्रतच्या दुष्काळांत मिळेल.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटली पाहिजेः—

सुआधिओ दिव ऑ सप्त यह्वी
रायो दुरो वि ऋतँज्ञा अजानन् ।
विदद्गँव्यं सॅरमॉ दृव्हमूर्वं
येना नु कं मानुषी भोजते विट् ॥

९. हाहि मंत्र कठिण आहे. वर केलेल्या भाषांतराचें तात्पर्य असें आहे कीं, 'ज्या आदित्य देवांप्रीत्यर्थ आपणांस अमरत्व प्राप्त व्हावें म्हणून सर्व लोक सत्कर्में आचरितात, आणि जे आदित्य प्रसन्न होऊन अमरत्वाचा मार्गच जणुं उपासकांसाठीं बांधून देते झाले, त्या महान् आदित्यांसहित त्यांची अपरिमितपणानें मोठी जी आई अदिति ती सुद्धा अग्निरूपी महापक्ष्याच्या सुखासाठीं इतकी विस्तीर्ण होऊन राहिली आहे.' म्हणजे, अग्नीस सुख व्हावें, त्याला पाहिजे तेवढें स्थळ आणि भक्ष्यपेय मिळावें म्हणून आदित्यांसहित देवी अदितिहि विस्तीर्ण होऊन राहिली आहे. याप्रमाणें अग्नीचा महिमा आहे. आदित्यांसहित अदितिहि अग्नीसाठीं मोठी झाली. (म्हणजे अग्नीला राहण्यास जागा मिळावी म्हणून अदितीलाहि मोठें व्हावें लागलें.) असें झालें यावरून अग्नीचें महत्त्व अथवा मोठेपण इतकें सर्वव्यापी आहे कीं त्याची कल्पना

सुद्धा करितां येत नाहीं असें यांत दर्शविलें आहे. हें खालीं सांगितल्यावरून समजेल.

'अदिति' ही कोण हें येथें विस्तारानें सांगणें अवश्य आहे. 'अदिति' शब्दाचा मूळचा अर्थ, जें विभागलेलें नव्हे तें, म्हणजे जें सगळें तें; त्यावरून मोठें, 'अतिविस्तीर्ण.' या शेवटच्या अर्थी अदिति हें विशेषण अग्नीला आणि इतर देवांला लाविलेलें वेदांत आढळतें. (ऋ. १. ९४. १५; ७. ९. ३; ८. १९. १४ यांत अग्नीला; ऋ. ५. ५९. ८ मिमातुर्द्यौरदितिर्वीतये नः, आणि १०.६३.३ यांत द्यूला लाविलें आहे; ६.४८.२ यांत अन्तश्च प्रागा अदितिर्भवासि यांत सोमदेवाला लाविलें आहे; आणि ४. ३. ८ अवध्रं ज्योतिरदितेर्ऋतावृधो देवस्य श्लोकं सवितुर्मनामहे यांत सवित्या देवास लाविलें आहे.) त्यावरून सर्व पृथिवी, सर्व अंतरिक्ष, आणि असंख्य चंद्रसूर्यतारकरूप लोकांनीं भरलेला जो द्यू म्हणजे द्युलोक या तीनहि लोकांची जी जागा अथवा अवकाश तीच कोणी एक देवी तिला अदिति हें नांव पडलें. एतावता स्वर्ग, अंतरिक्ष आणि पृथिवी यांची जो अकल्पनीय अतिविस्तीर्ण पोकळी तीच 'अदिति' देवी होय. हिच्या पोटांत विस्तीर्ण पृथिवी, त्याहूनहि विस्तीर्ण अंतरिक्ष, आणि त्याहूनहि परमविस्तीर्ण द्युलोक हे आले. म्हणजे हिची विस्तीर्णता किती मोठी आहे त्याची कल्पनाहि करितां येत नाहीं, तेव्हां सर्व जें कांहीं आहे तें तिच्या पोटांत आहे, तिच्या पलीकडे कांहीं नाहीं म्हणून सांगावयास नकोच.

ही जो निःसीमावकाशरूपी देवी तिला आपले आर्य पूर्वज देवांची माता असें समजून भजत. आणि ती सकल देवतांची माता होय यांत संशय नाहीं. कारण दिवसरूप जो मित्र देव, तो तिच्याच पोटांत म्हणजे त्रैलोक्याच्या पोकळींतच राहतो. तसाच रात्रिरूप जो वरूण, तोहि तिच्याच पोटांत असतो म्हणून तो तिचा पुत्र होय. आकाशांत वृत्रादिकांस मारून उदकवृष्टि भूमीवर पडूं देणारा जो इंद्र, तोहि ह्या महा पोकळीच्याच पोटांत असतो म्हणून तोहि तिचा पुत्र होय. सर्व जगताला प्रकाश देणारा जो सविता देव, तोहि या पोकळींतच असतो, म्हणून सविता देवहि अदितीचा पुत्र होय. त्याप्रमाणेंच सकल जगताला सौभाग्य देणारा जो (सूर्यविभूतिरूपच) भग देव, तोहि त्या पोकळींत संचार करितो म्हणून तोहि अदिति मातेचा पुत्र होय. आणि आपल्या प्रकाशप्रेरणेनें सकळ प्राण्यांस पुष्ट करणारा जो (सूर्यविभूतिरूप) पूषा देव, तो तरी त्याच अपरिमेय पोकळींतच राहतो म्हणून तोहि अदिति मातेचा पुत्र होय. आणि मित्र, वरूण इत्यादिक जे आतांच देव सांगितले, त्यांजबरोबरच

सदैव जगाच्या घडामोडींत गुंतलेला जो अर्यमा देव तोहि त्याच अपरिमित त्रैलोक्यावकाशांतच असतो म्हणून तोहि अदितीचा पुत्र होय.

याच कारणावरून मित्र, वरुण, पूषा, सविता, अर्यमा, भग यांस 'आदित्य' म्हणजे अदितीचे पुत्र असें नांव पडलें आहे. अदितीनें या देवांस जन्म दिलें असें वेदांत सांगितलें आहे. ऋ. १०. १३२. ६ यांत मित्र आणि वरुण यांस एक ऋषि म्हणतो कीं, 'हे बुद्धिमान् मित्रावरुण हो, तुमची माता अदिति होय' (=युवोर्हि माता अदितिर्विचेतसा). याप्रमाणें पुष्कळ दुसऱ्या ठिकाणींहि अदिति देवांची माता आणि देव अदितीचे पुत्र असें सांगितलें आहे. उदाहरणार्थः—अदिति आम्हांस रक्षो, अदिति सुख देओ, जी अदिति मित्राची, धनसंपन्न अर्यमाची, आणि निष्पाप वरुणाची माता होय (=अदितिर्न उरूष्यत्वदितिः शर्म यच्छतु। माता मित्रस्य रेवतोर्यम्णो वरुणस्य चानेहसो इ० ऋ. ८. ४७. ९); त्या सर्वज्ञ आणि महातेजस्वी [मित्रावरुणां]स सत्यमय आणि अतिविस्तीर्ण अदिति बळासाठीं जन्म देती झाली (=ता माता विश्ववेदसा असुर्याय प्रमहसा। मही जजान अदितिः ऋतावरी ८. २५. ३). आणि वर सांगितलेल्या देवांस अदितीचे पुत्र असें म्हटलें आहे. व हे जे मित्रावरुणादि मुख्य देव, त्यांची माता अदिति होय त्यापेक्षां इतर देवांचीहि ती माता होय असें म्हणणें साहजिक आहे. आणि यास्तव अदिति सर्व देवांची माता असें समजूनहि तिचें आह्वान केलेलें आढळतें. उदाहरणार्थः—कारण कीं ते मित्रावरुणादिक जे अदितीचे पुत्र, ते शत्रूंचा परिहार करण्याला जाणतात (=ते हि पुत्रासो अदिते विदुर्द्वेषांसि योतवे ऋ. ८. १८. ५); हे जे मित्र, अर्यमा, वरुण, ते महापापाचा नाश करणारे होत, हे अदितीचे सुखकर आणि सुखी पुत्र यज्ञस्थानीं आनंद पावतात (=इमे चेतारो अमृतस्य भूरेर्मित्रो अर्यमा वरुणो हि सन्ति। इम ऋतस्य वावृधुर्दुरोणे शग्मासः पुत्रा अदितेरदब्धाः ऋ. ७. ६०. ५); हे आदित्य देव हो, अदितीचे सुखी पुत्र जे तुम्ही ते आम्हांवर स्नेह करा आणि क्षमा करा (=यूयं नः पुत्रा अदितेरदब्धा अभिक्षमध्वं युज्याय देवाः ऋ. २. २८. ३); मित्राची आणि धनसंपन्न वरुणाची माता अदिति आम्हांला सकळ पापापासून रक्षो (=विश्वस्मात् नः अदितिः पातु अंहसः माता मित्रस्य वरुणस्य रेवतः, ऋ. १०. ३६. ३). आणि मित्रावरुणादिक देवांस वेदांत 'राजे' असें म्हटलें आहे त्यावरून अदितीला 'राजपुत्रा' म्हणजे जिचे पुत्र राजे आहेत ती, आणि 'सुपुत्रा' म्हणजे जिचे पुत्र चांगले आहेत ती अशीं विशेषणें दिलेलीं आढळतात. उदाहरणार्थः—मित्रावरुणादिक देव जे राजे

त्यांची आई अदिति ती आम्हांस शत्रूपासून रक्षो (=पिपर्तु नः अदितिः राजपुत्रा अति द्वेषांसि २. २७. ७); हे अग्नी, तुला आम्हीं प्रदीप्त केला आहे, तर इन्द्र आणि दुसऱ्या त्वरित येणाऱ्या देवांसहित एकाच रथांत बसून आम्हांकडे ये, चांगल्या पुत्रांची आई जी अदिति ती येऊन आमच्या दर्भासनावर बसो, आणि अमरदेव सोम पिऊन आनंद पावोत (=आ याह्यग्ने समिधानो अर्वाङ् इन्द्रेण देवैः सरथं तुरेभिः। बर्हिर्न आस्ताम् अदितिः सुपुत्रा स्वाहा देवा अमृता मादयन्ताम् ३. ४. ११).

अदितीविषयीं वेदांत इंद्राप्रमाणें अथवा वरुणाप्रमाणें वगैरे पराक्रम कांहीं वर्णिलेले नाहींत. तिच्याविषयीं दोन गोष्टी वेदांत मुख्यत्वेंकरून प्रसिद्ध आहेत. पहिली, ती मनुष्यांचें पाप अथवा अपराध क्षमा करिते, आणि दुसरी ही कीं, ती मनुष्यांला सुख देते. आणि अदिति देवांची आई असल्यामुळें देवांबरोबर तिला बोलाविण्याचा प्रचार आपल्या आर्य पूर्वजांचा असे. तिला भजलें म्हणजे देव प्रसन्न होतात. आणि मनुष्यें पापी नव्हेत असें कोणी देवानें तिला सांगितलें म्हणजे ती त्या त्या मनुष्यांचें कल्याण करिते. याप्रमाणें वेदांत सांगितलें आहे तें खालीं दिलेल्या मंत्रांवरून समजून येईल.

‘ हें अदिती, हे मित्रा, आणि हे वरुणा, आम्ही जो कांहीं तुमचा अपराध केला असेल, तो तुम्ही क्षमा करा आणि हे इंद्रा, मला विपुल अभय आणि प्रकाश मिळे असें कर.’ (=अदिते मित्र वरुण उत मृळ यत् वः वयं चकृम कत्तं चित् आगः। उरु अश्याम् अभयं ज्योतिरिन्द्र ऋ.२. २७. १४). यांत मित्र, वरुण आणि इन्द्र यांसहित अदितीचें आह्वान केलें आहे. ‘ तर हे आदित्य हो, तुम्ही आम्हांस हिंसकांच्या तोंडांतून मुक्त करा. हे अदिती, चोरास सोडल्याप्रमाणें तूं आम्हांस सोड’ (ते नः आस्नः वृकाणाम् आदित्यासः मुमोचत स्तेनं बद्धमिवादिते ८. ६७. १४). ‘हे राजानो मित्र आणि वरुण हो, हे अदिती, ज्याला तुम्ही साहाय्य करितां त्याला संकट अथवा पाप किंवा भय कोणत्याच दिशेहून प्राप्त होत नाहीं’ (=न तं राजानौ अदिते कुतश्चन न अंहः अश्नोति दुरितं नकिः भयं यं...... पुरोरथं कृणुथः...... १०. ३९. १४). ‘ हा यज्ञाचा नायक वरुण, मित्र, आणि अर्यमा हे जे राजे ते आणि सुलभहवन अप्रतिहत देवी अदिति आम्हांस निष्पाप करो व दुःखाच्या पार पाडो’ (अयं हि नेता वरुण ऋतस्य मित्रो राजानो अर्यमापो धुः। सुहवा देव्यदितिरनर्वा ते नो अंहो अति पर्षन्नरिष्टान् ७. ४०. ४). ‘ हे अग्नी, आम्हीं जें पाप केलें असेल त्याची आम्हांस मनापासून क्षमा कर, आणि अर्यमा आणि अदिति हीं क्षमा करोत’ (अग्ने......यत् सीम् आगः चकृम तत्

सुमृळ तत् अर्यमा अदितिः शिश्रथन्तु ७. ९३. ७). 'अदिति आमच्या गुरांस दिवसा रक्षो, सत्यमय अदिति रात्रीं आमच्या गुरांस रक्षो, सदा सुखदायक अदिति आम्हांस पापापासून रक्षो' (अदितिर्नो दिवा पशुमदितिर्नक्तमद्वयाः। अदितिः पातु अंहसः सदावृधा ८. १८. ६). 'आणि देवी अदिति आम्हांस रक्षो, आणि अश्वी देव आणि महाबल मरुत् आम्हांस रक्षोत' (उत नो देवी अदितिः उरुष्यताम् उरुष्यन्तु मरुतो वृद्धशवसः ८. २५. १०). 'आम्ही निष्पाप आहों असें मित्र, अदिति आणि सविता देव हे वरुणापाशीं सांगून आम्हांस क्षमा करवोत' (मित्रो नो अत्र अदितिरनागान् सविता देवो वरुणाय वोचत् १०. १२. ८). 'इंद्र, मित्र, वरुण, अग्नि, मरुद्गण आणि अदिति यांस आम्हीं संरक्षणाकरितां हाक मारितों. तर हे दानशाली वसुदेव हो, तुम्ही खडकापासून रथ रक्षिल्याप्रमाणें आम्हांस सकल पापापासून रक्षा' (इन्द्रं मित्रं वरुणम् अग्निमूतये मारुतं शर्धः अदितिं हवामहे। रथं न दुर्गात् वसवः सुदानवः विश्वस्मात् नः अंहसः निः पिपर्तन १. १०६. १). 'आम्हांस पापाच्या पाशापासून वरुण मुक्त करो; आम्हांस अदितीच्या आश्रयाचें संरक्षण प्राप्त होओ; हे देव हो, तुम्ही आमचें संरक्षण करून आमचें कल्याण करा' (वि अस्मत् पाशं वरुणो मुमोचत्। अपो वन्वाना अदितेरुपस्थाद्यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ७. ८८. ७).

अदिति देवी संरक्षण करिते आणि कल्याण करिते याविषयीं अनेक स्थळीं प्रार्थना आहे. उदाहरणः—'हे देव हो, आमच्या हातानें सांप्रतकाळीं, अथवा भविष्यकाळीं अथवा सर्व प्रसंगीं तुमची सेवा कोणती होणार? तर हे मित्रावरुण हो, हे देवी अदिती, आणि हे इंद्रा, हे मरुतांनो, तुम्ही होऊनच आमचें संरक्षण करा' (किमु नु वः कृणवाम अपरेण किं सनेन वसवः आप्येन। यूयं नः मित्रावरुणा अदिते च स्वस्तिम् इन्द्रामरुतः दधात २. २९. ३); यांत मित्रावरुणादिक जे अदितीचे पुत्र त्यांसहित अदितीची प्रार्थना केली आहे. 'हे मित्रावरुण हो, हे अंतरिक्षरूपी देवी, तुम्हीं आणि इन्द्र, आणि अग्नि आणि अदिति हीं सर्वजण आमचें कल्याण करा' (स्वस्ति मित्रावरुणा स्वस्ति पथ्ये रेवति स्वस्ति नः इन्द्रश्च अग्निश्च स्वस्ति नः अदिते कृधि ५. ५१. १४); यांत मित्र, वरुण, इन्द्र, अग्नि आणि आकाशमार्गरूपी देवता यांसहित अदितीची प्रार्थना आहे. 'हे पित्या द्युलोका, हे माते पृथिवी, हे कृपाळू बन्धू अग्नी, हे देव हो, तुम्ही आम्हांवर दया करा. हे आदित्य हो, आणि हे अदिती देवी, तुम्ही सर्वजण मिळून आम्हांस पुष्कळ सुख द्या' (द्यौः पितः पृथिवि मातः अध्रुक् अग्ने भ्रातः वसवः मृळत नः। विश्वे आदित्या

अदिते सजोषाः अस्मभ्यं शर्म बहुलं वि यन्त ६. ५१. ५). इत्यादि पुष्कळ मंत्र आहेत. पुष्कळ ठिकाणीं अदितीचें आह्वान म्हणजे धांवा इतर पुष्कळ देवांबरोबर किंवा सर्व देवांबरोबर मिळून पण विशेषेंकरून तिचे पुत्र आदित्य यांजबरोबर केलेला आढळतो, ऋ. ८. १८. ४; ८. २७. ५; ९. ८१. ५; १०. ६५. १; १०. ६६. ३; १. ८९. ३; ४. २५. ३; ५. ४२. १; ५. ४६. ३; ६. ५०. १; ६. ५१. ३; ६. ५१. ४; ७. १०. ४; ७. ३९. ५; १०. ६३. १०; ७. ४१. २; १०. ६३. १७; १. ९४. १६; १. १०६. ७; १. १०. ७; २. ४०. ६; ३. ५४. १८; ४. २५. ५; ४. ५४. ६; ५. ४२. २; ५. ४९. ३; ५. ५१. ११; ६. ५१. ११; ६. ७५. १२; ६. ७५. १७; ७. ३५. ९; ७. ५१. २; ७. ६०. ८; ७. ६६. ६; ८. १८. ७.

अदिति म्हणजे त्रैलोक्याची जी अपरिमित, अखंड आणि दृष्टिगोचर पोकळी तीच कोणी देवता होय असें वर सांगितलें आहे. तें अदिती देवतेला लाविलेल्या विशेषणांवरूनहि उघड होतें. ऋ. ८. ६७. १० यांत अदितीला 'मही' हें विशेषण दिलें आहे. 'मही' म्हणजे विस्तीर्ण. ऋ. ५. ४६. ६ यांत तिला 'उरुव्यचाः' म्हणजे 'अतिविस्तीर्ण'. असें विशेषण दिलेलें आहे. (उरुव्यचाः अदितिः श्रोतु मे हवम्=अतिविस्तीर्ण देवी अदिति माझी हाक ऐको).

अदिति ही कुटुंबांतील माणसांस कुलदेवतेप्रमाणें सुख देणारी देवी होय असें ऋषि समजत, आणि तिची स्तुति प्रेमानें करीत. उदाहरणः—'कुटुंबाला सुख देणारी जी अदिति देवी तिणें आम्हांवर लोभ करावा म्हणून मी स्तोत्रें करून तिला प्रार्थितों' (प्र पस्त्याम् अदितिम् ......अर्कैः स्वस्तिम् ईळे सख्याय देवीम् ४. ५५. ३). 'मी यज्ञांत प्रातःकाळीं अदिति देवीस प्रार्थितों, मध्याह्नीं प्रार्थितों आणि सूर्योदयीं प्रार्थितों; संपत्ति आणि पुत्रपौत्रादि संतति मिळावी म्हणून मित्रावरुण यांला प्रार्थितों' (प्रातर्देवीमदितिं जोहवीमि मध्यंदिन उदिता सूर्यस्य। राये मित्रावरुणा सर्वताता ईळे तोकाय तनयाय शंयोः, ऋ. ५. ६९. ३).

आदित्य हे अदितीचे पुत्र होत, तेव्हां आदित्यांसहित अदितीचा धांवा करणें स्वाभाविक होय. वर दिलेल्या उदाहरणांशिवाय हा एक मंत्र पाहण्यासारिखा आहे. 'साम्राज्य करणारे, अतिबलाढ्य आणि निःशत्रु जे महा आदित्य देव द्युलोकीं राज्य करीत असतात आणि यज्ञाला येत असतात, त्यांस आणि अदितीस नमस्कारानें आणि सुंदर स्तोत्रांनीं कल्याणासाठीं तूं भज' (सम्राजो ये सुवृधो यज्ञमाययुः अपरिह्वृता दधिरे दिवि क्षयम्। तान् आ विवास नमसा

सवृक्तिभिः मह आदित्यान् अदितिं स्वस्तये १०. ६३. ५).

अदितीचे जे पुत्र महादेव आदित्य ते आठ होत असें सांगितलें आहे. जसें:—' अदितीच्या उदरांतून जे आठ पुत्र [आदित्य] देव जन्मले' इ० (अष्टौ पुत्रासो अदितेर्ये जातास्तन्वस्परि १०. ७२. ८.) हे आठ कोण कोण ते सायणांनीं ' अध्वर्युब्राह्मणा'च्या आधारावर सांगितले आहेत; ते असेः–१ **मित्र** (दिवसप्रकाशरूपी देव), २ **वरुण** (रात्रितमोरूपी देव), ३ **धाता** (म्हणजे ऋ. १०. १९०. ३ सूर्याचन्द्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत् यांत, १०. १२८. ७ धाता धातॄणां भुवनस्य यः पतिः यांत, आणि यथा अहानि अनुपूर्वं भवन्ति इ० १०. १८. ५ या आणि असल्या मंत्रांत सांगितलेला जो जगताचा कर्ता देव तो), ४ **अर्यमा** (म्हणून जो वेदांत सूर्यरूपीच एक देव प्रसिद्ध आहे तो), ५ **अंश** (या नांवाचा सूर्यविभूतिरूपच दुसरा एक देव ऋ. २. १. ४ आणि सायणभाष्य पहा), ६ **भग** (लोकांचें कल्याण करणारा सूर्यविभूतिरूपच आणखी एक देव), ७ **विवस्वान्** (तेजःपुंज सूर्यविभूतिरूपच चौथा एक देव) आणि ८ **आदित्य.** परंतु हेच आठ आदित्य (म्हणजे अदितीचे पुत्र जे ते) असें सर्वत्र निर्विवाद रीतीनें स्वीकृत नाहीं, याविषयीं सू. १४, मं. ३ याजवरील टीप पहा. पण मित्र, वरुण, अर्यमा, भग, सविता, इन्द्र आणि पूषा हे आदित्य होत हें मात्र सर्वत्र प्रसिद्ध आहे.

हें जें वर अदितीचें स्वरूप सांगितलें त्यावरून आपल्या आर्य पूर्वजांविषयीं आम्हीं जितका अभिमान धरिला तितका थोडाच असें दिसून येईल. कारण कीं हे आर्य लोक मानवी जातीच्या बाल्यावस्थेंत होऊन गेले असें मानिलें तरी, त्रैलोक्याची जी काळाच्या आणि स्थलाच्या संबंधानें पाहिलें तरी अपरिमेय पोकळी तिला देवता मानून देवाधिदेव वरुणादिक सुद्धा सर्व तिचीं मुलें होत असें समजून चालणें म्हणजे, ज्या खऱ्या अपरिमेय पदार्थास ईश्वर म्हणणें योग्य आहे त्याच्या जवळ जवळ येणें होय. वैदिक काळीं दुसऱ्या कोणत्याच लोकांस ईश्वरगुणांविषयीं इतकी सुंदर आणि इतकी भव्य कल्पना करितां आली ननती. त्यांणीं दगडास, किंवा लढाईच्या आवेशास, किंवा झाडासच देव असें नांव दिलें असतें.

अदिति (देवी माता) हेंच नांव जर ईश्वरवाचक होऊन सदैव आम्हांमध्यें चालू राहिलें असतें तर फार उत्तम झालें असतें. परंतु वैदिक काळच्या दुसऱ्या जशा अनेक उत्तम गोष्टी आणि कल्पना वेदोत्तर पुराणादिकांच्या काळीं नाहींशा झाल्या किंवा भ्रष्ट झाल्या तशीच अदिति शब्दाची अवस्था झाली आहे. कारण पुराणांत देवांची माता

अधि श्रियं नि दधुश्चारुमस्मिन्दिवो यदक्षी अमृता अकृण्वन् ।
अध क्षरन्ति सिन्धवो न सृष्टाः प्र नीचीरग्ने अरुषीरजानन् ॥
॥ १० ॥ १८ ॥

अधि । श्रियम् । नि । दधुः । चारुम् । अस्मिन् । दिवः । यत् । अक्षी इति । अमृताः । अकृण्वन् ।
अध । क्षरन्ति । सिन्धवः । न । सृष्टाः । प्र । नीचीः । अग्ने । अरुषीः । अजानन् ॥ १० ॥ १८ ॥

भाषायाम्.

१०. यद् (=यदा) अमृताः (=मरणधर्मरहिता देवा) दिवः (=द्युलोकस्य) अक्षी (=चक्षुर्द्वयं सूर्यचन्द्ररूपम्) अकृण्वन् (=अकुर्वन्=निर्मितवन्तः) [तदा] [ते] अस्मिन् (=अग्ने) चारु श्रियं (=रमणीयं तेजः) अधि नि दधुः (=स्थापयामासुः) । अध (=तदनन्तरं) सृष्टाः (=अग्नेर्जाता ज्वालाः) सिन्धवो न (=नदीप्रवाहा इव) क्षरन्ति (=संचलन्ति) । हे अग्ने, [तदा ते] नीचीः अरुषीः (=अरुणवर्णा अधोगमनशीला ज्वालाः) प्राजानन् (=प्रकर्षेण ज्ञातवन्तः=दृष्ट्वा हर्षमापुः) ॥

अत्रेदमुक्तं भवति । अग्नेर्ज्वालाः खलु न नवीनास्तर्हि यदा सूर्याचन्द्रमसौ निर्मितौ तदैव निर्मिताः सन्ति । ताश्च ज्वाला निर्मातृभिर्देवैर्यदा दृष्टास्तदा तानहर्षयन्निति ॥ सत्येतावति भावार्थेपि देवास्तावत्सूर्याचन्द्रमसोर्निर्मातार इति प्रसिद्धिर्वेदे न वर्तते । सायणास्तु एवमाहुः । अस्मिन्नग्नौ चारुं शोभनां श्रियं परिस्तरणपरिषेचनादिरूपां यज्ञसंपदमधि निदधुः । यजमानाः स्थापितवन्तः । निधाय च यद्यदाक्षी यज्ञस्याज्यभागलक्षणे चक्षुषी अकृण्वन् । कुर्वन्ति । चक्षुषी वा एते यज्ञस्य यदाज्यभागाविति श्रुतेः । तदानीं दिवो द्युलोकादमृता अमरणधर्माणो देवा यागसमयो जात इत्यवगम्यागच्छन्तीति शेषः । अधाज्यभागानन्तरं सृष्टा अग्नेरुत्पन्नाः सिन्धवो न शीघ्रं गच्छन्त्यो नद्य इव नीचीर्नितरां सर्वासु दिक्षु गच्छन्तीररुषीरारोचमानाः । यद्वा निर्मलरूपाः । हे अग्ने । एवंभूतास्त्वदीया ज्वालाः क्षरन्ति । संचलन्ति । सर्वासु दिक्षु गच्छन्तीत्यर्थः । आगता देवाश्च प्राजानन् । अस्माकं होमायेदृश्यो ज्वाला उत्पन्ना इति हृष्टाः सन्तः प्रकर्षेण जानन्तीति ॥

१०. जेव्हां अमरांनीं द्युलोकाचे दोन डोळे निर्माण केले तेव्हां त्यांनीं या [अग्नी]चे आंगीं सुंदर तेज स्थापित केलें. मग हे अग्नी, [तुजपासून] निघालेल्या [ज्वाळा] नद्यांप्रमाणें वाहूं लागल्या, [आणि] खालीं वाहणाऱ्या [ज्या तुझ्या] आरक्त [ज्वाळा त्या] त्यांजला दिसूं लागल्या.

10. The immortals placed beautiful splendor in Him when they created the two eyes of Heaven. Then [the effulgences] issuing from Him flowed like rivers, [the immortals] perceived, O Agni, [thy] red netherward [rays].

अदिति इजविषयीं अनेक अनन्वित कथा रचिल्या गेल्या हें सर्व पुराणभक्तांस सांगितल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें वृत्ताला बसतोः—

आ ये विश्वा सुअपॅत्यानि तस्थुः
कृण्वानॉसो अॅमृतॅत्वाय गातुम् ।
मह्ना महद्भिः पृथिवी वितस्थे
माता पुॅत्रैरॅदितिर्धायसे वेः ॥

१०. हाहि मंत्र बराच कठिण आहे, तथापि तात्पर्य उघड दिसतें. तें असेंः— ‘ अग्नीच्या ज्या ज्वाला त्या आधुनिक नव्हेत, तर देवांनीं जेव्हां द्युलोकाचे डोळे असे सूर्य आणि चंद्र उत्पन्न केले तेव्हां त्या निर्माण केल्या होत्या. ह्या ज्वाला अग्नीच्या आंगीं स्थापितांच त्या नद्यांप्रमाणें मोठ्या प्रवाहरूपानें वाहूं लागल्या आणि त्या वाहतांच देवांस संतोष झाला.’ या ऋचेचा अर्थ सायणाचार्य किंचित् निराळा करितात, तो आम्हीं भाषेंत दिला आहे, तो पहा.

ही ऋचा श्लोकवृत्ताला खालीं दाखविल्याप्रमाणें लागतेः—

अधि श्रियं नि दधुॅश्चारुमस्मिन्
दिवो यदक्षी अमृता अकृण्वन् ।
अध क्षरन्ति सिन्धवो न सृष्टाः
प्र नीचैरग्ने अरुषीरजानन् ॥

सूक्तम् ७३.

शक्तिपुत्रः पराशर ऋषिः । अग्निर्देवता । त्रिष्टुप् छन्दः ।

रयिर्न यः पितृवित्तो वयोधाः सुप्रणीतिश्चिकितुषो न शासुः ।
स्योनशीरतिथिर्न प्रीणानो होतेव सद्म विधतो वि तारीत् ॥१॥

रयिः । न । यः । पितृऽवित्तः । वयःऽधाः । सुऽप्रनीतिः । चिकितुषः । न । शासुः ।
स्योनऽशीः । अतिथिः । न । प्रीणानः । होताऽइव । सद्म । विधतः । वि । तारीत् ॥ १ ॥

भाषायाम्:

१. यः पितृवित्तो रयिर्न (=पितृभ्यः सकाशाल्लब्धं धनमिव) वयोधाः (=अन्नस्य दाता), [यः] चिकितुषः शासुर्न (=विदुष उपदेश इव) सुप्रणीतिः (=सन्मार्गदर्शकः), [यश्च] स्योनशीः अतिथिर्न (=सुखासीनोतिथिरिव) प्रीणानः (=हविर्भिस्तृप्यमाणो) [भवति] [सोग्निः] होतेव (=होमकर्ता ऋत्विगिव) विधतः सद्म (=परिचरणवत उपासकस्य गृहं) वि तारीत् (=विविधं कामति=तत्र गृह इतस्ततः कामति) ॥

सुप्रसन्नोतिथिरिव अथवा सख्ययुक्तो होतेव यजमानगृह इतस्ततो गच्छतीत्यर्थः ॥

सूक्त ७३.

ऋषि–शक्तीचा पुत्र पराशर. देवता– अग्नि. वृत्त–त्रिष्टुभ्.

१. वडिलोपार्जित द्रव्याप्रमाणें जो अन्नदायक, विद्वानाच्या उपदेशाप्रमाणें सुमार्गास लावणारा, [आणि] सुखासनीं बसलेल्या पाहुण्याप्रमाणें तृप्त होणारा, [असा] [अग्नि] उपासकाच्या घरांत होत्याप्रमाणें इकडे तिकडे फिरतो.

HYMN 73.

To *Agni*. By *Parâs'ara* son of *S'akti*. Metre—*Trishṭubh*

1. [He] who gives food like a treasure inherited from [one's] ancestors, [who is] a good guide like the command of the wise, [who is] pleased like a guest [that is] comfortably seated—[that Agni] walks about in the house of the worshipper like a priest.

---

१. हेंहि सूक्त पराशराचेंच आहे, आणि अग्नीविषयीं आहे. या मंत्रांत अग्नि हा उपासकांच्या घरीं कसा घरोब्यानें वागतो आणि तो कसा उपासकांस सुख देतो तेंहि या मंत्रांत सांगितलें आहे. ऋषि म्हणतो, ‘ वाडवडिलांनीं संपादन करून ठेविलेलें द्रव्य जसें श्रमाशिवाय अन्नदायक असतें, तसा अग्नि उपासकांला सहज अन्नदायक होतो. विद्वान् मनुष्याच्या उपदेशापासून जसें खऱ्या मार्गाचें ज्ञान होतें तसा अग्नि उपासकांला सन्मार्ग दाखविणारा होय. आदरातिथ्य करून प्रसन्न केलेला पाहुणा जसा आनंदकारक होतो तसा अग्नि आनंदकारक होय. आणि तो एकाद्या होत्याप्रमाणें उपासकाचे घरीं घरोब्याच्या नात्यानें इकडे तिकडे जात असतो.’

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला बसतोः–

रयिर्न यः पितृवित्तो वयोधाः
सुप्रणीतिश्चिकितुषो न शासुः ।
सिओनशीरतिथिर्न प्रीणानो
होतेव सद्म विधतो वि तारीत् ॥

देवो न यः सविता सत्यमन्मा क्रत्वा निपाति वृजनानि विश्वा ।
पुरुप्रशस्तो अमतिर्न सत्य आत्मेव शेवो दिधिषाय्यो भूत् ॥२॥

देवः । न । यः । सविता । सत्यऽमन्मा । क्रत्वा । निऽपाति । वृजनानि । विश्वा ।
पुरुऽप्रशस्तः । अमतिः । न । सत्यः । आत्माऽइव । शेवः । दिधिषाय्यः । भूत् ॥ २ ॥

देवो न यः पृथिवीं विश्वधाया उपक्षेति हितमित्रो न राजा ।
पुरःसदः शर्मसदो न वीरा अनवद्या पतिजुष्टेव नारी ॥ ३ ॥

देवः । न । यः । पृथिवीम् । विश्वऽधायाः । उपऽक्षेति । हितऽमित्रः । न । राजा ।
पुरःऽसदः । शर्मऽसदः । न । वीराः । अनवद्या । पतिजुष्टाऽइव । नारी ॥ ३ ॥

भाषायाम्.

२. देवः सविता न सत्यमन्मा (=सविता देव इव सत्यज्ञानः) यः [अग्निः] क्रत्वा (=आत्मीयया प्रज्ञया) विश्वा वृजनानि निपाति (=विश्वानि बलानि रक्षति) [स] पुरुप्रशस्तः (=बहुभिः स्तुतः) अमतिर्न सत्यः (=प्रकाश इव नित्यरूपः) आत्मेव शेवः (=प्राण इव सुखकरः) [अग्निः] दिधिषाय्यः (=सर्वैर्धारणीयः=संभजनीयो) भूत् (=अभूत्) ॥

लोकेषु प्रादुर्भूत एव सवितृवत्सत्यज्ञानत्वादिगुणविशिष्टोग्निः सर्वेषां संभजनपात्रोभवदिति भावः ॥

३. विश्वधायाः (=सर्वस्य जगतो धर्ता पोषयिता) यः [अग्निः] देवो न (=देदीप्यमान सवितेव) [अथवा] हितमित्रो राजा न (=अनुकूलैर्मित्रैर्युक्तो राजेव) पृथिवीम् उपक्षेति (=पृथिव्यां निवसति=तत्र निवसन् ईष्टे), [तथा] [यस्य] पुरःसदः (=पुरोवर्तिनः=उपासकाः) शर्मसदो वीरा न (=पितृगृहे निवसन्तः पुरुषा इव) [सुरक्षिताः] [अथवा] अनवद्या (=दोषरहिता) पतिजुष्टा (=पतिभुक्ता=पतिप्रिया) नारीव [सुरक्षिता भवन्ति],

२. जो सवित्या देवाप्रमाणें सत्यज्ञान [अग्नि] [आपल्या] पराक्रमानें सकळ बळें रक्षितो [तो] अनेकांनीं स्तविलेला, प्रकाशाप्रमाणें सत्य [आणि] जीवाप्रमाणें सुखकारक [अग्नि] सर्वांस पाहिजे असा झाला.

३. जो सकलांचें पोषण करणारा [अग्नि] देदीप्यमान [सवित्या]प्रमाणें [आणि] प्रिय मित्रांनीं युक्त [अशा] राजाप्रमाणें पृथिवीवर राज्य करीत असतो; [आणि] ज्याच्या पुढें बसणारे उपासक [आपल्या] घरीं बसलेल्या वीरांप्रमाणें [आणि] पतिप्रिय पतिव्रता नारीप्रमाणें [सुरक्षित होत],

2. [He] who, possessing true knowledge like divine Savitâ, protects all powers with [his] wisdom, [who is] praised by many [and] true as light [and] dear like the vital breath, became worthy of being sought.

3. [He] who, the nourisher of all, governs the earth like the divine [Savitâ], like a king surrounded by loyal friends ; [whose] servants [are as much protected] as heroes in [their] homes [or] as a stainless wife beloved of [her] husband;

---

२. या ऋचेंत अग्नीचे कितीएक गुण वर्णून तो लोकांस त्या गुणांच्या योगें-करून पूजनीय झाला असें सांगितलें आहे. पराशर म्हणतातः—‘ सूर्यरूप जो सविता देव त्याप्रमाणें खरें खोटें सर्व यथार्थ जाणणारा, सर्वांनीं स्तविलेला, प्रकाशाप्रमाणें सनातन (म्हणजे कधींहि न बदलणारा) आणि प्राणांप्रमाणें प्रिय असा जो अग्नि सकळ बळाचें रक्षण करीत असतो, तो लोकांच्या दृष्टीस पडतांच सर्वांस त्याला भजावें आणि त्याची उपासना करावी असें वाटलें.’

‘ सवित्याप्रमाणें सत्यज्ञान. ’ म्हणजे सविता देव सर्वत्र फिरून सकल वस्तूंचीं स्वरूपें जशीं यथार्थ जाणतो तसें सर्व वस्तूंचें खरें ज्ञान ज्याला आहे तो.

‘ सकळ बळें रक्षितो ’=‘ निपाति वृजनानि विश्वा. ’ म्हणजे सकळांच्या आंगची शक्ति जशाची तशी राहूं देतो, आंगांत तेज उत्साह इत्यादि ज्या शक्ति त्यांचें संरक्षण करितो. सायणाचार्य ‘सकळ संग्रामांपासून’ असा अर्थ करितात. ‘ वृजन’शब्दाचा ‘ बळ ’ हा अर्थ सायणभाष्यांत पुष्कळ ठिकाणीं केलेला आहे. ‘ अशस्तिहा वृजनं रक्षमाणः ’ (ऋ. ९. ८७. २) इत्यादि मंत्र पहा.

तं त्वा नरो दम आ नित्यमिद्धमग्ने सचन्त क्षितिषु ध्रुवासु ।
अधि द्युम्नं नि दधुर्भूर्यस्मिन्भवा विश्वायुर्धरुणो रयीणाम् ॥ ४ ॥
तम् । त्वा । नरः । दमे । आ । नित्यम् । इद्धम् । अग्ने । सचन्त । क्षितिषु । ध्रुवासु ।
अधि । द्युम्नम् । नि । दधुः । भूरि । अस्मिन् । भव । विश्वऽआयुः । धरुणः । रयीणाम् ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. तं त्वा (= तादृशं त्वां) नरः (=उपासका मनुष्या) आ दमे (=गृहे) नित्यम् इद्धं (=समिदादिभिः सदैव प्रज्वलितं) [कृत्वा] हे अग्ने, ध्रुवासु क्षितिषु (= " चलनरहितासु भूमिषु=निरुपद्रवेषु ग्रामेषु ") सचन्त (=असेवन्त=सेवितुं प्रवृत्ताः)। अस्मिन् (=पूर्वोक्ते त्वयि) [ते] द्युम्नं (=हविर्लक्षणमन्नम्) अधि नि दधुः (=स्थापयामासुः=प्रार्पयन्)। [तस्मात् कारणात्] [हे अग्ने], विश्वायुः (=सकलान्नसंपन्नस्) [त्वं] रयीणां धरुणो (=धनानां धारकः=तेषां दाता) भव ॥

यत्र यत्र निरुपद्रवाणि ग्रामादीनि स्थानान्यासंस्तत्र तत्र अग्निं नित्यं समिद्धं कृत्वा नरा असेवन्त तस्मै च हवींषि प्रत्तवन्तः । तस्मात् हे अग्ने, त्वमधुनास्मभ्यं धनदायी भवेत्यर्थः ॥

' प्रकाशाप्रमाणें सत्य '=' अमतिर्न सत्यः.' म्हणजे प्रकाशाचें रूप जसें कधीं बदलत नाहीं तसें ज्याचें रूप न बदलतां सर्वदा एकसारिखें आहे तो.

' जीवाप्रमाणें सुखकारक '=' आत्मेव शेवः '. कोणाहि मनुष्यास आपल्या प्राणापलीकडे प्रिय दुसरें नसतें अशा प्रसिद्ध अनुभवास अनुसरून ही उपमा दिली आहे.

ही ऋचा खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला सहज बसतेः—

देवो न यः सविता सत्यमन्मा
क्रत्वा निपाति वृजनानि विश्वा ।
पुरुप्रशस्तो अमतिर्न सत्यः
आत्मेव शेवो दिधिषायिओ भूत् ॥

३–४. तिसऱ्या आणि चवथ्या मंत्रांचा अन्वय एकत्र आहे यास्तव दोन्ही मंत्रांचें तात्पर्य एकत्रच देतों. ऋषि म्हणतोः–' जो अग्नि सर्वांचें पोषण करितो, आणि सवित्या देवाप्रमाणें सर्व पृथिवीला आक्रमून एकाद्या राजाप्रमाणें पृथिवीचें राज्य करितो, आणि ज्या अग्नीचे उपासक इतके सुरक्षित असतात कीं त्यांस कोणी उपद्रव करूं शकत नाहीं

४. त्या तुला चिरकाळ वसलेल्या गांवीं मनुष्य आपल्या घरीं नित्य प्रज्वलित करून, हे अग्नी, तुझी सेवा करूं लागले. त्या ह्या अग्नीच्या ठायीं त्यांनीं विपुल धन स्थापिलें. [तर हे अग्नी], सर्वान्नपरिपूर्ण असा जो तूं तो संपत्तींचा धारण करणारा हो.

4. That Agni the worshippers have always kindled in their homes and have worshipped in perpetually inhabited communities. [The worshippers] placed in Him copious splendor.—Be thou, Agni, rich in all food, the protector of riches.

---

(३), त्या अग्नीला सर्व मनुष्य आपआपल्या घरीं नित्य प्रदीप्त करून सर्व स्थळीं भजत आले आहेत, आणि त्याला उत्तम हवि अर्पण करीत आले आहेत. तर हे अग्नी, तूं आम्हांस सर्व प्रकारच्या संपत्तींचा दाता हो(४).'

'प्रिय मित्रांनीं युक्त अशा राजाप्रमाणें '=' हितमित्रो न राजा.' म्ह० ज्याला शत्रु कोणी नाहींत आणि त्याच्या राज्यामध्यें प्रजा सुखी असून राजभक्ति करणाऱ्या आहेत.

'पृथिवीवर राज्य करीत असतो'= 'पृथिवीम् उपक्षेति'. अक्षरशः अर्थ 'पृथिवीवर वास करीत असतो' म्ह० पृथिवीवर आपला अधिकार चालवून राज्य करीत असतो.

'घरीं वसलेल्या वीरांप्रमाणें' आणि 'पतिव्रता नारीप्रमाणें,' या दोन्ही उपमांचा सायणाचार्य असा अर्थ करितात कीं; वीर आपल्या घरीं बापापुढें आणि नारी आपल्या प्रिय पतीपुढें वसल्या असतां त्यांस जसा कोणी हात लावूं शकत नाहीं, त्याप्रमाणें अग्नीचे भक्त अग्नीपुढें वसले म्हणजे त्यांस उपद्रव करण्याची कोणालाहि शक्ति नसते.

'चिरकाळ वसलेल्या गांवीं'=' ध्रुवासु क्षितिषु'. हें येथें हेतुगर्भ क्रियाविशेषण आहे. आणि, जेथें जेथें अग्नीची उपासना होत गेली तेथें तेथें लोकांस कोणताहि उपद्रव होणें अशक्य झालें, आणि गांव सोडून जाण्याचा प्रसंग पूर्वीं येत असे तो नाहींसा होऊं लागला असा भावार्थ आहे.

आपले आर्य पूर्वज वैदिकयुगांत ज्या स्थितींत होते आणि त्यांच्या आसपास राहणाऱ्या अनार्य लोकांशीं त्यांचा जो संबंध असे, ती स्थिति आणि तो संबंध अशा प्रकारचा असे कीं त्यांस वारंवार अनार्य लोकांपासून उपद्रव होत असे; तर आर्यलोक अग्नीची उपासना करूं लागल्यामुळें हा उपद्रव नाहींसा झाला आणि लोक आपआपल्या गांवीं सुखी राहूं लागले, असा ऋषीचा भावार्थ आहे.

'अग्नीच्या ठायीं त्यांनीं विपुल धन

वि पृक्षो॑ अग्ने म॒घवा॑नो अश्यु॒र्वि सू॒रयो॑ द॒दतो॒ विश्व॒मायुः॑ ।
स॒नेम॒ वाजं॑ समि॒थेष्व॒र्यो भा॒गं दे॒वेषु॒ श्रव॑से॒ दधा॑नाः ॥५॥१९॥

वि । पृक्षः॑ । अ॒ग्ने॒ । म॒घऽवा॑नः । अ॒श्यु॒ः । वि । सू॒रयः॑ । द॒दतः॑ । वि॒श्व॑म् । आयुः॑ ।

स॒नेम॑ । वाज॑म् । स॒म्ऽइ॒थेषु॑ । अ॒र्यः । भा॒गम् । दे॒वेषु॑ । श्रव॑से । द॒धा॑नाः ॥ ५ ॥ १९ ॥

भाषायाम्.

५. हे अग्ने, मघवानः (=उपासकाः) पृक्षः (=अन्नानि) वि अश्युः (=विविधं प्राप्नुयुः=सर्वत्र लब्धवन्तः स्युः), ददतः (=हविर्ददतः) सूरयः (=विद्वांस उपासका) विश्वम् आयुः (=सकलमप्यायुष्यं) वि [अश्युः] (=प्राप्नुयुः) । [वयं] समिथेषु (=संग्रामेषु) अर्यो वाजम् (=अरेर्धनं) सनेम (=लभेमहि) [येन] [तस्य धनस्य हवीरूपेण] भागम् (=अंशं) श्रवसे (=यशोलाभार्थं) देवेषु (=इन्द्रादिषु=तत्प्रीत्यर्थं) दधानाः (=अर्पयन्तो भूयास्म) ॥

स्थापिलें '=' अस्मिन् द्युम्नम् अधि नि दधुः.' म्ह० मनुष्यांनीं अग्नीला आजपर्यंत पुष्कळ हवि अर्पण केलें आहे तें जणुं त्याजजवळ धनच ठेविलें आहे; तें अग्नीनें आतां आम्हांस द्यावें असा ऋषीचा भावार्थ.

' संपत्तींचा धारण करणारा हो'='रयीणां धरुणो भव.' म्ह० संपत्ति हातांत धरून घेऊन ये आणि आम्हांस दे असा सायणाचार्यांचा भावार्थ आम्हांस योग्य दिसतो.

हे दोन्ही मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला लागतातः—

देवो न यः पृथिवीं विश्वधाया
उपक्षेति हितमित्रो न राजा ।
पुरःसदः शर्मसदो न वीरा
अनवद्या पतिजुष्टेव नारी ॥ ३ ॥
तं त्वा नरो दम आ नित्यमिद्धम्
अग्ने सचन्त क्षितिषु ध्रुवासु ।
अधि द्युम्नं नि दधुर्भूरि अस्मिन्
भवा विश्वायुर्धरुणो रयीणाम् ॥ ४ ॥

५. हे अग्नी, जिकडे तिकडे उपासक जन अन्नें लाभोत; जिकडे तिकडे हविर्दाते विद्वान् जन पूर्ण आयुष्य लाभोत; आम्हांस संग्रामांत शत्रूचें धन मिळो, कीं जेणेंकरून आम्ही यश प्राप्त व्हावें ह्मणून देवांस हविर्भाग देत जाऊं.

5. Everywhere, O Agni, may sacrificers obtain food, everywhere may learned worshippers who offer oblations live the whole life. May we win the enemies' wealth in battles, offering to the Gods oblation for fame.

---

५. 'हे अग्नी, जे जे उपासक, मग ते श्रीमंत असोत अथवा विद्वान् असोत, तुला भजून हवि अर्पण करितील त्यांस जिकडे तिकडे अन्नरूप संपत्तीचा लाभ होओ आणि अपमृत्यूपासून मुक्त होऊन सर्व आयुष्य भरपूर जगोत; आणि आम्हांस युद्धांत यश येऊन शत्रूचें सर्व धन आम्हांस मिळो, कीं जेणेंकरून आम्हीं इंद्रादिक देवांस हवि अर्पण करून कीर्तिमान् होऊं.'

'पूर्ण आयुष्य लाभोत'=' विश्वम् आयुः वि अश्युः.' म्ह० मनुष्याची जी शंभर वर्षांची आयुर्मर्यादा ती टळेपर्यंत जगोत. ही प्रार्थना पराशरासारिख्या महर्षीनें केली आहे, तेव्हां वैदिक युगांतील ऋषि वस्तुतः कसे होते त्याविषयीं अनुमान काढण्यास आपणांस चांगलीं साधनें आहेत. पाहिजे तितकीं सहस्र वर्षें जगण्याची शक्ति तपोबळानें त्यांस येत नसे ही गोष्ट जशी सिद्ध होते, तशीच ते रणशूर असत आणि शत्रूंबरोबर युद्ध करून त्यांची सर्व संपत्ति हरण करण्याविषयीं तत्पर, आणि उत्सुक असून उपास्य देवतांचें साहाय्य प्रार्थीत असत हीहि गोष्ट यात्र मंत्रावरून स्पष्ट होते. आपल्या परमप्राचीन ऋषींविषयीं जें आपणांस ज्ञान आहे तें इतकें निर्मूल आहे कीं आणि त्यापासून होणारे परिणाम इतके संकटकारक आहेत कीं, त्या ऋषींविषयीं खरें ज्ञान होण्यासाठीं जितके श्रम केले तितके थोडेच आहेत.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला बसतोः—

वि पृक्षो॑ अग्ने म॒घवा॑नो अश्युः
वि सू॒रयो॒ दद॑तो॒ विश्व॒मायुः॑ ।
सनेम॒ वाजं॑ समि॒थेषु अ॒र्यो
भा॒गं दे॒वेषु॒ श्रव॑से॒ दधा॑नाः ॥ ५ ॥

ऋतस्य हि धेनवो वावशानाः स्मदूध्नीः पीपयन्त द्युभक्ताः ।
परावतः सुमतिं भिक्षमाणा वि सिन्धवः समया सस्रुरद्रिम् ॥ ६ ॥

ऋतस्य । हि । धेनवः । वावशानाः । स्मत्ऽऊध्नीः । पीपयन्त । द्युऽभक्ताः ।
पराऽवतः । सुऽमतिम् । भिक्षमाणाः । वि । सिन्धवः । समया । सस्रुः । अद्रिम् ॥ ६ ॥

भाषायाम्.

६. हि (=यस्माद्) वावशानाः (=अतिवत्सलाः) स्मदूध्नीः (=स्मदूध्न्यः= नित्यपूर्णदुग्धाशया) द्युभक्ताः (=दीप्तिमत्यो) धेनवः (=गावः) ऋतस्य (=सत्यमयमग्निं) पीपयन्त (=अपाययन्)। सुमतिं (सुष्टुमतिम् अनुग्रहात्मिकां बुद्धिं) भिक्षमाणाः (याचमानाः) सिन्धवः (=नद्यः) परावतः (=दूरदेशाद् आगत्य) अद्रिं समया (=पर्वतस्य समीपे) वि सस्रुः (=विविधं प्रावहन्) ॥

एतां दुर्बोधां सायण एवं व्याचख्यौ ॥ ऋतस्य हि ऋतं देवयजनदेशं प्राप्तमग्निमेव धेनवोऽग्निहोत्रादिहविषां दोग्ध्र्यो गावः पीपयन्त । क्षीरादिलक्षणं गव्यम् अपाययन् । कीदृश्यो गावः । वावशानाः । अग्निं पुनः पुनः कामयमानाः । स्मदूध्नीः । स्मच्छब्दो नित्यशब्दसमानार्थः । नित्यमूधसा युक्ताः । सर्वदा पयसः प्रदात्र्य इत्यर्थः । द्युभक्ताः । दिवा प्रकाशेन संभक्ताः संश्लिष्टाः । तेजस्विन्य इत्यर्थः । अपि च सिन्धवः स्यन्दनशीला नद्यः सुमतिमस्याग्नेः शोभनामनुग्रहात्मिकां बुद्धिं भिक्षमाणा याचमानाः सत्यः अद्रिं समयाद्रेः पर्वतस्य समीपे परावतो दूरदेशाद्विसस्रुः । विशेषेण गच्छन्ति प्रवहन्ति । अग्नये दातव्यानां हविषां निष्पत्तये प्रवहन्तीत्यर्थः ॥

साधीयसोर्थलाभस्येतरत्राभावाद् वयं सायणाचार्यमनुसरामः । यतः कारणात् अग्नेः पृथिव्यां प्रथमप्रादुर्भावे सर्वा भौमा गावः (=सर्वाः सोमधारारूपा वा गावः) तस्य पोषणार्थं नित्यविपुलपयोयुक्ता आसन् अपि च सर्वा अप्यापस्तस्य पोषणार्थं यच्छस्यादिकं तन्निष्पादयितुमितस्ततः प्रावहन्, तथा गावश्च आपश्च अग्नेरनुग्रहमैच्छन्निति भावगतं स्पष्टम् ॥

६. परम वत्सल [आणि] नित्य भरलेल्या कासेच्या [अशा ज्या] तेजस्वी गाई त्या सत्यमय [अग्नी]-ला दूध पाजित्या झाल्या. अग्नीच्या प्रसादाची प्रार्थना करणाऱ्या नद्या दूर दूर अंतरावरून अनेक दिशांनीं येऊन पर्वताजवळ वाहिल्या.

6. The kindest cows, of never-drying udders [and] possessed of brightness, suckled truthful [Agni]. Imploring Agni's benevolence the rivers flowed in from afar to the mountain.

---

६. ही ऋचा कठिण आहे आणि हिचा अर्थ जो सायणांनीं दिला आहे तोच बहुतकरून आम्हीं घेतला आहे. त्याचा भावार्थ असा कीं, 'अग्नीला हवि मिळावें म्हणून गाईच्या कासेंत सतत दूध राहूं लागलें, आणि आपल्या वत्सांस दूध पाजण्याविषयीं जशा त्या उत्सुक असतात तशा अग्नीला आपला वत्स समजून त्याला त्या पाजूं लागल्या. आणि अग्नीला चरुपुरोडाशादिक हव्य मिळावें म्हणून उदकें जिकडून तिकडे वाहूं लागलीं आणि तेणेंकरून धान्यनिष्पत्ति होऊं लागली. अग्नीची कृपा आपणांवर व्हावी अशी इच्छा करून उदकांनीं धान्यें पिकविलीं.' असें तात्पर्य सायणाच्या भाष्याचें आहे. परंतु ऋचेच्या शब्दांकडेस पाहतां तिचा अर्थ असा होईल कीं नाहीं याविषयीं बराच संशय दिसतो. अग्नि पृथिवीवर प्रादुर्भूत होतांच सर्व गाई (किंवा सोमाच्या धारा) आणि उदकें हीं त्याच्या सेवेस तत्पर झालीं इतकें मात्र तात्पर्य निर्विवाद असेल असें वाटतें.

'ऋतस्य धेनवः' हे शब्द एकान्वय घेऊन 'सत्यरूप धर्मीच्या गाई' म्हणजे 'सोमाच्या धारा' असा अर्थ कितीएक मन्त्रान्तरांकडेस पाहतां होईल असें वाटतें. मग 'एनम् (=अग्निम्)' इतकें पद 'पीपयन्त' या क्रियेच्या कर्मासाठीं अध्याहृत घेतलें पाहिजे.

'पर्वताजवळ वाहिल्या'='समया अद्रिं सस्रुः.' हा पर्वत म्हणजे सायणाचार्य जेथें धान्यें उत्पन्न होतात तसला डोंगर असा अर्थ करितात. असें खरें असेल तर डोंगराच्या आसपासच धान्यें पिकविण्याची चाल आणि प्रसिद्धि पूर्वी होती असें अनुमान काढितां येईल. कितीएक विद्वान् 'अद्रि' शब्दाचा अर्थ मेघरूपी पर्वत असा करून त्याच्यामधून मेघोदकें वाहिलीं असें भाष्य करितात.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला लागतोः—

ऋतस्य हि धेनवो वावशानाः
स्मदूध्नीः पीपयन्त द्युभक्ताः ।
परावतः सुमतिं भिक्षमाणा
वि सिन्धवः समया सस्रुरद्रिम् ॥

त्वे अ॑ग्ने सुम॒तिं भिक्ष॑माणा दि॒वि श्रवो॑ दधिरे य॒ज्ञिया॑सः ।
नक्ता॑ च च॒क्रुरु॒षसा॒ विरू॑पे कृ॒ष्णं च॒ वर्ण॑मरु॒णं च॒ सं धुः॥७॥

त्वे इति॑ । अ॒ग्ने । सु॒ऽम॒तिम् । भिक्ष॑माणाः । दि॒वि । श्रवः॑ । द॒धि॒रे । य॒ज्ञिया॑सः ।

नक्ता॑ । च॒ । च॒क्रुः । उ॒षसा॑ । विरू॑पे इति॒ विऽरू॑पे । कृ॒ष्णम् । च॒ । वर्ण॑म् । अ॒रु॒णम् । च॒ । सम् । धु॒रिति॑ धुः ॥ ७ ॥

यान्रा॒ये मर्ता॒न्त्सुषू॑दो अग्ने॒ ते स्या॑म म॒घवा॑नो व॒यं च॑ ।
छा॒येव॒ विश्वं॒ भुव॑नं सिसक्ष्यापप्रि॒वान्रोद॑सी अ॒न्तरि॑क्षम् ॥ ८ ॥

यान् । रा॒ये । मर्ता॑न् । सुसू॑दः । अ॒ग्ने॒ । ते॒ । स्या॒म॒ । म॒घऽवा॑नः । व॒यम् । च॒ ।

छा॒याऽइ॑व । विश्व॑म् । भुव॑नम् । सि॒स॒क्षि॒ । आ॒प॒प्रि॒ऽवान् । रोद॑सी॒ इति॑ । अ॒न्तरि॑क्षम् ॥ ८ ॥

भाषायाम्.

७. हे अग्ने, [तव] सुमतिं भिक्षमाणाः (=अनुग्रहात्मिकां बुद्धिं प्रार्थयमाना) यज्ञियासः (=यज्ञार्हा) [देवा] दिवि (=द्युलोके=स्वर्गे) त्वे (=त्वयि) श्रवो दधिरे (=हविरन्नादिरूपां परिचर्यां कृतवन्तः), [अपि च] नक्ता च उषसा (=नक्तोषसौ=रात्रीं च उषसं च इति द्वे) विरूपे (=असमानरूपे) [देव्यौ] चक्रुः (=निर्मितवन्तः) [तेन च] कृष्णं च अरुणं च वर्णं (=श्यामलवर्णं तथा शुक्लवर्णं=रात्रेः उषसश्च ये स्वरूपे ते) सं धुः (=समं स्थापयामासुः=एकत्रैवास्थापयन्)॥

अग्नेः पृथिव्यां प्रथमप्रादुर्भावे तस्य प्रसादं प्रार्थयमानाः सर्वेपि देवास्तस्योपासनां स्वर्गे चक्रुः सर्वेपि च मनुष्या यथा प्रातःकाले यजनादिकं कुर्वन्ति तथा देवीमुषसं निर्ममिरे तया सह च रात्रिमपि निर्ममिर इति भावः ॥

८. च (=अपि च) हे अग्ने, यान् [अस्मान्] मर्तान् राये सुसूदः (=यदि त्वम् अस्मान् मर्तान् धनलाभाय प्रेरयेस्तर्हि) वयं मघवानः (=धनवन्तः) स्याम (=भवेम) । [त्वं हि] रोदसी (=द्यावापृथिव्यौ) अन्तरिक्षं [च] आपप्रिवान् (=आपूरितवान्) [सन्] विश्वं भुवनं (=सर्वं जगत्) छायेव सिसक्षि (सेवसे)॥

स्वसत्तया परिपूरितत्रैलोक्यस्त्वं सकलं जगद्रक्षसि । तस्माद् यदि त्वमस्माकमभ्युदयमिच्छेस्तर्हि वयं निश्चितं धनवन्तः स्यामेति भावः ॥

७. हे अग्नी, पूजार्ह [देव] [तुझ्या] अनुग्रहाची प्रार्थना करून द्युलोकीं तुझी उपासना करिते झाले, [आणि] असमानवर्ण [ज्या] रात्र आणि उषा [त्यां]स उत्पन्न करिते झाले, [आणि तेणेंकरून] कृष्णवर्ण आणि श्वेतवर्ण यांस एकत्र स्थापिते झाले.

८. आणि हे अग्नी, जर [तूं] [आम्हां] मर्त्यांस धन[प्राप्ती]ची प्रेरणा करशील तर आम्ही श्रीमंत होऊं. भूलोक आणि द्युलोक [आणि] अंतरिक्ष यांस व्यापून राहणारा [जो तूं तो] सकल जगताच्या बरोबर छायेप्रमाणें फिरतोस.

7. Imploring [thy] friendship the worship-deserving Gods offered to thee a sacrifice in heaven. And they created the Night [and] the Dawn, of dissimilar form, and established the black and the ruddy colour together.

8. And O Agni, if thou wert to lead us, mortals, to wealth, we should become rich men. Thou, who hast filled heaven and earth [and] the firmament, followest all creation like a shadow.

---

७. अग्नि प्रथम पृथिवीवर प्रगट झाला तेव्हां गाईनीं दूध दिलें आणि उदकांनीं धान्यें पिकविलीं म्हणून वर सांगितलें. आतां म्हणतो, 'त्या प्रसंगीं देवांसहि आनंद झाला आणि त्यांणीं अग्नीची कृपा आपणांवर व्हावी म्हणून त्याची उपासना द्युलोकीं केली, आणि मनुष्यांनीं अग्नीच्या द्वारें आपणास हवि देत जावें अशा हेतूनें रात्र आणि उषा हीं एकमेकापासून भिन्नरूपाचीं दैवतें निर्माण केलीं; तेथपासूनच मनुष्यांनीं सकाळीं आणि संध्याकाळीं देवांप्रीत्यर्थ हवि देऊन यजन करण्याची प्रवृत्ति घातली.'

'तुझी उपासना करिते झाले '=' ते श्रवो दधिरे.' अक्षरशः अर्थ हविरन्न तुझ्या ठायीं घालते झाले, तुला हवि अर्पण करिते झाले; तुझी सेवा करिते झाले.

'द्युलोकीं '=' दिवि.' हा सरळ अर्थ चांगला आहे असें समजून आम्हीं केला आहे. सायणाचार्य ' देदीप्यमान ' असा विशेषणीं अर्थ करून त्याचा संबंध 'त्वे'

अर्वद्भिरग्ने अर्वतो नृभिर्नॄन्वीरैर्वीरान्वनुयामा त्वोताः ।
ईशानासः पितृवित्तस्य रायो वि सूरयः शतहिमा नो अश्युः॥९

अर्वत्ऽभिः । अग्ने । अर्वतः । नृऽभिः । नॄन् । वीरैः । वीरान् । वनुयाम । त्वाऽऊताः ।
ईशानासः । पितृऽवित्तस्य । रायः । वि । सूरयः । शतऽहिमाः । नः । अश्युः ॥ ९ ॥

भाषायाम्.

९. हे अग्ने, त्वोताः (=त्वया रक्षिता) [वयम्] अर्वद्भिः (=अस्माकम् अश्वैः) अर्वतः (=शत्रोः अश्वान्) नृभिः (=भटैः) नॄन् (=भटान्) वीरैः (=पुत्रैः) वीरान् (=पुत्रान्) वनुयाम (=जयेम) । [अपि च] पितृवित्तस्य (=पित्रादेः सकाशात्प्राप्तस्य) रायः (=धनस्य) ईशानासः (=प्रभवः) [ईदृशा भूत्वा] नः सूरयः (=अस्माकं विद्वांसः पुत्राः) शतहिमाः (=शतसमा) वि अश्युः (=विशेषेण प्राप्नुयुः) ॥

त्वया रक्षिता वयमस्माकमश्वादिभिः शत्रोरश्वादीन् जयेम तस्य धनं च प्राप्नुयाम अस्माकं पुत्राश्च पितृलब्धधनस्य प्रभवः सन्तो विद्वांसश्च सन्तः शतवर्षाणि जीवेयुरिति प्रार्थनेयम् ॥

(=तुझ्या ठायीं) याजकडेस घेतात. परंतु हा अर्थ क्लिष्ट असून अनवश्य आहे.

‘एकत्र स्थापिते झाले’=‘ संधुः.’ ‘काळा वर्ण’ (रात्र) आणि ‘ शुभ्र वर्ण ’ (उषा) हीं एकत्र राहण्यासारिखीं नसतांहि ठेविलीं असा विरोध दाखविण्याचें ऋषीच्या मनांत आहे.

श्लोकीकरणः—

तुए अँग्ने सुमतिं भिक्षमाणा
दिवि श्रवो दधिरे यज्ञियासः ।
नक्ता च चक्रुरुषसा विरूपे
कृष्णं च वर्णमरुणं च संधुः ॥

८. या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, ‘हे अग्नी, भूलोक, स्वर्गलोक आणि अंतरिक्षलोक या तिन्ही लोकांस आपल्या सत्तेनें तूं व्यापून टाकितोस, आणि सकल जगताच्या बरोबर छायेप्रमाणें राहून त्याचें रक्षण करितोस, तर असा महापराक्रमी जो तूं त्या तुझ्या मनांत आम्हांस श्रीमंत करावें असें येईल, आणि तूं आम्हांस संपत्ति मिळविण्याचा मार्ग दाखविशील, तर आम्ही खचित श्रीमंत होऊं.’

९. हे अग्नी, तुवां रक्षिलेले [असे आम्ही] [आमच्या] घोड्यांनीं [शत्रूच्या] घोड्यांस, योद्ध्यांनीं योद्ध्यांस [आणि] पुत्रांनीं पुत्रांस जिंकून हरण करूं असें कर. आमचे विद्वान् [पुत्र] वडिलोपार्जित धनाचे प्रभु [होऊन] शंभर वर्षें जीवंत राहोत.

9. May we, O Agni, under thy auspices, conquer [the enemy's] horses with [our] horses, [his] soldiers with [our] soldiers, [his] sons with [our] sons. May our wise [sons], masters of ancestral wealth, attain a hundred winters.

'जर तूं आम्हां मर्त्यांस धनप्राप्तीची प्रेरणा करिशील तर '=' यान् राये मर्तान् सुसूदः ते स्याम मघवानो वयं '. अक्षरशः अर्थ, 'ज्या मर्त्यांस धनासाठीं प्रेरिशील ते आम्ही श्रीमंत होऊं.' परंतु 'ज्या मर्त्यांस तूं धनासाठीं प्रेरिशील ते आणि आम्ही श्रीमंत होऊं असें कर' असाहि अर्थ होऊं शकेल. परंतु तो जुळत नाहीं आणि सायणांस आम्ही अनुसरलों आहों.

' व्यापून राहणारा '=' आपप्रिवान्.'

यांत अग्नीच्या दिव्य स्वरूपाचें प्रमाण चांगलें आहे. अग्नि म्हणजे नित्य भौतिक अग्निच समजावयाचा असें नाहीं. त्याला दिव्य सत्ता आहे असें ऋषिजन समजत.

श्लोकीकरणः—

यान्रायें मर्तान् सुषुऊदों अग्ने
ते सिऑम मघवॉनो वयं च ।
छायेव विश्वं भुवनं सिसक्षि
आपप्रिवान्रोदसी अन्तरिक्षम् ॥

---

९. हा मंत्र फार महत्त्वाचा आहे. पराशर ऋषि म्हणतातः– ' हे अग्नी, तूं आमचें रक्षण कर, आणि युद्धांत आमच्या घोड्यांस, आमच्या योद्ध्यांस आणि आमच्या पुत्रांस जय देऊन शत्रूच्या घोड्यांचा, योद्ध्यांचा आणि पुत्रांचा पराजय करून त्यांस आमच्या हातीं पाड आणि तेणेंकरून आम्हांस श्रीमंत कर; आणि अशा प्रकारें आम्हांस तूं मिळवून दिलेली संपत्ति आमच्या पश्चात् आमच्या पुत्रांच्या हातीं राहो, ते विद्वान् होओत, आणि अल्पायुषी न होतां भरपूर शंभर वर्षें जगोत.'

जर पराशर ऋषि गिरिकंदरीं राहून तप करणारे असते तर ते अशी प्रार्थना करितेना. पराशरादिक जे आमचे प्रसिद्ध आर्य पूर्वज त्यांच्या विषयीं ज्या कथा आम्हांस पुराणादिक आधुनिक ग्रंथांनीं शिकविल्या आहेत, त्यांत आणि त्यांचें जें वेदावरून खरें स्वरूप स्पष्ट दि-

एता ते॑ अग्न उ॒चथा॑नि वेधो॒ जुष्टा॑नि सन्तु॒ मन॑से हृ॒दे च॑ ।
श॒केम॑ रा॒यः सु॒धुरो॒ यमं॒ तेऽधि॒ श्रवो॑ दे॒वभ॑क्तं॒ दधा॑नाः ॥१०॥
॥ २० ॥ १२ ॥

ए॒ता । ते॒ । अग्ने॒ । उ॒चथा॑नि । वे॒धः । जुष्टा॑नि । स॒न्तु॒ । मन॑से । हृ॒दे । च॒ ।
श॒केम॑ । रा॒यः । सु॒ऽधुरः॑ । यम॑म् । ते॒ । अधि॑ । श्रवः॑ । दे॒वऽभ॑क्तम् । दधा॑नाः ॥ १० ॥ २० ॥ १२ ॥

भाषायाम्.

१०. हे वेधः अग्ने (=मेधाविन् अग्निदेव), एता (=एतानि) उचथानि (=स्तवनानि) ते (=तव) मनसे (=मनोवृत्तये) हृदे (=अन्तःकरणाय) च जुष्टानि (=प्रियाणि) सन्तु । देवभक्तं (=देवैः संभजनीयं=देवानां प्रियं) श्रवः (=हविरन्नं) [त्वयि] अधि दधानाः (=स्थापयन्तः=अर्पयन्तो) [वयं] ते (=तव) सुधुरो रायः (=सुष्ठु वाहकस्य संपद्रूपस्याश्वस्य=शोभनस्य वैभवरूपस्याश्वस्य) यमं (=यमनं=नियमनं) शकेम (=कर्तुं शक्नुयाम) ॥

धनरूपस्तवाश्वोस्माकं यथानुकूलो भवति तथा कर्तुं शक्तिरस्माकं भवत्विति भावः ॥

सुधुरो राय इति सायणा एवं विवृण्वन्ति । ते तव संबन्धिनः सुधुरः सुष्ठु निर्वाहकस्य । यद्वा शोभनं धूर्वहति दारिद्र्यं हिनस्तीति सुधूः । तादृशस्य रायो धनस्येति ॥

सून येतें त्यांत फार अंतर आहे. ते नित्य शूर, देवाचे भक्त आणि देवसेवेंत राहून प्रपंच करणारे असत, आणि ते आपणांस हजारो वर्षेपर्यंत जगण्याची शक्ति आहे असें न समजतां शंभर वर्षें जगलों तर देवाची आपणावर मोठी कृपा झाली असें मानणारे होते, म्हणूनच त्यांनीं अशी प्रार्थना केली आहे. या प्रार्थनेंत विशेष इतकें आहे कीं, आपले पुत्र शंभर वर्षें जगोत इतकेंच अथवा त्यांस संपत्ति असो इतकेंच मागितलेलें नाहीं, तर ते विद्वान् (सूरयः) होओत असें जाणविलें आहे. आणि सर्वांत विशेष उत्तम हें कीं, हें सगळें आमच्या तपोबळानें आम्हांस प्राप्त होईल, देवाच्या कृपेची अवश्यकता नाहीं, देव प्रतिबंध करितील तर देवांसच शापानें बद्ध करूं असें म्हटलेलें नाहीं, तर अग्नि

१०. हे अग्नी, हे प्रज्ञावन्त [अग्नी], हीं स्तोत्रें तुझ्या मनाला आणि अंत:करणाला प्रिय होओत. देवप्रिय हवि अर्पण करणारे [असे आम्ही] तुझ्या संपत्तिरूप घोड्याला आवरण्याविषयीं समर्थ होऊं असें कर.

10. O wise Agni, may these prayers be dear to thy mind and to [thy] heart. May we, offerers of the god-loved oblation, be able to bridle thy flitting wealth.

जर आमचें रक्षण करील (त्वोताः) तरच हें सर्व प्राप्त होईल असें म्हटलें आहे. ह्याचा पूर्ण विचार करणें आपणांस अगदीं अवश्य आहे.

श्लोकीकरणः—

अर्वद्भिरग्ने अर्वतो नृभिर्नॄन्
वीरैर्वीरान् वनुयाम त्वोताः ।
ईशानासः पितृवित्तस्य रायो
वि सूरयः शतहिमा नो अश्युः ॥

१०. हा या सूक्ताचा उपसंहार आहे. यांत ऋषीची वरप्रार्थना आहे. तो म्हणतोः—' हे अग्नी, याप्रमाणें ह्या ऋचा रचून मीं तुला अर्पण केल्या आहेत. तर ह्या तुझ्या मनाला आणि अंतःकरणाला आवडोत, आणि आवडतील यांत संशय नाहीं, कारण त्या आम्ही किती श्रमानें आणि केवढ्या मोठ्या भक्तीनें रचिल्या आहेत तें तूं महाज्ञानी (वेधाः) असल्यामुळें तुला सहज समजण्यासारिखें आहे. आम्ही सतत तुझ्या ठायीं देवप्रिय हवि अर्पण करून तुझी सेवा करीतच आहों, तर जेणेंकरून तुजकडून आम्हांस संपत्ति मिळेल अशी शक्ति आम्हांस दे. '

' प्रिय होओत '=' जुष्टानि सन्तु.' म्हणजे तूं तीं ग्रहण कर आणि तीं मधुर आणि चातुर्ययुक्त आहेत असें तुला वाटो. ऋषीनें यथाशक्ति सुंदर मंत्र रचिले तरी ते चांगले आहेत असा त्याच्या मनाला भरवसा वाटत नाहीं, यास्तव ते अग्नीला प्रिय होओत अशी प्रार्थना करितो.

' तुझ्या संपत्तिरूप घोड्याला आवरण्याविषयीं समर्थ होऊं असें कर'=' शकेम रायः सुधुरो यमं ते.' अग्नीजवळ संपत्ति पुष्कळ आहे. ती पाहिजे त्याला मिळते असें नाहीं, तर ती एकाद्या घोड्याप्रमाणें धांवणारी आहे त्यामुळें घोड्यास आवरण्याची शक्ति असल्यावर घोड्यास जसें आवरतां येतें तशी त्या संपत्तीला पाहिजे तिकडे फिरविण्याची ज्याला शक्ति असेल तोच तिजप्रत पावेल अशी कल्पना दिसते.

सूक्तम् ७४.

रहूगणपुत्रो गोतम ऋषिः । अग्निर्देवता । गायत्री च्छन्दः ।

उपप्रयन्तो अध्वरं मन्त्रं वोचेमाग्नये ।
आरे अस्मे च शृण्वते ॥ १ ॥

उपऽप्रयन्तः । अध्वरम् । मन्त्रम् । वोचेम । अग्नये ।
आरे । अस्मे इति । च । शृण्वते ॥ १ ॥

भाषायाम्.

१. अध्वरं (=यज्ञम्) उपप्रयन्तः (=अनुतिष्ठन्तः=यज्ञमनुष्ठाय) [वयम्] आरे च (=दूरदेशादपि) अस्मे शृण्वते (=अस्मभ्यं शृण्वते=अस्माकं स्तुतीः शृण्वते) अग्नये मन्त्रं वोचेम (=सूक्तं गायेम) ॥

श्लोकीकरणः—

एता ते अग्ने उचथानि वेधो
जुष्टानि सन्तु मनसे हृदे च ।
शकेम रायः सुधुरो यमं ते
अधि श्रवो देवभक्तं दधानाः ॥

या मंडलांत आतां यापुढें पराशर ऋषीचीं स्तोत्रें नाहींत. हें त्याचें (या मंडलांत) शेवटचें सूक्त होय. तेव्हां येथें या महर्षीचा निरोप घेऊन दुसऱ्या एका ऋषीची वाणी कशी आहे तें आपण पाहूं. पण तसें करण्यापूर्वी पराशर ऋषीविषयीं त्याच्या या सूक्तांवरून जी आपली समजूत होते तिला आणि त्याच ऋषीविषयीं पुराणें, महाभारतादिक महा इतिहास आणि काव्यादिक दुसरे वेदोत्तर ग्रंथ यांत जें सांगितलें आहे त्याची आपण तुलना करून विचार करणें अवश्य आहे. आणि पराशरस्मृति म्हणून जी आहे ते पराशर आणि हे पराशर भिन्न म्हणावयाचे नाहींत, तेव्हां त्या स्मृतींत जो स्त्रियांच्या पांच आपत्काळीं पुनर्विवाह सांगितला आहे त्या आणि यासारिख्याच दुसऱ्या पुष्कळ गोष्टींला पराशराच्या अतिप्राचीनपणामुळें शास्त्रदृष्ट्या केवढें प्रमाण आहे तें सांगावयास नको.

सूक्त ७४.

ऋषि—**रहूगण**नामक पुरुषाचा पुत्र **गोतम**. देवता—**अग्नि**. वृत्त—**गायत्री**.

१. आपण यज्ञाची सिद्धता करून अग्निप्रीत्यर्थ स्तोत्र गाऊं-या, जो अग्नि दुरून सुद्धा आमचें ऐकितो.

HYMN 74.

To *Agni*. By *Gotama* the son of *Rahûgana*. Metre—*Gâyatrî*.

1. Performing a sacrifice let us sing a hymn in honor of Agni, who hears us even from afar;

---

१. हें सूक्त रहूगणाचा पुत्र गोतम नांवाचा कोणीएक ऋषि त्याणें केलेलें आहे. या ऋषीचीं सूक्तें ऋग्वेदसंहितेंत फार नाहींत. या सूक्तापासून ९३ पर्यंत वीस सूक्तें आणि ९ व्या मंडळांत ३१ वें एक इतकीं एकवीस सूक्तें आहेत. गौतम ऋषीची प्रसिद्धि पुराणांतरीं आणि रामायणादिक महा इतिहासग्रंथीं फार आहेच, पण गोतम ऋषीविषयीं विशेष कथा ऐकण्यांत नाहींत. तथापि आपल्या समजुतीप्रमाणें ते वेदसूक्तांचे ऋषि असल्यामुळें त्रिकालज्ञ, सर्वज्ञानी, तपोराशि आणि महाशक्ति असले पाहिजेत. तर हीं जीं वीस सूक्तें येथें आलीं आहेत त्यांवरून त्यांचें खरें स्वरूप कसें आहे तें आपण पाहूं. म्हणजे ते पुराणादिकांच्या वर्णनाप्रमाणें त्रिकालज्ञ, सर्वज्ञानी, तपोराशि आणि महाशक्ति होते, कीं या विनाकारण दूषित कलियुगांतील निर्बल दीन मानवांप्रमाणेंच शक्तिहीन, दीन आणि अल्पायुषी पुरुष होते त्याचा विचार करून पाहूं.

या पहिल्या ऋचेंत गोतम म्हणतातः—'आपण अग्निप्रीत्यर्थ हव्य अर्पण करून उपासना करून त्याची स्तुति गाऊं. तो ती ऐकून घेईल कीं नाहीं याविषयीं शंका नको, कारण तो आमचीं स्तोत्रें दुरून सुद्धा ऐकून घेत असतो.'

'स्तोत्र'='मन्त्रम्.' मंत्रशब्दाचा जो हा अर्थ येथें आला आहे, त्याजकडेस लक्ष्य पुरवावें. तो त्या शब्दाचा मूळ अर्थ होय. मनांत विचार करून गाइलेलें जें स्तोत्र त्याचें नांव 'मंत्र.' 'मंत्र' म्हणजे दुसऱ्याने ऐकूं नये अशा रीतीनें म्हणावयाची आणि जी म्हटली असतां तिजपासून कांहीं दिव्य अथवा अपौरुषेय कार्य व्हावयाचें अशा ऋचेला मंत्र म्हणत नसत. आणि आतां आपण मंत्र म्हणजे ऋचेसारिखी लहानशी कविता समजतों, पण वेदांत मंत्र म्हणजे ज्यांत अनेक ऋचा अथवा मंत्र आहेत असें सूक्त अथवा अशीं कितीएक सूक्तें ज्यांत आहेत

य: स्त्रीहितीषु पूर्व्य: संजग्मानासु कृष्टिषु ।
अरक्षद्दाशुषे गयम् ॥ २ ॥

य: । स्त्रीहितीषु । पूर्व्य: । सम्ऽजग्मानासु । कृष्टिषु ।
अरक्षत् । दाशुषे । गयम् ॥ २ ॥

उत ब्रुवन्तु जन्तव उदग्निर्वृत्रहाजनि ।
धनञ्जयो रणेरणे ॥ ३ ॥

उत । ब्रुवन्तु । जन्तवः । उत् । अग्निः । वृत्रऽहा । अजनि ।
धनम्ऽजयः । रणेऽरणे ॥ ३ ॥

भाषायाम्.

२. यः पूर्व्यः (=पुरातनः) [अग्निः] स्त्रीहितीषु (=वधकारिणीषु) कृष्टिषु (=प्रजासु) संजग्मानासु (=युद्धे संगतासु) [सतीषु] (=परस्परं प्राणहरं युद्धं कुर्वतीषु सतीषु) दाशुषे गयम् अरक्षत् (=यस्तस्मै हविर्दानं कृतवानस्ति तदर्थं तस्य गृहं रक्षति) ॥

३. उत (=अपि च) जन्तवः (=सर्वेपि प्राणिनः) ब्रुवन्तु (=अग्नये मन्त्रं ब्रुवन्तु=अग्निं स्तुवन्तु)। अग्निर्वृत्रहा (=वृत्रस्य हन्ता) उदजनि (=जातोस्ति) [स] रणेरणे (=सर्वेष्वपि रणेषु) धनंजयः (=शत्रुधनानां जेता) [उदजनि]॥

अशी स्तोत्रमालिका होय. हा भेद लक्ष्यांत विशेषेंकरून ठेवण्याजोगा आहे.

या सूक्ताचें वृत्त गायत्री होय. गायत्री म्हणजे अनुष्टुप् वृत्तच समजावयाचें, मात्र त्यांतून तिसरा चरण काढून घेतला आहे असें समजावें; गायत्री छंदांत दीर्घ-ह्रस्वाचा विशेष व्यत्यय दृष्टीस न पडतां तें सहज श्लोकाच्या धाटणीवर बसतें:—

उपप्रयन्तो अध्वरं मन्त्रं वोचेम अग्नये ।
आरे अस्मे च शृण्वते ॥

२. जो पुरातन [अग्नि], वध करणारे जन युद्धांत एकमेकांवर पडले ह्मणजे, [हवि] देणाऱ्या [उपासका]चें घरदार संभाळितो.

३. सकल जन हो, तुम्ही अग्नीची कीर्ति गा. अग्नि वृत्राला मारण्याकरितां जन्मला आहे आणि तो प्रत्येक युद्धांत विजयी होतो.

2. [That] ancient [Agni] who, when slaughtering men join in battle, protects the home of him who has given [oblation].

3. Nay let [all] beings praise [Agni]. Agni has been born the killer of Vṛitra, the victor in every battle.

---

२. यांत अग्नीचा एक गुण सांगितला आहे. तो हा कीं, 'जेव्हां मनुष्यें युद्ध करितात आणि एकमेकांच्या सेना मारून टाकितात, तेव्हां त्यांपैकीं ज्या पक्षांत अग्निभजक म्हणजे अग्नीला हवि अर्पण करून त्याची उपासना करणारे लोक असतात, त्यांचें संरक्षण करून त्यांचें घरदार शत्रूच्या हातीं न पडे असें करितो;' म्हणजे, जो अग्नि अनादिकाळापासून युद्धांत आपल्या उपासकांचा जय करीत असतो, त्या अग्नीप्रीत्यर्थ स्तोत्र गाऊं असा पूर्व ऋचेशीं अन्वय केला पाहिजे.

श्लोकीकरणः—

यः स्नोहितीषु पूर्व्यअः संजग्मानासु कृष्टयः।
अरक्षद्दाशुषे गयम् ॥

३. पहिल्या ऋचेंत आपण अग्नीची स्तुति गाऊंया असें सांगितलें. आतां म्हणतो कीं, ' आम्हींच अग्नीचें यश गावें असें नाहीं, तें सर्वांनीं गाण्यास योग्य होय, कारण कीं अग्नि हा वृत्रासारिख्या महाशत्रूला मारून टाकणारा आणि युद्धांत प्रत्येक प्रसंगीं जय मिळवून शत्रूचें धन हरण करणारा असा महाविजयी देव प्रादुर्भूत झाला आहे.'

वृत्राला मारणें हा मोठा पराक्रम इंद्राचा आहे, तरी इतर देवहि तोच पराक्रम करितात असें त्या त्या देवांचे भजक म्हणत असतात. त्यावरून ' वृत्रहा ' या शब्दाचा अर्थ ' शत्रुनाशक ' इतकाच वेदांत साधारण होऊं लागला, मग तो शत्रु वृत्रच असला पाहिजे असें नाहीं, कोणताहि शत्रु असला म्हणजे झालें. तोच अर्थ येथें घेतला तरी चांगला निर्वाह होईल.

'तो प्रत्येक युद्धांत विजयी [होतो]'= ' धनंजयो रणेरणे.' या तिन्ही ऋचांचा झोंक अग्नीच्या शौर्याकडेसच आहे हें ध्यानांत ठेवावें. गोतम ऋषि गिरिकंदरीं तप करूनच कालक्षेप करणारे असते, तर त्यांस अग्नीचें अशा प्रकारचें वर्णन करावें असें वाटलें नसतें.

श्लोकीकरणः—

उत ब्रुवन्तु जन्तवः उदग्निर्वृत्रहाजनि ।
धनंजयो रणेरणे ॥

यस्य॑ दू॒तो असि॒ क्षये॒ वेषि॑ ह॒व्यानि॒ वी॒तये॑ ।
द॒स्मत्कृ॒णोष्य॑ध्व॒रम् ॥ ४ ॥

यस्य॑ । दू॒तः । असि॑ । क्षयै॑ । वेषि॑ । ह॒व्यानि॑ । वी॒तये॑ ।
द॒स्मत् । कृ॒णोषि॑ । अ॒ध्व॒रम् ॥ ४ ॥

तमित्सु॑ह॒व्यम॑ङ्गिरः सु॒दे॒वं स॑हसो यहो ।
जना॑ आहुः सु॒ब॒र्हिष॑म् ॥ ५ ॥ २१ ॥

तम् । इत् । सु॒ऽह॒व्यम् । अ॒ङ्गि॒रः॒ । सु॒ऽदे॒वम् । स॒ह॒सः॒ । य॒हो॒ इति॑ ।
जना॑ः । आ॒हुः॒ । सु॒ऽब॒र्हिष॑म् ॥ ५ ॥ २१ ॥

भाषायाम्.

४. हे अग्ने, यस्य क्षये (=गृहे) त्वं दूतो असि (=देवानां दूतो भवसि), [यस्य गृहाद्] वीतये (=देवानां भक्षणाय) हव्यानि वेषि (=हविरन्नानि वहसि) [यस्य च] अध्वरं (=यज्ञं) दस्मत् करोषि (=शोभनं करोषि),

५. तमित् (=तम् एव) जनाः हे अङ्गिरः (=अङ्गिरःकुलस्य आदिपुरुष) [अग्ने], हे सहसो यहो (शक्तेः पुत्र), सुहव्यं (=शोभनस्य हव्यस्य दातारम्) [अपि च] सुबर्हिषं (=शोभनयज्ञस्य कर्तारम्) आहुः (=वदन्ति) ॥

पौंच ता. १ पासून ता. ३१ आगष्टपर्यंत.

	रु.	आ.
रा. सा. सदाशिव रघुनाथ जोशी कारभारी.	१२	१२
,, ,, हणुमंत रामचंद्र मामलेदार.	६	६
,, ,, हरीदास वेहारीदास कारभारी, वडवान...	१५९	६
रा. रा. रामचंद्र प्रभाकर जोशी	६	६
,, ,, विष्णु गंगाधर फडके	६	६
,, ,, गोविंदराव शिवराम गोरे	६	०
,, ,, सखाराम महादेव पंडित...	६	६
,, ,, शंकरराव गोरे रानडे मुंबई...	६	०
,, ,, गोविंदराव कृष्ण रानडे मुंबई	६	०
,, ,, गोपाळराव व्यंकटेश मास्तर मुंबई	१२	०
,, ,, वासुदेवराव बापुजी कानिटकर मुंबई	६	०
,, ,, जनार्दन रामचंद्रजी मुंबई	६	०
,, ,, केशवराव वामन कीर्तने मुंबई	६	०
,, ,, शामराव विठ्ठल, वकील मुंबई...	६	०
,, ,, विठ्ठलराव वासुदेव सब. इंजनियर	६	६
,, ,, बाळाजी नारायण जोशी मास्तर...	६	०
,, ,, त्रिंबकराव बापुजी मायदेव मुंबई...	१२	०
,, ,, महादेवराव चिमणाजी आपटे वकील मुंबई	६	०
,, ,, नाना बापु जोशी मुंबई	६	०
,, ,, सदाशिवराव वामन काणे मुंबई...	६	०
,, ,, सदाशिवराव बाळकृष्ण मराठे	६	०
,, ,, नारायण रामजी, क्लार्क मिशन	६	०
,, ,, सखाराम रामचंद्र किरलोसकर...	६	०
,, ,, धोंडु गोपाळ मुजुमदार...	६	०
,, ,, दामोदर भिकाजी जठार हेडमास्तर	६	६
डा० आत्माराम पांडुरंग. मुंबई	६	०
,, मेकडोनाल्ड साहेब मुंबई...	१२	०
रेवरेंड जे. एस. एस. राबर्टसन साहेब...	६	०
,, आलफ्रेड राइने साहेब...	६	०

Registered No. 98 of 1877.

सूचना.

	रु.	आ.
वर्षाची वर्गणी, आगाऊ	६	०
मुंबईबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दरवर्षाचे	०	६

All communications to be addressed to the Manager Mr. Mahâdev Nârâyan Pandit, No. 29 *Moroba Popatji's Oart, Kalka Devi Road, Bombay.*

ग्रंथकर्त्याच्या नांवचा वगैरे सर्व प्रकारचा पत्रव्यवहार मुंबई मोरोबा पोपटजीची वाडी घर नंबर २९, या पत्त्यावर रा. रा. महादेव नारायण पंडित "म्यानेजर वेदार्थयत्न" यांच्याशीं ठेवावा.

विशेष सूचना.–आमच्या कितीएक वर्गणीदारांस एक वर्ष पुरें होऊन दुसऱ्या वर्षाचे ४ अंक पोंचले असूनही त्यांच्याकडून मागील सालच्या वर्गणीचा पैसा अद्याप येत नाहीं. तर मेहेरबानी करून तो त्यांनीं "आगाऊ" शब्दाकडे विशेष लक्ष देऊन लवकर पाठवावा. तिकीटें पाठविणें झाल्यास अर्धा आणा दराचीं असून दर रुपयास अर्धा आणा वर्ताळा असावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

THE

VEDÂRTHAYATNA

OR

AN ATTEMPT TO INTERPRET THE VEDAS.

वेदार्थयत्न.

ऋग्वेदसंहिता

पदांसहित व

तिचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

पुस्तक २. सप्टंबर सन १८७७. अंक १८.
Vol 2 Sept 1877 № 18

मुंबईः
"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

(हें सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदलें आहे.)

माझे

सर्व आर्य बंधु व भगिनी

यांस

हें भाषांतर

सादर समर्पण केलें आहे.

भाषांतरकर्ता.

४. [हे अग्नी], ज्याच्या घरीं [तूं] दूत होतोस [आणि] [देवांनीं] भक्षावें ह्मणून हवि घेऊन जातोस [आणि] [ज्याचा] यज्ञ सुंदर करितोस;

५. त्यालाच हे अंगिरा, हे शक्तिपुत्रा [अग्नी], सुहव्य [आणि] सुदेव [आणि] सुयज्ञ [असें] जन ह्मणत असतात.

4. [He] in whose house, [O Agni], thou becomest a messenger, carriest the oblation to feast [the Gods] [and] gracest the sacrifice,—

5. Him alone, O Angiras, son of might, the people call the giver of good oblation, the servant of a good God [and] the performer of a good sacrifice.

४, ५. चवथा आणि पांचवा या मंत्रांचा अन्वय एकत्र आहे यास्तव त्यांचा विचार एकत्र केला पाहिजे. गोतम ऋषि म्हणतात, 'हे अग्नी, तूं देवांप्रत हवि नेऊन जाण्याकरितां त्यांचा दूत होऊन ज्याच्या घरीं प्रादुर्भूत होतोस, आणि यज्ञांत पूजा स्वीकारून ज्याचा यज्ञ तूं सुशोभित करितोस (४), त्यालाच लोक 'चांगलें हवि देणारा,' 'चांगल्या देवाची उपासना करणारा,' आणि 'चांगले दर्भ आथरून देवांप्रीत्यर्थ यज्ञ करणारा' असें म्हणतात.' (५).

'ज्याच्या घरीं दूत होतोस '=' यस्य दूतो असि क्षये.' म्हणजे ज्याच्या घरचें हवि स्वीकारून घेऊन देवांप्रत नेऊन पोंहचवितोस.

'ज्याचा यज्ञ सुंदर करितोस '=' दस्मत् कृणोषि अध्वरम्.' म्हणजे ज्या यज्ञांत तूं विराजमान होतोस, ज्या यज्ञांत तूं असल्यामुळें शोभा येत असते.

'हे अंगिरा '=' अङ्गिरः.' सू. ३१, मं. १ आणि त्याजवरील टीप पहा.

'शक्तिपुत्रा'=' सहसो यहो.' सू. २६, मं. १० आणि त्याजवरील टीप पहा.

'सुहव्य,' 'सुदेव ' आणि 'सुयज्ञ.' या विशेषणांचा विचार करण्यासारिखा आहे. कितीएक मनुष्य देवांस चांगलें हवि अर्पण करणारे असत, कितीएक वाईट हवि अर्पीत, कितीएक चांगल्या देवांस भजत, कितीएक वाईट देवांस भजत, त्याप्रमाणेंच कितीएक चांगला यज्ञ करीत, कितीएक वाईट यज्ञ करीत; आणि जे चांगलें हवि अर्पीत, चांगल्या देवास भजत आणि चांगला यज्ञ करीत, त्यांची प्रशंसा होत असे असें यावरून स्पष्ट दिसतें. आतां चांगलें हवि कोणतें, चांगला देव कोण, आणि चांगले दर्भ पसरून केलेला यज्ञ तो कोणता, याचा विचार सायणाचार्य करीत नाहींत. पण चांगला देव कोणता असें आपले आर्य पूर्वज समजत याविषयीं संशय नाहींच. मात्र कोणतें हवि चांगलें आणि कोणता

आ च वहासि ताँ इह देवाँ उप प्रशस्तये ।
हव्या सुश्चन्द्र वीतये ॥ ६ ॥

आ । च । वहासि । तान् । इह । देवान् । उप । प्रऽशस्तये ।
हव्या । सुऽचन्द्र । वीतये ॥ ६ ॥

न योरुपब्दिरश्व्यः शृण्वे रथस्य कच्चन ।
यदग्ने यासि दूत्यम् ॥ ७ ॥

न । योः । उपब्दिः । अश्व्यः । शृण्वे । रथस्य । कत् । चन ।
यत् । अग्ने । यासि । दूत्यम् ॥ ७ ॥

भाषायाम्.

६. च (=अपि च) तान् (=पूर्वोक्तान्) देवान् प्रशस्तये (=स्तोत्राय=अस्माभिः कृतं स्तोत्रं श्रोतुं), [तथा] हे सुश्चन्द्र (=सुप्रकाश), हव्या वीतये (=हव्यानि वीतये=अस्माभिः प्रत्तानि हवींषि सेवितुम्) इह (=अस्माकं यज्ञे) उप आ वहासि (=सामीप्येन आनय)॥

७. हे अग्ने, यद् (=यदा) [त्वं] दूत्यं यासि (=देवानां दूतत्वं करोषि) [तदा] योः (=रथे गच्छतस्तव) अश्व्यः (=अश्वसंबन्धी) [अथवा] रथस्य उपब्दिः (=ध्वनिः) कच्चन (=कदापि) न शृण्वे (=न श्रूयते)॥

"शीघ्रगमनेनास्माभिः शब्दो नोपलभ्यत इत्यर्थः" ॥

यज्ञ चांगला असें समजत तें, आर्य जन कोणकोणते पदार्थ खात आणि कोणकोणते पदार्थ देवांस अर्पण करीत ते सर्व समजल्याशिवाय कळण्यास साधनें नाहींत.

श्लोकीकरणः—

यस्य दूतो असि क्षये वेषि हव्यानि वीतये।
दस्मत् कृणोषि अध्वरम् ॥ ४
तमित्सुहव्यमङ्गिरः सुदेवं सहसो यहो।
जना आहुः सुबर्हिषम् ॥ ५

६. आणि [हे अग्नी], [तूं] त्या देवांस स्तोत्र [ऐकण्या]-करितां [आणि] हे सुप्रकाश [अग्नी], हवि भक्षण्याकरितां इकडे घेऊन ये.

७. हे अग्नी, जेव्हां [तूं] दूताचें काम करितोस, [तेव्हां] तूं चालत असतां [तुझ्या] घोड्याचा [आणि] रथाचा ध्वनि कधींहि ऐकूं येत नाहीं.

6. And bring [thou] hither those Gods to [hear our] praise, [and] O [Agni] of delightful splendor, to enjoy the oblations.

7. No sound of [thy] horses [or] of [thy] chariot is ever heard, when thou drivest, [and] when, O Agni, thou actest the messenger.

---

६. यांत अग्नीला ऋषि म्हणतो, 'ज्या देवांचा दूत तूं होतोस असें वर सांगितलें त्या देवांस इकडे आमच्या यज्ञाप्रत घेऊन ये, म्हणजे ते आम्हीं केलेली स्तुति ऐकून घेतील आणि आम्हीं अर्पिलेलीं हव्यें भक्षण करितील.'

या ऋचेंत आणि आधुनिक अनुष्टुप् श्लोकांत कांहीं अंतर नाहीं. आणि अनुष्टुप् व गायत्री मंत्र जितके आहेत तितक्यांविषयीं बहुतकरून असेंच म्हटलें तरी चालेल. त्यांत ह्रस्वदीर्घांचा विशेष फेरफार होत नाहीं. ते आधुनिक अनुष्टुप् (अथवा गायत्री)प्रमाणें वाचतां येतात.

७. यांत ऋषि अग्नीला म्हणतो, 'तूं देवांचें दूतत्व पतकरून देवांला पृथ्वीवर आणण्याला अथवा पृथ्वीवरून हवि घेऊन जाण्याला द्युलोकाहून पृथ्वीवर अथवा पृथ्वीवरून द्युलोकीं मोठ्या त्वरेनें रथांत बसून जातोस, तेव्हां तुझ्या घोड्यांचा अथवा रथाचा आवाज कधींहि ऐकूं येत नाहीं, कारण तूं फार मोठ्या त्वरेनें जात येत असतोस.'

या ऋचेंत खालीं दाखविल्याप्रमाणें अक्षरें आहेतः—

न योरुपब्दिरश्विअः शृण्वे रथस्य कच्चन।
यदग्ने यासि दूतिअम् ॥

त्वोतो वाज्यह्रयोऽभि पूर्वस्मादपरः ।
प्र दाश्वाँ अग्ने अस्थात् ॥ ८ ॥

त्वाऽऊतः । वाजी । अह्रयः । अभि । पूर्वस्मात् । अपरः ।
प्र । दाश्वान् । अग्ने । अस्थात् ॥ ८ ॥

उत द्युमत्सुवीर्यं बृहदग्ने विवाससि ।
देवेभ्यो देव दाशुषे ॥ ९ ॥ २२ ॥

उत । द्युऽमत् । सुऽवीर्यम् । बृहत् । अग्ने । विवाससि ।
देवेभ्यः । देव । दाशुषे ॥ ९ ॥ २२ ॥

भाषायाम्.

८. हे अग्ने, यः कोपि वाजी (=योद्धा) पूर्वस्मात् अभि (=अग्रे तिष्ठतः अन्यस्माद् योद्धुः) अपरः (=द्वितीयः=निकृष्टः) [सन्नपि] त्वोतः (=त्वया रक्षितो यदा तदा) अह्रयः (=लज्जारहितः=निर्भयो) [भवति] [अपि च] दाश्वान् (=तुभ्यं दत्तहविष्कः) [सन्] प्रास्थात् (=ऐश्वर्यमभिप्राप्य सर्वेषां पुरोभागे तिष्ठति) ॥

९. उत (=अपि च) हे देव (=द्योतमान) अग्ने, देवेभ्यो दाशुषे (=देवप्रीत्यर्थं हविर्दत्तवते यजमानाय) [त्वं] द्युमत् (=कीर्त्यादिना अतिशयेन दीप्तं) सुवीर्यं (=शोभनवीरैरुपेतं) बृहत् (=प्रौढं) [धनं] विवाससि (=प्रापयसि) ॥

८. हे अग्नी, [कोणी] योद्धा दुसऱ्यापेक्षां उणा असला [आणि] त्वां त्याचें रक्षण केलें तर [तो] निर्भय [होतो] [आणि] [तुला] हवि अर्पण करून अग्रेसर होतो.

८. Any warrior, [being] behind another who occupies the front, becomes fearless if protected by thee, [and] offering oblations to thee O Agni, stands in the front.

९. आणि हे देदीप्यमान अग्नी, देवांकारणें [हवि] अर्पण करणाऱ्या [उपासका]ला [तूं] कीर्तियुक्त, सुसंततियुक्त [आणि] मोठें [असें] वैभव प्राप्त करून देतोस.

9. And to him that sacrifices to the Gods, thou givest, O Agni, a prosperity full of splendor, full of brave progeny, full of greatness.

---

८. या ऋचेंत ऋषि म्हणतो कीं, 'हे अग्नी, जो मनुष्य तुला हवि देतो, म्हणजे तुला भजतो, त्याजवर युद्धांत प्रसंग आला तरी तूं त्याला निभावितोस आणि त्याला सर्वांचा अग्रगण्य करितोस'.

'दुसऱ्यापेक्षां उणा असला' = 'अभि पूर्वस्माद् अपरः'. म्हणजे अक्षरशः अर्थ 'पुढें उभा राहणाऱ्याच्या मागें असला' असा आहे. सायणाचार्य या ऋचेचा अर्थ करितात तो असाः— "हे अग्नी, जो कोणी पुरुष आपल्या अधिकारापासून भ्रष्ट होऊन अगदी निकृष्ट होईल त्याचें त्वां रक्षण केलें तर त्याणें तुला हवि अर्पण केलें असतां त्याला अन्न प्राप्त होतें आणि लज्जा प्राप्त होत नाहीं."

ही ऋचा किंचित् लडबडीत आहेः—

त्वाऊतो वाजी अह्रयः अभि पूर्वस्मादपरः।
प्र दाश्वाँ अग्ने अस्थआत् ॥

९. हा सूक्ताचा उपसंहार आहे. ऋषि म्हणतो, 'हे अग्नी, जो कोणी उपासक देवांची उपासना करून त्यांजप्रीत्यर्थ होम करून हवि अर्पण करितो, त्याला तूं कीर्ति, सुसंतति आणि वैभव हीं प्राप्त करून देत असतोस.' याप्रमाणें अग्नि भक्तांचा कैवारी आहे.

हें सूक्त येथें संपलें. यांत लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे कीं नऊ ऋचांपैकीं च्यार युद्धासंबंधी आहेत, जसें कोणी म्हणेल कीं हा ऋषि युद्धांतच गुंतलेला असून त्याणें हें सूक्त रचिलेलें आहे. आणि कांहीं अंशांनीं हें खरेंच आहे कीं पुरातन ऋषि, म्हणजे आपले आर्य पूर्वजांतील कवि कीं ज्यांनीं वेदा-

सूक्तम् ७५.

रहूगणपुत्रो गोतम ऋषिः । अग्निर्देवता । गायत्री च्छन्दः ।

जुषस्वं सप्रथस्तमं वचो देवप्संरस्तमम् ।
हव्या जुह्वान आसनि ॥ १ ॥

जुषस्वं । सप्रथः ऽतमम् । वचः । देवप्सरः ऽतमम् ।
हव्या । जुह्वानः । आसनि ॥ १ ॥

अथा ते अङ्गिरस्तमाग्ने वेधस्तम प्रियम् ।
वोचेम ब्रह्म सानसि ॥ २ ॥

अथ । ते । अङ्गिरः ऽतम । अग्ने । वेधः ऽतम । प्रियम् ।
वोचेम । ब्रह्म । सानसि ॥ २ ॥

भाषायाम्.

१. [हे अग्ने], हव्या (=हव्यानि=अस्माभिः प्रत्तानि चरुपुरोडाशादीनि) आसनि (=मुखे) जुह्वानः (=प्रक्षिपन्) [त्वम्] [इदमस्माभिः क्रियमाणं] सप्रथस्तमं (=सर्वतः अतिशयेन पृथु=अतिविस्तीर्णं=सर्वत्र श्रूयमाणं) देवप्सरस्तमम् (=अतिशयेन देवानां प्रीणयितृ) वचः (=स्तोत्रं) जुषस्व (=सेवस्व) ॥

२. अथ (=पूर्वोक्तप्रकारं स्तोत्रमहं जुषे इति तव प्रतिज्ञाया अनन्तरं) [वयं] हे अङ्गिरस्तम (=अङ्गिरसां वरिष्ठ) वेधस्तम (=अतिशयेन मेधाविन्) अग्ने, ते (=तुभ्यं=त्वत्प्रीत्यर्थं) प्रियं सानसि (=संभजनीयं) ब्रह्म (=स्तोत्रं) वोचेम (=गायेम) ॥

सारिखीं सूक्तें रचिलीं ते, युद्ध करण्यास उत्सुक आणि युद्धांत देवांनीं साहाय्य करावें अशी प्रार्थना करीत असलेले पण संसारांत गुंतलेले योद्धे असत.

श्लोकीकरणः—

उत द्युमत्सुवीरिअं बृहदग्ने विवाससि ।
देवेभ्यो देव दाशुषे ॥

सूक्त ७५.

ऋषि–रहूगणनामक पुरुषाचा पुत्र **गोतम**. देवता–**अग्नि**. वृत्त–**गायत्री**.

१. [हे अग्नी], हव्यें तोंडांत घालीत घालीत [हें] अतिविस्तीर्ण [आणि] देवांस अत्यंत आनंद करणारें [आमचें] स्तोत्र [तूं] सेवन कर.

२. आणि हे अंगिरसांतील उत्तम अंगिरसा, हे परम मेधावी अग्नी, तुला प्रिय [आणि] आवडतें स्तोत्र आम्ही गातों.

HYMN 75.

To *Agni*. By *Gotama*, son of *Rahûgaṇa*. Metre—*Gâyatrî*.

1. [O Agni], putting in [thy] mouth [our] offerings, accept [thou] [this our] widest hymn, most acceptable to the Gods.

2. And we will sing, O best of the Angirases, O most wise Agni, a dear [and] agreeable hymn unto thee.

---

१. हेंहि सूक्त गोतमाचेंच आहे. यांत ऋषि म्हणतो, ‘हे अग्नी, आम्ही तुला हव्यें अर्पण करीत आहों आणि तुझें स्तोत्र गात आहों. तर तूं आमचीं हव्यें भक्षण कर, आणि हें जें स्तोत्र आम्ही मोठ्यानें गात आहों आणि जें इतकें प्रेमळ आणि सुंदर आहे कीं तें देवांस परम आनंदकारक होणार आहे, तें तूं ग्रहण करून घे’.

‘अतिविस्तीर्ण’ =‘सप्रथस्तमम्’. अतिविस्तीर्ण म्हणजे या ठिकाणीं फार लांब असा अर्थ समजावयाचा नाहीं असें आम्हांस वाटतें, तर जें जिकडे तिकडे पसरत आहे, जें जिकडे तिकडे ऐकूं येत आहे तें, असा अर्थ असावा. ऋ. ६. ६८. ९ यांतहि स्तोत्र या अर्थाचा जो ‘मन्म’ शब्द आहे, त्यालाहि ‘सप्रथः’ म्हणजे विस्तीर्ण हें विशेषण लाविलें आहे तें पहा. तेथेंहि जिकडे तिकडे ऐकूं येणारें असाच भावार्थ दिसतो. ‘अतिविस्तीर्ण’ हा केवळ अक्षरशः अर्थ आहे.

२. ‘तुम्ही कराल तें स्तोत्र मी सेवन करितों, तुम्ही गा, असें तूं सांगितल्यानंतर तुला आवडतें आणि जें ऐकून तुला आनंद होईल असें स्तोत्र आम्ही तुजप्रीत्यर्थ गातों.’

‘अंगिरसांत उत्तम अंगिरस’=‘अङ्गिरस्तम.’ अग्नि आङ्गिरसकुळाचा आदिपुरूष होय असें पूर्वी आलेंच आहे. पूर्वील सूक्ताचा ५वा मंत्र पहा.

कस्ते॑ जा॒मिर्जना॑ना॒मग्ने॒ को दा॒श्व॑ध्वरः ।
को ह॒ कस्मि॑न्नसि श्रि॒तः ॥ ३ ॥

कः । ते॒ । जा॒मिः । जना॑नाम् । अग्ने॑ । कः । दा॒शुऽअ॑ध्वरः ।
कः । ह॒ । कस्मि॑न् । अ॒सि॒ । श्रि॒तः ॥ ३ ॥

त्वं जा॒मिर्जना॑ना॒मग्ने॑ मि॒त्रो अ॑सि प्रि॒यः ।
सखा॒ सखि॑भ्य॒ ईड्यः॑ ॥ ४ ॥

त्वम् । जा॒मिः । जना॑नाम् । अग्ने॑ । मि॒त्रः । अ॒सि॒ । प्रि॒यः ।
सखा॑ । सखि॑ऽभ्यः । ईड्यः॑ ॥ ४ ॥

भाषायाम्.

३. हे अग्ने, जनानां [मध्ये] कस्ते जामिः (=कस्तव बन्धुर्भवति ?) को दाश्वध्वरः (=तव प्रीतये कः कृतयज्ञो) [भवति] ? को ह [त्वं] (=त्वं कोसि ?) [त्वं] कस्मिन् [पुरुषे] श्रितोसि (=कृताश्रयोसि) ?

बहुषु जनेषु यज्ञान् कुर्वत्सु तेषां मध्ये कः पुरुषः अग्निं बन्धुवत् प्रीणयति ? कथं अग्नये यज्ञं करोति ? अग्नेः किं स्वरूपम् ? कस्य गृहे चाग्निर्वसतीति पृच्छ्यते गोतमेनात्रेति द्रष्टव्यम् ॥

४. जनानां त्वं जामिः (=बन्धुः) [असि] । हे अग्ने, [तेषां त्वं] प्रियो मित्रो [भवसि], [त्वं] [तव] सखिभ्यः (=सखिवत् प्रीणयितृभ्यो यजमानेभ्यः) ईड्यः (=स्तुत्यः) सखा [भवसि] ॥

जनानां मध्ये तावद् अग्नौ प्रीतिं कुर्वन् कोपि वर्तते वा न वेति सत्यपि संशये जनानामुपर्यग्निस्तु भवत्येव कृतप्रीतिः तथैव च स तेषां सखिवद् भवतीत्यत्र नास्ति संशय इति भावः ॥

‘ स्तोत्र ’=‘ ब्रह्म ’. ‘ ब्रह्म ’ शब्दाचा मूळचा आणि वेदांत प्रसिद्ध असलेला हा येथें अर्थ आला आहे. सू. ३१, मं. १८ आणि त्याजवरील टीप पहा.

‘ अङ्गिरस्तमाग्ने ’ असें मूळांत आहे त्या ठिकाणीं वृत्तसुखार्थ ‘ अङ्गिरस्तमे अग्ने ’ असें म्हटलें पाहिजे.

३. हे अग्नी, [ह्या] जनांतून तुझा बंधु कोण [आहे]? [तुजप्रीत्यर्थ] यज्ञ कोण करितो? [तूं] कोण [आहेस]? [तूं] कोणाचा आश्रय करितोस?

४. हे अग्नी, [तूं] जनांचा बंधु [होस], तूं जनांचा प्रिय मित्र होस. तुझ्या जीवलग मित्रांचा तूं जीवलग मित्र [होस].

3. Who [is] thy brother among the people? Who O Agni, performs a sacrifice [for thee]? Who [art thou]? With whom dost [thou] live?

4. [But] thou [art] a brother to the people, [thou art], O Agni, a dear friend—a praiseworthy companion of [thy] companions.

---

३. 'हे अग्नी, या लोकांत अनेक लोक तुला हवि अर्पण करितात, त्यांतून कोणता मनुष्य आपल्या सख्या बंधूप्रमाणें तुजवर प्रीति करितो? कोणता मनुष्य तुला आवडे असा यज्ञ करितो? तुझें स्वरूप कसें आहे? तूं कोणाचे घरीं राहत असतोस?' अग्नीविषयीं या सर्व गोष्टींच्या संबंधानें गोतम ऋषीस संशय आणि जिज्ञासा उत्पन्न झाल्यामुळें तो असे प्रश्न करीत आहे. अग्नीची खरी भक्ति आणि त्याजवर खरी प्रीति करणारे या जगांत किती आहेत असा भावार्थ.

श्लोकीकरणः—

कस्ते जामिर्जनानआम् अग्ने को दाशुअध्वरः।
को ह कस्मिन्नसि श्रितः।

४. 'अग्नीच्या अनेक नामधारी भक्तांत अग्नीवर खरोखर प्रीति करणारे आणि त्याला सतत आश्रय देणारे किती असतील ते असोत. त्याविषयीं संशय आहे. परंतु अग्नि मात्र सर्व जनांचा बंधु, सर्व जनांचा प्रिय मित्र आणि सर्व उपासक जनांचा जीवलग मित्र होय यांत संशय नाहीं.' यांत इतकें तात्पर्य आहे कीं, अग्नीवर लोकांची मनापासून प्रीति असो किंवा नसो, अग्नीची मात्र सर्व लोकांवर प्रीति असते. या अर्थासाठीं पूर्वीच्या मंत्राचा आणि या मंत्राचा संबंध एकत्र घेतला पाहिजे.

श्लोकीकरणः—

त्वं जामिर्जनानआमग्ने मित्रो असि प्रियः।
सखा सखिभ्य ईडिअः॥

यजा नो मित्रावरुणा यजा देवाँ ऋतं बृहत् ।
अग्ने यक्षि स्वं दमम् ॥ ५ ॥ २३ ॥

यज । नः । मित्रावरुणा । यज । देवान् । ऋतम् । बृहत् ।
अग्ने । यक्षि । स्वम् । दमम् ॥ ९ ॥ २३ ॥

भाषायाम्.

५. हे अग्ने, नः (=अस्मदर्थं) मित्रावरुणौ यज (=हविषा तर्पय), देवान् यज (=देवान् हविषा पूजय), बृहद् ऋतं [यज] (=यज्ञरूपं महत् सत्यम् अनुतिष्ठ) । स्वं दमं (=तव गृहं=यज्ञगृहं) यक्षि (=“यज संगच्छस्व ”) ॥

यक्षि स्वं दममित्यत्र त्वय्यन्तर्विद्यमाने सति हि यज्ञगृहं पूज्यत इति सायणः ॥

५. [हे अग्नी], [तूं] आम्हांकारणें मित्र आणि वरुण यांचें यजन कर, [तूं] देवांचें यजन कर, [तूं] मोठें यजन कर. हे अग्नी, [तूं] आपलें घर पूज.

5. Worship for us Mitra and Varuṇa, worship the Gods; perform a great sacrifice. Worship thou thine home, O Agni.

---

५. यांत ऋषि म्हणतो कीं, 'हे अग्नी, तुला आम्ही प्रदीप्त करून भजत आहों, तर मित्र, वरुण आणि दुसरे जे देव त्यांस घेऊन ये आणि आम्हांकरितां त्यांची पूजा कर, त्यांजप्रीत्यर्थ मोठा यज्ञ कर, आणि तुझें जें घर (म्हणजे तुला आम्ही जेथें प्रदीप्त करितों तें स्थळ त्याला तूं सुशोभित कर.'

'यजन कर'='यज.' यजन म्हणजे यज्ञ अथवा सेवा करणें.

'तूं आपलें घर पूज'='यक्षि स्वं दमम्.' याचा अर्थ सायणाचार्य 'तूं आपल्या घरांत येऊन बैस' असा करितात, त्यालाच आम्ही अनुसरलों आहों.

वृत्तसुखार्थ 'स्वं दमम्' असें आहे त्याच्या ठिकाणीं 'सुअं दमम्' असें म्हटलें पाहिजे.

हें सूक्त येथें संपलें. यांत अग्नीविषयीं ऋषीचें प्रेम आणि नम्रतापूर्ण भक्ति हीं स्पष्ट दिसून येतात. यांत तपोबळाचा अथवा अपौरुष शक्तीचा लेश नाहीं. सांप्रत काळीं खऱ्या प्रेमळ मनानें कोणी ईश्वरोपासक प्रार्थना करील त्यासारिखीच प्रार्थना यांत आहे.

सूक्तम् ७६.

रहूगणपुत्रो गोतम ऋषिः । अग्निर्देवता । त्रिष्टुप् छन्दः ।

का त उपेतिर्मनसो वराय भुवदग्ने शंतमा का मनीषा ।

को वा यज्ञैः परि दक्षं त आप केन वा ते मनसा दाशेम ॥१॥

का । ते । उपऽइतिः । मनसः । वराय । भुवत् । अग्ने । शम्ऽतमा । का । मनीषा ।

कः । वा । यज्ञैः । परि । दक्षम् । ते । आप । केन । वा । ते । मनसा । दाशेम ॥ १ ॥

भाषायाम्.

१. [हे अग्ने], का (=कीदृशी) उपेतिः (=उपगमनम्=उपासना) ते मनसो वराय (=तव मनस आवरणाय=तव मनः अस्मान् प्रति आवर्तयितुं) [समर्था] भुवत् (=भवेत्) ? हे अग्ने, का मनीषा (=कीदृशी स्तुतिस्) [तुभ्यं] शंतमा (=अतिशयेन सुखकरा) [भवेत्] ? वा (=अथवा) यज्ञैः (=त्वत्प्रीत्यर्थं कृतैरुपासनाकर्मभिस्) ते दक्षं (=तव बलं=तव प्रज्ञां) कः पर्याप (=पर्याप्नोत्) ? वा (=अथवा) केन मनसा (=कीदृशेन मनसा) [वयं] ते दाशेम (=तुभ्यं हवींषि प्रयच्छाम) ?

अज्ञाना वयं नैतत्किमपि जानीमः । अतः कारणात् कीदृशेन प्रकारेण वयं त्वां परिचरितुमर्हामेति त्वमेव कथयेति भावः ॥

मनसो वरायेति शब्दयोरनु सायणं योनुवादोस्माभिः कृतः स एव यो वराय दाशति (ऋ. ७. ५९. २) इत्यत्र सायणेन प्रतिपादितः सम्यक् । वरायेति पदस्य यथाकाममिति योनुवादो ग्रास्मानेन कृतः स आधारापेक्षीति भाति ॥

को वा यज्ञैः परि दक्षं त आपेत्यत्र त्वत्प्रज्ञासदृशया प्रज्ञया कस्तुभ्यं यज्ञं कर्तुं समर्थो भवेत् न कोपीति भावः । दक्षशब्दं विदुष्टरो ग्रास्मानः सौमनस्यमिति विवृणोति तदपि काङ्क्षिताधारमिति द्रष्टव्यम् ॥

सूक्त ७६.

ऋषि–रहूगणाचा पुत्र गोतम. देवता–अग्नि. वृत्त– त्रिष्टुभ्.

१. [हे अग्नी], कोणती उपासना तुझें मन वळवील ? हे अग्नी, कोणती स्तुति [तुला] अत्यंत आनंदकारक [होईल] ? अथवा यज्ञांनीं तुझ्या कौशल्याप्रत कोण पावला आहे ? अथवा कोणत्या बुद्धीनें [आम्हीं] तुला हवि अर्पण करावें ?

HYMN 76.

To Agni. By Gotama son of Rahûgaṇa. Metre—Trishṭup.

1. What supplication shall turn thy mind [towards us]? What prayer, O Agni, [shall be] most agreeable [to thee] ? Or who has attained thy wisdom by sacrifice? Or with what mind shall we sacrifice unto thee ?

---

१. हेंहि सूक्त गोतम ऋषीचेंच आहे. भावार्थः– ' हे अग्नी, आम्ही जन अज्ञान आहों, कोणत्या प्रकारची उपासना केली म्हणजे तुझें मन आम्हांकडेस वळेल तें आम्ही जाणत नाहीं; कोणत्या प्रकारची स्तुति केली म्हणजे तुला मोठा हर्ष होईल आणि तूं आम्हांवर प्रसन्न होशील हें आम्ही जाणत नाहीं; तुझ्या शाहणपणाला योग्य अशा शाहणपणानें तुजप्रीत्यर्थ कोणीहि यज्ञ करूं शकत नाहीं; आणि कोणत्या स्थितींत मन ठेवून तुला हवि अर्पावें हेंहि आम्ही जाणत नाहीं. तर आमच्या अज्ञानावस्थेंत आम्ही जी वाईटवरी तुझी उपासना करीत आहों ती तूं कृपाकरून मान्य कर.'

' कोणती उपासना '=' का उपेतिः.' अक्षरशः ' उपेति ' शब्दाचा अर्थ ' जवळ येणें' असा आहे. म्हणजे 'आम्हीं हातांत हवि घेऊन तुझ्या जवळ यावें, कीं केवळ स्तोत्र म्हणत यावें, किंवा दोनीहि घेऊन यावें ?' असा भावार्थ.

' यज्ञांनीं तुझ्या कौशल्याप्रत कोण पावला आहे ? '=' को यज्ञैः परि दक्षं त आप.' ऋषीचा भावार्थ असा आहे कीं, यज्ञ करण्याविषयीं अग्नीची कुशलता आणि चातुर्य हीं इतकीं मोठीं आहेत कीं मानवांनीं कितीहि चातुर्यानें यज्ञ केले तरी ते अग्नीच्या मनाला येतील कीं नाहीं नकळे, अग्नीच्या मनाला ते ग्रहणीय होतील कीं नाहीं यांविषयीं संशय आहे.

' कोणत्या बुद्धीनें '=' केन मनसा. ' म्हणजे भाविक मनानें, कीं कांहीं द्रव्याची इच्छा करून, कीं ध्यानस्थ होऊन, कीं सभय होऊन, कीं नम्र होऊन, कीं बापाजवळ मुलगा सलगीनें वागतो तशा सलगीनें ?

एह्यग्न इह होता नि षीदादब्धः सु पुरएता भवा नः ।
अवतां त्वा रोदसी विश्वमिन्वे यजा महे सौमनसाय देवान्॥२॥

आ । इहि । अग्ने । इह । होता । नि । सीद । अदब्धः । सु । पुरःऽएता । भव । नः ।
अवताम् । त्वा । रोदसी इति । विश्वमिन्वे इति विश्वम्ऽइन्वे । यज । महे । सौमनसाय । देवान् ॥ २ ॥

भाषायाम्.

२. हे अग्ने, [त्वम्] एहि । [अस्माकं] होता (=अस्मदर्थं देवानामाह्वाता) [भूत्वा] इह निषीद (=अत्र देवयजनदेश उपविश) । [त्वं] नः (=अस्माकम्) अदब्धः (=अहिंसितः=केनाप्यतिरस्कृतः) पुरएता (=नायकः) सु भव (=सुष्ठु भव=त्वमेव भव) । त्वा (=त्वां) विश्वमिन्वे (=सर्वं व्याप्नुवत्यौ) रोदसी (=द्यावापृथिव्यौ) अवतां (=रक्षताम्) । महे सौमनसाय (=महते सौमनस्याय=महते प्रसादाय) देवान् यज (=हविरन्नादिभिः पूजय) ॥

हा मंत्र फार सुंदर आहे. यावरून आपले आर्य पूर्वज देवांची उपासना कशी करीत आणि कशा नम्रभावानें वागत तें समजून येतें. यावरून वेदसूक्तांचे ऋषि आपणांस सर्वशक्तिपूर्ण आणि त्रिकालज्ञ समजत नसत हेंहि उघड होतें. या शेवटच्या गोष्टीकडे जितकें लक्ष आपल्या लोकांनीं दिलें तितकें थोडें आहे. कारण हे ऋषि म्हणजे देवांहूनहि अधिक शक्तिमान् आणि ज्ञानी होते असें आतांचे अविचारी आणि दुराग्रही लोक समजतात.

श्लोकीकरणः—

का ते उपेतिर्मनसो वराय
भुवदग्ने शंतमा का मनीषा ।
को वा यज्ञैः परि दक्षं त आप
केन वा ते मनसा दाशएम ॥

यांतील चवथा चरण फार खडबडीत होतो. पण अशीं उदाहरणें वेदांत पुष्कळ सांपडतात.

२. हे अग्नी, [तूं] ये [आणि] [आमचा] होता [होऊन] येथें बैस. तूंच आमचा निःशत्रु नायक हो. सकलव्यापी द्युलोक आणि पृथिवी तुला रक्षोत. देवांनीं आम्हांवर मोठा प्रसाद करावा ह्मणून तूं त्यांचें यजन कर.

2. Come Agni, [and] sit here as our invoker. Uninjured do thou become our leader. May all-pervading Heaven and Earth protect thee. Worship the Gods for great kindness.

२. या मंत्रांत ऋषि अग्नीला म्हणतो कीं, 'हे अग्नी, देवांस कोणत्या रीतीनें आह्वान करावें आणि कोणत्या रीतीनें त्यांची प्रसन्नता संपादावी हें आम्हांस अवगत नाहीं; पण देवांस कसें बोलवावें आणि कसें आणावें आणि त्यांस कसें हवि अर्पण करावें हें तुला ठाऊक आहेः यास्तव तूं ये आणि येथें आमच्या घरीं बैस; आणि आमच्याकडून यज्ञ करीव म्हणजे देवांची मोठी कृपा आम्हांवर होईल. तुला कोणतेंहि विघ्न येणार नाहीं, कारण तुला कोणीहि विघ्न करूं शकत नसतो.'

यज्ञ करण्याविषयीं अग्नि अतिचतुर आहे असें पूर्वीं पुष्कळ ठिकाणीं आलें आहे आणि पूर्वील मंत्रांतहि 'यज्ञांनीं तुझ्या कौशल्याप्रत कोण पावला आहे ?' या शब्दांनीं जाणविलेंच आहे. यास्तव अग्नीनें येऊन आपला यज्ञ सिद्ध करावा असें ऋषि प्रार्थितो आहे.

'निःशत्रु नायक'='अदब्धः पुरएता.' म्हणजे तूं निःशत्रु आहेस, यास्तव आमचा नायक हो, आम्हीं तुझ्या मागून मागून चालतों.

प्रेत श्मशानांत नेल्यावर जेथें चिता रचावयाची ती भूमि पाणी शिंपून प्रथम शुद्ध करितात, तेव्हां हा मंत्र म्हणत असतात. त्याप्रमाणेंच, ग्रहयज्ञ म्हणून जें कर्म अनिष्ट ग्रहांच्या शांतीसाठीं करितात त्यांत आणि इतर कर्मांतहि स्थालीपाकाच्या वेळीं म्हणजे होमांत घालावयाचें अन्न शिजवितांनाहि ह्या मंत्राचा उच्चार करितात. अन्न शिजविते वेळीं हे अग्नी, तूं ये आणि येथें (ह्या अन्नाखालीं) बैस अशा अर्थाचा मंत्र कां लावून दिला हें समजण्यासारिखें आहे; पण प्रेतदहनाच्या वेळीं भूमिशुद्धीकडे याचा विनियोग केला आहे याविषयीं मात्र विचार आहे. मात्र शुद्ध केलेल्या भूमीवर अग्नीची स्थापना करावयाची असते.

या ऋचेंत शेवटचा चरण शिवाय करून दुसरे तीन सरळ वृत्ताला लागत नाहींत, दीर्घह्रस्वव्यत्यय करावा लागतोः—

प्र सु विश्वान्रक्षसो धक्ष्यग्ने भवा यज्ञानामभिशस्तिपावा ।
अथा वह सोमपतिं हरिभ्यामातिथ्यमस्मै चकृमा सुदाव्ने ॥३॥

प्र । सु । विश्वान् । रक्षसः । धक्षि । अग्ने । भव । यज्ञानाम् । अभिऽशस्तिऽपावा ।
अथ । आ । वह । सोमऽपतिम् । हरिऽभ्याम् । आतिथ्यम् । अस्मै । चकृम । सुऽदाव्ने ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. हे अग्ने, [त्वं] विश्वान् रक्षसः (=सकलान् राक्षसान्) प्र सु धक्षि (=प्रकर्षेण दह), यज्ञानां (=यागानां) [च] अभिशस्तिपावा (=हिंसायाः सकाशाद् रक्षिता) भव (=यज्ञानाम् अभिशस्तेर्हिंसा यथा न भवेत्तथा तान् रक्ष)। अथ (=अनन्तरं) सोमपतिं (=सोमस्य प्रभुम्=इन्द्रं) हरिभ्याम् (=अश्वाभ्यां) [सह] आ वह (=आनय)। [वयं हि] सुदाव्ने अस्मै (=सुष्ठु दात्रे तस्मै सोमपतये) आतिथ्यं चकृम (=अतिथेर्योग्यं सत्कारं सिद्धं कृतवन्तः स्मः) ॥

एहि अग्न इह होता निषीद
अदब्धः सु पुरएता भवा नः ।
अवतां त्वा रोदसी विश्वमिन्वे
यजा महे सौमनसाय देवान् ॥

३. हे अग्नी, तूं सकल राक्षसांस जाळून टाक [आणि] यज्ञांचा विघ्न निवारणारा हो. नंतर सोमपतीला [त्याच्या] उभय अश्वांसहित इकडे घेऊन ये; त्या उदार दात्याकारणें आम्हीं अतिथिसत्कार सिद्ध केले आहेत.

3. Burn down, O Agni, all demons, and be the protector of sacrifices from injury. Then bring thou hither the Lord of Soma with his pair of tawny horses. We have prepared hospitality for that liberal giver.

---

३. यांत अग्नीला अशी प्रार्थना आहे कीं, 'त्याणें सर्व राक्षसांला जाळून टाकावें आणि यज्ञांला कोणतेंहि विघ्न न होई असें करावें. आणि सोमपति जो इन्द्र त्याला यज्ञाप्रत घेऊन यावें, कारण इंद्र मोठा दाता होय आणि त्याजकरितां ऋषीनें आदरसत्कार करण्यासाठीं सर्व सिद्धता केली आहे.'

यांत राक्षसांला मारून टाकावें अशी प्रार्थना आहे ती समजण्याला राक्षस म्हणजे कोण तें सांगितलें पाहिजे. पुराणादिकांत राक्षस म्हणजे कोण तें प्रसिद्ध आहे. परंतु ज्याप्रमाणें पौराणिक आणि आधुनिक युगांतील ब्राह्मण, वैश्य इत्यादि; वैदिककाळांतील ब्राह्मण, वैश्य इत्यादिकांपासून भिन्न होत तसेच पौराणिक कथांतील आणि रामायण, महाभारत इत्यादिकांतील रावण, बकासुर, कंस, हिडिंब, हिरण्यकशिपु, केशी इत्यादि प्रसिद्ध राक्षसांहून वैदिकयुगांतील राक्षस भिन्न आहेत. ऋग्वेदांत राक्षसांविषयीं ज्या ज्या मंत्रांत उल्लेख अथवा उच्चार आले आहेत ते सर्व वाचून पाहतां याविषयीं संशय राहत नाहीं. वैदिक राक्षसांचीं नांवें कोठें दिलेलीं नाहींत. अमुकाला राक्षस म्हणावें अथवा अमुक व्यक्ति राक्षस होय असें कोठें सांगितलेलें नाहीं. नांव घेऊन कोणत्याहि राक्षसाविषयीं कांहींच सांगितलेलें नाहीं. राक्षस हे देवांपेक्षां अधिक शक्तिमान् अथवा पराक्रमी आहेत असें सांगितलेलें नाहीं आणि ते पृथिवीचा आणि पृथिवीवरील सकळ प्राण्यांचा उपमर्द करितात असेंहि सांगितलेलें नाहीं. राक्षसांला दहा तोंडें अथवा सहस्र बाहु, अथवा विक्राळ दांत किंवा भयंकर आकार आहेत असें सांगितलेलें नाहीं. ते अमुक ठिकाणीं राहतात अथवा अमुक ठिकाणीं राज्य करितात असें सांगितलेलें नाहीं. तर त्यांविषयीं वेदांत जें सांगितलें आहे तें निराळेंच आहे. तें येणेंप्रमाणें:—

१. राक्षस हे 'खाऊन टाकणारे' होत अशा अर्थाचीं विशेषणें वेदांत त्यांस दिलीं आहेत. उदाहरणार्थः 'हे सोमा, खाऊन टाकणाऱ्या सर्व राक्षसाला परा-

जित करून टाक' (=रक्षसं कं चिद् अत्रिणम् ९. १०४. ६). 'हे सोमा, खाऊन टाकणाऱ्या सर्व राक्षसांला तूं मारून टाक' (=जहि विश्वान् रक्षसः इन्दो अत्रिणः ९. ८६. ४८). राक्षस माणसांस खातात असें जरी कोठें सांगितलेलें नाहीं तरी ते खातात अशी पुराणांतरीं जी प्रसिद्धि आहे तिचें बीज या 'अत्रि' विशेषणांत दृष्टीस पडतें. २. राक्षस अपवित्र होत असें जाणविलें आहे:–'मी जादु करणारा नसतांहि जो राक्षस मला जादुकार म्हणेल अथवा जो राक्षस आपणास शुद्ध म्हणवील त्याला इंद्र मारून टाको' (=यो मा अयातुं यातुधान इत्याह यो वा रक्षाः शुचिरस्मीत्याह इन्द्रस्तं हन्तु ७. १०४.१६). ३. राक्षस 'अप्रिय' आहेत:– 'हे अग्नी, कोणासच आवडत नाहीं असे जे राक्षस त्यांजपासून आम्हांस रक्ष' (=पाहि नो अग्ने रक्षसो अजुष्टात् ७. १.१३). ४. राक्षस द्वेष करणारे आणि अपकार करणारे होत:– 'द्वेष करणाऱ्या राक्षसापासून सदादर्शी सोमदेव रक्षितो' (=वेति द्रुहो रक्षसः पाति जागृविः ९. ७१. १). 'हे इंद्र आणि सोम हो, द्वेषकारी आणि नाशकारी राक्षसांला तुम्ही मारून टाका' (=हतं द्रुहो रक्षसो भङ्गुरावतः ७. १०४. ७). ५. राक्षस पापी होत:– 'पापी राक्षसांला मारून टाकणारा आणि मजसारिख्या स्तोत्याला रक्षणारा इंद्र' (=हन्ता पापस्य रक्षसस्त्राता विप्रस्य मावतः १. १२९. ११). ६. राक्षस जादुविद्येमध्यें निपुण असतात:– 'हे अग्नी, जादु करणाऱ्या राक्षसाचें बळ आणि वीर्य नाहींसें करून टाक' (=यातुधानस्य रक्षसो बलं वि रुज वीर्यम् १०. ८७. २५). ७. राक्षस देवांची स्तुतिहि करीत नाहींत आणि त्यांस हविहि देत नाहींत:– 'हे अग्नी, हवि न देणाऱ्या सर्व राक्षसांपासून आम्हांस रक्ष आणि आम्हांस युद्धांत साहाय्य दे' (=पाहि विश्वस्मात् रक्षसो अराव्णः प्र स्म वाजेषु नो अव ८. ६०. १०). 'हे अग्नी, देवांचें स्तोत्र न करणारे जे राक्षस त्यांस जाळून भस्म कर आणि आम्हांस रक्ष' (=दह अशसो रक्षसः पाहि अस्मान् ४. ४. १५). ८. राक्षसांला कोणी यज्ञांत आवाहन करूं नये आणि त्यांची पूजा कोणी करूं नये:– 'हे मरुतांनो, देवांस ज्यांत हवि अर्पण करावें अशा यज्ञांत जो कोणी मनुष्य राक्षसांस बोलावील त्याला तुम्ही आपल्या बिनचाकी रथांनीं चिरडून टाका' (=य ओहते रक्षसो देववीतौ अचक्रेभिस्तं मरुतो नियात ५. ४२. १०); म्हणजे देवांप्रीत्यर्थ यज्ञ करावा, राक्षसांप्रीत्यर्थ करूं नये असा भावार्थ. ९. राक्षस रात्रीच्या वेळीं फिरत असतात:– 'जी राक्षसी द्वेषयुक्त होत्साती आपलें शरीर नग्न करून रात्रीच्या वेळीं घुबडीसारिखी फिरत असते ती अथाक खळग्यांत पडो' (=प्र या जिगाति खर्गलेव नक्तमप द्रुहा

तन्वं गूहमाना । वव्रान् अनन्तान् अव सा पदीष्ट ७.१०४.१७). 'हे मरुतांनो, तुम्ही मनुष्यांमध्यें जिकडे तिकडे राहा, आणि राक्षसांस धरा आणि त्यांस चिरडून टाका; जे राक्षस पक्षी होऊन रात्रीच्यावेळीं उडतात' (=वि तिष्ठध्वं मरुतः विक्षु इच्छत गृभायत रक्षसः संपिनष्टन । वयो ये भूत्वी पतयन्ति नक्तभिः ७. १०४. १८). १० राक्षसांला जाळून भस्म करावे अथवा मारून टाकावे म्हणून अग्नि, सोम, इंद्र, पर्जन्य, बृहस्पति आणि मरुत् या देवांस अनेक ठिकाणीं प्रार्थना केली आहेः– 'हे अग्नी, विस्तीर्ण तेजानें प्रकाशणारा असा जो तूं तो द्वेषकारी राक्षसांला नाहींसे करून टाक' (=वि पाजसा पृथुना शोशुचानः बाधस्व द्विषः रक्षसः ३. १५. १). 'हे सोमा, राक्षसांचीं दुर्गम घरेंहि फोडून टाक' (रुजा दृळ्हा चिद् रक्षसः सदांसि ९. ९१. ४). 'हे अग्नी, तूं प्रत्येक राक्षसाला जाळून टाक' (रक्षसो दह प्रति १. ७९. ६). 'हे अग्नी, तूं आपल्या अतितेजस्वी प्रभेनें राक्षसांला मार' (विध्य रक्षसः तपिष्ठैः ४. ४. १). 'जो पर्जन्य देव वृक्षांला मारितो, आणि राक्षसांला मारितो' (वि वृक्षान् हन्ति उत हन्ति रक्षसः ५ ८३. २). 'हे इंद्रा, तूं आपल्या वज्रानें पूर्व दिशेकडून, पश्चिम दिशेकडून, खालून आणि वरून राक्षसांला मारून टाक' (प्राक्ताद् अपाक्ताद् अधराद् उदक्ताद् अभि जहि पर्वतेन ७. १०४. १९–२१). शिवाय ३. ३०. १६, १७ पोहा.

याप्रमाणेंच ज्यांत राक्षसांला जाळून टाकण्याविषयीं देवांस प्रार्थना आहे असे मंत्र अनेक आहेत. परंतु राक्षसांविषयीं कोणतीहि कथा किंवा इतिहास सांगितलेला आढळत नाहीं. वर जे मंत्र सांगितले त्यांवरून राक्षस वाईट आहेत आणि ते नाशकारक आणि उपद्रवकारक आहेत असें होतें. पण त्यांची आकृति कशी असते अथवा ते कसे असतात याविषयीं कांहीं सांगितलेलें आढळत नाहीं. कितीएक मंत्र वेदांत आहेत त्यांचा विचार केला असतां राक्षस म्हणजे आम्ही ज्यांला भूतें अथवा राहु केतु इत्यादिक नांवें देतों तशा प्रकारचे कल्पनासिद्ध कोणी तरी असावे असें सिद्ध होतेंः– 'हे ग्रावे (सोम काढण्याचे पाषाण)हो, नाशकारक राक्षसांला मारा, पापाची देवता जी निर्ऋति तिला दूर हाकून द्या आणि दरिद्रावस्थेला जवळ येऊं देऊं नका' (अप हत रक्षसो भङ्गुरावतः स्कभायत निर्ऋतिं सेधताम् अमतिं १०. ७६. ४), यांत पापरूपी देवीला आणि दरिद्रावस्थारूप देवीला दूर करण्याविषयीं प्रार्थना आहे, त्यांतच राक्षसांना मारून टाकण्याविषयींहि प्रार्थना आहे. यावरून निर्ऋति आणि दरिद्रावस्था हे ज्या प्रकारचे प्राणी होत त्याच प्रकारचे प्राणी राक्षस असावेत

प्रजावता वचसा वह्निरासा च हुवे नि च सत्सीह देवैः ।
वेषि होत्रमुत पोत्रं यजत्र बोधि प्रयन्तर्जनितर्वसूनाम् ॥ ४ ॥
प्रजाऽवता । वचसा । वह्निः । आसा । आ । च । हुवे । नि । च । सत्सि । इह । देवैः ।
वेषि । होत्रम् । उत । पोत्रम् । यजत्र । बोधि । प्रऽयन्तः । जनितः । वसूनाम् ॥ ४ ॥

भाषायाम्.

४. [हे अग्ने], त्वम् आसा (=स्वेन आस्येन) वह्निः (=हविषां वोढा) [भवसि], अहं प्रजावता वचसा (=प्रजारूपफलोपेतेन स्तोत्रेण) आ च हुवे (=त्वां यस्मिन् क्षण आह्वयामि) नि च इह देवैः सत्सि (=तस्मिन् क्षण एव त्वं देवैः सह अस्मिन् देवयजनदेशे निषीद) । [निषद्य च] हे यजत्र (=पूजनीय) [अग्ने], होत्रम् उत पोत्रं (=होत्रा क्रियमाणं कर्म तथा पोत्रा क्रियमाणं कर्म) वेषि (=कामयस्व) [अपि च] हे वसूनां जनितः (=धनानाम् उत्पादयितः), [त्वं वसूनां] प्रयन्तः (=? प्रयन्ता दाता) बोधि (=भव) ॥

बोधि प्रयन्तर्जनितर्वसूनामित्यत्र बोधि प्रयन्ता जनितर्वसूनामिति पाठः अर्थलाभायेषितव्यः ॥

असें अनुमान होतें. दुसरें उदाहरणः— ‘ हे इंद्रा, तूं राक्षसांस आणि शत्रूंस मारून टाक, तूं वृत्राच्या दाढा फोडून टाक. हे वृत्रघ्न इंद्रा, तूं आम्हांस उपद्रव करणाऱ्या अमित्राचा क्रोध नाहींसा करून टाक’ (वि रक्षो वि मृधो जहि वि वृत्रस्य हनू रुज । वि मन्युम् इन्द्र वृत्रहन् अमित्रस्य अभिदासतः १०. १५२. ३). यांतहि वृत्रादिक जे कल्पनासिद्ध शत्रु त्यांच्याच मालिकेंत राक्षस घातले पाहिजेत असें अनुमान होतें. आणखी उदाहरणः— ‘ हे सोमा, राक्षसासहित रोग नाहींसा होओ’ (अप अमीवा भवतु रक्षसा सह ९. ८५. १). आणखीः— ‘ग्रावा (=सोम काढावयाचा पाषाण) वाजत वाजत राक्षसांस दूर हाकून देओ. दुःस्वप्न, निर्ऋति (=पापाची देवता) आणि दुसरा प्रत्येक भक्षक यांस हाकून देओ’ (ग्रावा वदन् अप रक्षांसि सेधतु दुःस्वप्नं निर्ऋतिं विश्वम् अत्रिणम् १०. ३६. ४) यांतहि दुःस्वप्नें आणि पापरूपी जी निर्ऋति नांवाची देवता त्याच्या पंक्तीस राक्षसांस बसविल्यामुळें ज्या जातीचे प्राणी दुःस्वप्नें आणि पापरूपी देवता हे होत, त्याच प्रकारचे प्राणी राक्षस हे असावे.

‘ सोमपतीला ’ =‘ सोमपतिम्.’ म्हण-

४. [हे अग्नी], [तूं] [आपल्या] तोंडानें हवि वाहून नेणारा [होस]. मी संततिदायक स्तोत्रानें तुझें आवाहन करितांच तूं येऊन देवांसहित येथें बैस. [आणि] होत्यानें केलेली सेवा आणि हे पूजनीय [अग्नी], पोत्यानें केलेली सेवा तुला मान्य होओ. हे संपत्तींच्या पित्या, [तूं संपत्तींचा] दाता हो.

4. [Thou art, O Agni], the carrier of the oblation with [thy] mouth. So soon as I invoke thee with a hymn that giveth children, sit thou down with the Gods. Accept, O worshipful [Agni], the service of the Hotâ and the service of the Potâ. Be thou, O father of blessings, the giver [of blessings] [unto us].

जे सोम अर्पण करणें तो विशेषेंकरून इंद्राला अर्पण करीत, म्हणून इंद्रास 'सोमाचा पति' असें नांव पडलें आहे. त्याप्रमाणेंच इतर देव जरी सोम पीत असत तरी इंद्रालाच ' सोमपा ' (म्हणजे सोम पिणारा) असें वेदांत नांव पडलें आहे.

श्लोकीकरणः—

प्र सु विश्वान्रक्षसो धक्षि अग्ने
भवा यज्ञानामभिशस्तिपावा ।
अथा वह सोमपतिं हरिभ्याम्
आतिथ्यमस्मै चकृमा सुदाव्ने ॥

४. ' हे अग्नी, तूं आपल्या तोंडानें हवि घेऊन जाऊन देवांकडेस पोंहचविणारा आहेस, यास्तव तुला प्रार्थना आहे कीं, मी तुझें आवाहन करितांच तूं येथें येऊन बैस आणि देवांसहि बरोबर आणून त्यांस आपल्याजवळ बसीव. आणि आम्हांतून होत्यानें आणि पोत्यानें जी तुझी सेवा केली जात आहे ती स्वीकारून घे, आणि तूं आम्हांस संपत्ति देणारा हो, कारण तूं सकल संपत्तींचा पिता आहेस. '

याप्रमाणें या ऋचेचा भावार्थ उघड दिसतो, तरी पहिल्या आणि चवथ्या चरणांतील पदांच्या अन्वयाविषयीं आणि अर्थाविषयीं थोडी अडचण दिसते. चवथा चरण अर्थलाभासाठीं बोधि प्रयन्ता जनितर्वसूनाम् असा असावा अशी आशा करून आम्हीं अर्थ केला आहे ' बोधि ' म्हणजे जो ' हो ' असा अर्थ केला आहे त्याविषयीं ऋ. ४. १७. १८; ६. ४६. ४; ७. ३२. ११, २५; आणि ४. २२. १० इत्यादि मंत्रांवरील सायणभाष्यांत भरपूर प्रमाण आहे.

' संततिदायक स्तोत्रानें '=' प्रजावता वचसा.' या विशेषणाचें येथें प्रयोजन समजत नाहीं, पण अर्थ असाच आहे याविषयीं संशय नाहीं.

यथा विप्रस्य मनुषो हविर्भिर्देवाँ अयजः कविभिः कविः सन् ।
एवा होतः सत्यतर त्वमद्याग्ने मन्द्रया जुह्वा यजस्व ॥५॥२४॥

यथा । विप्रस्य । मनुषः । हविःऽभिः । देवान् । अयजः । कविऽभिः । कविः । सन् ।
एव । होतरिति । सत्यऽतर । त्वम् । अद्य । अग्ने । मन्द्रया । जुह्वा । यजस्व ॥ ५ ॥ २४ ॥

भाषायाम्.

५. [हे अग्ने,] यथा [स्वयं] कविः सन् (=विद्वान् सन्) कविभिः (=विद्वद्भिः ऋत्विग्भिः) [पूर्वं] विप्रस्य मनुषः (=मेधाविनो मनोः) हविर्भिः (= चरुपुरोडाशादिभिरर्पणीयैर्द्रव्यैः) देवान् अयजः (=इन्द्रादीन् अपूजयः) एव (=एवं =तथैव) हे होतः (=देवानामाह्वातः), हे सत्यतर (=अतिशयेन सत्य) अग्ने,त्वम् अद्य (=अस्मिन् दिने) [अस्मिन् यज्ञे] मन्द्रया जुह्वा (=हर्षयित्र्या स्रुचा तव ज्वालारूपया) [तान्] यजस्व (पूजय) ॥

' आवाहन करितांच.' ' करितांच ' असें जें शीघ्रतार्थक पद घातलें आहे त्याचा अर्थ ' च–च ' अशीं जीं दोन पदें मूळांत आहेत त्यांजपासून गम्यमान आहे.

' होत्यानें केलेली सेवा आणि पोत्यानें केलेली सेवा '=' होत्रम् उत पोत्रम्.' होता म्हणून जसा यज्ञांत सोळा ऋत्विजांतून एक ऋत्विज् असतो तसा ' पोता ' हाहि एक ऋत्विज् होय. देवांचें आह्वान करणें हें होत्याचें काम आहे. ' पोता ' या शब्दाचा अर्थ ' शुद्ध करणारा ' असा सायणाचार्य करितात (ऋ. १. ९४. ६ याजवरील भाष्य पहा).

श्लोकीकरणः–

प्रजावता वचसा वह्निरासा
आ च हुवे नि च सत्सीह देवैः ।
वेषि होत्रमुत पोत्रं यजत्र
बोधि प्रयन्तर्जनितर्वसूनाम् ॥

दुसरा आणि तिसरा हे चरण फार खडबडीत आहेत.

५. [हे अग्नी], तूं विद्वान् होत्साता विद्वान् ऋत्विजांबरोबर ज्याप्रमाणें मेधावी मनूच्या हवींनीं देवयजन [पूर्वीं] करिता झालास त्याप्रमाणेंच, हे होत्या, हे अतिसत्यरूप अग्नी, तूं आज [आमच्या घरीं] आनंदकारक पळीनें [देव]यजन कर.

5. As thou didst, [O Agni], a sage in the company of sages, worship the Gods [before] with the oblations of pious Manus, even so, O invoker Agni, O most truthful one, do thou worship [them] today [for us] with [thy] gladdening ladle.

---

५. हा या सूक्ताचा उपसंहार आहे. यांत गोतम ऋषीची प्रार्थना अशी आहे कीं, 'हे अग्नी, तूं पूर्वींच्या काळीं जसा मनुष्यांचा जो आदिपुरुष अथवा प्रजापति त्याच्या घरीं, स्वतः विद्वान् होत्साता विद्वान् ऋत्विजांबरोबर देवांस हवि अर्पण करून तृप्त करीत होतास, तसाच आज आमच्या घरीं आपल्या पळीनें देवांस हवि अर्पण करून तृप्त कर; कारण तूं उत्तम होता आहेस आणि तूं प्रतारणा करणारा नसून केवळ सत्यरूप आहेस.'

'मेधावी मनूच्या हवींनीं'=' विप्रस्य मनुषो हविर्भिः.' मनु म्हणजे सर्व प्रजांचा मूळ पुरुष, (अथवा एक पुरातन ऋषि ?) असा अर्थ आहे. मनु प्रजापति हाच अर्थ येथें उचित आहे (सू. ३६, मं. १० याजवरील टीप पहा). पूर्वींपासून मानवांच्या घरीं तूं जसा मध्यस्थ होऊन देवांचें पूजन करीत आला आहेस, तसेंच आजहि आमच्या घरीं देवांचें पूजन कर, असें तात्पर्य.

'आनंदकारक पळीनें.' पळी म्हणजे होमांत हवि टाकण्याची जी स्रुचा म्हणून पळी असते, ती समजावयाची आहे. आनंदकारक असें म्हणण्याचें कारण असें कीं ती पुढें केल्याबरोबर देवांस आनंद होतो.

श्लोकीकरणः—

यथा विप्रस्य मनुषो हविर्भिः
देवाँ अयजः कविभिः कविः सन् ।
एवा होतः सत्यतर त्वमद्य
अग्ने मन्द्रया जुहुआ यजस्व ॥

या सूक्तांत त्रिकालज्ञानाच्या अथवा सर्वतोभूत शक्तीच्या डौलाचा लवलेशहि नाहीं, तर दीन पण खऱ्या भक्तीच्या उपासकानें स्तुति करावी तशीच गोतम ऋषीनें केलेली आहे.

सूक्तम् ७७.

रहूगणपुत्रो गोतम ऋषिः । अग्निर्देवता । त्रिष्टुप् छन्दः ।

कथा दाशेमाग्नये कास्मै देवजुष्टोच्यते भामिने गीः ।

यो मर्त्येष्वमृत ऋतावा होता यजिष्ठ इत्कृणोति देवान् ॥ १ ॥

कथा । दाशेम । अग्नये । का । अस्मै । देवऽजुष्टा । उच्यते । भामिने । गीः ।

यः । मर्त्येषु । अमृतः । ऋतऽवा । होता । यजिष्ठः । इत् । कृणोति । देवान् ॥ १ ॥

भाषायाम्.

१. अग्नये कथा (=कथं=केन प्रकारेण) दाशेम (=हविर्दद्याम)? अस्मै भामिने (=तेजस्विने) [अग्नये] देवजुष्टा (=देवसेविता=देवप्रिया) का (=कीदृशी) गीः (=स्तुतिः) उच्यते (=गीयते)? यः [अग्निः] मर्त्येषु (=मरणधर्मसु) अमृतः (=अमरः) [सन्] [तथा] ऋतावा (= यज्ञरूपसत्यवान्) यजिष्ठः (=यष्टृतमः=यजनकर्मणि कुशलतमो) होता (=देवानाम् आह्वाता) [सन्] देवान् इत् कृणोति (=हविर्भिः संयुक्तां करोति=पूजयति) ॥

अग्न्युचितहविर्दानस्तुतिकरणविषये मूढा वयं कथं तं भजेमहीत्यर्थः ॥

इत् कृणोति देवानित्यस्य व्याख्याने वयं सायणमनुसरामः । विद्वद्वरो ग्रास्मानस्तु यजिष्ठः इत् इत्यन्वयं गृहीत्वा अतिशयेन यष्टृतमोग्निर्मर्त्येषु देवान् कृणोति स्थापयतीतीच्छति व्याख्यातुम् । इच्छन्दस्य पुनर्यतेरनन्तरपाठात् इत् कृणोति इत्येव संबन्धः साधीयान् ॥

सूक्त ७७.

ऋषि—रहूगणाचा पुत्र गोतम. देवता—अग्नि. वृत्त—त्रिष्टुभ्.

१. कोणत्या रीतीनें आम्हीं अग्नीला भजावें ? ह्या तेजस्वी अग्नीसाठीं देवप्रिय असें कोणतें स्तोत्र गावें ? जो अग्नि मर्त्यांमध्यें अमर्त्य [होत्साता] [आणि] सत्यमय [आणि] यज्ञ करण्याच्या कामीं परमकुशल होता [होऊन] देवांप्रीत्यर्थ यजन करितो.

HYMN 77.

To *Agni*. By *Gotama* son of *Rahûgaṇa*. Metre—*Trishṭubh*.

1. How shall we sacrifice to Agni? What god-loved praise is sung of this brilliant one? who, immortal among mortals, truthful and the most skilled invoker, gratifies the Gods.

---

१. पूर्वींच्या सूक्ताप्रमाणें या सूक्ताच्या प्रथम मन्त्रांतहि गोतम ऋषि आपलें अज्ञान, अल्पशक्ति आणि उपासनेविषयीं कौशल्यहीनत्व दर्शवून म्हणतो कीं, ' मर्त्य मनुष्यांमध्यें अमर्त्य, सत्यमय आणि देवांला हवि अर्पण करून प्रसन्न करण्याविषयीं परमकुशल असा जो अग्नि, त्याला मान्य होई अशी आम्हीं अज्ञानी मनुष्यांनीं कोणती उपासना करावी, आणि देवांस जें आवडेल असें कोणतें स्तोत्र गावें ? तर याविषयीं आम्ही अज्ञानी आहों. यास्तव हे अग्नी, आम्हीं वेडीवांकडी जी तुझी उपासना करीत आहों ती तूं मान्य करून घे. '

' भजावें ' = ' दाशेम. ' अक्षरशः अर्थ ' [हवि] अर्पण करावें. ' पुरातन काळीं देवास भजण्याची मुख्य रीत म्हटली म्हणजे हवि (म्हणजे बलि) देऊन उपासना करणें ही होती. त्यामुळें ' दाशेम ' ह्याचा पर्यवसानीं अर्थ ' भजावें ' इतकाच होतो. देवास बळी देऊन यज्ञ करणें हा प्रचार आपल्या आर्यपूर्वजांतच होता असें नाहीं; पुरातन यहुदी लोकांत आणि आर्य लोकांचे अवांतर भेद असे जे ग्रीक आणि रोमन आणि पारसिक लोक त्यांजमध्येंहि तीच चाल असे.

' देवांप्रीत्यर्थ यजन करितो '=' कृणोति देवान्.' अग्नि हा उत्तम होता होय, म्हणजे देवांचा धांवा करून त्यांस यज्ञस्थळीं घेऊन येण्याच्या कामीं परमकुशल होय अशी जी वेदांत सर्वत्र प्रसिद्धि आहे, तिला अनुसरून उत्तरार्धाचा अर्थ केला पाहिजे. सर्व देवांप्रीत्यर्थ अग्नीच्याच मुखीं हवि घालीत असत आणि अनेक देवांच्या नांवानें अनेक हव्यें दिलीं तरी दृष्टीस दिसणारा अग्निच एकटा अ-

यो अध्वरेषु शंतम ऋतावा होता तमू नमोभिरा कृणुध्वम् ।
अग्निर्यद्वेर्मर्ताय देवान्त्स चा बोधाति मनसा यजाति ॥ २ ॥

यः । अध्वरेषु । शम्ऽतमः । ऋतऽवा । होता । तम् । ऊम् इति ।
नमःऽभिः । आ । कृणुध्वम् ।
अग्निः । यत् । वेः । मर्ताय । देवान् । सः । च । बोधाति । मनसा ।
यजाति ॥ २ ॥

भाषायाम्.

२. यः [अग्निः] अध्वरेषु (=यज्ञेषु) शंतमः (=अतिशयेन सुखकरः) ऋतावान् (=सत्यवान्) होता (=देवानाम् आह्वाता) [भवति], [हे ऋत्विजः] तम् उं (=तमेव) [अग्निं] नमोभिः (=स्तोत्ररूपैर्नमस्कृतिभिः=स्तोत्राण्यर्पयित्वा) आ कृणुध्वम् (=अभिमुखीकुरुत=अस्मान्प्रति यथागच्छेत्तथा कुरुत), यत् अग्निः (=अग्निर्हि) मर्ताय (=मरणधर्मणे मनुष्याय) देवान् वेः (=आवहति) स च [तान्] बोधाति (=बोधेत्=जानीयात्) मनसा (=भजनपूर्णमत्या) [च] यजाति (=यजेत्) ॥

अग्निर्देवान् मर्त्यहिताय आवहति को देवश्च कीदृशो भवतीति जानाति तथा तान् भक्तिभावेन पूजयति स हि देवानाम् अतिसुखकरः सत्यवांश्च आह्वाता वर्तते । अतः कारणात् अग्निं स्तोत्रैरानयतेति भावः ॥

सतो यास्तव सर्व देवांस अग्नि बोलावून आणितो आणि त्यांजकडून हवि खाववितो असें म्हणणें स्वाभाविक आहे.

श्लोकीकरणः—

कथा दाशेम अग्नये का अस्मै
देवजुष्टा उच्यते भामिने गीः ।
यो मर्तिएषु अमृतः ऋतावान्
होता यजिष्ठः इत्कृणोति देवान् ॥

२. [हे मित्र हो], जो [अग्नि] यज्ञांमध्यें अत्यंत सुखकारक [आणि] सत्यवान् होता [होय] त्याच [अग्नी]ला नमस्कारांनीं [तुम्ही] येथें आणा. कारण कीं अग्नि मर्त्य मनुष्यांसाठीं देवांला घेऊन येईल [आणि] तो [त्यांस] जाणील आणि मनापासून भजेल.

2. He who is a truthful [and] most delightful invoker in sacrifices, bring him, [ye friends], with adorations, that he—Agni—may bring the Gods for the benefit of the mortal, that he may know [them] and worship them with [his] heart.

---

२. 'अग्नि यज्ञांत सत्यवान् म्हणजे देव आले, हवि खाऊन तृप्त झाले असें उगीच सांगून यजमानाची प्रतारणा न करणारा, आणि देवांला अतिसुखकारक असा होता होय आणि तो आला तर देवांस आपल्याबरोबर घेऊन येईल आणि कोण देव आला, कोण नाहीं आला, कोण येईल, कोण येण्यास काय करावें असें तो जाणील, आणि त्याचें पूजन करील. यास्तव अग्नीला स्तोत्रें अर्पण करून बोलावून आणा', असें ऋषि आपल्या मित्रांस म्हणतो आहे.

कवीचा भावार्थ असा आहे कीं, देवांचें यजन करण्यास कोणातरी मानवी ऋत्विजास लाविलें तर मंत्र म्हणून किंवा हवि अर्पण करून देव न येतांहि देव आले आणि अर्पण केलेलें हवि खाऊन गेले असें उगीच सांगून प्रतारणा करील आणि खोटें बोलेल; पण अग्नि तसें करणार नाहीं, तो खरेंच बोलेल आणि देवांस खरोखर घेऊन येईल; कारण त्यानें देवांस बोलाविलें म्हणजे त्याची अत्यंत मधुर वाणी ऐकून देवांस आनंद होतो आणि ते येतात, यास्तव अग्नीला तुम्ही आळवून येथें आणा.

श्लोकीकरणः—

यो अध्वरेषु शंतमः ऋतावा
होता तमू नमोभिरा कृणुध्वम् ।
अग्ननिर्यद्वेर्मरताय देवान्
स चा बोधाति मनसा यजाति ॥

यांत तिसऱ्या चरणांत 'अग्नि' आहे त्या ठिकाणीं 'अग्नि' आणि 'मर्ताय' आहे तेथें 'मरताय' असें वाचावें लागतें त्याकडेस लक्ष्य द्यावें. अशीं उदाहरणें पूर्वीं आलींच आहेत.

स हि क्रतुः स मर्यः स साधुर्मित्रो न भूदद्भुतस्य रथीः ।
तं मेधेषु प्रथमं देवयन्तीर्विश उप ब्रुवते दस्ममारीः ॥ ३ ॥

सः । हि । क्रतुः । सः । मर्यः । सः । साधुः । मित्रः । न । भूत् । अद्भुतस्य । रथीः ।
तम् । मेधेषु । प्रथमम् । देवऽयन्तीः । विशः । उप । ब्रुवते । दस्मम् । आरीः ॥ ३ ॥

स नो नृणां नृतमो रिशादा अग्निर्गिरोऽवसा वेतु धीतिम् ।
तना च ये मघवानः शविष्ठा वाजप्रसूता इषयन्त मन्म ॥४॥

सः । नः । नृणाम् । नृऽतमः । रिशादाः । अग्निः । गिरः । अवसा । वेतु । धीतिम् ।
तना । च । ये । मघऽवानः । शविष्ठाः । वाजऽप्रसूताः । इषयन्त । मन्म ॥ ४ ॥

भाषायाम्.

३. स हि क्रतुः (=कर्मणां पराक्रमाणां कर्ता) [भवति], स मर्यः (=शत्रूणां मारयिता=शूरः), स साधुः (=साधयिता=विजयी) [भवति]। [स] मित्रो न (=मित्र इव), अद्भुतस्य रथीः (=अभूतस्य=अदृष्टस्य धनस्य नेता नायको) भूत् (=भवति)। तं दस्मं (=शत्रूणाम् उपक्षपयितारम्) [अग्निं] देवयन्तीः (=देवयन्त्यः= देवान् आत्मन इच्छन्त्यः=देवभजका) आरीर्विशः (=आर्याः प्रजाः=आर्यजनाः) मेधेषु (=यज्ञेषु) प्रथमम् उप ब्रुवते (=सर्वेषां देवानामग्रे स्तुवन्ति) ॥

४. सः [अग्निः] नृणां नृतमः (=नेतॄणां नेतृतमः शौर्योपेतेषु शौर्योपेतो) रिशादाः (=शत्रूणां भक्षयिता) [भवति]। अग्निः नः (=अस्माकं) गिरः (=स्तुतीः) अवसा धीतिं (=हविर्लक्षणेनान्नेन सह यत् कर्म तत्) [च] वेतु (=कामयतु)। ये च मघवानः (=यजमानाः) शविष्ठाः (=अतिशयेन बलिनः) [सन्तः] वाजप्रसूताः (=दत्तहविष्का) [भूत्वा] तना (=नित्यं) मन्म (=मन्मानि स्तोत्राणि) इषयन्त (=एषयन्ति=अग्निं प्रति गमयन्ति) [तेषां गिरः अवसा धीतिं च वेतु]॥

३. कारण कीं तो महा पराक्रमी [होय], तो शूर [होय], तो विजयी [होय], [तो] मित्राप्रमाणें अद्भुत [संपत्ति] मिळवून देणारा होय. देवोपासक आर्य लोक त्या महापराक्रमकारी [अग्नी]-लाच यज्ञांमध्यें प्रथम हाक मारितात.

४. तो शूरांमध्यें उत्तम शूर [आणि] शत्रूला खाऊन टाकणारा [होय]. अग्नि आमचीं स्तोत्रें, हविरन्न आणि उपासना हीं प्रीतीनें मान्य करून घेओ. आणि जे अत्यंत बलवान् [आणि] श्रीमान् उपासक हवि अर्पण करून नित्य स्तोत्र ह्मणतात [त्यांचींहि स्तोत्रें, हविरन्न, आणि उपासना हीं प्रीतीनें मान्य करून घेओ.]

3. For he [is] a hero, he [is] a warrior, he an achiever, [he] is like a friend the leader of unkown [wealth]. Him the God-worshipping Âryan people first address in sacrificies—him, the doer of wonderful deeds.

4. He [is] the bravest of the brave, [and] destroyer of the enemies—may Agni love [our] praises [and our] service with the oblation; and [love the praises and the service with the oblation of those] who, rich [and] most mighty, offer food [and] ever send forth hymns.

---

३. पूर्वील मंत्रांत अग्नीला स्तवून आणा असें सांगितलें, त्याचें कारण सांगतोः—' कारण कीं, अग्नि हा महा पराक्रमी, शूर, आणि विजयी आहे, आणि एकाद्या मित्राप्रमाणें पाहिजे तो पदार्थ मिळवून देणारा होय. आणि देवांच्या भजनांत तत्पर असे जे आर्य लोक ते पराक्रमकारी अग्नीलाच यज्ञांत प्रथम हाक मारितात, म्हणजे स्तवितात.'

' देवोपासक आर्यजन '=' देवयन्तीः आरीः विशः'. सू. ५१, मं. ८ आणि त्याजवरील टीप पहा.

' महा पराक्रमकारी '=' दस्मम्.' सू. ४२, मं. १०आणि त्याजवरील टीप पहा.

श्लोकीकरणः—

स हि क्रतुः स मर्यः स साधुः
मित्रो न भूदद्भुतस्य रथीः ।
तं मेधेषु प्रथमं देवयन्तीः
विशः उप ब्रुवते दस्ममारीः ॥

४. या मंत्राचा भावार्थ असा दिसतो

एवाग्निर्गोतमेभिर्ऋतावा विप्रेभिरस्तोष्ट जातवेदाः ।
स एषु द्युम्नं पीपयत्स वाजं स पुष्टिं याति जोषमा चिकित्वान् ॥ ५ ॥ २५ ॥

एव । अग्निः। गोतमेभिः। ऋतऽवा । विप्रेभिः। अस्तोष्ट । जातऽवेदाः।
सः । एषु । द्युम्नम् । पीपयत् । सः । वाजम् । सः । पुष्टिम् । याति ।
जोषम् । आ । चिकित्वान् ॥ ५ ॥ २५ ॥

भाषायाम्.

५. एव (=एवं=पूर्वोक्तप्रकारेण) ऋतावा (=यज्ञरूपसत्यवान्) जातवेदाः (=सर्वज्ञः) अग्निः गोतमेभिर्विप्रेभिः (=गोतमकुलोत्पन्नैर्विद्वद्भिः अस्माभिः) अस्तोष्ट (=स्तुतोऽस्ति) । स एषु (=गोतमानां गृहेषु) द्युम्नं (=वैभवं) पीपयत् (=वर्धयतु), वाजं स [पीपयत्] चिकित्वान् (=विद्वान्) सः [अग्निः] जोषम् आ (=यथाकामं) पुष्टिम् (=अन्नं) याति (=प्राप्नोति) ॥

सूक्तम् ७८.

रहूगणपुत्रो गोतम ऋषिः । अग्निर्देवता । गायत्री च्छन्दः ।

अभि त्वा गोतमा गिरा जातवेदो विचर्षणे ।
द्युम्नैरभि प्र णोनुमः ॥ १ ॥

अभि । त्वा । गोतमाः । गिरा । जातऽवेदः । विऽचर्षणे ।
द्युम्नैः । अभि । प्र । नोनुमः ॥ १ ॥

भाषायाम्.

१. हे जातवेदः (=वस्तुजातस्य वेदितः) विचर्षणे (=विश्वदर्शिन्) [अग्ने], अभि त्वा (=त्वाम् अभिमुखीकृत्य) गोतमा (=वयं गोतमकुलोत्पन्नाः) [प्र णोनुमः] (=प्रकर्षेण पुनः पुनः स्तुमः) द्युम्नैः (=स्तोत्रैः) अभि प्र णोनुमः (=प्रकर्षेण पुनः पुनः स्तुमः) ॥

की, ‘ आम्ही जें स्तोत्र गाऊन अग्नीला हवि अर्पण करितों तें आणि दुसरे जे मोठमोठे आणि श्रीमंत उपासक हवि अर्पण करितात तें सुद्धा अग्नीला प्रिय होओ ’. म्हणजे, मोठमोठे आणि श्रीमंत उपासकांनीं नित्य केलेली उपासना जशी अग्नि स्वीकारून घेतो, तशीच आमचीहि घेओ असें ऋषीच्या मनांत सांगावयाचें आहे असें दिसतें.

‘ नित्य ’=‘तना.’ सू. ३, मं. ४ याज-

५. या प्रकारेंकरून सत्यवान् आणि सर्वज्ञ अग्नि गोतमकुळांत जन्मलेल्या कवींनीं स्तविला आहे. ह्यांच्या घरीं तो वैभव वाढवो, तो संपत्ति समृद्ध करो. तो महाविद्वान् अग्नि त्यांच्या घरीं तृप्ति होईपर्यंत पुष्टिकारक हविरन्नाप्रत पावतो.

5. Thus is Agni, the truthful and the knower of all things, praised by poets descended of Gotama. May he enrich their prosperity, may he enrich their affluence. That wise [Agni] receives nourishing food [with them] to his satisfaction.

वरील सायणभाष्य पहा.

श्लोकीकरणः—

स नो नृणआं नृतमो रिशादा
अग्निर्गिरो अवसा वेतु धीतिम् ।
तना च ये मघवानः शविष्ठ
वाजप्रसूता इषयन्त मन्म ॥

---

५. 'हा या सूक्ताचा उपसंहार आहे; आणि हें जें सूक्त ऋषीनें केलें त्याला अनुलक्षून तो म्हणतो कीं, 'या प्रकारेंकरून आम्हीं गोतमकुळांतील मनुष्यांनीं ही अग्नीची स्तुति केली आहे तर अग्नि आमचें वैभव वाढवो. तो विद्वान् आहे आणि त्याची तृप्ति होईपर्यंत आम्हीं त्याला हवि अर्पण करीत असतों.'

श्लोकीकरणः—

एवा अग्निर्गोतमेभिर्ऋतावा
विप्रेभिरस्तोष्ट जातवेदाः ।
स एषु द्युम्नं पीपयत् स वाजं
स पुष्टिं याति जोषमा चिकित्वान् ॥

सूक्त ७८.

ऋषि—**रहूगणाचा** पुत्र **गोतम**. देवता—**अग्नि**. वृत्त—**गायत्री**.

१. हे सर्वज्ञ [अग्नी], हे सर्व साक्षी [अग्नी], आम्ही गोतम तुला स्तोत्रानें [पुनः पुनः स्तवितों], मंत्रांनीं पुनः पुनः स्तवितों.

Hymn 78.

To *Agni*. By *Gotama*, son of *Rahûgaṇa*. Metre—*Gâyatrî*.

1. To thee, O [Agni] that knowest all, O omniscient one, we approach and praise with our song, we praise with [our] hymns.

---

१. हेंहि सूक्त गोतमऋषीचेंच आहे. यांतील पहिल्या मंत्रांत अग्नीविषयीं स्तुति असून ती गोतम आणि त्याचे बांधव यांणीं केली आहे याच कारणास्तव 'आम्हीं

तमु॑ त्वा॒ गोत॑मो गि॒रा रा॒यस्का॑मो दुवस्यति ।
द्यु॒म्नैर॒भि प्र णो॑नुमः ॥ २ ॥

तम् । ऊँ॒ इति॑ । त्वा॒ । गोत॑मः । गि॒रा । रा॒यःऽका॑मः । दु॒व॒स्य॒ति॒ ।
द्यु॒म्नैः । अ॒भि । प्र । नो॒नु॒मः॒ ॥ २ ॥

तमु॑ त्वा वाज॒सात॑मम॒ङ्गि॒र॒स्वद्ध॑वामहे ।
द्यु॒म्नैर॒भि प्र णो॑नुमः ॥ ३ ॥

तम् । ऊँ॒ इति॑ । त्वा॒ । वा॒ज॒ऽसात॑मम् । अ॒ङ्गि॒र॒स्वत् । ह॒वा॒म॒हे॒ ।
द्यु॒म्नैः । अ॒भि । प्र । नो॒नु॒मः॒ ॥ ३ ॥

भाषायाम्.

२. तमु त्वा (=तादृशं त्वामेव) रायस्कामः (=धनकामो) गोतमः (=अस्य सूक्तस्य कर्ता) गिरा (=स्तुत्या) दुवस्यति (=परिचरति), द्युम्नैः (=स्तोत्रैः) अभि प्र णोनुमः (=पुनः पुनः स्तुमः) ॥

३. तमु त्वा (=पूर्वोक्तं त्वामेव) वाजसातमं (=धनानाम् अतिशयेन दातारम्) [अग्निम्] अङ्गिरस्वत् (=अङ्गिरसो यथा) हवामहे (=आह्वयामः), द्युम्नैः (=स्तोत्रैः) अभि प्र णोनुमः (=पुनः पुनः स्तुमः) ॥

गोतम' असें म्हटलें आहे. पुरातनकाळीं आपले आर्य पूर्वज कुटुंबांतील सगळीं मनुष्यें घेऊन उपास्य देवाची सेवा करीत असत याविषयीं पूर्वी पुष्कळ सांगितलें आहे. परंतु येथें सायणाचार्य, सूक्ताचा द्रष्टा जो मी गोतम ऋषि तो, इतकाच अर्थ समजावयाचा आहे असें जाणवितात.

२. त्या तुला [अग्नी]लाच धनेच्छु गोतम स्तोत्रानें पूजितो; [आम्ही] मंत्रांनीं पुन: पुन: स्तवितों.

३. त्याच तुला परम धनद [अग्नी]ला [आम्ही] अंगिरसांप्रमाणें बोलावितों; [आम्ही] मंत्रांनीं पुन: पुन: स्तवितों.

2. Thee, therefore, Gotama, desirous of wealth, worships with praise,—we praise with [our] hymns.

3. Thee, therefore, the best giver of wealth we invoke like the Angirases : we praise with [our] hymns.

---

२. 'त्या तुला'='तमु त्वा.' म्हणजे पहिल्या मंत्रांत सर्वज्ञ आणि सर्वसाक्षी असें अग्नीला म्हटलें आहे त्याच अग्नीला स्तवितों असें तात्पर्य. या मंत्राच्या पहिल्या भागांत गोतम स्तवितो असें एकवचन असून पुढच्या भागांत आम्ही स्तवितों असें अनेकवचन आहे. मंत्रकर्ता ऋषि हा आपल्या बांधवांसहित अग्नीची उपासना करीत आहे. यास्तव एकदा एकवचन आणि पुनः अनेकवचन घातलें आहे.

'मंत्रांनीं पुनः पुनः स्तवितों'='द्युम्नैरभि प्र णोनुमः.' हें पालवपद आहे आणि तें प्रत्येक मंत्राच्या शेवटीं हें सूक्त संपेपर्यंत येत जाईल.

३. 'अङ्गिरसांप्रमाणें बोलावितों'='अङ्गिरस्वत् हवामहे.' म्हणजे अङ्गिरस् म्हणून जे महापुरातन प्रसिद्ध देवभक्त होऊन गेले ते जसे अग्नीची स्तुति करून त्याला आपल्या घरीं यज्ञास बोलावीत असत तसे आम्ही बोलावितों. सू. ३१, मं. १७; सू. ४५, मं. ३ आणि सू. ६२, मं. १ आणि त्यांजवरील टिपा पाहा. अङ्गिरस हे अग्नीचे प्रख्यात भक्त असत आणि ही त्यांची अग्निभक्तीविषयीं जी प्रख्याति ती अतिप्राचीन काळापासून असल्यामुळें अङ्गिरसांप्रमाणें आम्ही तुला बोलावितों (म्हणजे तुझा धांवा करून तुला स्तवितों आणि भजतों) असें ऋषि म्हणतो.

तमु त्वा वृत्रहन्तमं यो दस्यूँरवधूनुषे ।
द्युम्नैरभि प्र णोनुमः ॥ ४ ॥

तम् । ऊम् इति । त्वा । वृत्रहन्ऽतमम् । यः । दस्यून् । अवऽधूनुषे ।
द्युम्नैः । अभि । प्र । नोनुमः ॥ ४ ॥

अवोचाम रहूगणा अग्नये मधुमद्वचः ।
द्युम्नैरभि प्र णोनुमः ॥ ५ ॥ २६ ॥

अवोचाम । रहूगणाः । अग्नये । मधुऽमत् । वचः ।
द्युम्नैः । अभि । प्र । नोनुमः ॥ ५ ॥ २६ ॥

भाषायाम्.

४. [हे अग्ने], यस् [त्वं] दस्यून् (=उपक्षपयितॄन्=अनार्यादीन् जनान्) अवधूनुषे (=स्वस्थानात् प्रच्यावयसि=विनाशयसि) तमु (=तमेव) वृत्रहन्तमं (=शत्रूणाम् अतिशयेन हन्तारं) त्वा (=त्वां) द्युम्नैः (=स्तोत्रैः) अभि प्र णोनुमः (=पुनः पुनः स्तुमः) ॥

५. [एवं वयं] रहूगणाः (=रहूगणस्य पुत्रा) मधुमत् वचः (=माधुर्योपेतं स्तोत्रम्) अवोचाम (=प्रावादिष्म) । [अग्निं] द्युम्नैः (=स्तोत्रैः) अभि प्र णोनुमः (=पुनः पुनः स्तुमः) ॥

४. जो तूं दस्यूंला विध्वंसून टाकितोस, त्याच तुला अतिपराक्रमी अग्नीला [आम्ही] मंत्रांनीं पुनः पुनः स्तवितों.

५. आम्हीं रहूगणांनीं अग्नीप्रीत्यर्थें हें मधुर स्तोत्र गाइलें आहे. [आम्ही] मंत्रांनीं पुनः पुनः स्तवितों.

4. Thee, who vanquishest the Dasyus, that very Agni, the best among destroyers of the enemy, we praise with [our] hymns.

5. Thus have we the Rahûgaṇas sung [this] sweet hymn in honor of Agni. We praise with [our] hymns.

४. 'दस्यूंला'='दस्यून्.' हे दस्यु म्हणजे आर्य लोकांस धर्माच्या संबन्धानें इत्यादि उपद्रव करणारे जे कोळी, खोंड इत्यादि आपल्या देशांत प्रथम वस्ति करून राहिले होते ते लोक. सू. ५३, मं. ४; सू. ५१, मं. ८ हे मंत्र आणि त्यांजवरील आमची टिका पाहावी.

अतिपराक्रमी'='दस्युहन्तमं.' अक्षरशः अर्थ अनार्य लोक इत्यादि जे शत्रु त्यांस मारून टाकण्याविषयीं अतिकुशल असा आहे.

५. हा या सूक्ताचा उपसंहार आहे आणि यांत ऋषि म्हणतो, या प्रकारेंकरून आम्हीं रहूगणांच्या वंशजांनीं हें मधुर स्तोत्र म्हटलें आहे, आणि पुनः पुनः अग्नीची स्तुति केली आहे.

सूक्तम् ७९.

रहूगणपुत्रो गोतम ऋषिः । अग्निर्देवता । आद्यस्तृचस्त्रिष्टुभः । द्वितीय औष्णिहः । शिष्टानां गायत्री च्छन्दः ।

हिरण्यकेशो रजसो विसारेऽहिर्धुनिर्वात इव ध्रजीमान् ।
शुचिभ्राजा उषसो नवेदा यशस्वतीरपस्युवो न सत्याः ॥ १ ॥

हिरण्यऽकेशः । रजसः । विऽसारे । अहिः । धुनिः । वातःऽइव । ध्रजीमान् ।
शुचिऽभ्राजाः । उषसः । नवेदाः । यशस्वतीः । अपस्युवः । न । सत्याः ॥ १ ॥

आ ते सुपर्णा अमिनन्तँ एवैः कृष्णो नोनाव वृषभो यदीदम् ।
शिवाभिर्न स्मयमानाभिरागात्पतन्ति मिहः स्तनयन्त्यभ्रा ॥२॥

आ । ते । सुऽपर्णाः । अमिनन्त । एवैः । कृष्णः । नोनाव । वृषभः । यदि । इदम् ।
शिवाभिः । न । स्मयमानाभिः । आ । अगात् । पतन्ति । मिहः । स्तनयन्ति । अभ्रा ॥ २ ॥

भाषायाम्.

१. हिरण्यकेशः (=सुवर्णसदृशज्वालायुक्तः) [अग्नी] रजसो विसारे (=अन्तरिक्षस्थमेघजलस्य विसरणे पतने निमित्ते सति) अहिः (=सर्पः=सर्पवत् क्रोधाविष्टो) धुनिः (=मेघानां कम्पयिता) वात इव ध्रजीमान् (=वायुरिव शीघ्रगतिमान्) [च] [भवति]। [स च] यशस्वतीः (=यशस्वत्यः=अन्नादिसंपद्युक्ता) अपस्युवः (=उदयकाले वस्तुमात्रप्राणप्रेरणादिकर्मकुशलाः) सत्याः (=नित्यतारूपसत्ययुक्ता) उषसो न (=उषस इव=एतादृशी दिने दिन आगच्छन्ती या उषा सेव) शुचिभ्राजाः (=शुद्धतेजस्कः) नवेदाः (=ज्ञाता) [अपि च यशस्वान् तथा अपस्युः सत्यश्च भवति] ॥

एषा दुर्बोधा कथं कथमपि व्याख्यायते ॥ केचिद् ग्रास्मानादयः पण्डिता उषसो नवेदाः इति संबध्नन्ति उषसोभिज्ञ इति च भाष्यमिच्छन्ति। तत्तु आधारसापेक्षमिति द्रष्टव्यम् ॥

२. [हे अग्ने], ते सुपर्णाः (=तव वाजिनः) एवैः आ अमिनन्त (=आग-

सूक्त ७९.

ऋषि–गोतम (पूर्वसूक्ताचा जो तोच). देवता– **अग्नि**. वृत्त–१,२ आणि ३ या ऋचांचें **त्रिष्टुभ्**; ४,५ आणि ६ यांचें **उष्णिक्**; आणि ७,८,९,१०,११ आणि १२ यांचें **गायत्री**.

१. सुवर्णमय ज्याचे केश [तो अग्नि] उदकवृष्टि करावयाची असली म्हणजे केवळ सर्पस्वरूप, अत्यावेशी [आणि] वायूप्रमाणें गतिमान् [होतो]. [तो] उषांप्रमाणें शुद्धतेजस्क, ज्ञानी, वैभवयुक्त, चपल [आणि] सत्य [होय].

२. [हे अग्नी], तुझे घोडे [आपल्या] गमनांनीं सर्वत्र संहार करीत येतात, [आणि] काळा वृषभ ओरडूं लागतो.–असें जेव्हां [होतें तेव्हां] [वैद्युत अग्नि] कल्याणकारक [आणि] हास्यमुख दिसणाऱ्या [आपो देवीं]-सहित येत असतो: वृष्टि पडत असतात, अभ्रें गर्जना करीत असतात.

HYMN 79.

To *Agni*. By *Gotama* (author of the previous hymn). Metre, 1–3 *Trishṭubh*; 4–6 *Ushṇik* and 7–12 *Gâyatrî*.

1. [Agni] of the golden hairs [is], when the waters fall, [like] a snake, [is] a shaker [of the clouds], [and] impetuous like the wind. Like the daily Ushas [he is] pure in his brightness, endowed with knowledge, glorious, full of energy, [and] truthful.

2. Down come thy steeds, [O Agni], destroying [all] as they come : the black bull lows.—When this [happens] [celestial Agni] comes with the healing [Waters] [that come] as though smiling : the showers fall, the clouds roar.

---

१. ही ऋचा फारच कठिण आहे. आम्हीं केलेल्या अर्थाचें तात्पर्य असें आहे कीं, 'आकाशांतून मेघवृष्टि करावयाची असली म्हणजे अग्नि हिरण्यकेश म्हणजे सोन्याप्रमाणें ज्याचे केश लकलकतात असा होतो, आणि त्याच्या आंगीं सर्पाप्रमाणें आवेश आणि वायूप्रमाणें प्रचंड शक्ति आणि वेग येतो.

यदीमृतस्य पयसा पियानो नयन्नृतस्य पथिभी रजिष्ठैः ।
अर्यमा मित्रो वरुणः परिज्मा त्वचं पृञ्चन्त्युपरस्य योनौ ॥ ३ ॥

यत् । ईम् । ऋतस्य । पयसा । पियानः । नयन् । ऋतस्य । पथिऽभिः । रजिष्ठैः ।
अर्यमा । मित्रः । वरुणः । परिऽज्मा । त्वचम् । पृञ्चन्ति । उपरस्य । योनौ ॥ ३ ॥

च्छन्ति आगच्छन्तश्च स्वगमनैर्मेघान् हिंसन्ति) [तदा] कृष्णो वृषभः (=कृष्णवर्णो मेघो) नोनाव (=भृशं शब्दं करोति) । यदि (=यदा) इदं [भवति] [तदा] [वैद्युतोग्निः] शिवाभिः (=सुखकारिणीभिः) स्मयमानाभिर्न (=हसन्तीभिरिव=हास्यमुखवद्दृश्यमानाभिः) [अद्भिः सह] आ अगात् (=आगच्छति) । [तदा] मिहः पतन्ति (=वृष्टयः पृथिव्यां पतन्ति) अभ्रा स्तनयन्ति (=अभ्राणि इतस्ततः शब्दं कुर्वन्ति) ॥

भाषायाम्.

३. यत् (=यदा) ईम् (=अयम्) [अग्निः] ऋतस्य पयसा (=सत्यरूपस्य यज्ञस्य रसेन=सोमेन) पियानः (=पुष्टः) [सन्], ऋतस्य रजिष्ठैः पथिभिः (=सत्यरूपस्य यज्ञस्य अतिशयेन ऋजुभिर्मार्गैः=यज्ञरूपैर्ऋजुतमैर्मार्गैः) नयन् (=नेता=जगतो नायको=जगतो यज्ञकर्मसु प्रवर्तको) [भवति], [तदा] अर्यमा, मित्रः, वरुणः, परिज्मा (=परितो गन्ता मरुद्गणश्च) [इत्येते] उपरस्य योनौ (=मेघस्य स्थाने=अन्तरिक्षे) त्वचं पृञ्चन्ति (=मेघं पूरयन्ति=मेघं जलसंपूर्णं कृत्वा तस्मात् जलं निर्गमयन्ति) ॥

त्वचं पृञ्चन्ति उपरस्य योनाविति दुर्बोधं सायणेनैवं व्याख्यातम् । उपरस्य मेघस्य योनौ वृष्ट्युदकोत्पत्तिस्थाने त्वचं पृञ्चन्ति । वृष्ट्युदकस्याच्छादकं प्रदेशं स्वकीयैरायुधैः संयोजयन्ति । उद्घाटयन्तीति यावदिति ॥

यदा मनुष्या अग्निं होतारं कृत्वा यज्ञरूपैः साधनैर्देवानुपासते तदा अर्यमादयो देवा मेघाज्जलं वर्षयन्तीति भावार्थोस्य मन्त्रस्येति द्रष्टव्यम् ॥

प्रतिदिनीं उगवणारी उषा जशी स्वच्छ, तेजस्क, सर्वदर्शी, वैभवयुक्त, वेळच्यावेळेवर उगवून सर्व प्राण्यांत प्राणच जणूं घालीत असते आणि सत्यरूप असते म्हणजे कधींहि कोणास निराश न करितां उगवते, तसा अग्नि होय.' मेघांपासून उदकवृष्टि करणें हा जो इंद्राचा मोठा पराक्रम त्याच्या संबंधानें अग्नीचें

३. जेव्हां सत्यधर्माच्या रसानें पुष्ट [होत्साता] [असा] हा [अग्नि] सत्यधर्माच्या परम सरळ मार्गांनीं उपासना करवितो, [तेव्हां] अर्यमा, मित्र, वरुण, [आणि] सर्वगामी [मरुद्गण] हे मेघाच्या स्थानीं जलकोश भरून टाकितात.

3. When he, fattened with the milk of the true religion, leads [the people] by the straightest roads, [then] Aryamâ, Mitra, Varuṇa [and] the all-wandering [Maruts] fill the skin in the home of the cloud.

स्वरूप कसें आहे तें या मंत्रांत आणि सूक्तांत सांगितलें आहे असें दिसतें. म्हणजे, आकाशांतून पर्जन्याच्या रूपानें जो पाऊस पडतो त्यांत अग्नीचाहि पराक्रम आहे असें तात्पर्य. विद्युल्लतेच्या रूपानें अग्नि मेघमंडलांतून पाऊस पाडितो म्हणून त्यास वैद्युत अग्नि असें म्हणतात. आणि या सूक्ताच्या पहिल्या तीन ऋचा वैद्युत अग्नीविषयीं आहेत असें अनुक्रमणिकेंत सांगितलें आहे. वैद्युत अग्नीला ‘ मध्यम अग्नि ’ असेंहि म्हणतात, कारण कीं विद्युत् भूमि आणि स्वर्ग यांच्या ‘ मधला ’ जो अंतरिक्षप्रदेश त्यांत असते.

हा मंत्र खालीं दाखविल्याप्रमाणें श्लोकवृत्ताला बसतोः—

हिरण्यकेशो रजसो विसारे
अहिर्धुनिर्वात इव ध्रजीमान् ।
शुचिभ्रआजा उषसो नवेदा
यशस्वतीरॅपस्युवो न सत्याः ॥

२. यांत ऋषि म्हणतो कीं, ‘ हे अग्नी, तुझे घोडे जेव्हां तुला रथांत बसवून घेऊन येतात तेव्हां ते येतां येतां सर्व मेघांचा चुराडा करीत करीत येतात. मग काळा जो मेघ तो ओरडूं लागतो. मग तूं उदकांबरोबर येऊन प्रगट होतोस, आणि तीं मेघोदकें तुजबरोबर हंसत हंसत जणूं येत असतात. एवंच तूं विद्युद्रूपानें आकाशांत प्रगट झालास म्हणजे जिकडे तिकडे वृष्टि होते आणि मेघगर्जना होत असते.’

‘ सर्वत्र संहार करीत येतात ’=‘ आ अमिनन्त.’ हा अर्थ सायणांप्रमाणें केला आहे. तसा अर्थ दिसतो यांत संशय नाहीं.

श्लोकीकरणः—

आ ते सुपर्णा अमिनन्त एँवैः
कृष्णो नॉनावँ वृषभो यदीदम् ।
शिवाभिर्न स्मॅयमॉनाभिरागात्
पतन्ति मिहः स्तनयन्ति अभ्रा ॥

३. ‘ जेव्हां अग्नि मनुष्यांनीं अर्पिलला सोमरस पिऊन मनुष्यांचा होता होतो तेव्हां अर्यमादि देव मेघवृष्टि करितात; म्हणजे अग्नीला पुढें करून म-

अग्ने वाजस्य गोमत ईशानः सहसो यहो ।
अस्मे धेहि जातवेदो महि श्रवः ॥ ४ ॥

अग्ने । वाजस्य । गोऽमतः । ईशानः । सहसः । यहो इति ।
अस्मे इति । धेहि । जातऽवेदः । महि । श्रवः ॥ ४ ॥

स इधानो वसुष्कविरग्निरीळेन्यो गिरा ।
रेवदस्मभ्यं पुर्वणीक दीदिहि ॥ ५ ॥

सः । इधानः । वसुः । कविः । अग्निः । ईळेन्यः । गिरा ।
रेवत् । अस्मभ्यम् । पुरुऽअनीक । दीदिहि ॥ ५ ॥

भाषायाम्.

४. हे अग्ने, हे सहसो यहो (=बलस्य पुत्र), हे जातवेदः (=जातानां वेदितः), गोमतो वाजस्य (=गोयुक्तस्यान्नस्य) ईशानः (=प्रभुस्) [त्वम्] अस्मे (=अस्मासु) महि श्रवः (=प्रभूतम् अन्नं) धेहि (=स्थापय) ॥

५. हे पुर्वणीक (=बहुमुख अग्ने), स इधानः (=तादृशः प्रज्वलितः) [सन्] वसुः (=साधुः) कविः (=क्रान्तदर्शी=मेधावी) गिरा ईळेन्यः (=स्तुत्यः स्तवनीयः) [एतादृशस्त्वम्] अग्निः अस्मभ्यम् (=अस्मदर्थे) रेवत् (=धनेन युक्तं यथा तथा) दीदिहि (=दीप्यस्व) ॥

नुष्य जेव्हां देवांस यज्ञरूप उत्तम साधनांनीं भजतात तेव्हांच अर्यमादि देव आकाशांतून वृष्टि पाडितात,' असा भावार्थ आहे. तथापि "त्वचं पृञ्चन्ति उपरस्य योनौ" इतकें वाक्य कठिण आहे. त्याचा भावार्थ सायणांप्रमाणेंच बहुतकरून आम्ही समजत आहों.

'सत्य धर्माच्या रसानें'=' ऋतस्य पयसा.' म्हणजे सोमानें. ऋत म्हणजे येथें यज्ञ असा अर्थ आहे. कारण आपले वाडवडील यज्ञ करणें हाच खरा धर्म असें समजत असत.

'सत्य धर्माच्या परम सरळ मार्गांनीं'= 'ऋतस्य पथिभी रजिष्ठैः'. म्हणजे यज्ञ हेच जे देवकृपा संपादन करण्याचे खरे आणि अगदी त्वरित कार्यसिद्धि करणारे मार्ग, त्यांहींकरून. यज्ञ हाच खरा धर्म आणि यज्ञ करणें हाच देवकृपा संपादण्याचा उत्तम मार्ग असें आपल्या पूर्वजांचें मत होतें.

'उपासना करवितो'=' नयन् [भवति].' अक्षरशः अर्थ, 'नायक होतो;' आपण पुढें होऊन जगास आपल्या मागून चालवितो, जगाला मार्गदर्शक होतो.

४. हे अग्नी, हे शक्तीच्या पुत्रा, हे ज्ञातवेदा, गोयुक्त संपत्तीचा प्रभु असा जो तूं तो आम्हांस विपुल अन्न दे.

५. तर हे बहुमुख [अग्नी], कृपाळु, मेधावी [आणि] स्तोत्रद्वारें वर्णनीय असा जो तूं त्या तुला [आम्ही] प्रज्वलित करितांच आम्हांस [आपल्या] प्रकाशाच्या योगानें धन दे.

4. O Agni, O son of might, confer upon us, thou Lord of food accompanied by cows, plenteous food, O knower of all creation!

5. When kindled, shine thou therefore, O Agni [who art] benign, wise [and] worthy of a hymn, so that we may attain wealth, O many-faced [God].

'जलकोश'='त्वचम्.' म्हणजे आकाशांत पखालीप्रमाणें शुष्क मेघ पुष्कळ असतात पण त्यांत पाणी नसतें, तें अर्यमादिक देव त्यांत भरितात.

या मंत्राचे पहिले दोन चरण तर श्लोकवृत्ताला सहज बसतात. तिसरा आणि चवथा हे खालीं दाखविल्याप्रमाणें म्हटले पाहिजेतः—

अर्यमॉ मित्रो वरुणः परिज्मा
त्वचं पृॅञ्चन्तिं उपरस्य योनौं ॥

---

४. जातवेदा. सू. ४४, मं. १ आणि त्याजवरील टीप पाहा.

'गोयुक्त संपत्तीचा'='वाजस्य गोमतः'. म्हणजे गाई आणि इतर संपत्ति यांचा. सायणाचार्य वाज शब्दाचा अर्थ इतकाच करितात.

या मंत्राचें वृत्त उष्णिक् आहे. उष्णिक् वृत्त म्हणजे असें असतें कीं त्याचे पहिले दोन चरण गायत्रीप्रमाणेंच असतात आणि तिसऱ्या चरणांत बारा अक्षरें असून तीं जगती छंदाच्या पादाप्रमाणें बहुतकरून म्हणतां येतात, अथवा त्यापैकीं शेवटचीं आठ अक्षरें गायत्रीच्या तिसऱ्या चरणाप्रमाणें म्हणावीं लागतात. उदाहरणार्थ, प्रस्तुत मंत्रांत जातवेदो महिश्रवः हा गायत्रीचा तिसरा पाद होतो. उष्णिक् वृत्त वेदांत फारसें येत नाहीं, मधून मधून एकाद्या सूक्तांत एक दोन मंत्र त्या वृत्ताचे येत असतात.

५. 'हे अग्नी, तूं कृपाळु आणि ज्ञानी आणि स्तवनीय आहेस; तर तूं आपल्या प्रकाशानें प्रदीप्त हो. तुझ्या प्रकाशण्याचा प्रताप इतका आहे कीं तूं प्रज्वलित होतांच आम्हांस संपत्ति मिळेल.'

'बहुमुख'='पुर्वणीक.' अग्नि पेटला म्हणजे अमुक एका वाजूला त्याचें तोंड आहे असें दिसत नाहीं. तो आप-

क्षपो राजन्नुत त्मनाग्ने वस्तोरुतोषसः ।
स तिग्मजम्भ रक्षसो दह प्रति ॥ ६ ॥ २७ ॥

क्षपः । राजन् । उत । त्मना । अग्ने । वस्तोः । उत । उषसः ।
सः । तिग्मऽजम्भ । रक्षसः । दह । प्रति ॥ ६ ॥ २७ ॥

अवा नो अग्न ऊतिभिर्गायत्रस्य प्रभर्मणि ।
विश्वासु धीषु वन्द्य ॥ ७ ॥

अव । नः । अग्ने । ऊतिऽभिः । गायत्रस्य । प्रऽभर्मणि ।
विश्वासु । धीषु । वन्द्य ॥ ७ ॥

भाषायाम्.

६. हे राजन्, हे तिग्मजम्भ (=तीक्ष्णमुख) अग्ने, [स त्वं] क्षपः (=रात्रिसमयेषु) उत त्मना (=अपि च) वस्तोः (=अहनि) उत (=अपि च) उषसः (=उषःकालेषु), रक्षसः प्रति दह (=प्रत्येकं राक्षसं दह) ॥

७. हे अग्ने, हे विश्वासु धीषु वन्द्य (=सर्वेषु कर्मसु स्तुत्य) गायत्रस्य प्रभर्मणि (=गायत्रवृत्तयुक्तस्य सूक्तस्य अर्पणे कृते सति), [त्वं] नः (=अस्मान्) अव (=रक्ष) ॥

तव प्रीतिकरं यद्गायत्रं तेन वृत्तेन कृते सूक्ते तुभ्यम् अर्पिते सति त्वं तव संरक्षणसाधनैरस्मान् रक्षेति भावः ॥

ल्या ज्वाळेनें चारी बाजूंला पाहात आहे असें दिसत असतें. अग्नि पेटला म्हणजे एक बाजूस तो पाहातो आणि तिकडेस प्रकाश पाडतो आणि मागच्या बाजूला अंधार पडतो असें नाहीं, तर आसमंतात् चारी बाजूंस त्याचा उजेड एकसारिखा पडत असतो. म्हणून अग्नीला ‘ पुर्वणीक ’ हें विशेषण दिलें आहे.

‘ प्रकाशाच्या योगानें धन दे ’ =‘ रेवत् दीदिहि.’ अक्षरशः अर्थ धनासहित प्रकाश- म्हणजे तूं प्रकाश, कीं जेणेंकरून आम्हांस धन मिळेल.

हा मंत्र असा म्हटला पाहिजे.

स इधानो वसुष्कविः
अग्निरीळेनिओ गिरा ।
रेवदस्मभ्यं पुर्वणीक दीदिहि ॥

६. तर हे राजा अग्नी, हे तीक्ष्णमुख [अग्नी], तूं रात्रीच्या वेळीं, आणि दिवसाच्या वेळीं आणि प्रभातकाळीं सर्व राक्षसांला जाळून टाक.

७. हे अग्नी, हे सकळ कर्मांमध्यें वंद्य [अग्नी], सूक्त अर्पण करितांच तूं आपल्या रक्षणांनीं आम्हांला रक्ष.

6. Burn thou, therefore, O king Agni, O [God] of fiery jaws, every Râkshasa at night and even during day and at the rise of the Dawn.

7. O Agni, that deservest to be revered in all actions, protect us with thy protections when a hymn is offered.

---

६ या मंत्रांत अग्नीला अशी प्रार्थना आहे कीं, ' हे अग्नी, वर सांगितल्याप्रमाणें तूं सर्वत्र प्रकाश पाडणारा देव आहेस, त्यापेक्षां आम्हांस उपद्रव करणाऱ्या प्रत्येक राक्षसाला रात्रीं, दिवसाच्या वेळीं आणि प्रभातकाळीं जाळून भस्म कर. आणि तसें करणें हें तुला कठीण नाहीं; कारण कीं तुला राजाप्रमाणें सर्वत्र अधिकार असून राक्षसांला जाळून टाकण्याएवढी तीक्ष्ण शक्ति तुझ्या अंगीं आहे. '

'राक्षसांला.' राक्षस म्हणजे कोण ह्याविषयीं सू. ७३, मं. ३ ह्याजवरील टीप पहा.

७. हे अग्नी, कोणतेंहि यज्ञादिक कर्म केलें तरी त्यांत तुझी स्तुति करण्यास योग्य होय. तर असा जो तूं त्या तुला आम्ही गायत्री वृत्तांत सूक्त रचून अर्पण केलें म्हणजे तूं आमचें रक्षण करीत जा; म्हणजे आम्हांस जेव्हां जेव्हां संकट पडेल तेव्हां आम्ही तुझी स्तुति गायत्री वृत्तांत सूक्त म्हणून करूं, आणि तेव्हां तेव्हां तूं आमचें रक्षण करीत जा.

' सकळ कर्मांमध्यें वंद्य ' =' विश्वासु धीषु वन्द्य.' म्हणजे कोणत्या देवाप्रीत्यर्थ कोणतेंहि कर्म केलें तरी त्यांत अग्नीची स्तुति प्रथम होतच असते असें तात्पर्य. कोणतेंहि हवि अर्पण केलें तरी तें अग्नींतच टाकिलें जातें.

आ नो॑ अग्ने र॒यिं भ॑र सत्रा॒साहं॒ वरे॑ण्यम् ।
विश्वा॑सु पृ॒त्सु दु॒ष्टर॑म् ॥ ८ ॥

आ । न॒: । अ॒ग्ने॒ । र॒यिम् । भ॒र॒ । स॒त्रा॒ऽसह॑म् । वरे॑ण्यम् ।
विश्वा॑सु । पृ॒त्ऽसु । दु॒स्तर॑म् ॥ ८ ॥

आ नो॑ अग्ने सु॒चे॒तुना॑ र॒यिं वि॒श्वायु॑पोषसम् ।
मा॒र्डी॒कं धे॑हि जी॒वसे॑ ॥ ९ ॥

आ । न॒: । अ॒ग्ने॒ । सु॒ऽचे॒तुना॑ । र॒यिम् । वि॒श्वायु॑ऽपोषसम् ।
मा॒र्डी॒कम् । धे॒हि॒ । जी॒वसे॑ ॥ ९ ॥

प्र पू॒तास्ति॒ग्मशो॑चिषे॒ वाचो॑ गोतमा॒ग्नये॑ ।
भर॑स्व सु॒म्न॒युर्गिर॑: ॥ १० ॥

प्र । पू॒ताः । ति॒ग्मऽशो॑चिषे । वाच॑: । गो॒त॒म॒ । अ॒ग्नये॑ ।
भर॑स्व । सु॒म्न॒ऽयुः । गिर॑: ॥ १० ॥

भाषायाम्.

८. हे अग्ने, [त्वं] सत्रासाहं (=बहूनाम् अभिभवितारं) वरेण्यं (=सर्वैरपि वरणीयं=श्रेष्ठं) विश्वासु पृत्सु दुष्टरं (=सर्वेष्वपि युद्धेषु शत्रुभिर्दुस्तरणीयं) रयिं (=धनं) नः (=अस्मदर्थम्) आ भर (=आनय) ॥

९. हे अग्ने, सुचेतुना (=सुबुद्ध्या=अस्मदनुग्रहबुद्ध्या) विश्वायुपोषसं (="सर्वस्मिन्नायुषि देहादेः पोषकं=यावज्जीवमस्मदुपभोगपर्याप्तं") रयिं (=धनम्) आ [भर] (=आनय) [अपि च] जीवसे (=जीवनाय=वयं जीवितुं यथा समर्थाः स्याम तथा) मार्डीकं धेहि (=सुखं प्रयच्छ) ॥

अस्मभ्यं प्रभूतं धनं दत्त्वा तस्योपभोगाय नो दीर्घायुषसः कुर्वित्यर्थः ॥

१०. हे गोतम (=एतत्सूक्तकर्तः), सुम्नयुः (=धनमात्मन इच्छन्) [त्वं] तिग्मशोचिषे (=तीक्ष्णज्वालाय) अग्नये पूताः (=शुद्धा) वाचः (=स्तुतीः) गिरः (=स्तोत्राणि) [च] प्र भरस्व (=प्रकर्षेण संपाद्य प्रार्पय) ॥

८. हे अग्नी, सर्वविजयी [आणि] उत्तम [आणि] सकळ युद्धांत दुस्तर असें धन तूं आम्हांला आण.

8. Bring unto us, O Agni, a wealth that shall subdue all, [that shall be] excellent, [and] [that shall be] unconquerable in all battles.

९. हे अग्नी, सर्व जन्मभर पोषण करणारें धन तूं कृपाकरून आम्हांकरितां आण आणि आम्हीं जगावें या हेतूनें आम्हांला सुख दे.

9. Bring thou unto us, O Agni, with graciousness a wealth that shall sustain all lifetime; confer happiness [upon us] that we may live.

१०. हे गोतमा, धनेच्छु [असा जो] तूं [तो] तीक्ष्णप्रभावान् अग्नीकारणें पवित्र स्तुति [आणि] स्तोत्रें अर्पण कर.

10. Pour forth, O Gotama, who art desirous of wealth, pure prayers [and] praises to Agni of resplendent brightness.

---

८. 'हे अग्नी, ज्या संपत्तीपासून आमच्या शत्रूंचा पराभव होईल, जी श्रेष्ठ होय, आणि जी कोणत्याहि संग्रामांत झाली तरी शत्रूंला निर्दाळून टाकणारी, शत्रूंकडून निर्दाळण करून न घेणारी अशी संपत्ति आम्हांला घेऊन ये.'

वृत्तसुखासाठीं 'वरेणिअं' आणि 'विश्वासु' असा उच्चार केला पाहिजे.

९. 'हे अग्नी, तूं कृपा करून आम्हांस इतकी संपत्ति दे कीं ती आमच्या जन्मभर आम्हांस पुरेल, संपणार नाहीं, आणि आम्हांला असें सुख प्राप्त करून दे कीं जेणेंकरून आम्ही पुष्कळ दिवस जगूं.' म्हणजे, आम्हांस पुष्कळ संपत्ति दे आणि तिचा उपभोग घेण्याला आम्हांला दीर्घायुषी कर असें तात्पर्य.

'कृपा करून' =' सुचेतुना.' अक्षरशः अर्थ 'सन्मतीनें,' म्हणजे आम्हांवर चांगली कृपा करून. ऋ. १. १५९. ५. आणि त्याजवरील सायणभाष्य पहा. दुसरींहि पुष्कळ प्रमाणें आम्हीं केलेल्या अर्थाला आहेत.

'सुख' =' मार्डीकम्.' हें येथें नाम आहे, विशेषण नव्हे, असें मन्तान्तरावरील सायणभाष्यावरून सिद्ध होतें.

१०. यांत, गोतम ऋषि आपणासच म्हणतो कीं, 'हे गोतमा, तूं धनाची इच्छा करीत आहेस, तर तेजःपुंज जो अग्नि त्याजप्रत मनापासून शुद्ध स्तुति अर्पण कर.' धनाची इच्छा कशी करीत आहे यांविषयीं वरचे तीन च्यार मंत्र पहा. 'मला धनाची फार इच्छा आहे

यो नो॑ अग्ने॒ऽभि॒दास॒त्यन्ति॑ दू॒रे प॑दी॒ष्ट सः ।
अ॒स्माक॒मिद्वृ॒धे भ॑व ॥ ११ ॥

यः । नः॒ । अ॒ग्ने॒ । अ॒भि॒ऽदास॑ति । अन्ति॑ । दू॒रे । प॒दी॒ष्ट । सः ।
अ॒स्माक॑म् । इत् । वृ॒धे । भ॒व ॥ ११ ॥

स॒ह॒स्रा॒क्षो वि॒च॑र्षणिर॒ग्नी रक्षां॑सि सेधति ।
होता॑ गृणीत उ॒क्थ्यः॑ ॥ १२ ॥ २८ ॥

स॒ह॒स्र॒ऽअ॒क्षः । वि॒ऽच॑र्षणिः । अ॒ग्निः । रक्षां॑सि । से॒ध॒ति॒ ।
होता॑ । गृ॒णी॒ते॒ । उ॒क्थ्यः॑ ॥ १२ ॥ २८ ॥

भाषायाम्.

११. हे अग्ने, यः [शत्रुः] अन्ति दूरे (=समीपं दूरे वा तिष्ठन्) नः अभिदासति (=उपक्षपयति) स [शत्रुः] पदीष्ट (=नश्यतु) । [त्वं तु] अस्माकम् इत् वृधे भव (=अस्माकमेव वर्धनाय भव=अस्माकमेव प्रवर्धयिता न तु शत्रूणामपि प्रवर्धयिता भव) ॥

१२. सहस्राक्षः (=सहस्रनेत्रोपेतः) विचर्षणिः (=विश्वस्य द्रष्टा) [एतादृशः] अग्निः रक्षांसि सेधति (=राक्षसान् विनाशयति)। उक्थ्यः (=स्तुत्यः) [स] होता (=देवानाम् आह्वाता) गृणीते (=गीर्यते=स्तूयते) [स्मास्माभिः] ॥

यास्तव मी मनःपूर्वक स्तुति अग्नीची केली पाहिजे' इतकें तात्पर्य. यांत जें धन (=सुम्नम्) सांगितलें आहे तें केवळ गाई, घोडे, घरेंदारें, सुवर्ण इत्यादि भौतिकपदार्थरूपच असलें पाहिजे असें नाहीं, साधारण सर्व प्रकारचा उत्कर्ष असा अर्थ आहे, असें जरी आहे तरी गोतमासारिखे मोठमोठे ऋषि संसारत्याग करून अरण्यांत जाऊन राहत असत असें सिद्ध होत नाहीं.

'स्तुति आणि स्तोत्रें' =' वाचः गिरः.' यांत हे दोन शब्द भिन्न भिन्न अर्थी योजिले आहेत असें दिसत नाहीं, तर एकाच अर्थी दार्ढ्यासाठीं समानार्थक दोन शब्दांचा प्रयोग केला आहे असें दिसतें.

वृत्तासाठीं 'गोतम अग्नये' असें म्हटलें पाहिजे.

११. हे अग्नी, जो कोण आम्हांला जवळून [अथवा] दूरून त्रास देईल तो नाश पावो. तूं आमचाच कल्याणकर्ता हो.

१२. सहस्रनेत्र [आणि] विश्वदर्शी अग्नि राक्षसांला नाहींसे करितो. [तो] स्तवनीय होता [या प्रकारेंकरून आम्हीं] स्तविला आहे.

11. He, O Agni, who from near or from afar harasses us,—may he be destroyed. Be thou the promoter of us alone.

12. Thousand-eyed [and] all-seeing Agni drives away demons. The praiseworthy invoker is [thus] praised.

---

११. 'हे अग्नी, जे कोणीहि आम्हांस जवळून अथवा दुरून उपद्रव देतील अशा सर्व मनुष्यांला तूं नाहींसे करून टाक. आणि तूं आमचेंच कल्याण करणारा हो, दुसऱ्यांचेंहि करूं नको' असा भावार्थ.

या मंत्राविषयीं विशेष सांगावयाचें कांहीं नाहीं, मात्र गोतमासारिख्या मोठ्या ऋषीनें अशी प्रार्थना करणें म्हणजे वैदिक काळच्या ऋषींचें खरें स्वरूप दिसून येतें. एक तर हें कीं, प्राचीन ऋषीला आपल्या शत्रूंचा तर काय, पण सूर्यचंद्रादिक प्रचंड गोलांचा नाश अथवा उपमर्द करण्याचीहि शक्ति त्यांला होती असें जें पौराणादिकांचें म्हणणें त्याला कांहीं आधार दिसत नाहीं (कारण जर असता तर गोतमानें आपल्या पराक्रमानेंच शत्रूंचा नाश केला असता, अग्नीची प्रार्थना केली नसती); आणि दुसरें असें कीं, सत्ययुगांतील मोठमोठ्या ऋषिजनांमध्यें क्षमेचा आणि क्षांतीचा मोठा भर असेल असें जर कोणास सत्ययुगाविषयीं पुराणादिक ग्रंथांत सांगितलेल्या कथांवरून वाटत असेल, तर त्याला पुरता आधार नाहीं.

वृत्तानुरोधासाठीं 'यो नो अग्नेभिदासति । अन्ति दूरे पदीष्ट सः' असे पहिले दोन चरण वाचले पाहिजेत.

१२. 'अग्नि हा सहस्राक्ष म्हणजे शंभर डोळे असलेला आणि सर्वत्र पाहणारा असा आहे, आणि त्यामुळें त्याला जिकडे जिकडे राक्षस असतील तिकडे तिकडे ते दृष्टीस पडतात, आणि तो त्यांस नाहींसे करून टाकितो. म्हणूनच तो देवांचा स्तुत्य आवाहन करणारा होय असें समजून त्याची स्तुति करितात.'

'सहस्रनेत्र.' या विशेषणाचें तात्पर्य इतकेंच कीं, अग्नीला पाहिजे तिकडे एकाचवेळीं दिसत असतें, जसे काय त्याला हजार डोळे आहेत. याच सूक्ताच्या

सूक्तम् ८०.

रहूगणपुत्रो गोतम ऋषिः । इन्द्रो देवता । पङ्क्तिश्छन्दः ।[५]

इत्था हि सोम इन्मदे ब्रह्मा चकार वर्धनम् ।
शविष्ठ वज्रिन्नोजसा पृथिव्या निः शशा अहिमर्चन्ननु स्वराज्यम् ॥ १

इत्था । हि । सोमे । इत् । मदे । ब्रह्मा । चकार । वर्धनम् ।
शविष्ठ । वज्रिन् । ओजसा । पृथिव्याः । निः । शशाः । अहिम् । अ-
र्चन् । अनु । स्वऽराज्यम् ॥ १ ॥

भाषायाम्.

१. इत्था हि (=अनेन प्रकारेण हि) मदे सोमे इत् (=मदकरे सोमपान एव) ब्रह्मा (=स्तोता) वर्धनं चकार (=तव आनन्दकरं स्तोत्रं कृतवान् अस्ति)। [तस्मात्] हे शविष्ठ वज्रिन् (=अतिशयेन बलवन् वज्रधर इन्द्र), [त्वम्] ओजसा (=तव बलेन) अहिं (=वृत्रं) पृथिव्या निः शशाः (=पृथिवीसकाशान्निरगमय), स्वराज्यम् अनु अर्चन् (=स्वस्य राज्यं च प्रकटय) ॥

---

५ ह्या मंत्रावरील ‘ बहुमुख ’ शब्दाविषयींची टीप पहा.

‘ राक्षसांला.’ सू. ७६, मं. ३ याजवरील टीप पहा.

‘ आम्हीं स्तविला आहे ’=‘ गृणीते.’ हें येथें कर्मणि आत्मनेपद असें समजून अर्थ केला पाहिजे. ‘ [देवांला] स्तवितो ’ असा अर्थ सायणाचार्य करितात. ‘ लोकांनीं स्तविला जात असतो ’ हा अर्थ चांगला जुळतो.

वृत्रासाठीं ‘ उक्थिअः ’ असा उच्चार तिसऱ्या चरणांत केला पाहिजे.

सूक्त ८०.

ऋषि-गोतम (पूर्वसूक्ताचा जोतोच). देवता-इन्द्र. वृत्त- पङ्क्ति.

१. या प्रकारेंकरून हर्षकारक सोमाच्या भरांतच स्तोत्यानें आनंदकारक स्तोत्र [तुला] अर्पण केलें आहे. [तर] हे परम प्रबळ वज्रधरा, [तूं आपल्या] पराक्रमानें अहीला पृथिवीपासून हाकून लाव, आणि आपलें आधिपत्य प्रगट कर.

HYMN 80.

To *Indra*. By *Gotama*, author of the previous hymn. Metre—*Pankti*.

1. For thus indeed in the exhilarating Soma has the praiser composed a gladdening hymn [for thee]. Drive off, O mightiest wielder of the thunderbolt, the Serpent from the earth with [thy] power, [thus] manifesting thy empire.

---

१. हेंहि सूक्त गोतम ऋषीचेंच आहे. याचें वृत्त मात्र 'पंक्ति' आहे. पंक्ति नांवाचें वृत्त साधारण संस्कृतांत बहुतकरून येत नाहीं, पण वेदांत बरेंच येतें. त्याचें लक्षण असें आहे कीं, अनुष्टुप् वृत्ताचा तिसरा चरण काढून घेतला आणि पहिला, दुसरा, हे चरण ठेवून चवथा ठेविला आणि तीन चरण केले म्हणजे जसें गायत्री वृत्त होतें, तसें अनुष्टुपाचे च्यारीहि चरण कायम ठेवून आणखी एक पांचवा चरण अष्टाक्षरी जोडिला म्हणजे पंक्तिवृत्त झालें. यावरून पंक्तिवृत्त म्हणजे अनुष्टुपच समजावयाचें, मात्र त्याला एक पांचवा चरण अधिक जोडिला म्हणजे झालें.

मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, 'हे इंद्रा, मी स्तोत्यानें सोमरसाच्या आनंदांत हें स्तोत्र रचून तुला अर्पण केलें आहे. तर हे इंद्रा, तूं पृथिवीवरून वृत्ररूप अहीतें हाकून लाव, आणि तसें केल्यानें तुझें आधिपत्य सहजच प्रगट होईल. असें करणें तुला कठिण नाहीं, कारण तुझ्या वज्राच्या योगानें तुला अत्यंत शक्ति येत असते.'

'हर्षकारक सोमाच्या भरांतच'='सोमे इत् मदे.' अक्षरशः अर्थ, 'सोमांत [आणि] मदांतच.' 'तुला इंद्राला सोमरसानें हर्ष उत्पन्न करण्यासाठीं' असा, अथवा 'तूं सोमरस पिऊन हर्ष पावला असतां' असाहि अर्थ चांगला संभवतो.

'स्तोत्यानें'=' ब्रह्मा.' ब्रह्मा अथवा (ब्राह्मण) शब्दाचा हा अगदी मूळचा अर्थ आहे. 'ब्रह्म' रचणारा, म्हणजे सूक्त रचणारा तो 'ब्रह्मा' अथवा 'ब्राह्मण.'

'अहीला.' 'अहि' म्हणजे सर्प. येथें सायणाचार्य अहि म्हणजे वृत्ररूपी सर्प

स त्वामदद्वृषा मदः सोमः श्येनाभृतः सुतः ।
येना वृत्रं निरद्भ्यो जघन्थ वज्रिन्नोजसार्चन्ननु स्वराज्यम् ॥२॥

सः । त्वा । अमदत् । वृषा । मदः । सोमः । श्येनऽआभृतः । सुतः ।
येन । वृत्रं । निः । अत्ऽभ्यः । जघन्थ । वज्रिन् । ओजसा । अर्चन् ।
अनु । स्वऽराज्यम् ॥ २ ॥

भाषायाम्.

२. हे वज्रिन् (=वज्रधर), स्वराज्यम् अनु अर्चन् (=स्वस्य स्वामित्वं प्रकटयन्) [त्वं] येन [सोमेन पीतेन] ओजसा (=तव बलेन) वृत्रम् अद्भ्यः निः जघन्थ (=वृत्रं हत्वा तम् अद्भ्यः सकाशात् प्रक्षिप्तवानसि) स वृषा (=सेचनसमर्थो=वीर्यवान्) मदः (=मदकारकः) श्येनाभृतः (=श्येनपक्षिणा स्वर्गादानीतः) सुतः (=अभिषुतः) सोमस्त्वा (=त्वाम्) अमदत् (=हर्षं प्रापयत्) ॥

असें म्हणतात. वृत्राला सर्प असें म्हणतात याविषयीं पूर्वी पुष्कळ ठिकाणीं आलेंच आहे. सू. ३२, मं. १ आणि त्याजवरील टीप पहा. दुसरे मंत्रहि पुष्कळ आहेत.— परंतु या वृत्ररूप अहीला पृथिवीपासून दूर करणें म्हणजे काय ? पृथिवीवर त्याचा उपद्रव होऊं नये असें करणें असेल एक, किंवा वृत्रासारिखे जे दुष्ट शत्रु या पृथिवीवर असतील त्यांस नाहींसे करून टाक असा अर्थ असेल एक.

‘आणि आपलें आधिपत्य प्रगट कर ’=‘ अर्चन् अनु, स्वराज्यम्.’ म्हणजे तुझ्या पुढें वृत्रादिक शत्रूंचें कांहीं चालत नाहीं, तूंच सर्वत्र सर्वश्रेष्ठ आहेस असें दाखविण्याकरितां आपला प्रकाश जणुं पाड. ‘ अर्चन् अनु स्वराज्यम् ’ हें पालवपद आहे आणि तें प्रत्येक ऋचेच्या शेवटीं येत जाईल. अशीं पालवपदें वेदांत पुष्कळ येत असतात. कितीएक प्रतिमंत्राच्या शेवटीं आणि कितीएक दर सूक्ताच्या शेवटीं येणारीं असतात. सू. ५८, याचा शेवटचा मंत्र आणि त्याजवरील टीप पहा.

या पालव पदांत वृत्तसुखासाठीं ‘ अर्चन्नतु स्वराजिअम् ’ असा पांचवा चरण म्हटला पाहिजे.

२. हे वज्रधरा, जो सोम पिऊन [तूं] वृत्राला [आपल्या] प्रतापाच्या योगानें मारून उदकांपासून फेकून देता झालास; तो प्रबळ, श्येन पक्ष्यानें आणिलेला मादकारक [आणि] पिळून काढिलेला सोमरस तुला हर्षविता झाला, आणि तूं आपलें आधिपत्य प्रगट करिता झालास.

2. That mighty, intoxicating extracted juice of Soma brought by the falcon exhilarated thee, by which, O wielder of the thunderbolt, thou didst with [thy] might strike Vṛitra off the waters, manifesting [thy] empire.

२ यांत ऋषि म्हणतो कीं, 'हे इंद्रा, तूं जेव्हां वृत्राला मारून टाकून मेघोदकें मुक्त केलींस आणि सर्व जगतावर आपलें परिपूर्ण आधिपत्य आहे असें उघड करून लोकांस दाखविलेंस, तेव्हां तूं सोम प्याला होतास आणि त्या सोमाच्या योगानें तुला मोठा हर्ष झाला होता.' म्हणजे वृत्रहननरूपी महा पराक्रम जो त्वां केला तो सोम पिऊन हर्ष झाल्यावर केला असा भावार्थ आहे.

'प्रबळ' =' वृषा.' म्हणजे ज्याचें पान केलें असतां पिणाऱ्याच्या आंगीं वीरश्री प्राप्त होते. सोमपानानें इंद्राला शक्ति येते असें पूर्वीं सांगितलेंच आहे.

'श्येनपक्ष्यानें आणिलेला'=' श्येनाभृतः.' हें येथें सहजोक्तिदर्शक विशेषण आहे; हेतुगर्भ नव्हे. सोम पहिल्यानें स्वर्गांत होता त्याला पृथिवीवर श्येनपक्ष्यानें आणिलें अशा अर्थाचे मंत्र वेदांत बरेच आढळतात. उदाहरणार्थः—'श्येन पक्षी नीट जाऊन आनंदकारक आणि हर्षकारक दिव्य सोमवल्लीला धरून तिला दूर आणि अति उंच द्युलोकापासून घेऊन आला' (=ऋजीपी श्येनो ददमानो अंशुं परावतः शकुनो मन्द्रं मदम्। सोमं भरद् दादृहाणो देवावान् दिवो अमुष्माद् उत्तराद् आदाय, ऋ. ४. २६. ६); 'हे इंद्रा, ज्या सोमाला सोमेच्छु जो तूं त्या तुजकरितां श्येन पक्ष्यानें आणिलें' (=आ यं ते श्येनः उशते जभार, ऋ. ३. ४३. ७); 'श्येन पक्ष्यानें मनोवेगी होऊन सुपर्णनगरीप्रत स्वर्गीं जाऊन सोमाला वज्रधर इंद्रासाठीं आणिलें' (=मनोजवा अयमान आय सीमतरत्पुरम्। दिवं सुपर्णो गत्वाय सोमं वज्रिण आभरत्, ८. १००. ८); 'हे इंद्रा, श्येन पक्ष्यानें आणिलेला, आणि पिळून काढिलेला, जो सोम तो माद येण्यासाठीं तूं पी' (=पिबा सोमं मदाय कम् इन्द्र श्येनाभृतं सुतम्, ८. ९५. ३).

सोमरसासारि... अतिप्रीतींतला पदार्थ पूर्वीं पृथिवीवर नव्हता, द्युलोकीं होता,

प्रेह्यभीहि धृष्णुहि न ते वज्रो नि यंसते ।
इन्द्र नृम्णं हि ते शवो हनो वृत्रं जया अपोऽर्चन्ननु स्वराज्यम् ॥३

प्र । इहि । अभि । इहि । धृष्णुहि । न । ते । वज्रः । नि । यंसते । इन्द्र । नृम्णम् । हि । ते । शवः । हनः । वृत्रम् । जयाः । अपः । अर्चन् । अनु । स्वऽराज्यम् ॥ ३ ॥

भाषायाम्.

३. [हे इन्द्र], प्रेहि (=प्रकर्षेण गच्छ), अभीहि (=आभिमुख्येन आपत) धृष्णुहि (=धैर्यवान् भूत्वा अभिभव) ते वज्रो न नि यंसते [हि] (=तव वज्रं न नियम्यते हि=शत्रुभिः अप्रतिहतगमनं वर्तते हि) । हे इन्द्र, ते शवः (=तव बलं) हि नृम्णं (=वीर्ययुक्ता शक्तिः खलु=लोकाभिभवितृ साधनं खलु) । [अतः कारणात्] हनो वृत्रम् (=वृत्रं जहि) । जया अपः (=मेघोदकानि तस्माज्जित्वा गृहाण), अनु स्वराज्यम् अर्चन् (=स्वस्य स्वामित्वं प्रकटयन्=तथा कृत्वा स्वस्याधिपत्यं प्रकटय च) ॥

तो मागाहून भूलोकीं आणिला असें म्हणणें याचा अर्थ समजावयाला कठिण नाहीं. ज्या वस्तु अतिउत्तम अशा समजल्या जातात त्या मृत्युलोकीं प्रथम नव्हत्या; दिव्यलोकीं, अथवा तशाच एखाद्या दुसऱ्या अगम्यस्थळीं होत्या, तेथून भूलोकीं आणिल्या असें समजणें हा मानवी स्वभाव आहे. अग्नि हा पूर्वी पृथिवीवर नव्हता, त्याला द्युलोकाहून भूलोकीं मनुष्यहितार्थ मातरिश्व्यानें आणिलें असें वेदांत सांगितलें आहे (सू. ६०, मं. १ आणि त्याजवरील टीप पहा). सूर्य, चंद्र, अमृत, स्त्री इत्यादि जीं चवदा रत्नें तीं पूर्वी पृथिवीवर नव्हतीं, समुद्रांत होतीं, तेथून देवदैत्यांनीं मंथून काढिलीं हें तर प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेंच सर्वांस आनंद करणारा असा जो सर्वप्रिय सोमरस तो पूर्वी पृथिवीवर नव्हता, स्वर्गीं होता, तेथून त्याला आणिलें अशी कथा वेदांत सांपडावी यांत नवल नाहीं.

पण तो श्येन पक्ष्यानें आणिला असें सांगितलें आहे. तर श्येनाचीच योजना करण्याचें विशेष कारण काय ? श्येन हा अतिचपल अतिबलाढ्य आणि अति उंच उडणारा पक्षी आहे म्हणून त्याचें नांव या कथेंत आलें कीं काय ?

श्येनानें स्वर्गाहून सोम आणिला अशा अर्थाचे जे वेदांत मंत्र आहेत त्यांला अनुलक्षून ऐतरेय इत्यादि ब्राह्मणांत कथाविस्तार रचिले गेले आहेत. त्याचें एक उदाहरण येथें देतोः—' पूर्वी सोम

३. चल, मार, जिंक; तुझें वज्र कोणीहि निवारणार नाहीं. कारण कीं हे इंद्रा, तुझें बळ घातक [होय]. वृत्राला मारून टाक, उदकांला हिसकावून घे, आणि आपलें आधिपत्य प्रगट कर.

3. Go forth, attack, challenge. Thy thunderbolt shall not be resisted. For thy power, O Indra, is overpowering. Slay Vṛitra, win the waters, manifesting thy empire.

राजा हा गंधर्वांजवळ होता. त्याची इच्छा देवांस आणि ऋषींस झाली. हा सोम राजा आम्हांप्रत कसा येईल ? वाग्देवी म्हणाली गंधर्व स्त्रीलंपट होत, मला स्त्री करा आणि माझ्या योगानें तुम्ही सोम विकत घ्या. देव म्हणाले, नाहीं; तुझ्या शिवाय आमच्यानें कसें राहवेल ? ती म्हणाली, विकत घ्याच. माझें तुम्हांला कारण पडेल तेव्हां मी येत जाईन. देव म्हणाले, वरें आहे. आणि ती अगदी नग्न स्त्री झाली आणि तिच्या योगानें देवांनीं सोमराजाला विकत घेतला' (=सोमो वै राजा गन्धर्वेष्वासीत् । तं देवाश्च ऋषयश्च अभ्यध्यायन् कथमयमस्मान्सोमो राजागच्छेदिति । सा वागब्रवीत् । स्त्रीकामा वै गन्धर्वाः । मयैव स्त्रिया भूतया पणध्वमिति । नेति देवा अब्रुवन् कथं वयं त्वदृते स्यामेति । साब्रवीत् क्रीणीतैव । यर्हि वाव वो मया अर्थो भविता तर्ह्येव वोहं पुनरागन्तास्मीति । तथेति । तया महानग्न्या भूतया सोमं राजानम् अक्रीणन् । ऐतरेय ब्रा. १, २७). इतर ठिकाणीं गायत्रीनें श्येन पक्ष्याचें रूप घेऊन सोमाला द्युलोकाहून पृथिवीवर आणिलें असें सांगितलें आहे. शतपथ ब्राह्म. ३. २. ४; आणि ऋ. ८. ९५. ३; ९. ७१. ९ या मंत्रांवरील सायणभाष्य पहा.

शेवटचे तीन चरण

येना वृत्रं निरद्भिओ ।
जघन्थ वज्रिन्नोजसा ।
अर्चन्नतु स्वराजिअम् ॥

असे म्हटले पाहिजेत.

३. इंद्र वृत्राला मारण्यास सरसावून पुढें जात आहे अशी कल्पना करून ऋषि म्हणतो कीं, 'हे इंद्रा, हं चल, घाल वृत्रावर घाला, बोलाव त्याला लढाईस. तुझें वज्र त्याच्या आंगावर टाक. तें निवारण्याची शक्ति शत्रूला येणार नाहीं. तुझी शक्ति सर्वांस जिंकून टाकणारी आंगशक्तिच जणुं आहे. तर वृत्राला मारून तूं त्याजकडून उदकें (म्हणजे मेघोदकें) जिंकून घे, आणि तसें करून आपलें आधिपत्य सर्वत्र आहे असें प्रगट करून दाखीव.'

'जिंक'=' धृष्णुहि.' धैर्य धर, धैर्य धरून आंगावर घालून घे.

'तुझें बळ घातक [होय]'=' नृम्णं हि ते शवः.' 'नृम्ण' शब्दाचा अर्थ 'नृ-

निरिन्द्र भूम्या अधि वृत्रं जघन्थ निर्दिवः ।
सृजा मरुत्वतीरव जीवधन्या इमा अपोऽर्चन्ननु स्वराज्यम् ॥ ४ ॥

निः । इन्द्र । भूम्याः । अधि । वृत्रम् । जघन्थ । निः । दिवः ।
सृज । मरुत्वतीः । अव । जीवऽधन्याः । इमाः । अपः । अर्चन् ।
अनु । स्वऽराज्यम् ॥ ४ ॥

इन्द्रो वृत्रस्य दोधतः सानुं वज्रेण हीळितः ।
अभिक्रम्याव जिघ्नतेऽपः सर्माय चोदयन्नर्चन्ननु स्वराज्यम् ॥ ५ ॥ २९ ॥

इन्द्रः । वृत्रस्य । दोधतः । सानुम् । वज्रेण । हीळितः ।
अभिऽक्रम्य । अव । जिघ्नते । अपः । सर्माय । चोदयन् । अर्चन् ।
अनु । स्वऽराज्यम् ॥ ५ ॥ २९ ॥

भाषायाम्.

४. हे इन्द्र, [त्वं] भूम्या अधि [वृत्रं निर्जघन्थ] (=वृत्रं हत्वा तं भूम्याः सकाशान्निःक्षिप्तवानसि) [तथा] दिवो वृत्रं निर्जघन्थ (=द्युलोकसकाशाद्वृत्रं हत्वा निःक्षिप्तवानसि) । [तस्मात्] मरुत्वतीः जीवधन्या इमा अपः (=मरुद्भिर्युक्ता जीवान् प्रीणयित्रीः इमा पुरोदृश्यमाना अपः) अव सृज (=अधः पातय), अनु स्वराज्यम् अर्चन् (=स्वस्य स्वामित्वं प्रकटयन्=तथा कृत्वा स्वस्याधिपत्यं प्रकटय च) ॥

५. हीळितः (=क्रुद्ध) इन्द्रः अभिक्रम्य (=आभिमुख्येन वृत्रं प्रति गत्वा) दोधतः (=जगद् भृशं कम्पयतो) वृत्रस्य सानुं (=समुच्छ्रितं हनुप्रदेशं) वज्रेण अव जिघ्नते (=प्रहृत्य अवक्षिपति) सर्माय (=सरणाय=प्रवहणाय) अपः चोदयन् (=मेघोदकानि प्रेरयन्=मेघोदकानि च अवसृजति) अनु स्वराज्यम् अर्चन् (=तथा कृत्वा स्वाधिपत्यं प्रकटयति च) ॥

त्व,' 'वीर्य' असा अक्षरशः आहे. 'सु' याला 'म्न' प्रत्यय लागून जसें 'सुम्नं;' आणि 'द्यु' शब्दापासून 'द्युम्नं' होतें तसें 'नृम्णं' झालें आहे. तुझी वज्रादिकांपासून आलेली शक्ति तुझ्या स्वाधीन इतकी असते कीं ती जणुं सर्व तुझ्या अंगची शारीरकच शक्ति होय असा भावार्थ दिसतो.

४. हे इंद्रा, [तूं] पृथिवीवरून [वृत्राला मारून नाहींसा केलास], द्युलोकाहून वृत्राला मारून नाहींसा केलास. [तर] हीं मरुद्युक्त [आणि] जीवांस तृप्त करणारीं उदकें [तूं] खालीं सोड, आणि आपलें आधिपत्य प्रगट कर.

४. Off from Earth, O Indra, [and] off from Heaven, hast thou slain Vṛitra. Send thou down these waters that have the Maruts with them [and] that sustain life, manifesting thy empire.

५. क्रोधाविष्ट इंद्र [जगताला] कांपविणाऱ्या वृत्राच्या तोंडावर वज्रानें प्रहार करून खालीं पाडितो आणि उदकें खालीं सोडून देऊन वाहवितो, आणि आपलें आधिपत्य प्रगट करितो.

5. Enraged Indra, attacking with [his] thunderbolt the chin of destructive Vṛitra, strikes him down, propelling the waters to flow, [and] manifesting his empire.

---

४. उदकें मेघोदरांतून खालीं गळावीं अशी इच्छा करून ऋषि इंद्राला म्हणतो कीं, ' हे इंद्रा, तूं वृत्राबरोबर युद्ध करून त्याला मारून पृथिवीवरून आणि द्युलोकांतून नाहींसा करून टाकिला आहे. तर हीं जीं आकाशांत उदकें मेघरूपानें लोंबत आहेत त्यांस तूं खालीं पाड आणि तसें करून आपलें आधिपत्य प्रगट कर.'

' मरुद्युक्त'=' मरुत्वतीः.' म्हणजे मरुत् ज्यांजबरोबर आहेत अशीं. मरुत् उदकांबरोबर कसे आहेत आणि या विशेषणाचें प्रयोजन काय आहे तें समजत नाहीं. कदाचित् इंद्रानें वृत्रापासून सोडविल्यानंतर त्यांचें संरक्षण करण्याकरितां मरुत् त्यांच्याबरोबर राहिले अशी कवीची कल्पना असेल तर कोण जाणे. ' मरुत्वान् ' हें विशेषण बहुतकरून इंद्रासच लाविलेलें आढळतें. बृहस्पति, वायु, विष्णु, अग्नी आणि सोम या देवांसहि लाविलेलें क्वचित् आढळतें. पण उदकांस लाविलें आहे असें हें एकच उदाहरण दिसतें.

वृत्तानुरोधानें ' निरिन्द्र भूमिआ अधि ' असा प्रथम चरण वाचावा.

५. वृत्राशीं जें इंद्राचें युद्ध त्याला अनुलक्षून, म्हणजे तें युद्ध जणुं होत आहे असें समजून ऋषि म्हणतो, ' इंद्र वृत्राच्या आंगावर धांवून जाऊन त्याच्या मानेवर वज्रप्रहार करितो आणि वृत्राला

अधि सानौ नि जिघ्नते वज्रेण शतपर्वणा ।
मन्दान इन्द्रो अन्धसः सखिभ्यो गातुमिच्छत्यर्चन्ननु स्वराज्यम् ॥ ६

अधि । सानौ । नि । जिघ्नते । वज्रेण । शतऽपर्वणा ।
मन्दानः । इन्द्रः । अन्धसः । सखिऽभ्यः । गातुम् । इच्छति । अर्चन् ।
अनु । स्वऽराज्यम् ॥ ६ ॥

इन्द्र तुभ्यमिदद्रिवोऽनुत्तं वज्रिन्वीर्यम् ।
यद्ध त्यं मायिनं मृगं तमु त्वं माययावधीरर्चन्ननु स्वराज्यम् ॥ ७ ॥

इन्द्र । तुभ्यम् । इत् । अद्रिऽवः । अनुत्तम् । वज्रिन् । वीर्यम् ।
यत् । ह । त्यम् । मायिनम् । मृगम् । तम् । ऊम् इति । त्वम् । मा-
यया । अवधीः । अर्चन् । अनु । स्वऽराज्यम् ॥ ७ ॥

भाषायाम्.

६. [इन्द्रः] शतपर्वणा (=शतसंख्याकसंधियुक्तेन शतधारेण वा) वज्रेण [वृत्रस्य] अधि सानौ (=कपोले) नि जिघ्नते (=प्रहरति)। अन्धसो मन्दानः (=सोमलक्षणस्यान्नस्य पानेन हृष्टः) इन्द्रः सखिभ्यः (=मित्रभूतेभ्यः स्वोपासकेभ्यो) गातुमिच्छति (=सुखमिच्छति), अनु स्वराज्यम् अर्चन् (=तथा कृत्वा स्वाधिपत्यं प्रकटयति च)॥

७. हे इन्द्र, हे अद्रिवः (=अद्रिवन्=वज्रधर), हे वज्रिन्, तुभ्यम् इत् अनुत्तं वीर्यम् [अस्ति] (=तवैव सामर्थ्यं शत्रुभिरतिरस्करणीयं वर्तते), यत् ह (=यस्मात् कारणात् खलु) त्वं त्यं मायिनं मृगं तम् उ (=तं प्रसिद्धमपि मायायुक्तं वृत्ररूपं मृगं) मायया अवधीः (=हतवानसि), अनु स्वराज्यम् अर्चन् (=तथा कृत्वा स्वस्य स्वामित्वं प्रकटितवानसि च)॥

मारून खालीं, पृथिवीवर पाडितो, आणि उदकांचा प्रवाह भूमीवर वाहे, अशा रीतीनें उदकें खालीं सोडून देतो आणि तेणेंकरून आपलें आधिपत्य उघड करून दाखवितो.'

'तोंडावर '=' सानुम्.' 'पाठीवर' असा अर्थ होईल. परंतु सायणांनीं 'समुच्छ्रितं हनुप्रदेशम्' (=उताणा निजल्यावर तोंडापैकीं हनुवटीचा जो भाग वर येतो) असा अर्थ केला आहे तो आम्हीं घेतला आहे.

'उदकें खालीं सोडून देऊन वाहवितो '=' अपः सर्माय चोदयन्.' अक्षरशः अर्थ, 'उदकें वाहण्यासाठीं सोडणारा ' इतका आहे. 'तोंड ' अथवा ' शिर ' कीं जें सर्व शरीरापेक्षां उंच दिसणारें तें इतका अर्थ आहे असें पुढील मंत्रावरच्या सायणभाष्यावरून समजावयाचें आहे.

६. [वृत्राच्या] तोंडावर [इंद्र] शंभर गांठी असलेल्या वज्रानें प्रहार करितो. सोमरसानें हृष्ट झालेला इंद्र [आपल्या] मित्रांस सुख [व्हावें असें] इच्छितो, आणि आपलें आधिपत्य प्रगट करितो.

७. हे इंद्रा, हे वज्रधरा, हे वज्री, तुझेंच सामर्थ्य अजिंक्य [होय], कारण कीं तूं त्याला—त्या मायावी मृगालाहि मायेनें मारिता झालास; आणि आपलें आधिपत्य प्रगट करिता झालास.

6. On [Vṛitra's] chin He strikes with his hundred-knotted thunderbolt: Indra, delighted with the oblation, wishes prosperity to [his] friends, manifesting his empire.

7. O Indra, armed with the sling-stone, O wielder of the thunderbolt, thou alone hast unresisted prowess, since thou slewest with art that artful beast—that, even that [artful beast], manifesting thy empire.

---

६. यांत ऋषि म्हणतो कीं, 'शंभर ज्याला गांठी गांठी आहेत अशा वज्रानें इंद्र वृत्राच्या तोंडावर प्रहार करितो, आणि उपासकांनीं अर्पण केलेलें हवि भक्षून तृप्त होऊन त्यांजला सुख व्हावें असें इच्छितो, कारण कीं तो आपल्या उपासकांस आपले मित्र असें समजतो. आणि तसें करून आपलें आधिपत्य उघड करून दाखवितो.'

'शंभर गांठी असलेल्या वज्रानें'='शतपर्वणा, वज्रेण.' म्हणजे ज्याला अनेक कठिण कठिण गांठी आहेत, ज्यांच्या योगानें त्याचा घातकपणा अधिक होतो. 'शंभर धारा ज्याला आहेत' असाहि अर्थ सायणाचार्य करितात.

'सोमरसानें हृष्ट झालेला'='अन्धसः मन्दानः.' ऋ. १. ८२. ५ याजवरील सायणभाष्य पहा. दुसरींहि प्रमाणें पुष्कळ आहेत.

'आपल्या मित्रांस'='सखिभ्यः', म्ह. उपासक जनांला. जे लोक इंद्राची उपासना करितात त्यांच्याशीं इंद्र मित्रभावानें वागतो असें आपले पूर्वज मानीत.

'सुख...इच्छितो'='गातुम् इच्छति.' ऋ. ५. ३०. ७ 'मनवे गातुम् इच्छन्' इत्यादि मंत्रावरील सायणभाष्य पहा.

७. 'हे इंद्रा, शत्रूच्या हातून ज्याचा पराभव होणें नाहीं असें वीर्य अथवा सामर्थ्य तुझ्याच आंगीं आहे, दुसऱ्या कोणाच्या आंगीं नाहीं. कारण कीं मायावी मृगाप्रमाणें पळणारा जो जगताचा उपद्रवकारक वृत्र, त्याचा पाठलाग करून त्याला मायेनें तूंच मारिता झालास, दुसऱ्यांला मारतां आलें नसतें.'

वि ते वज्रासो अस्थिरन्नवतिं नाव्या३अनु ।
महत्त इन्द्र वीर्यं बाह्वोस्ते बलं हितमर्चन्ननु स्वराज्यम् ॥ ८ ॥

वि । ते । वज्रासः । अस्थिरन् । नवतिम् । नाव्याः । अनु ।
महत् । ते । इन्द्र । वीर्यम् । बाह्वोः । ते । बलम् । हितम् । अर्चन् । अनु । स्वऽराज्यम् ॥ ८ ॥

सहस्रं साकमर्चत परि ष्टोभत विंशतिः ।
शतैनमन्वनोनवुरिन्द्राय ब्रह्मोद्यतमर्चन्ननु स्वराज्यम् ॥ ९ ॥

सहस्रम् । साकम् । अर्चत । परि । स्तोभत । विंशतिः ।
शता । एनम् । अनु । अनोनवुः । इन्द्राय । ब्रह्म । उत्ऽयतम् । अर्चन् । अनु । स्वऽराज्यम् ॥ ९ ॥

भाषायाम्.

८. [हे इन्द्र], नवतिं नाव्या अनु (=नावा तार्या नवतिं नदीरनु=वृत्रनिरुद्धा वह्वीर्मेघजलरूपा नदीरनु) ते वज्रासः वि अस्थिरन् (=तव वज्रा विविधम् अतिष्ठन्=यत्र यत्र मेघजलान्यासंस्तत्र तत्र तेषां रक्षणाय तव वज्रं बहुत्वमापन्नं सत् अतिष्ठत्) । हे इन्द्र, ते वीर्यं (=तव सामर्थ्यं) महत् (=प्रभूतम्) [अस्ति] । ते बाह्वोः (=तव हस्तयोः स्थाने) बलं हितं (=बलं निहितं वर्तते) । अनु स्वराज्यम् अर्चन् [भवसि] (=त्वं च तेन स्वस्य स्वामित्वं प्रकटयसि) ॥

९. सहस्रं (=सहस्रसंख्याका मनुष्याः) साकम् अर्चत (=युगपदेव अस्तुवन्), विंशतिः (=विंशतिसंख्याका ऋत्विगादयः) परि स्तोभत (=परितः स्थित्वा अस्तुवन्), शताः (=शतसंख्याका मनुष्या) एनम् अनु अनोनवुः (=इन्द्रम् आनुपूर्व्या तुष्टुवुः), इन्द्राय ब्रह्म उद्यतम् (=इन्द्राय तस्मिन् काले हविर्दातुमूर्द्ध्वं धृतम्) । [इन्द्रः] अनु स्वराज्यम् अर्चन् [भवति] (=स्वस्य स्वामित्वं प्रकटयति) ॥

'वज्रधरा'=' अद्रिवः.' 'अद्रिवान्' आणि ' वज्री ' या दोनीहि शब्दांचा अर्थ एकच आहे. 'अद्रिवान्' शब्द (संबोधनीं इंद्रास अथवा वरुणास लाविलेला) वेदांत पुष्कळ मंत्रांत आलेला आहे. आणि ' अद्रि ' म्हणजे वज्र आणि ' अद्रिवान् ' म्हणजे ' वज्रधर ' असा अर्थ सायणाचार्यांनींच पुष्कळ ठिकाणीं केला आहे. एकच अर्थाचे दोन शब्द अर्थदार्ढ्याकरितां योजिलेले आहेत.

८. [हे इंद्रा], नव्वद नद्यांनवळ तुझीं वेगवेगळीं वज्रें राहिलीं. हे इंद्रा, तुझें सामर्थ्य मोठें [आहे], तुझ्या बाहूंच्या ठायीं मोठें बळ स्थापिलेलें [आहे], [आणि तेणेंकरून] तूं आपलें आधिपत्य प्रगट करितोस.

८. Thy different thunderbolts lay along the ninety navigable [rivers]. Great, O Indra, is thy puissance. In thy arms is strength established, [whereby] thou manifestest thy empire.

९. हजारो [लोक] मिळून याचें स्तोत्र गाते झाले, वीसजण याचें स्तवन करिते झाले, शंभरजण याला वाखाणिते झाले. इन्द्रालाच हवि अर्पण केलें, आणि तो [तेणेंकरून] आपलें आधिपत्य प्रगट करिता झाला.

9. A thousand praised [him] in one voice; twenty glorified [him] together. A hundred extolled him one after another. To Indra was sacrifice offered. [And he thereby] manifested his empire.

'मायावी मृगाला'='मायिनं मृगम्.' वृत्राला ज्या कारणासाठीं अहि (सर्प) असें म्हणतात त्याच कारणास्तव त्याला 'मृग' असें म्हणतात. मृगया करणारे लोकांची नजर चुकवून अनेक युक्ति (माया) करून जसा मृग पळतो आणि पारधी अनेक युक्ति (माया) करून त्याला मारितो, तसा वृत्र इंद्राला चुकवून पळूं लागला, पण इंद्रानेंहि अनेक युक्ति (माया) योजून त्याला मारिलें असें कवीचें हृद्य आहे.

वृत्तानुरोधेंकरून पहिले दोन चरण असे म्हटले पाहिजेतः—

इन्द्र तुभ्येमिदद्रिवो
अनुत्तं वज्रिन्वीरिअम् ।

---

८. 'हे इंद्रा, वृत्रानें अवरोधून ठेविलेलीं जीं असंख्य मेघोदकें त्यांच्या रक्षणार्थ तूं आपल्या एकाच वज्राचीं अनेक वज्रें करून एक एक उदकाजवळ एक एक वज्र ठेविलेंस. हे इंद्रा, तुझें वीर्य मोठें आहे, आणि तुझ्या बाहूंच्या ठायीं मोठी शक्तिच जणुं स्थापिलेली आहे. तेणेंकरून तूं आपलें आधिपत्य प्रगट करीत असतोस.'

'नव्वद नद्यांजवळ'='नवतिं नाव्या अनु.' अक्षरशः अर्थ, 'नावा ज्यांत चालतील अशा नव्वद [नद्यां]जव-

इन्द्रो॑ वृ॒त्रस्य॒ तवि॑षीं॒ निर॑ह॒न्त्सह॑सा॒ सहः॑ ।
म॒हत्तद॑स्य॒ पौंस्यं॑ वृ॒त्रं ज॑घ॒न्वाँ अ॑सृज॒दर्च॒न्ननु॑ स्व॒राज्य॑म् ॥
॥ १० ॥ ३० ॥

इन्द्रः॑ । वृ॒त्रस्य॑ । तवि॑षीम् । निः । अ॒ह॒न् । सह॑सा । सहः॑ ।
म॒हत् । तत् । अ॒स्य॒ । पौंस्य॑म् । वृ॒त्रम् । ज॒घ॒न्वान् । अ॒सृ॒ज॒त् । अर्च॑न् । अनु॑ । स्व॒ऽराज्य॑म् ॥ १० ॥ ३० ॥

भाषायाम्.

१०. इन्द्रो वृत्रस्य तविषीं (=बलं) [निरहन्=हतवान्], सहसा सहः निरहन् (=आत्मीयेन आयुधेन तस्य आयुधं हतवान्)। तत् अस्य पौंस्यं महत् (=तत् इन्द्रस्य बलं महत् खलु) [यत् स] वृत्रं जघन्वान् (=वृत्रं हत्वा) [अपः=उदकानि] असृजत् (=अधः पातितवान्)। [तथा कृत्वा स] अनु स्वराज्यम् अर्चन् [अभूत्] (=स्वस्याधिपत्यं प्रादुरभावयत्) ॥

ळ ', म्हणजे नव्वद नद्यांजवळ इतकेंच तात्पर्य. नव्वद नद्या म्हणजे अमुक नव्वद नद्या असें समजावयाचें नाहीं, तर असंख्य इतकाच अर्थ आहे. सू. ५४, मं. ६ याजवरील टीप पहा. नद्या म्हणजे भूमीवरील नद्या समजावयाच्या नाहींत, पण ज्या उदकांच्या योगानें नद्या भूमीवर वाहतात तीं मेघोदकें घ्यावयाचीं आहेत.

' बळ स्थापिलें आहे '=' हितम्,' म्हणजे राहिलें आहे, राहतें असतें इतकाच अर्थ.

दुसरा, तिसरा आणि चवथा हे चरण खालीं लिहिल्याप्रमाणें वाचले पाहिजेतः—

नवतिं नाविआ अनु ।
महत् ते इन्द्र विरिअम् ।
बाहुओस्ते बलं हितम् ।

९. जेव्हां वृत्रावर इंद्राला जय मिळाला त्या वेळेला अनुलक्षून ऋषि म्हणतोः—' इंद्राला जय मिळाला हें पाहून एकदम सहस्रावधि उपासक जन एकत्र मिळून इंद्राचा जयजयकार करिते झाले; इकडे वीस, तिकडे वीस याप्रमाणें कितीएक कवि त्याचें यश वर्णिते झाले, कितीएक ठिकाणीं शेकडो मनुष्यें जमून त्यांतून एकामागून एक असे इंद्राची स्तुति गाते झाले आणि इंद्राला हवि अर्पण करिते झाले. या प्रकारेंकरून इंद्रानें आपलें आधिपत्य प्रगट केलें.'

' हजारो,' ' वीसजण ' आणि ' शंभर ' हीं परिसंख्यावाचक विशेषणें समजावयाचीं नाहींत, तर अपरिमितत्वदर्शक संख्यावाचकें असें समजलें पाहिजे.

चवथा चरण ' इन्द्राय ब्रह्म उद्यतम् ' असा म्हणावा लागतो.

१०. इंद्र वृत्राचें सामर्थ्य [नाहींसें करिता झाला], [आणि आपल्या] आयुधानें [त्याचें] आयुध मोडून टाकिता झाला. [तो जो] वृत्राला मारिता झाला [आणि उदकें] [खालीं] सोडिता झाला हा त्याचा मोठा पराक्रम [होय], आणि [तो तेणेंकरून] आपलें आधिपत्य प्रगट करिता झाला.

10. Indra [broke] the strength of Vṛitra, broke [his] weapon with [his] weapon. That is his great heroism that he slew Vṛitra and let down the waters, [thereby] manifesting his empire.

---

१०. 'इंद्रानें आपल्या बळानें वृत्राचें बळ नाहींसें केलें आणि आपल्या आयुधानें त्याचें आयुध मोडून टाकिलें आणि वृत्राला मारून त्याणें कोंडून ठेविलेलीं जीं मेघोदकें तीं मुक्त करून खालीं सोडून देता झाला. हा जो इंद्रानें पराक्रम केला तो मोठा होय आणि तेणेंकरून त्याणें या जगावर आपलें आधिपत्य आहे असें सिद्ध करून दाखविलें,' असा कवीचा भावार्थ आहे.

वृत्रसुखासाठीं 'वृत्रं जघन्वॉन् असृजत्' असा उच्चार केला पाहिजे.

इमे चित्तव मन्यवे वेपेते भियसा मही ।
यदिन्द्र वज्रिन्नोजसा वृत्रं मरुत्वाँ अवधीरर्चन्ननु स्वराज्यम्॥११॥

इमे इति । चित् । तव । मन्यवे । वेपेते इति । भियसा । मही इति ।
यत् । इन्द्र । वज्रिन् । ओजसा । वृत्रम् । मरुत्वान् । अवधीः । अर्च-
न् । अनु । स्वऽराज्यम् ॥ ११ ॥

न वेपसा न तन्यतेन्द्रं वृत्रो वि बीभयत् ।
अभ्येनं वज्र आयसः सहस्रभृष्टिरायतार्चन्ननु स्वराज्यम् ॥ १२ ॥

न । वेपसा । न । तन्यता । इन्द्रम् । वृत्रः । वि । बीभयत् ।
अभि । एनम् । वज्रः । आयसः । सहस्रऽभृष्टिः । आयत । अर्चन् ।
अनु । स्वऽराज्यम् ॥ १२ ॥

भाषायाम्.

११. हे इन्द्र, हे वज्रिन्, यद् (=यदा) मरुत्वान् (=मरुद्युक्तः=मरुत्सहायः सन्) [त्वम्] ओजसा (=स्वबलेन) वृत्रम् अवधीः (=हतवानसि) [तदा] भियसा (=भयेन) तव मन्यवे (=त्वदीयकोपात्) इमे मही चित् (=इमे पुरोदृश्यमाने द्यावापृथिव्यावपि) कम्पेते (=कम्पिते अभवताम्)। अनु स्वराज्यम् अर्चन् [अभवः] (=तेन च त्वं स्वस्याधिपत्यं प्रकटयसि स्म)॥

१२. वृत्रः न वेपसा इन्द्रं वि बीभयत् (=इन्द्रं स्वकीयेन वेपथुना भीतं नाकरोत्=कर्तुं न समर्थोऽभूत्) न तन्यता (=स्वकीयेन घोरेण गर्जनेनापि न) [वि बीभयत्=भीतं नाकरोत्]। [अपि तु] एनं (=वृत्रम्) आयसः (=अयोमयः) सहस्रभृष्टिः (=सहस्रधारायुक्तो) वज्रः (=इन्द्रस्यायुधम्) अभि आयत (=अभ्यपतत्)। [तेन च इन्द्रः] अनु स्वराज्यम् अर्चन् [अभवत्] (=स्वस्याधिपत्यं प्रादुरभावयत्)॥

११. हे इंद्रा, हे वज्रधरा, तूं जेव्हां मरुतांच्या साहाय्यानें [आपल्या] बळेंकरून वृत्राला मारिता झालास [तेव्हां] ह्या प्रचंड [द्यावापृथिवी] सुद्धा तुझ्या क्रोधाला भिऊन कंपायमान झाल्या; आणि [तेणेंकरून तूं] आपलें आधिपत्य प्रगट करिता झालास.

11. Even these vast [Heaven and Earth] trembled with fear at thy rage, when O Indra, O wielder of the thunderbolt, thou, accompanied by the Maruts, didst slay Vritra with thy might, manifesting thy empire.

१२. [आपल्या] क्षोभानें [अथवा आपल्या] घोर गर्जनेनें सुद्धा वृत्र इंद्राला भिववूं शकला नाहीं. [तर इंद्राचेंच] सहस्रधारांचें लोहमय वज्र याच्या अंगावर पडलें. आणि [तेणेंकरून तो] आपलें आधिपत्य प्रगट करिता झाला.

12. Nor with [his] agitation nor with [his] roaring could Vritra terrify Indra. [But] on him fell [Indra's] adamantine thunderbolt of a thousand edges, manifesting Indra's empire.

११. 'इंद्रानें महा क्रोधेंकरून वृत्राला मारून टाकिलें तेव्हां हा विस्तीर्ण भूलोक आणि त्याहूनहि हा वरचा विस्तीर्ण द्युलोक हे दोनीहि भीतीनें थरथर कांपले, मग इतर पदार्थ कंपायमान झाले म्हणून काय सांगावयाचें आहे ? या प्रकारेंकरून इंद्र आपलें आधिपत्य या सर्व जगतावर आहे असें सिद्ध करिता झाला.'

'मरुतांच्या साहाय्यानें'=' मरुत्वान्'. अक्षरशः अर्थ, 'मरुतांसहित [होत्साता तूं]' असा आहे. इंद्रानें वृत्र मारिला तेव्हां मरुतांनीं इंद्राला साहाय्य केलें हें वेदांत सर्वप्रसिद्ध आहे.

वृत्तसुखासाठीं चवथा चरण 'वृत्रं मरुत्वाँ अवधीः' असा वाचावा.

१२. 'इंद्र वृत्राबरोबर युद्ध करूं लागला तेव्हां वृत्रानें सर्व जगत् हालविलें आणि मेघगर्जनेसारिखी मोठी घोर गर्जना करूं लागला. पण त्याला इंद्र भ्याला नाहीं. उलटें इंद्राचेंच वज्र वृत्रावर जाऊन पडलें—जें वज्र लोखंडाप्रमाणें जड आणि हजार धारांचें असें होतें. याप्रमाणें वृत्राचा नाश करून इंद्रानें आपलें आधिपत्य जगताला उघड करून दाखविलें.'

43001

यद्वृत्रं तव चाशनिं वज्रेण समयोधयः ।
अहिमिन्द्र जिघांसतो दिवि ते बद्बधे शवोऽर्चन्ननु स्वराज्यम् ॥
॥ १३ ॥

यत् । वृत्रम् । तव । च । अशनिम् । वज्रेण । सम्ऽअयोधयः ।
अहिम् । इन्द्र । जिघांसतः । दिवि । ते । बद्बधे । शवः । अर्चन् ।
अनु । स्वऽराज्यम् ॥ १३ ॥

अभिष्टने ते अद्रिवो यत्स्था जगच्च रेजते ।
त्वष्टा चित्तव मन्यव इन्द्र वेविज्यते भियार्चन्ननु स्वराज्यम् ॥ १४ ॥

अभिऽस्तने । ते । अद्रिऽवः । यत् । स्थाः । जगत् । च । रेजते ।
त्वष्टा । चित् । तव । मन्यवे । इन्द्र । वेविज्यते । भिया । अर्चन् ।
अनु । स्वऽराज्यम् ॥ १४ ॥

भाषायाम्.

१३. यद् (=यदा) वृत्रं तव अशनिं च (=त्वया प्रक्षिप्तं वैद्युतमग्निं च), वज्रेण (=तवायुधविशेषेण) समयोधयः (=परस्परम् अयोधयः) [तदा] हे इन्द्र, अहिं जिघांसतः (=वृत्ररूपं सर्पं हन्तुमिच्छतः=वृत्ररूपं सर्पं हन्तुं प्रवृत्तस्य तव) शवः (=बलं) दिवि बद्बधे (=अनुस्यूतमासीत्=व्याप्तमभूत्) [तेन च त्वम्] अनु स्वराज्यम् अर्चन् [अभूः] (=स्वस्याधिपत्यं प्रादुरभावयः) ॥

१४. हे अद्रिवः, ते (=तव) अभिस्तने [सति] (=सिंहनादे सति) यत् स्थाः [यत्] जगत् च (=यत् किमपि स्थावरं जङ्गमं च) [वर्तते] [तत्सर्वं] रेजते (=कम्पते)। [तव वज्रस्य निर्माता] त्वष्टा चित् (=त्वष्टा देवोपि) तव मन्यवे भिया (=तव क्रोधाद् भीत्वा) वेविज्यते (=भृशं कम्पते)। [एवं त्वम्] अनु स्वराज्यम् अर्चन् [भवसि] (=स्वाधिपत्यस्य प्रकटयिता भवसि) ॥

इंद्राला साहाय्य करणारे मरुत् जसें सर्व जग हालवितात तसें सर्व हालवून देण्याची शक्ति वृत्राला होती, आणि इंद्र जशी मेघगर्जनारूप घोर गर्जना करितो तशीच वृत्रहि करूं शकतो असें मनांत ठेवून हा मंत्र रचिला आहे. वृत्र हा सामान्य शत्रु नव्हता, तर इंद्राला जशी अपार शक्ति आहे त्याच्या जवळ जवळ वृत्रालाहि आहे अशाविषयीं पूर्वीं सांगितलेंच आहे. (सू. ५२, मं. ५ याजवरील

पौष ता. १ पासून ता. ३० नव्हेंबरपर्यंत.

	रु. आ.
रा. ब. गोपाळराव गोविंद फाटक, सब. जज्ज....	६-६
,, ,, भोलानाथ साराभाई.	१२-१२
,, ,, गोपाळराव हरि देशमुख जाईंट जज्ज....	१०-१०
रा. सा. घनश्याम नीळकंठ नाडकर्णी, मुंबई.	६-०
,, ,, वासुदेव जगन्नाथ कीर्तिकर, मुंबई.	६-०
,, ,, गणपतराव नारोबा पितळे, मुंबई.	६-०
,, ,, श्रीधर गुंडो, मामलेदार...	१२-१२
रा. रा. वेनिशंकर, हेडमास्तर.	६-६
,, ,, सीताराम गोपिनाथजी, मुंबई....	३०-०
,, ,, नारायणराव महादेव परमानंद, मुंबई....	६-०
,, ,, धोंडो शामराव गरुड, जज्ज	६-६
,, ,, गणेश नरसिंह जोशी, मुंबई.	६-०
,, ,, गंगाधर चिंतामण भिडे.	१२-१२
,, ,, गोपाळराव हरि भिडे, वकील....	६-६
,, ,, रामचंद्र सदाशिव जोगळेकर, सुपरवैझर.	६-६
,, ,, शांताराम नारायण वकील, मुंबई.	६-०
,, ,, नारायण विश्राम दळवी, मुंबई.	६-०
,, ,, जवेरीलाल उमियाशंकर, मुंबई....	६-०
,, ,, जयसत्यबोधराव तिरमलराव, मुंबई.	६-०
,, ,, अण्णाजी बापूराव अनगळ, मुंबई.	६-०
,, ,, वासुदेव जगन्नाथ उर्फ तात्या शास्त्री, मुंबई.... ...	६-०
,, ,, केशव बाळकृष्ण पटवर्धन.	६-६
,, ,, हरि महादेव पंडित. ... ..., ...	६-०
,, ,, राघवेंद्र श्रीनिवास वाळवेकर....	६-६
,, ,, जनार्दन बाळाजी मोडक, असि. मा.	६-०
,, ,, दासो श्रीधर जोशी, हेडमास्तर.	६-६
,, ,, अनंदराव सखाराम बर्वे, जज्ज....	६-६
,, ,, नारायण पांडुरंग आकटे.	६-०
,, ,, केशवराव महादेव, ओव्हरसियर	६-६
,, ,, नारायण अनंत उकिडवे, कान्सरवेटर....	१३-८
,, ,, जगन्नाथ इच्छाराम.....	६-६
,, ,, गोविंदराव जिवाजी देशपांडे....	६-०

Registered No. 98 of 1877.

	रु.आ.
रा. रा. बापुजी दिनानाथ मुंबई.	६- ०
,, ,, पांडुरंग राघोबा शेट, मुंबई.	६- ९
,, ,, त्रिंबक सदाशिव ठाकूर, मुंबई.	६- ०
,, ,, पांडुरंग रामनाथ खोटे, मुंबई.	६- ०
,, ,, कृष्णराव अंतोबा चेंबुरकर.	६- ०
आनरेबल, आर. वेस्ट साहेब जज्ज हायकोर्ट मुंबई.	१२- ०
,, नानाभाई हरिदास.	६- ०
हीजहायनेस, महाराजा त्रावणकोर.	२६- ९
,, महाराजा रणजितसिंगजी.	६- ६
रेवरेंड डि. मेकेशन साहेब, मुंबई.	६- ०
,, जान स्माल साहेब फ्रीचर्चमिशन.	६- ६
,, जी शर्ट साहेब.	६- ६
,, जोजेफ मार्टिन साहेब, मुंबई.	६- ०
श्रीमंत कारभारी साहेब, गुधोळ.	५१- ०
,, कारभारी साहेब, मिरज.	५१- ०
मेहेरबान चीफ कमिशनर साहेब, म्हैसूर.	६३-१२
श्रीमंत भिकाजी गणेश.	१३- ८
डा. भाऊ शिरके.	६- ६
डे. डा. कुन्हा साहेब, मुंबई.	६- ०
,, यशवंत पांडुरंग गोडबोले.	६- ०
बांबे ब्र्यांच आफ धी रायल एशियाटिक सोसायटी.	६- ०
कलकत्ता एशियाटिक सोसायटी.	६- ६
नेटिव लायब्ररी, मंडलेश्वर.	६- ६
,, जनरल लायब्ररी, नागपूर.	६- ६
शेट लखमीदास खिमजी, मुंबई.	६- ६
मे. शेरीअरजी दादाभाई म[illegible]च्या.	६-४॥

विशेष सूचना.–आमच्या कितीएक वर्गणीदाराकडे गेल्या वर्षाची बाकी येणें आहे ती त्यांणीं मेहेरबानी करून लवकर पाठवून द्यावी.

तिकीटें पाठविणें झाल्यास अर्धा आणा दराचीं असून दर रुपयास अर्धा आणा वर्तावळा असावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

292
20II

42,462

42575

ARCHIVES DATA BASE
2011 - 12